# लातुरातील संगीतरत्ने

लेखक

**प्रा. डॉ. संदिपान गुरूनाथ जगदाळे**

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

**मैत्री प्रकाशन, लातूर**

# लातुरातील संगीतरत्ने

Laturatil Sangeetratne


| | |
|---|---|
| **लेखक** | : प्रा. डॉ. संदिपान गुरूनाथ जगदाळे |
| **ISBN** | : ९७८-९३-८४८१०-३८-२ |
| **प्रकाशक** | : मैत्री प्रकाशन, देशपांडे गल्ली, लातूर |
| **सर्व हक्क** | : लेखकाधिन |
| **प्रथम आवृत्ती** | : २६ जानेवारी २०१९ |
| **मुद्रक** | : आर्टी ऑफसेट, लातूर |
| **अक्षरजुळणी** | : पारीख विजय जितेंद्र, मो.९७६५०६१९७५. |
| **मुखपृष्ठ** | : शिवाजी हांडे |
| **प्रमुख वितरक** | : ओंकार बुक सेलर्स, रो हाऊस नं.१०० 'साईधाम सोसायटी', न्यू खाडगांव रोड, लातूर-४१३५३१, भ्रमणध्वनी - ८२७५४५४६९६ |

मूल्य : रु.१२०/-






*लातूर जिल्ह्यातील*
*सर्व*
*संगीत रत्नांना*
*कृतज्ञतापूर्वक अर्पण.*

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१. | मराठवाड्याची सांगीतिक पृष्ठभूमी | ००७ |
| ०२. | लातूर जिल्ह्यातील सांगीतिक स्थिती | ०१३ |
| ०३. | पं. रामदासजी अनवले | ०४८ |
| ०४. | पं. कोंडिबा नागोराव बोळंगे | ०६१ |
| ०५. | पं. शांतारामजी चिगरी | ०८३ |
| ०६. | डॉ. राम बोरगावकर | ११९ |
| ०७. | पं. बाबुराव बोरगावकर | १५४ |
| ०८. | पं. विठ्ठलरावजी जगताप | १९२ |
| ०९. | पं. पांडुरंगजी मुखडे | २०८ |
| १०. | पं. मुकेश जाधव | २४१ |
| ११. | श्री. गोपाळ उगीले (जाधव) | २५८ |
| १२. | श्री. अंगद गायकवाड | २६७ |
| १३. | श्री. राजेंद्र भोसले | २७० |
| १४. | उपसंहार | २७४ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २८३ |




# मनोगत

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, वाङ्मय कला शाखेअंतर्गत संगीत विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध ग्रंथरूपाने प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होत आहे. **लातूर जिल्ह्यातील निवडक अभिजात गायक-वादकांद्वारे भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रचार : एक अभ्यास** (१९८० ते २०१३) हा प्रस्तुत विषय मी संशोधनासाठी निवडला. कारण मी १९८८ पासून लातूर येथे पं. शांतारामजी चिगरी गुरुजींकडे अभिजात संगीताच्या अध्यापनास प्रारंभ केला. पुढे १९९९ पासून दयानंद कला महाविद्यालयातील संगीत विषयाचा अध्यापक म्हणून कार्य करू लागलो. या काळात मी पाहिले की लातूर जिल्ह्यात अनेक थोर व्यासंगी व विद्वान संगीततज्ज्ञ आहेत; परंतु त्यांच्या कार्याची नोंद कोठेही झाली नसल्याचे मला आढळून आले. त्यांच्या कार्याची व अभिजात संगीताच्या प्रचार-प्रसारार्थ केलेल्या परिश्राची मांडणी कुठे तरी करावी या हेतूने मी हा विषय निवडला आहे. कसल्याही प्रकारच्या सांगीतिक सुविधा नसताना ज्यांनी आपल्या रक्ताघामाने अभिजात संगीताचा वृक्ष जोपासला, त्यांच्या परिश्रमाचे पोत उलगडून संशोधनाच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा आढावा मांडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न मी केला आहे.

प्रस्तुत विषय घेऊन मी माझ्या मार्गदर्शिका प्रा. डॉ. स्नेहल शेंबेकर यांच्याकडे गेलो असता त्यांनी मला या विषयावर काम करण्याची संधी दिली आणि मला त्यांनी सतत वेळोवेळी अनमोल मार्गदर्शन केले.

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करताना मला दयानंद शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सरचिटणीस मा. श्री. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव श्री. सुरेशजी जैन व संस्थेच्या सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी मानसिक बळ दिले. त्यामुळे मी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो.

दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, उपप्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, कार्यालयीन अधिक्षक श्री. नवनाथ भालेराव, संगीत विभागप्रमुख प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी या सहकारी गुरुजनांचे व मित्रांचे तसेच ग्रंथपाल सौ. वीणा कुलकर्णी व

श्री. श्रीकांत जोशी या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या शोध निबंधाचे कार्य करताना माझे गुरु पं. शांतारामजी चिगरी, डॉ. राम बोरगांवकर, पं. बाबूराव बोरगांवकर, पं. विठ्ठलराव जगताप, प्रा. कृष्णा अनवले, पं. पांडुरंग मुखडे, पं. मुकेश जाधव, प्रा. अंगद गायकवाड, श्री. राजेंद्र भोसले व श्री. गोपाल जाधव यांनी मला वेळोवेळी सर्वतोपरी मदत करुन सहकार्य व मार्गदर्शन केले.

मला सतत प्रेरणा देणारी माझी आई श्रीमती मंगल जगदाळे, माझे वडीलबंधू संतोष जगदाळे, माझे मनोबल वाढविणारे माझे सासरे प्राचार्य डॉ. चंद्रसेन मोहिते यांचेही मला सतत मार्गदर्शन मिळाले. माझ्या वैवाहिक जीवनात मला सतत प्रेरणा देणारी व माझ्या आयुष्यातील अडचणींच्या काळात माझे मनोबल वाढविणारी माझी धर्मपत्नी सौ. अभिश्री जगदाळे, माझा मुलगा अधिराज व मुलगी अनन्या यांचेही या शोधकार्यात मोलाचे योगदान आहे.

याशिवाय मी माझे संशोधन कार्य पूर्ण करावे म्हणून मला सतत विचारणारे माझे विद्यार्थी, तसेच शोधनिबंधाची अक्षर जुळवणी करणारे श्री.विजय जितेंद्र पारीख, शिवाजी पांचाळ व सौ. मीनाक्षी कोळी यांनी वेळेवर टंकलेखन करुन दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या शोध निबंधास लेखन व व्याकरण दृष्ट्या तपासून शुद्ध लेखन वेळेवर तपासून दिलेले श्री. शरद वा.खर्चे, मैत्री प्रकाशनच्या कु.संगीता मोरे यांनी हा ग्रंथ वेळेत प्रकाशित केला त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार. श्री.शिवाजी हांडे यांनी या ग्रंथाला अतिशय सुंदर व कल्पक मुखपृष्ठ काढून दिले, त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

ज्यांचा इथे उल्लेख केलेला नाही त्यांची यादी खूप मोठी आहे. त्या सर्वांचेच ऋण हेच माझे संचित आहे. या धनाच्या बळावरच हा शोधनिबंध पूर्ण झाला आहे. या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

लेखक

**डॉ. संदिपान जगदाळे**

लातूर



# प्रकरण १

# मराठवाड्याची सांगीतिक पृष्ठभूमी

**प्रस्तावना :**

संगीत ईश्वर आहे, आनंद आहे, आध्यात्म आहे. संगीत करूणा आहे, प्रेम आहे, वात्सल्य आहे आणि माधुर्य आहे. संगीत म्हणजे जीवनाचा प्राण आहे. रोजच्या घाई-गर्दीच्या आणि कामाच्या धबडग्यात, चिंतेच्या वणव्यात अन् निरस आयुष्यात प्राण फुंकण्याचे कार्य करते ते केवळ संगीतच. संगीतामुळे आपले जीवन सुसह्य झाले आहे.

खरोखरच मानवी जीवन आणि संगीताचा घनिष्ठ असा संबंध आहे. अगदी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संगीत मानवाच्या जीवनात महत्त्वाची भूमिका निभावत असते. आई आपल्या बाळाला अंगाईगीत गाऊन थोपटत असते. यातून त्याला स्वरांची व तालांची ओळख होते. एवढेच नव्हे तर मानवाच्या मृत्यूनंतर त्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून भजन, कीर्तन यांसारखे संगीतप्रकार गाऊन ईश्वरचरणी प्रार्थना केली जाते.

**'साहित्य संगीत कलाविहीनः**
**साक्षात पशुपुच्छविषाणहीन' -भर्तृहरि**

किती यथार्थता आहे भर्तृहरि यांच्या श्लोकात! ते म्हणतात, "साहित्य, संगीत आणि कला याचा गंध नसलेली जी व्यक्ती आहे ती शिंगे व शेपटी नसलेल्या पशुसमान आहे.

संगीत हे ईश्वरप्राप्तीचे साधन मानले जाते. भौतिक सुख-दुःख विसरून मन ईश्वरभक्तीत एकरूप करणे हे आध्यात्माचे अंतिम साध्य असते. संगीत हे आनंदाचा अविर्भाव आहे. आनंद हे ईश्वराचे स्वरूप आहे. जे लोक संगीताचा अभ्यास करतात त्यांना तप, योग, कर्म, दान, धर्म, व्रत, वैकल्य, होम-हवन अशी कष्टप्राय साधने न वापरता केवळ संगीताची साधना केल्यामुळे मोक्षप्राप्ती होते म्हणूनच याज्ञवल्क्य ऋषींनी

असे लिहून ठेवले आहे की,

**वीणावादन तत्त्वज्ञः श्रुतिजाती विशारदः।**
**तालज्ञस्य प्रयासेन मोक्षमार्ग निगच्छती।**

याचाच अर्थ वीणावादनाचे तत्त्व जाणणाऱ्या, श्रुति-जातींमध्ये पारंगत असलेल्या व तालांचे उत्तम ज्ञान असलेल्या मानवाला प्रयासावाचून मोक्षप्राप्ती होते.

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्याची सांगीतिक पृष्ठभूमी पाहण्यापूर्वी संगीत म्हणजे काय? संगीताचा उगम कसा झाला? याचा थोडक्यात परामर्श घेता येईल.

***	संगीताची उत्पत्ती :**

संगीताची उत्पत्ती "सम गै (गाना)+कत" अशी आहे. अर्थात "गै" धातूमध्ये "सम" उपसर्ग लावल्याने हा शब्द बनतो. "गै" चा अर्थ गाना आणि "सम्"(सं) एक अव्यय ज्याचा व्यवहार समानता, संगति, उत्कृष्ट, पूर्ण तसेच औचित्यपूर्ण ढंगाने गायन असा मानला जाऊ शकतो.

संगीत शब्द "गीत" मध्ये सम् उपसर्ग लावून बनला आहे. सम् म्हणजे 'सहित' आणि 'गीत' म्हणजे 'गान' . 'गान सहित' म्हणजे अंगभूत क्रिया (नृत्य) व गायनाबरोबर केलेले कार्य म्हणजेच संगीत होय.

**"नृत्य वाध्यानुगं प्रोक्तं वाद्यं गीतानुवृत्तिचा।**
**अतो गीत प्रधानत्त्वा दत्रा दाव भिधीयते।।"**

याचाच अर्थ गायनाच्या अधीन वादन आणि वादनाच्या अधीन नर्तन आहे. या कलांमध्ये गायनाला प्राधान्य दिले आहे.

संगीताची व्याख्या करताना पं. शारंगदेव यांनी 'संगीत रत्नाकर' या ग्रंथात

**"गीतं, वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतगच्यते"**

अशी केलेली आहे. म्हणजेच गायन, वादन व नृत्य या तिन्ही कलांच्या सुंदर संगमास संगीत असे म्हणतात. मध्यकालीन संगीत ग्रंथकारांनीसुद्धा उपरोक्त आधाराचेच अनुकरण केले आहे.

**गीत वादित्र नृत्याना त्रयं संगीत मुच्यते।**
**गानस्या त्र प्रधानत्त्वा तच्छंगीतमिततम**
**नारदन कृत शास्त्रं मकरन्दाख्य मुक्तमम्**



पाश्चिमात्य देशात संगीतासाठी म्युजिक शब्दाचा प्रयोग केला गेला. म्युझिक शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द मौसिक पासून मानतात. वास्तविक पाहता म्यूज शब्द मूळ आहे. ग्रीक परंपरेत विविध ललित कलेच्या अधिष्ठात्री देवीस ही संज्ञा वापरली जाते. अरबी परंपरेत संगीताला समानार्थी शब्द "मुसिका" आहे. याची उत्पत्ती 'मूसिका' शब्दापासून मानली जाते.

युनानी भाषेत आवाजाला 'मूसिका' असे म्हणतात त्यामुळे "इल्मे मूसीका" (संगीत कला) "आवाजो" याचा अर्थ रागांचा इल्म म्हटले जाऊ लागले.

***	संगीताचा आरंभ :**

हिंदू धार्मिक परंपरेनुसार संगीताचे ज्ञान सर्वप्रथम ब्रह्मदेवाने शंकराला दिले. शंकराने विद्या, बुद्धी व कलेची अधिष्ठात्री सरस्वती मातेला दिले. सरस्वतीने नारदाला, नारदाने भरत, हनुमान इ. ऋषींना दिले त्यानंतर संगीताचा प्रचार भूलोकात झाला.

प्राचीन काळात संगीताच्या जागी गांधर्व शब्दाचा प्रयोग दिसून येतो. वाल्मिकी 'रामायण' मध्ये लवकुश यांच्या रामायण गायनास "गांधर्व" शब्दाचा प्रयोग दिसून येतो. जो गायकांच्या रूपात घेतला आहे. दन्तिकं यांच्यानुसार - गांधर्वाचे आदी प्रवचनकार स्वयंभू ब्रह्मा आहेत.

अन्य परंपरेनुसार संगीताचा उगम पशु-पक्ष्यांच्या ध्वनीने झाला. मतंग यांच्या बृहद्देशीमध्ये कोहल (बुलबुल)च्या नावाने संगीताचे ज्ञान होते.

**षड्ण वदति मयुर ऋषभं चतको वदेता।**
**अजा वदति गांधार क्रौंचो वदति मध्यमम्।।**
**पुष्प साधारणे काले कोकिलाः पंचमोवदेत।**
**प्रावृट काले तु सम्प्राप्ते धैवतं दुदुरौवदेत।।**

पशुपक्षी व निसर्गातील विविध ध्वनींना ऐकून तसेच त्यांच्या मंजुळतेची अनुभूती घेऊन स्वतः आपणही गावे अशी प्रेरणा आदीम मानवाला झाली असावी यात आश्चर्य वाटायला नको. याचाच अर्थ शिकार करताना अथवा युद्धप्रसंगी धनुष्याच्या प्रत्यंचीच्या टणत्कारातून तंतुवाद्याची निर्मिती त्याने केली असावी अशी कल्पना केली जाऊ शकते. नाट्यशास्त्रानुसार मृदंगवाद्याची परिकल्पना पानावर पडणाऱ्या जलबिंदूच्या आघात शब्दातून झाली आहे.

संगीताचा उगम मानव जातीच्या उगमाबरोबरच झाला. मानवाच्या जन्माबरोबरच त्याच्या कंठातून ध्वनीची निर्मिती झाली. गायन याच ध्वनीचे रूपांतर आहे. मानवाचा कंठ स्वयं एक वाद्य आहे ज्याच्यात स्वरांच्या सूक्ष्मतेला आत्मसात करण्याची शक्ती आहे.

### * संपन्न मराठवाडा :

प्राचीन महाराष्ट्राचे केंद्रस्थान असलेल्या या प्रदेशास प्राप्त झालेली 'मराठवाडा' ही भौगोलिक संज्ञा म्हणजे ऐतिहासिक अपघातांची निष्पत्ती होय. या शब्दाचे 'मराठ' हे पूर्वपद महाराष्ट्र या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रूप असून त्याचे उपपद 'वाडा' हे 'वाटक' या संस्कृत शब्दाचे तद्भाव होय. 'मराठवाडा' हे प्रादेशिक नाव असून तो शब्दप्रयोग आधुनिक आहे. मराठवाडा याचा अर्थ मराठी भाषिकांचा प्रदेश. हैद्राबाद निजाम सरकारने प्रथमतः उपयोगात आणला. आजचा मराठवाडा हा औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, परभणी, नांदेड आणि हिंगोली अशा आठ जिल्ह्यांचा असून महाराष्ट्राचा एक प्रशासकीय महसूल विभाग आहे. मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाला असला तरी त्याचे प्रादेशिक नाव अद्यापही टिकून आहे.

महाराष्ट्राच्या सुसंगत प्राचीन इतिहासाची सुरुवात सातवाहन काळापासून होते... इ. स. पूर्वी २३६ ते इ. स. ३३० अशी ४६० वर्षे राज्य करणारे संपूर्ण भारतातील हेच एकमेव राजघराणे होय. हे सातवाहन घराणे मूळचे पैठणचे असल्याचे लोकपरंपरा मानते. प्राचीन महाराष्ट्र म्हणजेच पैठणचा परिसर होय. हे तर ऐतिहासिक साधनांच्या आधारे सिद्ध झाले आहे. इथली बाजारपेठ व व्यापारी केंद्र समृद्ध असल्याचे पुराणे अवशेष उपलब्ध होतात. रेशमी वस्त्रे, सोने-नाणे आदींसाठी दूरदूरच्या देशातील लोक येथे येत. या व्यापारी पेठांमध्ये पैठण, तेर, भोकरदन या शहरांचा प्रामुख्याने इतिहासकार व परकीय प्रवाशांनी लिहिलेल्या प्रवास वर्णनात उल्लेख करण्यात आलेला आहे. तेरचा सर्वात प्राचीन उल्लेख Periplus of the Erythraeovn sea या इजिप्शियन ग्रीक वंशाच्या कोण्या अनामिक लेखकाच्या ग्रंथात आढळतो. तद्नंतर पैठण व नगर (देवगिरी) या दक्षिण पंथातील दोन बाजारपेठा होत्या. मराठवाड्याच्या परिसरात विविध कालखंडात जे उत्खनन झाले. त्या उत्खननात सापडलेल्या अवशेषाद्वारे व पुराव्यावरून मराठवाड्यात प्राचीन काळातही संपन्नता होती हे सिद्ध होते.

अजिंठ्याची कोरीव लेणी व तेथील चित्रकला यांना इ. स. पूर्व पहिल्या शतकात प्रारंभ झाला आणि ते काम इ.सनाच्या सातव्या शतकापर्यंत चालू राहिले. वरील क्र.१० चे



लेणे सातवाहन काळचे आहे, तर १६, १७ व १९ ही लेणी वाकाटकांच्या काळातली आहेत. ही तीन लेणी भारतातल्या कोणत्याही लेण्यांपेक्षा जास्त सुंदर आहेत असे बर्जेस या पाश्चात्त्य कोविदाने म्हटले आहे. राष्ट्रकूट काळातले सर्वात श्रेष्ठ लेणे म्हणजे कैलास लेणे होय. हे लेणे सर्व जगात अद्वितीय व अलौकिक असे शिल्प मानले जाते.

सातवाहनानंतर या परिसरात वाकाटक राजवंशाने राज्य केले. हे राजघराणे महाराष्ट्रात इ. स.२५० ते इ. स.५५० या काळात होऊन गेले. नांदेडचा 'नंदीतर' असा उल्लेख याच काळात मिळतो. आठव्या शतकात राष्ट्रकूट सत्तेचा उदय झाला व त्यांनी संपूर्ण मराठवाडा आपल्या वर्चस्वाखाली आणला. आपली राजधानी म्हणून वेरूळची निवड केली.

देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी तीन आणि महाराष्ट्रातील चार शक्तिपिठांपैकी तीन पीठे मराठवाड्यात असावीत हा केवळ योगायोग मानावा का? प्राचीन शिल्प, स्थापत्य आणि चित्रकलांचा उत्कर्ष मराठवाड्याच्या भूमीत झाला. ज्योतिष, धुरंदर राजकारणी व संतमहंताच्या पदस्पर्शाने मराठवाड्याची भूमी पावन झाली. मराठीतील सर्व संत कवींनी तर जणू या भूमीत जन्म घेण्यासाठी परमेश्वरालाच साकडे घातले होते की काय असे वाटते. मराठवाड्याची भूमी ही साधू-संतांची भूमी म्हणून देशाच्या इतिहासात ओळखली जाते. या भूमीने संत ज्ञानेश्वरांपासून ते संत नामदेवांपर्यंत देशाला संत दिले. या संतांनी भक्तिमार्गाचा मळा फुलविला. लोकांना आध्यात्माची प्रेरणा देऊन समाजात जागृती केली. त्यांच्या साहित्यातून समाजाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. धार्मिक व आध्यात्मिक प्रेरणा वाढीस लागल्या. अशा या संपन्न मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याची माहिती पाहू...

### लातूर जिल्हा :

रत्नापूर या नावाने ओळखले जाणारे लातूर हे शहर मांजरा नदीकाठी विसावलेले आहे. अगदी सुरुवातीला इथली बाजारपेठ श्रीमंत होती त्यामुळे ही नगरी व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध होती. पाहता-पाहता ही नगरी 'शिक्षणाची पंढरी', 'शिक्षणाचे माहेरघर', 'मराठवाड्याचे नालंदा' म्हणून नावारूपाला आली. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी तर लातूरला 'महाराष्ट्राचे ऑक्सफर्ड' म्हणून गौरविले. यातून एक नवा शिक्षणाचा लातूर पॅटर्न निर्माण झाला. महाराष्ट्रच नव्हे तर देशभरातून हजारो विद्यार्थ्यांचे पाय लातूरच्या दिशेने वळू लागले. एवढेच नव्हे तर अनेक प्राचीन मंदिराने नटलेली ही नगरी तीर्थक्षेत्र म्हणून सर्वांना परिचित झाली. विविध किल्ले व लेण्या इतिहासाच्या दैदीप्यमान परंपरेची

साक्ष देताना दिसतात. मराठवाड्यातील संगीत व नाट्य चळवळीचे प्राचीन केंद्र अशीही लातूरची ख्याती आहे. थोर धुरंधर राजकारण्यांनी या जिल्ह्याचीच नव्हे तर महाराष्ट्र व देशाची मान उंचावली. साखर उद्योगात महाराष्ट्रातील सर्वोच्च उत्पादन करणारे शहर म्हणून लातूरने आपला ठसा उमटविला आहे. तेल व डाळीच्या व्यवसायातसुद्धा हे शहर अग्रणी ठरलेले आहे. साहित्य, चित्र, क्रीडा व चित्रपट क्षेत्रांतही आपली वेगळी मोहर उमटवून या जिल्ह्याने आपली ख्याती सर्वदूर पोहोचविली आहे. जागृत, संवेदनशील व सुसंस्कृत नागरिकांचे शहर म्हणूनही याची प्रतिमा आहे. या सर्व कारणांमुळे लातूर जिल्ह्याने यशाची व प्रगतीची गरूड भरारी मारली. मराठवाड्याची उपराजधानी होऊ पाहणाऱ्या या लातूर नगरीला, प्राचीन परंपरेसोबतच दिव्य इतिहास लाभलेला आहे. या शहराचा दैदीप्यमान इतिहास पाहण्यासाठी आपल्याला भूतकाळात डोकावून इतिहासाची पाने उलगडून पहाव लागेल.

♦ ♦ ♦



# प्रकरण २

# लातूर जिल्ह्यातील सांगीतिक स्थिती

* **लातूरचा इतिहास :**

लातूर शहरात अगदी पुराश्म युगापासून मानवी वस्ती होती याचे दाखले मिळतात. मांजरा नदीच्या परिसरात उत्खनन झाले त्यात पुराश्मयुगीन हत्यारे आणि अवजारे सापडली. ती मानवनिर्मितच होती. लातूर शहराच्या नावासंदर्भात माहिती घेण्यासाठी इ. स. च्या ७-८ व्या शतकापर्यंतचा इतिहास पहावा लागेल. अगदी सुरुवातीला लत्तलूर हे लातूर शहराचे प्राचीन नाव होते. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील अनेक ताम्रशील शासनात या स्थल नामाचा उल्लेख सापडतो. प्राचीन काळी दक्षिणेत होऊन गेलेल्या बलाढ्य अशा राष्ट्रकूट राजवंशाचे हे मूलस्थान होते त्यामुळे हे स्थळ रट्टनौर (म्हणचे रट्टांचे पूर) या नावाने ओळखले जाऊ लागले. लातूर येथील रट्टा किंवा राष्ट्रकूट घराण्यात अनेक ऐतिहासिक व्यक्ती होऊन गेल्या. मालखेडचे सम्राट राष्ट्रकूट, सौदंतीचे रट्ट, नागपूर विभागाचा शासक महाराष्ट्र कूट, धाडिदेव आणि यादवांचा लातूर येथील अधिकारी गोपाल राप्टौड इ.चा या व्यक्तीत समावेश आहे. श्री. ग. ह. खरे यांनी लातूर या नावाची उत्पत्ती रट्ट वा राष्ट्रकूट या राजवंशाच्या नावातून झाल्याचे दाखविले आहे. रट्टगिरी वा रत्नागिरी म्हणजेच लातूर. (रत्नापूर महात्म्यानुसार म्हणजे लातूर महात्म्यानुसार लातूरचे प्राचीन नाव रत्नापूर होते.) लप्तनौर, रट्टनौर असा उल्लेखही ताम्रपटात येतो. थोडक्यात असे म्हणता येईल की चालुक्याच्या काळातही लातूर परिसरावर हा अंमल होता तो राष्ट्रकुटांचा. हा काळ आहे इ. स. ६८२ चा. नवव्या शतकाच्या पहिल्या दशकात राष्ट्रकूट नरेश तिसरा गोविंद याने वेरूळ ही राजधानी कर्नाटकाच्या बीदर जिल्ह्यातील मयूरखंडी येथे हालविली. गोविंदाचा पुत्र व उत्तराधिकारी अमोघ वर्ष याचे लत्तलूर पुरवराधीश्वर असे बिरूद होते त्यामुळे सम्राट राष्ट्रकूटचे घराणे मूळचे लातूरचे हे सर्वमान्य आहे.

सातवाहन राजे हे मौर्यांचे दक्षिणेकडील उत्तराधिकारी होते. त्या काळात तेर (तगर) हे अत्यंत भरभराटीस आलेले आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र होते. ती मौर्यांची उपराजधानी होती. विशेष म्हणजे तेथे आढळलेल्या तगर जनपदाचा उल्लेख असलेल्या नाण्यांवरून अर्थातच त्यावेळचे लत्तलूर (लातूर) हे तगर (तेर) जनपदाचा एक भाग होते हे स्पष्ट होते. रट्टनौर, लत्तनौर - लत्तलूर - लातूर अशी त्याची रूपांतरे होत गेली व 'लातूर' हे नाव निश्चित झाले.

चालुक्य नरेश तिसरा सोमेश्वर याचा लातूर शिलालेखात लातूर हे एक भव्यदिव्य आणि श्रेष्ठ नगर असल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यातील पाचशे महाजनांच्या उल्लेखावरून चालुक्याच्या काळी लातूर हे विद्वानांचे माहेरघर आणि वेदविद्येचे प्रमुख केंद्र असावे असे वाटते. त्याकाळी लातूर येथे अनेक मंदिरे अस्तित्त्वात होती. त्यापैकी भूतनाथ मंदिर, पापविनाशी तीर्थ व सिद्धेश्वर मंदिर एवढ्याच वास्तू आज अस्तित्त्वात आहेत. सिद्धेश्वरचे मंदिर हे राजा ताम्रध्वजाने बांधल्याचा उल्लेख मिळतो.

कृष्णदेव यादवांच्या वंशाने महाराष्ट्रावर अनेक वर्षे राज्य केले. या काळातील लातूरचा विचार केल्यास दि.७ डिसेंबर १२५८ चा लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील कान्हेगावचा शिलालेख महत्त्वाचा ठरतो. या शिलालेखात लातूर व परिसरातील ग्रामनामांचा उल्लेख सापडतो. कृष्णदेव यादवांच्या काळात लातूर हे कंधार, उमरगा आणि उदगीर इ. देश विभागाचा सामावेश असलेले मंडळ विभागाचे मुख्यालय होते. महानुभव साहित्यातील नोंदीवरून आणि महाकावतीच्या बखरीनुसार रामचंद्र यादवांचा मुलगा भीम (सहावा भिल्लम) उदगीर देशाचा शासक असल्याची माहिती मिळते. अशा प्रकारे सातवाहन काळ, राष्ट्रकूट काळ व यादव काळात लातूरची आणि परिसराची प्राचीनता व श्रेष्ठत्त्व महान होते हे लक्षात येते.

इस्लाम राजवटीतसुद्धा लातूर, औसा व उदगीर या नगरांना अत्यंत महत्त्वाचे स्थान राहिलेले आहे. इ. स.१३५० पासून ते मराठवाडा महाराष्ट्रात विलीन होईपर्यंत म्हणजेच १९४८ पर्यंत मराठवाड्यावर इस्लामी सत्तेचे सावट होते. मराठवाडा स्वतंत्र होण्यापूर्वी म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ पूर्वी लातूरचा विस्तार फार मोठा नव्हता. सुमारे दोन ते अडीच शतकांपूर्वी लातूर हे एक लहानसे म्हणजे दोन-तीन हजार लोकवस्तीचे गाव असल्याचा पुरावा मिळतो. पहिल्या महायुद्धाच्या काळात (इ. स. १९१८ ते १९२५) ज्ञानकोषकार केतकरांचा दौरा या प्रांतात झालेला आहे. पुढे १९२६ साली त्यांनी प्रसिद्ध



केलेल्या ज्ञानकोषात लातूर हे दहा हजार वस्तीचे पण कापूस आणि अन्नधान्याच्या व्यापाराचे एक केंद्र होते असे म्हटले आहे. सुरुवातीला लातूर हे उस्मानाबाद जिल्ह्यातील एका छोट्याशा तालुक्याचे गाव होते.

इ. स. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत लातूर शहराची व्याप्ती, लोकसंख्या व महत्त्व खूपच वाढले. मराठवाड्यात सर्वात मोठा जिल्हा उस्मानाबाद (प्राचीन धाराशिव) हा होता त्यामुळे या जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांनी १६ ऑगस्ट १९८२ साली लातूर हा स्वतंत्र जिल्हा म्हणून घोषित केला. सुरुवातीला लातूर, औसा, निलंगा, उदगीर व अहमदपूर अशा पाच तालुक्यांचा समावेश या जिल्ह्यात करण्यात आला. त्यांनतर १५ ऑगस्ट १९९२ पासून चाकूर व रेणापूर या दोन तालुक्यांची निर्मिती झाली. पुढे सात वर्षांनी दि.२७ जून १९९९ रोजी निलंगा आणि उदगीर तालुक्यांचे विभाजन झाले. यातून शिरूर अनंतपाळ, देवणी व जळकोट हे नवीन तालुके झाले. अशा प्रकारे आज लातूर जिल्ह्यात १० तालुक्यांचा समावेश आहे.

अशा या लातूर जिल्ह्याच्या सांगीतिक स्थितीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

* **जॉली क्लब :**

सन १९३७ मध्ये लातूरला जॉली क्लब नावाची एक संगीत संस्था स्वर्गीय प्रभुआप्पा निगुडगे यांच्या प्रेरणेने स्थापन झाली. त्यांच्यासमवेत माणिकराव आळंदकर, गणपतराव आळंदकर, गंगाधर गुंजलवार, शंकरराव खरोळेकर, त्रिंबकआप्पा गिरवलकर, हरीभाऊ कोटलवार, जानकीदास पुरोहित, मेहबूब मास्तर, मोतिलाल कोंडेकर, डॉ. पांडुरंग बीदरकर, रामजीभाई भाटे, रामगोपाल राठी, राचप्पा हत्ते, व्यंकटराव गोजमगुंडे अशी संगीत रसिक मंडळी या क्लबमध्ये होती. सुरुवातीला दर शनिवारी कोण्यातरी मित्राच्या घरी भजन करण्यासाठी ही मंडळी एकत्र यायची. पुढे प्रभुआप्पा निगुडगे यांच्या माडीवर ठुमरी, दादरे गाणाऱ्या गायिका तर कधी शास्त्रीय गायन करणारे गायक यायचे. यामध्ये लीला मुश्रफ, जानकी अय्यर, रोशन आरा बेगम, रोहिणी भाटे, शकिला बानू, नन्हे बाबू, लाडकूजान, साहेबजान, केशर बेळगावकर, बेबी निलम, गुलाबजान व महेबूबजान इ. कलावंतांनी आपल्या कलेचा आनंद या मंडळीना दिला. यामध्ये भीमाशंकर आप्पांचा सहयोग हळू हळू वाढू लागला. अशा प्रकारे अगदी सुरुवातीच्या काळी लातूरातील रसिकांसाठी जॉली क्लबने मोलाचे योगदान दिले.

* **गुरुवार क्लब :**

१९५० पूर्वी गुरुवार भजनी मंडळ प्रसिध्द होते. याच भजनी मंडळाचे रूपांतर पुढे गुरुवार क्लब असे झाले, गुरुवार भजनी मंडळींची स्थापना व कल्पना कै. बाबुआप्पा चव्हाण, अडप्पा हमीने, महादेवआप्पा मेनकुदळे, लिंबाजी धायगुडे, हिरालाल शहरकर, भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी, महावीर शर्मा यांची होती. या क्लबचे पहिले अध्यक्ष अडप्पा हमिणे हे होते. पुढे याची व्याप्ती वाढत गेली. गंगाधर उटगे, हरीभाऊ भूमकर, कलप्पा शाबरे, त्र्यंबकआप्पा पंचाक्षरी, वसंतराव पुसकर व प्रा. के. एस. वारद ही मंडळी यांचे सभासद झाले. दर गुरुवारी पाचशेघर मठात गायक हजेरी लावू लागले. शहरातील गायकांना निमंत्रित करून गायनाचा आग्रह केला जायचा. लोकही भक्तिभावाने ऐकायचे. सर्वसामान्यांना व नवोदितांना व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य या क्लबने केले. १९७२ साली हमीने यांचे निधन झाले व भीमाशंकरआप्पा गुरुवार क्लबचे अध्यक्ष झाले. लातूरकरांची श्रवण तृष्णा शमविण्यासाठी कधीकधी बाहेरगावचा एखादा कलावंत हजेरी लावायचा. त्याचा सन्मान करून त्यांच्या जाण्यायेण्याची आर्थिक व्यवस्था भीमाशंकरआप्पा करायचे. १९६६ ते १९८० पर्यंत या क्लबच्या सदस्यांकडून दोन रूपये जमा केले जायचे. यातूनच कलावंताना मानधन दिले जायचे. क्लबला ऊर्जितावस्था देण्यासाठी पं. कुमार गंधर्वांचा कार्यक्रम घेतला. याच निधीतून आझाद चौकात गुरुवार क्लबची सुमारे एक लाख रूपयांची दोन मजली इमारत उभी केली. या संस्थेने सर्व प्रकारची वाद्य सामग्री जमविली होती. लातुरातील अडलेल्या अनेक मैफली गुरुवार क्लबच्या तानपुऱ्यांनी, पेटीने व तबल्याने मार्गी लावल्या होत्या.

पुढे चालून १९५६ साली ही संस्था नोंदणीकृत झाली. भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी हे अध्यक्ष तर प्रा. के. एस. वारद हे सचिव झाले. आता मात्र या क्लबचे भजनी मंडळाचे रूप बदलून अभिजात संगीताचे रूप देण्याचा प्रयत्न सुरू झाला. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी शास्त्रोक्त संगीताचे वर्ग सुरू करण्यात आले. सुरुवातीला प्रयाग संगीत समिती अलाहाबाद या संस्थेशी ही संस्था संलग्न केली. शास्त्रीय संगीताच्या परीक्षा देण्याची सोय झाली पुढे चालून प्रयाग संगीत समितीचे संलग्निकरण रद्द करून १९८६ साली अखिल भारतीय गांधर्व मंडळाची संलग्नता प्राप्त करून घेतली. अशा प्रकारे १९७५ साली गुरुवार क्लब हा शब्द काढून गुरुवार संगीत विद्यालय असे नामकरण करण्यात आले.



सुरुवातीला या संगीत विद्यालयात अध्यापन करण्यासाठी श्री प्रल्हादराव अष्टेकर यांची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर पं. शांताराम चिगरी व सौ. शकुंतलादेवी चिगरी, पं. के.एन. बोळंगे, श्री. करंदीकर गुरुजी यांनी संगीताचार्य म्हणून सेवा केली. त्यांच्यानंतर पं. विठ्ठलराव जगताप हे संगीताचार्य म्हणून रूजू झाले ते आजही अत्यंत निष्ठेने हे कार्य करीत आहेत. त्यांचे पुत्र शंकर जगताप हे याच विद्यालयातून तबलावादनाचे धडे देत आहेत. प्रारंभीक ते संगीत अलंकारपर्यंतचे मार्गदर्शन या विद्यालयातून दिले जाते. आज हे विद्यालय गंजगोलाईवरील जगदंबा मंदिराच्या पहिल्या मजल्यावर चालू आहे. अशा प्रकारे पंचाक्षरीआप्पा, प्रा. वारद व त्यांच्या सहकार्यांच्या परिश्रमाने शिंपलेल्या गुरुवार क्लबने लातूरच्या संगीतिक विश्वात मोलाची भर घातली.

* **कलोपासक मंडळ :**

साधारणतः साठ वर्षांपूर्वी लातूर हे छोटेसे तालुक्याचे गाव होते. कदाचित चाळीस हजार लोकसंख्या असावी. छोटीशी बार्शीलाईट नॅरोगेज रेल्वे - दोनच गाड्या - एक जाणारी व एक येणारी, बसेसही तुरळकच होत्या. गावची बाजारपेठ मात्र संपन्न होती. आजूबाजूच्या पाच-पन्नास गावांना सेवा देणारी भक्कम होती. रस्ते खडीचे होते. धूळ, पाणीटंचाई, विजेचा पत्ता नव्हता. दोन सिनेमा टॉकीज, दोन शाळा, एक सरकारी व एक खाजगी. अशाही स्थितीत येथील लोक समाधानी होते; परंतु त्यांची सांस्कृतिक भूक शमविण्याचे साधन नव्हते. अशा स्थितीत लातूर जिल्ह्याला सुरांची वाट दाखविण्यासाठी व सांस्कृतिक श्रीमंती देण्यासाठी राजा म्हैसकर यांनी मोलाचे योगदान दिले. श्री. मारवाडी राजस्थान विद्यालयात राजा म्हैसकर हे १९५५ साली शिक्षक म्हणून दाखल झाले. त्यांना नाटकाची व अभिजात संगीताची मनस्वी आवड होती. ते जेव्हा पुण्याहून लातूरला आले तेव्हा त्यांनी लातूरकरांची सांस्कृतिक भूक पाहिली. यासाठी काहीतरी करावे असे त्यांना वाटू लागले. यातूनच १४ जानेवारी १९५६ साली त्यांनी कलोपासक मंडळाची मुहूर्तमेढ रोवली. या मंडळाच्या वतीने शास्त्रीय संगीताचे दोन दर्जेदार कार्यक्रम व म्हैसकर दिग्दर्शित एक नाटक असे ३ कार्यक्रम दरवर्षी मंडळाच्या सदस्यांसाठी होत असत.

कलोपासक मंडळाचे अध्यक्ष असलेले राजा म्हैसकर हे सुप्रसिद्ध चित्रपट कलावंत शरद तडवलकर यांचे साडुभाऊ होते त्यामुळे पुण्या-मुंबईकडील सर्व नाट्य, चित्रपट कलावंतांचा त्यांच्याकडे राबता असायचा. पं. कुमार गंधर्व, प्रभा अत्रे, शोभा गुर्टू, रामदास कामत, वसंतराव देशपांडे, प्रभाकर कारेकर, मालिनी राजूरकर, जितेंद्र अभिषेकी अशा

दिग्गज कलावंतांना त्यांनी लातूरला पाचारण केले. त्यांच्या कलेचा आनंद लातूरकरांना मिळवून दिला. जाती धर्म, गरिबी-श्रीमंतीच्या पलीकडे जावून म्हैसकरांनी कलोपासकचे सदस्य केले. व्यापारी, मध्यमवर्गीय व सामान्य लोकही कलोपासकचे सदस्य होते. त्या काळी कलोपासक मंडळाचे सदस्य असणे ही अभिमानाची बाब असायची. थोडक्यात सांगायचे तर अभिजात संगीताच्या जाहीर मैफली लातुरात सर्वप्रथम आयोजित करण्याचे श्रेय राजा म्हैसकर यांनाच द्यावे लागेल.

* **भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी :**

आज मराठवाड्यात लातूरचे सांस्कृतिक क्षेत्रात जे स्थान संपादन केले आहे त्यात भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी यांनी निश्चितच मोलाची भर टाकली आहे. त्यांचा जन्म १९१५ साली परभणी येथे झाला. त्यांचे मूळ गाव अंबाजोगाई हे होते; परंतु संगीताच्या दृष्टीने लातूर ही त्यांची कर्मभूमी ठरली. लहाणपणी पं.अण्णासाहेब गुंजकर यांच्याशी त्यांचा संबंध आला. त्यांच्या सहवासामुळे ते अभिजात संगीताचे कानसेन बनले. अण्णासाहेब जेथे जेथे भजनाला जात तेथे आप्पांना घेऊन जात. पुढे अण्णासाहेब नांदेडला गेले तर आप्पा लातूरला आले तो काळ १९३३ चा होता. दोघांच्या वाटा जरी वेगळ्या झाल्या तरी रागसंगीताशी जुळलेली नाळ मात्र तुटली नाही. तारूण्यात असताना त्यांना आपले आर्थिक जीवन व्यवस्थित करण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागले. १९३३ साली त्यांना लातूर येथील लिंगप्पा इंडे यांच्या किराणा दुकानात नौकरी करावी लागली. आर्थिक स्थिती जरी चांगली नसली तरी त्यांच्यातला रसिक त्यांना शांत बसू देईना. त्यांनी रसिकांचा शोध घेतला व आपली श्रवणभक्ती दृढ करण्यासाठी जॉली क्लबचा रस्ता धरला. १९३७ चा हा काळ होता. जॉली क्लबच्या मैफलीतून त्यांचा कान पक्का होत गेला.

पुढे १९४९ पासून सवाई गंधर्व महोत्सवाची सुरुवात पुणे येथे झाली. या महोत्सवासाठी ते आपल्या मित्रांना दरवर्षी घेऊन जाऊ लागले. प्राचार्य कन्हैयालाल पुरोहित म्हणतात, "भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी, लातुरातील एक चालती बोलती सांस्कृतिक संस्था होती. नवयुवक नाट्यमंडळ आणि गुरुवार क्लब ही त्यांची दोन अपत्ये होती. वारकरी जेवढ्या निष्ठेने पंढरपूरची आषाढी-कार्तिकी वारी करतो त्याच निष्ठेने आप्पा सवाई गंधर्व महोत्सवास हजर असायचे." आप्पांनी विविध सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमांतून कार्य केले. प्रा. के. एस. वारद यासंदर्भात लिहितात, "भिन्न भिन्न संस्थांमधून आतापर्यंत लातूरमध्ये संगीताचे जवळजवळ ३०० ते ४०० कार्यक्रम झालेले आहेत. त्यातील बहुतांशी कार्यक्रम आप्पांच्याच



प्रयत्नामुळे झाले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही."

संगीत श्रवण हा त्यांचा प्राण होता. त्यासाठी ते संपूर्ण भारतात जिथे जिथे संगीत संमेलन व्हायचे तेथे तेथे ते जायचे. सवाई संगीत संमेलनात ते दरवर्षी जात त्यामुळे पं.भीमसेन जोशी, पं. बसवराज राजगुरू, पं. कुमार गंधर्व, मालिनी राजूरकर, गिरीजादेवी, प्रभा अत्रे, किशोरीताई अमोनकर असे अनेक गायक-गायिका त्यांना आपल्या कुटुंबीयांपैकीच एक मानीत असत. आप्पा केवळ स्वत: संगीत ऐकून थांबायचे नाहीत तर त्यापैकी बहुतेक सर्व गायकांना त्यांनी आग्रहपूर्वक लातूरकरांना त्यांचे गाणे ऐकण्याचे भाग्य प्राप्त करून दिले. मराठवाड्यातील कित्येक उदयोन्मुख कलावंतांना प्रोत्साहन देऊन व्यासपीठ मिळवून दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आप्पा घरोघर फिरायचे. अंगात पांढरा कोट, डोक्यावर टोपी अशा थाटात आप्पा सायकलचे हँडल हातात धरून पायीच निघायचे. संगीताचा गंधही नसलेले हेच लोक नंतर आप्पांना पुढचा कार्यक्रम कधी असे उत्सुकतेने विचारायचे. यासंदर्भात प्रा. गो. न. मग्गीरवार म्हणतात, "आप्पांनी लोक जोडले. गावाला एक कल्चर दिले. कोणताही अभिनिवेश न बाळगता आप्पांनी तळमळीने आणि समर्पित भावनेने काम केले त्यामुळे बाहेरून येणारा कलावंतही आप्पांशी जोडला जायचा. पं. भीमसेन जोशी आप्पांशी जवळिकतेने बोलायचे ते मी प्रत्यक्ष पाहिले आहे." स्टेज, माईक, तिकीटविक्री, कलाकारांची राहण्याची, खाण्याची व्यवस्था करण्यात त्यांना कधीही कमीपणा वाटला नाही. या सर्व धावपळीत आप्पा कुठेही अन् कधीही स्टेजवर नसत की हारतुरे फोटोसाठी पुढे येत नसत.

लातूर नगरपरिषदेने ह्या गुणी रसिकाचा १९८५ मध्ये यथोचित सन्मान केला. तसेच मराठवाडा संगीत प्रसारक मंडळाने कै.अण्णासाहेब गुंजकर समिती संगीतमहोत्सवात श्री. स. भ. देशपांडे व प्रा.राम पुजारी यांच्या उपस्थितीत व फेब्रुवारी १९८७ रोजी औरंगाबाद येथे श्री. नाथराव नेरळकरांनी श्री. पंचाक्षरी आप्पांचा विशेष सत्कार घडवून आणला. खरोखरच आप्पा हे लातूरमधील विविध संगीत व सांस्कृतिक चळवळीचे आधार मेरूच होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

* **संगीत महर्षि बाबा बोरगावकर :**

लातूरपासून जवळ असलेल्या बोरगाव या छोट्याशा गावी बाबांचा जन्म झाला. गावात संगीत नाटकाची परंपरा असल्यामुळे लहाणपणापासूनच त्यांना नाटकाविषयी अभिरूची

निर्माण झाली. नाटकांच्या सहवासामुळे नकळतच संगीताचेही संस्कार व्हायला वेळ लागला नाही. गावात विरप्पा मास्तर हे संगीत मास्तर होते त्यांच्याकडून बाबांनी संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला. त्यांनतर तबलावादक बंकटलालजी व तुकाराम कटके यांच्या सहवासामुळे त्यांना संगीत नाटकाचा अधिकच छंद जडला. वयाच्या सोळाव्या वर्षीच ते संगीत मास्तर झाले. तत्कालीन संगीत नाटकांना ते संगीत साज चढवू लागले. संगीत नाटकांचा त्यांना इतका छंद जडला की त्यांनी एके दिवशी लातूर सोडून बालगंधर्वांची नाटक कंपनी गाठली. बालगंधर्वासारख्या श्रेष्ठ नटसम्राटांचा त्यांना परीसस्पर्श झाला. तेथेच बाबांनी भार्गवराम आचरेकरांकडून नाट्यगीतांची तालीम घेण्यास प्रारंभ केला. तेथे राहून त्यांनी हार्मोनियम, तबला व नाट्यपदांचे ज्ञान संपादन केले. इकडे घरची मंडळी शोध घेऊ लागली त्यामुळे इच्छा नसतानाही बाबांना घरी परतावे लागले. रजाकाराच्या काळात पोलिसांनी पकडू नये यासाठी त्यांनी दोन वर्षे पश्चिम महाराष्ट्रात जाऊन संगीत नाटकातून काम केले.

१९५२ साली ते कायमचेच लातूरला परतले. येथील डॉ.पत्की यांनी त्यांना गायनवर्ग चालविण्यासाठी प्रोत्साहन दिले आणि क्लास उत्तम चालू लागला. हे चालू असतानाच त्यांनी वाद्य दुरूस्तीचे कौशल्य आत्मसात केले. यातूनच सन १९५५ ते १९६१ या कालावधीत त्यांनी संगीत वाद्ये बनविण्याचा कारखाना सुरू केला. लातूरनगरीत संगीताच्या मैफली होत होत्या. इथे कानसेनांची संख्याही वाढलेली होती; परंतु इथे शास्त्रोक्त संगीत शिकण्याची सोय नव्हती म्हणून बाबांनी १९६३ साली 'सरस्वती संगीत विद्यालयाची' स्थापना केली. यातून क्रमिक अभ्यासक्रम शिकविण्याचे पर्व उदयास आले त्यांनी संगीताचे धडे देण्यास प्रारंभ केला; परंतु त्यांनी संगीताचे जुजबी ज्ञान संपादन केले होते. पुढील वर्गास शिकविण्यासाठी त्याच्याकडील ज्ञान अपुरे पडू लागले. कदाचित त्यांना चुकीचे ज्ञान देऊन विद्यार्थ्यांना व पालकांना फसविता येऊ शकले असते; परंतु त्यांच्या प्रामाणिक बुद्धिमत्तेला ते पटले नाही. म्हणून ते थेट अब्दुल करीम खाँ यांच्या पत्नी बानूबाईकडे मिरज येथे गेले व लातूरसाठी संगीत शिक्षक देण्याची विनंती केली. बाबांचा प्रामाणिकपणा व संगीताबद्दलची तळमळ पाहून बानूबाईंनी संगीत शिक्षण देण्याचे मान्य केले. अशा प्रकारे चूडामणी संगीत रत्न कृष्णाबाई रामदुर्गकर या शास्त्रीय संगीतासाठी तर नारायणराव जोगळेकर सुगम गायनाचे शिक्षण देण्यासाठी लातूरला रूजू झाले. त्या काळात शिक्षकांना दरमहा सातशे रूपये मानधन देण्याचे ठरले. ही रक्कम जरी जास्त असली तरी बाबांनी ती अट बिनशर्त मान्य केली. अशा प्रकारे लातूरकरांसाठी अभिजात संगीताचे द्वार खुले



झाले. पुढे अ. भा. गांधर्व मंडळाचे परीक्षा केंद्र मिळाले व शेकडो विद्यार्थी या केंद्रातून परीक्षा देऊ लागले.

बाबांचे कार्य एवढ्यावरच थांबले नाही. घरात संगीताचे सूर निनादू लागले. साहजिकच बाबांचे पुतणे बाबुराव व नातू राम हे संगीताकडे आकृष्ट होऊ लागले. त्यांची संगीतातील अभिरूची पाहून त्यांना उच्च स्तरीय संगीताचे शिक्षण घेण्यासाठी बनारसला पाठविले. यातूनच पं. डॉ. राम बोरगावकर व पं. सूरमणी बाबुराव बोरगावकर हे मराठवाड्याच्या क्षितीजावर चमकणारे तेजस्वी तारे निर्माण झाले त्यांनी मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शिष्य घडविले. त्यांची तिसरी पिढी मंगेश, गणेश, मधुवंती व सरस्वती ही उदयोन्मुख कलावंत गायन-वादनातील आपले श्रेष्ठत्त्व सिद्ध करीत आहेत. अशा प्रकारे संगीतमहर्षि बाबा बोरगावकर यांनी लातूरच नव्हे तर मराठवाड्यासाठी सांगीतिकदृष्ट्या भरीव कार्य केले आहे.

## * स्व. शकुंतलादेवी चिगरी :

लातूरच्या अभिजात संगीतात स्व. शकुंतलादेवी चिगरी यांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील बोळेगाव येथे झाला. त्या जन्मताच अंध होत्या. लातूर परिसरात अंध शाळा नसल्यामुळे त्यांनी डेहराडून येथील अंध शाळेत प्रवेश घेतला. शालेय शिक्षण घेत असताना त्यांना संगीताची आवड निर्माण झाली. तेथेच सौ. इला सरवदे यांच्याकडून त्यांनी संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केले. पुढे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या आपल्या मूळ गावी परतल्या. तेथे पं. शांताराम चिगरी यांच्याशी त्यांचा परिचय झाला. दोघेही अंध, दोघेही संगीताचे उपासक, त्यामुळे त्यांच्या मनाच्या तारा जुळण्यासाठी फार वेळ लागला नाही. लवकरच ते विवाहबद्ध झाले. उर्वरीत तालीम त्यांनी पं. शांताराम चिगरी यांच्याकडून घेतली. त्या गायन व तबल्यामध्ये विशारद होत्या. सुरुवातीला त्यांनी गुरुवार क्लबमध्ये नौकरी पत्करली व तेथून विद्यार्थ्यांना संगीताची तालीम देण्यास प्रारंभ केले. पुढे त्यांनी सूरताल संगीत विद्यालयाची स्थापना केली. पं. शांताराम चिगरी यांच्याबरोबर त्यांनी अनेक शिष्यांना घडविण्याचे काम केले. स्वरातील बारकावे, रियाजाची पद्धत, तबलावादनातील बोलांचा शुद्ध निकास या बाबींकडे त्यांनीअत्यंत डोळसपणे लक्ष दिले. अर्थातच यातून पं. मुकेश जाधव, प्रा. अण्णू भोसले, श्री. खंडेराव कुलकर्णी, अंगद गायकवाड असे शेकडो शिष्य त्यांच्या तालमीत तयार झाले. अशा या शकुंतलादेवी कर्करोगाने आजारी पडल्या यातच दि. ६ जुलै २००८ रोजी त्या सर्वांना

सोडून स्वरविश्वात विलीन झाल्या. त्यांचे सांगीतिक योगदान निश्चितच लातूरच्या इतिहासात नोंद घेण्याजोगे आहे.

* **राजा काटे :**

राजा काटे हे तसे मूळचे कळंब या गावचे. सन १९६०-६२ च्या काळात ते कोर्टात लिपिक पदावर कार्यरत होते. लातूर जिल्ह्यातील निलंगा येथून त्यांची बदली लातूर जिल्हा न्यायालयात झाली. तेव्हापासून ते लातुरातच रमले. लातूरला आल्यानंतर त्यांचा संबंध येथील सांस्कृतिक जीवनाशी येऊ लागला. त्या काळात कलोपासक मंडळ व नवयुवक नाट्यमंडळ अशा दोन संस्था कार्यरत होत्या. कलोपासक मंडळाच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्या काळात नाटकात स्त्री पात्रांच्या समस्या होत्या म्हणून त्यांनी सपत्निक काम करून लातूरच्या नाट्य चळवळीस सहाय्य केले.

त्यांनी पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडून सहा वर्षे अभिजात संगीताची तालीम घेतली. मधुर आवाज, उत्तम अभिनयाची जाण यामुळे ते अल्पावधीतच गायक, नट म्हणून प्रसिद्धीस आले. अभिनयाची आवड असल्यामुळे त्यांनी अनेक नाटकांतून यशस्वी भूमिका साकारल्या. एवढेच नव्हे तर त्यांनी अभिनयाची अनेक पारितोषिके प्राप्त केली. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी सुगम गायनाच्या मैफली रंगविल्या. आकाशवाणीच्या मुंबई, पुणे व औरंगाबाद केंद्रावरून त्यांचे गाणे प्रसारित झाले.

'झटपट करू दे खटपट' व 'चितपट' या चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. दूरदर्शनवरील अनेक सुगम संगीताच्या कार्यक्रमांना तसेच इंडियन नॅशनल थिएटरच्या 'जगन्नाथ' तर बिर्ला ग्रुपच्या 'जाग उठा है रायगड' या व्यावसायिक नाटकांना त्यांनी संगीताचा साज चढविला आहे. स्वरांवर विलक्षण प्रभुत्त्व असल्यामुळे अनेक संगीत संमेलनातून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे.

* **नवयुवक नाट्य मंडळ :**

कलोपासक या संस्थेपासून प्रेरणा घेवून भीमाशंकर आप्पा पंचाक्षरी यांनी १९५७ मध्ये नवयुवक नाट्य मंडळ स्थापन केले. यात महत्त्वाची भूमिका पंचाक्षरी हेच निभावीत होते. त्यांच्या इतका तळमळीने काम करणारा संगीतवेडा माणूस विरळच. लातूरच्या रसिकांमध्ये नाट्य व संगीताची गोडी निर्माण व्हावी, त्यांना कलेचा आस्वाद चाखता यावा, त्यांच्यामध्ये रसिकता निर्माण व्हावी हा या मंडळाचा उद्देश होता. शास्त्रीय संगीत, नृत्य व नाट्य अशा सर्वच कलाप्रकारांचा आनंद त्यांनी रसिकांपर्यंत पोहचविला. त्या



काळात बाबुराव जोशी गुरुजी, मन्मथप्पा बोळेगावे, श्रीमंत खानापुरे, सोमनाथ खानापुरे हे आप्पांचे सहकारी होते. शास्त्रीय संगीताबरोबरच नाटकांसाठीसुध्दा या मंडळाने कार्य केले. त्या काळी दोन-दोन महिने तालीम व्हायची. ही नाटके राज्यनाट्य स्पर्धेसाठी पाठविली जायची. हयवदन, रद्दीवाला, चिक्कीवाला, सैनिक, तुघलक अशी अनेक नाटके गाजली तर घराबाहेर (१९६२), डॉ. कैलास (१९६५), जिद्द (१९६५), हा खेळ सावल्यांचा (१९७०), मुकं करोनी वाटचालं (१९७२), बर्थ डे पार्टी (१९७३), असचं आणि इतकचं (१९७६), हमीदाबाईची कोठी, निखारे, आकाश पेलताना अशी अनेक नाटके राज्य नाट्य स्पर्धेत पाठविली. या नाटकांना यश देखिल मिळाले. सूर्यकांत जोशी यांनीही अनेक नाटके दिग्दर्शित केली. बालनाट्य चळवळीस देखील त्यांनी मोलाचे योगदान दिले.

नवयुवक नाट्य मंडळ ही संस्था १९५७ साली स्थापन झाली तरीपण धर्मदाय आयुक्त कार्यालयामध्ये या संस्थेची नोंदणी २४ सप्टेंबर १९५२ रोजी झाली. या एकूण ३५-३५ वर्षांच्या काळात भीमाशंकर आप्पांनी नवयुवक नाट्य मंडळींच्या माध्यमातून लातूरच्या सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. निजाम राजवटीबरोबरच मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर ही सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल लातूरमध्ये घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांच्यामुळे नटसम्राट बालगंधर्व,पं. सी.आर. व्यास, पं. बिरजू महाराज अशा अनेक कलावंतांनी लातूरकरांची तृष्णा शमविली.

आप्पाबरोबरच जयंत दिवाण, राजा काटे, विजय भोयरेकर, विलास उदगीरकर, प्रा. रविंद्र गोवंडे, प्रभाकराव कोळपकर, गोविंद आंबेकर, श्रीराम गोजममुंडे, डॉ. विभाकर मिरजकर, सुनीता कुलकर्णी, कमल कोळपकर, अजय बेलूरकर सौ. लीला काटे, सौ. वृंदा दिवाण यांनी नवयुवक नाट्य मंडळास मोलाचे सहकार्य केले. तसेच भारत थोरात यांनी सुद्धा एक उत्तम रंगभूषाकार व नैपथ्यकार म्हणून मोलाचे योगदान दिले. ही संस्था गायनाच्या कार्यक्रमाखेरिज राज्य नाट्यस्पर्धेतील सहभाग, चर्चासत्रे, शिबीर आणि तत्सम सामाजिक उपक्रम राबवित असे. पन्नास वर्षांच्या कारकीर्दीनंतर आप्पांनी १९९० साली नवयुवक नाट्य मंडळाचे अध्यक्षपद सोडले. त्यांच्यानंतर सूर्यकांत जोशी यांनी अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळली. पुढे चार-पाच वर्षांनी ही नाट्य संस्था बंद पडली.

थोडक्यात असे म्हणता येईल की नवयुवक नाट्य मंडळाने कलेच्या क्षेत्रात खूप क्रांतिकारक कार्य केले. तानसेन, गायक कलावंत, अभिनेते, लेखक व दिग्दर्शक निर्माण करून लातूरचे सांस्कृतिक जीवन संपन्न केले.

* **जय जगदंबा नवरात्र महोत्सव :**

१९६८ साली गंजगालाईमध्ये जय जगदंबा नवरात्रमहोत्सवाची सुरुवात झाली. १९७८ साली ही संस्था नोंदणीकृत झाली. त्याचे अध्यक्ष बाबुआप्पा पारशेट्टी तर सचिव म्हणून प्रा. के. एस. वारद यांनी कार्य केले. या संस्थेचे कार्याध्यक्ष भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी हे होते. लोककला व अभिजात संगीताचा अनोखा मिलाफ या महोत्सवातून घडला. गोंधळगीते, आराधीगीते, नामदेवी कीर्तन व भारूडासारख्या लोककलेसोबतच शास्त्रीय संगीताची साधना करणाऱ्या थोर कलावंतांनी या महोत्सवात रंग भरला. हा आनंद यज्ञ मागील ४७ वर्षांपासून अव्याहतपणे चालू आहे. ९ दिवस चालणाऱ्या या स्वरयज्ञात आजपर्यंत किमान २०० ते २५० कलावंत सहभागी झाले आहेत. त्यात पं. जितेंद्र अभिषेकी, पं. अजय पोहनकर, मालिनी राजूरकर, नन्हेबाबू, श्रीकांत देशपांडे, पं. आप्पा जळगावकर, पं. पांडुरंग मुखडे, संगीतकार राम कदम, हेमंत पेंडसे अशा अनेक कलावंताच्या सुश्राव्य मैफली लातूरकर रसिकांनी अंतःकरण भरून ऐकल्या आहेत. या महोत्सवासाठी प्रा. के. एस. वारद, शिवप्पा अंकलकोटे, राजेश्वर डांगे, पं. विठ्ठलराव जगताप, शंकर जगताप मोलाचे परिश्रम घेतले. हा महोत्सव आजही तेवढ्याच उत्साहात होत असतो. या महोत्सवामुळे लातूरमध्ये अभिजात संगीत ऐकणारा वर्ग निर्माण केला.

* **पाचवे मराठवाडा संगीत संमेलन :**

१९५४ साली मराठवाडा पातळीवर पहिले संगीत संमेलन नांदेड येथे श्री. अण्णासाहेब गुंजकर यांच्या प्रेरणेतून आयोजित झाले. यानंतर प्रत्येक जिल्ह्यातील रसिकांना असे संमेलन आपल्या जिल्ह्यात व्हावे असे वाटू लागले. त्यानंतर दुसरे औरंगाबाद, तिसरे अंबाजोगाई, चौथे परभणी तर पाचवे मराठवाडा संगीत संमेलन लातूरला झाले. यासंदर्भात विलासरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या प्ररेणेने दि. १२,१३ व १४ फेब्रुवारी १९८१ या तारखेस लातूर येथे ५ वे मराठवाडा संगीत संमेलन आयोजित करावे असे ठरले. त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर, या समीतीचे कार्याध्यक्ष भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी; सचिव प्रा. के. एस. वारद तर कोषाध्यक्ष, शिवप्पा अंकलकोटे होते. संयोजन समितीत डॉ. शिवराज नाकाडे, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर हे होते. या संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून थोर अभ्यासक प्रा. नरहर कुरुंदकर हे उपस्थित होते.

येथील बसवेश्वर मंगल भुवनाच्या प्रांगणात गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी १९८१ सायं.



आठ वाजता पं. बसवराज राजगुरू यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. या संमेलनात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे १० ते १२ कलावंत आणि मराठवाड्यातील ४० ते ४२ कलावंत सहभागी झाले होते. या संमेलनात पं. भीमसेन जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. राजन साजन मिश्रा, डॉ. एन. राजम, पं. आप्पा जळगावकर, उ. शहिद परवेझ याबरोबरच मराठवाड्यातील पं. शांताराम चिगरी, पं. के. एन. बोळंगे, आशालता करलगीकर, प्रा. दत्ता चौगुले, पं. रामदास अनवले, पं. नाथराव नेरलकर, प्रा. लावण्यवती मुकादम, राम बोरगावकर, बाबुराव बोरगावकर, शंकरबापु शिंदे- अपेगावकर, शाम गुंजकर, पांडुरंग मुखडे, कमलाकर परळीकर, सतीशचंद्र चौधरी, सुहासिनी कोरटकर, जिजाबाई काटेजवळगेकर, कांतराव सोमवंशी, देवीदासराव चाकूरकर आदी कलावंतांनी गायन-वादन करून मैफिलीत रंग भरला.

या संमेलनाच्या आर्थिक व्यवस्थेसाठी एक स्मरणिका काढून जाहिरातीच्या स्वरूपात निधी संकलन करण्यात आला. या स्मरणिकेत संपादक डॉ. चंद्रकांत देऊळगावकर लिहितात, "लातुरात दि. १२,१३ व १४ फेब्रुवारीस मराठवाडा संगीत संमेलन होत आहे व त्या निमित्ताने पं. जितेंद्र अभिषेकी, पं. बसवराज राजगुरू, पं. भीमसेन जोशी आदी गायक व कलावंताचे गायन आणि कलांचा अस्वाद घेण्याचे भाग्य आपणास लाभत आहे. मी भाग्यवान अशासाठी म्हणतो की, लातूरसारख्या एका बाजूस बसलेल्या तालुक्याच्या ठिकाणी भारतीय कीर्तीच्या कलाकारांच्या कलांचा अस्वाद मिळणे हे दुर्मिळ आहे."

या संमेलनात मराठवाड्याच्या दृष्टीने सर्वात आनंददायक गोष्ट अशी होती की, पं. शांताराम चिगरी यांचा शिष्य मुकेश जाधव या लातूर जिल्ह्यातील छोट्या तबलावादकांची कला या व्यासपीठावरून झळाळून दिसली. आपल्याच मातीतल्या कलारत्नांचा शोध समस्त मराठवाड्याच्या श्रोत्यांना लागला.

* **कलासंस्कार संगीतमहोत्सव :**

पाचवे मराठवाडा संगीत संमेलन यशस्वी झाले. या संमेलनातून काही निधी शिल्लक राहिला. तो निधी पंचाक्षरीआप्पांनी बँकेत ठेवीच्या स्वरूपात ठेवला. यातूनच कलासंस्कार संस्थेची स्थापना केली. भारतीय अभिजात कलेचे जतन करणे, त्यांची अभिरूची जनतेत वाढविणे, संशोधन कार्यास चालना देणे, कलाकारांना व विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, मेळावे, संमेलने वा चर्चासत्रांचे आयोजन करणे इत्यादी उद्देश समोर ठेऊन या संस्थेची वाटचाल आरंभ झाली. या संस्थेच्या माध्यमातून दि. २५ व २६ नोव्हेंबर १९८७

रोजी कलासंस्कार संगीतमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात पं. जसराज, पं. आप्पासाहेब जळगावकर, श्रीकांत देशपांडे, पांडुरंग मुखडे, सौ. वीणा सहस्त्रबुध्दे, उस्मान खॉ, मधुरा मुदगल, शेखर सरोदे, विठ्ठल जगताप या थोर कलावंतांनी सुरेख कलादर्शनाचा योग जुळवून आणला. याच संगीत संमेलनात भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी यांचा अमृतमहोत्सवानिमित्त भव्य सत्कार करण्यात आला. यानंतर कलासंस्कारच्या वतीने एकूण चार संगीत संमेलन घेतली. पहिले संगीत संमेलन कलकत्ता येथील आय. टी. सी. संगीत अकादमी व कलासंस्कार यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. दुसरे संमेलन कै. नरहर कुरुंदकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित केले. तिसरे भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी अमृतमहोत्सव संगीत संमेलन तर चौथ्या संगीत संमेलनात वीना सहस्त्रबुध्दे, पं. सी.आर. व्यास, उस्मान खॉ, पं. विजयेंद्र काबरा व उ.रशिद खॉ इ. कलावंत सहभागी झाले होते.

सर्वच लातूरकरवासीयांची इच्छा असूनही पुण्यास सवाई गंधर्व महोत्सवास जाऊ शकत नव्हते; परंतु तोच आगळा वेगळा आनंद 'आनंदाचे डोही आनंद तरंग' होऊन लातूरवासीयांना उपलब्ध करून देण्याचे पुण्यकर्म कलासंस्कारने केले आहे.

***  गणेश मंडळातून अभिजात संगीत :**

सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रबोधन व्हावे, राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभी गणेशोत्सवाची सुरुवात केली. १८९१ साली लातूर येथे जिनिंग फॅक्टरीची सुरुवात झाली. याचे उद्घाटन लोकमान्य टिळकांच्या हस्ते झाले. तो काळ गणेशोत्सवाचा होता. लोकमान्यांच्याच हस्ते जिनिंगमिलमध्ये श्री. गणेशोत्सवाची सुरुवात झाली. त्या काळात गणेशोत्सवात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातून रागसंगीतावर आधारित गाणी सादर व्हायची. तो बालगंधर्वांचा काळ होता त्यामुळे त्यांच्या तबकड्या ऐकूण नाट्यपदे बसविली जायची. मेळ्यातून संगीत नाटकांचे सादरीकरण व्हायचे. रत्नदीप गणेश मंडळात संगीत नाटकांचे सादरीकरण व्हायचे. पोलिस ॲक्शननंतर लातूर शहरात रत्नदीप गणेश मंडळ, शिवाजी गणेश मंडळ, आझाद गणेश मंडळ, अशी अनेक मंडळे होती. प्रा. के. एस. वारद यासंदर्भात सांगत होते, रत्नदीप गणेश मंडळ हे आझाद चौकात होते. या मंडळाच्या वतीने नाटक, व्याख्यान व संगीताची मैफल हे कार्यक्रम घेतले जायचे. व्याख्यानमालेतून नरहर कुरुंदकर, बॅरिस्टर गाडगीळ, बापूसाहेब काळदाते यांची व्याख्याने व्हायची तर नंदकुमार भातलवंडे हे औसा येथील श्रेष्ठ तबलावादक होते. त्यांनी हैद्राबादचे शेख दाऊद खॉ यांच्याकडून तबलावादनाची तालीम घेतली होती. त्यांच्या



मदतीने या गणेश मंडळाला कलावंत मिळायचे. अगदी सुरुवातीला मालिनी राजूरकरांचे गाणे झाले. सर्वांनी फरशीवर बसून या कार्यक्रमाचा आनंद लुटला. त्या काळात मालिनी राजूरकरांना ३०० रुपयांची बिदागी दिली होती.

रेल्वे गणेश मंडळात महाडिक व त्यांचे मित्र मेहबूब कळवान्त हे पेटीवादक होते. दोघांनाही संगीताची जाण होती. त्यांनी हिराबाई बडोदेकर, परविन सुल्ताना, गिरिजादेवी, बाबूसिंह, शेख दाऊद खान अशा श्रेष्ठ मंडळींचा परिचय लातूरकरांना करून दिला. अशा प्रकारे इतर गणेश मंडळांनीसुध्दा रागसंगीताच्या मैफली आयोजित करून रागसंगीताचा परिचय लातूरकरांना करून दिला. १९७० पर्यंत सर्वसामान्य लोकही गणेशोत्सवातून अभिजात संगीत ऐकत आले. पुढे चालून वाढत्या आधुनिकीकरणामुळे मंडळांचे स्वरूप बदलत गेले व अभिजात संगीतांची जागा ऑर्केस्ट्रा व सिनेगीतांनी घेतली.

***  अष्टविनायक संगीत प्रतिष्ठाण :**

लातूर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रदीपजी राठी यांनी १९८९ साली अष्टविनायक संगीत प्रतिष्ठाणची स्थापना केली. शास्त्रीय नृत्य, भक्तिगीत, समूहगीत, समूहनृत्य, उत्कृष्ट वेशभूषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन या प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात येते. राज्य स्तरीय होणाऱ्या या स्पर्धेतून महाराष्ट्रातील हजारो स्पर्धकांनी यांत सहभाग नोंदविला. आपल्या कलेचे नैपुण्य दाखवित अनेक कलावंत या स्पर्धेत यशस्वी झाले. यातून हजारो स्थानिक कलावंतांना मुक्त व्यासपीठ मिळाले. एवढेच नव्हे तर लातूरच्या रसिकांनासुध्दा ही स्पर्धा पर्वणीच ठरली. लाखो रुपयांची पारितोषिके असल्यामुळे महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील श्रेष्ठ स्पर्धकांनी यात उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. पाच दिवस चालणाऱ्या या स्पर्धेच्या शेवटी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अभिजात गायक, वादक व नर्तकांची मैफल होते. या सर्वच स्पर्धेला व त्यातील कलावंताला प्रसिध्दी मिळावी म्हणून सह्याद्री वाहिनीवरून याचे प्रक्षेपण केले जाते.

पाहता-पाहता २०१४ साली अष्टविनायक संगीत प्रतिष्ठाणची २५ वर्षे पूर्ण झाली त्यामुळे या उपक्रमाच्या रौप्यमहोत्सवी सोहळा मोठ्या दिमाखदारपणे संपन्न झाला. ज्या समारोहात आश्विनी भिडे- देशपांडे यांच्या संगीत मैफलीने कळस चढविला. या स्पर्धेच्या यशासाठी श्री. प्रदीपजी राठी यांचे कल्पक नियोजन, ॲड. नारायण मार्डीकर, कै. खंडेराव कुलकर्णी, डॉ. राम बोरगावकर, गोविंद शेळके, विठ्ठलराव जगताप, शशिकांत देशमुख यांचे मोलाचे योगदान लाभले. ही परंपरा आजतागायत अविरतपणे सुरूच आहे.

*      **रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळ :**

आजची पिढी दिशाहीन आहे, पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुकरण करीत आहे, त्यांनी ३१ डिसेंबर साजरा करू नये असे म्हणण्याऐवजी त्यांना काहीतरी पर्याय दिला पाहिजे. याच संकल्पनेतून २००२ साली नववर्षाचे स्वागत करण्यासाठी लातूर येथील रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने 'चैत्रपल्लवी संगीतोत्सवाची' मुहूर्तमेढ रोवली. यातून संस्कृती संवर्धनासोबतच युवाशक्तीला विधायक कार्यात गुंतवून ठेवण्याचे महान कार्यही होत आहे.

संस्कृतीप्रमाणेच महाराष्ट्रातील लोकसंगीतरूपी खजिना काळाच्या ओघात लुप्त होत आहे म्हणूनच गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला या महोत्सवातून लोककलांचे सादरीकरण केले जाते. त्यात वासुदेव, जात्यावरच्या ओव्या, गण, गौळण, भजन, भारूड, पोवाडा, वाघ्या मुरळी, कोळीगीते, लोकनृत्य व लावणी इ. लोककलांचे सादरीकरण केले जाते.

भारतीय संस्कृतीप्रमाणे नवीन दिवसाची सुरुवात ही सुर्योदयाने होते त्यामुळे गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अभिजात संगीताच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले. अशा प्रकारे लातूर शहरात प्रातःकालीन संगीत सभा आयोजित करण्याची परंपरा पहिल्यांदाच रणसम्राट मंडळाने सुरू केली. या मैफलीत अनेक आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलावंतांनी सहभाग नोंदविला. यात उ.सैदुद्दिन डागर (धृपद-धमार) कीर्ती शिलेदार (नाट्य-संगीत) पं. मुकेश जाधव (स्वतंत्र तबलावादन) पं. राजीव कुलकर्णी (बासरी), पं. कुमार मर्डुर (गायन), पं. देविदास कुलकर्णी (व्हायोलिन) पं. राजेंद्र मणेरीकर (गायन), गौरी गोडसे ( गायन), पं. रमेश कानोले (गायन), पं. शिवदास देगलूरकर (गायन) अशा अनेक कलावंतानी शास्त्रीय संगीताच्या मैफली सजविल्या.

या संगीतोत्सवातून समाजातील अनेक गुणी व्यक्तींना 'चैत्रपल्लवी पुरस्काराने' सन्मानीत केले आहे. हा संगीतोत्सव सर्वांसाठी निःशुल्क खुला असतो. सुरुवातीच्या काळात हा संगीतोत्सव बसवेश्वर मंगल कार्यालयात व्हायचा. पुढे तो श्री. राजस्थान मारवाडी विद्यालयाच्या खुल्या रंगमंच्यावर होऊ लागला. त्यानंतर दयानंद शिक्षण संस्थेच्या सांस्कृतिक सभागृहात हा महोत्सव होत आहे. या संगीतोत्सवाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिह बिसेन, प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. शशिकांत देशमुख, शरद होळकर, प्रा. अनिल जाधव, प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, प्रा. आरेफ शेख, प्रा.वृषाली कोरडे, प्रा. डॉ. शुभांगी कुलकर्णी, संजय आयाचित, लक्ष्मीकांत तुबाजी, संजय सुवर्णकार प्रा. संजय सरवदे, प्रमोद भोयरेकर, रघुनाथ पाटील, हणुमंत पांचाळ, सुरज



साबळे, सोमनाथ पवार, कौस्तुभ जोशी यांनी मोलाचे योगदान दिले आहे. थोडक्यात की, रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने लोककला, संस्कृती व अभिजात संगीत जोपासण्यासाठी जे प्रयत्न केले आहेत ते स्तुत्यच आहेत असे म्हणता येईल.

*      **सवाई संगीत संमेलन :**

स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त व आर्य संगीत प्रसारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ व २८ फेब्रुवारी २०१० या दिवशी सवाई संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले. लातूरकरांना शास्त्रीय संगीताच्या मैफलीचा आनंद घेण्याची संधी मिळाली हा मनीकांचनीचा योग असावा. हे संगीत संमेलन दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात झाले. या मैफलीचे पहिले पुष्प सजविले ते भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचे सुपुत्र व शिष्य पं. श्रीनिवास जोशी यांनी यानंतर मालिनी राजूरकर यांचे बहारदार गायन सादर झाले. श्रीकांत देशपांडे यांनीही अत्यंत सुरेख पद्धतीने किराणा घराण्याची गायिकी सादर करून लातूरकरांना मंत्रमुग्ध केले.

दुसऱ्या दिवशीच्या मैफलीची सुरुवात किराणा घराण्याचे गायक पं. उपेंद्र भट यांनी केली. त्यांनी 'मिया की तोडी' हा राग आपल्या धीरगंभीर आवाजात पेश केला. त्यानंतर पं. अजय पोहनकर यांनी आपल्या बहारदार गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना भरत कामत यांनी तबल्याची साथसंगत केली तर हार्मोनियमची साथ अरविंद थत्ते यांनी केली. याबरोबरच पं. सतीश व्यास यांचे संतुरवादन तेवढेच रसिकांना भावून गेले. दोन दिवस तीन सत्रांत झालेल्या या मैफलीतून जिल्ह्यातील संगीत रसिकांनी याचा आनंद घेतला. एका व्याख्यानमालेने संगीत संमेलनाचे आयोजन करावे ही घटना महाराष्ट्रात पहिल्यांदाच घडत असावी हाही एक आगळा वेगळा लातूर पॅटर्न असे उद्‌गार येथील लोकप्रिय आमदार मा. दिलीपराव देशमुख यांनी मागील बैठकीत काढले होते. ते अगदी सार्थ आहेत.

केंद्रीय अवजड उद्योगमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांची रसिकांत पूर्णवेळ उपस्थिती, आ. श्री. दिलीपरावजी देशमुख यांच्या रूपाने स्वागताध्यक्ष म्हणून लाभलेली रूपेरी किनार, सवाई गंधर्व संमेलनाचे निवेदक आनंद देशमुख यांचे खुमासदार निवेदन, रसिकांचा उदंड प्रतिसाद, कुशल संयोजनामुळे सवाई संगीत संमेलन लातूरच्या सांगीतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे झाले. या संगीत संमेलनानिमित्त 'संवादिनी' चा मथळ्याखाली एक स्मरणिकाही प्रकाशित करण्यात आली. संमेलनाच्या यशस्वितेसाठी

श्री. अतुल देऊळगावकर, श्री. विजय दबडगावकर, श्रीनिवास लाहोटी, डॉ. अजित जगताप, श्री. शिरीष पोफळे, श्री. कमलकिशोर अग्रवाल, प्रा. अभिजीत बादाडे, सिध्देश्वर स्वामी यांनी परिश्रम घेतले.

* **लातूर फेस्टिवल :**

लातूरचे युवा नेते आ. श्री. अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून व माजी मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर फेस्टिव्हलची २०११ साली सुरुवात करण्यात आली. अबाल-वृध्दांना मोहून टाकणारे भव्यदिव्य फेस्टिव्हल यापूर्वी लातूरच्या इतिहासात कधीच झाले नव्हते. भजन, लोकसंगीत, नृत्य, नाटकांपासून ते अभिजात संगीतापर्यंत, चित्र शिल्पांपासून ते गायन नृत्यांच्या स्पर्धांपर्यंत, जादुच्या खेळापासून ते चित्रपट महोत्सवापर्यंत अनेक कार्यक्रमांची मुक्त बरसात या महोत्सवातून झाली. क्रीडा संकुलाचे भव्य व्यासपीठ, दगडोजीराव देशमुख सभागृह, दयानंद सभागृह, नाना नानी पार्क, पी. व्ही. आर. टॉकीज अशा शहरातील मुख्य पाच व्यासपीठांवरून हा महोत्सव चालतो. मनोरंजनाबरोबरच पर्यावरण रक्षणासाठी 'सायकल डे', राष्ट्र भक्तिसाठी '५२ सेकंद देशासाठी' असे समाज उपयोगी उपक्रमांचेही आयोजन या महोत्सवातून झाले.

संगीतात अभिरूची असणाऱ्यांसाठी सुगम संगीत, लोकसंगीत, गजल, मुशायरा, कव्वाली यांसारख्या कार्यक्रमांबरोबरच प्रात:कालीन सुप्रभात संगीत सभेचेही आयोजन करण्यात आले. कैलास खेर, विशाल शेखर, हृदयनाथ मंगेशकर, सलील कुलकर्णी, तौफीक कुरेशी, श्रीधर फडके, कलापिनी व भुवनेश कोमकली अशा अनेक कलावंतांनी लातूरकरांची ओंजळ भरली. नाना नानी पार्कच्या ॲम्पी थियटरवर सुप्रभात संगीत सभेचे आयोजन केले गेले. यात पं. शौनक अभिषेकी(गायन),पं. देवकी पंडीत (गायन),पं. मिलिंद तुळणकर(जलतरंग),पं. संजीव अभ्यंकर(गायन), पं. मुकेश जाधव (तबला), पं. रूपक कुलकर्णी (बासरी), सावनी शेंडे (गायन) आदी कलावंतांनी लातूरकरांची सुप्रभात सुरेल केली. सकाळच्या कोवळया उन्हात लातूरकरांनीही न भूतो न भविष्यती प्रतिसाद देततालासुरांचा मनमुराद आनंद लुटला. लातूरच्या सांस्कृतिक चळवळीतील एक सोनेरी पान म्हणून या लातूर फेस्टिव्हलचा उल्लेख करता येईल.



* **सूरश्री प्रतिष्ठाण :**

लातूर जिल्ह्यातील रसिकांची शास्त्रीय संगीताची भूक भागवावी या प्रमुख उद्देशाने काही तरुणांनी एकत्र येऊन २०१२ साली सुरश्री प्रतिष्ठाणची स्थापना केली. पुणे येथील सवाई गंधर्व महोत्सवाला प्रत्येक श्रोत्यांना जाता येत नाही म्हणून रसिकाग्रणी भीमाशंकरआप्पांनी जशा मैफलीचे आयोजन लातुरात केले, त्याच धर्तीवर सूरश्री प्रतिष्ठाणची सुरुवात झाली. या प्रतिष्ठाणच्या वतीने १५०० रुपयांत दोघांसाठी वर्षातून तीन शास्त्रीय संगीताच्या मैफली देण्यात आल्या. या उपक्रमासाठी लातुरातील अनेक कानसेनांनी उत्स्फूर्तपणे सभासद नोंदणी केली. या सभासदांना घरपोच प्रवेशिका दिल्या जातात. या उपक्रमामुळे अनेक नवीन रसिक निर्माण घेण्यास मदत झाली.

या प्रतिष्ठाणच्या माध्यमातून आतापर्यंत पं. उल्हास कशाळकर, पं. सुरेश तळवळकर, पं. कौशिकी चक्रवर्ती, पं. संहिता नंदी, पं. जयतीर्थ मेवंडी, पं. गणपती भट, पद्मभूषण पं. डॉ. एन राजम् व कन्या संगीता शंकर, पं. रमाकांत गायकवाड, सितारवादक संजय देशपांडे पं. अतुलकुमार उपाध्ये, उ. शाहिद परवेझ यांच्यासारख्या दिग्गज कलावंतांनी लातूरकरांच्या कर्णाची ओंजळ भरली.

पं. एन राजम् यांच्या मैफलीविषयी दै. सकाळमध्ये सुरेख वर्णन केले आहे. रविवारी डॉ. एन. राजम् यांनी येथील रसिकांना स्वरविश्वात नेले. त्यांची कन्या व शिष्या पं. संगीता शंकर यांनी सहवादन करीत तेवढीच तोलामोलाची साथ केली. त्यांना अजित पाठक यांनी तबल्याची साथ केली. पं. राजम् यांनी गोरख कल्याण या रागाने आपल्या मैफलीस प्रारंभ केला. यानंतर 'पायोजी मैने रामरतन धन पायो' हे भजन सादर केले. त्यानंतर बनारसी ठुमरी सादर केली. दोन तास चाललेल्या या मैफलीत रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

या प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रा. शशिकांत देशमुख तर सोनू डगवाले हे सचिव म्हणून काम पाहतात. सौ. मिनाक्षी कोळी, सिद्धेश्वर स्वामी, प्रा. अरेफ शेख, गजानन डगवाले हे या प्रतिष्ठापणचे सक्रिय सभासद आहेत. ॲड. त्रिंबकदास झंवर, डॉ. अजित जगताप, श्री. अतुल देऊळगावकर, डॉ. मंजुषा कुलकर्णी यांचे नेहमीच मार्गदर्शन या प्रतिष्ठाणला लाभते. थोडक्यात लातूरच्या सांस्कृतिक चळवळीतील एक महत्त्वाचे वळण म्हणून या प्रतिष्ठाणकडे पाहता येईल.

*　**महासमाराधना महोत्सव :**

प. पू. श्री. श्री. १०८ बालगोविंदानंद सरस्वती (बालस्वामी) महाराज यांच्या समाराधणानिमित्त लातूर येथे २०१३ पासून संगीतमहोत्सवास प्रारंभ झाला. सुमारे ५० वर्षांपूर्वी प.पू. बालस्वामी व त्यांच्या पत्नी विमलाताई यांनी औसा रोडवर सदानंद मठाची स्थापना केली. समाजातील अन्य मठांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण या सदानंद मठाने जोपासले आहे. प. पू. बालस्वामी यांनी आध्यात्मिक क्षेत्राबरोबरच संगीत, योग, स्थापत्य, लेखन इ. ची विलक्षण आवड होती. ते उत्तम लेखक होते. अगदी मृत्यूपर्यंत म्हणजे वयाची शंभरी उलटून गेल्यानंतरसुद्धा त्यांचे लेखन चालू होते. शेवटच्या चार-पाच वर्षात त्यांनी गुरूचरित्राची पूर्ण पोथी पूर्णलेखन करून प्रसिद्ध केली. त्यांना संगीताविषयी आवड होती त्यामुळे दर दत्तजयंतीला सप्ताहाचे आयोजन ते करीत. भजन, कीर्तन, प्रवचनाबरोबरच दोन दिवस शास्त्रीय संगीताच्या मैफली व्हायच्या. त्यांनी वयाच्या १०८ व्या वर्षी समाधी घेतील. तो दिवस होता ५ नोव्हेंबर २०१२. त्यांनतर रिकामी झालेली पोकळी विमलताईंनी अत्यंत समर्थपणे भरून काढली. प.पू. बालस्वामींना संगीताविषयी रूची असल्यामुळे त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त 'प्रथम महासमाराधना' महोत्सव घ्यावा असे ताईंना व त्यांच्या सर्व शिष्यांना वाटले. म्हणून श्री. सदानंद मठ, दत्तमंदिर, औसा रोड येथे रविवार दि. २० ऑक्टोबर ते शनिवार दि. २६ ऑक्टोबर २०१३ या सात दिवसांत हा महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात भजन, प्रवचनाबरोबरच अनेक आंतरराष्ट्रीय कलावंतांनी हजेरी लावली. यात विश्वविख्यात सतारवादक उ. उस्मान खाँ (पुणे), सुप्रसिद्ध गायक डॉ. विकास कशाळकर (पुणे), पं. शौनक अभिषेकी (पुणे) सुरमणी पं. बाबुराव बोरगावकर, तालमणी डॉ. राम बोरगावकर, सौ. सरोज बोरगावकर, गणेश बोरगावकर, सौ. मधुवंती बोरगावकर- देशमुख, सरस्वती बोरगावकर, हन्नुमियाँ शेख (भालकी) पंकज शिरभाते (नांदेड), हरिश खंडेराव कुलकर्णी इ. कलावंतांनी हा महोत्सव अविस्मरणीय केला. यासंदर्भात 'मराठवाडा नेता' या वृत्तपत्रात लिहिले आहे की, "या समारोहाप्रसंगी जगविख्यात गायक पं. अजय पोहनकर यांनी राग बागेश्री विलंबित ख्याल आळवून ठुमरी, दादरा हे गीतप्रकार अतिशय प्रभावीपणे सादर करून रसिकांची मने जिंकली... विश्वविख्यात तबलावादक पं. नयन घोष (मुंबई) यांच्या बहारदार तबलावादनानंतर बनारस येथील पं. संदीप मिश्रा व संगीत मिश्रा यांच्या सारंगीच्या जुगलबंदीने रसिकांना मंत्रमुग्ध केले."



द्वितीय महासमाराधना महोत्सव गुरुवार, दि. ९ आक्टोबर ते बुधवार, दि. १५ आक्टोबर २०१४ या कालावधीत संपन्न झाला. या महोत्सवात डॉ. श्री. प्रमोद गायकवाड व कु. नम्रता गायकवाड यांचे शहनाई वादन, पं. संजीव अभ्यंकर यांचे शास्त्रीय गायन, पं. रोनू मजुमदार यांचे बासरीवादन व पं. रामदास पळसुले यांची तबला साथ, डॉ. मंजिरी देव यांचे कथ्थक नृत्य, पं. उदय भवाळकर यांचे धृपद गायन, पं. ज्ञानोबा लटपटे माऊली यांची पखावज साथ, बोरगावकर कुटुंबीयांचे गायन-वादन, श्री. विलास कुलकर्णी, प्रा. रविंद्र गांगुर्डे व सौ. साधना गांगुर्डे यांचे शास्त्रीय गायन असे अप्रतिम कार्यक्रम सादर झाले.

तृतीय महासमाराधना महोत्सव मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर ते सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०१५ या कालावधित मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात श्री. कल्याण अपार (शइनाई वादन), मीता पंडीत (शास्त्रीय गायन), पार्वती दत्ता (कथ्थक नृत्य), उ. हन्नमियाँ शेख (शास्त्रीय गायन), मंगेश बोरगावकर (गायन), डॉ. राम व गणेश बोरगावकर (तबला जुगलबंदी), पं. बाबुराव बोरगावकर (शास्त्रीय गायन), पद्मविभूषण डॉ. एन. राजम् व कु. रागीणी शंकर यांचे (व्हायोलीन वादन), भीमण्णा जाधव (सुंद्रीवादन) आणि विलास व हरीश कुलकर्णी यांचे गायन संपन्न झाले.

या महोत्सवात सर्वच कलावंतांनी रसीक श्रोत्यांना संगीतानंदात डुंबवून टाकले. सातही दिवस लातूरकरांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. या महोत्सवाच्या यशस्वितेसाठी अमृत महाराज पाटील, डॉ. राम बोरगावकर, पं. बाबुराव बोरगावकर, हरीश कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, प्रा. विश्वनाथ स्वामी हे परिश्रम घेत असतात. सातही दिवस अभिजात शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित करणारा हा महासमाराधना महोत्सव लातूरच्या सांस्कृतिक पर्वात मानाचा तुरा खोवणारा महोत्सव आहे यात शंकाच नाही.

*　**आवर्तन प्रतिष्ठाण :**

स्वर, ताल आणि लय हे मानसाच्या जगण्याचे वैभव आहे. असे हे अभिजात संगीताचे वैभव प्राणपणाने जपावे, अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी काही अभिनव उपक्रम करता येईल का? याच विचारातून आवर्तन मासिक संगीत सभेची सुरूवात झाली. लातूरकरांना अभिजात संगीत ऐकता यावे यासाठी प्रत्येक महिन्यात एका कलावंताचे गायन, वादन अथवा नृत्याच्या मैलीचे आयोजन करावे असे ठरले. आवर्तन प्रतिष्ठाण व अष्टविनायक प्रतिष्ठाण यांनी या उपक्रमासाठी मोलाचे योगदान दिले आहे. या मासिक

संगीत सभेत एका महिन्यात स्थानिक कलावंत तर दुसऱ्या महिन्यात लातूर शहराबाहेरील कलावंत अशा कलावंतांना पाचारण करून नवोदित कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले व लातूरकरांना मनसोक्त अभिजात संगीत ऐकण्याची संधी उपलब्ध करून दिली. विशेष म्हणजे या मासिक संगीत सभेत केवळ शास्त्रीय संगीताव्यतिरिक्त सुगम अथवा उपशास्त्रीय संगीतसुद्धा सादर केले जात नाही. दि. १४ एप्रिल २०१५ रोजी नांदेड येथील धनंजय जोशी यांच्या पहिल्या मैफिलीने या मासिक संगीत सभेचा श्रीगणेशा झाला. त्यानंतर जयंत केजकर (पुणे), अशिष मिश्रा (भोपाळ), सौ. मेघा परांजपे (पुणे), नवनिता चौधरी (दिल्ली), पंकज शिरभाते (नांदेड), सौ. आसावरी वाईकर (चेन्नई) यांनी आपल्या गायन, वादन व नृत्याने लातूरकरांना मंत्रमुग्ध केले. या बरोबरच लातूर येथील हरिष कुलकर्णी, तेजस धुमाळ, विशाल सोमवंशी व सौ. नभा बडे यांच्या नुपूर अकादमीच्या नवोदित कलावंतांनी दर्जेदार सादरीकरण करून एक अपूर्व मेजवानी दिली. तर कु. अंजली व नंदिनी गायकवाड या उभरत्या कलावंतांनी आपले कला नैपुन्य दाखवून लातूरकरांना मंत्रमुग्ध केले. प्रा.दूर्गादास सबनिस यांचे गायन व प्रा. सुनिल सर्वज्ञ यांच्या चित्रकलेचा एकाच व्यासपीठावर झालेला आविष्कार लातूरकरांसाठी नवा होता.

दिवाळी पाहट हा कार्यक्रम सुरू करण्याची परंपरा आवर्तन प्रतिष्ठाण व अष्टविनायक प्रतिष्ठाण यांनी सुरू केली. २०१५ साली प्रा. वृषाली देशमुख व हरिष कुलकर्णी यांच्या गायनाने दिवाळी पहाटची सुरूवात झाली. त्यानंतर २०१६ साली पं. रघुनंदन पणशीकर, २०१७ साली मंजुषा पाटील, २०१८ साली पं. जयतिर्थ मेवूंडी (हुबळी) यांनी लातूरकरांची दिवाळी पहाट आपल्या सुरांनी मंगलमय केली. याच बरोबर आवर्तन ने प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले. यात पं. राजेंद्र मणेरिकर (सातारा) यांनी पं. राम मराठे यांची गायकी व गायन या विषयावर सप्रयोग व्याख्यान दिले. श्री. अतूल देऊळगावकर व सुनिल देशपांडे यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'कुमार दर्शन' हा ही उपक्रम रसिकांच्या पसंतीस उतरला. पं. राहूल देशपांडे यांच्या प्रकट मुलाखतीतून संगीतातील बारकावे, नाटय संगीताची स्थिती व रियाज तंत्र या विषयाची माहिती उलगडली. गानसरस्वती किशोरीताई अमोनकर यांनाही आवर्तन परिवाराने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

पहाता-पहाता आवर्तनची ५० वी सुवर्ण महोत्सवी मैफल जवळ आली आहे. ही मैफल संस्मरणीय व्हावी यासाठी आवर्तन मधील सर्व सदस्य प्रयत्नशील आहेत. अर्थात या सर्व आयोजन नियोजनाच्या तसेच कलावंतांचे मानधन व खर्च आवर्तन मधील सर्व सदस्य स्वतःच्या खिशातून करीत आले आहेत. नुकतेच आवर्तन प्रतिष्ठान नोंदणीकृत



झाले आहे. त्यामुळे केवळ १५००/- रू. घेऊन रसिकांची सदस्य नोंदणी चालू केली आहे. यातून त्यांना वर्षातील १२ मैफिलींचा आनंद घेता येईल.

आवर्तन प्रतिष्ठाण चे अध्यक्ष म्हणून श्री. अभय शहा तर सचिव म्हणून डॉ. रवि पोरे हे कार्यरत आहेत. याबरोबरच प्रा. शशिकांत देशमुख, प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, श्री. लक्ष्मीकांत तुबाजी, प्रा.डॉ. संदिपान जगदाळे, श्री. विशाल जाधव, श्री. सिद्धेश्वर स्वामी, श्री. केशव जोशी, श्री. हेमंत रामढवे, डॉ. वृषाली देशमुख, डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ. अमित उटीकर, देवदत्त कुलकर्णी व श्री. महेश काकनाळे इ. सदस्य अविरत परिश्रम घेत आहेत. या मासिक संगीत सभेसाठी लातूरचे कलासक्त समाज सेवक श्री. प्रदीपजी राठी हे मैफिलीसाठी अष्टविनायक प्रतिष्ठाणचे गणेश हॉल निशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देत असतात. तसेच त्यांचे या उपक्रमासाठी नेहमीच मौलिक सहकार्य लाभलेले आहे. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी सुरू केलेल्या या चळवळीत महाराष्ट्रच नव्हे तर इतर प्रांतातील कलावंत सुद्धा गायन-वादन करण्यासाठी उत्सुक आहेत. हीच या चळवळीची यशस्वीता आहे असे म्हणता येईल.

* **शालेय स्तरावर सांगीतिक शिक्षण :**

लातूर शहरातील अनेक शाळांमधून संगीत विषयाचे अध्यापन केले जाते. श्री. देशीकेंद्र विद्यालयात श्री. रमाकांत स्वामी हे २० वर्षा पासून संगीत शिक्षक म्हणून सेवा करीत आहेत. ते पं. शिवदास देगलूकर यांचे शिष्य आहेत. गायन व तबला वादनाचे शिक्षण त्यांनी त्यांच्याकडूनच घेतले. आकाशवाणी औरंगाबाद केंद्रावर 'युवावाणी' कार्यक्रमात त्यांनी तबलावादन केले. पं. जसराजजी, सरला भिडे, प्रा. प्रीती भट, गिरीश वझलवार आदींच्या बरोबर त्यांनी तबलासाथ केली आहे. युनेस्कोशी संबंधित 'युनायटेड स्कूल ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली' या संस्थेच्या वतीने १९९० साली बेंगलोर येथे अधिवेशन झाले होते. या सांगीतिक अधिवेशनात महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली होती. एक उपक्रमशिल संगीत शिक्षक म्हणून ते सर्वत्र परिचीत आहेत. शालेय स्तरावर त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना संगीताचे बाळामृत पाजले आहे.

श्री. केशवराज विद्यालयात श्री. किरण भावठाणकर हे १९८४ ते १९९६ या कालावधीत संगीत शिक्षक म्हणून कार्यरत होते. ते संगीत अलंकार, बी. एड. असून त्यांनी संगीताचे शिक्षण पं. कमलाकर परळीकर यांच्याकडून घेतले. ते उत्तम गायक असून त्यांच्या मराठवाड्यात अनेक ठिकाणी मैफली झाल्या आहेत. त्यांची पदोन्नती इ

ााल्यानंतर १९९६ साली संतोष बीडकर हे संगीत शिक्षक म्हणून रूजू झाले. त्यांनी पं. प्राणेश पोरे, किरण भावठाणकर व पं. शिवदास देगलूरकर यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले. संगीत अलंकार, बी. एड. पर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले आहे. अनेक मान्यताप्राप्त व्यासपीठांवरून त्यांनी मैफली सादर केल्या आहेत. अनेक संगीत शिबिरातसुद्धा त्यांनी सहभाग नोंदविला आहे. विविध समूहगीते, पोवाडे यांची रचना करून विद्यालयास अनेक पारितोषिके प्राप्त करून दिली आहेत.

श्री. ज्ञानेश्वर विद्यालयात खंडेराव कुलकर्णी हे अनेक वर्षे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत होते. सध्या श्री. गोविंद शेळके हे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. गोदावरी कन्या विद्यालयात सौ. सरोज बोरगावकर या संगीत अध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. सरस्वती संगीत विद्यालयात श्री. लक्ष्मण श्रीमंगले हे १९९१ सालापासून संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांनाही संगीताचे अध्यापन करतात. श्री. व्यंकटेश विद्यालय शंकर जगताप तर यशवंत विद्यालयात सौ. मिनाक्षी भारती या संगीत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

***  महाविद्यालयीन स्तरावरील संगीत शिक्षण :**

लातूरच्या अभिजात संगीताच्या प्रचारार्थ येथील महाविद्यालयाने अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. त्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

***  राजर्षि शाहू महाविद्यालय :**

लातूर शहरात सर्वप्रथम राजर्षि शाहू महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयासाठी संगीत विषय प्रारंभ झाला तो १९९२ पासून. सुरुवातीपासूनच पं. बाबुराव बोरगावकर हे संगीत विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर १९९७ पासून प्रा. हरीसर्वोत्तम जोशी हे तबलावादनाचे धडे देण्यासाठी रूजू झाले. ते सध्या संगीत विभाग प्रमुख म्हणून कार्य पाहतात. २००५ ते २०१२ या काळात प्रा. सौ. स्मीता अजेगावकर यांनी या महाविद्यालयात संगीत अध्यापनाचे कार्य केले. २००४ पासून वरिष्ठ महाविद्यालयात संगीत विषयाचे अध्यापन सुरू झाले. वरिष्ठ महाविद्यालयात प्रा. सोमनाथ पवार व प्रा. वैभव माने हे कार्यरत आहेत. प्रा. सोमनाथ पवार हे प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांचे शिष्य आहेत. तर प्रा. माने हे पं. विठ्ठलराव जगताप यांचे शिष्य आहेत. या महाविद्यालाने 'शाहू संगीत समारोहाचे' आयोजन करून अनेक थोर कलावंतांना पाचारण केले आहे. यात उ. अजीम खाँ, पं. जयतिर्थ मेवंडी, पं. अशीष मिश्रा इ. कलावंतांचा नामोल्लेख करता येईल.



***  दयानंद कला महाविद्यालय :**

१९९६ पासून दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयात संगीत विषयाची सुरुवात झाली. सुरुवातीला प्रा. सीमा जोशी यांनी दोन वर्षे संगीत अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर १९९९ पासून प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी व प्रा. संदीपान जगदाळे हे संगीत अध्यापक म्हणून रूजू झाले. संगीत विभागप्रमुख प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी हे पं. शिवदास देगलूरकर यांचे शिष्य आहेत. संगीत अलंकार, एम. ए. संगीत व पीएच. डी. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले आहे. 'पं. सुधीर फडके यांच्या गीतातील रागसंगीत' या विषयावर त्यांनी संशोधन केले आहे. महाविद्यालयीन जीवनापासूनच विविध स्पर्धांत त्यांना अनेक पारितोषिके मिळाली. कर्नाटक, आंध्र प्रदेश येथे त्यांच्या मैफली झालेल्या आहेत. विविध गीतांना चाली देऊन त्यांनी महाविद्यालयाच्या युवकमहोत्सवात अनेक पारितोषिके मिळवून दिली आहेत. संस्कार भारती, रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून ते लातूरच्या सांस्कृतिक चळवळीस मोलाचे योगदान देत आहेत.

दयानंद कला महाविद्यालयात २००५ पासून बी. ए. व २००८ पासून एम. ए. पर्यंतचे संगीत वर्ग सुरू झाले. वरिष्ठ महाविद्यालयात प्रा. वृषाली कोरडे-देशमुख या अध्यापनाचे कार्य करतात. त्या पं. शिवदास देगलूकर यांच्या शिष्या असून संगीत अलंकार, एम. ए. संगीत, नेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगढ येथील महत्त्वपूर्ण संगीतमहोत्सवातून त्यांनी हजेरी लावली आहे. केंद्र सरकारची शिष्यवृत्तीही त्यांना मिळाली आहे. आकाशवाणी, दूरदर्शनची सह्याद्री व इनसिंक या वाहिन्यांवरून त्यांचे शास्त्रीय व सुगम गायनाचे प्रसारण झाले आहे. आरोह संगीत विद्यालयातून त्या संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

प्रा. डॉ. शुभांगी कुलकर्णी या बी. ए. एम. एस. असून त्यांनी संगीत अलंकार व एम. ए. संगीतपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. त्या प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांच्या पत्नी आहेत. त्यांचे शिक्षण सौ. मंगला नाईक व प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांच्याकडे झाले आहे. त्या दयानंद कला वरिष्ठ महाविद्यालयात संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत. विविध मैफलीतून त्यांनी गाणे सादर केले आहे. 'सूर मल्हार संगीत विद्यालया'च्या त्या संचालिका आहेत.

प्रा. अनिल जाधव हे वरिष्ठ महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांचे सांगीतिक शिक्षण डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांच्याकडे झाले आहे. ते एम. ए. संगीत, नेट (संगीत), नेट

(मराठी) व सेट (शिक्षणशास्त्र) परीक्षा उत्तीर्ण आहेत. महाविद्यालयीन काळात त्यांनी अनेक राज्य स्तरीय स्पर्धांत यश संपादन केले आहे. ते लोकसंगीताचे अभ्यासक आहेत.

दयानंद कला महाविद्यालयात इ. ११ वी ते एम. ए. पर्यंतचे सांगीतिक शिक्षण दिले जाते. याचबरोबर प्रारंभिक ते संगीत विशारद या परीक्षांसाठी अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळाचे केंद्रसुद्धा चालू आहे. याचा लाभ शेकडो विद्यार्थी घेत आहेत. स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठाच्या युवकमहोत्सवात मागील आठ वर्षांत ४ वेळा सर्वसाधरण विजेतेपद तर ४ वेळा उपविजेतेपद प्राप्त करून या महाविद्यालयाने संपूर्ण विद्यापीठात दबदबा निर्माण केला आहे.

* **महात्मा बसवेश्वर महाविद्यालय :**

१९९६ पासून या महाविद्यालयात इ. ११ वी व १२ साठी संगीत विषय सुरू झाला. सुरुवातीला एक वर्ष सौ. महादेवी स्वामी-मोरे यांनी सेवा केली. त्यानंतर १९९७ पासून प्रा. विजयकुमार धायगुडे यांनी विभाग प्रमुखांचा पदभार स्वीकारला. प्रा. विश्वनाथ स्वामी हे १९९९ पासून तबलावादन शिकविण्यासाठी रूजू झाले. २००४ पासून वरिष्ठ महाविद्यालयात संगीत विषय सुरू झाला, सध्या इ. ११ वी ते बी. ए. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना संगीताचे धडे दिले जातात. स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठात याही महाविद्यालयाने अनेक पारितोषिके पटकाविण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

* **सरस्वती संगीत कला महाविद्यालय :**

संगीताचा प्रचार व प्रसार करता यावा यासाठी २००१ साली बोरगावकर बंधूंनी या महाविद्यालयाची सुरुवात केली. कनिष्ठ महाविद्यालयात पं. सुरमणी बाबुराव बोरगावकर हे अध्यापनाचे कार्य करतात. वरिष्ठ महाविद्यालयात तालमणी डॉ. राम बोरगावकर हे अध्यापनाचे कार्य करतात. तर गायनाचे धडे देण्याचे कार्य प्रा. अमोल जाधव हे करतात. प्रा. जाधव हे मुळचे नांदेडचे असून ते एम. ए. संगीत व नेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. त्यांचे सांगीतिक शिक्षण पं. शाम गुंजकर, विलास गारोळे, प्रा. निशा कदम, प्रा. शिवदास शिंदे यांच्याकडे झाले आहे. जुलै २०१४ पासून ते या महाविद्यालयात कार्यरत आहेत.

* **आचार्य भातखंडे संगीत महाविद्यालय :**

डॉ. शिवरूद्र स्वामी आणि प्रा. संतोष तंत्रे पाटील यांनी १९९४ साली 'डॉ. कुमार गंधर्व संगीत प्रसारक मंडळाची' स्थापना केली. या अंतर्गत २०१० साली आचार्य



भातखंडे संगीत महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयातून बी. ए. पर्यंतच्या पदवीचे शिक्षण दिले जाते. हे महाविद्यालय प्रकाशनगर येथे चालते. तर याच महाविद्यालयाची शाखा क्रीडा संकूल येथे आहे. या शाखेतून प्रथमा, मध्यमा व विशारद असे २-२ वर्षांचे डिप्लोमा अभ्यासक्रम चालतात. या सर्व पदवी व डिप्लोमा अभ्यासक्रमांना इंदिरा कला संगीत विश्वविद्यालय, खैरागड यांची मान्यता आहे. या महाविद्यालयातून प्रा. डॉ. शिवरूद्र स्वामी व प्रा. संतोष तंत्रे हे अध्यापनाचे कार्य करतात. प्रा. तंत्रे यांचे एम. ए. संगीत, संगीत भूषणपर्यंतचे शिक्षण झाले आहे. त्यांच्या पत्नी सौ. श्वेता संतोष तंत्रे या उत्कृष्ट नृत्यांगना आहेत. त्यांनी नृत्याचे शिक्षण कुमार स्वामी (हैद्राबाद), रमेश बोडे (अमरावती) व डॉ. माधवी सिंग (खैरागड) यांच्याकडून घेतले आहे. त्याही कथ्थक नृत्याचे धडे देतात. या विद्यालयातून विविध संगीतिक स्पर्धा, कार्यशाळा व संगीतोत्सवाचे आयोजन करून संगीत प्रसारास योगदान दिले जाते.

कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर राजमाता जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालयात २००१ पासून संगीताचे अध्यापन केले जाते. येथे प्रा. गुरूनाथ येडले हे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत, ते एम. ए. संगीत, संगीत अलंकार व बी. एड. आहेत. त्यांनी गुरूवर्य एम. एस. कोडे यांच्याकडून विशारदपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी पं. शिवदास देगलूकर, पं. शाम गुंजकर यांच्याकडून तालीम घेतली. अभिजात संगीताबरोबर त्यांनी ह. भ. प. विनायक महाराज माडजकर, शिवाजी बडे महाराज चोपणवाडीकर, भास्कर अण्णा महाराज आदी महाराजांकडून आध्यात्मिक शिक्षण घेतले आहे. ते प्रवचनकार म्हणून ही प्रसिद्ध आहेत. ह. भ. प. तानाजी महाराज (डोंग्रजकर) यांच्या चाकूर येथील संतकृपा आश्रमातून ते नि:शुल्क संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

परिमल उच्च माध्यमिक विद्यालयात प्रा. शिवकुमार उरगुंडे हे अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

**खाजगी संगीत महाविद्यालये :**

* **सरस्वती संगीत महाविद्यालय :**

संगीत महर्षि बाबा बोरगावकर यांनी १९६५ साली या संगीत महाविद्यालयाची स्थापना केली. या संगीत महाविद्यालयातून पं. गोविंदराव बोरगावकर, डॉ. राम बोरगावकर,

पं. बाबुराव बोरगावकर, सौ. सरोज बोरगावकर व गणेश बोरगावकर हे गायन-वादनाचे अध्यापन करीत आहेत. प्रारंभिक ते संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण या विद्यालयातून दिले जाते.खोरे गल्ली, दत्त मंदिर व सिग्नल कॅम्प अशा तीन ठिकाणी त्यांच्या विद्यालयाच्या शाखा आहेत. या विद्यालयातून शेकडो विद्यार्थी विशारद, अलंकार झाले असून अनेक कलावंत निर्माण झाले आहेत.

* **सूरताल संगीत महाविद्यालय :**

पं. शांतारामजी चिगरी यांनी १९७३ साली या विद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. पं. स्व. शकुंतलादेवी चिगरी यांनीसुद्धा या विद्यालयातून अध्यापनाचे कार्य केले. प्रारंभिकपासून संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण या विद्यालयातून दिले जाते. अ. भा. गांधर्व मंडळाचे केंद्रही या महाविद्यालयातून चालविले जाते. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत या विद्यालयातून तयार झाले आहेत. नवीन रेणापूर नाका येथे हे महाविद्यालय चालू आहे.

* **गुरुवार संगीत महाविद्यालय :**

भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी व प्रा. के. एस. वारद यांच्या पुढाकाराने गुरुवार संगीत विद्यालयाची सुरुवात झाली. सध्या पं. विठ्ठलराव जगताप व त्यांचे सुपुत्र शंकर जगताप हे प्रारंभिक ते संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण देत आहेत. हे महाविद्यालय गांधर्व मंडळाशी संलग्न असून संगीत विशारदपर्यंतच्या गायन-वादनाच्या परीक्षांची सोय या महाविद्यालयात आहे. शेकडो विद्यार्थी येथून तयार होऊन गेले आहेत.

* **शारदा संगीत महाविद्यालय :**

श्री. अमर कडतने यांनी १९९८ साली या संगीत महाविद्यालयाची सुरुवात केली. शास्त्रीय गायन, तबलावादन, हार्मोनियम व सुगम संगीताचे मार्गदर्शन या विद्यालयातून केले जाते. पहाटे पाच वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत चालणारे हे लातूर शहरातील एकमेव महाविद्यालय आहे.अमर कडतने यांच्या पत्नी सौ. विजयालक्ष्मी कडतने यासुद्धा संगीत विशारद (गायन व हार्मोनियम) व एम. ए. संगीत आहेत. या महाविद्यालयातून त्या अध्यापनाचे कार्य करतात. अमर कडतने यांचे अनेक विद्यार्थी हे संगीत विशारद व अलंकार परीक्षा उत्तीर्ण आहेत. साधारणतः दोनशे विद्यार्थी त्यांच्याकडून संगीताचे धडे घेत आहेत. संभाजी नगर व बार्शी रोड या दोन ठिकाणी त्यांची विद्यालये चालतात.

* **आरोह संगीत विद्यालय :**

प्रा. शशिकांत देशमुख हे या विद्यालयाचे संचालक आहेत. ते संगीत अलंकार,



एम. ए. संगीत, बी. एड. आहेत. त्यांनी श्री. प्राणेश पोरे, श्री. पांडुरंग देशपांडे व पं. शिवदास देगलूरकर यांच्याकडून संगीताची तालीम घेतली. महाविद्यालयात असताना त्यांनी अनेक सांगीतिक स्पर्धांत यश संपादन केले. उस्मानाबाद, बीड व औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे गाणे प्रसारीत झाले आहेत. महाराष्ट्राबरोबरच, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात या राज्यात त्यांनी त्यांचे गुरू पं. देगलूरकर यांच्यासमवेत हार्मोनियमची साथ केली. ते सध्या गोल्डक्रिस्ट हाय इंग्लिश स्कूलमध्ये संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत. ते सूरश्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष आहेत. आवर्तन मासिक संगीत सभा, दिवाळी पहाट, चैत्रपल्लवी संगीतोत्सव, अष्टविनायक प्रतिष्ठाण यांच्या सांगीतिक उपक्रमात ते हिरारीने सहभागी होतात. अशा प्रकारे लातूरच्या सांस्कृतिक चळवळीत ते नेहमी योगदान देत आले आहेत. आरोह संगीत विद्यालयातून ते भावी पिढीस संगीताचे ज्ञानामृत पाजत आहेत. त्यांच्या पत्नी सौ. वृषाली देशमुख कोरडे याही या विद्यालयातून संगीताचे धडे देत आहेत. याच विद्यालयातून जयप्रकाश हरीदास हे तबलावादनाचे धडे देत आहेत.

* **शारदा संगीत महाविद्यालय :**

श्री. संजय सुवर्णकार हे या विद्यालयाचे संचालक आहेत. शामनगर येथे हे महाविद्यालय चालते. सुवर्णकार हे तबल्याचे मार्गदर्शन करतात. तर गायनाचे धडे श्री. शरद पाडे हे देतात. श्री. पाडे यांचे प्राथमिक शिक्षण श्री. लक्ष्मण श्रीमंगले यांच्याकडे झाले. त्यानंतर त्यांनी प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांच्याकडून गायनाचे धडे घेतले. संगीत विशारद, एम. ए. संगीत, बी. एड. पर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले आहे. गोड गळ्याची देणगी लाभलेल्या शरद पाडे यांनी महाविद्यालयीन जीवनात अनेक सांगीतिक स्पर्धांत यश संपादन केले आहे. त्यांनी दयानंद कला महाविद्यालयातही काही वर्षे सेवा केली आहे. याबरोबरच ते शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयात संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत. विविध लोकगीतांना व समूहगीतांना त्यांनी चाली दिल्या आहेत. ज्या रचना युवकमहोत्सवात बक्षीसपात्र ठरलेल्या आहेत.

* **श्रीराम संगीत विद्यालय :**

श्री. संजय शिनगारे यांनी २००१ साली येथे या विद्यालयाची सुरुवात केली. ते संगीत अलंकार, संगीत विशारद (तबला व हार्मोनियम) आहेत. त्यांनी पं. कमलाकर परळीकर यांच्याकडून संगीताची तालीम घेतली. त्यांच्या पत्नी सौ. सरोजा शिनगारे यासुद्धा संगीत विशारद आहेत. हे दांपत्य अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी

मेहनत घेत आहे. प्रारंभिक ते विशारदपर्यंतचे शिक्षण ते देतात. गुरूपौर्णिमेनिमित्त ते संगीत समारोहाचेही आयोजन करतात. देशीकेंद्र विद्यालयासमोर व अश्वमेघ हॉटेलच्यामागे अशा दोन ठिकाणी त्यांचे संगीत विद्यालय चालते.

*** सरगम संगीत विद्यालय :**

सौ. श्वेता बीडकर-सोनपावले यांनी या संगीत विद्यालयाची सुरुवात केली. सौ. श्वेता यांनी सौ. शुभदा शार्दूल (हिंगोली) यांच्याकडून संगीताचे धडे घेतले. त्या संगीत विशारद व एम. ए. संगीत परीक्षा उत्तीर्ण आहेत. त्यांचे पती संतोष बीडकर हे केशवराज विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. मंत्रीनगर व अजिंक्य सिटी या भागात त्यांचे हे विद्यालय चालते. 'सरगम संगीत विद्यालया'च्या माध्यामातून ते अभिजात संगीताचा प्रसार व प्रचार करीत आहेत.

*** लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय सांगीतिक स्थिती :**

*** उदगीर :**

मराठवाड्यातील पहिले आकाशवाणी कलावंत पं. रामदास आनवले यांनी उदगीर तालुक्यात संगीताची पाळेमुळे खोल रूजविली. प्रा. डॉ. कृष्णचंद्र ज्ञाते, किशनराव देशमुख, माधव सोनार, रमाकांत बनशेळकीकर, शाम घनपाटी या गायक मंडळींनी उदगीरच्या सांस्कृतिक चळवळीचा श्रीगणेशा केली. या कलावंतांना गायनाची उत्तम जाण होती. एवढेच नव्हे तर यांनी अनेक श्रेष्ठ गायक वादकांना बोलावून उदगीरकर रसिकांना मंत्रमुग्ध केले.उदयगिरी महाविद्यालयातील प्राध्यापक असणाऱ्या कृष्णचंद्र ज्ञाते यांनी 'भारतीय संगीत : स्वरूप आणि प्रयोजन' हा समीक्षात्मक ग्रंथ लिहून संगीतातील शास्त्र पक्षावर प्रकाश टाकला.

उस्मानाबाद येथील शाम नळदुर्गकर यांच्या मार्गदर्शनाखाली १९७२ साली उदगीर येथे जिल्हा संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या यशस्वितेसाठी सुभाष देशमुख, प्रा. ज्ञाते, प्रा. दा. वा. गचके यांनी मोलाचे योगदान दिले होते. रूपवेध व कलावैभव या संस्थांनीसुध्दा उदगीरच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकली आहे. प्रा. संगीता बागडे यांनी पं. अण्णासाहेब गुंजकर, श्यामराव गुंजकर, प्रभा अत्रे, विश्वनाथ ओक अशा दिग्गजांकडून सांगीतिक शिक्षण घेतले. शामार्य कन्या उ. मा. विद्यालय, उदगीर येथे त्या संगीत विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. आकाशवाणीवरूनही त्यांचे गायन प्रसारीत झाले आहे. मराठवाडा व मराठवाड्याबाहेर त्यांनी शास्त्रीय व सुगम



संगीताचे कार्यक्रम करून अभिजात संगीताचा प्रचार केला. त्यांचे पती सुनीलराव बागडे हे नृत्य शिक्षक असून त्यांनी उदगीर व परिसरात अनेक विद्यार्थी घडविले आहेत. त्यांचा मुलगा चि. ओंकार बागडे हा सुध्दा उदयोन्मुख गायक असून दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवरून त्याचे गाणे सादर झाले आहे. प्रमोद रायचूरकर हे पं. शांतारामजी चिगरी यांचे शिष्य असून तबलावादनातील अलंकार ही पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. ते उत्तम तबलावादक असून त्यांनी शास्त्र व क्रियात्मक अंगावर सखोल चिंतन केले आहे. ते अनेक शिष्य घडवून संगीताचा प्रचार करीत आहेत. प्रा. कृष्णा अनवले हे गायन व तबलावादनात अलंकार आहेत. वडील पं. रामदास अनवले यांच्याकडून त्यांनी संगीताची तालीम घेतली आहे. सध्या उदयगिरी महाविद्यालयात संगीतविभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून गायन-वादनाचा प्रचार व प्रसार करीत आहेत. श्री. गोपाळ जोशी हे सुध्दा उत्तम गायक व तबलावादक आहेत. लालबहादूर शास्त्री विद्यालय, उदगीर येथे ते संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ओंकार संगीत विद्यालयातून १९९० पासून ते अभिजात संगीताचे धडे देत आहेत. महाराष्ट्र व कर्नाटकातून त्यांनी आपले गायन पेश केले आहे. श्री. जी. डी. बद्दे हे सुध्दा उदयगिरी संगीत विद्यालयाच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. रविंद्र कांबळे हे तालस्वरूप संगीत विद्यालयातून तबलावादनाचे धडे देत आहेत. श्री. प्रशांत पाटोदेकर हे श्री. फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध सांगीतिक उपक्रम राबवित आहेत. शिल्पा सेलूकर, ज्योती कुलकर्णी याही भारतीय संगीताचा प्रचार करीत आहेत.

*** औसा :**

पं. मुकेश जाधव, पं. पांडुरंग मुखडे यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत औसा तालुक्याने महाराष्ट्राला दिले. ज्यांच्या कार्याचा आढावा पुढील प्रकरणात येणार आहे. याबरोबरच जीवन कुलकर्णी यांनीसुध्दा उत्तम तबलावादन करून संपूर्ण महाराष्ट्रातून वाहवा मिळविली आहे. नंदकुमार भातलवंडे हे जुन्या काळात मोठे तबला वादक होऊन गेले. त्यांनी शेख दाऊद यांच्याकडून तबलावादनाचे धडे घेतले होते. थोडक्यात औसा तालुका हा तबलावादकांचा तालुका आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अगदी सुरुवातीच्या काळात ईश्वर रणखांब, बाबुराव राजेगावकर गुरुजी यांनी संगीत जोपासण्याचे कार्य केले. ह. भ. प. गहिनीनाथ महाराज, शिवाचार्य महाराज यांनासुध्दा संगीताची अभिरूची असल्यामुळे त्यांनी संगीताला आश्रय दिला. सध्या डॉ. शिवरूद्र

स्वामी व प्राचार्य संतोष तत्रे हे आचार्य भातखंडे संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून औसा तालुक्यात अभिजात संगीताचा प्रसार व प्रसार करीत आहेत. मागील सहा वर्षांत महाविद्यालयातून गायन, तबलावादन व पखावज वादनाचे १०० ते १५० शिष्य तयार झाले आहेत. ते केवळ संगीत विद्यालय चालवित नाहीत तर संगीतमहोत्सवाचे आयोजन करून ग्रामीण भागात संगीताबद्दलची अभिरूची निर्माण करीत आहेत. मागील सहा वर्षात या महाविद्यालयाने पं. कैवल्यकुमार गुरव, पं. व्यंकटेशकुमार, पं. आनंद बदामीकर, हेमंत पेंडसे, प्रसाद हेगडे, रवीकिरण नाकोड, रघुनाथ नाकोड, सुखद मुंडे, परमेश्वर हेगडे, कौशिक अयंकाळ तसेच श्रीलंका येथील तारक तिमाळ (कथ्थक) यांचे गायन, वादन व नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले. औसासारख्या ग्रामीण भागात ते राज्य स्तरीय भजन स्पर्धांचे आयोजन करून संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

*** रेणापूर :**

रेणापूर तालुक्यात खरोळा येथे जगन्नाथ कागले व खरोळेकर महाराज यांनी संगीत नाटकांची पंरपरा चालविली त्यातूनच अभिजात संगीताचा प्रचार केला. तीच परंपरा महादेव बन हे चालवित आहेत. गोड गळ्याची देणगी लाभलेले महादेव बन हे श्रीराम विद्यालय, रेणापूर येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. हणुमंत कासलगावे हे रेणापूर येथे साधना संगीत विद्यालयातून अभिजात संगीत धडे देत आहेत. श्री. शिवाजी महाविद्यालयात श्री. रंगनाथ भांदर्गे हे संगीत विषयाचे अध्यापन करीत आहेत. जनार्धन गुडे (पानगाव), दिलीप शिंदे, बालाजी पांचाळ, धम्मपाल सावंत ही मंडळी संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. असे असले तरी या भागात अभिजात संगीत म्हणावे तसे रूजले नाही.

*** जळकोट :**

जळकोट तालुक्यातील कुनकी या छोट्या गावात सूर्यकांत पवार हे जयमल्हार संगीत विद्यालयातून अभिजात संगीताचे शिक्षण देत आहेत. ते पं. के. एन. बोळंगे गुरुजीचे शिष्य असून संगीत विशारद आहेत. सध्या तिरूमला अध्यापक विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. गोविंद धुळशेट्टी हे मागील पाच वर्षांपासून नटराज संगीत विद्यालय चालवित आहेत. याबरोबरच राजकुमार थोटे, वांजरखेडा, रविकुमार आंदी ही मंडळी संगीताची सेवा करीत आहेत. याही तालुक्यात अभिजात संगीताचा म्हणावा तसा प्रचार व प्रसार झाला नाही.



*** शिरूर अनंतपाळ :**

शिरूर अनंतपाळ तालुक्यात आनंदवाडी या छोट्याशा गावात बोळंगे गुरुजीचे ज्येष्ठ शिष्य किसनराव नरहरे हे अत्यंत मेहनतीने अभिजात संगीताची कला जतन करीत आहेत. जि.प. शाळेत शिक्षक असलेल्या नरहरे गुरुजींनी त्या काळात सुरेखा व शारदा या मुलींना संगीत विशारदापर्यंत गायनाचे धडे दिले. ते अ.भा. गांधर्व मंडळाचे केंद्रही चालवितात. त्यांच्याशिवाय या तालुक्यात दुसरे कोणीही संगीताचे वर्ग चालवित नाहीत. रवी किडले हे पं. विठ्ठल जगताप यांचे शिष्य मात्र विविध मैफलीत गायन पेश करीत असतात. त्यांच्या गायनाच्या अनेक ध्वनिफिती प्रसारित झाल्या आहेत.

*** चाकूर :**

पं. के. एन. बोळंगे गुरुजींनी अगदी सुरुवातीला चाकूर येथे सूरगंगा संगीत विद्यालयाची स्थापना केली. हीच परंपरा त्यांचे शिष्य श्री. शिवाजी कोडे यांनी निष्ठेने चालविली. ते जनजागृती विद्यालय, चाकूर येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांनी प्रा. गुरूनाथ येडले, राजू लागदोडे, धनंजय नवटाके व रायफळे असे शिष्य घडविले. ते गांधर्व मंडळाचे केंद्रही चालवायचे. त्यांच्या दोन मुली रागिनी व बागेश्री याही संगीत विशारद आहेत. श्री. देविदास कुलकर्णी हे उत्तम व्हायोलिन वादन आहेत. या अंध कलावंताने मराठवाड्यात एलोरा फेस्टिव्हल सह अनेक ठिकाणी व्हायोलिन वादन केले आहे.भरत हुमनाबादे हेसुध्दा पं. बोळंगे गुरुजीचे शिष्य आहेत. ते पं. के.एन. बोळंगे गुरुजी सेवाभावी संस्था खलंग्री शाखा नं. २ वटसिध्द नागनाथ संगीत महाविद्यालय वडवळ (ना.) येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत. तेथून ते अभिजात संगीताचे धडे देण्याचे कार्य करीत आहेत. दत्तू धोंडगे हे लोकमान्य विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर शिवलिंग गादगे हे कोडे गुरुजींचे शिष्य होते. ते चाकूर, येथे गायनाचे धडे देत होते. सद्यःस्थितीत मात्र संतकृपा आश्रमातून वारकरी शिक्षण देण्याचे कार्य हे करीत आहेत. अभिजात संगीताचे शिक्षण देणारी एखादीही संस्था सध्या चाकूर तालुक्यात नाही.

*** निलंगा :**

निलंगा तालुक्यातील संगीत नाटक व संगीताची जुनी परंपरा आहे. संभामास्तर गरूड हे उत्तम तबलावादक होते. याचबरोबर ते संभळ, मृदंग इ. वाद्ये लिलया वाजवायचे. नाटकातही त्यांना रूची होती त्यामुळे त्या परिसरात तेच नाटके बसवायचे. जीजाबाई काटेजवळगेकर या उत्तम गायिका आहेत. त्यांनी उस्मानाबाद व लातूर येथे झालेल्या

मराठवाडा संगीत संमेलनात हजेरी लावून रसिकांची दाद मिळविली. श्री. पोतदार हे उत्तम बासरीवादक होते. साधरणत: १९६० ते १९८० या कालावधीत संगीततज्ज्ञ श्री. गणपतराव पोतदार यांनी येथे अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ सुरुवात केली. त्यांनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण दिले. त्यानंतर त्यांच्याच पुढच्या पिढीतील श्री. विनायक पोतदार यांनी संगीताची धुरा समर्थपणे सांभाळली. पं. रामन्नाप्पा हरनाळकर यांनी निलंगा या शहरासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. ते उमरग्याहून निलंग्याला येत असत. त्यांच्या तालमीत श्री. घनश्याम देशपांडे, श्री. मेघराज तळीखेळकर व श्री. राघवेंद्र देशपांडे असे शिष्य तयार झाले. श्री. ज्ञानेश्वर पिंगाने यांनीसुद्धा निलंगा शहरातील अभिजात संगीता करीता योगदान दिले आहे. ते मूळचे पोहरादेवी जिल्हा वाशीम येथील असून १९९८ पासून ते नौकरीच्या निमित्ताने निलंगा येथे आले. पुढे ते निलंगेकर झाले. त्यांनी श्री. बळीराम गोमसारे, श्री. पांडुरंग आनंदवाडे, श्री. शंकर पाचंगे, श्री. खंडू मुळे, श्री. सतीष झगे असे शिष्य घडविले आहेत.

औराद शहाजानीसारख्या एका छोट्याशा गावात मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या मदतीसाठी एक कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी दि. २८ फेब्रुवारी १९८१ या दिवशी स्वत: स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर उपस्थित होत्या. त्याच्यासमवेत आशा भोसले, उषा मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, सुरेश वाडकर, नितीन मुकेश आदी दिग्गज कलावंतांनी साडेतीन तास मैफल केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले होते सुप्रसिद्ध निवेदक हरीष भिमानी यांनी. या भव्यदिव्य संगीत रजनीसाठी लातूरच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यातून आलेल्या तीन लाख श्रोत्यांनी मनमुराद आनंद लुटला. हा सोहळा औराद व निलंगाच नव्हे तर लातूरच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याजोगा झाला. त्या वेळी मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाचे संस्थाचालक श्री. वलांडे गुरुजी होते तर प्राचार्य सदाविजय आर्य हे होते. याबरोबरच निलंगा येथे बांधकाम विभागाच्या गणेशोत्सवातून अनेक शास्त्रीय संगीताच्या मैफली व्हायच्या. ज्यात कीर्ती शिलेदार यांची मैफल रसिकांच्या कायम स्मरणात राहिली. सध्या औराद शहाजानी येथे प्रा. भालचंद्र गरूड, प्रा. अनंत गोदरे, प्रा. दुर्गादास सबनिस हे मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना गायन-वादनाचे धडे देत आहेत. निलंगा तालुक्यातील श्री. एकनाथ पांचाळ हे उत्तम तबलावादक असून गायनाचीही त्यांना उत्तम जाण आहे. ते निलंगा येथे राहून अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारात मोलाचे योगदान देत आहेत.



* **अहमदपूर :**

अहमदपूर येथे ब्राह्मणवाड्यात पंतोजी हे शिक्षण खात्यात सेवेत होते. ते मागील ३० वर्षापासून दत्त पोर्णिमेला तीन दिवसाला संगीतमहोत्सव आयोजित करतात. या संगीतोत्सवात आतापर्यंत पं. यादवराज फड, जयतीर्थ मेवंडी, पं. रघुनंदन पणशीकर, पं. शिवदास देगलूरकर, गौरी पठारे, पं. नाथराव नेरलकर, पं. रमेश कानोले, धनंजय जोशी, पं. शामराव गुंजकर, पं. कमलाकर परळीकर, हेमा उपासणी, अश्विनी पोटे, उ. गुलाम रसूलखाँ, लक्ष्मीकांत सहकारी, कोरडे असे अनेक नामवंत कलावंतांनी हजेरी लावलेली आहे याचबरोबर ते नाथ षष्टीनिमित्तसुद्धा एक दिवसाची संगीत सभा आयोजित करतात.

श्री. रामभाऊ गवळी हे पं. बोळगे गुरुजींचे शिष्य असून त्यांनी यशवंत विद्यालय, अहमदपूर येथे संगीत शिक्षक म्हणून ३० वर्षे सेवा केली . नुकतेच ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी अहमदपूर येथे सरस्वती संगीत विद्यालयातून अनेक अनेक शिष्यांना तालासुरांची ओळख करून दिली. त्यांचे अनेक शिष्य संगीत विशारद झाले असून ते विविध कार्यक्रमांतून संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. अनंत भदाडे हेसुध्दा पं. विठ्ठलराव जगताप यांचे शिष्य आहेत. अहमदपूर येथे स्वरसाधना संगीत विद्यालयाच्या माध्यमातून संगीताचा प्रचार करीत आहेत. ते समर्थांच्या मठात प्रत्येक पोर्णिमेला संगीत मैफलीचे आयोजन करतात. तुकाराम पाटील हे पं. शांतरामजी चिगरी यांचे शिष्य असून ते टागोर विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी रामभाऊ गवळी यांच्यासमवेत अनेक शिष्यांना तबलावादनाचे धडे दिले आहेत.

* **देवणी :**

तालुक्यात मात्र अभिजात संगीताचा प्रसार व प्रचार झाला नाही. देवणी तालुक्यातील धनेगाव येथे अण्णाराव पांचाळ हे एकमेव संगीताचे जाणकार होते. त्यांनी पं. शांतारामजी चिगरी यांच्याकडून गायनाचे धडे घेतले होते. दवणगाव हिप्परगा येथे हे संगीताचे दर्दी होते. सोनू डगवाले हे धनेगाव येथील युवा गायक असून ते विविध ठिकाणी गायनाचे कार्यक्रम करीत असतात. एवढेच नव्हे तर ते लातूर येथे सूरश्री प्रतिष्ठाणचे सचिव म्हणून कार्यरत आहेत.

♦ ♦ ♦



प्रकरण

३

# पं. रामदासजी अनवले

* **जीवनवृत्त :**

उदगीरसारखा ग्रामीण भाग, भौतिक सुख सुविधांचा अभाव, घरात अठराविश्वे दारिद्र्य, भटक्या विमुक्त जातीचा मिळालेला शाप अशा स्थितीत माधुकरी मागून चरितार्थ चालविणाऱ्या एका गरीब कुटुंबात सूरमणि पं. रामदास अनवले यांचा जन्म १९३० साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बळिराम असे होते. तसे पाहता त्यांचे अनवले घराणे हे मुळचे कर्नाटकातील सैदाबादचे होते; परंतु पुढे ते उदगीर येथे भटकंती करीत आले व उदगीर येथेच स्थायिक झाले. ते वासुदेव या भटक्या-विमुक्त जमातीत जन्माला आले. त्यामुळे आयुष्यभर त्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंतीच करावी लागली. रोजची चार घरे मागून आणल्याशिवाय त्यांच्या घरची चुलच पेटत नसे. आर्थिक परिस्थिती हलाखीचीच होती. त्यात आई वडील व पाच भावंडे अशा सात माणसांचे पोट भरणेही मुश्किल व्हायचे.

असे असले तरी चिमुकल्या रामदासचे अगदी लहाणपणीच स्वरविश्वाशी नाते जोडले गेले. परिस्थिती अनुरूप नसली तरी सांगीतिक वारसा मात्र आनुवंशिकतेने मिळाला. त्यांचे आजोबा लक्ष्मण महाराज सैदाबादकर हे थोर गायक होते. ते हैद्राबादच्या निजाम दरबारात दरबारी गायक होते. त्यांचे गायन इतके श्रवणीय होते की, खुद्द निजाम नवाज अलीपाशा याने त्या काळात लक्ष्मण महाराजांना साठ एकर जमीन देऊन त्यांचा गौरव केला होता. हाच सांगीतिक वारसा त्यांचे सुपुत्र बळिराम महाराज अनवले यांना मिळाला. ते प्रसिध्द कीर्तनकार व गायक होते. असे असले तरी आर्थिक परिस्थिती हलाखीचीच होती. त्यामुळे त्यांना वासुदेव होऊन परंपरागत भिक्षुकीचा व्यवसाय करावा लागत असे. स्वाभाविकपणे भिक्षा मागत असताना ते दारोदारी जाऊन भजने व लोकगीते म्हणत असत. रामदासजी अनवले हे या आठवणी सांगताना दै. लोकमत मध्ये 'माझे जीवन गाणे'



या सदरात लिहितात, "माझे वडील गावोगावी मुशाफिरीला (भिक्षा मागायला) जात असत. त्यातूनच त्यांनी पाच मुलांचा संसार यशस्वीपणे सांभाळला. पाच भावंडांतून मी दुसरा. वडिलांमुळे घरात संगीताचा वारसा असल्यामुळे मी आपोआपच संगीत कलेकडे वळलो. गावोगावी खेड्यापाड्यात मुशाफिरी करायची. वडील वासुदेवाच्या वेशात माधुकरी मागत असत. त्या वेळी मी वडीलबंधूच्या साथीने सुस्वर भजने, अभंग, रामदासांच्या ओव्या इत्यादी म्हणत असू." अशा प्रकारे लहानपणात महाराष्ट्राबरोबर आंध्र प्रदेश व कर्नाटकाच्या सीमा भागात माधुकरीसाठी त्यांचा प्रवास व्हायचा. मुळातच चिमुकल्या रामदासचा आवाज मधुर असल्यामुळे त्याला भजने म्हणण्यासाठी निमंत्रणे येऊ लागली. कालांतराने बालपणातच उदगीरबरोबरच लातूर, देगलूर व बीदर येथे भजनाच्या निमित्ताने तो फिरू लागला. वयाच्या १५ व्या वर्षापर्यंत तो भजने गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध करू लागला. लोकही त्यांचे तोंडभरून स्तुती करू लागले.

आता मात्र आपण शास्त्रीय संगीत शिकावे असे त्यांना वाटु लागले, परंतु बेताची आर्थिक परिस्थिती, पुन्हा जातीचा अडसर याही बाबी त्यांच्या संगीत अध्ययनात अडथळा आणणाऱ्या होत्या. त्याच वेळी त्या काळात संगीताकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक नव्हता. अशा स्थितीत त्याचे मन बैचेन व्हायचे. तो द्विधा मनःस्थितीत सापडायचा. शेवटी त्यांची संगीत शिकण्याची आंतरिक इच्छा त्याला स्वस्थ बसू देईना. संगीत शिकायचे तर उदगीरसारख्या ग्रामीण भागात बसून जमणार नव्हते. त्यामुळे त्याने मनाचा निग्रह केला व उदगीर सोडले. पुढे अनेक गुरूंकडून विधिवत तालीम घेतली. मनातील अदम्य आत्मविश्वास, कठोर परिश्रम व स्वप्रतिभेने त्यांनी आपले गायन विकसित केले. येणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीला लाथाडून त्यांनी आपले सांगीतिक विश्व निर्माण केले. आपल्या मधुर गायन-वादनाने स्वतः बरोबरच हजारो शिष्यांच्या आयुष्यात स्वरतालांची बरसात केली व त्यांचे आयुष्य फुलविले. त्यांना शालेय शिक्षण घेता आले नाही तरी सुध्दा स्वप्रतिभेने संगीत साधना केली व त्यात प्रभुत्त्व मिळविले. कसल्याही प्रकारचा राजाश्रय नसतानाही त्यांनी आपली प्रतिभा सिध्द केली. कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाला आवश्यक अंतरबाह्य गुण त्यांना लाभले होते. साडेपाच फूट उंच, वर्ण गोरा, मानेवर लोळणारी केसांची आयाळ त्यांचे सौंदर्य खुलवीत होती. अहंपणाचा लवलेश त्यांच्यात दिसून येत नव्हता. लांगुण चालन, लुब्रेपणा त्यांना कधीही जमला नाही. ते स्पष्टवक्ते होते. समोरच्याची एखादी चूक असेल तर ते मनात न ठेवता परखडपणे मांडत असत. गायनाबरोबरच तबलावादनातही ते निष्णात होते. साधारणातः १९५० साली त्याचा विवाह शांताबाई यांच्याशी झाला. सुधीर

व कृष्णा ही त्यांची अपत्ये होती. यापैकी सुधीर व कृष्णा यांनी त्यांच्याकडून गायन-वादनाची विधिवत तालीम घेतली व वडिलांची परंपरा चालविली. पं. रामदासजी यांना मराठीबरोबरच उर्दू, कानडी, तामिळ या भाषा अवगत होत्या.

बडाख्याल, छोटाख्याल, तराणा, ठुमरी, भजने आदी प्रकार गाण्यात त्यांचा हातखंडा होता तर तबला पखावज ही वाद्ये ते तयारीने पेश करीत असत. एवढेच नव्हे तर व्हायोलीन व सतार ती तंतुवाद्ये ते उत्तमरीत्या वाजवीत असत. याबरोबरच बसवेश्वर, अल्लमप्रभू, अक्क महादेवी यांचे कानडी वचन ते अतिशय उत्तमप्रकारे पेश करीत असत.

*** गुरू आणि शिक्षण :**

अभिजात संगीत शिकण्याची आस असल्यामुळे घरात कोणालाही न सांगता पं. रामदास अनवले यांनी सरळ मिरज गाठले. त्या वेळी त्यांचे वय होते केवळ पंधरा वर्षांचे. त्या काळी मिरज, कोल्हापूर हा भाग सांगीतिक दृष्टीने संपन्न होता. मिरजेत पोहोचल्यानंतर रात्र कोठे घालवावी हा प्रश्न त्यांच्यासमोर होता. म्हणून त्यांनी रेल्वेस्थानकाचा आश्रय घेतला. हिवाळ्याचे दिवस होते. जीवघेण्या थंडीत ते प्लॅटफॉर्मवर झोपले. थंडित कुडकुडत असतानाच कोठूनतरी येणाऱ्या शास्त्रीय संगीताचे स्वर त्यांच्या कानांवर पडले. कोठेतरी संगीताचा जलसा चालू होता. बोचऱ्या थंडीतही त्या स्वरांची ऊब त्यांना उभारी देत होती. क्षणाचाही विलंब न लावता त्यांची शोधकदृष्टी त्या स्वरांकडे आकृष्ट झाली. त्या स्वरांना शोधित शोधीत ते स्टेशनबाहेर पडले. त्या कीर्र रात्री भुंकणारी कुत्री व पोलिसांच्या काठ्यांचा व शिट्यांचा आवाज जिवाचा थरकाप उडवीत होता. अशा प्रकारे त्या दोघांचाही ससेमिरा चुकवीत ते त्या जलशापर्यंत पोहोचले. समोर एक बुजुर्ग गायक गात होते. राग कोणता होता, बंदिश कोणती आहे, कोणत्या तालात आहे हे त्या चिमुकल्या रामदासला समजत नव्हते. परंतु हृदयाचा ठाव घेणारी, मनाला डोलावणारी गायकी चालू होती एवढेच त्याला समजले. त्यांनी तेथेच एका कोपऱ्यात बसून त्या गाण्याचा मनसोक्त आनंद घेतला आणि मैफील संपली. आपण त्यांच्याकडे जावे, नतमस्तक व्हावे व गाणे शिकण्याची मनीषा व्यक्त करावी, असे त्यांना वाटले. परंतु त्यांच्यासमोर जाण्याची हिंमत झाली नाही. मैफील संपल्यानंतर ते तेथेच एका कोपऱ्यात झोपले . सकाळी उठल्यानंतर मात्र त्यांना समजले की, ते गवई किराणा घराण्याचे उस्ताद रशीदअली खाँ. चांदोरकर आहेत. ते विदर्भातील चंद्रपूर येथे राहात होते. काही झाले तरी आपण याच गायकाकडून संगीत शिकायचे असे



त्यांनी मनस्वी ठरविले आणि खाँ साहेबांच्या पाठोपाठ रामदास यांनी चंद्रपूरचा रस्ता धरला. ते चंद्रपूरला पोहोचले. यासंदर्भात ते माझा स्वरांकित जीवन प्रवास' या 'दै. लोकमत' मधील लेखात म्हणतात, 'खाँ साहेब मला सुरुवातीला गाणे शिकविण्यासाठी तयारच नव्हते. पण माझी दयनीय अवस्था पाहून व संगीत कलेविषयीची आंतरिक तळमळ पाहून त्यांनी मला शिकविण्याचे मान्य केले. यावरून त्यांची संगीताप्रती असलेली निष्ठा दिसून येते. तेथे त्यांनी गुरुकुल पध्दतीने सहा वर्षे किराणा घराण्याची रीतसर तालीम घेतली. स्वरोपासना हाच त्यांचा ध्यास होता व संगीत हाच त्यांचा श्वास होता. त्यामुळे त्यांनी रियाजात कधीही कसूर केला नाही. गुरूगृही कपडे धुणे, चिलीम भरणे, अशी कामे करताना त्यांना कधीही कमीपणा वाटला नाही. अथक परिश्रमाने व सेवाभावी वृत्तीने त्यांनी गुरूंना प्रसन्न करून घेतले व त्यांची मर्जी संपादन केली.

मिळालेल्या ज्ञानावर ते प्रसन्न नव्हते. त्यामुळे त्यांनी उ. गुलाम रसूल खाँ साहेबांकडून तबलावादनाची रीतसर तालीम घेतली. पुढे ते मध्य प्रदेशात गेले. तेथे गोंदियाचे गुरू दयाल यांच्याकडून ठुमरीची तालीम घेतली. काकू पध्दत व लालित्यपूर्ण ठुमरी कशी पेश करावी याचे शिक्षण त्यांनी घेतले. पुढे ते हैद्राबादला गेले. तेथे त्यांचे काका गंगाधरशास्त्री अनवले राहात होते. ते उत्तम सतारीये होते. त्यांनी त्यांच्याकडून ४ वर्षे सतार वादनाची कला अवगत केली. हैद्राबाद येथील वास्तव्यात त्यांना तबलानवाज उस्ताद शेख दाऊद खाँ साहेबांचा सहवास लाभला. त्यांच्याकडूनही कलेची देवाण-घेवाण झाली. तेथील थोर गायक विठ्ठलपंत यांच्या समवेत कार्यक्रम करण्याचीही त्यांना संधी मिळाली.

अशा प्रकारे त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत बी. ए. तबला प्रवीण, बी. ए. गायन व एम. ए. गायन या सांगीतिक पदव्या प्राप्त केल्या.

**अपूर्व गायन व वादन शैलीद्वारे प्रचार व प्रसार :**

थोर गुरूंचा सहवास, मिळालेली विधिवत तालीम व गायन-वादनात सिध्दता प्राप्त केल्यामुळे पं. रामदास अनवले गुरुजी यांची अल्पावधीतच एक प्रतिथयश गायक वादक म्हणून ख्याती सर्वदूर पसरली. त्यामुळे महाराष्ट्राबरोबरच त्यांना कर्नाटक व आंध्र प्रदेशातील मोठमोठ्या संगीत संमेलनांतून निमंत्रणे येऊ लागली.

दि. ४ व ५ ऑक्टोबर १९६९ रोजी उदगीर येथे उस्मानाबाद जिल्ह्यातील दुसरे संगीत संमेलन संपन्न झाले होते. त्यात त्यांनी शास्त्रीय गायन सादर केले. या नंतर अक्कलकोट येथे अखिल भारतीय संगीत महासभा आयोजित करण्यात आली होती. दि. ४ ते ८ मे

१९७५ या कालावधीत संपन्न झालेल्या संमेलनात त्यांनी गुरुवार, दि. ८ मे १९७५ रोजी रात्री ९ वा. गायन सादर केले. या कार्यक्रमात रसिकांनी त्यांना भरभरून दाद दिली.

आंध्र प्रदेशातील सिकंदराबाद येथील श्री. शंकर संगीतालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार, दि. ५ जून १९७६ रोजी पं. रामदास अनवले यांनी शास्त्रीय गायन सादर केले. याच मैफिलीत पं. जसराजजी यांचेही गायन झाले होते. दि. २७ ते २९ जानेवारी, १९७८ या दरम्यान अंबाजोगाई येथे मराठवाडा संगीत संमेलन संपन्न झाले. याही संमेलनात त्यांनी अप्रतिम तबलावादन सादर केले.

अक्कलकोटचे अ. भा. संगीत संमेलन, हैद्राबादचे विश्वआर्य संमेलन व हरिदास संगीत महोत्सवात त्यांनी अविस्मरणीय गायन केले आहे. हुमनाबाद (कर्नाटक) येथील माणिक दरबारात त्यांचे गायन, वादन नेहमीच व्हायचे. लातूर येथील जय जगदंबा नवरात्र महोत्सवात त्यांचे अनेक वेळा गायन, वादन झाले आहे. मराठवाड्यील उस्मानाबाद, लातूर, अंबाजागाई, परभणी इत्यादी संगीत संमेलनांतून त्यांनी गायन-वादन करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

मुंबई येथील 'कल के कलाकार संगीत संमेलना'त सुध्दा दि. १५.१०.१९८० रोजी मैफील सादर करून मुंबईकरांची मने जिंकली. त्यांना सूरसिंगार संसदेचा 'सूरमणी' हा पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचे मुंबई येथे गायन झाले. त्यासंदर्भात दै. लोकसत्ता या वृत्तपत्रात त्यांच्या गायकीचे वर्णन केले आहे ते असे- 'या कार्यक्रमाच्या वेळी श्री. अनवले गुरुजींनी 'श्याम कल्याण' हा राग अळविला. त्यांना तबल्याची साथ लखनौ येथील भातखंडे संगीत विद्यालयातील तबला शिक्षक करीत होते. आपल्या दमदार आवाजातील गोडव्याने गुरुजींनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. 'श्याम कल्याण' हा राग प्रियकराच्या आठवणींनी पुलकित झ ालेल्या तरुणीची मनोदशा व्यक्त करणारा राग आहे. संधि प्रकाशाच्या वेळी त्याचा सूर लावायचा असतो. त्यांनी राग आळविताना तरुणींची मनोदशा, रागातील बारकावे व्यक्त करून प्रकट केली. गायकीच्या थाटावरून किराणा घराण्याशी ते संबंधीत आहेत हे जाणकार श्रोत्यांच्या लक्षात आले. स्वतःच दहा ते पंधरा वर्षे उत्कृष्ट रचना वाजवीत असल्याने गाण्याचा तोल तालाशी विसंगत होण्याचा प्रश्नच नव्हता.

यावरून मुंबईसारख्या मोठ्या शहरात त्यांनी आपली प्रतिभा व श्रेष्ठत्त्व सिध्द केले होते हे लक्षात येते. प्रत्यक्ष गायनवादनाच्या मैफिलीबरोबरच त्यांचे



आकाशवाणीवरूनसुध्दा अनेक वेळा गायन व तबलावादनाचे कार्यक्रम प्रसारीत झाले आहेत. तत्कालीन नभोवाणीमंत्री वसंत देसाई यांच्याशी त्यांचा १९६० पासून संपर्क होता. त्यामुळे त्यांनी त्यांच्या कलेची कदर करून त्यांना विविध आकाशवाणी केंद्रावरून गाणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली. ते आकाशवाणीचे बी हाय ग्रेडचे कलावंत होते. किंबहुना मराठवाड्यातील पहिले आकाशवाणी कलावंत होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. यासंदर्भात दै. लोकमतमध्ये लिहिले आहे की, "आकाशवाणीवर आतापर्यंत पं. रामदास अनवले यांचे दहा-बारा कार्यक्रम झाले असून त्यांना १९८६ मध्ये आकाशवाणीचे बी हाय ग्रेडचे कलावंत म्हणून मान्यता मिळाली होती."

शास्त्रीय गायन, शास्त्रीय तबला वादन, मृदंग वादन, जुगलबंदी सुगम संगीत भजन इ. कार्यक्रम त्यांनी परभणी, औरंगाबाद, पुणे, सांगली, जळगाव, हैद्राबाद, मुंबई, बेंगलोर, धारवाड आकाशवाणी केंद्रावरून प्रसारीत झाले आहेत. बाबासाहेब मिरजकर, दत्तोपंत मंगवेढेकर, दामू अण्णा अशा विख्यात मृदंग वादकांबरोबर त्यांनी तबलावादनाची जुगलबंदी सादर केली. गुलबर्गा आकाशवाणी केंद्रावरून दि. ७.९.१९७८ वार गुरुवार, वेळ दुपारी १.३० ते २.०० या वेळेत श्री. अनवले यांनी महात्मा बसवेश्वर व अक्कमहादेवी यांचे वचन गायिले आहे.

त्यांच्या श्रवणीय गायन-वादनाने प्रभावित होऊन अनेक आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांना नोकरी देऊ केली. यात ऑल रेडिओ कटक/संबळपूर व जयपोरे (ओरिसा) येथे स्टाफ आर्टिस्टच्या रिक्त जागेवर निवड झाली. दार्जिलिंग (प. बंगाल) आकाशवाणी, धारवाड आकाशवाणी, पुणे आकाशवाणी एवढेच नव्हे तर कोरोसांगी (नेपाळ) आकाशवाणीवरसुध्दा त्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाली होती. किंबहुना मुंबई दूरदर्शन केंद्रावर तबलावादक म्हणून ही यांची निवड झाली होती.

अशा प्रकारे त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशातून मैफीली सादर केल्या. आकाशवाणी केंद्रावरूनसुध्दा त्यांचे गायन, वादन सादर झाले. यातून त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. विविध आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रावर नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या त्या संधीचा लाभ घेऊन ते मोठ्या शहरात राहिले असते तर त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत म्हणून ख्याती प्राप्त झाली असती; परंतु ग्रामीण भागात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी ते उदगीरमध्येच राहिले. यावरून त्यांची ग्रामीण

भागातील लोकांविषयीची व जन्मभूमिविषयीची तळमळ लक्षात येते.

* **संगीत विद्यालयाची स्थापना :**

अभिजात संगीताची शास्त्रोक्त तालीम घेतल्यानंतर त्यांनी आपला मोर्चा उदगीर या आपल्या जन्मभूमीकडे वळविला. त्यांनी पाहिले की, उदगीरसारख्या ग्रामीण भागात अभिजात संगीत शिकविणारे एकही विद्यालय नाही म्हणूनच १९५४ साली गानप्रचारार्थ त्यांनी 'अनवले संगीत विद्यालया'ची स्थापना केली. अशा प्रकारे हे संगीत विद्यालय लातूर जिल्ह्यातील पहिले तर मराठवाड्यातील दुसरे संगीत महाविद्यालय ठरले. यापूर्वी अण्णासाहेब गुंजकर यांनी १९२७ साली नांदेड येथे गायन-वादन विद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली होती.

पं. अनवले संगीत विद्यालयातील पहिले विद्यार्थी होण्याचा बहुमान पटकावला तो कृष्णचंद्र ज्ञाते यांनी. अशा प्रकारे या विद्यालयाच्या माध्यमातून उदगीर परिसरात शास्त्रीय संगीताचा ज्ञानयज्ञ सुरू झाला. यातून उदगीरसारख्या छोट्याशा गावात रागविद्येची अर्चना निष्ठेची चालू राहिली. या घटनेचा उल्लेख मुंबई येथील नेहरू सेंटरच्या वतीने प्रकाशित झालेल्या 'दिशा' या पुस्तिकेत केला आहे. He is the founder of Anavale Sangit Mahavidhyalaya, which during the last 40 years has benifited thousend of music students.

अशाप्रकारे त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी भगीरथाप्रमाणे ज्ञानगंगा उदगीर येथे आणली. यातून हजारो विद्यार्थ्यांनी आपली ओंजळ तालासुरांनी भरली. पैशांचा विचार न करता गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी भरभरून दिले. यासंदर्भात लातूर जिल्हा रौप्यमहोत्सवीवर्षानिमित्त 'दै. लोकमत' ने प्रकाशित केलेल्या विशेष पुरवणीत लिहिले आहे की, "पं. रामदास अनवले यांनी उदगीर येथे पहिला तंबोरा आणला. संगीत महाविद्यालयाच्या स्थापनेपासून हजारो विद्यार्थी दूरदर्शन, आकाशवाणी, संगीत शिक्षक व प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आजही अंध, अपंग, मागासवर्गीय, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना विनामूल्य मार्गदर्शन केले जाते."

पंडितजींनी स्वतः गरिबी काय असते हे पाहिल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना त्यांनी रित्या हातांनी कधीही परत पाठविले नाही. ते स्वतः भटक्या-विमुक्त जमातीत जन्माला आल्यामुळे अशा जाती-जमातीतील विद्यार्थी संगीत कलेपासून वंचित राहू नये म्हणून



त्यांना मोफत संगीताचे धडे दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगीतिक शिक्षण देऊन तृप्त तर केलेच परंतु याबरोबरच अनेकांचे जीवन उभे केले. यासंदर्भात संग्राम वाघमारे यांनी त्यांना पाठविलेले पत्र अत्यंत बोलके आहे. ते आपल्या पत्रात लिहितात, "आदरणीय गुरूवर्य पं. रामदासजी अनवले सर यांना आपला स्नेहांकित विद्यार्थी संग्राम वाघमारेचा अनंत कोटी शि. सा. नमस्कार. सर आपल्याकडून माझ्या समाज कार्याच्या राष्ट्रीय कामासाठी बरेच मार्गदर्शन लाभले आहे. मी माझ्या उभ्या आयुष्यात आपले उपकार कधीही विसरू शकत नाही . आपण आपल्या कर्तृत्वाने संगीत क्षेत्रात फार मोठे यश संपादन केले आहे व त्याद्वारे आपण भारतमातेची सेवा करीत आहात. आपण जो नावलौकिक मिळविला आहे व यशाचे शिखर गाठले आहे याचा खराखुरा आदर्श आमच्यासारख्या होतकरू सेवाभावी तरुणांपुढे नक्कीच आहे."

थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. रामदासजी अनवले गुरुजींनी लातूर जिल्ह्यातील पहिले विद्यालय स्थापन करून एक क्रांतिकारक पाऊल उचलले. ज्याचा लाभ समस्त लातूर जिल्हावासीयांसाठी झाला.

**सुयोग्य शिष्यांची निर्मिती :**

पं. रामदासजी अनवले गुरुजींनी आयुष्यभर अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्यामुळे त्यांचा फार मोठा शिष्यवर्ग मराठवाड्यात दिसून येतो. त्या शिष्यांचा नामोल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

* **कृष्णचंद्र ज्ञाते :**

पं. रामदास अनवले गुरुजीचे हे सर्वात पहिले शिष्य आहेत. उदगीरसारख्या छोट्या गावात उदयगिरी महाविद्यालयात ते प्राध्यापक होते. त्यांनी 'भारतीय संगीत स्वरूप आणि प्रयोजन या समीक्षात्मक पुस्तकात रागविद्येच्या शास्त्रपक्षावर प्रकाशझोत टाकला आहे.

* **प्रा. सुधीर अनवले :**

हे अनवले गुरुजीचे ज्येष्ठ सुपुत्र असून त्यांनी त्यांच्याकडून गायन व तबलावादनाची तालीम घेतली. त्यांनी तबलावादनात व गायनात संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांची तबलावादनाची अनेक पारितोषिके पटकाविली. १९८२ साली उस्मानाबाद येथे झालेल्या मराठवाडा संगीत

संमेलनात त्यांनी स्वतंत्र तबलावादन पेश करून श्रोत्यांची दाद मिळविली. विविध संगीत संमेलनात त्यांनी आपल्या वडिलांना तबल्याची साथ दिली.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे ते राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापणाचा विषय जरी राज्यशास्त्र असला तरी त्यांचा मुळ पिंड संगीताचा आहे. त्यामुळे महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातच ते अधिक रमतात. त्यांनी आजपर्यंत शेकडो युवा कलावंतांना घडविले आहे. महाविद्यालयास अधिकाधिक पारितोषिके मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी १९९६ साली लातूर येथे 'षड्ज पंचम संगीत साधना मंडळा'ची स्थापना केली. या मंडळाच्या माध्यमातून त्यांनी सांगीतिक स्पर्धांचे आयोजन करून उद्योन्मुख कलावंतांना मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून दिले. अशा प्रकारे लातूर जिल्ह्याच्या सांस्कृतिक चळवळीस त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

* **प्रा. कृष्णा अनवले :**

प्रा. कृष्णा अनवले हे सुद्धा पं. अनवले गुरुजींचे द्वितीय पुत्र असून ते आपल्या वडिलांचा सांगीतिक वारसा पुढे चालवित आहेत. त्यांनी संगीत अलंकार (गायन व तबला) पर्यंतचे शिक्षण आपल्या वडिलांकडेच पूर्ण केले. मागील १८ वर्षांपासून ते हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर येथे वरिष्ठ महाविद्यालयात संगीत विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. या महाविद्यालयातून त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना संगीताचे धडे दिले आहेत. त्यांचे अनेक शिष्यसुद्धा संपूर्ण महाराष्ट्रात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. विविध संगीत संमेलनातून त्यांनी गायन व तबलावादनाचे कार्यक्रम केले आहेत. ते आकाशवाणीचे बी हाय ग्रेडचे कलावंत आहेत. आकाशवाणीच्या माध्यमातूनही त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला आहे. त्यांचे शिष्य महेंद्र किणीकर हेसुद्धा आकाशवाणी कलावंत आहेत.

* **प्रा. भालचंद्र संभाजी गरूड :**

हे संगीत विशारद असून औराद शहाजनी येथे मा. दिनानाथ मंगेशकर कनिष्ठ महाविद्यालयात संगीत विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. लातूर विभागातील ज्येष्ठ संगीत शिक्षक असून १९८८ पासून आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना संगीताचे शिक्षण देत आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी शिक्षक व प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.



* **प्रा. भास्कर मोरे :**

संगीत अलंकार व एम. ए. संगीतपर्यंत, शिक्षण त्यांनी पं. रामदास अनवले यांच्याकडून घेतले. ते सौ. इंदिराबाई कनिष्ठ महाविद्यालय, हानेगाव, जि. नांदेड येथे संगीत विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. महाविद्यालयीन जीवनात त्यांनी तबलावादनाची अनेक पारितोषिके पटकावली आहेत. सध्या ते महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे येथे कलाशिक्षण अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. हाणेगावसारख्या अत्यंत दुर्गम भागात ते संगीत प्रचार व प्रसाराचे कार्य करीत आहेत.

* **श्री. जयेन्द्र कुलकर्णी :**

पं. अनवले गुरुजींकडूनच त्यांनी संगीताचा श्रीगणेशा केला. ते संगीत अलंकार असून श्री. खोलेश्वर विद्यालय, अंबाजोगाई येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते आकाशवाणीचे सुगम संगीताचे बी श्रेणीचे कलावंत आहेत. 'स्वरशिल्प' या कार्यक्रमातून ते सुगम गायन करतात. बी. रघुनाथ यांच्या पुण्यतिथीनिमित्त व स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आकाशवाणीवर गायनाचा कार्यक्रम प्रसारीत झाला. मुंबई दूरदर्शनच्या 'सारे सारे गाऊ या' या कार्यक्रमातून त्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. महाविद्यालयीन काळापासूनच त्यांनी अनेक राज्य स्तरीय स्पर्धांमधून यश संपादन केले आहे. यशवंतराव चव्हाण स्मृतिसमारोहाबरोबरच मराठवाड्यातील अनेक शहरांतून ते मैफिली करतात. संस्कार भारतीच्या माध्यमातूनही त्यांनी अनेक सांस्कृतिक उपक्रम राबविले आहेत.

**संगीतविषयक अनेक महत्त्वपूर्ण पदांवर सफलतापूर्वक कार्य :**

०१. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या 'कार्यक्रम सल्लागार समिती' वर सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. एप्रिल १९९१ ते मार्च १९९३ या दोन वर्षांसाठी त्यांची नियुक्ती होती. या माध्यमातून त्यांनी कामगारांच्या भजन, समूहगीत, लोकगीत, लोकनृत्य व नाट्यविषयक स्पर्धांचे आयोजन करून सांस्कृतिक कार्याला हातभार लावला.

०२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवकमहोत्सवासाठी दि. २ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर १९९४ या कालावधीत सांगीतिक कला प्रकारांसाठी तज्ज्ञ परीक्षक समितीवर त्यांची निवड झाली होती.

०३. षडज-पंचम संगीत साधना मंडळ', लातूर यांच्या वतीने दि. ३ फेब्रुवारी १९९६

रोजी राज्य स्तरीय तबलावादन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते या स्पर्धेसाठी तज्ज्ञ परीक्षक समितीत त्यांची निवड झाली होती.

०४. उस्मानाबाद जिल्ह्यातील शिक्षकांसाठी उस्मानाबाद येथे संगीत, नाट्य कला प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षण विभागाने एक समिती स्थापन केली होती. यात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांची निवड झाली होती.

०५. जिल्हा कलावंत संघावर सचिव म्हणूनही त्यांची निवड झाली होती. यातून त्यांनी लातूर जिल्ह्यातील संगीत शिक्षकांचे एकत्रिकरण करून कलेचे आदान-प्रदान केले. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला.

०६. अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ, मिरज यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या गायन व तबला वादनाच्या प्रारंभिक ते विशारदपर्यंतच्या परीक्षांसाठी त्यांनी अनेक वर्षे परीक्षक म्हणून कार्य केले.

०७. उदगीर येथे शासकीय अध्यापक महाविद्यालयात त्यांनी ४० वर्षे संगीत अध्यापक म्हणून कार्य केले. यातून हजारो भावी शिक्षकांना संगीताचे ज्ञानामृत पाजले.

**मानसन्मान व पदव्या :**

तब्बल ५० वर्षाहून अधिक वर्षे संगीतावर अजोड निष्ठा ठेवून पं. रामदास अनवले गुरुजींनी संगीताची सेवा केली. ग्रामीण भागात भौतिक सुख-सुविधांचा अभाव असतानाही संगीत सेवेचे हे व्रत त्यांनी पूर्ण केले. गलेलठ्ठ पगारांच्या नोकरींचे अमीष समोर दिसत असतानाही त्याला बळी न पडता जन्मगावीच त्यांनी संगीताची पाळेमुळे घट्ट रोवली व अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्यांच्या या कार्याबद्दल निरनिराळ्या संस्थांनी त्यांना विविध पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला.

०१. १९६० साली, तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांच्या हस्ते 'बाबर रौप्य पदक' देऊन त्यांचा गौरव केला.

०२. सूरसिंगार संसदेने १९७५ साली 'सूरमणि' हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.

०३. १९७४ साली अक्कलकोट येथे अखिल भारतीय संगीत संमेलनात 'ताम्रपट' देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



०४. दि. २१ आक्टोंबर १९८० रोजी माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते उदगीर येथे संपन्न झालेल्या 'विद्वत जनांचा सत्कार समारंभात' त्यांचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

०५. १९८५ पासून महाराष्ट्र शासनाकडून प्रतिमाह रु. ७५०/- आर्थिक सहाय्य सुरू केले.

०६. १९८६ साली समाज कल्याण विभाग (पुणे) यांच्या वतीने त्यांना सिल्व्हर ट्रॉफी देऊन 'आदर्श संगीत शिक्षक' पुरस्काराने सन्मानित केले.

०७. १९९४ मध्ये हुमनाबाद (कर्नाटक) येथे झालेल्या संगीत महासभेत 'संगीत वाचस्पती' या पदवीने त्यांना गौरविण्यात आले.

०८. नेहरू सेंटर मुंबई यांच्या वतीने भारतातील दिग्गज कलावंतांची माहीती सांगणारी 'दिशा' या नावाने पुस्तिका प्रकाशीत केली आहे. यात भारतरत्न प. भीमसेन जोशी, पं. हरीप्रसाद चौरसिया, उ. झाकीर हुसेन अशा थोर कलावंतांच्या मांदियाळीत पं. रामदास अनवले गुरुजींचा परिचय देण्यात आला आहे.

०९. 'हुज हु' या ग्रंथातसुद्धा त्यांचा अल्प परिचय देण्यात आला आहे.

१०. मराठवाड्यातील पहिले आकाशवाणी कलावंत होण्याचा बहुमान त्यांनी पटकावला.

११. उदगीर येथील नागरिक व संगीत विद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचा शिवलिंग महाराजांच्या मठात, 'भव्य नागरी सत्कार' करण्यात आला. अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी श्री. माने व प्राचार्य ना. य. डोळे यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी त्यांनी २८ मात्रांचा ब्रह्मताल वाजवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले होत.

या यशस्वी कारकीर्दीत त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई यांनी त्यांना मोलाची साथ दिली. पं. रामदास अनवले यांनी संपूर्ण आयुष्य संगीत कलेसाठीच सर्मर्पित केले. अगदी आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी संगीताची साथ सोडली नाही. आयुष्याची अखेरसुध्दा गाणे गाता गाता झाली. ते परभणी येथे आकाशवाणी केंद्रावर गात होते. राग जौंनपुरी हा राग ते सादर करू लागले. ख्यालात रंग भरू लागला. ख्यालांची बढत सुरू झाली. लयकारीयुक्त बेहलाव्यांनी सारे आसमंत डोलायला लागले. पुन्हा सुरू झाली तानांची बरसात, किराणा घराणाचे भावपूर्ण गायन सुरू असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला

आणि गाता गाताच त्यांचा स्वर आसमंतात विलीन झाला. तो दिवस होता १३ डिसेंबर, २००४, या दिवशी ते स्वरविश्वात विलीन झाले. असे असले तरी त्यांचा स्वरविलास आजही ध्वनिमुद्रिकांतून निनादतो आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. अनवले गुरुजींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून संगीत क्षेत्रात संगीत साधकांसाठी अढळ दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन कार्य करीत राहील.

♦ ♦ ♦



प्रकरण

४

# पं. कोंडिबा नागोराव बोळंगे



*** जीवनवृत्त :**

वारकरी संप्रदायाचा संपन्न वारसा हा मराठवाड्याच्या घराघरांतील सांस्कृतिक ठेवाच आहे. अशाच सांस्कृतिक वारसा लाभलेल्या घरात पं. बोळंगे गुरुजींचा जन्म झाला. तो दिवस होता १ जानेवारी १९३४. खलंग्री या अति दुर्गम अशा खेड्यात त्यांचा जन्म झाला. खलंग्री हे गाव लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यात वसलेले आहे. त्यांच्या वडिलांचे नाव नागोराव तर आईचे नाव व्यंकामाता असे होते. त्यांना एक बहीण होती. घरात आध्यात्मिक वातावरण होते पण संगीताचा वारसा मात्र नव्हता. कुटुंबीय अशिक्षित होते. परिस्थितीनेही गांजले होते. अशाही स्थितीत वडिलांनी त्यांना शाळेत दाखल केले; परंतु त्यांचे मन शाळेत रमले नाही. १८ दिवसांतच त्यांनी शाळेला रामराम ठोकला. गावात सांप्रदायिक वातावरण होते. त्यामुळे स्वाभाविकपणे गावात भजन-कीर्तनाचे कार्यक्रम व्हायचे. लहानशा कोंडिबा यांचे पाय नकळतच भजनाकडे वळू लागले. अगदी सुरुवातीस पखावज या वाद्याच्या धीरगंभीर नादाने त्यांना मोहिनी घातली तर भजनाचे मधुर स्वर त्यांना खुणावू लागले.

लहानपणापासूनच त्यांना कुस्ती खेळण्याचा छंद जडला. व्यायाम करून शरीरसंपदा बलवान करावे, असे त्यांना वाटू लागले. हीच व्यायाम करण्याची सवय त्यांनी आयुष्यभर चालू ठेवली. त्यांचे शिष्य गोविंद शेळके यासंदर्भात म्हणतात, "पं. बोळंगेगुरुजी पहाटे उठून रोजच पळत असत. ते स्वत: एकटेच व्यायाम करीत नसत तर ते शिष्यांनाही व्यायाम करायला सांगत असत." बालपणातच विटीदांडू आणि गोट्या खेळण्यात त्यांना रस होता. अगदी मोठेपणी सुद्धा ते जेव्हा गावात यायचे तेव्हा तेथील छोटी मुले गोट्या खेळत असतील तर ते मुलांप्रमाणेच गोट्या खेळण्यात दंगून जायचे. मी कोणी मोठा हा

अहंकाराचा लवलेशही त्यांच्याजवळ नव्हता. गावातील मोठी माणसे ते गोट्या खेळताना पाहून हसायचे व नावे ठेवायचे. परंतु गुरुजी मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत व मुलांसमवेत गोट्या खेळून जीवनाचा खरा आनंद लुटायचे. पुढे त्यांचा विवाह पद्मीणबाई यांच्याशी झाला. बाबुराव व व्यंकट ही त्यांची दोन मुले तर छाया व उषा या त्यांच्या दोन मुली. त्यांनी महाराष्ट्रात अनेक शिष्य निर्माण केले परंतु स्वतःची मुले मात्र संगीताकडे आकृष्ट झाले नाहीत. याचे शल्य त्यांना कायम बोचत राहिले. असे असले तरी त्यांनी मुलगा व्यंकट याचा मात्र तबलावादक श्री. राम कुसंगे यांची कन्या कालिंदा हिच्याशी विवाह करून दिला. सौ. कालिंदा या संगीत विशारद आहेत. त्यामुळे बोळंगे गुरुजीनंतरही तानपुऱ्याचा नादब्रह्म त्यांच्या घरात कायम निनादत आहे.

गुरुजी नेहमी पांढरा नेहरूशर्ट, पांढरे धोतर, डोक्यावर पांढरी शुभ्र टोपी परिधान करायचे. गळ्यात तुळशीची माळ असायची. गौरवर्णीय उभट चेहऱ्यावर बुक्का शोभून दिसायचा. पाच-साडेपाच फूट उंचीची देहयष्टी असलेले बोळंगे गुरुजी नेहमी प्रसन्न असायचे. त्यांनी संपूर्ण हयातीत आपले गायन ईश्वरासाठीच केले. त्यांनी आईला वचन दिले होते, आयुष्यात संसार करणार नाही पण भजनच करीन. तेच वचन त्यांनी शेवटपर्यंत पाळले. ते आध्यात्मिक होते. त्यामुळे ते कधीही व्यसनाच्या आहारी गेले नाहीत. नवीन शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना ते एकच अट घालायचे, गळ्यात तुळशीमाळ घालणार असशील तरच मी तुला शिकवीन. यावरून त्यांची अध्यात्माकडे असलेली ओढ दिसून येते तसेच त्यांच्या पवित्र व सोज्वळ व्यक्तिमत्त्वाची प्रचीती येते.

त्यांनी अनेकांचे आयुष्य उभे केले. अडल्या नडलेल्यांना आधार दिला. गोरगरिबांना हात दिला. त्यांनी अनेकांची लग्ने लावून दिली. अनेक गरिबांच्या मुलींची पैशाअभावी लग्ने जमत नसत. तेव्हा गुरुजी त्यांच्या घरी जात व म्हणत, "मी तुमच्या मुलीसाठी स्थळ आणले आहे." तेव्हा त्या मुलीचा बाप केवीलवाणी होऊन म्हणायचा, "गुरुजी लग्नासाठी पैसा लागतो आणि तो आमच्याकडे नाही." अशा वेळी ते म्हणायचे, "पैशानेच सर्व काही होत नाही आणि लग्नासाठी कशाला लागतो पैसा?" अशा प्रकारे ते त्या मुलीचा विवाह करून द्यायचे. त्यांच्या शब्दाला किंमत होती. त्यांच्या मनात गोरगरिबांबद्दल कणव होती. त्यांचे शिष्य श्री. बाळासाहेब नारागुडे यासंदर्भात म्हणतात, 'गुरुजींनी माझ्यासाठी मुलगी पाहिली आणि म्हणाले, "मी तुझे लग्न जमवून आलोय. या तारखेला तू तयार हो." माझे लग्न जमलेय हे माझ्या आई-वडिलांनाही माहीत नव्हते. परंतु गुरूआज्ञा म्हणून मी लग्नाला तयार झालो. त्याच प्रसंगी मुलीचे वडील बोळंगेगुरुजींना म्हणाले, "मुलगा अजून कमावता



नाही, मग त्यांचा संसार कसा सुखी व्हायचा?" त्यावर गुरुजी म्हणाले, "माझ्या नावावर २७ एकर जमीन आहे ती मी त्याच्या नावाने करून देतो. मग तर झाले?" त्यावर मुलीचे वडील मला मुलगी द्यायला तयार झाले." यावरून त्यांच्या दिलदारपणाचे दर्शन घडते. याबरोबरच ते आपल्या शिष्यांवर पितृवत प्रेम कसे करायचे याची प्रचीती येते.

गुरुजी अनेक गोरगरिबांच्या घरी दिवाळी करायचे. लातूरहून गाडीभरून दाळ, तांदुळ, साखर, तेल घ्यायचे व खेड्यापाड्यांत जाऊन गरिबांना वाटायचे, गोरगरिबांच्या घरी दिवाळी होत असताना पाहून त्यांचे डोळे आनंदाने पाणावायचे. कित्येकांना गुरुजी उसने पैसे द्यायचे परंतु गुरुजींचा भोळा स्वभाव पाहून ते पैसे परत करीत नसत. तेव्हा गुरुजी म्हणत, "त्याने मला फसविले नाही त्याने स्वतःलाच फसविले आहे."

यावरून त्यांच्या निरागस व निष्पाप स्वभावाच्या पैलूचे दर्शन घडते, ते घरापासून शेतापर्यंत जात असताना प्रत्येक घरातील व्यक्तींची आस्थेवाईकपणे चौकशी करायचे. घरापासून शेतापर्यंत जाण्यासाठी अर्धा तास लागतो परंतु गुरुजींना सर्वांच्या ख्याली खुशाली विचारण्यातच तीन-चार तास निघून जायचे. अशा प्रकारे लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत त्यांचे सौहार्दपूर्ण संबंध होते. प्रसिद्ध तबलावादक व त्यांचे शिष्य श्री. पांडुरंग मुखडे म्हणतात, "बोळंगेगुरुजींनी मला केवळ तबला, हार्मोनियम व गायनच शिकविले नाही तर त्यांनी मला जीवनात कसे वागावे हे शिकविले. हीच सर्वांत अवघड कला आहे, असे मला वाटते व ती कला मी त्यांच्याकडून शिकलो."

अशा प्रकारे स्वतः अशिक्षित असतानाही गुरुजींनी त्यांच्या शिष्यांना जीवनभर पुरेल अशा ज्ञानाची शिदोरी दिली. जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवून अनेक शिष्यांचे जीवन सन्मार्गी लावले.

त्यांनी आयुष्यभर संगीत प्रचारार्थ महाराष्ट्रभर पायपीट केली. त्यामुळे त्यांना स्वतःच्या घराकडे म्हणावे तसे लक्ष देता आले नाही. असे असले तरी त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्याबद्दल कधीही तक्रार केली नाही. गुरुजींनी संगीताचाच संसार केला. प्रत्येक खेड्यापड्यांपासून शहरापर्यंत त्यांनी आपला एक परिवार निर्माण केला होता. त्यांना दुसऱ्याच्या घरात राहताना कधीही परकेपणा वाटला नाही. ते कुण्या एकाच्या घरी जायचे व मला चहा प्यायचाय म्हणायचे तर कधी एखाद्याच्या घरी जाऊन पुरणपोळी तयार करण्याचा हट्ट धरायचे. लोकही तेवढ्याच प्रेमाने त्यांना हवे ते तयार करून खाऊ घालायचे. यावरून त्यांची जनमानसांशी जुळलेली नात्यांची वीण किती घट्ट होती हे लक्षात येते.

*  **गुरू आणि शिक्षण :**

अगदी लहानपणापासून टाळ, वीणा व पखावजाचे मधुर स्वर कानांवर पडत होते. त्यामुळे चिमुकल्या कोंडिबा यांची बोटे कशावरही पडू लागली. त्यांना पखावज वादनाची गोडी निर्माण झाली. याबरोबरच आपणही गाणे शिकावे, असे त्यांना मनस्वी वाटू लागले. परंतु त्या काळात सहज संगीताचे शिक्षण मिळणे कठीणच होते. गाणे व पखावज शिकण्यासाठी वाटेल तेवढे कष्ट उपसण्याची त्यांची तयारी होती. यासंदर्भात पं. बोळंगे गुरुजींचे ज्येष्ठ शिष्य श्री. विलास धावणे यांनी गुरुजींची एक आठवण सांगितली, "पं. बोळंगे गुरुजी शिष्यांना सांगत, 'मी लहानपणी भजन ऐकून एक चाल शिकली. ती चाल मी प्रत्येक सप्ताहाच्या कार्यक्रमात म्हणत असे. त्या काळात श्री. सीताराम पाटील हे उत्तम गात असत. असाच मी एका सप्ताहात गाण्यासाठी गेलो. तेथे सीताराम पाटील होते. ते माझ्याकडे कुत्सितपणे हसून म्हणाले, "आला बघा एक चालीचा गायक." ही गोष्ट गुरुजींच्या जिव्हारी लागली व त्याच प्रसंगी त्यांनी भिष्मप्रतिज्ञा केली की, जोपर्यंत मी संगीत कलेत पारंगत होणार नाही तोपर्यंत मी गावात परत येणार नाही." म्हणूनच मनाचा निग्रह केला व घर सोडले. बंडा महाराज देगलूरकर यांच्या चक्रीभजनात हार्मोनियम व पखावजाची साथ करणारे श्री. पंढरीनाथ चाकूरकर आणि श्री. बोळंगे गुरुजींची गाठ पडली आणि खऱ्या संगीत प्रवासास सुरुवात झाली." त्यांनी त्यांच्याकडून पखावज वादनाचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी श्री. माणिकराव संगवई (अंबाजोगाई) यांच्याकडून दोन तीन वर्षे संगीताचे ज्ञान आत्मसात केले. मिळालेल्या ज्ञानावर ते समाधानी नव्हते. ज्याप्रमाणे मधमाशी विविध फुलांतून मध गोळा करते तशाच प्रकारे पं. बोळंगे गुरुजींनी अनेक गुरूंकडून संगीताचे ज्ञानकण वेचण्यास प्रारंभ केला. पुढे त्यांनी इचलकरंजीला प्रस्थान केले. तेथे त्यांना श्री. बाबुरावजी वनकुद्रे यांचा सहवास लाभला. आर्थिक अडचणीतून ते पायपीट करीत होते. ज्ञानलालसा बळावत चालली होती. वणकुद्रे गुरुजींकडे आल्यामुळे ते समाधानी झाले. कारण वनकुद्रे गुरुजी शिष्यात असलेल्या गुणांची पारख करायचे व त्या शिष्याला खुल्यादिलाने शिक्षण द्यायचे. त्याचे पालन पोषणही करायचे. त्यांनी बोळंगे गुरुजींना भरभरून ज्ञान देण्यास प्रारंभ केला. त्यांनीही मिळालेला प्रसाद मनोभावे स्विकारला. डोळसपणे रियाज सुरू झाला. परंतु हे नियतीला मान्य नव्हते. पुन्हा त्यांचे दुर्दैव आड आले. दोनच वर्षात वनकुद्रे गुरुजींचे कृपाछत्र हरवले. त्यांचे अकस्मीत निधन झाले. पुन्हा बोळंगे गुरुजींच्या नशिबी भटकंती आली. निराश होऊन ते आपल्या मुळगावी खलंग्री येथे परत आले.



एके दिवशी खलंग्री येथे भजन चालू होते. ईश्वरनामात ते तल्लीन झाले. टाळ वीणा व मृदंगाच्या नादब्रह्मात सारे वातावरण भक्तिमय झाले. त्यांनी आपल्या सुरांनी ईश्वराशी नाते जोडले. ते गात असतानाच समाधिस्थ झाले. स्वतःला विसरून ते स्वरविश्वात व ईश्वरभक्तीत रममाण  झाले. अशातच एक अवलिया फकीर त्यांच्यासमोर उभे राहिले आणि त्यांनी विचारले, "क्या आप संगीत सीखना चाहते हो? तो चलो मेरे साथ" हा एक ईश्वरी चमत्कार होता. त्या अवलिया फकिरांना बोळंगे गुरुजींनी यापूर्वी कधीही पाहिले नव्हते पण त्यांना पाहताच त्यांचा आणि त्या फकिरांचा जन्मोजन्मीचा ऋणानुबंध होता की काय, असे त्यांना वाटले आणि त्यांच्या आज्ञेनुसार गुरुजींनी घर सोडले. अशा रीतीने सतत तीन वर्षे त्यांच्यासमवेत पायी फिरून संगीत साधना केली. खाँ साहेब स्वतः फकीर असल्यामुळे ते दारोदार भिक्षा मागत असत. मिळालेल्या भिक्षेवरच या गुरू-शिष्यांचे उदरभरण होत असे. मजल-दरमजल करीत ते अनेक गावांत फिरायचे. लहर येईल तेव्हा ते बोळंगे गुरुजींना संगीताचे धडे द्यायचे. कधी झाडाखाली, कधी नदीकिनारी तर कधी मशिदीत ते शिकवायचे. जवळ तंबोरा नसायचा की तबला-हार्मोनियम, अशाही स्थितीत संगीत शिकविणारे हे गुरू निश्चितच महान होते. गोड गळ्याची देणगी लाभलेल्या या गुरूला संगीतातील सर्व शास्त्र ज्ञात होते. परंतु का कोणास ठाऊक त्यांनी जाहीर कार्यक्रम केले नाहीत. त्यांच्या कंठात व हृदयात सुप्तपणे वसलेल्या या विद्येस वाट मिळाली ती या शिष्याद्वारे. तीन वर्षांच्या सहवासातून बोळंगे गुरुजींनी खॉ साहेबांकडून अनेक दुर्मिळ बंदिशी प्राप्त केल्या. पुढे खाँ साहेब वाशीम येथे पैगंबरवासी झाले. त्यांच्याच आज्ञेने बोळंगे गुरुजींनी संगीत अध्यापनाला वाहून घेतले. त्यांचे शिष्य भरत हुमनाबादे यांना गुरुजी म्हणायचे, "खाँ साहेबांच्या निधनानंतर जर मला एखाद्या रागाचे स्वरूप समजून घ्यायचे असेल तर मी दिवसभर खाँ साहेबांचे स्मरण करायचो व प्रार्थना करायचो आणि खरोखरच खाँ साहेब रात्री माझ्या स्वप्नात यायचे व त्या रागाचे विवेचन करून सांगायचे."

यावरून आपणास असे म्हणता येईल की, खाँ साहेब खरोखरच दैवी पुरुष होते. त्यांच्याच कृपाशीर्वादाने पं. बोळंगे गुरुजींची गायकी बहरली.

एकदा जयजगदंबा नवरात्र महोत्सवात बोळंगे गुरुजींचे गाणे झाले. त्या वेळी समोर श्रोत्यांत कलकत्त्याचे पं. जगदीश प्रसाद हे थोर गायक होते. त्यांनी गुरुजींचे गाणे ऐकले व प्रसन्न होऊन त्यांनी त्यांना आपल्या समवेत घेऊन गेले. त्यांच्याकडूनही गुरुजींनी संगीतरूपी धन प्राप्त केले. पतियाला घराण्याचे थोर गायक उ. बडे गुलाम अलीखॉ यांचेही त्यांनी शिष्यत्त्व पत्करले. त्यांच्याकडून पतियाला घराण्याची रीतसर तालीम घेतली.

याबरोबरच नजामत अलीखाँ, सलामत अलीखाँ, पाकिस्तानचे गायक फत्तेअलीखाँ आणि अमानत अलीखाँ यांच्या गायकीचा त्यांनी अत्यंत जवळून आणि डोळसपणे अभ्यास केला. त्यांच्या काळात सीताराम पाटील साताळकर, शंकर मास्तर तळणीकर, राम फुलारी तोंडारकर, पं. अण्णासाहेब गुंजकर यांसारखे गायक त्याचे समकालीन होते. त्यांच्याही सहवासातून त्यांची गायकी व वादनशैली बहरत गेली. अशा प्रकारे एका दुर्गम भागात राहणारे पं. बोळंगे गुरुजींनी अनेक थोरा-मोठ्या कलावंतांकडून संगीत कला अवगत केली व लातूर जिल्ह्याच्या अभिजात संगीत वाटचालीस एक चांगले वळण लावले.

**अपूर्व गायन व वादन शैलीद्वारे प्रचार व प्रसार :**

पं. बोळंगे गुरुजी हे पतियाला घराण्याचे उत्तम गायक होते. ते ख्याल उत्तम प्रकारे सादर करीत असत. फकीर अवलिया यांच्याकडून त्यांनी अनेक दुर्मिळ बंदिशी मिळविल्या होत्या. त्या बंदिशी ते मैफीलीतून सादर करीत असत. ते जरी पतियाला घराण्याचे गायक असले तरी ते किराणा, जयपूर व आग्रा या घराण्यांचे गायक व गायकीबद्दल त्यांच्या मनात कमालीचा आदरभाव होता. केदार, नंद, मधुवंती, मुलतानी, रागेश्री, तोडी, जौनपुरी, मारूबिहाग, यमन, दरबारी कानडी व मालकंस हे राग त्यांच्या आवडीचे होते. रागाची मांडणी कौशल्य पूर्ण रीतीने करून त्या बंदिशीमध्ये ते मुक्तपणे विहार करायचे. असे त्यांच्या गायिकीबद्दल लातूर येथे झालेल्या पाचव्या संगीत संमेलनाच्या स्मरणिकेत लिहिले आहे. एवढेच नव्हे तर ते ठुमरी हा गीत प्रकार अत्यंत उत्तम प्रकारे सादर करीत असत. ठुमरीतील उपज अंग, बेहलावे, मुर्की या अलंकारिक बाबींमुळे त्यांची ठुमरी ऐकणे ही एक स्वर्गीय आनंद देऊन जाणारी अनुभूती होती. त्यांच्या गायकीमध्ये उ. बडेगुलाम अली खॉं यांच्या ठुमरीची लकब व लयकारी प्रकर्षाने जाणवते. ते उ. बडे गुलाम अलीखॉं यांना दैवत मानत असत. सोहनी रागातील 'याद पिया की आये', भैरवी रागातील,'कैसे जादू दारा', 'क्या करू सजनी' या ठुमऱ्या ते मुक्तपणे पेश करीत असत. पं. कुमार गंधर्व व पं. भीमसेन जोशी यांची भजने ते हुबेहूब पद्धतीने सादर करीत असत. रसिकांनी डोळे बंद करून ऐकले तर समोर पं. भीमसेन जोशी गात आहेत की काय? असे वाटायचे. 'माझे माहेर पंढरी' हे त्यांच्या आवडीचे भजन होते. मराठीबरोबरच हिंदी भजनेदेखील ते तितक्याच तयारीने पेश करीत असत. यात 'दुनिया है बडी दिवानी', 'इस जगत मे कौन बडा' अशा भजनांचा त्यात समावेश असायचा. संत मीराबाई, संत कबीर, सूरदास यांचीही पदे गाऊन ते श्रोत्यांना आनंद द्यायचे. पं. वसंतराव देशपांडे यांची नाट्यगीते ते उत्तम



प्रकारे सादर करायचे. होरी, कजरीसारखे उत्तरेकडील गीतप्रकार ते तयारीने पेश करायचे. कधी-कधी लावणीसारखा अस्सल मराठमोळी प्रकार सादर करून मैफीलीत रंग भरायचे.

पं. बोळंगे गुरुजी उत्तम हार्मोनियम वाजवायचे, तबला व पखावजाचेही त्यांना उत्तम ज्ञान होते. त्यामुळे ते आपल्या मैफीलीत स्वतंत्र तबलावादन व स्वतंत्र पखावजवादन करायचे. किंबहुना ढोलकी, हालगी, क्लॅरोनेट, दिमडी आदी लोकवाद्ये वाजवून ग्रामीण भागातील लोकांना आकर्षित करायचे. यासंदर्भात त्यांचे शिष्य, पं. पांडुरंग मुखडे लिहितात, "पं. श्री. बोळंगे गुरुजी हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. ते संगीत क्षेत्रातील कॅप्टन आहेत. क्रिकेटमधील कॅप्टनला बॅटिंग, बॉलिंग, फिल्डिंग, किपिंग आणि क्रिकेटची टीम मेन्टेन करणे हे सर्व काही जमते. तसेच श्री. बोळंगे गुरुजी ख्याल, ठुमरी, भजन आणि सांप्रदायिक भजनातील मुकुटमणी आहेत. वाद्य वादनात तर तबला, मृदंग, हार्मोनियम, क्लॅरोनेट, हालगी अशा चौफेर गुणांनी संपन्न आहेत म्हणूनच ते संगीत क्षेत्रात तर थोर आहेतच तसेच त्यांची लोकसमुदायात आणि जनसमूहातही थोरवी आहे."

अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी खेड्यापाड्यात कार्यक्रम केले. वाहनांची सुविधा नसतानाही ते डोक्यावर वाद्ये घेऊन रात्री बेरात्री प्रवास करायचे. सहज निमंत्रण दिले तरीसुद्धा ते आवर्जून मैफीलीसाठी जायचे. एवढे पैसे द्याल तरच गातो असा अट्टाहास त्यांनी केला नाही. ध्वनी व्यवस्था आहे किंवा नाही याचा विचार न करता ते केवळ ईश्वरासाठी गात राहिले. शास्त्रीय संगीताच्या सभासंमेलनाबरोबरच महाराष्ट्रातील अध्यात्मिक संप्रदायाच्या मुख्य लोकाभिमुख अशा व्यासपीठावरून त्यांनी भजनाच्या आधारे संगीताचा प्रचार केला. त्यांनी कधीही भव्य दिव्य व्यासपीठाची मागणी केली नाही. कधी मारुतीच्या पारावर तर कधी जमिनीवर सतरंजी टाकून संगीत सेवा केली. गावातील पखावज वाजत नसला तर ते स्वतः त्याची ओढ काढायचे व तो सूरात लावायचे. ओढ काढताना कधी कधी हाताला फोड यायचे. परंतु त्या वेदनांकडे दुर्लक्ष करून ते पांडुरंगाच्या चरणी लीन व्हायचे. कार्यक्रमात हार्मोनियम नादुरूस्त झाली तर ते स्वतः दुरूस्त करायचे. मैफील सुरू झाल्यानंतर आपण किती वेळ गात आहे याचे भान त्यांना राहात नसे. संयोजकांनी 'गाणे बंद करा' असे म्हंटल्यानंतरच ते थांबायचे. भजनानंतर ते उत्तम कीर्तनही करायचे.

ग्रामीण भागात भजन सादर करताना ते ठाय लयीत व शास्त्रीय संगीतावर आधारितच भजन करायचे. त्यांच्या भजनांवर ठुमरीचा प्रभाव असायचा. ज्या गावात सांप्रदायिक सप्ताह

होत नव्हते तेथे त्यांनी सुरू केले. या माध्यमातून गावातील आबाल-वृद्धांच्या कानावर तालासूरांचे संस्कार झाले. त्यांनी मराठवाड्यातच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, पंढरपूर, मिरज, बार्शी व सासवड येथे कार्यक्रम केले तर चंद्रपूर, यवतमाळ, वणी अशा विदर्भातील शहरातसुद्धा मैफीली केल्या. लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद व अंबाजोगाई येथे झालेल्या मराठवाडा संगीत संमेलनांतून त्यांनी आपले गायन-वादन सादर केले. दि. १३ ऑक्टोंबर १९९५ साली राजीव गांधी ग्रामीण विकास संस्था संचलित संगीत विद्यालय, मोहोळ येथे विद्यालयाच्या प्रथम वर्धापनदिनाचे औचित्य साधून बोळंगे गुरुजींनी शास्त्रीय गायन केले. एवढेच नव्हे तर सौ. अंजली पटवर्धन यांच्या शास्त्रीय गायनास तबल्याची उत्तम साथ संगत केली. गुरुजींचे शिष्य श्री. बी. बी. नरारे यांनी करमाळा येथे सूरताल संगीत विद्यालयाच्या प्रमाणपत्र वितरण समारंभ व पुस्तक प्रकाशन सोहळयासाठी दि. २८.८.२००१ रोजी प्रमुख अतिथी म्हणून पं. बोळंगे गुरुजींना निमंत्रित केले होते. या कार्यक्रमात पं. बोळंगे गुरुजींनी उत्तम भाषण केले. त्याचा वृत्तांत 'करमाळा संदेश' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला. त्यात गुरुजी म्हणतात, "सातत्याने सराव केल्याशिवाय शास्त्रीय संगीत अवगत होत नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांनी गायन ही तपश्चर्या समजून त्यासाठी वेळ देऊन नियमित सराव केला पाहिजे. शालेय शिक्षणाबरोबरच संगीत शिक्षणाचीही आज नितांत आवश्यकता आहे. पालकांनी आपल्या मुलांना प्रोत्साहित करून संगीत शिक्षणासाठी पाठवावे व भारतीय संस्कृती जतन करावी." अशा प्रकारे पं. बोळंगे गुरुजींनी आपल्या भाषणातूनसुद्धा अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. पं. बोळंगे गुरुजींचे ज्येष्ठ शिष्य प्रा. श्री. टी. एन. मुरकुटे म्हणतात, "पं. बोळंगे गुरुजींनी संपूर्ण हयातीत अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार एका व्रताप्रमाणे केला. पुणे आणि पुणे परिसरात त्यांचे किमान १०० तरी कार्यक्रम झाले असावेत. यात गणेशोत्सव कालात टिळक वाडा व महात्मा फुले सभागृहात त्यांचे गायन-वादन झाले. स्वरानंद सासवड संगीत विद्यालयात अनेक थोर कलावंतांचे आम्ही कार्यक्रम ठेवीत असू. त्या कार्यक्रमांत त्या मुख्य कलावंताच्या पूर्वी आम्ही गुरुजींचे गाणे मुद्दाम ठेवीत असू. जेणेकरून ते कलावंत गुरुजींचे गाणे ऐकतील आणि खरोखरच ते कलावंत गुरुजींचे गाणे ऐकून प्रसन्न होत असत."

थोडक्यात असे म्हणता येईल की पं. वि. ना. भातखंडे व पं. वि. दि. पुलस्कर यांनी ज्याप्रमाणे संगीताचा प्रचार व प्रसार केला. हीच प्रेरणा घेऊन पं. के. एन. बोळंगे गुरुजींनी ही थोर परंपरा पुढे चालविली. ग्रामीण परिसरात, अतिदुर्गम अशा खेडेगावात ज्यांनी स्वर्गीय संगीताचे स्वर ऐकले नसतील अशा भागात गुरुजींनी संगीताचा प्रचार व



प्रसार केला. केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर सांस्कृतिक माहेरघर असलेल्या पुण्यासारख्या मोठ्या शहरात जाऊन त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार केला.

* **संगीत विद्यालयाची स्थापना :**

अवलिया फकीर यांच्या आज्ञेनुसार अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करण्यातच पं. बोळंगे गुरुजींनी धन्यता मानली. अनेक वर्षांच्या भटकंतीनंतर ते लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे आले. त्यांच्या लक्षात आले की, सांप्रदायिक गायन-वादनाने चाकोरीबद्धता येते. त्याच्या पलीकडे असलेल्या आनंदापासून अनेक कलाकार वंचित राहतात. राग विद्येच्या अमर्याद आनंदाचा ठेवा खेड्यापर्यंत मोकळा करण्याच्या ध्येयाने त्यांनी चाकूर येथे आपल्या आईच्या नावाने 'व्यंकामाता संगीत विद्यालयाची' सुरुवात केली पण ही स्थिरता गरिबातल्या गरीब कलाकारांपर्यंत पोहोचण्यास बाधक आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी स्थितिशिलतेचा त्याग केला आणि गावोगाव जाऊन गायन-वादनाचे धडे गुणवंत विद्यार्थ्यांना देऊ लागले.

हा प्रवास त्यांनी लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यापुरताच मर्यादित न ठेवता संपूर्ण मराठवाड्याबरोबरच सोलापूर व पुणे जिल्ह्यात सुरू ठेवला. वारकरी सांप्रदायाच्या व्याप्तीचा त्यांना फार फायदा झाला. दोन-चार शिष्य सोबत घ्यायचे एखाद्या गावात कोण्यातरी वारकऱ्याच्या घरात मुक्काम करायचा. गावातील मुलांना एकत्रित करायचे. दोन-चार दिवस त्यांना धडे द्यायचे. शिकविलेला धडा त्या शिष्याला समजला की पुढच्या गावात जायचे. जात असताना ते शिष्यांना बजावून सांगायचे की हा ताल, एकपट, दुप्पट व चौपटीत आलाच पाहिजे. पुन्हा गुरुजी आठ-दहा दिवसांनी त्या गावी परतायचे. धडा पाठ केला नाही तर निरगुडीच्या फोकाने ते विद्यार्थ्यांना मारायचे आणि जर विद्यार्थ्यांने तो धडा पाठ केला असेल तर गुरुजी त्याला गळ्याला लावून घ्यायचे, पाठीवर हात फिरवून शबासकी द्यायचे. ते जितके कठोर होते. तितकेच ते प्रेमळही होते. अशा प्रकारे पुन्हा पुढचा पाठ देऊन गुरुजी दुसऱ्या गावी मुक्कामाला जात असत.

लातूर येथे गुरुवार संगीत महाविद्यालयातूनसुद्धा त्यांनी अनेक शिष्यांना संगीताचे धडे दिले. भोई गल्लीत हे संगीत महाविद्यालय चालायचे. याबद्दल त्यांचे शिष्य श्री. विठ्ठलराव जगताप म्हणतात, "त्याकाळी माझ्याबरोबर बाळासाहेब गरड, कृष्णा सावंत, विलास धावणे हे गुरूबंधू होते. आम्ही गुरुजींची वाट पहात असू. गुरुजी एकदा आले की रात्रंदिवस आमची शिकवणी चालायची. रात्री १० वाजता बसलो की सूर्योदय कधी व्हायचा हे आम्हाला

समजायचे नाही." याबरोबरच त्यांचे दुसरे शिष्य श्री. विलास धावणे म्हणतात, "पं. बोळंगे गुरुजींचा मला १९७७ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत सहवास लाभला. गुरुवार क्लब येथे मला ३-४ वर्षे संगीताचे धडे घेता आले. गुरुजी आमच्याकडून स्वर साधना करून घेत असत. एक स्वर दोन-दोन तास आम्हाला लावायला शिकवित. मंद्रसाधना, शुद्ध, विकृत स्वरांचा रियाज, अलंकार पलटे इ. आमच्याकडून घोटून घ्यायचे. रियाज झाल्यानंतर आम्ही सर्वजण एकाच ताटात जेवत असू. जात, पात, धर्म याचा त्यांनी कधीही संकुचित विचार न करता सर्व शिष्यांना सढळ हाताने विद्यादान केले. त्यानंतर त्यांनी गायन-वादन संगीत विद्यालयाची लातूर येथे सुरुवात केली. गुरूदत्त संगीत विद्यालय, अहमदपूर येथे प्रधानाध्यापकाचे त्यांनी कार्य केले. खरोळा येथील पांढरी देवस्थानात त्यांनी एक आश्रम सुरू केला होता. त्यातून गुरू-शिष्य परंपरेच्या माध्यमातून शास्त्रीय संगीताचे शिक्षण देणे सुरू केले होते. एवढेच नव्हे तर त्यांनी निलंगा, सोलापूर, बार्शी येथेही संगीत विद्यालयाची स्थापना केली होती. पुढे ते पुणे जिल्ह्यातील सासवड येथे गेले. तेथे स्वरानंद-सासवड-सरस्वती संगीत विद्यालयाची स्थापना केली. यासंदर्भात त्यांचे शिष्य प्रा. टी. एन. मुरकुटे लिहितात, "सुमारे पंधरा वर्षांपूर्वी सासवडमधील आम्ही बोटावर मोजण्याइतकी संगीतप्रेमी मंडळी कधी कधी एकत्र येत असू आणि भजन, शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करीत असू. अशाच एका प्रसंगी मराठवाड्यातील गायक पं. बोळंगे गुरुजी यांचे सासवडला माझ्याकडे येणे झाले. दोन-तीन दिवसांच्या मुक्कामात भजन, शास्त्रीय संगीत इत्यादी कार्यक्रम झाले. त्यातूनच सासवडला संगीत संस्था काढण्याची कल्पना पुढे आली. स्वतः श्री. बोळंगे गुरुजी यांनी आपल्या दोन-तीन शिष्यांसह सासवड येथील सोपान महाराजांच्या मंदिरात शिकवणीला सुरुवात केली आणि तीन महिन्याच्या त्यांच्या अखंड सहवासातून आणि स्वरसाधनेतून जन्माला आली 'स्वरानंद सासवड' ही संगीत आराधना करणारी संस्था." श्री. नानासाहेब महागावकर (नाना) हे सासवडमधील एक प्रसिद्ध सराफ होते. व्यवसायाबरोबरच सामाजिक जाण असणारे नाना यांनी या संस्थेच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले. पं. आप्पा जळगावकर, पं. ना. वा. दिवाण आणि पं. बोळंगे गुरुजी यांच्या मैफीलीने या संस्थेचे उद्घाटन झाले. या संस्थेतून पुण्याचे ख्यातनाम तबलावादक व पं. बोळंगे गुरुजींचे शिष्य श्री. पांडुरंग मुखडे हे तबलावादनाचे धडे देऊ लागले. तसेच श्री. बाळासाहेब नारागुडे, श्री. शिवाजीराव डिगोळे व श्री. राजेंद्र बढे हे गुरुजींचे शिष्य गायन शिक्षक म्हणून संस्थेत आले. पं. ना. वा. दिवाण यांच्या सहकार्याने सासवड येथे विशारदपर्यंतचे परीक्षा केंद्र मिळाले. नानांनी हाक मारावी आणि त्यांच्या रसिकतेचा मोह अनावर होऊन पं. बोळंगे



गुरुजी धाऊन यावेत असे पंधरा वर्षे चालत राहिले. यामुळेच या संस्थेने लावलेले इवलेसे रोप गगनावर झेप घेत राहिले."

पं. के. एन. बोळंगे गुरुजींच्यासंदर्भात डॉ. ना. वा. दिवाण म्हणतात, "वास्तविक पाहता सासवडसारखे खेडे आणि खेडे म्हटले की अशिक्षण, दारिद्र्य, अंधश्रद्धा व नैसर्गिक प्रतिकूलतेला तोंड देता देता खचून, पिचून गेलेली माणसं असच काहीसं चित्र आपल्यासमोर उभं राहतं आणि अशा या वातावरणात संगीत विद्यालय सुरू करणे अत्यंत धाडसाचं होते. विद्यालय आणि तेही पुन्हा शास्त्रीय संगीताचे. एक वेळ सुगम संगीताचे म्हटले असते तर काही समजण्याजोगे होते. कारण खेड्यात अनेक लोक तुलनेने अधिक सश्रद्ध असतात. भक्तिभावात रंगून जाणारे असतात. त्यामुळे भजनात रमून जाणे मी समजू शकलो असतो; परंतु तेथे तर कोणावरही शास्त्रीय संगीताचा संस्कार झालेला नाही. या प्रश्नामागे उभी होती ती एका त्रिमूर्तीची जिद्द, त्यांची चिकाटी. ही त्रिमूर्ती म्हणजेच पं. बोळंगे गुरुजी, श्री. नानासाहेब महागावकर व प्रा. मुरकुटे." अशा प्रकारे ग्रामीण भागात त्यांनी अभिजात संगीताचे बीज रोवले.

भौतिक सुख-दुःखाच्या मागे धावणाऱ्या युगात सर्वजण पैसा मिळविण्यासाठीच कार्य करतात. परंतु बोळंगे गुरुजींनी मात्र अर्थार्जनाचा कधीही विचार केला नाही. त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना मुक्त हस्ताने विद्यादान केले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून फीस घेतली नाही. किंबहुना कार्यक्रमातून मिळालेले मानधन स्वतःसाठी किंवा घर प्रपंचासाठी न वापरता गरजू, अनाथ व स्वरांवर प्रेम करणाऱ्या खेड्यापाड्यातील मुलांसाठी वाटले. या विद्यार्थ्यांना कपडे घेण्यासाठी त्यांच्या जेवणासाठी आणि संगीत साहित्य घेऊन देण्यासाठी हा पैसा वापरला. यासंदर्भात त्यांचे शिष्य बाळासाहेब नारागुडे म्हणतात, "माझी घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. संगीत शिकण्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध नव्हता परंतु माझी संगीत शिकण्याची तीव्र इच्छा व प्रयत्न पाहून श्री. बोळंगे गुरुजींनी मला संगीताचे धडे द्यायला सुरुवात केली. तसे संगीत विशारद होण्यासाठी सात परीक्षा द्याव्या लागतात. आपणाला ही कला शिकता येणार नाही असेच सुरुवातीला वाटले परंतु एकदा मी त्यांच्या गायनाला पेटीची साथ दिली. माझी संगीतामधील लहान वयातील झेप पाहूनच त्यांनी मला संगीत शिकविण्याचे मान्य केले आणि अक्षरशः माझे संगीत विशारदपर्यंतचे शिक्षण होईपर्यंत मला खाणे-पिणे, राहणे याचा कदापीही खर्च होऊ दिला नाही. एवढ्या उदार अंतःकरणाचा गुरू लाभणे हे मी माझे परमभाग्य समजतो." प्रसिद्ध तबलावादक पं.

पांडुरंग मुखडे हे यासंदर्भात म्हणतात, "स्वतःची परिस्थिती अगदी सामान्य असूनदेखील आपल्या शिष्यांना स्वतःच घेऊन येत. त्यांचे राहणे, जेवण-खाण, कपडा-लत्ता आणि प्रसंगी खिशातील चार पैसे देत. त्यासाठी खेडोपाडी पायी फिरून भजनाचे, गायनाचे कार्यक्रम करीत आणि मिळणाऱ्या तोकड्या बिदागीतून माझा आणि माझ्यासारख्या अनेकांचा सांभाळ करीत. प्रसंगी आई-वडील, बहीण, बंधू यांचेही प्रेम देत म्हणून श्री. बोळंगे गुरुजी हे माझे सर्वस्व आहेत. त्यांनीच मला तबला शिकविला, मिनिटात आणि तासांत मोजमाप करून त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना कधी फीसचे नाव काढलेले आठवत नाही. याउलट एखाद्या शिष्याची परिस्थिती बिकट असेल तर त्याला मुद्दामहोऊन जवळ धरायचे, शिवाय त्यांच्या घरातील ज्या ज्या अडचणी असतील त्याही ते सोडवायचे. माझे शिक्षण अशाच पद्धतीने झाले म्हणून त्यांचे आणि माझे गुरू-शिष्याचं नातं आजतागायत टिकून आहे आणि जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत टिकून राहील अशी मला खात्री आहे. हेच ते नाते मी आजपर्यंत जपले आहे आणि त्यांच्या या ऋणात मी जन्मभर राहणार आहे." गुरुजींचे शिष्य श्री. उत्तमराव जायभाये म्हणतात, "पं. बोळंगे गुरुजी कार्यक्रमातून मिळालेली बिदागी शिष्यात वाटून टाकायचे. काही संसारीक विद्यार्थीही त्यांच्याकडे असायचे. ते गावाकडे निघाले की, गुरुजी त्यांना बोलवायचे व आपल्याजवळचे पैसे द्यायचे. तेव्हा विद्यार्थी म्हणायचे, "गुरुजी आमच्याकडे आहेत पैसे." त्यावर ते म्हणायचे, "अरे ते पैसे तर घरी गेल्यानंतर संपून जातील, इकडे परत येताना तुला लागणार नाहीत का पैसे?" असे म्हणून गुरुजी त्यांच्या खिशात पैसे घालायचे." असाच एक प्रसंग प्रा. टी. एन. मुरकुटे यांनी सांगितला, ते म्हणतात, "पं. बोळंगे गुरुजींनी माझा गोड आवाज पाहून मला म्हणाले, "तू कलकत्ता येथे पं. जगदिश प्रसाद यांच्याकडे उच्च स्तरीय गाणे शिकण्यासाठी जा." यावर मी म्हणालो, गुरुजी मला घर-प्रपंच सोडून जाणे शक्य नाही." त्यावर गुरुजी म्हणाले, "तू खुशाल जा इथे मी तुझ्या घर-प्रपंचाला काहीही कमी पडू देणार नाही." अशा प्रकारे गुरुजी-विद्यार्थ्यांची तर काळजी घ्यायचेच पण त्यांच्या संसाराचीही काळजी घ्यायचे. "संगीत विद्यालयातील विद्यार्थी झोपल्यानंतर गुरुजी रात्री-बेरात्री उठायचे व बॅटरी घेऊन पाहणी करायचे. कोणाला थंडी वाजू नये, डास चावू नयेत यासाठी ते त्यांच्या अंगावर पांघरून घालायचे. एवढ्या ममत्त्वाने काळजी घेणारा गुरू जगात सापडणार नाही." त्यांचे शिष्य पं. विठ्ठलराव जगताप म्हणतात, "शेतात नांगर धरणारे व जनावरे राखणाऱ्या विद्यार्थ्यांना गुरुजींनी पारखले व त्यांना गायन-वादन शिकविले. त्यांना विशारद केले व त्यांच्या पायावर उभे केले. ते एक आदर्श गुरू होते. त्यांची शिकविण्याची हातोटी अशी होती की मनात आणले तर कितीही



आज्ञानी शिष्य असला तरी त्याला एक चांगला आदर्श गायक बनवायचे." श्री. बाळासाहेब नारागुडे लिहितात, "गुरुजींजवळ संगीताचे इतके ज्ञान आहे की, त्यांची तुलना सागराच्या अथांगतेशी केली तर अतिशयोक्ती होणार नाही. आजपर्यंत कोणी एकही शिष्य त्यांच्याकडील ज्ञान पूर्णपणे ग्रहण करू शकला नाही. त्यांचा गाढा व्यासंग आहे."

ते विद्यार्थ्यांना नेहमीच रात्री शिकवित असत. त्यांच्या मनात येईल तेव्हा ते तानपुरा काढायचे. आगदी रात्री २ वाजतासुद्धा; सर्व शिष्यही मन लावून त्यांच्याकडून विद्या आत्मसात करायचे. रात्री शेतात भाकरी आणायच्या. अचानक गुरुजी शिकवायला सुरू करायचे. गुजरी तोडी, मिया की तोडी अशा रागांच्या शास्त्रावर चर्चा चालायची. रात्री २-३ वाजेपर्यंत या सांगीतिक गप्पा चालायच्या. गप्पा संपल्यानंतर लक्षात यायचे की, अरे आपण जेवणच केले नाही. वास्तविक पाहता तालासुरांच्या गप्पांनीच त्यांची पोटं भरलेले असायचे. जेव्हा जेवणाची आठवण यायची तेव्हा आणलेली भाजी-भाकरी थंड झालेली असायची. मग गुरुजी रात्री २-३ वाजता सर्वांना घेऊन जेवायचे व शेतातच सर्वजण निद्राधिन व्हायचे. गुरुजी रियाज कसा करून घ्यायचे यासंदर्भात त्यांचे शिष्य बाळासाहेब नारागुडे लिहितात, "गुरुजींची बैठक इतकी स्थिर होती की, एकदा रात्री दहा वाजता त्यांनी तानपुरा घेऊन शिकवायला सुरुवात केली की पहाटे चार वाजेपर्यंत त्यांचे हे पाठ चालायचे. तासन्‌तास ते संगीताचे धडे आमच्याकडून घोटून घेत असत." शिक्षण घेत असतानाची एक आठवण ताजी आहे. त्यांनी मला 'मिया मल्हार' रागातील २० पलटे रियाजासाठी दिले होते. त्या पलट्यांच्या रियाज करताना मी अगदी कंटाळून गेलो. कारण मला एक एक पलटा तीन-तीन तास तानपुऱ्यावर रियाज करावा लागत असे. त्यामुळे मी अगदी वैतागून गेलो. नको तो रियाज असे वाटायचे, पळून जावेसे वाटू लागले. मी तशी संधी शोधू लागलो. गुरुजींनी मला असाच रियाज करताना पिशवी व पैसे देऊन बाजारात फळे आणायला सांगितले. मी फळे आणण्याच्या निमित्ताने सरळ एस. टी. स्टँड गाठले व घरी आलो. हा प्रकार माझ्या गुरूबंधूंना समजला व त्यांनी मला परत गुरुजींकडे आणून सोडले. त्या वेळी गुरुजींनी मला सांगितले, "तुला खरच गाणं शिकायच असले तर मी सांगतो त्याप्रमाणे रहावे लागेल. मी केंव्हाही झोपेतून उठवीण, रात्री दोन वाजतासुद्धा तुला तानपुरा हातात घ्यावा लागेल. नाहीतर तू आयुष्यात तानपुऱ्याला स्पर्श करू नकोस. मला तू गुरुजी म्हणून पुन्हा हाक मारू नकोस." मी गुरुजींचे पाय धरले व हातातला तानपुरा परत कधीही खाली ठेवला नाही. संगीताची सेवा करायची व गाणे शिकायचे तर गुरुजींकडेच असा निश्चय केला. हाच गुरुजींनी माझ्या जीवनात दिलेला पहिला धडा होय." अशा प्रकारे गुरुजींनी

संगीत विद्यालयातून विद्यार्थ्यांना मायेच्या ममतेने शिक्षण दिले. गुरुजींबद्दल त्यांचे शिष्य श्री. कृ. द. बोबडे लिहितात, "जीवनातील प्रत्येक मिळणारा क्षण, प्रत्येक श्वास हा ईश्वराचा कृपाप्रसाद आहे असे ते मानतात. स्वर हा ईश्वर मानून त्याची रात्रंदिन आराधना करतात. स्वर आणि ईश्वरभक्तीचे संस्कार स्वरांच्या माध्यमातून खेड्यापाड्यातून येणाऱ्या हजारो शिष्यांवर करतात." पं. बोळंगे गुरुजींनी स्वरानंद सासवड सरस्वती संगीत विद्यालयाच्या माध्यामातून अनेक सांगीतिक उपक्रम राबविले. गुरूपौर्णिमा, गणेशोत्सव, वर्धापणदिन व मासिक संगीत सभा इ. द्वारे ग्रामीण भागातील रसिकांना अभिजात संगीत ऐकण्याची दुर्मिळ संधी उपलब्ध करून दिली. याबरोबरच ग्रामीण भागातील कलावंतांना मुक्त व्यासपीठ मिळवून दिले. त्यांनी अनेक दिग्गज कलावंतांना पाचारण करून त्यांच्या मैफीली आयोजित केल्या. पं. श्रीकांत देशपांडे, पं. सदाशिवबुवा जाधव, डॉ. सुहासिनी कोरटकर, डॉ. आशा पारसनीस, डॉ. प्रकाश संगीत, सौ. मंगला आपटे, पं. हरिशचंद्र गवारे, श्री. यादवराज फड, पं. विजय बक्षी, सौ. विद्या कुलकर्णी, श्री. शंकरराव वैरागकर यांच्या मैफीली आयोजित करून हा स्वर प्रसाद ग्रामीण भागातील रसिकात वाटला.

भजन व अध्यात्म हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता त्यामुळे सरस्वती संगीत विद्यालयाच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी संतश्रेष्ठ सोपान महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सासवड येथील भैरवनाथ मंदिरात संगीत भजनाचे कार्यक्रम आयोजित केले. भजनातील थोर गायक व रसिकांना एकत्र बोलावून हा नादब्रह्माचा आनंद सर्वांना वाटला. यात जुन्या पिढीतील गायक कै. मारुतीबुवा कडेगावकर, मारुतीबुवा दोदेकर, तुकारामबुवा कडेगावकर, तुळशीरामबुवा, दीक्षित, बोगडेबुवा (मुंबई), राजेंद्र पवार (नागपूर), बाबुरावजी धामणीकर (सोलापूर), वसंतराव मांडरे (भोर), ह. भ. प. पांडुरंग महाराज वैद्य (आळंदी), ह. भ. प. ज्ञानोबा माऊली लटपटे (परळी), श्री. सुभाष देशमुख, श्री. विठ्ठलराव फडकर (गंगाखेड) इ. मान्यवरांच्या भजनाचे कार्यक्रम केले. अशाप्रकारे अध्यात्मातून अभिजात संगीताचा प्रचार केला.

सांगीतिक उपक्रमाबरोबरच ज्यांनी संगीत सेवा केली अशांचाही त्यांनी यथोचित सत्कार केला. यात पं. आप्पा जळगावकर, दत्तोपंत देशपांडे, डॉ. टी. डी. जानोरीकर, पं. ना. वा. दिवाण, पं. श्रीकांत देशपांडे, ह. भ. प. साहेबराव, नाना देशमुख यांचा गौरव केला. किंबहुना त्यांनी विद्यालयातील विशारद, अलंकार झालेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करून त्यांचे कौतुक केले. या उपक्रमात नानासाहेब महागावकर, प्रा. टी. एन. मुरकुटे, पं.



पांडुरंग मुखडे, श्री. बाळासाहेब नारागुंडे यांनी मोलाचे योगदान दिले. पं. बोळंगे गुरुजींनी केवळ या एकाच संगीत विद्यालयातून असे उपक्रम राबविले नाहीत तर त्यांनी जेथे जेथे संगीत विद्यालय सुरू केले तेथे तेथे अशा उपक्रमांद्वारे अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

## सुयोग्य शिष्यांची निर्मिती :

पं. बोळंगे गुरुजींनी संपूर्ण महाराष्ट्रात भटकंती करून शेकडो शिष्य तयार केले. त्यांचे अनेक शिष्य सोलापूर, पंढरपूर, बार्शी, लातूर, चाकूर, अहमदपूर, निलंगा, भूम, नांदेड, परभणी, नागपूर, चंद्रपूर आणि पुणे इ. ठिकाणी संगीत विद्यालये चालवित आहेत. त्यांनी सर्व जाती-धर्मांच्या मुलांना आणि विशेषतः शेतकरी कुटुंबातील असंख्य निरक्षर मुलांना संगीत शिकवून तयार केले. त्यापैकी अनेकजण अ. भा. गांधर्व मंडळाचे विशारद, अलंकार परीक्षा उत्तीर्ण होऊन नोकरीमध्ये स्थिरावले आहेत. त्यापैकी काही शिष्यांच्या कार्याचा परिचय पुढीलप्रमाणे घेता येईल.

***     पं. दीपक लिंगे :**

पं. दीपक धोंडोपंत लिंगे यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील सांगीतिक वाटचालीस बळ दिले आहे. सगरोळी ता. जि. उस्मानाबाद या छोट्याशा गावी त्यांचा जन्म २५ मे १९५४ साली झाला. त्यांनी तबला व मृदंगाची तालीम वडील मृदंगाचार्य ह. भ. प. धोंडोपंत लिंगे यांच्याकडून घेतली. हार्मोनियम व गायनाचे शिक्षण पं. कोंडिबा बोळंगे गुरुजींकडून घेतले. त्यानंतर दि.२४ डिसेंबर १९९० रोजी पद्मभूषण पं. सी. आर. व्यास यांच्याकडून रीतसर गंडाबंधन करून दहा वर्षे गाण्याची तालीम घेतली. उस्मानाबाद येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये संगीत विभागप्रमुख म्हणून त्यांनी कार्य केले. भारतातील अनेक संगीत संमेलनात स्वतंत्र हार्मोनियम वादनाचे कार्यक्रम करून दाद मिळविली. त्यांनी पं. सी. आर. व्यास, डॉ. वसंतराव देशपांडे, पं. बसवराज राजगुरू, जितेंद्र अभिषेकी अशा मातब्बर कलावंतांना हार्मोनियमची साथ दिली. 'मृदंग साधना' हे पखावज वादनाचे पुस्तक लिहून अ. भा. गांधर्व मंडळाच्या विद्यार्थ्यांना बोलांचे भांडार खुले करून दिले. त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक विवेक घळसासी म्हणतात,"लिंगे गुरुजींनी स्वतः गायन-वादन आत्मसात केलेच पण मोठ्या उदारतेने लाभाचा विचार न करता त्यांनी जिज्ञासूस ती विद्या दिली. संगीत शिक्षक म्हणून सेवा करून ते स्वरदान दिले तसेच स्वतंत्र विद्यालय उभे करूनही हेच कार्य केले."

मृदंग साधना या पुस्तकातून त्यांनी अ. भा. गांधर्व मंडळाच्या प्रारंभिक ते प्रवेशिका पूर्ण परीक्षांसाठी पखावज वादनाचा पाठ्यक्रम दिला आहे. याबरोबरच या पुस्तकात वारकरी संप्रदायासाठी मृदंग वादनाचे शास्त्रोक्त बोल दिले आहेत. यात 'रामकृष्ण ताल', 'विठ्ठल ताल', 'दिंडी ताल', ' माऊली ताल', 'तुकाराम ताल' असे नवताल निर्मिती करून सांप्रदाय विश्व भरून टाकले आहे.

* **श्री. बाळासाहेब गरड :**

बाळासाहेब गरड यांनीसुद्धा भूम तालुक्यात सांगीतिकदृष्ट्या मोलाचे कार्य केले आहे. पं. बोळंगे गुरुजी, श्री बुर्ली (धारवाड) यांच्याकडून त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. सुरुवातीला रेणापूर येथे संगीत विद्यालय सुरू केले. त्यानंतर गुरुवार क्लबमध्ये काही दिवस संगीत अध्यापक म्हणून कार्य केले तर लातूर येथील व्यंकटेश विद्यालयात एक वर्ष संगीत शिक्षक म्हणून नौकरी केली. पुढे बोळंगे गुरुजींच्या बरोबर प्रवास करीत ते भूम येथे आले आणि भूम हीच कर्मभूमी मानून त्यांनी संगीत प्रचाराचे कार्य हाती घेतले. त्यांनी गायनात संगीत अलंकार व तबलावादनात विशारद ही पदवी प्राप्त केली. भूम येथे दत्तप्रसाद संगीत विद्यालयाची स्थापना केली. त्यातील जवळपास ३५ विद्यार्थ्यांना संगीत शिक्षक म्हणून नौकरी मिळाली आहे. येरमाळा ते करमाळा, बार्शी ते बीड या अतिशय दुर्गम भागात संगीताचा मळा फुलविण्यासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले आहे.

* **श्री. बाळासाहेब नारागुडे :**

२० जून १९६७ साली लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील चिमाची वाडी या गावी बाळासाहेबांचा जन्म झाला. गावात श्री. बाळासाहेब गरड हे भजन शिकविण्यासाठी यायचे. शामलालदादा महाराजांच्या समाधी मंदिरात हे भजन चालू असतानाच चिमुकला बाळासाहेब चोरून ऐकायचा. हे पाहून गरड गुरुजींनी त्यांना बोळंगे गुरुजींकडे घेऊन गेले. चौथीपासून ते संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत ते बोळंगे गुरुजींच्या समवेत राहिले. ते १९८५ साली संगीत विशारद तर १९९५ साली संगीत अलंकार परीक्षा उत्तीर्ण झाले. सासवड येथे सरस्वती संगीत विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. त्यानंतर श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय, कोल्हापूर संचालित भोर, जि. पुणे येथे १९८७ पासून संगीत शिक्षक म्हणून रूजू झाले. लातूर, सासवड, पुणे, भोर, परभणी, परळी, उदगीर अशा ठिकाणी अनेक छोट्या मोठ्या मैफीलीत त्यांनी गायन सादर केले. त्यांची १९ विद्यार्थी विशारद तर २ विद्यार्थी संगीत अलंकार झाले आहेत. त्यातील ७



विद्यार्थी संगीत शिक्षक म्हणून विविध शाळांत कार्यरत आहेत. संगीत विद्यालयाचा वर्धापणदिन व गुरुपौर्णिमेनिमित्त दरवर्षी शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित करतात. त्यांची गायकी उ. सलामत अलींची आहे. त्यांनी २५० बंदिशी व तराणे स्वरबद्ध केले आहेत. दूरदर्शनच्या बालचित्रवाणी कार्यक्रमातून त्यांनी अभंगवाणी सादर केली आहे. त्यांनी अनेक कलावंतांना हार्मोनियमची साथ संगत केली आहे. पं. जितेंद्र अभिषेकी, पं. आप्पासाहेब जळगावकर व पं. श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला आहे.

* **श्री. भरत हुमानाबादे :**

श्री. भरत हुमनाबादे यांचा जन्म ५ जून १९६५ साली झाला. त्यांनी बोळंगे गुरुजी व पं. रामदास अनवले यांच्याकडून संगीताची तालीम घेतली. १९९२ साली ते संगीत विशारद तर २००२ साली संगीत अलंकार ही परीक्षा उत्तीर्ण झाले. १९८६ ते २००२ पर्यंत त्यांना बोळंगे गुरुजींचा प्रदीर्घ सहावास लाभला. संगीताच्या प्रचारार्थ त्यांनी शारदा संगीत महाविद्यालय शिरूर अनंतपाळ येथे चार वर्षे संगीत अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर श्री. संत ज्ञानेश्वर संगीत महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी येथे संगीत अध्यापनाचे कार्य केले. ते पतियाला घराण्याची गायकी पेश करतात. मराठवाड्यातील अनेक ठिकाणी त्यांचे गायन झाले. त्यांना संगीताच्या शास्त्रात विशेष रस आहे. रवी किडिले, अरविंद मुगळे, राम करमुडे, हणुमंत करमुडे हे त्यांचे शिष्य संगीत विशारद आहेत. पं. बोळंगे गुरुजींच्या मृत्यूनंतर 'पं. के. एन. बोळंगे सेवाभावी संस्था खलंग्री' या संस्थेची स्थापना केली. याच संस्थेची एक शाखा वडवळ (ना) येथे 'वट्टसिद्ध नागनाथ संगीत विद्यालय' या नावाने चालविली जाते. त्या संस्थेचे संचालक म्हणून ते सध्या कार्यरत आहेत.

* **श्री. बाळासाहेब सूर्यवंशी :**

दि. १ जानेवारी १९६४ साली कामखेडा, ता. रेणापूर, जि. लातूर येथे बाळासाहेबांचा जन्म झाला. ते गायन व तबलावादनात विशारद आहेत. तर २००९ मध्ये ते संगीत अलंकार परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी संगीताचे शिक्षण पं. बोळंगे गुरुजी, पं. शिवदास देगलूरकर, पं. शांतारामजी चिगरी, श्री. बाळासाहेब गरड, श्री. शिवाजी कोडे, श्री. राम कुसंगे व पं. सतिशचंद्र चौधरी यांच्याकडून घेतले. युवा अवस्थेत त्यांनी लातूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा व औरंगाबाद शहरांमधून सांगीतिक स्पर्धेत सहभाग नोंदविला. लातूर, उदगीर, नांदेड, गंगाखेड, परभणी, सूरत, अंबाजोगाई, दीपनगर, भुसावळ या शहरातील सांगीतिक शिबीरात सहभाग नोंदविला. अ. भा. गांधर्व मंडळाचे ते १९९१

पासून परीक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर १९९९ पासून ते गांधर्व मंडळाचे केंद्र व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. २०१५ पासून ते गांधर्व मंडळाचे निर्वाचित सदस्य म्हणून सक्रीय आहेत. १९९७ साली त्यांनी संत ज्ञानेश्वर संगीत विद्यालयाची स्थापना गंगाखेड येथे केली. २००० पासून निवासी गुरुकुलातून ते संगीताचे अध्यापन करीत आहेत. अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना ते मोफत संगीताचे धडे देत आहेत. त्यांची दोन मुले स्वरचित व स्वरानंद हे संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत. बाळासाहेबांचे अनेक विद्यार्थी संगीताच्या व्यवसायात स्वतःच्या पायावर उभे आहेत. अशाप्रकारे ते ग्रामीण भागात राहून पं. बोळंगे गुरुजींचा वारसा चालवीत आहेत.

*     **श्री. विलास ग्यानबा धावणे :**

श्री. विलास धावणे यांचा जन्म १ जानेवारी १९५२ साली कामखेडा, ता. रेणापूर या गावी झाला. लहाणपणापासूनच त्यांना संगीताची आवड निर्माण झाली. १९७० साली त्यांचा पं. बोळंगे गुरुजींचा परिचय झाला. इ. १० वी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर बोळंगे गुरुजींनी त्यांना संगीताचे धडे दिले. १९८६ साली ते विशारद झाले. विशारद झाल्यानंतर लगेचच म्हणजे १९८७ साली रयत शिक्षण प्रसारक संस्था, माकडाचे उपळे येथे संगीत शिक्षक म्हणून रूजू झाले. ग्रामीण भागात अभिजात संगीताचा प्रचार व्हावा यासाठी त्यांनी बार्शी येथे वारकरी शिक्षण संस्था सुरू केली. यातून त्यांनी अनेक शिष्यांना संगीताचे धडे दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काही विद्यार्थी विशारद झाले आहेत. ते गांधर्व मंडळाचे परीक्षक म्हणूनही कार्यरत आहेत. ते शाळेतून सेवानिवृत्त झाले असून ते कामखेडा येथे संगीत प्रचार करीत आहेत.

*     **श्री. गुणवंत धोंडिराम बद्दे :**

चाकूरजवळील तिवट (घाळ) या छोट्याशा गावी ६ ऑगस्ट, १९६९ साली श्री. गुणवंत यांचा जन्म झाला. त्यांनी तबलावादनाचे शिक्षण पं. कोंडिबा बोळंगे गुरुजींकडून घेतले तर गायनाचे शिक्षण उ. शेख हन्नुमिया (भालकी) यांच्याकडून घेतले. ते तबला व गायनात विशारद आहेत. त्यांनी १९९० साली उदगीर येथे 'उदयगिरी संगीत विद्यालयाची' स्थापना केली. गांधर्व मंडळाच्या परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जवळपास २० विद्यार्थी संगीत विशारद झाले आहेत. संगीत विद्यालयाबरोबरच वाद्य दुरूस्ती-विक्रीचाही ते व्यवसाय करतात. पं. पलुस्कर व पं. भातखडे यांच्या पुण्यतिथी, गुरुपौर्णिमेनिमित्त ते संगीत मैफीलीचे आयोजन करतात. अशा प्रकारे ते



ग्रामीण भागात गायन-वादनाचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

*     **श्री. बाळासाहेब बाबासाहेब नरारे :**

बाळासाहेबांचा जन्म साखरा, ता. जि. लातूर येथे झाला. त्यांनी १९८६ पासून ते १९९२ पर्यंत पं. बोळंगे गुरुजींकडून गायनाचे शिक्षण घेतले. त्यानंतर प्रा. भनगडे (अहमदनगर) व पं. ना. वा. दिवाण (पुणे) यांच्याकडून काही काळ गायनाचे मार्गदर्शन घेतले. पुढे ते सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे १९९५ पासून स्थायिक झाले. तेथे नामदेवराव जगताप अध्यापक महाविद्यालयात संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी कमलाभवानी बहुउद्देशीय संस्था संचालित, सूरताल संगीत विद्यालय सुरू केले. त्यांच्या मागेपुढे कोणीही नसताना स्वहिमतीने संगीत विद्यालयातून संगीताचे शिक्षण देण्याचा त्यांनी ध्यास घेतला. त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. गावात कोणीही ओळखीचे नसल्याने त्यांना चार दिवस तर रूमच भाड्याने दिली नाही; परंतु पाचव्या दिवशी श्री. विश्वनाथ भणगे यांना विनंती केली व त्यांनी विद्यालयासाठी रूम देण्याचे मान्य केले कारण ते स्वतःही कलाकार होते.... करमाळा तालुक्याला संगीत क्षेत्रात उंचीवर नेण्याचे काम बाळासाहेबांनी केले आहे. त्यांच्या सततच्या चिकाटीमुळे व कष्टाळू वृत्तीमुळे आज शहरात अनेक विद्यार्थी संगीताचे विशारद झाले आहेत. नादविश्वात रमणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचे तालुक्याच्या संगीत क्षेत्रात चांगले योगदान आहे. ते अ. भा. गांधर्व मंडळाचे विशारदपर्यंतचे परीक्षा केंद्र चालवितात. गुरुपौर्णिमा, वर्धापनदिन, श्रावणसरी, पं. पलुस्कर व पं. बोळंगे गुरुजी यांच्या पुण्यतिथिनिमित्त तसेच प्रमाणपत्र वितरणाच्या निमित्ताने वर्षातून तीन-चार वेळा कार्यक्रम घेण्याचा उपक्रमही चालू असतो. त्यामुळे अनेक विद्यार्थी गायक-वादक झाले आहेत. या उपक्रमामुळे त्यांना करमाळा फेस्टिवल 'कलागौरव' पुरस्कार 'दिगंबर संगीत रत्न पुरस्कार' असे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सांगली, सातारा, सोलापूर, बीड, पुणे, नांदेड विद्यापीठ व औरंगाबाद विद्यापीठतूनही त्यांनी परीक्षक म्हणून कार्य केले आहे.

मातीच्या खाली स्वतःला गाडून घेणारे बिज जसे लाखोंच्या संख्येने पुन्हा प्रकटते तद्‌वतच आयुष्यभर दुसऱ्यासाठी कष्ट उपसणारे गुरुजी हे लाखोंचे पोशिंदे होते. त्यांनी हे व्रत आयुष्याच्या अखेरपर्यंत चालविले. त्यांनी चार तपांहून अधिक काळ दुसऱ्यासाठी व्यथित केला. पैसा व प्रसिद्धीची त्यांनी कधी अपेक्षा बाळगली नाही. अखंडपणे उपेक्षेच्या गर्तेत सापडूनदेखील कधी कुणावर राग व्यक्त केला नाही. 'अन्न, मान, धन। हे तो प्रारब्धा

आधीन।।' या संत तुकाराम महाराजांच्या वचनावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी आयुष्यात कधीही 'मानपान, सत्कार वा पदव्यांची' कधीही अपेक्षा केली नाही. असे असले तरी काही मान सन्मान त्यांना प्राप्त झाले ते पुढीलप्रमाणे.

०१. पं. बोळंगे गुरुजींच्या कार्याचा गौरव म्हणून ज्या स्वरानंद सासवड सरस्वती संगीत विद्यालयाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली त्या संस्थेच्या दशकपूर्ती सोहळ्यात त्यांचा दि. २४ फेब्रुवारी १९९६ साली पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या शुभ हस्ते भव्य सत्कार करण्यात आला.

०२. त्यांच्या षष्टब्दिपूर्तीनिमित्त १९९६ साली त्यांच्या जीवन कार्यावर एक स्मरणिका काढून प्रकाशित केली.

०३. १९८६ साली पुणे आकाशवाणी केंद्राच्या संचालिका डॉ. सुहासिनी कोरटकर यांनी बोळंगे गुरुजींची एक मुलाखत घेऊन केसरी वृत्तपत्रात प्रकाशित केली ज्यामुळे त्यांच्या कार्याचा परिचय उभ्या महाराष्ट्रातील रसिकांना झाला.

* **गौरवोद्‌गार**

०१. पं. बोळंगे गुरुजींची पुणे जिल्ह्यातील सारवड येथे मैफील चालू होती. त्यांच्या साथीसाठी पं. आप्पासाहेब जळगावकर हे होते. गुरुजींनी मंद्रसप्तकापासून तार सप्तकापर्यंत कशी काही तान घेतली की पं. आप्पा जळगावकर आश्चर्यमुग्ध झाले. ते थांबले व म्हणाले, "मी आजपर्यंत अनेक दिग्गजांना साथ केली तेव्हा हार्मोनियमवरील माझा हात थांबला नाही; परंतु आज बोळंगे गुरुजींनी माझ्या हाताला थांबविले."

०२. लातूर येथील जयजगदंबा नवरात्र महोत्सवात पं. बोळंगे गुरुजी गात होते. श्रोत्यांमध्ये पं. जगदिश प्रसाद हे थोर गायक होते. त्यांनी बोळंगे गुरुजींचे गायन ऐकले व नकळतच त्यांच्या तोंडून शब्द बाहेर आले "अरे हा तर छोटा जगदिश आहे."

०३. ते विविध गीतप्रकार सादर करीत असत तसेच अनेक वाद्येही वाजविण्यात ते पारंगत होते. त्यामुळे सर्वजण त्यांना 'अष्टपैलू कलावंत' म्हणून संबोधित असत.

०४. श्री. बोळंगे गुरुजी हे खुद्द सासवडचे नाहीत; परंतु ते एक उत्तम गायक आहेत. त्यांनी अनेक खेड्यांतील मुलांना संगीताचे मोफत शिक्षण देऊन घडविले.

**- पं. डॉ. ना. वा. दिवाण.**



०५. पं. बोळंगे गुरुजींनी संगीताच्या साधनेबरोबरच जीवन जगण्याचाही मार्ग दाखविला. असा महान संगीत प्रचारकाचा 'स्वरानंद - सासवड' ही संस्था षट्यद्बिपूर्तीचे औचित्य साधून भव्य सत्कार करत आहे ही अत्यंत उचित आणि खऱ्या अर्थाने गुरुजींच्या महान कार्याची दखल घेणारी अशी घटना आहे.

**- पं. यादवराज फड**

०६. माझ्यासारखा मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा मुलगा जगातील श्रीमंत अशा देशात अमेरिकेपर्यंत जाऊ शकला तो पं. बोळंगे गुरुजींमुळेच.

**- पं. पांडुरंग मुखडे**

**संगीत महासागरातील संताला देवाज्ञा :**

लातूर येथे संगीत विद्यालय चालू होते. तेव्हा त्यांच्या मनात काय आले कोणास ठाऊक? त्यांनी आपल्या काही शिष्यांना जवळ बोलावून घेतले व म्हणाले, "आताच्या आता एक ट्रक घेऊन या. मला माझी सर्व वाद्ये माझ्या गावी घेऊन जायची आहेत." शिष्यांना उलट प्रश्न विचारण्याची सोय नव्हती आणि समजा एखाद्याने प्रश्न विचारलाच तर गुरुजी दोन दिवस मौन ठेवायचे. त्यामुळे शिष्यांनी सर्व वाद्ये ट्रकमध्ये भरली व सर्व वाद्ये गावात आणली. त्यांनी शिष्यांना फर्मान सोडले, "मला शेतात शेड मारून द्या." गुरू आज्ञेनुसार शिष्यांनी शेतात दोनच दिवसांत शेड उभे केले. गुरुजींनी सर्व वाद्ये शेड मध्ये आणली. तेथे राहून दोन महिने शिष्यांना संगीताची तालीम दिली. कदाचित गुरुजींना त्यांचा मृत्यू दिसला असावा. म्हणूनच ते शेतात आले होते. त्या शेवटच्या दोन महिन्यांत शेताच्या या बांधावरून त्या बांधावर चकरा मारायचे. विविध राग आळवायचे, जणू काही हा त्यांचा त्या झाडा वेलींशी, फुलांशी व पशुपक्ष्यांशी शेवटचा संवादच चालू होता. त्याचे तंबोऱ्यावर जेवढे प्रेम होते तेवढेच प्रेम त्यांच्या शेतावर होते. ते नेहमी म्हणायचे, "माझे संपूर्ण आयुष्य लोकांच्या दारात गेले. मी जर खरेच देवासाठी भजन केले असेल आणि माझा खरा सूर लागला असेल तर माझे मरण माझ्या शेतातच येईल." आणि खरोखरच त्यांची इच्छा पूर्ण झाली. दि. ७ ऑगस्ट, २००२ या पवित्र दिवशी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. संगीताचा खरा साधक त्या निसर्गरम्य वातावरणात धरणीमातेच्या कुशीत कायमचा विसावला. खरोखरच त्यांचा सूर हा 'सच्चा सूर' होता, तो ईश्वरभक्तीत पावन झाला होता म्हणूनच त्यांचे मागणे ईश्वरानेही पूर्ण केले. अशा प्रकारे एक पवित्र व आध्यात्मिक सूर लोप पावला.

त्यांचा हा खडतर आणि तपस्वी जीवनाचा प्रवास पाहिला म्हणजे असे वाटते की, पं. विष्णू दिगंबर पलुस्करांच्या कार्याची परंपरा आणि त्यांचे कार्य युगानुयुगे चालत राहील यात शंकाच नाही. ज्यांनी दुसऱ्यासाठी आयुष्य खर्च केले, दुसऱ्याचे सुख-दु:ख पाहिले, स्वत:च्या प्रपंचाचा आणि मुलाबाळांचा कधीच विचार केला नाही, ज्यांनी स्वत:च्या जीवनात प्रत्येक श्वास स्वरांची उपासना करण्यासाठी व्यथित केला अशा थोर संगीत उपासकाच्या पुण्यतिथीला म्हणजेच श्रावण महिन्याच्या शिवरात्रीला संगीत सोहळ्याचे आयोजन करून त्यांना आदरांजली अर्पण केली जाते

♦ ♦ ♦



प्रकरण

५

# पं. शांतारामजी चिगरी



*　**जीवनवृत्त :**

अकाली आलेल अंधत्त्व... घरातील अठराविश्वे दारिद्र्य ...ऋषितुल्य गुरुजनांचा सहवास व परीसस्पर्श... अनेक दशकांची साधना... गायन-वादनात प्राप्त केलेली सिद्धता... शेकडो शिष्यांना दाखविलेल्या सुरेल वाटा... अंधत्त्वातून प्रकाशमान झालेलं आयुष्य.... हे सारं साध्य होऊ शकते ते केवळ एखाद्या सरस्वतीपुत्रालाच! ते सरस्वतीपुत्र म्हणजेच पं. शांतारामजी चिगरीगुरुजी. त्यांच्या कार्याचा, परिश्रमाचा, केलेल्या संघर्षाचा, दिलेल्या अग्निपरिक्षेचा व देदीप्यमान यशाचा आलेख खालीलप्रमाणे मांडता येईल.

पं. शांतारामजी चिगरी गुरुजींचा जन्म कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील खैनूर या छोट्याशा गावी सन १९३९ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव वीरगंट्टीआप्पा तर आईचे नाव वीरम्मा असे होते. त्यांच्या पोटी पाच अपत्ये जन्माला आली. त्यात तीन मुली व दोन मुले होती. गुरुजींचे आई-वडील शेतात मोलमजुरी करायचे. कमविणारे हात चार तर खाणारी तोंडे मात्र सात होती. घरात अठराविश्वे दारिद्र्य. पैशांची अडचण तर विश्वामित्रासारखीच होती. अनेक वेळा या कुटुंबाला पाणी पिऊनच दिवस काढावे लागायचे.

घरात कसल्याही प्रकारचा संगीताचा वारसा नव्हता, असे असले तरी चिमुकला शांताराम मंदिरात होणारी भजने ऐकत असताना तल्लीन व्हायचा. प्रत्येक सूर कानात साठवायचा, मंदिरात ऐकलेली भजने पुन:पुन्हा गुणगुणायचा. शांताराम जसजसा लहानाचा मोठा होऊ लागला. तसतसा तो तालासूरात अधिकच रमू लागला. परंतु गावात संगीत शिकण्याची सोय नव्हती. बाहेरगावी जाऊन शिकावे म्हटले तर घरात पैशांची वानवा होती.

घरात जरी आर्थिक चणचण असली तरी चिगरी कुटुंब मीठ-भाकरीत सुख मानून जगत होते. अशा या सुखी-समाधानी कुटुंबाला काळाची दृष्ट लागली. अचानक देवीची साथ आली. हे सुंदर व मनोहारी जग का असते हे पुरतेसे उमजण्याआधीच चिमुकल्या शांतारामचे डोळे अधू झाले. देवीच्या साथीने त्याचे डोळे हिरावून नेले. आता त्यांच्या आयुष्यात उरला होता काळाकुट्ट अंधार... या घटनेने त्याच्या जीवनात कायमचा काळोख पसरला. यासंदर्भात दै. लोकमतमध्ये 'माझे जीवनगाणे' या सदरात ते म्हणतात,"दृष्टी घेऊन जन्माला आलो होतो पण देवीच्या आजारामुळे वयाच्या ६व्या वर्षीच दृष्टी गेली नि जीवनात काळोख पसरला. आयुष्याच्या खडतर प्रवासाची सुरुवात झाली. परिस्थितीवर मात करून संगीताचे धडे आत्मसात केले. या सहवासात दृष्टीचाही विसर पडला अन् स्वतःचे आयुष्य सावरले."

जिथे उदरनिर्वाहासाठी पैसे नव्हते तिथे त्याच्या उपचारांसाठी कोठून पैसे येणार? त्या वेळेचे त्यांचे वय होते फक्त ६ वर्षे. पंडित विष्णू दिगंबर पलुस्करांचे जसे डोळे गेले आणि संगीत साधना हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय ठरले तद्वतच छोट्याशा शांतारामच्या जीवनात घडले. भलेही त्यांच्या दृष्टीपुढे काळोख पसरला तरी पुढे चालून संगीतरूपी प्रकाशाने त्यांचे आयुष्य उजळून निघाले. अगदी लखलखत्या दिव्याप्रमाणे !

गुरुजी ९ वर्षांचे असावेत. त्या वेळची ही गोष्ट आहे. शेजारचे चार-पाच मित्र त्यांच्याजवळ आले. त्यातील एक मित्र म्हणाला, "शांताराम चल आपण यात्रेला जाऊयात."

गुरुजी - "कोणत्या यात्रेला?"

मित्र - "ग्वालगीरच्या यात्रेला."

गुरुजी - "पण माझ्याकडे पैसे नाहीत."

मित्र - "पैशाची चिंता करू नकोस, आम्ही देतो तुला पैसे."

गुरुजी- 'पण मी काय करू यात्रेला येऊन? गिरक्या-फिरक्या घेणारे पाळणे, सुंदर सुंदर खेळण्या आणि नेत्रदीपक आतषबाजी पाहण्यासाठी माझ्याकडे डोळेही नाहीत.' गुरुजींनी खंत व्यक्त केली. पण मित्र पक्के होते. ते म्हणाले अरे, 'डोळे नसले म्हणून काय झाले? तिथे संगीताचे कार्यक्रम होतात ना? त्या कार्यक्रमाला आपण जाऊन मनसोक्त संगीत ऐकून येऊयात.'

संगीताचे नाव ऐकताच गुरुजी मोहरून गेले. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी होकार दिला. घरात कोणालाही न सांगता गुरुजी यात्रेला निघाले. खैनूरपासून १५ मैलांवर



असलेल्या ग्वालगीरकडे बैलगाडीत बसून स्वारी निघाली. मजल-दरमजल करीत ही मंडळी रात्री ग्वालगीर येथे पोहोचली. मित्रांनी घरूनच दशम्या बांधून आणल्या होत्या. त्या सोडल्या आणि त्याच्यावर यथेच्छ ताव मारला. दिवसभराच्या प्रवासाने ते थकले होते. जमिनीवर पाठ टेकताच ते कधी निद्राधीन झाले हे त्यांनाही कळले नाही.

सकाळी लवकर उठून ही मंडळी यात्रेत फिरू लागली. यात्रेतील प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहात होता. कोणी जादूचे खेळ पाहात होता, कोणी फुगे घेत होता तर कोणी शिट्टी, पिपाणी व डफली घेऊन वाजवीत होता परंतु चिमुकला शांताराम मात्र या आनंदाला पारखा होता. कारण ती सुंदर यात्रा पाहण्यासाठी ना त्याच्याजवळ डोळे होते, ना एखादी खेळणी घेण्यासाठी त्याच्या खिशात दोन पैसे होते. दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद मानून तो मित्रासमवेत फिरत होता. रात्री मात्र रामलीला, दशावतार इ.कार्यक्रमांतून सादर होणारे गायन ऐकून त्याला परमानंद व्हायचा. देहभान विसरायचा. कानाची ओंजळ करून ते स्वर कानांत साठवू लागला. सर्वांनीच दोन दिवस यात्रेचा मनमुराद आनंद लुटला. आता वेळ झाली होती ती गावाकडे परतण्याची. त्यामुळे सर्व मित्रमंडळी बैलगाडीकडे आली आणि अचानक यात्रेत कल्लोळ माजला. पळा, पळा म्हणून लोक ओरडू लागले. कोणी तरी म्हणाला, "यात्रेत बैलांच्या टक्करीची स्पर्धा चालू होती. त्यातील एक मस्तवाल बैल डरकाळ्या फोडीत दिशा सापडेल तिकडे पळत सुटला आहे." हे ऐकताच लोक भीतीच्या आकांताने सैरावैरा पळत सुटले. त्या धावपळीत शांतारामची आणि मित्रांची ताटातूट झाली. त्यानंतर बऱ्याच शोधाशोधीनंतरही त्यांची भेट होऊ शकली नाही. शांताराम हरवला या भीतीने मित्रांनी बैलगाडी जुंपली आणि खैनूरच्या दिशेने पळ काढला.

अथक परिश्रमानंतरही मित्र सापडत नाहीत, असे शांतारामच्या लक्षात आले. आता मात्र त्याचा बांध फुटला आणि तो ओक्साबोक्सी रडू लागला. पोटात भुकेचा डोंब उसळला होता तर दुसरीकडे जीवघेण्या थंडीने तो गारठून गेला होता. रस्त्याने जात असतानाच त्याच्यासमोर एक ट्रक उभा होता. मनाचा निग्रह करून त्याने चाचपडत चाचपडत ट्रकचा आसरा घेतला. त्या ट्रकमध्ये कापूस भरलेला होता. रक्त गोठविणाऱ्या थंडीत ऊबदार कापसामुळे त्याला हायसे वाटले. ट्रक कोठे निघाला आहे हेही त्याला माहीत नव्हते. दिवसभराचा प्रवास करून त्याचा जीव थकला होता. त्यामुळे त्या मऊ आणि ऊबदार कापसात तो आपसुकच झोपी गेला.

तो जेव्हा जागा झाला तेव्हा तो विजापूरच्या रेल्वे स्टेशनवर पोहोचला होता. ट्रकमधील

कापूस काढण्यासाठी जेव्हा तेथील मजूर आले तेव्हा त्यांना हा नऊ वर्षांचा चिमुरडा दिसला. त्यांनी विचारपूस केली, त्याने सर्व हकीकत त्यांना सांगितली परंतु आता इलाज नव्हता. ते त्याला खैनूरला पाठवू शकत नव्हते. त्यामुळे शांताराम रेल्वेस्थानकावर इकडे तिकडे फिरू लागला. भीक मागण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय नव्हता. हे होत असतानाच पोलिसांनी त्याला पकडले व त्याची रवानगी मुंबईच्या रिमांड होममध्ये केली.

रिमांड होममध्ये चार दिवस पोलिसांनी शांतारामला ठेवून घेतले. त्यानंतर त्यांनी त्याला दादरच्या अंधशाळेत प्रवेश मिळवून दिला. शालेय शिक्षणास प्रारंभ झाला. परंतु शिक्षण घेण्यास भाषेची अडसर येऊ लागली. कन्नड भाषेशिवाय त्याला भाषा येत नव्हती. त्यामुळे पहिल्याच चाचणी परीक्षेत त्याला सर्वच विषयांत भोपळा मिळाला. ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. त्याच शाळेत उडपी आणि कारवारचे काही विद्यार्थी होते. त्यांनी शांतारामला मराठी व हिंदी भाषा शिकविण्यास प्रारंभ केला. कुशाग्र बुद्धिमत्ता असल्यामुळे त्याने अल्पावधीतच या भाषेवर प्रभुत्त्व मिळविले. ब्रेल लिपीच्या माध्यमातून शांतारामने ६ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षणाबरोबरच त्यांना संगीताचेही शिक्षण दिले जायचे. शाळेत भालेकर मास्तर व प्रमोदिनी मॅडम संगीताचे धडे देऊ लागले. बालपणापासूनच संगीताची आवड असल्यामुळे चिमुकला शांताराम संगीतातच अधिक रमू लागला.

संगीतातील एखादा गीतप्रकार शिकायचा म्हटले तर आयुष्य पुरत नाही. परंतु गुरुजींच्या कार्यावर नजर फिरविता आपणास थक्क व्हायला होते. ग्वाल्हेर गायकीची अस्सल गायकीवर चिंतन करून त्यांनी आपली स्वतंत्र गायकी निर्माण केली. भावगीत, नाट्यगीत, मराठी व कानडी भजने आदी गान प्रकारांत त्यांचा हातखंडा आहे. एवढेच नव्हे तर फरूखाबाद, बनारस व दिल्ली घराण्यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या तबलावादनातून दिसून येतो. तबल्याबरोबरच पखावज, ढोलक, ढोलकी, दिमडी, ढोल इत्यादीचर्मवाद्ये व व्हायोलीन, सतार, बुलबुल ही तंतुवाद्ये गुरुजी लीलया वाजवितात. हार्मोनियम, बासरी व सारंगी (माऊथ ऑर्गन) ही वाद्ये वाजविण्याची कला त्यांना अवगत आहे. ही सर्व वाद्ये एकाच माणसाने वाजविणे हे येड्या-गबाळ्याचे काम नव्हे. या पाठीमागे एखादी ईश्वरीशक्तीच असावी लागते. म्हणून 'कलावंत हा जन्मालाच यावा लागतो' ही उक्ती इथे सार्थ ठरते.

अगदी सुरुवातीच्या काळापासूनच गुरुजींचा स्वभाव कडक शिस्तीचा होता. ते अत्यंत रागीट होते. शिष्याच्या गळ्यातून चुकीचा स्वर लागला अथवा हातातून चुकीची जागा निघाली तर ते हातोडी फेकून मारायचे परंतु काळानुरूप त्यांच्या स्वभावात कमालीचे



परिवर्तन झाले आहे. १९८८ पासून मी गुरुजींना पाहतोय. तेव्हा माझ्या असे लक्षात येते की, त्यांचा स्वभाव हा बाहेरून टणक व आतून मृदू आहे एवढे मात्र निश्चित. त्यांनी कधीही स्वाभिमान विकला नाही. अगदी सुरुवातीपासून आजपर्यंत कितीही बिकट प्रसंग आला तरी 'मोडेन पण वाकणार नाही' हाच बाणा त्यांनी कायम ठेवला. ना कधी लाचारी पत्करली, ना कधी राजकारणात गेले. पैशासाठी कधीही मैफीली केल्या नाहीत. १९७४ पासून पहाटे चार ते रात्री १० वाजेपर्यंत त्यांच्या घरात स्वर निनाद राहिला. चार घरचे हवसे, गवसे, नवसे विद्यार्थी त्यांच्यासमोर आले. पण त्यांनी शिकविण्याचा कंटाळा कधी केला नाही. वाद्ये कितीही मधुर असली तरी सतत वाजत राहिल्यामुळे डोके फुटून जाण्याची वेळ येते पण त्यांनी त्याचा कधीही त्रागा केला नाही. यातून त्यांच्या सोशिकतेचे दर्शन घडते. गुरुजींच्या स्वभावाबद्दल पं. विकास कशाळकर म्हणतात," चिगरीबुवांचा आणखी एक गुण नमूद करणे आवश्यक वाटते तो म्हणजे त्यांच्या कलेतील प्रामाणिकपणा आणि स्पष्टवक्तेपणा. त्यामुळे जरी काही लोकांमध्ये ते अप्रिय असले तरी विद्वान लोकांमध्ये त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. चांगल्या गोष्टीला दिलखुलासपणे दाद द्यायला मनाचा मोठेपणा लागतो. याउलट एखादा नवोदित कलाकार छान गायला तर बुवा त्याची मुक्त कंठाने ते प्रशंसा करतात तसेच रागाची शुद्धता किंवा वादनात उणिवा जाणवल्या तर ते स्पष्टपणे सांगतात. त्यामागे कलाकाराचा उत्कर्ष व्हावा व कलेची उंची वाढावी ही भावना असते."

गुरुजींचे ज्येष्ठ शिष्य श्री. केशवराव सूर्यवंशी म्हणतात, "गुरुजींमध्ये प्रचंड उत्साह असायचा. डोळ्यांनी अंध असले तरी ते कुणावरही अवलंबून नसायचे. त्यांना उगीचच केलेली कीव अजीबात आवडत नसे. सतत आम्ही चार-पाच विद्यार्थी त्यांच्यासोबत राहात असू. त्यांना पहाटे उठायची सवय. पहाटे लवकर उठून आम्ही नदीवर स्नानाला जायचो. आम्ही दोघे तिथे कुस्तीही खेळायचे. त्यांना कुस्तीतले डावपेच चांगलेच माहीत होते."

गुरुजी उत्तम घोडेस्वारही होते. यासंदर्भात पं. जे. एम. कळसने लिहितात, "गुरुजींना घोडे पाळायची आवड होती. अर्थातच त्यासाठी लागणारी अश्वपरीक्षादेखील अवगत होती. ते अश्वपरीक्षा शास्त्र त्यांनी मला समजावून सांगितले. मी सहदेव-भाडळी या पुस्तकात हे शास्त्र वाचले होते. त्या सिद्धताच्या कसोटीवर वापर कसा करायचा याच्या स्वानुभवातील गोष्टी गुरुजींनी सांगितल्या. त्यांच्या पूर्वपरीक्षेला उतरलेल्या घोड्याचे पिल्लू ते विकत घेऊन त्याला स्वत: खुराक देऊन चालायला शिकवीत असत. तो मोठा झाल्यावर गुरुजी खेड्यापाड्यांत शिकवायला जात असत. गुरुजी घोड्यावर उभे राहूनदेखील घोडा दामटीत असत. कोठे झाडाच्या फांद्या आल्या, रस्त्यात असलेल्या वळणावर घोडा हळू कसा

करायचा हे दिव्य दृष्टीशिवाय अंध असलेल्या माणसाला कळणे शक्य नाही. ज्यांनी घोड्याला चाल व ताल शिकविला त्यांचा मानवदेही विद्यार्थी तयार नाही झाला तरच नवल!"

गुरुजींचे जीवन संगीतासाठी कसे सर्मर्पित आहे यासंदर्भात प्रा. एच. जी. जोशी म्हणतात, " गुरुकुल पध्दती व नव्या शिक्षण पध्दतीचा समन्वय राखून ज्ञानदानाचे हे सत्र निरंतर सुरू आहे. प्रकृतीच्या कणाकणांत ओतप्रोत भरलेल्या संगीताची अनुभूती आपल्या रोमारोमांत भिनलेली आहे. संगीत हाच श्वास आणि संगीत हाच ध्यास हीच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानून कलेचा व्यास वाढविण्यातले आपले समर्पण आम्हा कला साधकांच्या मध्ये एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण करते."

गुरुजींच्या निःस्वार्थीपणाबद्दल रंगकर्मी शैलेश गोजमगुंडे लिहितात, "ठरवले असते तर ते पैसाही भरपूर कमावू शकले असते पण रागदारीत जगणाऱ्याला, ताला-सूरात रमणाऱ्याला अर्थाचा लोभ नसतोच कधी. आज महाराष्ट्रभर पसरलेला त्यांचा शिष्यांचा गोतावळा हीच त्यांची खरी कमाई आहे. पैसा गुरुजींच्या सोबत संपला असता पण जी कमाई गुरुजींनी आयुष्यभर केली ती त्याच्या हयातीतच नव्हे तर त्यांच्यानंतरही कित्येक वर्षे खर्च होणारी नाही. उलट त्यात वाढच होणार आहे."

शून्यातून विश्व निर्माण केल्यामुळे ते कायम जमिनीवरच राहिले. गरिबी काय असते याची जाणीव असल्यामुळे त्यांनी कधीही उधळपट्टी केली नाही. नेहरू शर्ट व पायजामा हाच त्यांचा पोशाख. कार्यक्रमासाठी भपकेबाज कपडे घालावेत असे त्यांना कधीही वाटले नाही. शिष्यांच्या आग्रहाखातर कधी तरी जाकीट घालतात. नाही तर तेही घालण्याचा कंटाळा करतात. पांढऱ्याशुभ्र केसांची मानेवर लोंबणारी आयाळ व लांब मिशा त्यांना शोभून दिसतात. आदर्श कॉलनीत विद्यालय असताना त्यांच्याकडे कोणतेही वाहन नव्हते. त्यामुळे ते आदर्श कॉलनी ते गंजगोलाईपर्यंत पायीच फिरायचे. नंतर बजाज एम. एटी. हे दुचाकी वाहन घेतले. पुढे चालून चार चाकी गाडीही आली. तरीही चालण्याची आस त्यांनी सोडली नाही. मिरची भजे व अर्धा कप चहा मिळाला की त्यांना परमानंद होतो. किमाम पुदीना सादा पान त्यांना मनस्वी आवडते.

एका यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते. त्याप्रमाणेच गुरुजींच्या आयुष्यात त्यांची पत्नी शकुंतलादेवी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. गुरुजींच्या सुख-दुःखात खऱ्या अर्थाने अर्धांगिनी होण्याची भूमिका बाईंनी पार पाडली. शिष्यांची स्वरसाधना असो की तबल्यातील



बोलाची स्पष्टता असो. त्याकडे बाईंनी कमालीचे लक्ष दिले. विद्यालयाबरोबरच सर्वशिष्यांना संगीताबरोबरच संस्कार व शिस्तीचे धडे त्यांनी दिले. मोडून पडलेल्या संसाराला त्यांनी भक्कम आधार दिला. वास्तविक पाहता ज्या अंध दांपत्यांना एखाद्या पोटच्या पोराची आवश्यकता होती परंतु दैवाने त्यांची क्रूर थट्टा केली होती. त्यांच्या संसारवेलीवर कळी उमलू शकली नाही. असे असले तरीही त्यांनी याची कधीही खंत वाटून घेतली नाही.

गुरुजी-बाईंचा सुखाचा संसार चालू असतानाच त्यांना काळाची दृष्ट लागली. नियतीने डाव साधला अन् बाईंना कॅन्सर झाला. त्यांना मरणप्राय यातना सहन कराव्या लागल्या. हे पाहून गुरुजींचा जीव कासावीस झाला. मात्र समोर मृत्यू दिसत असतानाही बाई अत्यंत धीराने व संयमाने मृत्यूशी झुंज देत होत्या.

त्या दिवशी बाईंची प्रकृती अधिकच खालावली होती. त्यामुळे त्यांना रूग्णालयात दाखल केले. आम्ही गुरुजींच्या घरी जमलो. गुरुजी घरीच होते आणि अचानक फोन आला. बाई गेल्या.... अखेर काळाने बाईंवर झडप घातली. हे ऐकून गुरुजींच्या पायाखालची वाळू सरकली. त्यांच्या ओठांतून शब्द फुटेना. त्यांचा कासावीस झालेला चेहरा व त्यांच्या जिवाची घालमेल आजही मला आठवते. बऱ्याच वेळांनी दाटून आलेल्या त्यांच्या कंठातून शब्द बाहेर आला, "पोरांनो, मास्तर गेली.... आता मला या जगात कोणीच उरले नाही... आणि सारा सूरताल परिवार धाय मोकलून रडू लागला. तो दिवस होता रविवार, दिनांक ६ जुलै २००८! गुरुजींच्या बरोबर मांडलेला सारीपाटाचा डाव अर्ध्यावरच सोडून त्या निघून गेल्या.... कायमच्या. परत कधीही न येण्याच्या रस्त्याला. आयुष्यभर पोटाला चिमटा देऊन चार पैसे जमा केले पण त्याचा उपभोग न घेताच बाई निघून गेल्या. स्वरविश्वात विलीन झाल्या."

अशा प्रकारे पं. शांताराम चिगरीगुरुजींनी अथक परिश्रमाने यशाची परिसीमा गाठली. यश-अपयशाला गिळून स्वाभिमानाने जीवन जगण्यास सज्ज झाले. स्वतःचे जीवन तर संगीतमय केलेच परंतु जवळ येणाऱ्या पांथस्थास ओंजळ भरून संगीताचे ज्ञानामृत पाजविले.

* **गुरू आणि शिक्षण :**

पं. शांताराम चिगरी गुरुजींनी मिळालेले ज्ञान गायन-वादनाद्वारे सर्व रसिकांपर्यंत पोहोचविले. स्वतः अंध असूनही त्यावर मात करीत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटकात अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

ग्वाल्हेर घराण्याची परिपक्व व वैशिष्ट्यपूर्ण गायकी गुरुजींच्या सादरीकरणातून

व शिकविण्यातून दिसून येते. गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी महाराष्ट्रात आणून प्रचलित केलेली व त्यांचे पट्टशिष्य पं. पलुस्कर यांच्या शिष्यपरंपरेतून आलेली गायकी गुरुजींनी आत्मसात केलेली आहे. पं. नारायणराव व्यास, पं. विनायकबुवा पटवर्धन, पं. ओंकारनाथ ठाकूर हे पलुस्करांचे शिष्य असलेले दिग्गज गुरू गुरुजींना लाभलेले होते. या तिघांच्या गायकीचे मिश्रण गुरुजींच्या गायनात दिसून येते. गुरुजींची षडज लावण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण पद्धत आहे. गुरुजींनी लावलेला षडज तानपुरा व हार्मोनियमच्या षडजाशी अगदी एकरूप होतो. स्वच्छ आकारयुक्त, खुला व स्थिर आवाज ही गुरुजींच्या षडजाची खासीयत आहे. मैफीलीत गाताना गुरुजींनी सुरुवातीला लावलेल्या दोन-तीन स्वरामध्येच रागाचे स्वरूप स्पष्ट दिसून येते. सुरुवातीच्या विस्तारापासून ते ख्याल गायन संपेपर्यंत गुरुजी रागाची रंजकता कधीच कमी होऊ देत नाहीत याउलट रंजकता अधिक वाढेल अशी दर्जेदार व उच्च कल्पनाशक्तीची मांडणी गुरुजी आपल्या गायनात करतात. गुरुजी आकारयुक्त आलापला अधिक प्राधान्य देतात. अंतऱ्याचे आलाप करताना इकारात षडज लावण्याची गुरुजींची पद्धत अत्यंत आकर्षक व मनभावक वाटते. बोल आलाप, बोलताना, बेहलावे, विशिष्ट अंगाने सरगम, गमकयुक्त ताना या गोष्टींचा, लयकारीच्या विविध अंगाने मर्यादित व आकर्षक स्वरूपात गुरुजी उपयोग करतात. कर्नाटक शैलीचाही प्रभाव गुरुजींच्या गायकीत दिसून येतो. हंसध्वनी, बिभास, कलावतीसारखे राग विद्यार्थ्यांना शिकविताना कर्नाटक गायकीचीही झलक गुरुजी दाखवीत असतात. मैफीलीत गाताना असो की विद्यार्थ्यांना शिकविताना, कोणत्याही प्रकारचे अंगविक्षेप, हातवारे, तोंड व जबडा हलवणे असे दोष गुरुजींच्या गायनात कधीच दिसून आले नाहीत. गुरुजींच्या साधेपणा व सहजता असलेल्या गायनातून रसिक श्रोते व विद्यार्थ्यांना अलौकिक आनंदाची पर्वणी मिळत असते.

गुरुजींच्या तबलावादनात बनारस, दिल्ली व फरूखाबाद या घराण्यांचा त्रिवेणी संगम झाल्याचे दिसून येते. किंबहुना या तीन घराण्यांच्या वादनशैलीचा अभ्यास करून त्यांनी स्वतंत्र 'चिगरीबाज' निर्माण केला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अखंड रियाजातून साधलेले दायाँ-बायाँचे संतुलन अतुलनीय आहे. तबलावादनातील मिठास वर्णनातीत आहे. गायन-वादन करताना पाठीचा कणा ताठ ठेवूनच सादरीकरण करतात. लयकारीवरील प्रभुत्त्व, स्पष्टता व सहजता या गोष्टी त्यांच्या रोमरोमांत भिनलेल्या आहेत. विविध चर्मवाद्ये वाजवीत असताना त्या-त्या वादनशैलीनुसारच वादन करतात. अशा या गायन-वादन शैलीने अगदी लहानपणापासूनच गुरुजींनी भारतीय अभिजात संगीताचा



प्रचार व प्रसार केला.

आयुष्यातील सुखद आठवणी सांगताना गुरुजी सांगतात. एकदा थोर सतारवादक पं. रविशंकर यांचा तबलावादक काही कारणास्तव येऊ शकणार नव्हता. त्यामुळे पं. रविशंकर अंध शाळेच्या वसतिगृहावर आले. त्यांनी तेथील व्यवस्थापकाकडे तबलावादकाविषयी चौकशी केली. तेव्हा त्या व्यवस्थापकने त्यांना संगीत कक्षात नेले व लहानग्या शांतारामकडे बोट दाखवून म्हटले, 'हा तबलावादक चालेल का?' त्यावेळी गुरुजींचे वय केवळ १४ वर्षे होते. त्यावर पंडितजी म्हणाले, 'यह क्या तबला बजायेगा? और कैसी करेगा मेरी साथी?' असे म्हणत त्यांनी तेथील सतार घेतली व ते वाजवू लागले. तेव्हा शांतारामने तबल्यावर दमदार ठेका धरला. एक-दोन आवर्तनातच पं. रविशंकरजी अत्यानंदित झाले व छोट्या शांतारामकडे पाहात म्हणाले, 'यह तबलावादक मुझे चलेगा।'

त्याच दिवशी मुंबईतील काळवादेवी मंदिराच्या सभागृहात जगप्रसिद्ध सतारवादक पं. रविशंकर यांची साथ केली. त्या दिवशी त्यांनी केलेली साथसंगत इतकी अद्वितीय झाली की, गुरुजींची त्रितालाची द्रुत लय पाहून पंडित रविशंकर भारावून गेले. ते श्रोत्यांकडे पाहण्याऐवजी चौदा वर्षांच्या छोट्या शांतारामकडे पाहू लागले. त्या दिवशी श्रोत्यांकडून मिळालेली दाद व टाळ्यांचा कडकडाट आजही गुरुजींच्या कानात निनादतो आहे. खरोखरच हा क्षण गुरुजींच्या आयुष्यात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखाच आहे.

दादरच्या अंधशाळेचे प्राचार्य तरुणकुमार घोषाल हे संगीतप्रेमी होते. उन्हाळ्याच्या सुटीत ते थोर कलावंतांना बोलावून मैफील आयोजित करायचे. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ती एक अपूर्व पर्वणीच असायची. असेच एकदा मेहेर घराण्याचे थोर संगीत तज्ज्ञ उ. अल्लाउद्दीनखाँ साहेबांना निमंत्रित केले होते. त्यांनी पं. रविशंकर, पं. पन्नालाल घोष, उ. अलीअकबरखाँ व अन्नपूर्णादेवी असे थोर वादक निर्माण करून भारतीय संगीताला मोलाचे योगदान दिले. ते जेव्हा अंधशाळेत आले तेव्हा त्यांना तबल्याची संगत करण्याचा योग पं. शांतारामजींना आला. पं. शांतारामजींच्या साथीवर उ. अल्लाउद्दीन खाँ बेहद खुश झाले. ते जेव्हा मेहेरला गेले तेव्हा त्यांनी गुरुजींसाठी एक जाकीट शिवून पाठविले. ते जाकीट त्यांनी १० वर्षे वापरले. शाळेत त्रैमासिक जलसा व्हायचा. त्यात एकदा थोर गायिका जतिका रॉय यांच्या भजनाचा कार्यक्रम झाला. त्यांनाही तबल्याची साथ त्यांनी केली. त्यांना शांतारामजींची साथ आवडली. त्यामुळे महिन्यातून दोन वेळेस ते कलकत्त्याला जायचे व जतिका रॉय यांची साथसंगत करायचे

१९५४ साली गुरुजींनी शाळा सोडली. चरितार्थ चालविण्यासाठी नोकरीची आवश्यकता होती. अशातच मुंबई आकाशवाणीचे संचालक श्री. जोशी यांची आणि गुरुजींची भेट झाली. गुरुजी वाद्ये उत्तम जुळवितात हे पाहून त्यांनी मुंबई आकाशवाणी केंद्रात नोकरी दिली. सुरुवातीला त्यांनी त्यांना वाद्ये सूरात लावून देण्याचे काम दिले. त्यांच्या कामावर खुश होऊन श्री. जोशी यांनी गुरुजींना म्युझिक प्रोड्युसरची नोकरी दिली. या कामासाठी त्यांना रोज ३ रुपये मिळायचे. आकाशवाणी केंद्रावर अत्यंत विद्वान कलावंत यायचे. त्यांचा फायदा गुरुजींना झाला. त्यांची बहुविध कला पाहून अनेक कलावंतांनी त्यांना तबला व हार्मोनियमची साथ करण्याची संधी दिली. तत्कालीन ठुमरी गायिका गोहराजान यांच्याबरोबर तबल्याची साथसंगत केली. बेगम अख्तर यांच्या जवळपास १५ रेकॉर्डिग वाजविल्या. एवढेच नाही तर थोर गायिका नूरजहाँ यांच्यासमवेत २३ कार्यक्रमात साथ केली. श्री. जोशी आकाशवाणी केंद्रावरून निवृत्त झाले. त्यानंतर मात्र गुरुजींचे मन रमले नाही. त्यामुळे त्यांनी आकाशवाणीची नोकरी सोडून दिली.

आकाशवाणी केंद्रावर नोकरी करीत असतानाच ज्या कुटुंबीयाने भारतीय रसिकांवर मोहिनी घातली त्या मंगेशकर कुटुंबीयांचा आणि गुरुजींचा अत्यंत जवळून संबंध आला. त्यांचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर, उषा, मीना व हृदयनाथ मंगेशकरांशी नेहमीच वार्तालाप व्हायचा. केवळ वार्तालापच नव्हे तर लता दीदीसमवेत आशा भोसले वगळता सर्वच भावंडांना त्यांनी तबला व ढोलकची साथ दिली. गुरुजींच्या वादनाचा लाभ चित्रपट संगीतकारांनीही घेतला 'हमदर्द', 'अलबेला' या हिंदी व 'साखरपुडा' या मराठी चित्रपटात त्यांनी तबला व ढोलकची साथसंगत केली. लता दीदीचा ईश्वरीय आवाज आणि गुरुजींची मधुर साथ हा दुग्धशर्करा योगच होता. ही गाणी आजही भारतीय रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवीत आहेत. गुरुजींच्याच भाषेत बोलायचे झाले तर, "मी म्हातारा झालो पण ती गाणी आजही चिरतरुण आहेत." पं. अण्णासाहेब गुंजकरांनी नांदेड येथे मराठवाडा संगीत संमेलनाचे आयोजन केले. ज्या संगीत संमेलनासाठी नभोवाणी मंत्री बाळकृष्ण केसकरांनी मोलाचे योगदान दिले होते. त्या संमेलनात गुरुजींना स्वतंत्र तबलावादन करण्यासाठी निमंत्रित केले. गुरुजींनी अप्रतिम तबलावादन सादर करून रसिकांची मने जिंकली. एवढेच नाही तर थोर व्हायोलिनवादक पं. गजाननबुवा जोशी व माणिक वर्मा यांना तबल्याची साथ केली. त्यांच्या साथीमुळे संमेलनात चांगलाच रंग भरला. अल्पावधीतच गुरुजींच्या कलेचा सुगंध संपूर्ण मराठवाड्यात पसरला. या संगीत संमेलनाच्यासंदर्भात पं. शिवदास देगलूरकर यांनी म्हटले आहे की, "गुरुजींच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्यावर



लिहिताना अजून एक प्रसंग सांगण्याची मला गरज वाटते. मराठवाड्यातील पहिले संगीत संमेलन १९५५ ला नांदेड येथील लिबर्टी टॉकीजमध्ये झाले होते. त्यात गुरुजींच्या बालवयातील तयारीचे तबलावादन ऐकून माझे वडील तालमर्तंड रंगनाथबुवा देगलूरकर यांनी विशेषत्त्वाने पाठ थोपटून आशीर्वाद दिल्याचे स्वतः गुरुजींनी मला सांगितले."

गुरुजींच्या साथसंगतीबाबत श्री. दिपक लिंगे लिहितात, "इ. स. १९७० रोजी मिरज येथे अब्दुल करीम खाँ यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेलो होतो. तेव्हा तीन दिवसांचा संगीतमहोत्सव आयोजित केला होता. भारतातील विविध कलाकारांनी आपली सेवा रसिक श्रोत्यांसमोर सादर केली. रसिकांना फार मोठी पर्वणी या दिवसात मिळत असे. समारोपाच्या दिवशी रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी संगीतकार श्री. राम कदम यांचे क्लोरोनेट वादन झाले. त्यानंतर पं. बसवराज राजगुरू यांचे गायन झाले. त्यानंतर एक वृद्ध व्यक्तिमत्त्व व्यासपीठावर आले व मला त्यांच्यासोबत हार्मोनियम साथीसाठी बसविण्यात आले. तबल्याच्या साथीसाठी गॉगल घालून एक व्यक्ती आले होते. बुवांनी (म्हणजे बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी) बिलावल आलापी सुरू केली व विलंबित बंदिश 'दैंया कहाँ गयो' बोल कानावर पडले आणि गॉगल घातलेल्या व्यक्तीने एक तुकडा घेऊन 'धा' टाकला तोच टाळ्यांचा कडकडाट झाला ती व्यक्ती म्हणजे पं. शांताराम चिगरी गुरुजी. त्यानंतर कपिलेश्वरी यांनी मध्य लयीमध्ये अल्हैया बिलावलमधील 'कवन भटरिया गईलो माई' ही तीनतालातील बंदिश सादर केली. त्यासोबत चिगरी गुरुजींनी तबल्याचा असा ठेका धरला की, पहिला 'धा' संपून दुसरा 'धा' येईपर्यंत पहिल्या 'धा' ची आस गुंजन करीत होती."

पं. शांताराम चिगरी यांनी अभिजात संगीताची गंगा घराघरापर्यंत पोहोचावी यासाठी सूरताल संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून गुरुपौर्णिमा, पं. वि. दि. पलुस्कर समारोह, पं. भातखंडे पुण्यतिथी, कोजागरी पौर्णिमा, सूरताल उत्सव याचे औचित्य साधून विविध सांगीतिक उपक्रमांचे आयोजन केले. अशा या संगीत समारोहातून आजपर्यंत अनेक कलावंतांनी हजेरी लावली. यात पं. अनिंदो चटर्जी, उ. उस्मान खाँ, पं. मोहन दरेकर अशा अनेक कलावंतांना बोलावून त्यांच्या मैफीली घडवून आणल्या. त्यामुळे लातूर जिल्हा व परिसरातील रसिकांची तृष्णा शमली. अशा सांगीतिक उपक्रमांचा लेखा-जोखा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

दि. २५ जुलै १९९८ साली डॉ. विकास कशाळकर (पुणे), अश्विनी यजुर्वेदी (कोल्हापूर), स्वाती कुमठेकर (बीदर) यांचे गायन व सतार वादनाचा कार्यक्रम श्री. केशवराज विद्यालयात गुरुपौर्णिमा समारोह संपन्न झाला.

असाच एक गुरुपौर्णिमा संगीत समारोह लातूरकरांच्या कायम स्मरणात राहिला ज्यात डॉ.चारूशिला दिवेकर, पं. शाम गुंजकर, पं. चिदानंद जाधव (सुंद्रीवादन) यांनी आपली कला सादर केली. हा समारोह लातूर येथील पूर्णानंद मंगल कार्यालयात दि. २२ जुलै २००० रोजी संपन्न झाला. पं. पलुस्करांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी अनेक संगीत महोत्सवाचे आयेजन केले.

यासंदर्भात दै. संचार या वृत्तपत्रात लिहिले आहे, "पं. वि. दि. पलुस्कर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून सूरताल संगीत महाविद्याच्या वतीने संगीतोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या संगीतोत्सवात ज्येष्ठ गायिका पं. पद्मा तळवलकर यांचे गायन आणि जगप्रसिद्ध बासरीवादक पं. रोनू मजूमदार यांच्या बासरीवादनाने रसिकांची मने जिंकली. पं. पलुस्कर संगीतोत्सवाने रसिकांची मने जिंकली. हा संगीतोत्सव दि. २१ ऑगस्ट २०१४ रोजी नगर परिषद सभागृहात झाला."

सौ. शकुंतलादेवी चिगरी यांच्या निधनानंतर गुरुजींनी स्व. शकुंतलादेवी चिगरी प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानला गुरुजींचे शिष्य शरद सूर्यवंशी, बालाजी सूर्यवंशी, मुकुंद कुलकर्णी, हेमंत सास्तुरकर, शिरीष देशपांडे यांनी मोलाचे योगदान दिले. या प्रतिष्ठानच्या वतीने दि.२३ जानेवारी २०१० रोजी पहिली मैफल घेण्यात आली. यात विश्वविख्यात पखावजवादक पं. भवानी शंकर व पं. मुकेश जाधव यांची पखावज व तबला जुगलबंदी झाली. भोपाळ येथील शाश्वती मंडल यांचे शास्त्रीय गायन सादर झाले. याच वर्षी दि.२१ ऑगस्ट रोजी पुण्यतिथीचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सारंगीवादक उ. दिलशाद खाँ यांचे सारंगी वादन व पं. मुकेश जाधव यांचे तबला जुगलबंदी झाली. दगडोजीराव सभागृहात पार पडलेल्या या संगीतोत्सवास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

२०११ साली याच प्रतिष्ठानच्या वतीने कथ्थक व तबला जुगलबंदीचे आयोजन केले. यासंदर्भात दै. सामनामध्ये आवाहन करण्यात आले,"स्व. शकुंतलादेवी चिगरी प्रतिष्ठान व सूरताल संगीत महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पं. वि. दि. पलुस्कर संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात बनारस घराण्याचे तबलावादक पं. अरविंदकुमार आजाद यांचे तबलावादन होणार आहे. या वेळी आसावरी पाटणकर (पुणे) कथ्थक नृत्य सादर करणार आहेत. या निःशुल्क मेजवानीचा लाभ घेण्याचे आवाहन पं. शांतारामजी चिगरी यांनी केले आहे." अशा प्रकारे पं. चिगरी गुरुजींनी अनेक संगीतमहोत्सवाचे आयोजन करून लातूरकरांना मंत्रमुग्ध केले.



*  **स्पर्धा :**

पं. शांताराम चिगरी गुरुजींनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा, नवोदित कलावंतांच्या कलेला मुक्त व्यासपीठ मिळावे यासाठी संगीत स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धांचा सर्वदूर प्रचार व्हावा यासाठी संगीत कलाविहार या मासिकातून जाहीर आवाहन करण्यात आले. अखिल भारतीय साहित्य कला अकादमी आणि सूरताल संगीत महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. शकुंतलादेवी चिगरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भव्य राज्य स्तरीय शास्त्रीय संगीत स्पर्धा दि. १७ जुलै २०१० रोजी लातूर येथील नगर परिषदेच्या सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाल्या. यात शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवादन, शास्त्रीय नृत्य, सुगम संगीत या ४ प्रकारात आणि बालगट व प्रौढगट अशा दोन गटांत स्पर्धा झाल्या. या स्पर्धेच्या संयोजनाची जबाबदारी पं. शांतारामजी चिगरी यांनी समर्थपणे पेलली.

राज्य स्तरीय शास्त्रीय संगीत स्पर्धेच्या समारोप प्रसंगी परीक्षकांसोबतच पं. शांतारामजी चिगरी गुरुजींचे गायन होत असे. यासंदर्भात दै. सकाळ वृत्तपत्रात वर्णन केले आहे, "या स्पर्धेची सांगता पं. शांतारामजी चिगरी यांच्या पूरिया केदार व भैरवीतील 'जोगी मत जा' या बंदिशीने झाली. त्यांच्या गायनाने रसिक काही वेळासाठी भान विसरून गेले."

अशा स्पर्धांतून अनेक नवोदित कलावंतांनी हजेरी लावली. हजारो रुपयांची पारितोषिके देऊन त्या स्पर्धक कलावंतांचा यथोचित सन्मानही केला.

थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. शांतारामजी चिगरी यांनी अनेक मैफीलीतून आपले गायन-वादन सादर केले व रसिकांची वाहवा मिळविली. शास्त्रीय गायन, ठुमरी एवढेच नाही तर चित्रपटातून वादन करून रसिकांच्या कानाची ओंजळ भरली. स्वतः अंध असताना प्रतिकूल परिस्थितीत संगीतोत्सवाचे आयोजन केले व स्पर्धांच्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्यांचे हे संगीतातील योगदान शब्दातीत आहे.

**संगीत विद्यालयाची स्थापना :**

गुरूंचा आशीर्वाद व मनात अगम्य विश्वास घेवून गुरुजी संगीताच्या प्रचारार्थ घराबाहेर पडले. पायपीट करीत ते मराठवाड्यात आले. संत-महंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली मराठवाड्याची भूमी गुरुजींच्या आगमनाने बहरू लागली. ज्या भूमीत पं. शारंगदेव, गोपाळ नायक जन्माला आले, त्या थोरांचा सांगीतिक वारसा गुरुजी पुढे चालवू लागले. ईश्वरानेच त्यांना मराठवाड्यात पाठविण्याची योजना केली असावी. विजापूर, सोलापूर,

उमरगा, निलंगा असे करत करत ते उदगीरला येऊन पोहोचले. तिथे संगीताचा प्रचार करावा या हेतूने विद्यालय सुरू केले. त्याकाळी महिना पाच रुपये फीस होती. उदगीर येथे गुरुजींनी विद्यालय काढले; परंतु ते चालेना. त्यामुळे त्यांचे मन उदगीर येथे रमले नाही म्हणून ते लातूरनगरीत दाखल झाले. रत्नापुरीनगरीत गुरुजींच्या रूपाने आणखी एका रत्नाची भर पडली. लातूर येथे आल्यानंतर आपले दैन्य सरेल असे त्यांना वाटले परंतु खऱ्या संघर्षमय जीवनाची सुरुवात लातूरमध्ये आल्यानंतरच सुरू झाली. मुळातच गरिबी व दारिद्र्याने ग्रासलेले गुरुजी लातुरात आल्यानंतर अधिकच खचले. त्यातच उदगीर तालुक्यातील बोळेगाव येथील शकुंतलादेवी यांच्याशी त्याचा विवाह झाला. त्याही जन्मजात अंध होत्या. असे असले तरी त्या संगीताच्या तज्ज्ञ होत्या. एका अंधाने दुसऱ्या अंधाला सहारा व साथ देण्याचा संकल्प केला. सप्तफेऱ्यांबरोबरच सप्तसुरांच्या रेशीमगाठी आयुष्यभर जोपासण्याच्या आणा-भाका घेतल्या. अशाप्रकारे त्यांचा संगीतमय जीवनप्रवाह सुरू झाला. विवाहामुळे त्यांची जबाबदारी वाढली. त्यामुळे त्यांनी सुरुवातीला संगीतमहर्षी बाबा बोरगावकर यांच्या सरस्वती संगीत विद्यालयात संगीत शिक्षकाची नोकरी केली. त्यानंतर गुरुवार क्लबमध्ये काही काळ संगीत अध्यापक म्हणून कार्य केले. त्याकाळी भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी व प्रा.वारद यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. मिळणारा तुटपुंजा पगार, त्यात दोन जिवाचे पोट भरणे कठीण झाले. लग्न झाल्यानंतर एक वर्ष गुरुजी-बाईंनी चुरमुरे खाऊन दिवस काढले. त्या वेळी त्यांची परिस्थिती इतकी बिकट होती की, रेशन आणणे तर दूरच पण चुरमुरे विकत घेण्यासाठीसुद्धा त्यांच्याकडे पैसे नसायचे. दोन नेहरू शर्ट व पायजम्यावर त्यांनी तीन वर्षे काढली. गरिबी वाईट असते. पोट भरण्यासाठी प्रसंगी त्यांना संगीत बारीत (तमाशात) ढोलकी व हार्मोनियम वाजवावी लागली.

अशा कठीण परिस्थितीत गुरुजींसारख्या रत्नाला लातूरकर मात्र ओळखू शकले नाहीत. असे असले तरी काही रत्नपारखी माणसे गुरुजींच्या आयुष्यात देव होऊन आली. त्या देवमाणसांमध्ये सिनेकलावंत श्रीराम गोजमगुंडे यांचा नामोल्लेख करता येईल. जखमेवर हळुवार फुंकर घालणाऱ्या आठवणी सांगताना गुरुजी सांगतात, "माझ्या घरी चूल पेटविण्यासाठीसुद्धा लाकडे नव्हती. तेव्हा ती लाकडे श्रीराम गोजमगुंडे यांनी आपल्या नाटकाचे स्टेज मोडून दिली. शिष्य गिरीश नाईक चहा-साखर आणून द्यायचे तर रत्नदीप बोटवे हे बाजरी आणून द्यायचे. काही दिवसांनी पंडितराव सोनवणे यांनी एक स्टोव्ह आणून दिला. त्यांच्या वाईट स्थितीत दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. घरजाळे व श्री. पत्की यांनी मोलाचे सहकार्य केले." या सर्वांच्या प्रयत्नामुळे गुरुजी लातुरात राहू



शकले.

विद्वत्ता आणि ज्ञानाचा सागर जवळ असताना आपण दुसरीकडे नोकरी करावी हे त्यांना पटेना. आपले एक स्वत:चे संगीत विद्यालय असावे असे त्यांना वाटू लागले. शेवटी धाडस करून १९७३ साली त्यांनी सूरताल संगीत विद्यालयाची स्थापना केली. या विद्यालयाची स्थापना कशी झाली यासंदर्भात गुरुजींचे ज्येष्ठ शिष्य डॉ.महावीर उदगीरकर म्हणतात, "एक दिवस माझ्या वडिलांचे मित्र श्री. भास्कर कुलकर्णी चिगरी गुरुजींना घेऊन आमच्या घरी आले. त्यांची क्लास सुरू करण्याविषयी चर्चा होवून क्लास सुरू करण्याचे ठरले आणि तेही सिग्नल कँप या परिसरात. तात्काळ माझ्या वडिलांनी जागाही उपलब्ध करून दिली. आम्ही राहात असलेल्या व्यंकटराव निपाणीकर गुरुजींच्या वाड्यातच मुख्य रस्त्यालगत बाहेरील बाजूस गुरुजींनी क्लास सुरू केला. अशा रितीने गुरुजींच्या स्वतंत्र संगीत विद्यालयाचा श्रीगणेशा झाला."

सुरुवातीच्या काळातील प्रसंग सांगताना गुरुजींचे ज्येष्ठ शिष्य श्री. प्राणेश पोरे सांगतात, "गुरुजींचा मनावर व मनगटावर दुर्दम्य विश्वास, कितीही वादळ-वाऱ्यात तो कायम असतो म्हणून संकटात कधी ते चेपाळले, ढेपाळले नाहीत. गुरुवार क्लब काही कारणांमुळे सुटला. समोरच्याच माडीवर एक पेटी, कसाबसा तबला, बारा रुपयांच्या दोन चटया, त्याही विद्यार्थ्यांनी आणलेल्या, एवढ्यावर क्लास सुरू झाला. लौकिक अर्थानं सारी गणिते वजाबाकीची, बेहिशेबी मामला. अशाही वेळी गुरुजी विद्यादानात बेहिशेबी राहिले. मात्रांचे काटेकोर हिशेब शिकवत राहिले. गुरुजींच्या विचाराची मुख्य बैठक अध्यात्मिक आहे. त्यामुळेच सावरण्याची शक्ती आहे. बाईंची सोबत सुटल्यावरही गुरुजींनी किती शिष्य आणि शिष्य म्हणण्यापेक्षा स्वर उपासक, ताल उपासक घडवले यांचं गणित मांडणं म्हणजे त्यांच्या ज्ञानयज्ञाचा मोड केल्यासारख होईल."

या विद्यालयातून त्यांनी गायन-वादनाचे शास्त्रोक्त शिक्षण देण्यास प्रारंभ केला. अनेक वेळा बँडमधील लोकांना ढोल व हालगी कशी वाजवावी याचेही शिक्षण त्यांनी दिले. पुढे चालून प्रयाग संगीत समिती अलाहाबादचे परीक्षा केंद्र सुरू केले. त्यातून अनेक विद्यार्थी प्रभाकर व प्रवीण परीक्षा उत्तीर्ण होऊ लागले. त्यानंतर त्यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मंडळाचे परीक्षा केंद्र सुरू केले. ज्यातून दरवर्षी शेकडो विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण होत आहेत.

संगीताचे पवित्र ज्ञानदान चालू असतानाच त्यांना अनेक वेळा जागा बदलावी

लागली. वाद्यांचा आवाज, विद्यार्थ्यांची वर्दळ या गोष्टीला कंटाळून घरमालक घर रिकामे करायला सांगत त्यामुळे त्यांना सिग्नल कँम्प, आदर्श कॉलनी, जुना औसा रोड, नंदी स्टॉप, विजय कॉलनी व शामनगरमध्ये विद्यालय चालवावे लागले. आता या गोष्टीचा त्यांना कंटाळा येऊ लागला. गुरुजींनी आपल्या रक्ता-घामातून पैसे गोळा केले आणि रेणापूर नाक्याजवळ निसर्गरम्य वातावरणात स्वतःचे घरकुल बांधले. १६ मार्च १९९२ हा दिवस त्यांच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस होता. कारण याच दिवशी त्यांनी त्यांच्या स्वप्नातील घरात पहिलं पाऊल टाकलं होतं. ज्या घरात गुरुजी आणि बाईंनी गुरुकुल पद्धतीने संगीत अध्यापनाचे कार्य केले.

आदर्श गुरू म्हणून जे गुण असायला हवे ते सर्व गुण गुरुजींकडे आहेत. अविरत परिश्रमाने प्राप्त केलेले ज्ञान गुरुजींनी सर्वांना खुल्या दिलाने दिले. ज्यांना जे झेपेल, पचेल व रूचेल त्याचा विचार करून त्यांना ते दिले. कोणताही पक्षपात न करता सढळ हाताने शिष्यांना दिले. केवळ बंदिशी शिकले म्हणजेच गायन नव्हे असे ते म्हणतात. स्वरसाधनेवर नितांत निष्ठा असल्यामुळे ते शिष्यांकडूनही कठोर स्वरसाधना करून घेतात. स्पष्ट शब्दोच्चार, अचूक स्वरस्थाने, विविध अलंकारांनी गळा तयार करून घेणे इ. बाबींकडे गुरुजी आणि बाईंनी कटाक्षाने लक्ष ठेवले. गायकाचा ताल कच्चा राहू नये म्हणून ते स्वतः तबला घेऊन साथीला बसतात.

तबलावादनाचे धडे देताना गुरुजी नेहमीच म्हणतात, 'हात है तो बात है।' आणि खरोखरच गुरुजींच्या शिष्यांची हाताची जी ठेवण आहे ती अन्यत्र अपवादानेच आढळते. साधारणतः तीन महिने ताता व तीती हे दोन बोल घोटून घेतात. तबलावादन करताना पाठीचा कणा ताठच असावा असा त्यांचा दंडकच आहे. अनावश्यक हालचाली, मानेला झटका देणे इ. वाईट सवयींपासून गुरुजी शेकडो मैल दूर आहेत. पखावज वादन असो की ढोलकी वादन त्यांची वादनशैली भिन्न आहे. त्या त्या ढंगानेच वादन व्हावे असा कानमंत्र ते शिष्यांना देतात. त्यामुळेच गुरुजी-बाईंच्या हातून शेकडो मैफीलीचे कलावंत निर्माण होऊ शकले.

पं. मुकेश जाधव यांचे वडील त्याकाळातील आठवणी सांगताना म्हणतात," गुरुजींचा स्वभाव खूप कडक होता परंतु ते खूप मायाळू व प्रेमळ स्वभावाचे होते. प्रत्येकाला ते बोलण्यावरून ओळखत. वाईटाला वाईट व चांगल्याला चांगली वागणूक मिळत असे. त्यांच्याकडे अनेक विद्यार्थी येत पण त्यांनी कधीही गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, जात-पात



असा दुजाभाव केला नाही. त्यांनी दिलेले बोल मी मुकेशकडून पहाटे ५ वाजल्यापासून सराव करून घेत असे. त्याने वाजवून दाखवल्यावर चांगले असेल तर गुरुजी टाळ्या वाजवून छान म्हणायचे आणि चुकले तर खूप रागवायचे. त्याला शिकवत असताना अचानक काही सुचले की मला लिहून घ्यायला सांगायचे. गुरुजींच्या स्वभावाला ओळखून मुकेशने पण खूप रियाज केला."

गुरुजींचे शिष्य श्री. गिरीश नाईक हे म्हणतात,"ख्याल, ठुमरी आणि वाद्यसंगीताची साथ उदा.सतारीबरोबर कसे वाजवावे, व्हायोलिन किंवा इतर वाद्यांची साथ कशी करावी तसेच गाण्याला साथ जी करावी त्यातल्या त्यात लाईट म्युझिकमध्ये ताल वाद्य कशी व कोणत्या बाजाने वाजवावीत हे गुरुजींकडूनच जाणून घ्यावे."

हनुमंत पांचाळ हे गुरुजींबद्दल लिहितात,"बाई-गुरुजी आम्हाला शिकविण्यासाठी शाळेत पहाटे यायचे. आम्हा सर्व मुलांवर ते पोटच्या मुलांसारखे प्रेम करीत. माझे एस. एस. सी.पर्यंत शिक्षण झाल्यावर माझी तबला शिकण्याची तळमळ पाहून तबल्यातील उच्च कोटीचे शिक्षण देण्यासाठी मला बाई-गुरुजींनी त्यांच्या घरी म्हणजेच सूर-ताल संगीत विद्यालयात ठेवून घेतले."

डॉ. महावीर उदगीरकर गुरुजींच्या पितृप्रेमाबद्दल म्हणतात, "त्यांच्या आठवणीतील दुसरा एक प्रसंग सांगताना गुरुजींमधील विद्यार्थ्याविषयी असलेली तळमळ दिसून येते. आकाशवाणी केंद्र औरंगाबाद येथे माझ्या सोलो वादनाकरीता गुरुजींनी सतीशचंद्र चौधरी यांच्याकडे विचारणा केली. माझ्यासोबत केवळ एवढ्याच कारणासाठी गुरुजी पं. चौधरींच्या घरी चार दिवस राहिले. हाच त्यांच्यातील मोठेपणा कायम स्मरणीय आहे."

श्री. संजय कुलकर्णी हे १९६८-१९७८ या काळात गुरुजींकडे संगीताचे अध्यापन करीत होते. त्या वेळच्या गुरुजींच्या आठवणी सांगताना ते म्हणतात,"गुरुजी -बाई त्यावेळी आझाद चौकस्थित गुरुवार क्लबमध्ये संगीत अध्यापनाचे कार्य करीत होते. क्लासमध्ये विद्यार्थी भरपूर परंतु सर्वच फीस देणारे असे नव्हते त्यामुळे आर्थिक विवंचना या दाम्पत्यास कायमचीच पण त्यांनी ती कधीही व्यक्त केली नाही की कोणाकडे याचनाही केली नाही. गुरूवर्यांनी फीसवरून कुठल्याही विद्यार्थ्यास कधीच प्रतिबंध केला नाही."

श्री. माणिकराव निलंगेकर म्हणतात,"गुरुजी जेव्हा कार्यक्रमासाठी जात तेव्हा मानधनाचे कधीच ठरवत नसत. आयोजकाने दिलेले मानधन आनंदाने घ्यायचे आणि अनेक वेळा कार्यक्रमाच्या शेवटी ते भैरवीमध्ये कुछ लेना न देना मगन रहना हे संत

कबिराचे भजन गायचे." प्रा. राहुल सोनवणे गुरुजींबद्दल म्हणतात,"गुरुजींकडे जेव्हा मी शास्त्रीय गायन शिकण्यासाठी आलो. तेव्हा गुरुजींनी माझ्या आवाजाची जात ओळखून तसे धडे देण्यास सुरुवात केली. गुरुजीं औसा रोड येथे भाड्याच्या घरात क्लास घेत असत. मी गेलो तेव्हा गुरुजींचे नवीन रेणापूर नाका येथे घराचे बांधकाम सुरू होते. त्या वेळी मी व गुरुजी जुना औसा रोड ते नवीन रेणापूर नाका पायी चालत येत असत. मला रस्त्याने पायी चालत असताना गुरुजी स्वरांचे बारकावे, चीजांचे पठण करून घेत असत. माझा खरा क्लास चालत-चालतच होत असे."

श्री. संजय सुवर्णकार म्हणतात,"त्यांची बोटे काही ना काही सतत वाजवितच असत व नवीन बोलांची निर्मिती करत असत. गुरुजींकडे असलेला पानाचा डब्बासुद्धा यामुळे चपटा झाला होता. गुरुजी हाताची बोटे व्यवस्थित बसत नाही, बोलामध्ये वजन, स्पष्टता येत नाही तोपर्यंत पुढे शिकवत नसतं."

श्री. विजय श्रीमंगले म्हणतात," रोज पहाटे गुरुजी रियाज करून घेत असत. पहाटे त्यांनी लावलेल्या स्वरांनी माझ मन प्रफुल्लित व भावविभोर होत असे. गुरुजींनी लावलेला षडज तानपुऱ्यातील षडजाशी अगदी एकरूप होत असे. स्वच्छ आकारयुक्त, खुला व स्थिर आवाज ही गुरुजींच्या षडजाची खासीयत आहे. गात असताना गुरुजींनी लावलेल्या दोन-तीन स्वरांमध्येच रागाचे स्वरूप स्पष्ट दिसून येत असे."

श्री. हरीश कुलकर्णी म्हणतात, "तिलवाडा व झुमरा ही गुरुजींची आवडते ताल. यात गात असताना गुरुजी एवढे रमून जात की तासंन्-तास वेळेचे भान रहात नसे. स्वरांचा तेज:पुंज स्वराविष्कार नेहमीच त्यांच्या गाण्यातून जाणवत असे. गुरुजी एकदा म्हणाले होते की, "खरं गाणं हे तानात नसून सुंदर अशा आलापीत असतं." याचं चपखल असे उदाहरण देत ते म्हणाले की, "ललत रागातील अरे मन राम नाम जपले, ही बंदिश गाताना तू हे प्रत्यक्षात तुझ्या मनाला सांगतोय असा भाव निर्माण व्हायला हवा तेव्हा ते गाणं रसिकांच्या मनाला भावेल आपलंसं वाटेल. हा विचार सदैव स्मरणात ठेवून त्याप्रमाणे प्रयत्न कर असा संदेशसुद्धा गुरुजींनी दिला."

अशाप्रकारे पं. चिगरी गुरुजींनी स्वकर्तृत्त्वाने सूरताल संगीत विद्यालयाचे छोटेसे रोपटे लावले ज्याचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. शास्त्रीय गायन, सुगम गायन, तबला, पखावज, ढोलक, ढोलकीचे वादन-कौशल्य त्यांनी सर्वांना उलगडून दिले. आपल्या शिष्यांवर पितृवत प्रेम केले किंबहुना सूरताल हे होतकरू व रियाजी विद्यार्थ्यांचे



घरच झाले. यातून शिष्यांनी अभिजात संगीताचा प्रसाद भक्तिभावाने प्राशन केला.

**सुयोग्य शिष्यांची निर्मिती :**

दगड कसाही असो त्याला घडविणारे हातच कुशल असावे लागतात. तद्वतच शिष्य कसाही असो, गुरुजी आपल्या कुशल हाताने त्याला घडवितातच. त्यामुळेच त्यांनी अनेक शिष्य निर्माण करून भारतीय संगीताला मोलाचे योगदान दिले आहे. या शिष्यांचा परिचय व त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे पाहता येईल.

* **स्व. प्रा. अण्णाराव भोसले :**

यांचा जन्म १५ जानेवारी १९६३ रोजी उमरगा तालुक्यातील सांगवी या लहानशा खेड्यात झाला. त्यांचे शालेय शिक्षण एम. ए. बी. एड. पर्यंत झाले असून त्यांनी तबला वादनाचे शिक्षण पं. शांताराम चिगरी व श्री शेषेराव भोसले यांच्याकडे घेतले. त्यांना मराठवाडा विद्यापिठाच्या युवकमहोत्सवात दोन रौप्य पदक व एक सुवर्ण पदक मिळाले तसेच संगीत साधना सांगली, कालिदास संगीत स्पर्धा, लातूर संगीत स्पर्धा, गुंजकर स्मृती संगीत प्रतियोगिता व अशा अनेक ठिकाणी प्रथम पारितोषिके प्राप्त केली. ते अनेक वर्षे ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी येथे मराठी विषयाचे प्राध्यापक, विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. परभणी येथेच राहून त्यांनी अनेक तबलावादनातील शिष्य घडविले. ते आकाशवाणीचे बी श्रेणीचे कलावंत होते. त्यांनी अनेक दिग्गज कलावंतांना तबला साथसंगत करून मैफीली रंगविल्या. त्यामध्ये जागतिक कीर्तीचे कलावंत पं. सी. आर. व्यास, पं. राजा काळे, श्रीकांत देशपांडे, मालिनी राजूरकर, पं. रघुनाथ शेठ, श्रीमती सुहासिनी कोरटकर, उ. गुलाम सादिक खाँ, शैला दातार, दत्ता चौगुले, कल्याणी देशमुख, हार्मोनियम वादक आप्पा जळगावकर, आशा पारसनिस, शंकर भट्टाचार्य, पं. सत्यशील देशपांडे, डॉ. कमलाकर परळीकर यांचा उल्लेख करता येईल. अशा या थोर शिष्याला दिनांक २८ फेब्रुवारी २०११ रोजी देवाज्ञा झाली.

* **स्व. खंडेराव गणेशराव कुलकर्णी :**

यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा या गावी दिनांक ११ ऑक्टोबर १९५८ रोजी झाला. त्यांनी पं. चिगरी गुरुजींकडून संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण झाले. त्यांनी वडील डॉ. गणेशराव कुलकर्णी , श्रीपतराव नानजकर व श्री. कांतराव सोमवंशी यांच्याकडून गायनाचे प्राथमिक शिक्षण घेतले. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी युवकमहोत्सवात शास्त्रीय व सुगम गायनाची प्रथम पारितोषिके प्राप्त केली. १९७८ पासून

आकाशवाणी केंद्रावरून शास्त्रीय व सुगम गायनाचे कार्यक्रम प्रसारीत झाले. फाऊंटन कंपनी, पुणे यांच्याकडून 'प्रभात भक्तिगिते' हे भजनाची ध्वनिफीत प्रकाशित झाली. लातूर येथील अष्टविनायक राज्य स्तरीय संगीत स्पर्धेत संयोजक म्हणून त्यांनी अनेक वर्षे कार्य केले. सी. सी. आर. टी. नवी दिल्ली येथे त्यांनी गायनाचे सादरीकरण केले. याबरोबरच पुणे, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, हैद्राबाद, गुलबर्गा अशा अनेक ठिकाणी शास्त्रीय संगीताच्या मैफीली सादर करून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्यांनी ज्ञानेश्वर विद्यालय, लातूर येथे अनेक वर्षे त्यांनी संगीत शिक्षक म्हणून कार्य केले. अशा या कलावंतांचा मृत्यू दिनांक ९ ऑक्टोबर २०१३ रोजी झाला.

* **श्री. गिरीश नाईक :**

हे पं. शांताराम चिगरी यांचे ज्येष्ठ शिष्य असून संगीतकार म्हणून ख्यातकीर्त आहेत. त्यांनी प्रारंभिकपासून संगीत विशारदपर्यंतचे तबला व गायनाचे सांगीतिक शिक्षण गुरुजींकडून आत्मसात केले. १९७९ साली प्रसिद्ध संगीतकार राम कदम यांचे सहाय्यक म्हणून त्यांनी काम पाहिले. याबरोबरच १९८१ साली मेलडी मेकर्स ग्रुपसोबत मॉरीशस, केनिया या देशांचा प्रसिद्ध संगीतकार आर. डी. बर्मन आणि गायिका आशा भोसले सोबत दौरा केला. पाकिस्तानची गायिका नूरजहाँ आणि लता मंगेशकर यांच्यासोबत मुंबईतील शोमध्ये सहभाग नोंदवून तबला व ढोलक या वाद्यांची साथसंगत केली आहे. एवढेच नव्हे तर १९८२ साली प्रसिद्ध गायक किशोरकुमार यांच्यासोबत अमेरिका, कॅनडा, वेस्टइंडीज आणि लंडन या देशात सांगीतिक दौरा केला. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना सूरसिंगार संसदेने 'तालमणी' ही पदवी देऊन १९७२ साली सन्मानित केले. त्यांनी अनेक चित्रपटांना संगीताचा साज चढविला आहे. ज्यात महात्मा बसवेश्वर, विशेष ही माझी मिसेस -२०१३, शरयू , सेनानी - २०१४ या चित्रपटांचा नामोल्लेख करता येईल. सध्या ते 'गिरीश नाईक म्युझिक इन्स्टिट्यूट' या संस्थेतून भावी पिढीस भारतीय व पाश्चात्त्य संगीताचे धडे देत आहेत.

* **श्री. प्राणेश विश्वंभरराव पोरे :**

यांनी गुरुजींकडे गायन व तबला वादनाचे शिक्षण घेतले. याबरोबरच त्यांनी पं. शिवदास देगलूरकर, पं. सी. आ.व्यास, आबासाहेब देशमुख यांच्याकडूनही तालीम घेतली. ते संगीत प्रभाकर (प्रयाग संगीत समिती, अलाहाबाद), संगीत अलंकार प्रथम (कंठसंगीत), मध्यमा पूर्ण (तबला) (अ. भा. गां. म. मं.मुंबई) या परीक्षा उत्तीर्ण आहेत. ते माजलगाव



येथे श्री. सिद्धेश्वर विद्यालयामध्ये संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते रसिक मंडळ, संस्कार भारती व यांसारख्या सांस्कृतिक संस्थांमार्फत अनेक विख्यात कलाकारांचे गायन, वादन मैफीली माजलगाव शहरामध्ये आयोजित करण्यात महत्त्वाचे योगदान देत आहेत. तसेच अन्य संस्थांमार्फत विविध स्पर्धा व मैफीलींचे आयोजन करतात. त्यांनी अनेक बंदिशींचे लेखन केले आहे तसेच त्यांना काव्यलेखनाचाही छंद आहे. त्यांनी अनेक गीते स्वरबद्ध केली आहेत. नुकतीच त्यांची महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने पुरस्कार निवड समितीवर सदस्य म्हणूनही निवड झाली आहे.

* **श्री. केशवराव सूर्यवंशी :**

यांचा जन्म कर्नाटकातील भालकी या गावी दिनांक ५ सप्टेंबर १९३६ रोजी झाला. त्यांनी तबलावादनाचे प्रारंभिक ते विशारदपर्यंतचे शिक्षण गुरुजींकडे घेतले. त्यांनी अनेक दिग्गज कलावंतांना तबल्याची उत्तम साथसंगत केली आहे. ज्यामध्ये कशाळकर (व्हायोलिन वादक), नृसिंहलू वडवंटी (क्लोरोनेट), यशवंतबुवा देव (मुंबई), उ. शफीखाँन (सीतारवादक).धारवाड, पं. जगन्नाथबुवा पंढरपूरकर, पं. भीमाशंकर-हैदराबाद पं. गोपालन-हैदराबाद अशा अनेक कलावंतांचा नामोल्लेख करता येईल. त्यांनी बेंगलोर, हैदराबाद, परभणी, नांदेड, लातूर, बिदर, बनारस, पुणे, माणिकनगर येथे संगीत संमेलनात सहभागी होऊन अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल कर्नाटक सरकारने २००१ साली कलाश्री पुरस्कार- संगीत नृत्य अकादमी, बेंगलोर देऊन सन्मानित केले. तसेच बीदर उत्सव ॲवार्ड, डॉ. पंचाक्षरी गवई उत्सव ॲवॉर्ड, बसवकल्याण उत्सव ॲवॉर्ड, हिरेमठ उत्सव ॲवॉर्ड इत्यादि पुरस्कार त्यांना मिळाले.

* **डॉ. शिवरूद्र स्वामी :**

यांनी पं. चिगरी गुरुजींकडे शिक्षण घेऊन संगीतामध्ये एम. ए. (संगीत), पी. एच. डी. प्राप्त केली आहे. ते उत्तम गायक, हार्मोनियम वादक व उत्तम तबलावादक आहेत. त्यांनी विविध संगीत स्पर्धांच्या माध्यमातून गायन केले व पुणे विद्यापिठांतर्गत प्रथम पारितोषिक पटकावले. त्यांनी नाशिक येथील युवकमहोत्सवात तबलावादनात प्रथम पारितोषिक मिळवले. सध्या ते भातखंडे संगीत विद्यालयाच्या माध्यमातून लातूर व औसा परिसरात अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. ते इंदिरा कला संगीत विश्व विद्यालय, खैरागड या केंद्रामार्फत परीक्षा घेतात व त्यांच्याकडे गुरुकुल पद्धतीने ज्ञानदान चालू आहे.

*      **श्री. संजय कुलकर्णी :**

यांनी गुरुजींकडून संगीताचे शिक्षण घेऊन मराठवाड्यातील पहिल्या व्यावसायिक 'गांधार' या सुगम संगीत, भावगीत व चित्रपटगीतांचा समावेश असलेल्या कार्यक्रमाची निर्मिती केली. मराठवाड्यात प्रमुख शहरांमधून स्वरधारा, तोच चंद्रमा नभात, नक्षत्र अशा अनेक कार्यक्रमांतून अभंग, नाट्यगीत, भावगीत, मराठी, हिंदी चित्रपटातील गीते, मेहंदी हसन, गुलाम अली इ. च्या गजल सादर केल्या. त्यांनी जी. एस. एस.कॅसेट्स या ऑडिओ कॅसेट कंपनीची स्थापना करून त्यामार्फत 'सूरसागर के मोती' या सुगमगीतांच्या माध्यमातून शास्त्रीय रागदारीची ओळख करून देणाऱ्या कॅसेट्सची भारतीय पातळीवर निर्मिती करून वितरण केले आहे.

*      **श्री. उत्तम लोंढे :**

हे गुरुजींचे मानसपुत्र आहेत. यांचे मुळ गाव उस्मानाबाद जिल्ह्यातील कोंड हे आहे. वयाच्या ५ व्या वर्षापासून ते लातूरच्या शासकीय अंध शाळेत दाखल झाले. त्यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण राठी गुरुजी व शाम बनसोडे यांच्याकडे झाले. अंध शाळेत असतानाच पं. शांताराम चिगरी व सौ. शकुंतलादेवी यांच्याकडून त्यांना उच्च स्तरीय तालीम मिळाली. वयाच्या ७-८व्या वर्षीच ते उत्तमरीत्या गाऊ लागले. वयाच्या सोळाव्या वर्षी ते विशारद ही पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांची बुद्धिमत्ता व गायन कौशल्य पाहून गुरुजींनी सन १९९१ साली त्यांना कर्नाटकमधील गदग येथे पुट्ठराज गवई यांच्या आश्रमात दाखल केले. यांनी गुरुजींकडून लहानपासून संगीताचे उत्तम धडे घेतल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक येथे अनेक महोत्सवात यशस्वी शास्त्रीय गायन केले आहे. त्यांच्या गायकीत ग्वाल्हेर घराण्याची सर्व वैशिष्ट्ये दिसून येतात. अंध व अपंग असतानाही त्यांनी स्वपरिश्रमाने आपली गायकी तयार केली. त्यांच्या या कर्तृत्त्वाबद्दल तत्कालीन राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांनी त्यांचा सन्मान केला. सध्या ते श्री. क्षेत्र आळंदी येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

*      **श्री. हणमंत पांचाळ :**

यांचा जन्म लातूर तालुक्यातील मांजरी या गावी झाला. वयाच्या ८व्या वर्षी ते लातूरला शिक्षणासाठी शासकीय अंधशाळेत आले. घरात कसल्याही प्रकारचे संगीताचे वातावरण नव्हते, तालासुराची समजही नव्हती. अशा स्थितीत अंधशाळेत १९८२ साली पं. शांताराम चिगरी व सौ. शकुंतलादेवी यांच्या परीसस्पर्शाने त्यांचे आयुष्य तालमय



झाले. त्यांनी तबल्यातील प्रभाकर ही पदवी प्राप्त केली. ते उत्तम रचनाकार असून त्यांनी अनेक कायदे, तुकडे, मुखडे यांच्या रचना केल्या आहेत. सध्या ते प. र. लुंकड अंध विद्यालय, भोसरी, पुणे येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तेथे ते भावी पिढीस तबलावादनाचे ज्ञानामृत पाजत आहेत व अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

*      **श्री. गोविंद शेळके :**

यांचा जन्म ७ जानेवारी १९७० रोजी लातूर जिल्ह्यातील हरंगूळ या छोट्याशा गावी झाला. यांनी गुरुजींकडून लहानपासूनच तबलावादनाचे शिक्षण घेतले. यांनी संगीतात एम. ए. करून अ. भा. गां. म. मंडळ, मुंबई येथील तबला अलंकार व प्राचीन कला केंद्र, चंदीगढ येथील संगीत भास्कर ही पदवी प्राप्त केली. त्यांना सन १९८१ मध्ये लातूर येथे मराठवाडा पातळीवरील तबलासोलो (ताल-त्रिताल) स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच कै. पं. कंठे महाराज स्मृतिदिनानिमित्त औरंगाबाद येथे घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील तबलासोलो (ताल-धमार) स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळाले. सन १९८२ मध्ये परळी येथील जिल्हा पातळीवरील तबलासोलो (ताल-रूपक) स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळाले. सन.१९८४ मध्ये श्रीमती महालक्ष्मी स्वामीनाथन् मेमोरियल म्युझिक कॉन्टॅस्ट, औरंगाबादतर्फे घेण्यात आलेल्या तबलासोलो (ताल-त्रिताल) स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. दायाँ-बायाँ चे अचूक संतुलन, स्पष्ट निकास, वजन, हातातील गोडवा यामुळे ते उत्तम स्वतंत्र तबलावादक म्हणून परिचित आहेतच त्याचबरोबर ते उत्तम साथसंगतकार म्हणूनही परिचित आहेत. त्यांनी अनेक दिग्गज कलाकारांना तबला साथसंगत केली. त्यामध्ये श्रीमती गीता जावडेकर (मुंबई आकाशवाणी गायिका), पं. विकास कशाळकर (पुणे), पं. रेवणप्पा कुंकुमगार-व्हायोलिन (गुलबर्गा आकाशवाणी कलाकार), पं. सुहास व्यास (मुंबई), श्री. चौधरी (वीणा वादन), उ. शेख अब्दुल्ला- बासरी यांचा उल्लेख करता येईल. तसेच त्यांनी राज्यातील अनेक नामांकित कीर्तनकारांना मृदंगाची साथ केली आहे. मन्मथ स्वामी जन्म आख्यान-ऑडिओ सी. डी. तील गाण्याला तबला व ढोलकची साथ दिली आहे. सध्या ते ज्ञानेश्वर विद्यालय, लातूर येथे सन १९९२ पासून संगीत शिक्षक म्हणून कार्यरत.

*      **प्रा.डॉ. संदिपान जगदाळे :**

संदिपान गुरूनाथ जगदाळे यांचा जन्म १७ सप्टेंबर १९७३ रोजी लातूर येथे झाला. यांनी संगीतात एम. ए. करून अ. भा. गां. म. मंडळ, मुंबई ची तबला अलंकार व प्राचीन

कला केंद्र, चंदीगढ यांची संगीत भास्कर ही पदवी प्राप्त केली. त्याचबरोबर संगीतातील नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला. त्यांनी विविध राज्य स्तरीय व राष्ट्रीय युवकमहोत्सवात पारितोषके पटकावली. स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या केंद्रीय युवामहोत्सवात सतत तीन वर्षे तबलावादनात रौप्य पदक पटकावले. यांनी स्वातंत्र्याच्या सुवर्णजयंतीनिमित्त १५ ऑगस्ट १९९७ साली नवी दिल्ली येथील राजपथावर राष्ट्रीय युथ मार्च व सांस्कृतिक कार्यक्रमात यशस्वी सहभाग नोंदवला. तसेच जयपुर (राजस्थान) येथे राष्ट्रीय युवा योजनेतील सांस्कृतिक कार्यक्रमात यशस्वी सहभाग नोंदवला. श्री. श्री. रविशंकर गुरुजी प्रणित आर्ट ऑफ लिव्हिंगद्वारा आयोजित 'तालनिनाद' या विश्वविक्रमी कार्यक्रमाच्या आयोजनात व वादनात सहभाग नोंदविला ज्यामुळे त्यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदविले गेले. एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई आयोजित वेस्ट झोन समूहगीत स्पर्धेत व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील राज्य स्तरीय शास्त्रीय संगीताच्या कार्यशाळेत स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे नेतृत्त्व केले. महाराष्ट्र राज्य मा. व उच्च मा. शिक्षण मंडळाच्या कला शिक्षण मंडळावर लेखक व अभ्यास मंडळ सदस्य व निमंत्रक (गटप्रमुख) म्हणून कार्य केले. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व शैक्षणिक संशोधन केंद्र, बालभारती, पुणे येथे भारतीय संगीत विषयाच्या अभ्यास गटावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे संगीत विषयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. दि. ११ ते १३ मार्च २०१६ या कालावधीत आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने नवी दिल्ली येथे विश्वविक्रमी 'विश्व सांस्कृतिक' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात त्यांनी तबलावादन करून यशस्वी सहभाग नोंदवला.

त्यांचे सरस्वतीचे उपासक-पं. शांतारामजी चिगरी, उपेक्षा तबलावादकाची असे अनेक लेख दै. लोकमत, दै. एकमत, संगीत कलाविहार इ. दैनिक व मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून अनेक शोध निबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व संगीत रसिकांसाठी सांगीतिक ग्रंथांचे लेखन केले आहे. ज्यात ९ स्वतंत्र ग्रंथ, २ सहलेखन व १ संपादित ग्रंथाचा समावेश आहे. त्यामध्ये स्वरगंध, स्वरांगण, तालगंध-भाग १ व २, तालस्पर्श-भाग १ व २, सुरेल निबंधमाला, सुरेल इतिहासाची सोनेरी पाने या ग्रंथांचा उल्लेख करता येईल. यातील काही पुस्तके अमेरिका व कॅनडा या देशात पोहंचली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. त्यामध्ये केंद्र सरकारचा नेहरू युवा पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी म्हणून सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात



आले आहे. महाराष्ट्र गुणीजन रत्नगौरव पुरस्कार, मुंबई, साईरत्न पुरस्कार, लातूर या पुरस्कारांचा उल्लेख करता येईल. लातूर जिल्ह्यातील निवडक अभिजात गायक-वादकांद्वारे भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रचार : एक अभ्यास (१९८०-२०१३) हा शोध निबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या ठिकाणी सादर केला. सन १९९९ पासून दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे संगीत विषयाचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या माध्यमातून संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **सौ. मीनाक्षी कोळी :**

यांचा जन्म १३ ऑक्टोबर १९७२ रोजी लातूर येथे झाला. घरात संगीताचे वातावरण नव्हते. सन १९९० साली पं. शांतारामजी चिगरी व सौ. शकुंतलादेवी चिगरी यांनी त्यांच्यावर तालासुरांचे संस्कार केले. सन २००० साली त्या संगीत विशारद झाल्या. सन २०१४ मध्ये त्यांनी एम. ए. संगीत ही पदवी प्राप्त केली. गाण्याबरोबरच हार्मोनियम वादनात त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. त्यांनी नुपुरा नृत्य अकादमीत अनेक वर्षे नृत्यासोबत हार्मोनियमची साथसंगत केली आहे. विविध गायन व नृत्याच्या मैफीलीतसुद्धा त्यांनी हार्मोनियमची साथ करून मैफीली सजविल्या आहेत. श्री.गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात लिपिक पदावर कार्यरत असतानाही त्यांनी संगीत प्रचार व प्रसारासाठी अत्यंत मोलाचे योगदान दिलेले आहे. संगीताचा छंद जोपासत गुरुपौर्णिमा, पं. विष्णु दिगंबर पलुस्कर पुण्यतिथी, विविध संगीतोत्सव, स्पर्धा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन व त्यातून उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला आहे. त्यांनी अनेक वर्षे लातूर येथील सूरताल संगीत विद्यालयात सहकेंद्रसंचालक म्हणून कार्य पाहिले आहे. सध्या त्या शारदा संगीत महाविद्यालय, मजगेनगर येथून भावी पिढीस शास्त्रीय गायन, वादनाचे धडे देत आहेत. त्यांची कन्या शारदा कोळी हीसुद्धा भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्य प्रकारात विशारद आहे. अशाप्रकारे संगीताचा वारसा ती पुढे चालवीत आहे.

* **श्री. संजय सुवर्णकार :**

श्री. संजय विश्वंभरराव सुवर्णकार यांचा जन्म ०५ मार्च १९७६ रोजी लातूर येथे झाला. त्यांनी गुरुजींकडे संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यांनी अनेक दिग्गज कलावंतांसोबत तबलासाथ केली. त्यात प्रामुख्याने गुरूवर्य पं. शांताराम चिगरी, पं. विजय बक्षी-पुणे, अंजली मालकर- पुणे, पल्लवी जोशी-मुंबई, पं. शिवदास देगलूरकर-

अंबेजोगाई, डॉ. पवन नाईक-अहमदनगर यांचा नामोल्लेख करता येईल. श्री. श्री. रविशंकरद्वारा आयोजित आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ताल-निनाद या कार्यक्रमातून सादरीकरण केले. ते सध्या विवेकानंद इंटिग्रेशन स्कूलमध्ये संगीत शिक्षक म्हणून कार्यरत असून शारदा संगीत महाविद्यालय, शामनगर येथे १५ वर्षापासून संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **सौ. अश्विनी मोहन करपे (यजुर्वेदी) :**

यांचा जन्म २४ डिसेंबर १९७५ रोजी कोल्हापूर येथे झाला. यांनी गुरुजींकडे सतार वादनाचे शिक्षण घेऊन संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून एम. ए. संगीत (सतार) ही पदवी प्राप्त केली. त्यांनी १९९६ ते २००६ पर्यंत कुंदगोळ, मंत्रालय, गदग संगीत समारोह, कवठाळ, उडपीमध्ये सतारवादनाचे विविध कार्यक्रम केले. त्या सांगली आकाशवाणी कलाकार आहेत. त्यांना सन.२००४ मध्ये एच. एच. श्री विद्याधीश तीर्थस्वामीजी, उडपी यांच्याकडून नादश्री पुरस्कार मिळाला.

* **प्रा. राहुल सोनवणे :**

यांचा जन्म २० जानेवारी १९६९ रोजी झाला. यांनी गुरुजींकडे संगीताचे शिक्षण घेऊन प्राचीन कलाकेंद्र, चंदीगढ येथून संगीत भास्कर, अखिल भारतीय गांधर्व मंडळ, मुंबई येथून संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली. त्याचबरोबर गुरुजींच्या शिष्यांमध्ये संगीतातील नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रथम मान पटकावला. ते उत्तम शास्त्रीय गायक म्हणून प्रसिद्ध आहेतच त्याचबरोबर ते उत्तम गझल गायक म्हणूनसुद्धा प्रसिद्ध आहेत. त्यांचे महाराष्ट्रात शास्त्रीय गायन, सुगम गायन व गझल गायनाचे अनेक कार्यक्रम होतात. त्यांनी श्री क्षेत्र चाकरवाडी येथे महाशिवरात्रीनिमित्त अभंगवाणी सादर केली. सूरताल अकॅडमी मुंबईतर्फे दादर माटुंगा कल्चरल हॉलमध्ये शास्त्रीय गायन सादर केले. सोलापूर येथे पं. भिमरावदादा कनकधर स्मृति संगीत समारोहात बहारदार गायन केले याबरोबरच त्यांच्या गायनाच्या अनेक ध्वनिफिती प्रकाशित झाल्या आहेत. त्यामध्ये 'हाक माऊलीची जना', 'दिव्य प्रगटले जेतवनी', 'शिवलिंग शालीग्राम' आदीचा उल्लेख करता येईल. सध्या ते नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ जि. बीड येथे संगीत अधिव्याख्याता या पदावर कार्यरत आहेत. ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभिजात संगीताचे धडे देत आहेत.

* **श्री. सद्वर्तन खोडके :**

हे संगीत अलंकार, संगीत भास्कर (गायन, तबला) आहेत. त्यांनी तबलावादनाचे



शिक्षण पं. शांताराम चिगरी यांच्याकडेच घेतले. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापिठातून एम. ए. संगीत ही पदवी त्यांनी प्राप्त केली. विशेष म्हणजे त्यांना या परीक्षेत सुवर्णपदक मिळाले. त्यांनी शकुंतलादेवी इन्स्टिट्यूट फॉर म्युझिक-ड्रामा-कल्चर ॲण्ड परफॉर्मिंग आर्ट' (SIMDCPA) या संस्थेची स्थापना २०११ साली केली. नवकिरण मानव सेवा मंडळाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या या संस्थेत अनेक विद्यार्थी गायन-वादनाचे धडे घेऊन विशारद एम. ए. बी. एड. झाले आहेत. मोजकेच विद्यार्थी घेऊन त्यांना व्यासपीठाचे कलावंत घडविण्याचे ध्येय साकारताना दिसत आहे. सध्या ते कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी येथे संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

* **श्री. अमर कडतने :**

यांचा जन्म लातूर येथे दिनांक ०६ सप्टेंबर १९७६ रोजी झाला. यांनी गुरुजींकडे गायन, वादनाचे धडे घेऊन संगीत विशारद, तबला विशारद, तबला भास्कर, हार्मोनियम विशारद या पदव्या प्राप्त केल्या. यांनी १९९८ साली पद्मावती शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित शारदा संगीत महाविद्यालयाची स्थापना केली. या विद्यालयातून ते संगीताचा प्रचार व प्रसार करत आहेत. आज लातूरमध्ये शारदा संगीत महाविद्यालयाच्या १) संभाजी नगर - मुख्य शाखा, २) बार्शी रोड, ३) सीताराम नगर अशा तीन शाखा सुरू आहेत. या विद्यालयातून शेकडो विद्यार्थी अभिजात संगीताचे शिक्षण घेत आहेत.

* **श्री. जयप्रकाश हरिदास :**

यांचा जन्म ८ मार्च १९७७ रोजी लातूर येथे झाला. यांनी गुरुजींकडे संगीत विशारदपर्यंत गायन, वादनाचे धडे घेतले. ते सन १९९७ साली स्वा. रा. ती. विद्यापीठअंतर्गत युवकमहोत्सवात अनेक पारितोषिके प्राप्त केली. त्यांनी महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित विविध कला महोत्सवात सादरीकरण केले. श्री. श्री. रविशंकरद्वारा आयोजित आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ताल-निनाद या कार्यक्रमातून सादरीकरण केले. त्यांनी श्री. साई भक्ति गीतांची सी. डी. ची निर्मिती केली ज्यामध्ये गायक श्री. मधुसूदन कोटलवार हे होते व सी. डी. चे उद्‌घाटक श्री. विलासरावजी देशमुख हे होते. सध्या ते पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, लातूर येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

* **प्रा. संजय सरवदे :**

यांनी गुरुजींकडून तबला वादनाची तालीम घेतली. ते तबला विशारद, गायन विशारद आहेत. त्याचबरोबर त्यांनी एम. ए. गायन व तबला, संगीत नेट या पदव्या प्राप्त

केल्या आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाकडून आयोजित राज्य स्तरीय संगीत नाटक स्पर्धेत तबलावादनाचे पहिले पारितोषिक मिळाले आहे. ते उत्तम तबलावादक तर आहेतच त्यांचबरोबर ते उत्तम ढोलकीवादक, ढोलकवादक व हार्मोनियमवादक म्हणून परिचित आहेत. महाविद्यालयीन जीवनात त्यांनी अनेक सांगीतिक स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके प्राप्त केली आहेत. सध्या ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद येथे कार्यरत आहेत.

* **श्री. एकनाथ पांचाळ :**

यांचा जन्म १ जानेवारी १९८४ रोजी झाला. त्यांनी संगीताचे प्राथमिक धडे शाम वडधरे यांच्याकडून घेतले. त्यानंतर पं. शांताराम चिगरी यांच्याकडून तबलावादनाची उच्चस्तरीय तालीम घेतली. त्याबरोबरच त्यांना काही दिवस पं. अरविंदकुमार आझाद यांच्याकडूनही मार्गदर्शन मिळाले. त्यांचे तबला विशारद व एम. ए. संगीतपर्यंतचे शिक्षण झाले आहे. ते उत्तम तबलावादक तर आहेतच त्याचबरोबर ते उत्तम साथसंगतकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी पं. कैवल्यकुमार गुरव, पं. गिरीश गोसावी, श्री. मधुसूदन आपटे, भजनसम्राट बाबुरावजी धमगीकर, पं. पंकज शिरभाते (व्हायोलिन), पं. विवेक लिमकर (सतार), भजनसम्राट शंकर वैरागकर, तुकाराम गोसावी, पं. बोळंगे गुरुजी, बाळासाहेब वाईकर अशा अनेक गायक-वादकांबरोबर उत्तम साथसंगत केली आहे. महात्मा बसवेश्वरांच्या वचनांची 'बसवामृत' ही सी. डी. त्यांनी संगीतबद्ध केली आहे. त्याचबरोबर लातूर व निलंगा येथून संगीत प्रचार व प्रसाराचे कार्य करीत आहेत.

* **श्री. विजय श्रीमंगले :**

यांचा जन्म ३ जानेवारी १९८५ रोजी झाला. त्यांनी संगीताचे प्राथमिक धडे प्रा.अंगद गायकवाड यांच्याकडून घेतले. त्यानंतर त्यांनी पं. शांतारामजी चिगरी व शकुंतलादेवी चिगरी यांच्याकडून शास्त्रीय गायनाचे धडे घेतले. त्यांनी संगीत अलंकार व एम. ए. संगीत पर्यतचे शिक्षण पूर्ण केले आहे. महाविद्यालयीन जीवनापासून त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये शास्त्रीय गायन व सुगम संगीतात अनेक पारितोषिके प्राप्त केली. ज्यात वैद्यनाथ महोत्सव, परळी येथे भावगीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक, छत्रपती शिवाजी महोत्सव, उमरगा येथे भावगीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक, लातूर फेस्टिव्हलमध्ये सिनेशास्त्रीय गायन स्पर्धेत प्रथम पारितोषिक, स्वा. रा. ती. म. विद्यापीठांतर्गत युवकमहोत्सवात शास्त्रीय गायन, सुगम गायन व सूरवाद्यात पारितोषिके प्राप्त केली. लातूरमध्ये राहून अनेक वर्षे त्यांनी संगीताचा



प्रचार व प्रसार केला. सध्या पुणे येथे ते वास्तव्यास असून तेथे 'आरोही संगीत महाविद्यालयातून' अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **प्रा. शरद सूर्यवंशी :**

निलंगा तालुक्यातील मदनसुरी या छोट्याशा गावी त्यांचा जन्म झाला. घरात संगीताचे वातावरण नव्हते. अशा स्थितीत त्यांनी पं. शांताराम चिगरी व सौ. शकुंतलादेवी चिगरी यांच्याकडे तबलावादनाची तालीम घेतली. ते उत्तम स्वतंत्र तबलावादक व साथसंगतकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी हेमा उपासनी, खंडेराव कुलकर्णी, नृत्यांगना रागिणी कौसडीकर यांच्या तबलावादनाची साथसंगत केली तर पुणे, औरंगाबाद, भालकी, बीड, जालना व उमरगा या ठिकाणी स्वतंत्र तबलावादनाचे कार्यक्रम केले आहेत. सोलापूर येथील तालनिनाद या विश्वविक्रमी कार्यक्रमात त्यांनी तबलावादन केल्यामुळे त्यांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. सध्या ते चैतन्य कनिष्ठ महाविद्यालय, निवाडा फाटा, ता.रेणापूर येथे संगीत अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

* **श्री. तेजस धुमाळ :**

यांचा जन्म ८ सप्टेंबर १९९२ रोजी झाला. त्यांनी संगीताचे प्राथमिक शिक्षण वडील विश्वनाथ धुमाळ यांच्याकडे घेतला. त्यानंतर सुभाष देशमुख व पं. छबुराव भरणे, नागपूर यांच्याकडून संगीताची तालीम घेतली. त्यानंतर पं. शांताराम चिगरी गुरुजींकडे गुरुकुल पद्धतीने विधिवत तबलावादनाची तालीम घेतली. त्यांनी तबला अलंकार व एम. ए. संगीत ही पदवी प्राप्त केली. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी अनेक राज्य व राष्ट्रीय स्तरावर तबलावादनाची अनेक पारितोषिके प्राप्त केली. क्रीडा युवक संचलनालय, पुणे यांच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या राज्य स्तरीय युवा महोत्सवात सलग तीन वर्षे महाराष्ट्रात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला तर अनेक राष्ट्रीय युवकमहोत्सवात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्त्व केले. तसेच स्वा. रा. ती. म. विद्यापीठांतर्गत केंद्रीय युवकमहोत्सवात ३ वेळा सुवर्णपदक व दोन वेळा रौप्यपदक प्राप्त केले. इंद्रधनुष्य युवकमहोत्सव, पश्चिम विभागीय युवकमहोत्सवातही त्यांनी तबलावादनात अनेक पारितोषिके प्राप्त केली. त्यांनी आजपर्यंत मेंगलोर (कर्नाटक), भुवनेश्वरी (ओरिसा), डोंबिवली, सोलापूर व उस्मानाबाद अशा अनेक ठिकाणी त्यांनी स्वतंत्र तबलावादन केले आहे.

* **सौ. चंद्रकला खोसे :**

यांचा जन्म २० जून १९८६ रोजी किल्लारी येथे झाला. त्यांनी संगीताची तालीम त्यांचे वडीलबंधू प्रा.अंगद गायकवाड यांच्याकडून घेतली. त्यानंतर त्यांनी पं. शांताराम चिगरी व सौ. शकुंतलादेवी चिगरी यांच्याकडून संगीत अलंकार व एम. ए. संगीतपर्यंतचे शिक्षण घेतले. शालेय जीवनापासूनच त्यांनी विविध सांगीतिक स्पर्धेत यश प्राप्त केले. ज्यात अष्टविनायक राज्य स्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धेत प्रथम पारितोषिक, युवकमहोत्सवात शास्त्रीय व सुगम गायनात प्रथम पारितोषिक, माजलगाव येथे नाट्यगीत स्पर्धेत प्रथम पुरस्कार इत्यादी स्पर्धांचा उल्लेख करता येईल. तसेच त्यांनी यशवंतराव पटवर्धन अकादमी, रत्नागिरीतर्फे आयोजित कार्यक्रमात गायन सादर केले. एकनाथ नाट्यमंदिर, औरंगाबाद येथे हे चांदणं सुरांचे या विशेष कार्यक्रमात सुगम गायन प्रस्तुत केले. गोपालगायन समाज-पुणे, कल्चरल सेंटर-पनवेल येथे शास्त्रीय गायनाचे सादरीकरण केले. सध्या त्या देहू येथे सूरताल संगीत विद्यालयातून विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देऊन प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **श्री. अजित किंबहुने :**

यांचे सांगीतिक शिक्षण पं. शांताराम चिगरी व सौ. शकुंतलादेवी चिगरी यांच्याकडे झाले. त्यांनी एम. ए. (संगीत) तबला अलंकार -अ. भा. गां. म. मंडळ, मुंबई यांची पदवी मिळवली. ते उत्तम स्वतंत्र तबलावादक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याबरोबरच ते उत्तम साथीदार म्हणून परिचित आहेत. त्यांनी आजपर्यंत पं.हेमंत पेंडसे, पं.सुहासिनी कोरटकर, पं. मोहन दरेकर, पं. राजेंद्र कंदलगावकर, पं. संहिता नंदी, पं. जयंत केजकर, पं. जयतीर्थ मेवंडी, पं. माधुरी डोंगरे, डॉ. पोर्णिमा धुमाळे, पं. शिवदास देगलूरकर, पं. गिरीश जोशी, पं. उत्तम चिगरी, पं. रघुनंदन पणशीकर, अंगद गायकवाड, खंडेराव कुलकर्णी, पं. वैजयंती जोशी (सितार), उ. मोहसीन मिरजकर, सौ. अश्विनी कर्पे आदि गायक-वादकांना उत्तम साथसंगत करून मैफीली रंगवल्या आहेत. स्वरमाधुरी या ध्वनिफितीचे संगीत निर्देशन करून ती प्रसारित केली आहे. सध्या पुणे येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. पुणे येथे मासिक संगीत सभेचे आयोजन करून ते अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **प्रा. हरीश कुलकर्णी :**

यांचा जन्म ०२ जानेवारी १९८७ रोजी लातूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण वडील श्री. खंडेराव कुलकर्णी यांच्याकडे झाले. यानंतर पं. शांताराम चिगरी, डॉ. सुहासिनी



कोरटकर, श्री. केदार बोडस यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. त्यांनी एम. ए. (संगीत), बी. एड, संगीत विशारद या पदव्या प्राप्त केल्या. इयत्ता १२ वीत असतानाचा त्यांनी सांस्कृतिक कार्यामुळे त्यांची निवड N.C.C.च्या राष्ट्रीय परेडसाठी दिल्ली येथे झ ााली. स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या युवकमहोत्सवात सन २०१२, २०१३ मध्ये सलग दोन वर्षे शास्त्रीय गायन स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. त्यानंतर त्यांनी भारत सरकारची राष्ट्रीय युवा कलाकार शिष्यवृत्ती, N.C.P.A. मुंबईची शिष्यवृत्ती प्राप्त केली. तसेच कै. रामराव कोरटकर पुरस्कार देऊन गानवर्धन संस्था, पुणे यांनी त्यांचा पं. सुरेश तडवळकर यांच्या हस्ते सन्मान केला. याबरोबरच कै .पं. योगिनी जोगळेकर पुरस्कार- पुणे विद्यापीठ, पुणे, एम. ए. संगीत सुवर्णपदक - ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ, - क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्यतर्फे आयोजित राज्य स्तरीय युवा महोत्सवात शास्त्रीय गायन स्पर्धेत प्रथम - २०१२-१३ (सलग दोन वर्षे), अष्टविनायक राज्य स्तरीय शास्त्रीय व सुगम गायनात प्रथम पारितोषिक, - Tech Mahindra company चा यंग आर्टिस्ट Expting No Limit Award.अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित झाले आहेत. सध्या ते ज्ञानेश्वर विद्यालय, लातूर येथे संगीत अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

* **जलील पाशा :**

यांचा १७ जुलै १९८४ रोजी कर्नाटकातील गंगावती येथे झाला. यांचे प्राथमिक शिक्षण त्यांचे वडील श्री. राजासाब मुद्दाबली यांच्या कडे झाले. नंतर गदग येथे श्री. शरणकुमार गुट्टारगी यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले. तसेच पं. शांताराम चिगरी गुरुजी यांच्याकडे तबलावादनाची उच्च स्तरीय विधिवत तालीम घेतली. त्यांनी कर्नाटकमध्ये तबला विषयात 'विद्वत' ही पदवी- २००५ घेतली तर १९९९ साली तबला सिनियर ही पदवी प्राप्त केली. त्यांनी इ. स. २००० मध्ये गंगावती, कर्नाटक येथे सुवर्णमहोत्सवी प्रजासत्ताकदिनानिमित्त सतत १० तास तबलावादन केले. तसेच गदग येथे पद्मभूषण पं. पुट्टराज गवई यांच्या ९३ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित समारोहात सतत २० तास तबलावादन केले. त्यांनी जागतिक गिनीज बुक व जागतिक लिमका बुकमध्ये नोंद होण्यासाठी अखंड ६३ दिवस दररोज १६ तास प्रमाणे एकूण १००८ तास तबलावादन केले. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ज्यात शंकरा प्रशस्ती पुरस्कार, तबला चतुर पुरस्कार, सुवर्ण कर्नाटक कन्नड राज्योत्सव पुरस्कार, लय विद्या प्रवीण पुरस्कार, कल्याण नदीना कलाराधना पुरस्कार या पुरस्कारांचा उल्लेख करता येईल. सध्या ते बेंगलोर विद्यापिठात तबला विषयाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत आहेत.

याबरोबरच गुरुजींनी अनेक शिष्य घडविले ज्यामध्ये पं. मुकेश जाधव, प्रमोद रायचूरकर, सुभाष पाटील, माणिकराव निलंगेकर, प्रा. महावीर उदगीरकर, मोहन देशपांडे, बालासाहेब सूर्यवंशी, भाऊसाहेब रायते, प्रा. सुधीर अनवले, सुधाकर मोरे, सुनीता लोया, जयंत दिवाण, मोहन धर्माधिकारी, अरूण स्वामी, प्रा. राहुल अपशेट्टी, सोनू डगवाले, प्रमोद भोयरेकर, दिपिका डिगोळे, बीभीषण खोसे, शिरीष देशपांडे, विशाल जाधव, कु. राधिका पाठक इ. गायक-वादक शिष्यांचा नामोल्लेख करता येईल.

गुरुजींचा शिष्यवर्ग केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर कर्नाटकातसुद्धा पसरलेला आहे. शिवाजी सगर (भातंब्रा), हनुमंत हुगार (विजापूर), जयराम कुलकर्णी (गुलबर्गा), मल्लिकार्जुन (कर्नाटक), स्वाती कुमठेकर (बीदर), इ. शिष्यांचा उल्लेख करता येईल. थोडक्यात असे म्हणता येईल की पं. चिगरी यांनी महाराष्ट्राच्या सांगीतिक विश्वात भर घालण्यासाठी शेकडो शिष्य निर्माण केले. या शिष्यांनी महाराष्ट्रच नव्हे तर देश-विदेशात अभिजात संगीताचा प्रसार व प्रचार केला. खरोखरच हे कार्य अवर्णनीय आहे.

**मौलिक बंदिशीच्या रचना :**

प्रतिभा ही लाभावीच लागते. ती ओढून-ताणून आणता येत नाही. संगीताची तालीम घेऊन अनेक दशके ओलांडली तरी आजही पं. शांताराम चिगरी गुरुजींची स्मृती तल्लख आहे. शिकविताना ते ना ग्रंथाचा आधार घेतात ना संगणकाचा. स्वर-ताल-लय रचना सारं काही त्यांच्या डोक्यात आहे. ते जेव्हा शिकविण्यास प्रारंभ करतात तेव्हा त्या रागाचे स्वरूप व तालातील बंदिशीचे स्वरूप आपोआप स्पष्ट होते. शिकविताना त्यांना त्या बोलाचे आपोआप स्फुरण होते. त्यांच्या प्रतिभेला सृजनांचे घुमारे फुटतात आणि नकळतच या सरस्वती पुत्राच्या मुखातून त्याचे स्वरूप बाहेर पडते. ज्याप्रमाणे एखादा कवी कविता करतो, तद्वतच गुरुजी कायदे, पलटे, रेले, टुकडे, चक्रदार, परण इ. रचना करतात. तालाचे गणित डोक्यात पक्के आहे त्यामुळे चारपाच मिनिटातच त्यांची नवीन रचना जन्म घेते. रागाच्या बाबतीतही तसेच आहे. शिकविताना बंदिशी, आलाप, ताना, लयकारी, बोलबाट इ. बाबी आपसुकच गळ्यात उतरू लागतात. अशाप्रकारे गुरुजींनी असंख्य रचनांची निर्मिती करून भारतीय संगीताला मोलाचे योगदान दिले आहे.

**नवीन तालाचे सृजन :**

गुरुजींनी गायन-वादनातील केवळ विशारदची पदवी प्राप्त केली तिही गरज म्हणून. वास्तविक पाहता गुरुजींनी खानदानी शिक्षण प्राप्त केल्यामुळे अनेक विद्यार्थी विशारदच



नव्हे तर अलंकार झाले. एवढेच नाही तर अगदी पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करू शकतील एवढा ज्ञानाचा सागर त्यांच्याजवळ आहे. त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने व सृजनशीलतेने एका नवीन तालाची निर्मिती केली आहे. त्यांनी त्या तालाचे नाव 'षष्टम रूपक' असे ठेवले आहे. अत्यंत सुंदर व मनोवेधक रचना आहे. रुपकप्रमाणे वाटणारा; परंतु ६ मात्रांचा हा ताल मनाची पकड घेतल्याशिवाय रहात नाही.

मात्रा - ६
विभाग - ३ (३-३ मात्रांचे)
टाळ्या - २ (तिसऱ्या व पाचव्या मात्रेवर)
काल - १ (पहिल्या मात्रेवर)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मात्रा | - | १   २ । | ३   ४ । | ५   ६ । |
| ठेका | - | तिंऽ तात्र । | कधि ऽधी । | ऽधा त्रक । |
| चिन्ह | - | ० । | १ । | २ । |

अशा प्रकारचा हा ताल आहे; परंतु हा ताल म्हणावा तसा प्रचलित होऊ शकला नाही यांची खंत त्यांना आहे

**मानसन्मान व पदव्या :**

पं. शांतारामजी चिगरी गुरुजींनी शेकडो शिष्यांना घडविले. अंधत्त्वातून प्रकाशमान आयुष्य करणाऱ्या पं. शांतारामजी चिगरी गुरुजींना अनेक मानसन्मान मिळाले त्याची माहीती पुढीलप्रमाणे आहे.

०१. पं. शांतारामजी चिगरी यांना गदग येथील पुट्टराज स्वामींनी सुवर्णमुद्रा देऊन गौरव केला. कर्नाटकातील 'डॉ. पुट्टराज गवई' हे असे नाव आहे की त्यांचे वर्णन 'पृथ्वीवर अवतरलेला मानव देहधारी स्वर्गाचा गंधर्व असाच करावा लागेल.

०२. दी आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक परमपूज्य गुरूदेव श्रीश्री रविशंकर गुरुजींच्या सान्निध्यात सोलापूर येथे दि. १७ जानेवारी २०१२ यादिवशी 'तालनिनाद' हा विश्वविक्रमी कार्यक्रम संपन्न झाला यात अभिजात संगीतासाठी ज्या ज्येष्ठ कलावंतांनी योगदान दिले अशांचा श्रीश्री रविशंकर गुरुजींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात पं. शांतारामजी चिगरी यांचाही सत्कार करण्यात आला.

०३. अखिल भारतीय श्री. गुरूदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रम, अमरावती यांच्याकडून

पं. शांतारामजी चिगरी यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सुरू केलेल्या या संस्थेकडून विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. पं. चिगरी यांनी भारतीय शास्त्रीय संगीतात विशेष योगदान दिल्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

०४. कर्नाटक सरकारने 'कलाश्री' हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान केला.

०५. पुणे येथील स्वरांगण दृष्टीहीन संस्थेच्या वतीने २०१३ मध्ये 'स्वरभूषण' पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले.

०६. रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने २००३ साली चैत्रपल्लवी पुरस्काराने देऊन सपत्नीक सत्कार केला.

०७. यशवंतराव चव्हाण स्मृति समिती, अंबाजागाई यांच्या वतीने पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

०८. कर्नाटकातील भातंब्रा या गावी कर्नाटकातील गुरुजींच्या शिष्यांनी नाण्यांनी तुलाभार करून सत्कार केला.

०९. लातूर जिल्हा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

१०. दि. २४ ऑगस्ट २०१४ या दिवशी पं. शांतारामजी चिगरी यांचा अमृतमहोत्सवी सोहळा लातूरकरांच्या स्मरणात राहील असाच झाला. लातूरच्या सांस्कृतिक परंपरेत संगीत क्षेत्राला मानाचे स्थान प्राप्त करून देणाऱ्या पं. शांताराम चिगरी गुरुजी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सूरताल संगीत विद्यालयातील शिष्यांनी एकत्र येऊन अमृतमहोत्सव समिती स्थापन करून आपल्या गुरूप्रती असलेला आदरभाव व्यक्त केला. गुरूचे ऋण फेडण्यासाठी दयानंद सभागृहात गौरव सोहळ्याचे आयोजन केले होते.

गुरुजींचा नाथ संस्थानचे अध्वर्यू ह. भ. प. गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला तसेच या वेळी त्यांच्या शिष्यांच्या वतीने नाणे तुला ही करण्यात आली. विशाल जाधव या शिष्याने रु.७५०००/- चा धनादेश देऊन गुरूप्रति कृतार्थ भाव व्यक्त केला. प्रा. संदीप जगदाळे यांनी संपादित केलेल्या 'सूरताल' या त्यांच्या जीवन कार्यावर आधारित गौरवग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. या वेळी राज्यमंत्री अमित देशमुख व ॲड. त्र्यंबकदास झंवर उपस्थित होते. या सोहळ्यात पं. चिगरी यांचे शिष्य पं. मुकेश जाधव यांचे तबलावादन, जगविख्यात



गायक उस्ताद अर्शदअली खान यांनी शास्त्रीय गायन केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. ०४ मार्च २०१८ रोजी पं. शांताराम चिगरी यांना अभिजात शास्त्रीय संगीतातील मौलिक योगदानाबद्दल राज्यसांस्कृतिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील रविंद्र नाट्यमंदिरात हा दिमागदार सोहळा संपन्न झाला. रू. १ लाख, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. या प्रसंगी राज्याचे सांस्कृतिक मंत्री श्री. विनोदजी तावडे, पं. उपेंद्र भट, राज्य सांस्कृतिक मंडळाचे संचालक श्री. संजय पाटील, पं. पांडुरंग मुखडे, पं. शिवराजजी देगलूरकर इ. मान्यवर उपस्थित होते.

* **गौरवोद्‌गार :**

०१. पृथ्वीवर एका ठिकाणी काळोख असला तरी त्याच वेळेला दुसरीकडे सुर्याचा लख्ख प्रकाश पडलेला असतो. तसेच चिगरी बुवांचे बाह्य चक्षू जरी काळोखले असले तरी अंतःचक्षू समोर लख्ख प्रकाश असल्यामुळे त्यांच्या रागाच्या आणि तालाच्या प्रतिमा उजळल्या आहेत. त्याचे तेज पुढच्या पिढीला दिशादर्शक ठरेल हे निश्चित. **- डॉ. विकास कशाळकर**

०२. अश्वत्थाम्याप्रमाणे शेकडो शिष्यांच्या जीवनात संगीत अध्ययन, अध्यापनाचा प्रकाश पोहोचविला आहे. विद्यार्थ्यांनी संगीत गायनाचे तथा तबला, पखावज अध्ययन करून विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर केले. आपल्या शास्त्रशुद्ध अभिजात गायन-वादनाचा महाराष्ट्र स्तरावर ठसा उमटविला. **- पं. रघुनाथ केसकर**

०३. जन्मांध असले तरी निसर्गाने डोळ्याची भरपाई मात्र देताना गुरुजींना स्वरतालाची मौलिक देणगी देवून जास्ती डोळस केले असे त्यांचे गायन आणि वादन ऐकल्यानंतर मला तरी वाटते. पं. ओंकारनाथ ठाकूर व पं.विनायकबुवा पटवर्धनांची अस्सल ग्वाल्हेर गायकी त्यांनी आत्मसात केलीच पण तबलावादनात बनारस व फरूखाबादी बाजाला दिल्लीचेही किनार लाभल्याचे त्यांचे स्वतंत्र वादन ऐकल्यानंतर लक्षात येते. **- पं. शिवदासजी देगलूरकर**

०४. कोणत्याही प्रकारचा संगीत वारसा नसलेल्या पण संगीताच्या ध्येयाने झपाटलेल्या एका थोर व्यक्तिमत्त्वाच्या पावलांनी लातूरच्या संगीतविश्वात सोनं ज्यांनी केलं, चंदनाप्रमाणे स्वतः झिजून इतरांना सुगंध दिला तसेच संगीत विश्वात लातूर पॅटर्नचे नाव यशाच्या शिखरावर नेऊन पोहोचविले संगीत विश्वातील महामेरू म्हणजे पं. शांताराम चिगरी गुरुजी. **- श्री. विठ्ठलराव जगताप.**

**संगीत सूर्याचा अस्त :**

पं शांतारामजी चिगरी गुरूजींनी शुन्यातून विश्व निर्माण केले होते. स्वत:चे सुंदर घरकुल उभे केले होते. तेथून अभिजात संगीताच्या प्रचार व परिसराचा झरा अविस्त खळखळून वाहत होता.पांथस्थांची ओंजळ भरत होता. उतारवयात सुद्धा संगीत साधनेत खंड पडत नव्हता. शकुंतलादेवी यांच्या अकाली निधनानंतर संसाराचा गाढा सुरळीत चालावा यासाठी त्यांनी सुमन यांच्याशी विवाह केला. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी पै पै जमा करून विकत घेतलेली जागा त्यांनी अखिल भारतीय गंर्धव महाविद्यालयाला दान केली.

सुख समाधान व ऐश्वर्याचे दिवस येत असताना पुन्हा दैवाने गुरूजींवर घाला घातला. त्यांनी पोटदुखीचा त्रास सुरू झाला. वैद्यकीय तपासणीअंती निदान झाले की त्याना पोटाचा कर्करोग झाला आहे आणि मग सुरू झाल्या मरणप्राय यातना. हळूहळू जेवण बंद झाले. आता गुरूजींचा देह मानवी देह दिसत नव्हता.केवळ राहिला होता तो हाडांचा साफळा. याही स्थितीत गुरूजी हसतमुखाने या वेदना सहन करायचे. येणाऱ्या शिष्यांना संगीताचे ज्ञानामृत पाजयचे. अनेक वैद्यकीय उपचार केले पण इलाज होऊ शकला नाही. भेटायला येणार प्रत्येकजन हळहळत होता.

अखेर २०१८ वर्षातील सप्टेंबर महिन्यातील दहा तारीख उजाडली. वार सोमवार.... सूर्य उगवण्याला अवकाश होता. अशातच या संगीतातील भीष्माचार्यांनी अखेरचा श्वास घेतला. केवळ सुरताल परिवारच नव्हे तर संपूर्ण लातूर शोकाकुल झाले. त्यांच्या अखेरच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातीलच नव्हे तर कर्नाटकातून सुद्धा अनेक चाहत्यांनी गर्दी केली. लातूर पासून जवळ जवळ असलेल्या अंकोली येथील त्यांच्या प्लॉटमध्ये संगीतातील हा भीष्माचार्य कायमची चिरनिद्रा घेत होता. गुरूजींच्या जाण्याने मराठवाड्यातल संगीत पोरके झाले.

मृत्यूनंतर त्यांच्या स्मृती कायम राहव्यात यासाठी लातूर महानगर पालिकेच्या वतीने मराठवाडा स्तरीय पं. शांताराम चिगरी कलारत्न पुरस्कार देण्याचे निश्चित केले. यात गुरूजींचे शिष्य व महानगर पालिकेच्या स्थायी समितीचे सदस्य विशाल जाधव, मनपा स्थायी समितीचे सभापती व रंगकर्मी शैलेश गोजमगुंडे, महापौर सुरेश पवार यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. एवढेच नाही तर त्यांच्या शिष्यांनी दि.१२ व १३ एप्रिल २०१९ या दोन दिवशी गुरूजींच्या पहिल्या जयंतीनिमीत्त संगीत महोत्सवाचे आयोजन करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

♦ ♦ ♦



प्रकरण

६

# डॉ. राम बोरगावकर



भारतीय तबलावादनाच्या क्षेत्रामध्ये घराणेदार पद्धतीने आपल्या कार्यकर्तृत्त्वाचा ठसा अनेक महान कलावंतांनी उमटवलेला आहे. त्यामध्ये पं. डॉ. राम बोरगावकर यांचे कला क्षेत्रातील व तबलावादनातील योगदान अद्वितीय असेच मानावे लागेल. तसा फार मोठा सांगीतिक वारसा नसला तरी आजोबांच्या मार्गदर्शनात केलेली दारिद्र्य ते ऐश्वर्यापर्यंतची त्यांची वाटचाल खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. आपल्या नातवांनी कला क्षेत्रात काही तरी भव्यदिव्य करावे, कला क्षेत्रात लातूरचे नाव वाढवावे आणि अभिजात संगीताचा प्रचार-प्रसार व्हावा ही आजोबांची म्हणजेच बाबांची मनोमन इच्छा होती. उपजत जातिवंत प्रतिभा घेऊन जन्मलेल्या चिमुकल्या रामचा हात तबल्यावर फिरायला लागला. एका एका पावलांवर अडचणींचा डोंगर उभा असताना वादळातील दीपस्तंभाप्रमाणे आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून एक कलावंत म्हणून उभे टाकणे हे खरोखरच अवघड काम. कारण वाटेवरून चालणाऱ्यांची संख्या भरपूर असते पण नव्या वाटांचा शोध घेऊन त्यावर चालणे कठीण असते. ध्येय व जिज्ञासा एकत्र आल्यानंतर काय होते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच पं. डॉ. राम बोरगावकर होय. महाराष्ट्रातल्या कलेच्या क्षितिजावर जी काही खानदानी व घराण्याशी एकनिष्ठ असलेले कलावंत आहेत त्यात त्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

* **जीवनवृत्त :**

डॉ. राम बोरगावकर यांचा जन्म ५ मार्च १९६३ साली लातूर येथे झाला. घरात थोडेफार संगीताचे वातावरण होतेच. त्यांच्या वडिलांचे नाव कमलाकर तर आईचे नाव कमलाबाई आहे. आजोबा सदाशिवराव ऊर्फ बाबा बोरगावकर हे संगीताचे जाणकार होते. ते उत्तम हार्मोनियम वादक होते. ते तबलाही वाजवायचे तसेच दोन्ही हातांनी पायपेटी वाजवायचे. लातूर जिल्ह्यातील चाळीस खेड्यांत ते नाटकाचे तालीम मास्तर होते. नाटकाच्या

वेडासाठी त्यांनी घरातून पलायन केले होते. अचरेकर नाटक मंडळी व बालगंधर्वांच्या नाटक मंडळीत त्यांनी छोट्या मोठ्या भूमिका केल्या. मी कलावंतांचे कपडे धुवीन पण मला तुमचा सहवास लाभू द्या. मला खूप शिकायचे आहे, असे म्हणून त्यांनी अचरेकरांच्या नाटक मंडळीत दीड वर्षे सेवा केली. त्या काळात देशभक्तीची लाट उसळली होती. त्यामुळे त्यांनी खेड्यापाड्यांत देशभक्तिपर नाटके सादर केली. जंगल सत्याग्रहात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. त्यांनी अंबाजोगाई येथे जाऊन ताडीची झाडे तोडली. त्यामुळे त्यांना तुरूंगवास भोगावा लागला. रझाकाराच्या काळात त्यांनी पोलिस स्टेशनवर हात बॉम्ब टाकला. त्या वेळी त्यांना पकडण्यासाठी अटक वॉरंट निघाले होते. त्यामुळे त्यांना बेळगाव येथे जाऊन सहा महिन्यांसाठी भूमिगत व्हावे लागले. तेथे राहून त्यांनी नाटके बसविली. जेव्हा रझाकार संपले तेव्हा बेळगावकरांनी त्यांचा यथोचित सन्मान केला. बिदागी व भेटवस्तू देऊन त्यांना निरोप दिला.

बाबांना दीडशे एकर जमीन होती पण त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकारांनी त्यांची जमीन हडप केली. त्यामुळे नाटकांतून त्यांनी अशिक्षित लोकांना सज्ञान करण्याचे काम केले. नाटकांतून समाजप्रबोधन केले. जातिपातीची बंधने तोडून टाकण्याचा प्रयत्न केला. आपण अज्ञानामुळे फसलो याचे त्यांना शल्य होते. त्यामुळे त्यांनी मुळग्रामी दर्जी बोरगाव येथे चौथीपर्यंत शाळा सुरू केली.

सन १९५५ ते १९६१ या कालावधीत त्यांनी लातूर येथे संगीत वाद्ये बनविण्याचा कारखाना सुरू केला तर १९६३ साली लातूर येथेच पहिल्या 'सरस्वती संगीत विद्यालयाची' स्थापना केली. या संगीत विद्यालयात अध्यापिका म्हणून संगीतरत्न कृष्णाबाई रामदुर्गकर व अध्यापक म्हणून नारायणराव जोगळेकर रूजू झाले.

या संगीत विद्यालयाच्या उद्घाटनासाठी मिरजेहून काकासाहेब चिंचोलीकर (सितारवादक), उमरसाहेब (सितारमेकर), पं. सदाशिवबुवा जाधव (गायक) हे उपस्थित होते. लातूरच्या टाऊन हॉलवर उद्घाटन समारंभ संपन्न झाला. जुन्या कापड गल्लीत विद्यालय सुरू झाले. म्हैसाळच्या रेडिओस्टार कृष्णाबाई अभिजात गायनाचे धडे द्यायच्या तर पं. नारायणराव भावगीत, नाट्यगीत व भजन शिकवायचे. त्या काळात घरातील वसंतराव, विलास, विजया व गोविंदराव तसेच न्यायाधीश गाडगीळ व डॉ पत्की ही मंडळी गायनाचे धडे घेऊ लागली.

वाद्यनिर्मितीचा कारखाना चांगलाच थाटला होता. पं. राम बोरगावकरांचे वडील



कमलाकार व काका गोविंदराव या कारखान्यात जीव तोडून मेहनत घेत होते. त्याकाळात बाबांनी सुरत व पुणे येथील हरिभाऊ मेहंदळे कंपनीतील कारागिरांना पाचारण केले होते. वाद्येखरेदीसाठी लातूरच नव्हे तर मुंबई, पुणे व अहमदनगरसारख्या शहरातून लोक यायचे. या शहरात शेकडोंच्या संख्येने वाद्ये पाठविली जायची. या कारखान्यात १६ कारागीर रात्रंदिवस काम करीत असत. डॉ. राम यांचे वडील कमलाकरजी हे हार्मोनियमची उत्तम ट्युनिंग करायचे तसेच ते उत्तम चित्रकारही होते. साळे गल्लीत मोठा वाडा होता. भरभराटीचा काळ सुरू झाला होता. दिवाळीचे दिवस होते. सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. गोडधोड पक्वानांचा सुवास प्रत्येकांच्या घरातून दरवळत होता. दिव्या-पणत्यांनी साऱ्यांची घरे उजळून निघाली होती. अशातच राम यांच्या वडिलांची प्रकृती बिघडली. त्यांना तात्काळ मिरज येथे नेले परंतु उशीर झाला होता. डॉक्टरांनी सांगितले, "यांनी यंत्राप्रमाणे शरीर वापरले. जिवाची पर्वा न केल्यामुळेच हे गतप्राण झाले आहेत." वयाच्या २४ व्या वर्षीच ते हे जग सोडून गेले. ऐन दिवाळीत बोरगावकर कुटुंबीयावर काळोख पसरला.

ज्या वयात मृत्यू कसा असतो हे कळत नव्हते अशा वयामध्ये राम यांचे पितृछत्र हरवले. त्या वेळेस रामचे वय केवळ ११ महिन्यांचे होते. जे वय हसून खेळून बागडायचे असते, त्या वयात तो पोरका झाला. त्याला पितृप्रेम व पितृसहवास मिळाला नाही. अशा स्थितीत आजोबा बाबांनी मात्र तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. अगणित कष्ट झेलीत कला क्षेत्रात पुढे जाण्यासाठी त्यांनी छोट्या रामला प्रोत्साहन दिले. आई कमलाबाई यांनी तर रणरागिनीप्रमाणे परिस्थितीशी झुंज देत रामला सावरले. यासंदर्भात डॉ. राम यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुनीता लिहितात, "कमलाकररावांच्या संसाराची नुकतीच छानशी सुरुवात झाली होती आणि अचानक डाव विस्कटला. त्यांच्या पत्नी कमलाबाईवर जणू दुःखाचा डोंगर कोसळला. पण या बाईने झाशीच्या राणीचा कित्ता गिरविला. स्वतःचे दुःख पदरात झाकून घराण्याच्या सेवाकार्यात त्या खंबीरपणे सर्वांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. त्या काळात घरात त्या एकट्याच बाई म्हणून होत्या आणि घरात मात्र चोवीस तास आल्या गेल्यांची वर्दळ! सगळ्यांचे अतिशय प्रशस्तपणे व तितक्याच मायेने करणाऱ्या कमलाबाई त्यामुळेच सर्वांच्या हक्काच्या 'भाभी' झाल्या."

अशा प्रकारे अत्यंत कठीण परिस्थितीत चिमुकल्या रामला बाबा, काका गोविंदराव व आई कमलाबाई यांनी प्राणपणाने जपले. संगीत विद्यालय सुरू करून दहा महिने झाले होते पण घरावर झालेला हा मोठा आघात पाहून संगीत चुडामणी रामदुर्गकर यांनी बाबांना संगीत विद्यालय व वाद्यांचा व्यवसाय बंद करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार विद्यालय बंद

झाले. व्यवसायही थंडावला.दारिद्र्यापासून ऐश्वर्यापर्यंत चालणारी ही वाटचाल थांबली.

पुढे पं. शांतारामजी चिगरी व खरोळ्यांचे निवृत्तीबुवा यांनी याच संगीत विद्यालयातून अध्यापनाचे कार्य सुरू केले. काही दिवसानंतर पं. चिगरी हे गुरुवार क्लबमध्ये रूजू झाले. त्यामुळे श्री. गोविंदरावजी बोरगावकर, पेटीवादक कल्लपा शहाबादे व बासरीवादक वसंत पोतदार हे संगीत शिक्षक म्हणून कार्य करू लागले. १९८८ साली सरस्वती संगीत विद्यालयात लातुरातील पहिले गांधर्व मंडळाचे परीक्षा केंद्र सुरू झाले.

चिमुकल्या रामवर संगीताचे संस्कार होतच होते. आजोबांनी राम व बाबू यांना संगीत क्षेत्रातील थोर कलावंत निर्माण करण्याचा निर्धार केला. दोघांनाही ते गायनाचे धडे देऊ लागले. यासंदर्भात डॉ. राम बोरगावकर सांगतात, "मी आणि बाबुरावांनी बाबांकडून दीड वर्षे गायनाची तालीम घेतली. आम्ही दोघे कार्यक्रमात गायनाची जुगलबंदी करायचो. एकदा मोरेगाव येथे हरी करंदीकर यांचे कीर्तन झाल्यानंतर मी व बाबुराव गायनासाठी बसलो. आमची जुगलबंदी सुरू झाली. बाबा हार्मोनियमवर तर अण्णा (गोंविदराव) तबल्याची साथ करीत होते. तेव्हा समोर बसलेली मुले आमच्या गायनाला हसू लागली. त्यांची गाणे ऐकण्याची मानसिकता नव्हती. कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही तेथेच झोपलो. सकाळी उठल्यानंतर तीच मुले पुन्हा आम्हाला चिडवू लागली. तेव्हा माझ्या लक्षात आले की, ही मुले गायनाला हसली. तबल्याला नाही. तेव्हाच मी निर्णय घेतला की, आजपासून आपण गायन न शिकता तबलाच शिकायचा. तेव्हापासून मी अण्णांकडून तबला वादनाचे धडे घेऊ लागलो."

डॉ. राम यांचे शालेय शिक्षण जवाहर प्राथमिक विद्यालय, लेबर कॉलनी, लातूर येथे झाले. माध्यमिक शिक्षण यशवंत विद्यालयात झाले. इ. ११ वी व इ. १२ वी चे शिक्षण राजर्षि शाहू महाविद्यालयात तर बी.ए.चे शिक्षण दयानंद कला महाविद्यालयात झाले. १९८७ साली त्यांचा विवाह सुनीता सावंत यांच्याशी झाला. सौ. सुनीता यांनी शालेय जीवनात पं. शांतारामजी चिगरी यांच्याकडून गायनाचे धडे घेतले होते. मध्यमा पूर्णपर्यंत शिक्षण झाल्यामुळे पुढे पं. राम यांच्याशी सूर जुळायला फार वेळ लागला नाही. त्यांच्या सांगीतिक कारकिर्दीत त्यांनी मोलाचा हातभार लावला. त्या उत्तम चित्रकार आहेत. गोदावरी विद्यालयात त्या चित्रकला व मराठी विषयाचे अध्यापन करीत आहेत. त्याबरोबरच त्या गोदावरी विद्यालयाच्या पर्यवेक्षक म्हणूनही कार्यरत आहेत. मंगेश व गणेश ही त्यांची दोन मुले. मंगेश याने 'सा रे ग म प' च्या माध्यमातून बोरगावकर कुटुंबीयाबरोबरच लातूरचे



नाव संपूर्ण महाराष्ट्रात केले आहे. प्रा. गणेश हा सुद्धा उत्तम तबलावादक म्हणून पुढे येत आहे. त्यांचे संपूर्ण महाराष्ट्रात तबलावादनाचे कार्यक्रम होत असतात. एकंदरीतच बोरगावकर कुटुंबीयांचा सांगीतिक वारसा ही चौथी पिढी अविरतपणे व यशस्वीपणे चालवीत आहे.

डॉ. राम बोरगावकर यांचे व्यक्तिमत्त्व अंतर्बाह्य सुंदर आहे. साडेपाच फूट उंचीचे गौरवर्णीय डॉ. राम हे नेहमी हसतमुख असतात. डोक्यावर वाढलेले केस त्यांचे सौंदर्य वाढवितात.त्यांच्या वागण्यातील विनम्रता सर्वांनाच भावून जाते. त्यांची मधुर वाणी हा एक त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वपूर्ण पैलू आहे.ते जेव्हा इतरांशी बोलत असतात. तेव्हा ऐकणारे त्यांच्या बोलण्यात हरवून जातात. शिष्य असो वा अन्य कोणी त्यांच्यामध्ये रमणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. त्यांचे शिष्य प्रा. विश्वनाथ स्वामी म्हणतात, "पं. रामसरांचा स्वभाव अत्यंत मृदू व गोड आहे. ते अधिकाऱ्यांपासून सामान्य माणूस व सेवकालासुद्धा तेवढेच विनम्र होऊन बोलतात. 'विद्या विनयेन शोभते' या उक्तीप्रमाणे ते नेहमी विनम्र असतात. ते नेहमी म्हणतात, "तुम्ही जोपर्यंत विनम्र होत नाहीत तोपर्यंत तुमची कला फुलणार नाही." त्यामुळे शिष्यांनासुद्धा तोच संदेश ते देत असतात."

विनोद करणे, चुटकुले सांगणे, कोटी करणे आणि त्यातून निखळ हास्यकल्लोळ निर्माण करणे हे त्यांच्या बोलण्यातून नेहमी ठरलेले असते. संगीताचा प्रचार व्हावा, विश्वाचे कल्याण व्हावे हीच त्यांच्या बोलण्यातून तळमळ दिसून येते. केवळ गप्पा मारण्यापुरतेच त्यांचे बोलणे मर्यादित नाही, ते जेव्हा व्यासपीठावरून बोलायला उभे राहतात तेव्हा ते मुरलेल्या वक्त्याप्रमाणे बोलत असतात. तेव्हा त्यांचे बोलणे हे यांत्रिक किंवा औपचारिक राहात नाही. ते मनातून निखळ झरा वाहिल्याप्रमाणे बोलत राहतात. साहजिकच ऐकणारा हरवून गेला नाही तरच नवल. सूत्रसंचालन असो की एखाद्या अभंगाचे निरूपण असो ते उत्तम प्रकारे मांडतात. त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याबद्दल त्यांचे शिष्य प्रा. हरिसर्वोत्तम जोशी म्हणतात, "अतिशय सुसंस्कारित असलेली विचारांची बैठक, अध्यात्माचे अधिष्ठान आणि अहंकारापासून कोसो मैल दूर असेच रामसरांच्या स्वभावाचे विश्लेषण मला करावेसे वाटते. मी कोणी तरी मोठा कलावंत आहे या अभिनिवेशाचा लवलेश मात्रही त्यांच्या वागण्या बोलण्यात व कृतीमध्ये दिसत नाही. जे आहे त्यात सुख शोधणं आणि मानणं ही त्यांची खासीयत आहे. रागावणे, रागात येणे हे चवीला लागणाऱ्या मिठापुरतं त्यांनी सीमित ठेवले आहे. शिष्यांकडून झालेल्या प्रमादाला शिक्षेच्या दृष्टीने उद्रेक कधी झाला नाही. धार्मिकता व भक्ती किती असावी, कशी असावी याचे प्रतीक म्हणजे पं. रामसर आहेत. लग्नपत्रिकेवरचा गणपतीही त्यांचे आराध्य दैवत असतो. त्यामुळे ती लग्नपत्रिकाही रद्दीत

टाकायला त्यांचा हात धजावत नाही. ही पवित्रता त्यांनी मनोमन जपलेली आहे."

यावरून पं. रामसर हे अत्यंत धार्मिक व शिष्यांवर पितृवत प्रेम करणारे गुरू आहेत असे लक्षात येते. त्यांच्या दिनचर्याबद्दल त्यांचे सुपुत्र गणेश सांगतात, "रात्री कितीही वेळ जागरण झाले तरी माझे वडील पहाटे ५ वाजता उठतात. स्नानादी उरकून ते देवपुजा करायला बसतात. घरात देवपूजेसाठी त्यांनी स्वतंत्र खोली केली आहे. मंद आवाजात मंत्रपठणाची सीडी लावलेली असते. घरातील सर्व देवांच्या मुर्ती, प्रतिमांचे ते पूजन करतात, त्यानंतर अंगणातील वृक्षांची पूजा होते. चारही दिशांची पूजा ते करतात. दारातील वाहनांची ते पूजा करतात. देवघरात ध्यानस्थ बसतात. राष्ट्रसंत मोरारी बापूंचा त्यांच्यावर अधिक प्रभाव आहे. त्यांची ते प्रवचने ऐकतात. त्यानंतर ते तबल्याचा रियाज करतात. ते अत्यंत अल्पआहारी आहेत. शुद्ध शाकाहार, अल्पाहार व ध्यानस्थ वृत्तीमुळे ते कधीही चिडचीड करीत नाहीत."

यावरून ईश्वरच नव्हे तर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या उक्तीप्रमाणे वृक्षांची पूजा करणारे रामसर निश्चितच एक पर्यावरणावर प्रेम करणारे सहृदय कलावंत आहेत. त्यांचे शिष्य श्री. लक्ष्मण श्रीमंगले त्यांच्याविषयी म्हणतात, "डॉ. रामसर हे सांस्कृतिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व राजकीय क्षेत्रातसुद्धा तेवढेच रमतात. विविध सांगीतिक उपक्रम करावेत व लातूरच्या रसिकांना ऐकवावे हाच त्यांचा ध्यास असतो. आपले नाव संगीत क्षेत्रात कायम राहावे ही त्यांची आंतरिक तळमळ असते."

माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख व दिलीपरावजी देशमुख यांचा व बोरगावकर कुटुंबीयांचा स्नेह कायम होता.बोरगावकर कुटुंबीयांच्या यशस्वी कारकीर्दीत विलासराव देशमुख यांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले आहे.अर्थात बोरगावकर कुटुंबीयांनासुद्धा त्यांच्यासाठी अनेक मैफीलीचे आयोजन केले. विविध कार्यक्रमांत त्यांचे स्वागत गीत ठरलेलेच असायचे. अत्यंत दर्दी असलेले विलासरावजी त्यांचे संगीत ऐकून सुखाहून जायचे व मनातून दाद द्यायचे. यासंदर्भात सुनीता बोरगावकर लिहितात, "विलासरावांच्या चढत्या काळात तर बाकी अनेक जण त्यांच्यासोबत होते. मात्र दुर्दैवाने मधल्या पाच वर्षांत थोडासा उतरणीचा काळ आला तेव्हाही आमचे घराणे त्यांच्यासोबत होते. खास त्यांच्यासाठी डॉ राम यांनी पं. सुरेश वाडकर यांना लातूरला बोलावून मोठा महोत्सव केला आणि लातूरकरांना दाखवून दिले की, कलाकार हा रसिकांसाठी अशक्य ते शक्य करून दाखवितो. त्यांचे देशमुख घराणे आणि आमचे बोरगावकर घराणे यांच्यामधील स्नेह देखील गेल्या चार पिढ्यांपासून टिकून आहे."



अशा प्रकारे दगडोजीराव देशमुखांपासून ते आ. अमित देशमुखांपर्यंत त्यांनी आपले सौहार्दपूर्ण संबंध जोपासले आहेत. कठोर परिश्रमाने डॉ. राम व बाबुराव बोरगावकरांनी औसा रोडवर दत्तमंदिराजवळ सुंदर असे घरकूल बांधले आहे. ज्या घरात गोविंदरावजी (अण्णा) कमलाबाई (भाभी) डॉ. राम व त्यांच्या पत्नी सौ सुनीता, मंगेश, गणेश ही पं. रामसरांची मुले तर पं. बाबुरावजी व त्यांच्या पत्नी सौ. सरोज व मधुवंती, मधुमंजिरी व सरस्वती या पं. बाबुराव यांच्या कन्या असे एकत्र कुटुंब गुण्यागोविंदाने राहते. अशा बाळगोपाळांनी भरलेल्या एकत्र कुटुंबात नेहमीच तानपुरा व संवादिनीचे सूर निनादत असतात तर तबल्याच्या नादब्रह्माने संपूर्ण कुटुंब आनंदाने डोलत असते. घरातील वाद्यांसोबत विविध पुरस्कार व मानसन्मानांच्या स्मृतिचिन्हांनी भरलेले कपाट त्यांच्या कर्तृत्त्वाची साक्ष देत असतात.

या घरात पं. भीमसेन जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी, उ. झाकीर हुसेन, उ. उस्मान खाँ, गानसरस्वती किशोरीताई अमोणकर अशा किती तरी ज्येष्ठ, श्रेष्ठ व गुणी कलावंतांनी त्यांच्या आदरातिथ्याचा मान ठेवून त्यांच्या घरीच मुक्काम केला. किंबहुना शिलेदार कुटुंबीय, पं. अजय पोहनकर, उ. उस्मान खाँ हे कलावंत इतक्यांदा त्यांच्या घरी आले की ते नकळतच त्यांच्या कुटुंबातील सदस्यच घेऊन गेले. अशा थोर कलावंतांच्या पदस्पर्शाने त्यांचे घर पावन झाले. कलावंत, शिष्य व रसिकांच्या मूर्त आशीर्वादामुळेच बोरगावकर कुटुंबीयांचे नाव लातुरातच नव्हे तर महाराष्ट्रात लोकप्रिय झाले. गुरुकुल पद्धतीने ज्ञानदान देणारी संगीत नगरी, महाविद्यालय व ज्ञानसरस्वती मंदिराच्या उभारणीत या सर्वांचेच आशीष महत्त्वपूर्ण ठरले.

* **गुरू आणि शिक्षण :**

लातूरसारख्या आडवळणाच्या गावात पूर्वी अभिजात संगीत शिकण्याची म्हणावी तशी सोय नव्हती.असे असले तरी डॉ. राम बोरगावकर यांच्या घरात आजोबांच्या पुण्याईने घरात संगीताचा थोडाफार वारसा लाभला होता. लहान वयातच त्यांच्या वडिलांचे छत्र हरवले होते. वाद्यनिर्मिताचा कारखाना बंद पडला होता. त्यामुळे घरात आर्थिक चणचण भासत होती. परंतु बाबांनी आपल्या नातवांनी संगीताची ही परंपरा पुढे चालवावी हा ध्यास घेतला. त्यामुळे त्यांनी राम यांना लहानपणापासूनच गायनाचे धडे देण्यास प्रारंभ केला. परंतु मोरेगावातील मुले त्यांच्या गायनाला हसली म्हणून त्यांनी गायनाकडे कायमचीच पाठ फिरविली व काका गोविंदरावजींकडून तबलावादनाचे धडे घेण्यास प्रारंभ केला.

आजोबा व काकांच्या कडक शिस्तीत रियाज सुरू झाला.गोट्या नाही, विटी-दांडू नाही, एवढेच काय तर शालेय शिक्षणातसुद्धा विशेष लक्ष नव्हते. ते पहाटे उठवून आपल्या नातवाचा रियाज करून घेत होते. उठता-बसता, खाता-पिता रियाजाशिवाय काहीच नव्हते. १०-१० मिनिटांचे स्वतंत्र वादन घोटून घेतले जात होते. त्यामुळे साहजिकच चिमुकल्या रामच्या हातून तबल्याचे बोल हुकमतीने बाहेर पडू लागले.

वयाच्या सातव्या वर्षी झपतालाचा सोलो तयार झाला. पं. अण्णासाहेब चौधरी यांच्या विदेह संगीत विद्यालयाच्या माध्यमातून परळी येथे तबलावादनाच्या स्पर्धा व्हायच्या. या स्पर्धेत छोट्याशा रामला पारितोषिक मिळाले. श्री सामंत हे औरंगाबाद येथे कंठे महाराज स्मृतीप्रीत्यर्थ तबलावादन स्पर्धा घ्यायचे. याही स्पर्धेत त्यांनी यश संपादन केले. त्याच वर्षी मुंबई येथे मानवमंदिर सभा आयोजित तबलावादन स्पर्धेत ५०१ रुपयांचे प्रथम पारितोषिक व मेडल मिळाले. सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेते प्रेमनाथ व अभिनेत्री पौर्णिमा यांच्या हस्ते चिमुकल्या रामचा सत्कार झाला. स्पर्धेचे संयोजक श्री. शुक्लाजी म्हणाले, "एवढ्या छोट्या मुलाला तबलावादन करण्यासाठी पहिल्यांदाच कसे बसविले?" प्रेमनाथ यांनी तर रामला उचलून कडेवर घेतले व भावविभोर होऊन म्हणाले,"इस बच्चे ने इस उमर मैं कैसे सीखा होगा? सचमुच ये तो भगवान की देन है!" अभिनेत्री पौर्णिमा यासुद्धा चिमुकल्या रामचे वादन ऐकून आश्चर्यमुग्ध झाल्या व म्हणाल्या, "इसे मेरे पास मुंबई में रखो मैं अकेली हुँ। मैं इसको अच्छा पढा सकती हुँ। तुम्हारे देहात में क्या रखा है?" त्यावर बाबा म्हणाले, "इसकी माँ मालकीन है, उसे पुछकर इसे आपके पास रखते है।" त्यावर त्या म्हणाल्या, "इसे मुझे दे या ना दे लेकिन मैं इसकी यहाँ अच्छी शिक्षा तो कर सकुंगी ।"परंतु बाबांना आपल्या नातवाला दुसऱ्यांच्या हवाली करायचे नव्हते म्हणून त्यांनी त्याला आपल्यासोबत लातूरला आणले.

नांदेड येथील पहिल्या मराठवाडा संगीत संमेलनात त्यांना तबलावादन करता आले. तेव्हा डॉ.अण्णासाहेब गुंजकर यांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. औरंगाबाद येथे पं. नाथराव नेरलकर यांनी त्यांचे तबलावादन ऐकले व त्यांनीही त्यांची पाठ थोपटली. छोट्या मोठ्या मैफीली, स्पर्धांतून चिमुकल्या रामची आगेकूच चालू होती. अशातच कोल्हापूरच्या देवल क्लब मध्ये जेव्हा त्यांचे वादन झाले तेव्हा तेथील अनेकांनी सल्ला दिला की, "या मुलाचा हात गोड आहे. निसर्गदत्त देणगी लाभलेली आहे. तुम्ही याला चांगल्या गुरूंकडे घेऊन जा व याला शास्त्रोक्त तबलावादन शिकवा." हा सल्ला बाबांना व अण्णांना पटला.त्यांनी लगेचच रामला पुणे येथे उ. गुलाम रसूल खाँ साहेबांकडे घेऊन



जाण्याचे ठरविले.

१९७३ साली पुणे येथे उ. गुलाम रसूल खाँ यांच्याकडे राम यांनी रीतसर गंडा बांधला. प्रतिमाह रु. १०० गुरूदक्षिणा देण्याचे ठरले. पूर्वी मोकळ्या बसलेल्या बोटांना बंदिस्त केले व बोल स्पष्ट केले. दिल्ली घराण्याची दोन बोटांची शिस्त त्यांनी लावली. कायदे, तुकडे असे शास्त्रोक्त शिक्षण सुरू झाले. बाबा व बंधू बाबुराव सोबतीला होते. गुरूंकडे २-३ तास धडे घ्यायचे व खोलीवर येऊन त्याचा रियाज करायचा, असा दिनक्रम ७-८ महिने चालला.परंतु पुण्यात तिघांचे राहणे, भोजनाचा खर्च व गुरूदक्षिणा देणे आर्थिक अडचणीमुळे शक्य होईना.त्यामुळे बाबांनी दोन्ही नातवांना लातूरला परत आणले. परंतु नातवांची तळमळ पाहून १५ दिवसांतून एकदा ते पुण्याला घेऊन जाऊ लागले. ज्ञानरूपी मिळालेला प्रसाद चिमुकला राम मनोभावे ओंजळीत घेऊ लागला व लातुरात येऊन त्याचा रियाज करू लागला.अशा प्रकारे शिक्षण ३ वर्षांपर्यंत चालू राहिले.

मिळालेल्या ज्ञानावर रामसर समाधानी नव्हते. याहीपेक्षा उत्तमोत्तम ज्ञान संपादन करण्याची त्यांची मनिषा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. परंतु अजूनही त्यांना म्हणावा तसा योग येत नव्हता. असे म्हटले जाते की, तुमच्या इच्छेची तीव्रता किती आहे त्यावर त्याचे भविष्य व भवितव्य अवलंबून असतं. पं. रामजी म्हणजे ध्येयाने झपाटलेले व्यक्तिमत्त्व होते. योगायोगाने मनाची तृप्ती होईल असा महान गुरू त्यांना मिळाला. यासंदर्भात पं. डॉ. राम बोरगावकर सांगतात, "मुलाच्या अचानक 'जाण्याने' राहिलेली स्वप्ने मग बाबांनी आम्हाला हाताशी घेऊन साकारण्याची जिद्द बाळगली. त्यासाठी त्यांनी संगीत शिक्षणाची काशी असलेल्या 'बनारसाला' घेऊन जाण्याचे निश्चित केले. त्यावेळी आम्ही १५ वर्षांचे होतो. रामवाडीचे लक्ष्मणशास्त्री तेव्हा बनारसला संस्कृत शिकत होते. ते बाबांचे मित्र होते. त्यांनी आम्हाला मोलाचे सहकार्य केले. स्वयंपाक करण्यासाठी आईलाही सोबत घेतले होते. मी , आई, बाबा व बाबुराव बनारसला निघालो. सोबत खूप साहित्य होते. बनारसला पोहोचायला आम्हाला तीन दिवस लागले. तिथे पोहोचल्यानंतर लक्ष्मणशास्त्री यांनी श्री अमरनाथजी महंत यांचा परिचय करून दिला. ते संकटमोचन हनुमान मंदिराचे विश्वस्त होते, तसेच ते उत्तम धृपद गायक होते. उत्तम पखावजही वाजवायचे. ६६ वर्षांचे ब्रह्मचारी असलेलेअमरनाथजी अत्यंत ज्ञानी, मृदू व मुलायम होते. ते तबलावादक पं. ईश्वरलालजी मिश्र यांचे शिष्य होते. पं. किशन महाराज व पं. सामताप्रसादजीसुद्धा त्यांना खूप मान द्यायचे. अल्पावधीत बाबांनी त्यांना बोलण्यातून आपलेसे केले. योगायोगाने गुरुपौर्णिमेचा दिवस होता. त्यांनी गंगाकिनारी तुळसीघाटावर माझे वादन ऐकले. ते प्रसन्न झाले. आम्ही

पहिले गुरूपूजन त्यांचेच केले व त्यांच्याकडे तालीम सुरू झाली. पुढे त्यांनी बाबांनी विचारले, "तुम्हे विद्या सीखनी है या गुरू का नाम लगाना है?" तेंव्हा बाबा म्हणाले, "मी घरादाराचा व संसाराचा त्याग करून इथे आलोय. तुम्ही म्हणाल ती मी सेवा करायला तयार आहे पण माझ्या नातवांना तयार करा." त्यानंतर त्यांनी बनारस घराण्याचे थोर तबलावादक व पं. रामसहाय यांचे पाचवे वंशज पं. शारदा सहाय महाराज यांचे नाव सुचविले. त्यांच्याकडे जाताना त्यांनी एक खलिता दिला. आम्ही तो खलिता घेऊन गुरुजीच्या घरी गेलो. तेथे आठ-दहा शिष्य 'तिरकिट' व 'धिरकिट'चा रियाज करीत होत. त्यांचा रियाज ऐकून आम्ही भारावून गेलो. त्यानंतर खडी उंगलीचा खुला तिनताल सुरू केला. तब्बल दीड तास तो ठेका चालला. त्यांची तयारी व रियाज पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो. तेवढ्यात गुरू दर्शनाची जी आस लागली होती, ती प्रतीक्षा संपली. पं. शारदा सहाय महाराजांचे दर्शन झ ाले. त्यांनी माझे तबलावादन ऐकले व ते म्हणाले, "आपको जो भी आपके गुरूने सीखाया है वो अच्छा ही है। ये आपके पास रहने दो। इसे भूलना नही। आगे जो भी बनारस की विद्या आप पावोगे तो पहिली विद्या बदलनी पडेगी।" अशा प्रकारे माझा गंडाबंधनाचा सोहळा संपन्न झाला. बनारस घराण्याची अस्सल व घरंदाज तालमीस प्रारंभ झाला. आठ-दहा दिवसांतच मी बनारस घराण्याची रखत आत्मसात केली."

अशा प्रकारे पं. राम बोरगावकर यांना बनारस घराण्याच्या थोर गुरूंचा परीसस्पर्श झाला. त्या वेळेस त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. त्यामुळे त्यांना तनपुरे आश्रमातील धर्मशाळेत राहावे लागले. खोल्या साधारण होत्या. पण तिथे मच्छर खूप होते. ते १५ वर्षांच्या रामला चावले. रात्रीतून त्याला खूप ताप आला. रात्री २-३ वाजता सर्व दवाखाने बंद असतील या चिंतेत सर्व जण होते. अशातच बाबांनी एक रिक्षा बोलावला. त्याने रामला रिक्षातून दवाखान्यात नेहले. तेंव्हा तेथील डॉक्टरांनी त्याला तपासले. १०४ डिग्री ताप होता. ते पाहून तो डॉक्टर म्हणाले, "इसे क्यो लाये हो? इसमे क्या है अब, जावो, इसे घर ले जावो. "तेव्हा सर्व जण रडायला लागले. पण रिक्षावाल्याने त्यांना धीर दिला व म्हणाला, "ये डॉक्टर नही ये हैवान है। चलो मै तुम्हे दुसरे अस्पताल में ले जाता हुँ।" अशा प्रकारे त्याने अतिशय जलदगतीने रिक्षा चालवीत कबीर चौरा अस्पताल येथे आणले. तेथील डॉक्टरांनी रामची तपासणी केली व उपचार सुरू केले. हे सर्व राम याच्या परदेशी गुरूभगिनी फ्रान्सिस शेफर्ड यांनी पाहिले व गुरुजींना निरोप दिला. सकाळी सहा वाजताच गुरुजी रामला पाहायला आले. रामला जनरल वॉर्डमध्ये ठेवले होते. हे पाहून गुरुजी डॉक्टरांना म्हणाले, "ये हमारा शागीर्द है, इसे जनरल वॉर्ड में क्यो रखा है ?इसे व्हीव्हीआयपी वॉर्ड में



रखो। अशा प्रकारे १५ दिवस त्यांना दवाखान्यात ठेवावे लागले. त्यानंतर मात्र स्वतः गुरुजींनी राम यांची काळजी घेतली. ते त्यांना काजू, बदाम खायला द्यायचे. त्यांनी रामची नम्रता व सेवाभाव पाहून रामला धर्मशाळेत न ठेवता स्वतःच्या घरी ठेवून घेतले. आता मात्र २४ तासांचा गुरू सहवास लाभू लागला. छोट्याशा रामने गुरूंची एवढी मर्जी संपादन केली की गुरुजी इतर शिष्यांना म्हणायचे, "राम छोटा है इसे काम मत लगावो।"

पाहता पाहता राम दोन महिन्यांतच बनारस बाज उत्तम वाजवू लागले. बनारस येथे गेल्यापासून सहा महिन्यांतच ते पट्टीचे वादक झाले. यासंदर्भात एक किस्सा पं. राम बोरगावकर यांनी सांगितला, "मी आतल्या खोलीत रियाज करीत होतो. त्या वेळी तेथे पं. अमरनाथ मिश्र, पं. नटराज मोहन, रूक्मिणी देवी व बागेश्वरी देवी आदी कलावंत मंडळी आली. मी तबल्यावर 'धाऽ तिरकिट तक तिरकिट' चा रियाज करीत होतो. त्यांनी माझा तबला ऐकला व त्यांना असा समज झाला की पं. शारदा सहाय महाराजच रियाज करीत आहेत. जेव्हा प्रत्यक्ष गुरुजी आले तेव्हा पं. अमरनाथ मिश्र त्यांना म्हणाले,"आपका यह तगडा शिष्य है। हुबहू आप जैसा बजा रहा है आपका ही ढंग है, हम खुश हो गये।" हे ऐकून गुरुजीही प्रसन्न झाले.त्यांनी मला भरभरून आशीर्वाद दिला व म्हणाले, "बेटा तुम्हे बहोत आगे बढना है। रियाज करो और घराणे का नाम रोशन करो।"

अशा प्रकारे त्या थोर गुरूंनी पं.राम बोरगावकरांना त्यांच्या वादनाची पावती दिली. यासंदर्भात त्यांचे शिष्य श्री. अभय करंदीकर सांगतात, "पं. रामसरांनी एकलव्याप्रमाणे शिक्षण घेतले. गुरूसमोर बसून त्यांना अधिक काळ शिक्षण घेता आले नाही. परंतु त्यांच्या वादनातील ढंग व बाज त्यांनी अचूकपणे आत्मसात केला. १९८३ साली पं. शारदासहाय महाराज लातूरला आले होते. तेव्हा त्यांचे स्वतंत्र वादन झाले. याच कार्यक्रमात रामसरांचेही वादन झाले. या दोघांनी वादन केलेल्या कॅसेट ऐकल्या तर गुरू आणि शिष्यातील वादनाचा फरक कानाला कळत नव्हता. इतकी गुरूंची छाप त्यांच्यावर पडली होती."

यावरून त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा, गुरूंच्या प्रभावाचा व वादनशैलीचा अंदाज येतो.

बनारस येथे पं. शारदा सहायजी यांच्याकडून तालीम घेत असतानाच पं. रामसरांनी बनारस विश्वविद्यालयात प्रवेश घेतला होता. तेथे पं. ईश्वरप्रसाद मिश्र, पं. छोटेलाल मिश्र, पं. लालजी मिश्र असे गुणी कलावंत तबला शिकण्यासाठी यायचे.याचाही लाभ त्यांनी घेतला व अधिकचे ज्ञान संपादन केले. तेथे नवोदित कलावंतांना सादरीकरण करण्याची

संधी मिळायची.याच काळात तेथे पं. बलवंतराय भट्ट व सुमीरन बॅनर्जी यांसारख्या थोर कलावंतांना साथ करण्याची संधी पं. राम यांना मिळाली. बनारस येथे रोज एक मैफील असायची.बाबांसोबत राम व बाबुरावजी पाच-सात किलोमीटर चालत जायचे.तेथे मनसोक्त गायन-वादनाचा आनंद घ्यायचे. गुरूगृही रियाज व्हायचा तर कधी विश्वनाथ मंदिरात जाऊन ते रियाज करायचे.

चार वर्षे त्यांना बनारस येथे राहता आले. एके दिवशी गुरुजी म्हणाले,"बेटा अब मैं विदेस जा रहा हूँ। यहाँ रहकर तुम्हारा खर्चा बढता रहेगा, तुम लातूर चले जावो। जब मैं यहाँ लोटुंगा तब तुम जरूर आना।" अशा प्रकारे चार वर्षांच्या कालावधीत मिळालेले संगीतरूपी धन घेऊन ते लातूरला परत आले. यासंदर्भात 'दै. लोकमत' या वृत्तपत्रात गुरुपौर्णिमा विशेष वृत्तात ते म्हणतात, "उत्तर प्रदेशातील पं. शारदा सहाय महाराज यांच्या आश्रमात मी चार वर्षे वास्तव्य करून तबल्यात पारंगत झालो. पुढे १४ वर्षे मी त्यांच्या सानिध्यात राहूनच संगीतातील बारकावे आणि शास्त्रीय पद्धतीचे ज्ञान पारंगत केले. आज मोठा अभिमान वाटतो. एवढ्या दिग्गज आणि संगीत क्षेत्रात नावाजलेल्या शारदा सहायजी यांचे शिष्यत्त्व मिळाले. हाच माझ्यासाठी आणि माझ्या घराण्यासाठी वैभवाचा ठेवा आहे. हा ठेवा प्राणपणाने जपण्याचा आमच्या घराण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे."

बनारस घराण्याचे पं. शारदा सहाय यांच्या रूपाने डॉ. राम बोरगावकर यांना अद्वितीय गुरू मिळाले. खरे तर लातूर ते बनारस हा प्रवास म्हणजे एक देदीप्यमान इतिहास आहे. यासंदर्भात त्यांचे शिष्य प्रा. हरिसर्वोत्तम जोशी म्हणतात,"जेव्हा कधी आम्ही गुरुजींसोबत बनारसाच्या गप्पा मारायचो त्या वेळी गुरुजींनी तिथल्या ज्या काही गोष्टी आम्हाला सांगितल्या त्यावरून त्यांचा हा काळ अतिशय खडतर अशा स्वरूपाचा होता हे निश्चित. पं. शारदा महाराजांच्या सानिध्यातले ते मंतरलेले दिवस, त्यांचा मिळालेला वरदहस्त व प्रत्येक श्वासागणिक घेतलेला रियाजाचा ध्यास हेच त्यांच्या कला क्षेत्रातील वाटचालीतले अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे."

आपल्या गुरूंबद्दलचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करताना डॉ. राम बोरगावकर म्हणतात,"आयुष्याला कलाटणी मिळण्यासाठी अतूट प्रेम करणाऱ्या गुरूंची गरज असते. जगातले ज्ञान गुरूंशिवाय मिळत नाही. आयुष्याच्या विद्यापीठात गुरूशिवाय ज्ञानाचा धबधबा अस्तित्त्वात येत नाही. प्रत्येक शिष्याला जीव तोडून ज्ञानाचे अमृत पाजणारे गुरू मिळणे ही आयुष्यातील सगळ्यात मोठी शिदोरी असते. गुरूला आईची उपमा दिली जाते. आईनंतर शिष्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या गुरूची साथ मिळणे यातच आयुष्याचे



कल्याण आहे. अशा गुरूंचा आशीर्वाद मिळाल्याने मी इथपर्यंत संगीत क्षेत्रातील प्रवास करू शकलो."

यावरून त्यांची गुरूभक्ती व गुरूंबद्दल असलेला आदरभाव दिसून येतो. पं. राम बोरगावकर लातूरला आले. पण ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी अखंड रियाज सुरू ठेवला. सुरुवातीला सात घंटे नंतर १० घंटे व पुढे पुढे तर १७ घंटे रियाज करू लागले. ते स्वतःला खोलीत बंद करून घ्यायचे व न उठता न खाता-पिता अविरत रियाज करायचे. यासंदर्भात त्यांचे शिष्य श्री. अभय करंदीकर सांगतात,"१९८१ ते १९९१ या दहा वर्षांत त्यांनी १२ ते १६ तास रियाज केला. प्रत्येक रविवारी त्यांनी सकाळी सहा वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत अखंड न थांबता रियाज केलेला आम्ही पाहिला आहे."

यावरून त्यांनी रियाजाचा किती ध्यास घेतला होता हे लक्षात येते. पं. राम यांचा १० घंटे रियाज झाला की बाबा दारात येऊन रडत बसायचे. कारण या मुलाला अधिक रियाज केल्यामुळे काही तरी होईल म्हणून त्यांना चिंता होती. एकदा अंबाजोगाई येथील मराठवाडा संगीत संमेलनात बाबांची व उ. मैनुद्दीन डागर यांची भेट झाली. बाबांनी राम यांच्या रियाजाबद्दलची सर्व हकीकत त्यांना सांगितली. तेव्हा उ. डागरसाहेब राम यांना म्हणाले, "अशा प्रकारचा अघोरी रियाज तू बंद कर अन्यथा वयाच्या ३५ व्या वर्षी तुला हे जग सोडून जावे लागेल. अधिक रियाजाने रोग वाढतील, व्यवस्थित साधना होणार नाही.मी बाबांचा मित्र आहे म्हणून तुला हा सल्ला देतो. एकसारखा रियाज करू नकोस. दोन तासांच्या रियाजानंतर विश्रांती घेत जा. दिवसातून ७ तासांपेक्षा अधिक रियाज करू नकोस अन्यथा तू माणसात राहणार नाहीस."

अशा प्रकारे पं. राम यांनी त्यांचा सल्ला ऐकला व रियाजाचा अवधी कमी केला. असे असले तरी सांगीतिक ग्रंथांचे वाचन व श्रवणभक्ती अविरत चालू ठेवली. यातूनच ते उत्तम तबलावादक होऊ शकले.

या कठोर साधनेमुळे डॉ. रामसरांच्या मनगटाच्या खालच्या बाजूला जाडसर घट्ट असे 'घट्टे' पडले आहेत. तबल्याचे बोल वाजविताना त्यात दमदारपणा यावा, असा बनारस शैलीचा रिवाज; त्यासाठी म्हणून मनगटावर वाळूने भरलेल्या जड पिशव्या बांधून रोज दहा दहा तास सलग रियाज केला. त्या वजनाचे त्या परिश्रमाचे आणि गुरूंच्या आशीर्वादाने ते 'घट्टे' जणू 'मानचिन्ह' आहेत, असे डॉ. राम यांचे मत आहे.

या कठोर साधनेतून त्यांनी संगीत प्रवीण ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली.

१९८० साली अलंकार ही परीक्षा उत्तीर्ण झाले तर १९७८ साली 'भारतीय आणि पाश्चात्त्य तालवाद्य पध्दती मधील तुलनात्मक विवेचन' या विषयावर शोधप्रबंध सादर करून अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची 'संगीताचार्य' ही पदवी प्राप्त केली. यासाठी त्यांना पं. स. भ. देशपांडे व पं. शारदा सहाय महाराज यांचे मार्गदर्शन लाभले.

पं. राम बोरगावकरांनी डॉक्टरेट ही पदवी प्राप्त केली याचा आनंद सर्वांनाच झाला. यासंदर्भात त्यांच्या पत्नी सौ. सुनीता लिहितात, "योगायोग असा की, लग्न होऊन मी या घरी आले आणि थोड्याच काळात माझे पती जे आधी 'श्री' होते ते आता 'डॉक्टर' राम झाले. तबल्याच्या तालशास्त्रात डॉक्टरेट मिळविणारे भारतातील ते पहिलेच युवा कलाकार ठरले. संपूर्ण घर आनंदोत्सवी झाले. दोन दशके आमच्या आजेसासऱ्यांनी (म्हणजे बाबांनी) उपसलेल्या कष्टाचे सार्थक झाले. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर 'नातू व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' अशी उन्मनी अवस्था झाली. पुत्रवियोगाचा धक्का पचवून उभे राहिलेले 'बाबा' काय किंवा अकाली वैधव्याच्या वणव्यात सापडलेल्या 'भाभी' (माझ्या सासूबाई) काय... ही दोन्ही माणसे खरचं खूप ग्रेट. बाबांनी उंबरठ्याबाहेरच्या जगात घराण्याचे नाव केले तर आतमध्ये 'भाभी'नी संस्काराचे बाळकडू पाजून घर सक्षम केले."

'योग्यांच्या खुणा योगी जाणती' या उक्तीप्रमाणे पं. शारदा सहाय महाराज व पं. राम बोरगावकर यांची झालेली अनाकलनीय भेट म्हणजे मराठवाड्याच्या कला क्षेत्राला मिळालेली मोठी देणगी होय. किती वर्षे तालीम घेतली यापेक्षा ती कशी घेतली याला जास्त महत्त्व असते. पं. रामसरांना फार वर्षे बनारसला राहता आले नसले तरी 'देखीली पंढरी देही जनीवनी' या संतांच्या वचनाप्रमाणे गुरूवर अढळ श्रध्दा, निष्ठा, गुरूसेवा व सातत्याने केलेल्या कठोर रियाजामुळे खऱ्या अर्थाने पं. रामसरांच्या तबलावादनाचे दालन समृध्द झाले असेच म्हणता येईल.

**भारतीय संगीतातील योगदान :**

चार तपाहून अधिक केलेली खानदानी मेहनत, निसर्गदत्त देणगी, थोर गुरूचा परीसस्पर्श यामुळे डॉ. राम बोरगावकरांची वादन शैली विकसित झाली. पं. शारदासहाय महाराजांची कृपादृष्टी झाल्यामुळे त्यांच्यावर बनारस घराण्याची अस्सल छाप पडली. त्यामुळे त्यांचे तबलावादन ऐकणे म्हणजेच रसिक श्रोत्यांबरोबर सर्वसामान्यांनाही ती मोठी पर्वणीच असते. शुद्ध बनारस घराण्याची वादनशैली ऐकत असताना बहुतांशी वीररसाची



अनुभूती रसिक श्रोत्यांना नेहमीच आलेली आहे. उठाण, बनारसी ठेका, बनारसी बॉट, 'धिग धिना तिरकिट धिना' सारखा कायदा, विविध परण, गती, तिहाई व चक्रधार या सर्व तबलावादनातील सामुग्रीची मांडणी ते अत्यंत आकर्षक पद्धतीने करतात. अत्यंत तयारीने सादर केलेल्या रचना ऐकताना श्रोते भान विसरून ऐकतात. दायाॅ-बायाॅचे संतुलन व तयारीने वाजणारा मिंडयुक्त डग्गा हे त्यांच्या वादन शैलीचे खास वैशिष्ट्य आहे. सोलापूर येथे कै. माधवराव अग्निहोत्री यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त दि. ५ ऑक्टोबर १९९७ रोजी एका मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. राम सरांचे वादन झाले त्यांच्या वादन शैलीच्यासंदर्भात डॉ. चौगुले यांनी अत्यंत सुंदर समीक्षा केली आहे ती अशी, "कार्यक्रमाच्या प्रारंभी तालमणि डॉ. राम बोरगावकर यांचे सोलो वादन झाले. त्यांनी तबल्यावर विलंबित तिनताल वाजविला. त्यांनी उठाण, चलन, कायदे, रेले, गत तुकडे व पाचपल्ली अशा विविध प्रकारांचे वादन केले. स्पष्टता, बोलवादनातील गोडवा, डग्ग्यावर असलेली लक्षवेधी हुकुमत, अधुन मधून आक्रमक बेदम तिहाई रचना करून समेवर येण्याच्या त्यांच्या कृतीस रसिकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. वादनात अफाट तयारी, एकपट, दुप्पट, चौपट अशा पटीत तबल्यावर सहज फिरणारी बोटे, दृत गतीतसुद्धा गोडवा ही आजच्या वादनातील वैशिष्ट्ये रसिकांना सुखावून गेली. याशिवाय अतिव परिश्रमांनी मिळालेली कल्पनातीत तयारी वेगास प्राधान्य हे त्यांचे आणखीन एक वैशिष्ट्य होते. त्यांच्या वादनातील चमत्कृती हा स्थायीभाव असल्याचे प्रकर्षाने जाणवत होते. बनारस घराण्याची खासीयत पं. राम बोरगावकरांनी चांगलीच आत्मसात केली आहे यात शंका नाही."

अशा प्रकारे स्वरसाधनेच्या मूलतत्त्वाचे अभ्यासक डॉ. चौगुले यांनी डॉ. राम यांच्या वादन शैलीचे समर्पक समीक्षण केले आहे.

बनारस घराण्याचा तबलावादक हा परिपूर्ण तबलावादक असतो. डॉ. राम सरांच्या बाबतीत बोलायचे झाले तर गायन, वादन व नृत्याची साथसंगत करत असताना त्या त्या अंगाने रसानुकूल संगती करण्याचे तंत्र त्यांनी आत्मसात केले आहे. यासंदर्भात त्यांचे शिष्य श्री. अभय करंदीकर म्हणातात, "सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगणा अर्चना जोगळेकर यांच्या अनेक मैफीलीत पं. राम सरांनी उत्तम साथसंगत केली. त्यांची साथ कु. अर्चना जोगळेकर यांना एवढी पसंत पडली की राम सरांनी त्यांच्या चमुत कायम तबल्याची साथसंगत करावी अशी विनंती केली होती."

यावरून त्यांचा कथ्थक नृत्याच्या साथीसाठी किती हातखंडा होता याची प्रचीती येते. त्यांचे शिष्य प्रा. हरीसर्वोत्तम जोशी, पं. राम सरांच्या साथीबद्दल म्हणतात, "भारतीय संगीतातील गायन, वादन व नृत्यातील अनेक प्रतीतयश कलावंतांबरोबरची त्यांची संगती म्हणजे रसिक श्रोत्यांना दुग्धशर्करा योग असतो. प्रमुख कलावंतांच्या आविष्काराला कुठेही बाधा न येऊ देता संगती करणे हे कौशल्याचे काम असते आणि ही उपलब्धी पं. राम सरांच्या संगतीतून आम्हाला नेहमीच झालेली आहे."

शास्त्रीय संगीताबरोबरच उपशास्त्रीय व सुगम संगीताची साथसंगत ते तेवढ्याच तोलामोलाची करतात. उ. उस्मान खाँ साहेब असतील किंवा पं. अजय पोहनकर, डॉ. प्रभा अत्रे असतील किंवा पं. सुरेश वाडकर या साऱ्यांच्याच मैफीली त्यांनी रंगविल्या व त्यांच्याकडून दाद मिळविली. त्यांच्या स्वतंत्र वादनाबद्दल त्यांचे शिष्य प्रा. विश्वनाथ स्वामी म्हणतात, "पं. राम सर जेव्हा स्वतंत्र वादनाला बसतात तेव्हा त्यांचे दोन तास वादन झाले तरी सुरुवातीच्या वादनातील वजन, स्पष्टता ही शेवटपर्यंत कायम टिकून राहते. यात तसूभरसुद्धा बदल होत नाही. यामागे त्यांची कठोर साधना आहे."

प्रसन्न चेहरा, उत्तम वेशभुषा, चेहऱ्यावरील अनुरूप भाव, डोक्यावर वाढलेल्या केसाची लयदार हालचाल, स्पष्ट व खणखणीत पढंत, त्याही पेक्षा वादनातील भक्तिभाव यामुळे रंगदेवता अवतीर्ण झाली नाही तरच नवल. त्यांचे सुपुत्र प्रा. गणेश त्यांच्याबद्दल म्हणतात, "वडिलांनी आम्हाला एकच शिकवण दिली ती म्हणजे तुम्ही एलोरा फेस्टीव्हलमध्ये वाजविताय की कुण्या एखाद्या घरगुती मैफीलीत. वादनातील दर्जा कमी करायचा नाही. कारण ऐकणारा श्रोता हा मोठ्या अपेक्षा घेऊन तुमच्यासमोर बसलेला असतो. त्यामुळे तुम्ही १०० टक्के देऊनच वादन केले पाहिजे."

उपरोक्त संदर्भाचा प्रत्यय मला दत्तमंदिर येथील बाल गोविंदानंद सरस्वती (बालस्वामी) महाराजांच्या तृतीय महासमाराधना महोत्सवात आला. रात्री अकरा वाजले होते. डॉ. राम सर व सुपुत्र गणेश तबला जुगलबंदीसाठी बसले होते. समोर केवळ २० ते २५ रसिक होते. कडाक्याची थंडी अशा स्थितीत डॉ. राम हे अगदी जीव तोडून तबलावादन करीत होते. विविध स्तुती परणे, बनारस घराण्याच्या दुर्मिळ रचना, तिहाईचे विविध प्रकार त्यांनी अशा काही पद्धतीने पेश केल्या की समोर हजारो श्रोते बसलेले आहेत की काय? असे भासत होते. त्यांच्या वादनातील लगन, एकरूपता पाहून प्रत्यक्ष 'ईश्वरच वादन करताहेत की काय' असा भास झाला. किती रसिक आहेत यापेक्षा आपण कोठे वाजवीत आहोत याची जाणीव ठेवून तासनतास मैफीलीमध्ये तबलावादन करणारे डॉ. राम सर हे



आधुनिक काळातील संगीतातील संतच म्हणावे लागतील.

मराठवाड्याच्या सांस्कृतिक वैभवाला परम वैभवापर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक कलावंतांचे योगदान लाभलेले आहे. त्यामध्ये पं. राम बोरगावकरांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. लातूरसारख्या अडवळणाच्या गावामध्ये कसल्याही भौतिक सुविधा नसताना शहरात संगीताच्या दृष्टीने काम उभे करणे हे येरागबाळ्याचे  काम नाही. अभिजात संगीताचा प्रसार व प्रचार व्हावा यासाठी त्यांनी मराठवाडा, महाराष्ट्र व भारतातच नव्हे तर विदेशातसुद्धा जाऊन कार्यक्रम केले. अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ त्यांनी गुरुकडून मिळालेला प्रसाद खुल्या दिलाने रसिकांच्या ओंजळीत टाकला.

***  मैफीलीतून संगीताचा प्रचार-प्रसार :**

पं. राम बोरगावकर यांनी वयाच्या सातव्या वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावी तबलावादन करून श्रोत्यांची मने जिंकली. १९७६ साली त्यांना नागपूर येथे संत तुकडोजी महाराज स्मृति संगीत उत्सवात साथसंगत करण्याची संधी मिळाली. १९७७ साली लातूर येथे त्यांनी सुप्रसिद्ध संगीतकार व गायक पं. सुधीर फडके यांच्याबरोबर साथसंगत केली व त्यांच्याकडून वाहवा मिळविली. १९७९ साली बनारस विश्वविद्यालय, बनारस येथील संगीत विभागात त्यांनी स्वतंत्र तबलावादन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. १९७९ साली हैद्राबाद येथे आयोजित 'आज के कलाकार संगीत समारोहात' त्यांनी यशस्वी स्वतंत्र वादन केले. १९८० साली मिरज येथे अब्दुल करिम खाँ यांच्या दर्ग्यावर ऊरुसानिमित्त त्यांना संगीत सेवा करण्याची संधी मिळाली. १९८१ साली लातूर येथे पाचवे मराठवाडा संगीत संमेलनात दि. १२ डिसेंबर १९८१ रोजी स्वतंत्र तबलावादन केले. २५ मिनिटांच्या वादनाने श्रोते खुश झाले पण याच दिवशी उ. झाकीर हुसेन यांचे तबलावादन होते. तेही श्रोत्यांत उपस्थित होते. त्यांनी राम सरांचे कौतुक केले. त्यानंतर १९८२ साली उस्मानाबाद, १९८३ साली औरंगाबाद येथील मराठवाडा संगीत संमेलनात त्यांनी स्वतंत्र तबलावादन व साथसंगत केली. १९८३ साली आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या 'सवाई गंधर्व महोत्सव', पुणे येथे तबला साथ करण्याची संधी त्यांना मिळाली. पं. शामराव लोणकर यांच्या मधुर सनईला त्यांनी भारदस्त व दमदार तबला साथ करून पुणेकर रसिकांना मंत्रमुग्ध केले त्यानंतर पं. राम यांना सवाई संगीत महोत्सवात १२ वेळा साथसंगत करण्याची संधी मिळाली. १९८८ साली पुणे येथे आयोजित 'स्व. जी. एल. सामंत स्मृति उत्सवा'त त्यांनी स्वतंत्र तबलावादन केले. याच वर्षी हैद्राबाद येथे 'इंडियन म्युझिक सोसायटी' आयोजित संगीत समारोहात त्यांनी हजेरी लावली. १९९६ साली पं. राम यांनी मुंबई येथील 'सूर सिंगार संसद संमेलनात'

हजेरी लावून तेथील रसिक श्रोत्यांची दाद मिळविली. १९९४ साली 'स्वर साधना संगीत समीतीने' आयोजित केलेल्या संगीत समारोहात त्यांनी स्वतंत्र तबलावादन केले. याच वर्षी मुंबई येथील नेहरू सेंटर येथे दमदार स्वतंत्र वादन केले. १९९४ साली इंदोर येथे 'लय शाला समारोहात' स्वतंत्र वादन करून दाद मिळविली. याच वर्षी आग्रा येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय संगीत संमेलनातून स्वतंत्र तबलावादन करून श्रोत्यांना भावविभोर केले. दि. २८ जानेवारी १९९४ साली मराठवाडा संगीत प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांनी आयोजित केलेल्या संगीत सभेत त्यांनी स्वतंत्र तबलावादन केले. ही सभा संत एकनाथ नाट्य मंदिरात संपन्न झाली होती. १९९९ साली भालकी (कर्नाटक) येथे 'देवी संगीत दरबार' या कार्यक्रमात संगीत सेवा करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. हैद्राबाद येथील प्रसिद्ध 'भटजीबापू संगीत समारोहात' १९९६ साली स्वतंत्र तबलावादन व साथ संगत केली. १९९७ साली 'पद्मश्री शंकरबापू अपेगावकर संगीत अकादमी', औरंगाबाद येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व स्वतंत्र तबलावादन सादर केले. १९९८ साली पुणे येथे संपन्न झालेल्या 'संगीतोन्मेष संगीत समारोहात' त्यांनी आपले कलानैपुण्य दाखवून दाद मिळविली.

डॉ. राम बोरगावकर यांनी उत्तम स्वतंत्र वादनाबरोबरच त्यांनी पं. सुधीर फडके, सुप्रसिद्ध ठुमरी गायिका शोभा गुर्टू, श्रीमती डॉ. प्रभा अत्रे, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. सी. आर. व्यास, उ. उस्मान खाँ (सितार), कु. अर्चना जोगळेकर (कथ्थक नृत्य), पं. सविता देवी (शास्त्रीय नृत्य), पं. बलदेवराय भट्ट, पं. अमरनाथ मिश्र (शास्त्रीय गायन), एम. राजन (व्हायोलिन), राजन कुलकर्णी (सरोद), पं. सुरेश वाडकर व स्वप्नील बांदोडकर अशा गायक, वादक व नर्तकांना साथ करून त्यांच्या मैफीली रंगविल्या आहेत.

महाराष्ट्र व भारतातील महत्त्वपूर्ण संगीत संमेलनात त्यांनी तबलावादन व साथ संगत करून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला; त्यांनी अभिजात संगीताच्या प्रचारार्थ पहिला विदेश दौरा केला. मलेशिया व इंडोनेशिया या देशात त्यांनी ११ दिवसांचा सांगीतिक दौरा केला. या दिवसात ७ मैफीलीतून स्वतंत्र तबलावादन करून तेथील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले तर काही ठिकाणी त्यानी भारतीय संगीतावर व्याख्याने दिली. अशाप्रकारे भारतीय अभिजात संगीताचा सुगंध विदेशात दरवळत ठेवण्याचे कार्य त्यांनी केले.

* **संगीतोत्सवांचे आयोजन :**

देश-विदेशात स्वतंत्र वादन व साथ संगतीच्या माध्यमातून तर त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार केलाच; परंतु लातूरसारख्या मागासलेल्या भागात भारतीय अभिजात



संगीताचा प्रचार व्हावा यासाठी अनेक संगीतोत्सवाचे आयोजन केले. १९७५ पासून ते प्रतिवर्ष पं. वि. दि. पलुस्करांच्या पुण्यतिथीनिमित्त संगीत सभेचे आयोजन करतात. १९८३ साली 'भव्यदिव्य संगीत सोहळ्या'चे आयोजन केले. हा महोत्सव लातूरच्या संगीत क्षेत्रातील सुवर्णमयी व ऐतिहासिक घटना मानावी लागले. तीन दिवस चाललेल्या या संगीत सोहळ्यासाठी बनारसच्या दिग्गज कलावंतांनी हजेरी लावली. यात गुरुवर्य पं. शारदा सहाय महाराज, पं. अमरनाथ, पं. पशुपतीनाथ, पं. दुर्गाप्रसाद पांडे, पं. किशोरकुमार मिश्र, पं. डॉ. प्रभा अत्रे, पं. आप्पा जळगावकर व पं. नाथराव नेरलकर अशा थोर कलावंतांनी ही मैफील सजविली.

१९८७ साली नटसम्राट बालगंधर्वांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांनी तीन दिवसीय नाट्यमहोत्सवाचे आयोजन केले. यात शिलेदार कुटुंबीयांनी 'संगीत स्वयंवर', 'एकच प्याला', 'संगीत सौभद्र' व 'मानापमान' या संगीत नाटकांची मेजवाणी लातूरकरांना दिली. अशा प्रकारचा नाट्यमहोत्सव यापूर्वी लातुरात कधीही झाला नव्हता. यासाठी लातूर व परिसरातील रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. १९९० साली सरस्वती संगीत विद्यालय, मित्रनगर येथील स्वतःच्या इमारतीत स्थलांतरित झाले. त्या वास्तूपुजनासाठी व इमारतीच्या उद्घाटनासाठी पं. भीमसेन जोशी उपस्थित होते. या निमित्ताने रात्री पं. भीमसेन जोशी यांनी लातूरकरांना मनमुराद संगीत ऐकविले. १९९१ साली पं. सी. आर. व्यास, १९९२ साली सिने कलावंत व नृत्यांगना अर्चना जोगळेकर यांच्या मैफीलीचे आयोजन त्यांनी केले.

१९९३ साली लातूर जिल्ह्यात प्रलयंकारी भूकंप झाला. त्या भूकंप-ग्रस्तांच्या मदतीसाठी १० डिसेंबर १९९३ रोजी त्यांनी 'संगीत सेवा रजनी'चे आयोजन केले. दि. २ व ३ मे १९९३ साली त्यांनी 'राष्ट्रीय एकता संगीत नृत्य महोत्सवा'चे आयोजन केले. ज्यात पं. अनुपम रॉय यांच्या तबलावादनाने श्रोते भावविभोर झाले. याच महोत्सवात ऋची शर्मा, रिता शर्मा व अनुरिता शर्मा यांच्या कथ्थक नृत्याने श्रोते रोमांचित झाले. तसेच डॉ. अबान मिस्त्री या पहिल्या स्त्री तबलावादक कलावंतांनी लातूरकरांना मंत्रमुग्ध केले. २० मार्च १९९४ साली त्यांनी 'संगीत नृत्य महोत्सवा'चे आयोजन केले. ज्यात उ. झाकीर हुसेन यांचे तबलावादन झाले. त्यांच्या तबलावादनाने संपूर्ण मराठवाड्यातील रसिकांचे कान तृप्त झाले. याच वर्षी ३० ऑगस्ट २००३ साली कै. दगडोजीराव देशमुख स्मृतिमहोत्सवाचे आयोजन केले. यात पं. प्रभाकर कारेकर यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांना पं. राम बोरगावकर यांनी तबल्याची साथ दिली.

दि. २ सप्टेंबर १९९६ साली 'स्वरांकित' ही मैफील घेऊन डॉ. राम यांनी लातूरच्या

श्रोत्यांना सुरेल भेट दिली. पं. सुधीर फडके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'दरवळ' या बाबुजींच्या गाण्यावर आधारित कार्यक्रम त्यांनी आयोजित केला. १९९५ साली 'तानसेन संगीत समारोहाचे' आयोजन करून देशातील नामवंत कलावंतांना त्यांनी पाचारण केले व त्यांच्या गायन-वादनाचा आनंद श्रोत्यांना दिला. २००३ मध्ये 'स्वरसाज' या कार्यक्रमाचे त्यांनी आयोजन केले. याच वर्षी 'संगीत नृत्य महोत्सवात', उ. झाकीर हुसेन यांच्या शिष्या अनुराधा पाल यांचे तबलावादन व वैशाली पाटकर यांच्या कथ्थक नृत्याचे आयोजन केले.

२००९ साली डॉ. राम बोरगावकर व पं. बाबुराव बोरगावकर यांनी ज्ञानसरस्वती मंदिराची उभारणी केली. त्यांनी केवळ मंदिरच उभारले नाही तर तेथे दर वर्षी 'ज्ञानसरस्वती संगीत समारोहा'चे आयोजनही केले. यात आहुती टाकण्यासाठी अनेक कलावंत आसुसलेले असतात. या समारोहाविषयी डॉ. राम यांच्या पत्नी सौ. सुनीता लिहितात, "गुरुकुल पद्धतीने शास्त्रीय संगीत शिकविणारी 'संगीत नगरी' आम्ही उभी केली. तिथेच सरस्वतीचे आगळे वेगळे मंदिर उभे केले. इथेच देवीच्या साक्षीने संपूर्ण भारतात कुठेच न झालेला एक अनोखा यज्ञ आम्ही सुश्री किशोरीताईच्या प्रमुख उपस्थित दोन वर्षांपूर्वी केला. सलग २४ तास संगीत सेवा रसिकांसमोर या मंदिर प्रांगणात सादर झाली. हाच तो संगीत यज्ञ! दुसऱ्या वर्षी सलग ४८ तासांचा असाच संगीत यज्ञ झाला. या वर्षी ७२ तासांचा हा यज्ञ होणार आहे. संपूर्ण देशभरातील विविध कलाकार इथे कला सादर करतात. रसिक त्यात चिंब होऊन जातात."

या समारोहाविषयी संगीत कलाविहार या मासिकातसुद्धा सुंदर वर्णन केले आहे, "ज्ञानसरस्वती मंदिर संस्थान, लातूर की ओर से चार दिवसीय संगीत समारोह का आयोजन किया गया था। इस समारोह में ७१ कलाकारोंने अपनी संगीत सेवा प्रस्तुत की। अनेक कलाविष्कार से श्रोता आत्मविभोर हुए और आनंद की परिसीमा नहीं रही। ज्ञान सरस्वती मंदिर संस्थान के दरबार में स्वरमयी ईश्वर भक्ती प्रकट हुई। इस संगीत दरबार में भारत के विभिन्न प्रांतो से आए कलाकारोंने अपनी संगीत सेवा हृदय से अर्पन की।... इस संगीत समारोह आकर्षन रहे डॉ. राम बोरगावकर के तबलावादन से इस संगीत समारोह का समापन हुवा। आपने वादन में बनारसी ढंग से तबला सोलो प्रस्तुत कर अपने श्रोताओंका मन जीत लिया। अपने वादन में त्रिताल प्रस्तुत करके समारोह संपन्न हुआ।"

२०१४ साली अखंड ५१ तासांचा भव्य संगीत महायज्ञ झाला तर २०१५ साली ७२ तासांचा सर्वांत मोठा संगीत महायज्ञ झाला. यात देशभरातील २५१ कलावंतांनी



हजेरी लावली. धर्म, जात, भाषा व वंशाची सर्व बंधने झुगारून या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता साधणारा संगीतोत्सव संपन्न झाला.

अगदी लहानपणापासून औसा रोड लातूर येथील दत्तमंदिरात ते तबलावादनाची हजेरी लावत आले आहेत. याच दत्तमंदिरात २०१३ पासून श्री श्री १००८ बाल गोविंदानंद सरस्वती (बाल स्वामी) महाराजांच्या नावाने 'महासमाराधना महोत्सवाचे' आयोजन करण्यात येत आहे. सात दिवस चालणाऱ्या या संगीत महोत्सवासाठी ते रात्रंदिवस परिश्रम घेत असतात. कलावंतांना निमंत्रित करण्यापासून सादरीकरणापर्यंत ते संयोजन करतात.या समारोहासंदर्भात 'दै. मराठवाडा' नेता या वृत्तपत्रात सुंदर वर्णन केले आहे,"येथील सदानंद मठ, औसा रोड या ठिकाणी आयोजित प. पु. श्री श्री १००८ बालस्वामी महाराज संगीत समारोहात रसिक श्रोते संगीतानंदात बुडून गेले. या संगीत समारोहात जग विख्यात गायक पं. अजय पोहनकर यांनी राग बागेश्री विलंबित ख्याल आळवून दादरा, ठुमरी हे गीत प्रकार प्रभावीपणे सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यांना तितकीच दमदार तबला साथ तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी केली."

सावेवाडी येथील वैद्यनाथ मंदिरात ते गेल्या अनेक वर्षांपासून श्रावण महिन्यात आपल्या शिष्यांसोबत संगीत सेवा अर्पण करतात. मुळ दर्जी बोरगाव या आपल्या मुळग्रामी चिन्मयानंद महाराजांच्या मठात व शिवरात्रीला लातूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिरातसुध्दा कर्तव्यभावनेने संगीत सेवा रूजू करतात. अशा प्रकारे डॉ. राम बोरगांवकर यांनी आपल्या संगीत प्रचार कार्याला अध्यात्माची जोड दिल्याचे दिसून येते.

डॉ. राम बोरगावकर यांनी लातूर शहरात तर मैफीलीचे आयोजन केलेच परंतु याच बरोबर २००५ साली त्यांनी मराठवाड्यातील कलावंतांना घेऊन पुणे, अहमदनगर व मुंबईसारख्या मोठ्या शहरात मैफीलीचे आयोजन केले. मराठवाड्यातील कलावंत भलेही उपेक्षित असले तरी ते कलेच्या प्रांतात मागे नाहीत हे त्यांनी दाखवून दिले. या कार्यक्रमासंदर्भात 'दै. एकमत' या वृत्तपत्रात श्री अभय करंदीकर लिहितात,"मराठवाडा संगीत कला अकादमी व सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूरच्या संयुक्त विद्यमाने मुंबई नगरीत आयोजित पहिल्या मराठवाडा कलाकार संगीत संमेलनाने मुंबईतील जाणकार रसिकांना आपल्या कलाविष्काराने मंत्रमुग्ध केले. दि. २३ व २४ जुलै २००५ रोजी कर्नाटक संघ सभागृहात हा महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवाच्या उद्‌घाटनाच्या दिवशी मा. मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांनी मराठवाड्यातील सर्व कलाकारांना 'वर्षा' निवास स्थानी पाचारण

केले व संयोजक डॉ. राम बोरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अकादमीच्या वतीने सर्व कलाकारांना 'मराठवाडा कलागौरव पुरस्कार' देऊन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित केले."[३६]

अशा प्रकारे मराठवाड्यातील गुणी कलावंतांना त्यांनी मुंबईसारख्या मोठ्या शहरात व्यासपीठ निर्माण करून दिले. अशाच मैफीली पुणे येथील बालगंधर्व सभागृहात व अहमदनगर येथे घडवून आणल्या.

*** आकाशवाणी, दूरदर्शन व ध्वनिफितींच्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार-**

आकाशवाणीच्या माध्यमातून संगीताचा प्रचार वयाच्या सातव्या वर्षी डॉ. राम यांनी औरंगाबाद व पुणे आकाशवाणीच्या बालसंगीत सभेत तबलावादन केले. १९७९ पासून त्यांनी स्वतंत्र तबलावादन व साथसंगत करून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. १९९४ साली त्यांनी ऑल इंडिया रेडिओवरून प्रसारित होणाऱ्या मंगळवारीय राष्ट्रीय संगीत सभेतून सादरीकरण केले. १९९७ साली ऑल इंडिया रेडिओवरून गोवा, धारवाड, सांगली, पुणे व रत्नागिरी या शृंखला कार्यक्रमात त्यांनी पं. बाबुराव बोरगावकर यांच्याबरोबर तबला साथ केली.

डॉ. राम यांनी आकशवाणीबरोबरच दूरदर्शवरूनसुध्दा आपली कला सादर केली. दि. ३० ऑगस्ट १९९४ व ११ नोव्हेंबर १९९४ रोजी त्यांनी 'स्वर माधुरी' या कार्यक्रमात पं. बाबुरावजी यांच्या शास्त्रीय गायनाला तबल्याची साथसंगत केली. १९९७ साली मुंबई दूरदर्शनवर झालेल्या पं. यादवराज फड यांच्या गायनाला त्यांनी साथ दिली. २००१ साली त्यांनी सह्याद्री वाहिनीवरून आपल्या नऊ शिष्यांसमवेत 'तालदर्शन' हा कार्यक्रम सादर केला. याही कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी उदंड प्रतिसाद दिला. M२G२ याही कार्यक्रमात त्यांनी व सुपुत्र गणेश यांनी गप्पा गोष्टीबरोबरच तबलावादन सादर केले. १४ जून २००५ पासून सह्याद्री वाहिनीवरून 'भक्तिरंग ' या नावाने भजनांची मालिका सुरू झाली. दर गुरुवारी सकाळी ७ वाजता सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात त्यांनी तबला साथ व अभगांचे निरूपण केले. ही मालिका जवळजवळ साडेतीन वर्षे चालली.

आकाशवाणी व दूरदर्शनप्रमाणेच त्यांनी काही ध्वनिफिती प्रकाशित केल्या. ज्यात 'सूर-ताल संगम', 'भक्तिरंग' व 'तालतरंग' या तीन ध्वनिफितींचा उल्लेख करता येईल. 'सूर-ताल संगम' या ध्वनिफितीचे प्रकाशन तत्कालीन मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या शुभ हस्ते झाले. यासर्व ध्वनिफितीतून डॉ. राम यांनी स्वतंत्र तबलावादन व साथसंगत केली आहे. स्वतंत्र तबलावादनात ताल गणेश ताल व तीनताल ध्वनीमुद्रित केला आहे.



ज्याचा लाभ रसिकांबरोबरच संगीताचे अध्ययन करणा-या विद्यार्थ्यांना होतो आहे.

१९९६ पासून त्यांनी 'संगीत सरगम ' हे साप्ताहिक सुरू केले. याचे संपादक म्हणून डॉ. राम यांनी काम पाहिले.यात विविध तज्ज्ञाचे संगीतविषयक लेख प्रकाशित करून संगीत साधकांना बौद्धिक मेजवानी उपलब्ध करून दिली.

थोडक्यात असे म्हणता येईल की डॉ. राम बोरगावकर यांनी पुणे व बनारस येथून प्राप्त केलेली विद्या स्वत:पुरती मर्यादित न ठेवता सर्वांना भरभरून दिली. अनेक संगीतमहोत्सवाचे आयोजन केले त्यामुळे अनेक महान कलावंतांना ऐकण्याची संधी लातूरकरांना मिळाली. अर्थात या माध्यमातून संगीताची चळवळ झाली पाहिजे, रसिकता वाढली पाहिजे या सद्हेतूने त्यांनी अशा मैफीलीचे आयोजन केले. रेडिओ, दूरदर्शन, ध्वनिफिती व संगीत मासिकातून त्यांनी भारतीय अभिजात संगीताचा प्रसार व प्रचारार्थ मोलाचे योगदान दिले आहे.

**संगीत विद्यालयाची स्थापना**

अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी डॉ. राम यांनी काही सांगीतिक संस्थांची स्थापना केली. याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

* **सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर :**

संगीतमहर्षी बाबा बोरगावकरांनी १९६३ साली लातुरातील पहिल्या 'सरस्वती संगीत विद्यालयाची'स्थापना केली होती. या संगीत विद्यालयात संगीतरत्न कृष्णाबाई रामदुर्गकर, पं. नारायणराव जोगळेकर, स्वतः बाबा बोरगावकर, पं. शांताराम चिगरी अशा थोर कलावंतांनी अध्यापनाचे कार्य केले होते. याच संगीत विद्यालयात पं. राम बोरगावकर यांनी १९७९ पासून विद्यालयाची धुरा आपल्या हातात घेतली. बनारस येथून नुकतीच उच्च स्तरीय तबल्याची शिक्षा त्यांनी घेतली होती. घरातील अभिजात संगीताचा वारसा पुढे अविरत चालू राहावा यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले. लातूर व परिसरातील संगीत साधकांना परीक्षा पध्दतीने व घरंदाज तबलावादन शिकता यावे यासाठी त्यांनी आपल्याजवळील ज्ञानगंगा सर्वांसाठी खुली केली. अगदी सुरुवातीच्या काळात ॲड. अच्युतराव टेकाळे, अभय करंदीकर, राम पाटील व राजेंद्र भोसले इ. शिष्य मन लावून अध्ययन करीत होते. पुढे चालून विश्वनाथ स्वामी, हरीसर्वोत्तम जोशी, शेखर हविले, जगदीश वेदपाठक, घनश्याम कुलकर्णी आदी शिष्यांनी त्यांच्याकडून तबलावादनाचे धडे घेतले. तबला हे तसे मर्दाणी वाद्य पण पं. राम सरांच्या स्वभावामुळे व शिकण्याच्या

पध्दतीमुळे अनेक मुली तबलावादन शिकण्यास प्रवृत्त झाल्या. यात दीपाली तेरकर, मयुरी आळंदकर, निलीमा चापसी, ब्रिजवासी भगिनी, उषा गोस्वामी, सुनीता गोस्वामी अशा विद्यार्थिंनी पुढे होऊन तबल्याची साधना त्यांच्याकडे करू लागल्या.

पं. राम सरांच्या तबला शिकविण्याच्या पध्दतीबद्दल सांगताना त्यांचे शिष्य प्रा. विश्वनाथ स्वामी सांगतात, "पं. राम सर विद्यार्थ्यांना शिकवीत असताना कठीण बोलसुध्दा सुलभ पध्दतीने शिकवितात. सरांची वादन पध्दती स्पष्ट असल्यामुळे बोलांचे वजन, निकास व मिठास विद्यार्थ्यांच्या पटकन लक्षात येते. एखादा बोल विद्यार्थ्यांना समजला नाही तर तो त्याला अनेक वेळा समजवून सांगतात."

त्यांचे दुसरे शिष्य जगदीश वेदपाठक त्यांच्या शिकविण्याच्या पध्दतीबद्दल म्हणतात,"राम सरांचा स्वभाव गोड आहे. त्यामुळे विद्यार्थी न भीता त्यांच्याशी जवळीक साधतात. ते लहान मुलांना लहान होऊन आत्मीयतेने शिकवितात. त्यांच्यात कमालीची सहनशीलता आहे. त्यामुळेच त्यांच्या हातून अनेक शिष्य घडले."

डॉ. राम सरांचे सुपुत्र गणेश यांच्या मते, "आम्हा घरातील सर्व मुलांना तबला, गायन व हार्मोनियमचे शिक्षण दिले. आम्ही अगोदर त्यांचे शिष्य आहोत व नंतर मुले आहोत. शिष्यात व मुलात शिकविताना त्यांनी कधी भेदभाव केला नाही. ज्याच्यात घेण्याची जशी क्षमता आहे तसेच ज्ञान त्यांनी विद्यार्थ्यांना दिले."

प्रा. राजेंद्र भोसले हे गुरूंच्या विषयी म्हणतात, "मी एका गरीब लाकूडतोड्याचा मुलगा होतो. घरात अठराविश्व दारिद्र्य पण तबलावादनाची आवड होती. माझी आवड पाहून पं. राम सरांनी मला कधीही फीस मागीतली नाही. माझ्या प्रमानेच विश्वनाथ स्वामी, महादेव बन, गोपाळ जाधव अशा अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मोफत शिक्षण दिले."

उपरोक्त प्रतिक्रियांवरून असे लक्षात येते की डॉ. राम बोरगावकर यांनी विद्यार्थ्यांत भेदभाव न करता खुल्यादिलाने विद्यादान केले. विश्वनाथ स्वामी यांच्यासारख्या शिष्यांचा प्रामाणिकपणा पाहून व त्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन त्यांना विनामूल्य शिक्षण दिले. एवढेच नाही तर आपल्या विद्यालयात व्यवस्थापकाची नोकरी देऊन त्यांना आर्थिक मदत केली. अशा अनेक शिष्यांचा चरितार्थ चालविण्यासाठी व त्यांना त्यांच्या आयुष्यात उभे करण्यासाठी डॉ. राम बोरगावकर यांनी मोलाचे योगदान दिले.

संगीत विद्यालयातील सर्व शिष्यांना संगीत विषयाची गोडी लागावी, त्यांना मुक्त व्यासपीठ मिळावे, त्यांच्यात सभाधीटपणा यावा यासाठी त्यांनी प्रत्येक गुरुवारी साप्ताहिक



संगीत सभेचे आयोजन केले. सायंकाळी ४ वाजता सरस्वती पुजनाने कार्यक्रम सुरू व्हायचा व रात्री ८ वाजता त्याची सांगता व्हायची. अशा उपक्रमामुळे शिष्यमंडळी तयार होऊ लागली या विद्यालयातून शेकडो विद्यार्थी विशारद परीक्षा उत्तीर्ण होऊ लागले असे असले तरी संगीत अलंकार परीक्षेसाठी लातूर जिल्हयातील विद्यार्थ्यांना नांदेड, पुणे अथवा हैद्राबाद येथे जावे लागायचे. त्यामुळे डॉ. राम सरांनी प्रयत्न करून १९९९ पासून अ. भा. गांधर्व मंडळाचे संगीत अलंकार परीक्षेचे केंद्र सुरू केले.त्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची सोय झाली.

मासिक संगीत सभेबरोबरच पं. पलुस्कर पुण्यतिथि निमित्त संगीत समारोह, विविध संगीत संमेलने, शिबिरे, कार्यशाळा आदी उपक्रम त्यांनी राबविले. तबलावादन, शास्त्रीय गायन, सुगम संगीत, शास्त्रीय नृत्य इ. विषयांचे शिक्षण या संगीत महाविद्यालयातून दिले जाते. यामुळे अनेक रसिक, गायक, वादक व नर्तक तयार झाले तर अनेक शिष्य संगीत अध्यापक म्हणून शाळा महाविद्यालयात रूजू झाले.

***  मराठवाडा संगीत कला अकदामी व रीसर्च सेंटर, लातूर :**

१९९२ साली मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटरची त्यांनी सुरुवात केली. विलासरावजी देशमुख यांनी या अकादमीला मदत केली. या अकादमीच्या माध्यमातून त्यांनी विविध संगीतोत्सवाचे व विविध सांगीतिक उपक्रमांचे आयोजन केले. या सर्व उपक्रमांमुळे अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कलावंत लातूरला आले. याअकादमीच्या माध्यमातून त्यांनी अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ ज्यांनी योगदान दिले अशा कलावंतांना 'विलासरत्न पुरस्कार' देऊन गौरविले. यात २०१४ मध्ये पं. अजय पोहनकर तर २०१६ मध्ये उ. उस्मान खाँ यांना पुरस्कार देऊन गौरव केला.

स्व. दगडोजीराव देशमुख कलादालन व स्व. बाबा बोरगावकर संगीत गुरुकुलाचे उद्घाटन विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते झाले. यात गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या निवासाची मोफत सोय केली जाते. याच बरोबर 'विलासरावजी देशमुख स्मृति संगीत शिष्यवृत्ती' देऊन संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रू १४,००० ची आर्थिक मदत ते करतात. प्रत्येक वर्षी ७ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. एवढेच नाही तर या विद्यार्थ्यांना मोफत संगीताचे शिक्षण दिले जाते.

***  सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर :**

काळ बदलत चालला होता. शिक्षणाचे प्रवाहही बदलत चालले होते. त्यादृष्टीने

नवीन संकल्पना आल्या. केवळ गुरुकुल पध्दतीनेच संगीत शिकवावे किंवा शिकावे ही कल्पना आता मागे पडली. त्या अनुशंगाने वरिष्ठ महाविद्यालयातून संगीत शिक्षणाची दारे उघडता येतील का? याचा ते विचार करू लागले. योगायोगाने १९९८ साली विलासरावजी देशमुख हे मुख्यमंत्री झाले. त्यांनी २००० साली क्षणाचाही विलंब न लावता 'सरस्वती संगीत कला महाविद्यालय' हे अनुदानासह मंजूर केले. इ. ११ वी पासून पदवीपर्यंत संगीताचे शिक्षण या महाविद्यालयातून चालू झाले. पुढे २००५ सालापासून एम. ए. संगीत विषयाची सुरुवात झाली. यामुळे लातूर जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून अभिजात संगीताचे धडे घेता येऊ लागले.

दैनंदिन अध्यापनाबरोबरच संगीत तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सुगम संगीत, शास्त्रीय संगीत विषयक शिबिरे व कार्यशाळा, शहरातील ज्येष्ठ गुरूंचा सत्कार करण्यासाठी 'गुरूगौरव सोहळा', स्नेह संमेलनानिमित्त सांगीतिक कलावंतांनी पाचारण करणे अशा विविध उपक्रमांमुळे लातूर शहरातील सांगीतिक वातावरण वृद्धिंगत होण्यास मदत झाली. साडेपाच एकर परिसरातील ही संगीत नगरी लातूरच्या वैभवात भर टाकणारी आहे. महाविद्यालयाच्या या संगीत नगरीत ज्ञानसरस्वती मंदिरामुळे हे खरोखरच ज्ञान मंदिर असल्याची अनुभूती येते. महाविद्यालयीन शिक्षण पद्धती असली तरी हे महाविद्यालय 'गुरुकुल' असल्याचा भास निश्चितच होतो. अशा या महाविद्यालय संस्थेचे डॉ. राम बोरगावकर हे संस्थापक अध्यक्ष आहेत. एवढेच नव्हे तर ते या महाविद्यालयात तबला विषयाचे अधिष्ठाता म्हणूनही कार्यरत आहेत.

अशा प्रकारे विविध सांगीतिक संस्था, महाविद्यालय, गुरुकुल, अकादमी, संशोधन केंद्र, संगीतनगरी, ज्ञानसरस्वती प्रतिष्ठान न्यास आदी संस्थांच्या माध्यमातून ते अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत

**सुयोग्य शिष्यांची निर्मिती**

डॉ. राम बोरगावकर यांच्या शिष्यांचा परिचय पुढील प्रमाणे सांगता येईल.

* **प्रा. हरिसर्वोत्तम जोशी :**

प्रा. जोशी यांचा जन्म १२ मार्च १९६८ रोजी निलंगा तालुक्यातील तगरखेडा या गावी झाला. वडील कीर्तनकार असल्यामुळे घरात संगीताचे वातावरण होते. पुढे त्यांनी १९८२ साली लातूर येथील पं. राम बोरगावकर यांच्या सरस्वती संगीत महाविद्यालयात प्रवेश घेतला. तबला वादनाची रीतसर तालीम घेण्यास सुरुवात झाली. पं. बाबुरावजी



बोरगावकर यांच्याकडून गायनाचे धडे घेण्यास प्रारंभ झाला. १९८७ साली त्यांनी तबल्यातील विशारद व १९९४ साली तबल्यातील अलंकार ही पदवी प्राप्त केली. या बरोबरच १९९८ साली गायनातील विशारद ही पदवी प्राप्त केली. १९९२ साली त्यांनी बी. ए. ही पदवी प्राप्त केली. तर २००४ साली बी. एड्. उत्तीर्ण झाले. दयानंद कला महाविद्यालयातून २०१२ साली गायनातील एम. ए. ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ची पदवी प्राप्त केली.

महाविद्यालयीन जीवनात जिल्हा युवकमहोत्सवात द्वितीय क्रमांक पटकावला. १९९१ साली पुन्हा एकदा युवकमहोत्सवात दुसरे पारितोषिक प्राप्त केले.

ते २ सप्टेंबर १९९७ पासून राजर्षि शाहू महाविद्यालयात संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे येथील कलाशिक्षण अभ्यास मंडळावर त्यांनी लेखक मंडळ सदस्य म्हणून कार्य केले. या बरोबरच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व शैक्षणिक संशोधन मंडळ, बालभारती, पुणे येथे भारतीय संगीत अभ्यास गट सदस्य म्हणून कार्यरत आहेत. अखिल भारतीय गांधर्व मंडळाचे परीक्षक म्हणूनही ते कार्यरत आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आयोजित युवकमहोत्सवात ते मार्गदर्शक व व्यवस्थापक म्हणून कार्य करतात. एवढेच नव्हे तर महाविद्यालयास संगीत प्रकारातील अनेक पारितोषिक त्यांनी मिळवून दिली आहेत. रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळ आयोजित 'चैत्रपल्लवी संगीतोत्सवात' त्यांनी सक्रीय सदस्य म्हणून काम केले. औरंगाबाद विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ आयोजित युवकमहोत्सवात ते सन्माननीय परीक्षक म्हणून काम केले आहे. आवर्तन मासिक संगीत सभा व राजर्षि शाहू संगीतोत्सवाच्या आयोजनातून त्यांनी अनेक कलावंतांचे गायन-वादन घडवून लातूरच्या सांगीतिक चळवळीत मोलाचे योगदान दिले आहे.

दि. १७ जानेवारी २०१२ रोजी आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या कार्यक्रमाच्या आयोजनातून व वादनात सक्रीय सहभाग नोंदविला. दि. ११ ते १३ मार्च २०१६ या कालावधित नवी दिल्ली येथे आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने आयोजित विश्व सांस्कृतिक महोत्सवात तबलावादक म्हणून सहभाग नोंदविला. याबरोबरच ते उत्तम तबला संगीतकार म्हणून प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारे प्रा. हरिसर्वोत्तम जोशी हे डॉ. राम बोरगावकरांचा संगीत वारसा पुढे चालवित आहेत. महाविद्यालयीन व सांस्कृतिक संस्थातून ते अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

*  **प्रा. विश्वनाथ गंगाधर स्वामी :**

यांचा जन्म ४ एप्रिल १९६८ साली लातूर येथे झाला. घरात अध्यात्मिक वातावरण होते; परंतु संगीताचा वारसा नव्हता. साधारणतः १९८१ पासून त्यांनी डॉ. राम बोरगावकर यांच्याकडून तबलावादनाची तालीम घेण्यास सुरुवात केली. त्यांनी १९९१ साली तबल्यातील विशारद तर १९९८ साली तबला अलंकार ही पदवी प्राप्त केली. १९९९ साली संगीत शिक्षा विशारद (बी. एड.) व २००५ साली यशवंतराव चव्हान मुक्त विद्यापीठातून बी. एड. ही पदवी प्राप्त केली. १९९९ पासून ते महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातून इ. ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना तबलावादनाचे धडे देत आहेत.

शालेय व महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी विविध सांगीतिक उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सरस्वती संगीत महाविद्यालयातील जवळपास सर्वच सांगीतिक महोत्सवाच्या आयोजनात त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या. दि. १ मे २००० रोजी मुंबई दूरदर्शनवरून 'तालदर्शन' या कार्यक्रमात सहभागी होऊन तबलावादन केले. 'भक्तिरंग' या दूरदर्शनवरील मालिकेतसुद्धा त्यांनी कला प्रदर्शन केले. १९९९ साली मध्य प्रदेशातील देवास येथे त्यांनी आपल्या गुरुसमवेत तबलावादन केले. लातूर जिल्हा रौप्यमहोत्सवीवर्षानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम, गुरुदेव सिद्धपीठ गणेशपुरी (ठाणे), रूईभर येथील श्रीदत्त संस्थान, सदानंद संस्थान, दत्तनगर येथील दत्तजयंती संगीतोत्सव, २००७ मधील अखिल भारतीय विरशैव मराठी साहित्य संमेलन, श्री. श्री. रविशंकर गुरूजीप्रणित आर्ट ऑफ लिव्हींगच्या वतीने आयोजित 'तालनिनाद' व 'वर्ल्डकल्चरल फेस्टिव्हल' अशा विविध संमेलनातून त्यांनी तबलावादन केले आहे.

त्यांच्या या कार्याबद्दल श्री. १००८ जगदगुरू विश्वराध्य ज्ञानसिंहासन जंगमवाडी मठ संस्थान, वाराणसी यांच्या वतीने 'श्री. सदगुरू सेवाभूषण' या उपाधीने सन्मानित केले. अशा प्रकारे ते पं. राम बोरगावकर यांच्याकडून घेतलेला सांगीतिक वारसा पुढे चालवित असल्याचे दिसून येते.

*  **गणेश बोरगावकर :**

तीन पिढ्यांच्या सांगीतिक वारसा मिळालेल्या कुटुंबात दि. २६ जून १९८८ साली गणेश यांचा जन्म झाला. त्यांना पणजोबा बाबा बोरगावकर, आजोबा गोविंदरावजी व वडील डॉ. राम बोरगावकर यांच्याकडून तबलावादनाची विधिवत तालीम मिळाली तसेच काका बाबुराव बोरगावकर यांच्याकडून त्यांनी गायन व हार्मोनियम वादनाचे



धडे घेतले.घरात सांगीतिक वातावरण व अनुवंशिकतेने मिळालेला तबलावादनाचा वारसा यामुळे आगदी बोलपणातच ते तयारीने वादन करू लागले. इ. स. २००२ साली त्यांनी तबलावादनातील विशारद ही पदवी प्राप्त केली तर २००४ साली संगीत अलंकार ही पदवी भारतात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी 'स्वरसाधना' समिती, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या तबलावादन स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

१९९५ साली महाराष्ट्र स्टेट कॉमर्स कॉन्फरन्स, लातूर येथे स्वतंत्र तबलावादन सादर केले.

१९९८ साली पं. वि. दि. पलुस्कर पुण्यतिथीनिमित्त घेण्यात आलेल्या राज्य स्तरीय तबलावादन स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळाले.

१९९९ साली अखिल भारतीय संगीत शिक्षकांचे १६ वे अधिवेशन नाशिकमध्ये संपन्न झाले. त्या राज्य स्तरीय कार्यक्रमात त्यांनी तबलावादन करून वाहवा मिळविली. इ. स. १९९९ साली स्व. दुल्लभदास चापसी संगीत स्पर्धेत तबलावादन स्पर्धेत विशेष प्रावीण्य प्राप्त केले.

२००० साली अष्टविनायक प्रतिष्ठान, लातूर यांच्याकडून घेण्यात आलेल्या राज्य स्तरीय तबलावादन स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. २००० साली सी. सी. आर. टी. दिल्ली यांच्याकडून 'सांस्कृतिक प्रतिभा खोज छात्रवृत्ती' योजनेअंतर्गत राष्ट्रीय स्तरावरची शिष्यवृत्ती मिळाली.

इ. स. २००३ मध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित १७८ व्या विविध कलामहोत्सवात स्वतंत्र वादन करण्याची संधी मिळाली. २००५ ते २००९ या कला कालावधित सह्याद्री दूरदर्शनवरून 'भक्तिरंग' या कार्यक्रमात तबला साथ केली. हा कार्यक्रम साडेतीन वर्षे चालला. तालदर्शन या कार्यक्रमाचे दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित झाला. उत्तम तयारी, अस्सल बनारस बाज वाजवून त्यांनी आपली प्रतिभा सिद्ध केली आहे. त्यांनी आपल्या वडिलांबरोबर वयाच्या १३ व्या वर्षी अखिल भारतीय गांधर्व मंडळाच्या दिक्षांत समारंभात नागपूर येथे पहिले सहवादन केले त्यानंतर २००३ पासून वडिलांबरोबर तबला जुगलबंदीचा कार्यक्रम सुरू केला. अनेक वेळा त्यांनी स्वतंत्र तबलावादनही केले आहे. मुंबई, पुणे, नासिक, नगर, नांदेडबरोबरच हैद्राबाद व इंदौर येथील संगीत संमेलनात त्यांनी वादन करून आपला ठसा उमटवलेला

आहे.

२००५ साली सांस्कृतिक क्षेत्रातील दैदीप्यमान यशाबद्दल 'सांस्कृतिक सन्मानप्राप्त व्यक्तिमत्त्व' म्हणून मराठा सेवा संघाच्या वतीने त्यांना सन्मानित केले तसेच २००७ साली आर्य संगीत कला प्रसारणी सभेची शिष्यवृत्तीही त्यांना मिळाली. सध्या ते सरस्वती संगीत महाविद्यालय हा सरस्वती संगीत कला महाविद्यालयातून भावी पिढीस तबलावादनाचे धडे देत आहेत.

**अनेक मौलिक बंदिशीच्या रचना :**

लहाणपणी डॉ. राम यांनी काका गोविंदरावजी बोरगावकर यांच्याकडून तबल्याची तालीम घेतली होती. मुळात अण्णांनी शास्त्रोक्त शिक्षण घेतले नव्हते. ते मुक्त व ढोबळ मानाने शिकवायचे; परंतु पं. राम सर हे लहाणपणापासूनच चौकस व कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. लहान वयातच अण्णांनी शिकविलेले बोल व्यवस्थित करून व मात्रेत बसवून वाजवायचे. 'आवश्यकता हीच नवनिर्मितीची प्रेरणा असते' या उक्तीप्रमाणे वयाच्या सातव्या वर्षापासूनच ते छोट्या छोट्या रचना करू लागले. अर्थात ही ईश्वरदत्त प्रतिभा त्यांना बालपणातच लाभली. पुढे उ. गुलाम रसूल खाँ व पं. शारदा सहायजी यांच्याकडून त्यांनी तालीम घेतली. भरपूर श्रवण केले, चिंतन केले. यातूनच त्यांची पेशकार कायदे, रेले, टुकडे आदि बंदिशी निर्माण करण्याची प्रतिभा विकसित झाली. यासंदर्भात त्यांचे शिष्य विश्वनाथ स्वामी यांनी एक किस्सा सांगितला, "पं. राम सर जेव्हा बनारसला होते तेव्हा त्यांचे गुरुजी अत्यंत कडक शिस्तीचे होते, त्यांचा प्रचंड धाक होता. ते नेहमी बनारसी पान खायचे व खात खातच ते शिष्यांना बंदिशी सांगायचे. त्यामुळे त्या बंदिशी अनेक वेळा अस्पष्ट ऐकू यायच्या; परंतु पुन्हा गुरूंना विचारण्याची हिंमत शिष्यांत नसायची. त्यामुळे राम सर एकाग्रतेने ऐकून लिहून घ्यायचे व रियाज करायचे. पुढे १९८३ साली पं. शारदा सहायजी लातूरला आले तेव्हा पं. राम सर त्यांना म्हणाले, "गुरुजी मैने बनारस में आपकी कुछ आधी रचनाए सुनी थी इसे मैने अब पुरा किया है। क्या ये सही है?" असे म्हणून त्यांनी चलन, बॉट, कायदे इ. प्रकार वाजवून दाखविले. त्यावर पं. शारदा सहायजी प्रसन्न झाले व म्हणाले, "बेटा राम आपने जो भी रचनाए बनाई है वे सही बनारस ढंग की ही है। आपने सही रचना कि है।"

अशा प्रकारे बनारस येथे केवळ ऐकलेल्या अर्धवट रचनांना डॉ. राम सरांनी पूर्ण केल्या. एवढेच नव्हे तर बनारस घराण्याच्या नियमांना लक्षात घेऊन त्या रचना सजविल्या.



आपल्या शिष्यांना शिकवीत असताना त्यांनी स्वयंस्फूर्तिने अनेक कायदे, रेले, टुकडे, चक्रधार व तिहाया निर्माण करून शिकविल्या. यासंदर्भात त्यांचे सुपुत्र व शिष्य श्री. गणेश सांगतात, "माझ्या वडिलांनी प्रत्येक शिष्याच्या कुवतीनुसार रचना करून शिकविल्या. एखाद्या शिष्याला एखादा पेशकार कठीण जात असेल तर त्याला सोप्यात सोपा करून शिकविला. तर प्रतिभासंपन्न शिष्याला कठीणात कठीण रचना तयार करून दिल्या. एखाद्या कायद्याचे २० ते २५ पलटे ते सहज करतात. एवढी कल्पनाशक्ती त्यांना लाभली आहे. त्यांनी आजपर्यंत किमान ५०० तरी नवीन रचना केल्या आहेत."

अशा प्रकारे डॉ. राम बोरगावकर यांनी विविध पेशकार, कायदे, रेले, टुकडे, बॉट, चलन, चक्रधार इ. रचना तयार करून शिष्यांना शिकविल्या. विविध संगीत समारोहातून त्या सादर केल्या व श्रोत्यांची दाद मिळविली. थोडक्यात असे म्हणता येईल की डॉ. राम यांनी अनेक तबलावादनातील नवनिर्मिती रचना करून तबल्याचे साहित्य समृद्ध केल

**नवीन तालाचे सृजन :**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मंडळाच्या संगीताचार्य परीक्षेसाठी पं. राम बोरगावकर यांनी 'गणेशताल' या नवतालाची निर्मिती केली. वयाच्या २४ व्या वर्षी जेव्हा त्यांनी या तालात उठाण, पेशकार, चलन, कायदे, रेले, टुकडे, चक्रधार या बंदिशीचे सादरीकरण केले. तेव्हा परीक्षकसुद्धा आश्चर्यमुग्ध झाले त्यांनी पं. राम यांना आनंदाने मिठी मारली व तोंडभरून कौतुक केले.

या तालाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे-

मात्रा - ११
विभाग - ३ (४-४-३ मात्रांचे)
टाळ्या - २ (पहिल्या व पाचव्या मात्रेवर)
काल - १ (९ व्या मात्रेवर)

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मात्रा - | १ | २ | ३ | ४ | । | ५ | ६ | ७ | ८ | । | ९ | १० | ११ | । |
| ठेका - | धाऽ | धिट | धिट | तिट | । | धाऽ | धिट | धिट | तिट | । | कत्त | गदि | गन | । |
| चिन्ह - | x | | | | । | २ | | | | । | ० | | | । |

डॉ. राम बोरगावकर यांनी सृजनशिलतेने निर्माण केलेल्या या 'गणेश तालाला' गांधर्व मंडळाने मान्यता दिली. तालशास्त्रावर आधारित असलेल्या या तालाची ध्वनिफीतसुद्धा प्रकाशित झाली आहे.

*	**संगीतविषयक अनेक महत्त्वपूर्ण पदांवर सफलतापूर्वक कार्य:**

०१. अखिल भारतीय गांधर्व मंडळ संलग्नित 'सरस्वती संगीत महाविद्यालया'चे ते प्रधानाचार्य आहेत. या पदावरून त्यांनी अनेक शिष्यांना संगीताचे ज्ञानामृत पाजले आहे. विविध संगीतोपयोगी उपक्रमांचे आयोजन करून त्यांनी विद्यार्थ्यात अभिजात संगीताची अभिरूची निर्माण केली.

०२. 'मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर'ची त्यांनी १९९२ साली स्थापना केली. या अकादमीचे ते अध्यक्ष आहेत. या अकादमीच्या माध्यमातून त्यांनी अनेक संगीतोत्सवांचे आयोजन केले. मराठवाड्यातील गुणी कलावंतांना संघटित करून त्यांचे पुणे, अहमदनगर व मुंबई येथे कार्यक्रम घडवून आणले. त्यांना 'मराठवाडा संगीतरत्न गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित केले.

०३. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे ते प्रारंभिक ते संगीत अलंकार परीक्षा घेण्यासाठी तज्ज्ञ परीक्षक म्हणून संपूर्ण भारतात जातात.

०४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात व राज्य स्तरीय 'इंद्रधनुष्य' युवकमहोत्सवात ते परीक्षक म्हणून कार्य करीत असतात.

०५. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील संगीत अभ्यास मंडळाचे ते २००४ ते २००७ या कालावधित अध्यक्ष राहिले आहेत. यातून पदवी परीक्षेचा पाठ्यक्रम तयार करणे, परीक्षा व्यवस्थापण, परीक्षक म्हणून उपस्थित राहणे अशी महत्त्वपूर्ण कार्ये त्यांनी केली आहेत.

०६. 'सरस्वती संगीत कला महाविद्यालय' या संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी लातूर व परिसरातील विद्यार्थ्यांना इ. ११ वी पासून पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.

०७. २००२ ते २००५ या कालावधीत महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचलनालयाने त्यांची कलावंतांच्या पुरस्कार निवड समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती केली होती. ज्यातून त्यांनी योग्य कलावंतांना न्याय मिळवून दिला.

अशा प्रकारे डॉ. राम बोरगावकर यांनी विविध महत्त्वपूर्ण पदांवर कार्य करून अभिजात संगीताच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे.



*	**मानसन्मान :**

वयाच्या सातव्या वर्षापासून पं. राम बोरगावकर यांनी अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ तन, मन, धन अर्पण केले. या श्रमाचे फळ म्हणून त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांची सूची खालीलप्रमाणे आहे.

०१. पं. राम बोरगावकर यांना १९७१ साली मुंबई येथील मानव मंदिर संस्थेने आयोजित केलेल्या तबलावादन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे रु. ५०१/- व पदक मिळाले.

०२. १९८१ साली ललित कला मंडळाच्या राज्य स्तरीय तबलावादन स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले.

०३. १९७७ साली म्हणजे वयाच्या १४ व्या वर्षी सुप्रसिद्ध संगीतकार व गायक पं. सुधीर फडके यांना तबलासाथ करण्याचा बहुमान मिळाला.

०४. १९८७ साली सूरसिंगार संसदेने त्यांना 'तालमणि' ही मानाची पदवी देऊन गौरविले.

०५. १९८९ साली गांधर्व मंडळ मुंबई यांनी त्यांना संगीताचार्य (डॉक्टरेट) ही पदवी देऊन सन्मानित केले. तालशास्त्रात पीएच. डी. करणारे सर्वात कमी वयाचे व मराठवाड्यातील पहिले युवा तबलावादक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

०६. १९९८ साली पुणे येथील संगीतोन्मेष संस्थेच्या वतीने 'भास्करराव दुषी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

०७. दक्षिण विभागीय संगीत महोत्सवात 'प्रथम युवा पुरस्काराने' त्यांना सन्मानित केले.

०८. काशी हिंदू विश्वविद्यालयाने 'युवा कलाकार गुणवत्ता पुरस्कार' देऊन सन्मानित केले.

०९. अखिल भारतीय गांधर्व मंडळ, मुंबई यांनी राष्ट्रीय स्तरावरील 'श्री. गुरुदेवजी पटवर्धन पुरस्कार' देऊन त्यांना गौरवान्वित केले.

१०. प्रयाग संगीत समिती अलाहबादचे सुवर्णपदक महाराष्ट्राला पहिल्यांदा मिळवून देण्याचा मान त्यांनी मिळवून दिला.

११. डॉ. राम बोरगावकर यांनी १९७९ साली आकाशवाणीचा बी. ग्रेड, १९८६ साली बी हाय व १९९१ साली ए ग्रेड प्राप्त केला.

१२. एन. सी. पी. ए. मुंबई यांनी आयोजित केलेल्या 'विश्वताल परिषदे'मध्ये बनारस घराण्यावर व्याख्यान देण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

१३. लातूर जिल्हा रौप्यमहोत्सवी वर्षात तत्कालीन मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते त्यांचा 'लातूर भूषण पुरस्कार' देऊन गौरवान्वित केले.

१४. १२ जानेवारी २०१२ रोजी आर्ट ऑफ लिव्हिंगच्यावतीने सोलापूर येथे आयोजित 'ताल-निनाद' या कार्यक्रमात संगीत क्षेत्रासाठी कार्य केल्याबद्दल डॉ. राम बोरगावकरांचा श्री. श्री. रविशंकर गुरुजींच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

१५. २०१३ साली महाराष्ट्र शासनाने त्यांना सांस्कृतिक राज्य पुरस्कार देऊन सन्मानित केले.

१६. २०१३ साली लातूर कला रसिक मंच व मराठवाडा संगीत कला अकादमीच्या वतीने 'डॉ. राम बोरगावकर गौरव समारोहा'चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उस्ताद उस्मान खाँ तर अध्यक्ष म्हणून माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख हे होते.

१७. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी त्यांची संशोधन मार्गदर्शक म्हणुन नियुक्ती केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी संगीत विषयात संशोधन करीत आहेत.

* **गौरोद्गार :**

* डॉ. राम बोरगावकर यांच्या वादनशैलीवर काही वर्तमानपत्रांनी प्रकाश टाकला आहे. तो पुढीलप्रमाणे...

०१. "The list of contributors to the field of Tabla contains the name of Dr. Ram Borgaonkar the young disciple of Pt. Sharda Sahay, Banaras." - Lokmat Times

०२. "Disciple of eminent Tabla exponent of the Banaras Gharana Pt. Sharda Sahay by Ram Borgankar of Latur has been chosen by sangeetonmesh for the first late Bhaskarrao Dushi Momorial award."

- Maharashtra Heald, Pune

०३. "डॉ. राम बोरगावकरने साफ शफ्फाक तबले के बोलोंसे बीते वैभव की स्मृतीया जगा दी। बनारस बाज की विलुप्त होती जा रही बंदिशोपर प्रकाश डाला और श्रोताओंको उच्चकोटी के वादन की लजीज दावत दी।"

- फ्री प्रेस, इंदौर



०४. "पं. शारदा सहाय के प्रमुख शिष्य डॉ. राम बोरगावकराने तबले पर विभिन्न लय की प्रस्तुतियाँ बोलोंकी तकनिकी निराली एवम् स्पष्ट की।"

- दै. आज, आग्रा

०५. "लातूर के कलाकार राम बोरगावकरने एकल तबला वादन में विविध प्रकार बजाकर अपनी श्रेष्ठ वादकता का परिचय दिया। इंदौर के रसिक श्रोताओं को यह तबला वादन मिष्ठान्न भोज था।"

- नगर समाचार, इंदौर

०६. "लातूर राम बोरगावकर यांचे स्वतंत्र तबलावादन खूपच तडाखेबाज झाले. त्यांचा बनारस बाजाचा सोलो व त्यातही विलक्षण बोलणारा बायाँ श्रोत्यांना नवीन वाटला."

- महाराष्ट्र टाईम्स

अशा प्रकारे डॉ. राम बोरगावकर यांच्या कार्याची दखल घेऊन समाजाने व शासनाने त्यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

चि. मंगेशचा विवाह झाला. त्याचा विवाह जळगावजवळील रावेर निवासी डॉ. राजेंद्र आठवले यांच्या कन्या डॉ. अपूर्वाशी झाला तर दुसरा मुलगा गणेशही त्यांच्याच महाविद्यालयातील संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका वैशाली यांच्याशी विवाहबद्ध झाला. नुकतेच गणेश यास कन्यारत्न झाले आणि पाहता पाहता डॉ. रामसर आजोबा झाले. रामसरांचा परिवार हा संगीतमय आहे. इथे प्रत्येक जन कलावंत आहे. अर्थात यामागे त्यांची कठोर साधना व ईश्वराचा कृपाशीर्वाद हाही तितकाच महत्त्वाचा आहे. ६० च्या दशकात सुरू झालेला त्यांचा हा प्रवास नागमोडी वळणे घेत संकटाच्या दरी खोऱ्यातून वाट काढीत अखंडपणे सुरू राहिला. या प्रवासात सहभागी झालेल्या प्रत्येकाने आपापल्या परीने कलासाधनेच्या यज्ञकुंडात समिधा समर्पित केल्या. त्यातूनच हे सोन्याचे दिवस त्यांच्या वाट्याला आले.

♦ ♦ ♦



प्रकरण

७

# पं. बाबुराव बोरगावकर

दोन पिढ्यांचा मिळालेला सांगीतिक वारसा, ईश्वरप्रदत्त लाभलेली सूरांची देणगी, थोर गुरूंचा सहवास, ताला-सूरांची केलेली कठोर साधना, काव्य करण्याची लाभलेली प्रतिभा यामुळे एक जिद्दी आणि अविरत धडपड करणारा एक कलावंत घडला. त्या कलावंतांचे नाव आहे पं. सूरमणी बाबुराव बोरगावकर! प्रतिथयश कलावंत असतानाही ते प्रसिद्धी मागे न लागता जमिनीवरच आहेत. कार्यमग्नतेतच त्यांनी आयुष्याची सार्थकता मानली. अशा या घरंदाज गायक, उत्तम हार्मोनियम वादक, उत्कृष्ट तबला संगीतकार, हाडाचा शिक्षक, आदर्श गुरू, प्रतिभासंपन्न रचनाकार, सरस्वती मातेचा निस्सीम भक्त, लेखक, प्रकाशक, निष्काम कर्मयोगी व लातूर जिल्ह्याचे भूषण असलेल्या पं. बाबुराव बोरगावकरांचे थोडक्यात जीवनवृत्त पाहुयात.

* **जीवनवृत्त :**

पं. बाबुरावजींचा जन्म २५ मे १९६७ साली लातूर या छोट्याशा नगरात झाला. त्यांचे मुळ गाव दर्जीबोरगाव परंतु आजोबा लातूरला येथून स्थायिक झाले. त्यांच्या वडिलाचे नाव गोविंदराव तर आईचे नाव गोदावरी असे आहे. ते जन्माला येण्यापूर्वीच घरात संगीताचे सूर निनादत होते. आजोबा संगीतमहर्षि बाबा बोरगावकर हे संगीताचे उत्तम मर्मज्ञ होते. अभिजात संगीताचे मुळ लातूरात रुजविण्यासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले होते. आपल्या नातवांनी अभिजात संगीत शिकावे, त्याचा आनंद घ्यावा. मिळालेला आनंद दुसऱ्यांना वाटावा. अशी त्यांची मनोमन इच्छा होती. यासंदर्भात पं. बाबुरावजी म्हणतात, "आद्यगुरू बाबांच्या प्रेरणेने व केवळ त्यांच्याचमुळे मी संगीताकडे आकर्षित होत गेलो. ते प्रचंड जिद्दी होते. संगीताच्या उत्कृष्ट प्रेमामुळे त्यांनी आम्हाला तयार करण्यासाठी जिवाचा आटपिटा



केला. असे आजोबा मिळणे हे आमच्या मागील कित्येक पिढ्यांची पुण्याई असेल म्हणूनच ते आम्हाला लाभले. आज मी जो काही आहे तो त्यांच्यामुळेच आहेत."

अशा प्रकारे त्यांना संगीताचे बाळकडू बाबांकडूनच मिळाले. त्यांचे वडील पं. गोविंदराव ऊर्फ अण्णा बोरगावकर हे उत्तम गायक, हार्मोनियम वादक व तबलावादक आहेत. त्यामुळे बाबुरावांना संगीताचा वारसा आपसुकच मिळाला. स्वरसाधनेची व रियाजाची सवय वयाच्या तिसऱ्या वर्षापासून लागली ती कायमचीच. शिक्षण घेताना व साधना करताना सोबतीला राम बोरगावकर हे त्यांचे चुलतभाऊ होते. घरात वाद्यनिर्मितीचा कारखाना होता. त्यामुळे संगीत क्षेत्रातील लोकांचे घरात जाणे-येणे व्हायचे. त्यामुळे त्यांना संगीताविषयी बालपणापासूनच आकर्षण निर्माण झाले. इतर मुलांप्रमाणे खेळायला न जाता 'सा रे ग म'चा व 'धा धिं धिं धा'चा खेळ सुरू झाला. संगीत शिक्षणाबरोबरच वयाच्या पाचव्या वर्षी त्यांना लातूर येथील जवाहर प्राथमिक विद्यालयात प्रवेश मिळवून दिला. त्यानंतर इ. ८ वी ते इ. १० वी पर्यंतचे शिक्षण यशवंत विद्यालयात पूर्ण झाले. पुढे राजर्षि शाहू महाविद्यालयात इ. १२ वी कला शाखेचे शिक्षण झाले. संगीत विषयाची अधिक आवड असल्यामुळे त्यांचे मन शालेय शिक्षणात रमले नाही. पर्यायाने शालेय शिक्षण बंद झाले. असे असले तरी सांगीतिक शिक्षणात त्यांनी गती घेतली होती. पुढे थोर गुरूंचा परीसस्पर्श झाला व त्यांचे आयुष्य ताला-सूरांनी उजळून निघाले.

पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला तर असे दिसून येते की, 'साधी राहणी, उच्च विचार सरणी' हेच तत्त्व त्यांनी अंगीकारले आहे. पाच फूट सात इंच उंची असलेले बाबुरावजी नाकी डोळी सुंदर दिसतात. वरून गंभीर चेहरा दिसत असला तरी आतून ते प्रसन्न असतात. सतत चिंतन व कामाच्या धबडग्यात त्यांना मनमुक्त फिरण्यासाठी कधीही वेळ मिळत नाही. आधुनिक काळातील भपकेबाजपणाचे रीतीरिवाज त्यांच्यापासून कोसोमैल दूर असतात. झगझगीत कपडे, नको तेवढे वाढलेले केस, मागेपुढे शिष्यांचा ताफा असे सोपस्कार न करता ते अगदी सहजपणे वावरताना दिसतात. 'मी कोणी मोठा कलावंत आहे' अशा अहंकाराचा लवलेशही त्यांच्यात दिसून येत नाही. त्यांचे शिष्य प्रा. हरिसर्वोत्तम जोशी म्हणतात, "गेल्या २०-२५ वर्षांपासून पं. बाबुराव गुरुजी यांच्या जीवनाकडे जवळून पाहात असताना त्यांच्या अंगी असलेल्या विविध गुणांचा परिचय झाला. खरा कलावंत हा कलेशी एकनिष्ठ असतोच परंतु त्याशिवाय व्यावहारिक व कौटुंबिक पातळीवर सर्व कामे सहजपणे करणे ही गुरुजींची खासीयत आहे. राष्ट्रीय पातळीवरचे मान्यताप्राप्त कलावंत असूनही प्रसिद्धीपासून कोसो मैल दूर आहेत. आपल्याच

कामात अहर्निशपणे रमणारे कलावंत म्हणूनच त्यांचा उल्लेख करावा लागेल. मित्रनगर येथील 'सरस्वती भवन' असो की संगीत नगरीतील 'ज्ञानसरस्वती मंदिरा'ची उभारणी असो प्रत्येक गोष्टीकडे कटाक्षाने लक्ष देऊन त्यामध्ये सुबकता कशी आणता येईल याचा विचार करून ते पूर्णत्त्वास नेहणे ही त्यांच्याकडे अंगभूत कला आहे. या कामाच्या अनुषंगाने स्वतः वाळू चाळणे, धुणे, बांधकामावरती पाणी टाकणे, मिस्त्री, मजुरी यांना वारंवार सूचना देणे ही सर्व कामे ते कोणताही अभिनिवेश न बाळगता करतात."

खरोखरच त्यांच्या कार्यप्रणव व्यक्तिमत्त्वाकडे पाहिल्यानंतर ते एक निस्सीम कर्मयोगी आहेत याची प्रचीती येते. 'दे रे हरि । पलंगावरी ।' ही संकल्पना त्यांना मान्य नाही. पं. बाबुरावजी हे कधी निवांत गप्पा मारत बसले आहेत असे कधी झाले नाही. वेळ आपल्यासाठी आहे. त्यामुळे प्रत्येक क्षणाचा सदुपयोग कसा होईल याचा त्यांनी सातत्याने ध्यास घेतला आहे. श्वासागणिक काम करणे हीच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता असल्याचे ते मानतात. पं. बाबुरावजी एक ध्येयवेडे कलावंत आहेत. झपाटल्यागत काम करणे हा त्यांचा एक महत्त्वाचा गुण म्हटला पाहिजे. याचीच फलश्रुती म्हणजे सरस्वती मंदिराची उभारणी होय. शारदेचे निस्सीम भक्त असलेल्या बाबुरावजींच्या मनामध्ये सरस्वती मंदिर बांधण्याची कल्पना अनेक वर्षांपासून होती. इच्छा तिथे मार्ग असतो. त्या दृष्टीने माता सरस्वतीचा वरदहस्त सिद्ध झाला आणि सुंदर अशा ज्ञानसरस्वती मंदिराची उभारणी झाली. यासाठी त्यांनी स्वतः लक्ष देऊन मंदिर व मूर्तीचे काम करवून घेतले. राजस्थानातील जयपूर येथील 'मुकुंद मूर्ती भांडार' या दुकानातून त्यांनी सुंदर व रेखीव मूर्ती आणली. याबरोबरच आंध्र प्रदेशातील बासरच्या सरस्वती मंदिराप्रमाणे आपल्या देवीचे मंदिर व्हावे यासाठी प्रयत्न केला. तेथील मंदिरातील नक्षीकामाचे फोटो काढण्यासाठी परवानगी नव्हती त्यामुळे त्यांची कन्या कु. सरस्वती हिने आपल्या हाताने नक्षीकामाची चित्रे रेखाटली व तसेच नक्षीकाम येथील मंदिरात केले.

पहाटे चार वाजता उठून ते नित्य नियमाने योगासने व प्राणायाम करतात. त्यामुळे ते नेहमी स्वस्थ असतात. ते कधी आजारीही पडत नाहीत. चेहऱ्यावर उदासीनता आली आहे अथवा कामात मरगळ आली आहे, असे कधी होत नाही. त्यानंतर २ तास माता सरस्वतीची मनोभावे पूजा, अर्चा करतात. ते सरस्वती मातेशी इतके एकरूप झाले आहेत की ते म्हणतात, "माझा अन्तसुद्धा याच देवीच्या चरणाशी व्हावा." यावरून ते किती श्रद्धाळू आहेत याची अनुभूती येते. त्यानंतर सुरू होते स्वरांची साधना. रियाजातून ते नित्य नियमाने काही तरी नवनिर्मितीचा ध्यास घेत असतात.



दर्जी बोरगाव हे त्यांचे मुळ गाव. तेथे थोडीफार शेती आहे. त्यांना शेती करायला मनस्वी आवडते. पेरणीपासून ते धान्यांची रास होईपर्यंत ते स्वतः जातीने लक्ष देतात. गायीचा गोठा स्वच्छ करणे, धार काढून दूध घरी आणणे अशी कामे करताना त्यांना कधीही संकोच वाटत नाही. या साऱ्या गोष्टी करीत असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यात वक्तशीरपणाला खूप महत्त्व दिले आहे. सायंकाळी ०४.०० वा. संगीत महाविद्यालयातील वर्ग सुरू होणार म्हणजे होणारच. किमान चार पाच तास तरी ते संगीत ज्ञानदानाचे कार्य करतात.

त्यांच्या स्वभावाबद्दल त्यांचे शिष्य प्रा. लक्ष्मण श्रीमंगले म्हणतात, "पं. बाबुराव गुरुजींचा स्वभाव अत्यंत कडक आहे. ते एखाद्यावर कमालीचे रागवतील पण थोड्या वेळाने मवाळ होतात. कसलेही संकट आले तर ते डगमगत नाहीत. शेवटच्या टोकापर्यंत लढणे हा त्यांचा गुण मला भावलेला आहे. वयाच्या ५७ व्या वर्षी त्यांनी बी.ए. ची परीक्षा दिली." यावरून त्यांची कष्ट करण्याची तयारी, तरुणांनाही लाजवेल असा उत्साह व जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा दृष्टीकोन दिसून येतो.

स्मीता जोशी (औटी) या त्यांच्या शिष्या म्हणतात, "सर स्वभावाने कडक होते. या बाबतीतील मला एक प्रसंग नेहमी आठवतो. मी संगीत अलंकार परीक्षा देत होते. त्या वेळेस आमचे परीक्षा केंद्र हैद्राबाद येथे होते. तेथे परीक्षक म्हणून श्री. कऱ्हाडेसर व इतर एकजण होते. पं. बाबुरावसरांनी माझी छान तयारी करून घेतली होती. त्यामुळे मी चांगल्यारितीने परीक्षा दिली. सरपण खुश होते. परंतु परीक्षा संपताना परीक्षकांनी मला ताल धमार विचारला. परीक्षा तर उत्तम झाली होती. याच खुशीत मी होते. पण काही केल्या मला धमार ताल आठवेना. त्यामुळे मी सरळ 'येत नाही' असे उत्तर दिले. सरांना माझा खूप राग आला. एवढी परीक्षा चांगली दिली पण तुला साधा 'धमार ताल' सांगता येत नाही. असे म्हणून ते परीक्षकांसमोरच रागावू लागले. एवढेच नाही तर हिला परीक्षेत नापास करून टाका असे परीक्षकांना सांगितले. पूर्ण परीक्षेवर पाणी फिरले. परंतु जेव्हा माझ्या परीक्षेचा निकाल आला तेव्हा मी चांगल्या मार्कांनी पास झाले होते."

प्रा. विजयकुमार धायगुडे हे त्यांचे शिष्य म्हणतात, "पं. बाबुराव गुरुजी हे व्यावहारिक आहेत पण तेवढेच प्रांजळ स्वभावाचे आहेत. कुण्या एखाद्याबद्दल आकस बाळगून त्यांच्याशी गैरवर्तन केल्याचे मी आजपर्यंत पाहिले नाही. ते तेवढेच स्वाभिमानी आहेत. कुणाचीही हुजरेगिरी करणे त्यांना आवडत नाही."

अशा प्रकारे निखळ व निर्मळ व्यक्तिमत्त्व लाभलेल्या बाबुरावजींच्या व्यक्तिमत्त्वात एक सहृदय माणूस दडलेला दिसून येतो.

पं. बाबुरावजी यांचा विवाह सरोज यांच्याशी झाला. मुळातच सौ. सरोज या संगीत साधक होत्या. त्यामुळे बाबुरावच्या सुरेल संसाराच्या मैफीलीत लवकरच एकरूप झाल्या. किंबहुना आयुष्याच्याही मैफीलीत आगदी संवादिनीप्रमाणे अनुरूप साथ दिली. त्या लातूर येथील गोदावरी कन्या शाळेत संगीत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच सरस्वती संगीत महाविद्यालयातून आपल्या पतीसमवेत भावी पिढीस अभिजात संगीताचे धडे देत आहेत. त्यांना तीन कन्या आहेत. त्याही संगीत क्षेत्राशी निगडित असून आपल्या वडिलांची परंपरा पुढे चालवीत आहेत. यासंदर्भात सौ. सुनीता बोरगावकर लिहितात, "आणि पाहता पाहता या घरात चौथ्या पिढीचे आगमन झाले. माझी दोन मुले व जाऊबाईच्या तीन मुली असा पंचरंगी 'बालस्वरांचा' मेळाच जणू घराच्या अंगाखांद्यावर रुणझुण करू लागला. माझा मुलगा मंगेश बोरगावकर, जो 'सा रे ग म'च्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोचला आणि दुसरा गणेश ज्याने तबल्यामध्ये झोकून दिले. तसेच जावेच्या मुली मधुवंती ही देखील 'सा रे ग म' स्पर्धेत ठसा उमटवून गेली. सरस्वती आणि मंजिरी या तिघींनी शास्त्रीय व सुगम संगीतातील वाटचाल आश्वासकपणे सुरू केली आहे."

अशा प्रकारे पं. बाबुरावजींच्या मार्गदर्शनाखाली मंगेश, मधुवंती, मंजिरी व सरस्वती यांचा सांगीतिक प्रवास सुरू झाला.

यासंदर्भात त्यांच्या ज्येष्ठ कन्या सौ. मधुवंती बोरगावकर-देशमुख म्हणतात, "माणसाचे पहिले गुरू असतात त्याचे आई-वडील, त्यानंतर दुसरे स्थान असते ते गुरूंचे. आई-वडिलांशिवाय त्याला योग्य वळण व संस्कार मिळत नाहीत तर गुरूशिवाय शिष्य घडत नाही. परंतु या बाबतीत माझे अहोभाग्य आहे की, मला माझे आई-वडीलच माझे जन्मदाते आणि गुरू अशा दोन्ही स्वरूपात मिळाले. आईच्या पोटात असल्यापासूनच माझ्या कानावर माझ्या गुरूंचे संगीत पडत होते. त्यामुळे जन्मजातच मी त्यांची शिष्या झाले. लहानपणी मला आणि माझ्या भावंडांना सतत गाण्याचा रियाज करण्याचा खूप कंटाळा येत असे. इतर मुलांप्रमाणे मोकळ्या वातावरणात बागडावे, खूप मजा करावी असे वाटायचे, परंतु माझ्या वडिलांनी संगीताच्या रियाजामध्ये आमच्याकडून कधीही खंड पडू दिला नाही."



अशा प्रकारे घरातील मुलांना त्यांनी अत्यंत कडक शिस्तीत घडविले. त्यामुळेच बोरगावकर कुटुंबातील चौथी पिढी संगीत क्षेत्रात आपला ठसा उमटवीत आहे.

***     गुरू आणि शिक्षण :**

घरात संगीताचे सूर निनादतच होते. वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच चिमुकले बाबू व राम आपल्या आजोबाकडून गायनाचे धडे घेऊ लागले. वडील गोविंदरावजी (अण्णा) यांनी संगीत चुडामणी कृष्णाबाई रामदुर्गकर (गदग) व पं. नारायणराव जोगळेकर यांच्याकडून अभिजात संगीताची तालीम घेतली होती. बाबुरावांनी सुरुवातीला ६ महिने केवळ स्वरसाधना केली. त्यामुळे स्वाभाविकपणे आयुष्यभर पुरेल इतकी स्वर-तालाची बैठक तयार झाली. घरात संगीत विद्यालय व वाद्यनिर्मितीचा कारखाना सुरळीत चालू होता. बोरगावकर कुटुंबीयांचे सुखाचे दिवस आले होते. अशातच नियतीची दृष्ट लागली आणि राम यांच्या वडिलांना काळाने हिरावून नेहले. अशा स्थितीत बाबांनी मोठ्या धीराने आपल्या नातवांना अभिजात संगीत शिकविण्याचा ध्यास घेतला. मुलांचे कोडकौतुक बंद झाले. खेळणे, बागडणेही बंद झाले आणि सुरू झाली ती कठोर संगीत साधना.

लातूरनगरी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होती परंतु साहित्य संगीत कलेच्या दृष्टीने मागासलेली होती. 'अभिजात संगीत' शिकण्याची इथे सोय नव्हती. कोल्हापूरच्या देवल क्लबमध्ये हे कुटुंबीय स्पर्धेसाठी गेले. तेथील जाणकारांनी बाबू व रामचे गायन-वादन ऐकले व बाबांना सल्ला दिला. तुमची नातवंडे तालासूरात पक्की आहेत. त्यांना शास्त्रीय संगीताचे शिक्षण द्या. तो सल्ला त्यांनी मान्य केला. दोघांना संगीत शिक्षणासाठी पुण्याला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. वयाच्या दहाव्या वर्षी बाबांनी दोन्ही नातवांना पुण्याला आणले. तेथील रोकडा हनुमान मंदिराजवळ एक छोटीशी खोली भाड्याने घेतली व गुरूंचा शोध सुरू झाला. दैवयोगाने पं. सदाशिवबुवा जाधव यांची भेट झाली. ते उ. अब्दुल करीम खाँ यांच्या पत्नी बानुबाई यांचे शिष्य होते. उत्तम तयारी व स्वरांचे सच्चे असे ते कलावंत होते. त्यांच्या षष्ठ्याब्दीपूर्ती निमित्त पुण्यात पं. भीमसेन जोशी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला होता. तेव्हा पं. भीमसेनजी म्हणाले होते, "स्वर गळ्यात असलेले अनेक कलावंत असतात परंतु गळ्यात सिद्धी असलेले कलावंत कमी असतात. पं. सदाशिवबुवा जाधव हे गळ्यात सिद्धी असलेले कलावंत आहेत. सूर एकदा मनाला भिडला की पुसला जात नाही, असे पं. सदाशिवबुवांचे गायन असून त्यांचे गायन शंभर नंबरी सोन्याप्रमाणे शंभर नंबरी किराणा आहे.

अशा प्रकारच्या थोर गुरूंचा परीसस्पर्श चिमुकल्या बाबूला झाला आणि पाहता पाहतो तो किराणा घराण्याची भावपूर्ण, करुण व शांत रसाची गायकी आत्मसात करू लागला. भावपूर्ण स्वरलगाव व अचूक स्वरस्थाने इ. साठी प्रसिद्ध असलेली ही गायकी त्याला आकर्षित करू लागली. गुरू सानिध्यात राहून तो स्वरांचा अभ्यास करू लागला. त्यानंतर खोलीवर आल्यानंतर बाबा त्याच्याकडून रियाज करून घेऊ लागले. बाबा स्वतः आपल्या हाताने स्वयंपाक करून आपल्या नातवांना खाऊ घालायचे. दोन वर्षे ही तालीम व्यवस्थित चालली परंतु पुण्यातील खर्च बाबांना परवडेना. त्यामुळे त्यांनी आपल्या नातवांना पुन्हा लातूरला आणले. असे असले तरी नातवांना संगीतात चांगलीच अभिरूची निर्माण झाली होती. त्यांची ओढ पाहून बाबा त्यांना महिन्यातून दोन-तीन वेळी पुण्याला घेऊन जाऊ लागले. अशा प्रकारचे अध्ययन पुढे चार वर्षे चालले. सहा वर्षे तालीम घेऊनही किराणा घराण्याची गायकी बाबुरावजींना पेलवत नव्हती.

पुढे बाबांनी आपल्या नातवांना उच्च स्तरीय तालीम मिळावी यासाठी बनारसला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. यासाठी बाबांनी आपल्याजवळ असलेली होती तेवढी जमीन विकली. त्या वेळेस बाबुरावांचे वय केवळ ११ वर्षांचे होते. अशा प्रकारे पवित्रभूमी बनारस येथे बाबू, राम, राम यांच्या आई व बाबा असे चौघे जण पोहोचले. तेथे पं. बलवंतराय भट्ट यांच्यासारखे थोर गुरू बाबुरावजींना लाभले. ते पं. ओंकारनाथ ठाकुरांचे पट्टशिष्य होते. हळूहळू किराणा घराण्याच्या गायकीवर ग्वाल्हेर गायकीचा मुलामा चढू लागला. खुला व जोरदार आवाज तसेच गमकांचा वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग असलेली गायकी बाबुराव आत्मसात करू लागले. या काळात त्यांनी गुरुजींकडून ग्वाल्हेर घराण्यातील अनेक धृपदे, टप्पे व तराणे इ. गायन प्रकार मोठ्या आत्मीयतेने प्राप्त केले.

यासंदर्भात पं. बाबुरावजी सांगतात, "बनारस येथील तो आमचा काळ अत्यंत स्वर्गीय होता. तिथे प्रत्येकाच्या घराघरांतून संगीत निनादत असायचे. पं. राजन साजन मिश्रा, पं. गोपीकृष्ण, पं. सामता प्रसाद, उ. बिस्मिला खाँ आदी कलावंत एखाद्या देवस्थानासमोर बसून आपली कला सादर करायचे. या कलावंतांचे गायन-वादन आम्ही अगदी समोर बसून ऐकायचो. सर्व कार्यक्रम मोफत असायचे. भक्ती आणि संगीताशिवाय बनारसमध्ये आम्हाला काहीच दिसत नव्हते. तिथे प्रत्येक कलावंतांना 'महाराज' असे संबोधले जायचे. जसे तबले के महाराज पं. किशन महाराज, नृत्य के महाराज पं. बिरजू महाराज. ते सर्वच कलावंत अत्यंत शूचिर्भूत पद्धतीने आपल्या कलेचे सादरीकरण करायचे. सर्वच कलावंतांना ते आदराने वागवायचे. तो अमक्याचा गुरू म्हणून मी त्याचे चरण स्पर्श



करणार नाही, असा संकुचित भाव तिथे नव्हता. सर्वच कलावंत एकमेकांचा सन्मान करायचे, आदर द्यायचे. त्या काळात परदेशांतील अनेक लोक भारतीय संगीत शिकण्यासाठी बनारसला यायचे. १०-१२ वर्षे येथे राहून संगीताचा अभ्यास करायचे. तेथे सर्वच शिष्य मोठ्या भक्तिभावाने श्रद्धेने ज्ञान संपादन करीत होते. गुरूसेवा करून मर्जी संपादन करायचे. तिथे केवळ शिकणे, रियाज करणे व संगीत ऐकणे हीच आमची दिनचर्या होती. या तिथल्या वातावरणाचा आमच्यावर खूप मोठा प्रभाव पडला. यातून आम्हाला खूप काही शिकता आले."

याच कालावधीत त्यांनी बनारस विश्वविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे पं. सुमीरन बॅनर्जी यांच्याकडूनही गायनाचे धडे घेतले. अशा प्रकारे पं. बाबुरावजी बोरगावकर यांनी बनारस येथील संगीत पूरक वातावरणाचा लाभ घेतला व आपली गायकी विकसित केली. पुढे बनारस येथील खर्च बाबांना परवडेनासा झाला. त्यामुळे त्यांना बनारस सोडून लातूरला परतावे लागले.

पुढे योगायोगाने मराठवाड्याचे अध्वर्यू पं. डॉ. स. भ. देशपांडे यांची व बाबांची भेट झाली. त्यांनी बाबुरावांचे गाणे ऐकले व म्हणाले, "बेटा बाबू आपल्या गळ्याला साजेल तेच स्वीकारले पाहिजे. भलेही आपण एखाद्या चांगल्या गुरुकडून उच्च स्तरीय तालीम आत्मसात केली असेल व ती आपल्याला झेपत नसेल तर त्यातून स्वतःची शैली निर्माण करावी." अशा प्रकारे पं. स. भ. देशपांडे गुरुजींचा हा कानमंत्र त्यांच्या पचनी पडला. यातून त्यांच्या गायकीला खरी दिशा मिळाली. त्यांच्याकडून त्यांनी चार वर्षे तालीम घेतली.

अशा प्रकारे या थोर कलावंताकडून त्यांनी फार थोडा काळच शिक्षण घेता आले. असे असले तरी रियाज, चिंतन, मनन व श्रवणातून त्यांनी एकलव्याप्रमाणे संगीत साधना केली व आपली स्वतंत्र गायकीचा आविष्कार केला. पुढे त्यांनी गायनातील संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली तर हार्मोनियम व तबलावादनातील विशारद ही पदवी संपादन केली.

*** अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार :**

पं. बाबुरावजी यांनी आजोबा बाबा बोरगावंकर, वडील गोविंदरावजी (अण्णा), पं. सदाशिवबुवा जाधव (किराणा), पं. बलवंतराय भट्ट (ग्वाल्हेर), पं. सुमिरन बॅनर्जी (बनारस) व पं. डॉ. स. भ. देशपांडे (ग्वाल्हेर) यांच्या सारख्या श्रेष्ठ कलावंतांकडून तालीम घेतली. या सर्व गुरुकडून मिळालेल्या ज्ञानावर त्यांनी स्वप्रतिभेने आपली एक

विशेष गायनशैली निर्माण केली. असे असले तरी त्यांच्या सर्वच गुरूंच्या गायनाची छाप त्यांच्या गायनातून दिसून येते.

पं. बाबुरावजींच्या गायकीबद्दल त्यांच्या कन्या सौ. मधुवंती म्हणतात, "माझ्या वडिलांची गायकी माधुर्ययुक्त, स्वरबद्ध, तालाशी संवाद साधणारी तसेच नावीन्याचा आविष्कार करणारी आहे. त्यांची आवाज लावण्याची पद्धत सहज आहे. त्यांनी आपला आवाज रियाज करून कमविला आहे त्यामुळे ते तीनही सप्तकांत मुक्त संचार करतात. गायनामध्ये मींड, खटका, गमक, आंदोलन, मुर्च्छना इ. प्रकारांचा प्रयोग अत्यंत कलात्मक पद्धतीने करतात. त्यांची धीरगंभीर रसयुक्त रागांची स्थिरतासुद्धा अवघड असून त्यांनी ती पेलवली आहे. तसेच अतिदृत लयीमध्ये तराणा गात असताना नोमतोमची बढत ही कल्पनातीत दृत लयीत असते."

त्यांचे दुसरे शिष्य प्रा. लक्ष्मण श्रीमंगले त्यांच्या गायकीबद्दल म्हणतात, "पं. बाबुराव गुरुजी स्वरांचे पक्के आहेत. ते स्वरांशी प्रामाणिक आहेत. तीव्र बुद्धिमत्ता व सृजनशीलतेमुळे त्यांचे गायन कल्पक झाले आहे. ते आपल्या गायनात बेहलावे, विविध लयकारी व सरगमाचा वापर करतात. गाताना सरगमाची पुनरावृत्ती होत नाही. एकच राग प्रत्येक मैफीलीत वेगळा वाटतो. त्यांचे गायन, स्वर व तालप्रधान असून त्यांचे गाणे डोक्याने ऐकण्याचे आहे."

प्रा. विजयकुमार धायगुडे त्यांच्या गायनाबद्दल म्हणतात, "पं. बाबुराव गुरुजींचे गायन ऐकताना कधी संपले हेच समजत नाही. ते ख्यालाबरोबरच भजन व नाट्यगीते उत्तम गातात. 'सुरत पिया' हे कट्यारमधील नाट्यगीत मुळ गायकापेक्षाही उत्तम गातात."

श्री. अभय करंदीकर त्यांच्या स्वरज्ञानाबद्दल एक किस्सा सांगतात, "ताणपुरा स्वरात लावण्यात त्यांचा हातखंडा आहे. ताणपुऱ्याच्या खुंट्यावर हात टाकला की तो सूरात मिळणारच. पं. भीमसेन जोशी लातूरला आल्यानंतर त्यांच्यासमोर पं. बाबुराव गुरुजींनी तानपुरा लावला. तेव्हा पं. भीमसेन जोशी म्हणाले की, "मलाही इतक्या झटपट एकदम अचूक तानपुरा लावता येत नाही."

प्रा. विश्वनाथ स्वामी म्हणतात, "पं. बाबुराव गुरुजींच्या स्वरात जादू आहे. ते अनेक वेळा विद्यार्थ्यांना शिकवीत असताना तोंडातून बंदिशीचे गायन चालू असते तर त्याच वेळी हातातून त्याच बंदिशीचे सरगम लिहिणे चालू असते. एकाच वेळी दोन्ही गोष्टी करणे कठीण काम आहे; परंतु एकाच वेळी दोन्ही गोष्टी करण्याची ईश्वरी देणगी लाभलेली आहे."



उपरोक्त प्रतिक्रियांवरून त्यांची स्वरांवर किती हुकमत आहे हे लक्षात येते व त्यांच्या गायकीबद्दल स्पष्ट कल्पना येते.

मराठवाडा संगीत कला अकादमीच्या वतीने १९९४ साली लातूर येथे संगीत नृत्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे रसिले समीक्षण केले आहे. यात पं. बाबुरावजी यांच्या गायकीबद्दल लिहिले आहे, राग 'वाचस्पती' मधील विलंबित रचना 'दया करो नाथ' या ख्यालामध्ये प्रा. बाबुराव बोरगावकर यांनी दमदार अशी सुरुवात केली. त्यांना गायला मिळालेल्या वेळेमध्ये त्यांनी खर्ज व तार सप्तकांत लीलया फिरत करून वाचस्पती रागाची वैशिष्ट्ये दाखविली. विलंबित ख्यालानंतर त्यांनी दृत बंदिशी 'चतुर सुगर बलमा' व दृत एकतालामध्ये तराणा सादर केला. वसंतरावांचे नाट्यगीत तर बाबुरावांचा हुकमी एक्का 'या भवनातील गीत पुराणे' हे नाट्यगीत त्यांच्या ढंगात एका आगळ्या पद्धतीने सादर केले.

याबरोबरच पं. बाबुराव यांची सोलापूर येथे कै. माधवराव अग्निहोत्री २३ वा संगीत स्मृति समारोहात गायन झाले. त्यांचे संगीततज्ज्ञ डॉ. सदाशिव चौगुले यांनी सुंदर समीक्षा केली आहे. ती अशी, "गायनाच्या सुरुवातीस नीट असनस्थ होऊन साज जूळवून त्यांनी आपल्या गायनास सुरुवात केली. प्रा. बाबुराव यांनी पं. स. भ. देशपांडे यांनी बांधलेल्या ठाय एकतालातील 'दया करो नाथ' ही चीज सादर केली. त्यांचा स्वर तीनही सप्तकांत लिलया विहार करीत होता. त्यांच्या गायनप्रक्रियेत शरीर बलाचा वापर झाल्याचे कुठेही निदर्शनास आले नाही. प्रसन्न मुद्रा, गाण्यात सहजता, स्वर तालावर प्रभुत्त्व यामुळे पं. बाबुराव यांचे गायन रंगत गेले. त्यांच्या गायन प्रक्रियेत रामपूर, पतियाला, मेवानी घराण्याच्या शैलीचे अधिक्य दिसले. बोल तानेचा वापर अधून-मधून ते करीत होते. त्यांच्या तानेला वेग आहे, सुरेलपणा आहे. त्यानंतर 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील दोन पदे या 'भवनातील गीत पुराणे' व 'सुरत पिया की' ही पदे अत्यंत तयारीने गाऊन कबीराची दोन भजने गायली. शेवटी मेवाती घराण्याच्या गायकांनी लोकप्रिय केलेले भैरवीतील भजन 'सुमीरन करले अरे मना' विविधतेने नटवून मैफीलीची सांगता केली."

उपरोक्त दोन समीक्षांवरून असे म्हणता येईल की पं. बाबुरावजी हे उत्तम ख्याल मांडणी करतात त्याच बरोबर भजन तराणा व नाट्यगीते अप्रतिम सादर करतात.

पं. बाबुरावजी हे एक प्रतिभासंपन्न गायकाबरोबरच उत्तम हार्मोनियम वादकही आहेत. त्यांचा हार्मोनियमवर हात पडला की ती स्वतः होऊन खुलते. ते जेव्हा हार्मोनियम

वाजवतात तेव्हा ती जणुकाही गातेय की काय असे वाटते. भात्यावरील नियंत्रण, अंगुली नैपुण्य, दृतलयीत सुद्धा अंगुलीचे अचूक संचालन ही त्यांच्या वादनशैलीची खासीयत आहे. या संदर्भात त्यांची कन्या सरस्वती म्हणते, "हार्मोनियमच्या त्यांनीच रचलेल्या धुनी ऐकल्यानंतर असे वाटते की एखादी सुंदर स्त्री हातात घागर घेऊन पाण्याला जाताना जशी तालात ठुमकत, मुरडत, लाजत जाते, तशीच ती धून भासत असते. त्यांनी तबलावादनासाठी जे लहरे तयार केले आहेत. ते वाजवताच तबलावादकाला वादन सुरू करण्यापूर्वी तयार केलेला कॅनव्हॉस असल्याची अनुभूती येते. त्यांच्या विविध गती ऐकताना सतत ऐकत राहाव्या वाटतात."

पक्के स्वरज्ञान असल्यामुळे ते सर्वच गीते उत्तमप्रकारे हार्मोनियमवर बेमालूमपणे वाजवितात. त्यांनी अनेक दिग्गज कलावंतांच्या गायनाला हार्मोनियमची साथसंगत करून मैफीली रंगविल्या आहेत. गायक कितीही तयार असो हे मागे पडत नाहीत. किंबहुना गायकापेक्षा काकणभर अधिक सरस हार्मोनियम वाजवितात.

ते उत्तम तबलावादकसुद्धा आहेत. तबल्यातील विशारद ही पदवी त्यांनी संपादन केली आहे. त्यामुळे तबलावादनावरही प्रभुत्त्व मिळविले आहे. ते उत्तम साथी करतात. शुद्ध व स्पष्ट ठेका वाजवून ते अनुरूप साथी करतात. वादन करताना टुकडे, मुखडे, तिहाई यांचा अंतर्भाव असतो. किंबहुना तिरकिट धिरकिटसारखे बोल तयारीने वाजवितात. हैद्राबाद येथील संगीत स्पर्धेत त्यांनी अनेक स्पर्धकांना तबल्याची उत्तम साथ दिली. तेव्हा कऱ्हाडे बुवांनी त्यांची कौतुकाने पाठ थोपटली. त्यांच्या कन्या सौ. मधुवंती या जेव्हा गानसरस्वती किशोरीताईंकडे संगीत शिकण्यासाठी जात असत तेव्हा बाबुरावजीही सोबत जात असत. एके दिवशी त्यांची तालीम चालू असताना बाबुरावजींनी तबल्याची साथ केली. ती ऐकून खुद्द किशोरीताईंनीही भरभरून दाद दिली. तब्बल सहा महिने त्यांच्या घरी तबला साथ करण्याचा त्यांना योग आला. शिकवताना, परीक्षेत, स्पर्धेतच नाही तर संगीत संमेलनातूनही त्यांनी काही गायकांना तबल्याची साथ करून वाहवा मिळविली आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की प्रतिभासंपन्न गायन, उत्तम हार्मोनियम वादन व तबलावादन अशा बहुआयामी कलाकारितेमुळे त्यांनी संपूर्ण भारतात अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. तो कशाप्रकारे केला ते पुढील प्रमाणे पाहुयात.

वयाच्या सातव्या वर्षापासून ते विविध स्पर्धा व संगीत संमेलनात आपली कला सादर करीत होते.



०१. १९८१ साली लातूर येथे पाचवे मराठवाडा संगीत संमेलन झाले. संमेलनातून त्यांनी आपले गायन सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

०२. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दि. ७ जानेवारी ते १४ जानेवारी १९९१ या कालावधीत 'विविध कला महोत्सवात' त्यांनी नागपूर, अमरावती, वर्धा, गोवा व सिंधुदुर्ग याठिकाणी आपल्या कलेचे प्रदर्शन केले.

०३. १९९१ साली हैद्राबाद येथे 'आज के कलाकार' या कार्यक्रमात त्यांनी अभिजात शास्त्रीय गायन सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

०४. 'गुरुवर्य पं. सदाशिवबुवा जाधव गौरव समारंभा'त त्यांनी शास्त्रीय गायन सादर केले. या सोहळ्यात पं. भीमसेन जोशी व छोटा गंधर्व आदी मान्यवरांसमोर त्यांना गाण्याची संधी मिळाली."

०५. १९९४ साली त्यांनी एन. सी. पी. ए. मुंबईच्या वतीने आयोजित संगीत संमेलनात शास्त्रीय गायन सादर केले.

०६. २३ ऑक्टोबर १९९४ रोजी त्यांनी आग्रा येथे 'पं. विष्णु दिगंबर पलुस्कर संगीत संमेलनात' गायन सादर केले. या संदर्भात 'आज आगरा' या वृत्तपत्रात लिहिले आहे, "... तत्पश्चात युवा गायक बाबुराव बोरगावकर ने अपनी परिष्कृत गायनशैली मे राग वाचस्पती तथा भजन मे समा बांध दिया। स्वरों में मिठास, गलेकी तयारी उनके गायन की विशेषता है।"

०७. दि. २९ मे १९९५ साली त्यांनी शनेश्चर जयंती निमित्त इंदोर येथे गायन सादर केले.

०८. दि. २२ जुलै २००१ मध्ये म्युझिक सर्कच औरंगाबाद यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातून शास्त्रीय गायन सादर केले.

०९. २००९ साली बेंगलोर येथे 'कला साधन संगीत समीती'च्या वतीने आयोजित संगीत संमेलनात त्यांनी आपली कला सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

१०. २००९ साली पुणे येथे भारतीय कला मंचद्वारा आयोजित संगीत मैफीलीत त्यांनी आपली कला पेश करून वाहवा मिळविली. याच वर्षी त्यांनी नेहरू सेंटर मुंबई येथे आपले गायन सादर केले.

११. १९९६ साली हैद्रबाद येथील सुप्रसिद्ध 'भटजीबापू संगीत समारोहात' त्यांनी शास्त्रीय गायन सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळविली.

१२. २००३ साली मुंबई येथे आयोजित 'मराठवाडा संगीत संमेलनात' त्यांनी शास्त्रीय गायन पेश करून मुंबईकरांना मंत्रमुग्ध केले.

१३. २०१२ साली पश्चिम विभागीय सांस्कृतिक केंद्राने आयोजित केलेल्या दिल्ली येथील संगीत संमेलनात त्यांना संगीत सेवा करण्याची संधी मिळाली.

१४. २०१२ साली पुणे येथील बालगंधर्व स्मारकात अभिजात संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात त्यांनी अभिजात संगीताचे सादरीकरण केले.

१५. २०१३ साली मुंबई येथील रविंद्रनाथ मंदिरात व पुणे येथील टिळक स्मारकात त्यांनी आषाढी संगीत रजनीत 'भक्तिरंग' हा कार्यक्रम सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

१६. २०१४ साली मुंबई येथे 'दादर माटुंगा म्युझिक सर्कल'ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यांना गायन करण्याची संधी मिळाली.

१७. लातूर जिल्हा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त दि. १४ जानेवारी २००८ रोजी त्यांनी गायन केले. यासंदर्भात दै. सकाळ वृत्तपत्रात लिहिले आहे, "... पं. बाबुराव बोरगावकर यांनी राग बागेश्री गायिला. त्यानंतर 'रूम झुम बाजे पायलिया' ही बंदिशी गायिली, त्याला रसिकांनी मोठी दाद दिली."

१८. २०१४ साली बेंगलोर येथे नादानुभाव फाऊंडेशन व कुरूक्षेत्र येथे आयोजित 'सरस्वती महोत्सवात' त्यांनी अभिजात संगीत पेश करून संगीताचा प्रचार केला.

अभिजात शास्त्रीय गायनाच्या स्वतंत्र मैफीलीबरोबरच त्यांनी पं. राजन-साजन मिश्रा, डॉ. प्रभा अत्रे, पं. सी. आर. व्यास, पं. प्रभाकर कारेकर, पं. अजय पोहनकर, शोभा गुर्टू, आशा खाडीलकर, पं. संजीव अभ्यंकर, पं. शौनक अभिषेकी, पं. विकास कशाळकर असा नामवंत कलावंतांना हार्मोनियमची साथसंगत तर डॉ. अबान मिस्त्री, पं. अनुराधा पाल व डॉ. राम बोरगावकर यांना लेहऱ्याची साथसंगत केली.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागांपासून प्रमुख शहरात तसेच आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा, दिल्ली या राज्यांतून त्यांनी आपली कला सादर करून अभिजात संगीताच्या प्रचारार्थ मोलाचे योगदान दिले आहे.



* **संगीत महोत्सवाचे आयोजन :**

पं. बाबुरावजी बोरगावकर यांनी संपूर्ण आयुष्यभर संगीत प्रचार व प्रसाराचा ध्यास घेतल्यामुळे बंधु डॉ. राम बोरगावकर यांच्याबरोबरीने अनेक संगीतमहोत्सवाचे आयोजन केले. ते १९७५ पासून प्रतिवर्षी पं. वि. दि. पलुस्कर पुण्यतिथीचे औचित्य साधून संगीत सभेचे आयोजन करीत आले आहेत.

०१. १९८३ साली त्यांनी बनारस येथील कलावंतांना निमंत्रित करून भव्यदिव्य संगीत सोहळ्याचे आयोजन केले.

०२. १९८७ साली बालगंधर्वाच्या जन्मशताब्दीनिमित्त तीन दिवसांच्या नाट्यमहोत्सवाचे आयोजन केले.

०३. दि. १९ ते २१ मे १९९० साली मित्रनगर येथील 'सरस्वती भवन' या इमारतीच्या उद्‌घाटनप्रसंगी संगीत महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात पहिल्या दिवशी डॉ. प्रभा अत्रे, शामराव लोणकर, यादवराज फड, डॉ. कमलाकर परळीकर, श्रीकांत देशपांडे यांचे सादरीकरण झाले. दुसऱ्या दिवशी पं. बिरजू महाराजांच्या शिष्या कु. योगीनी गांधी यांचे कथ्थक नृत्य, पं. आप्पा जळगावकरांचे हार्मोनियम वादन, पं. हरिशचंद्र कोकरे यांचे बासरी वादन झाले. तिसऱ्या दिवशी शंकरबापू व उद्धव अपेगावकर यांची पखावज जुगलबंदी व स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांचे शास्त्रीय गायन झाले. दे. भ. पाठक यांनी पं. भीमसेन जोशी यांच्या गायनाचे सुंदर वर्णन केले आहे. ...त्यानंतर टाळ्यांच्या गजरात लातूरच्या रसिकांनी पं. भीमसेन जोशी यांचे स्वागत केले. त्यांनी 'अभोगी राग' सादर केला. आवाजातील चढउतार, मेघांच्या गर्जनेप्रमाणे बुलंद ताना यांनी ख्याल सजविला. त्यानंतर 'तुम तो अब के' ही छोटा ख्यालाची बंदिशी बहारदारपणे सादर केली. त्यानंतर 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल' हा अंभग सादर केला. 'रसिक हो तोरे नैन' या भैरवी रागातील ठुमरीने महोत्सवाची सांगता केली. त्यांना माधव गुडी यांनी हार्मोनियमची तर कमलाकर नानामुळे यांनी तबल्याची साथ दिली. अशा प्रकारे हा संगीत महोत्सव अविस्मरणीय ठरला.

०४. १९९१ साली पं. सी. आर. व्यास, १९९२ साली अर्चना जोगळेकर यांच्या गायन-वादनाची व नृत्याची मेजवानी त्यांनी लातूरकरांना दिली.

०५. १९९३ साली त्यांनी भुकंपग्रस्तांच्या मदतीसाठी 'संगीत सेवा रजनी'चे आयोजन केले.

०६. दि. २ व ३ मे १९९३ साली 'राष्ट्रीय एकता संगीत नृत्य महोत्सवाचे' आयोजन केले.

०७. दि. २० मार्च १९९४ साली त्यांनी उस्ताद झाकीर हुसेन व इतर कलावंतांना निमंत्रित करून 'संगीत नृत्य महोत्सवा'चे आयोजन केले. याही कार्यक्रमाचे सुंदर समीक्षण 'दै. देवगिरी तरुण भारत' या वृत्तपत्रात केले आहे. ते असे, "... सारंगी वादनानंतर रंगमंचावर उस्ताद झाकीर हुसेन यांचे स्वतःच्या हातात तबला घेऊन आगमन झाले व रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आपल्या तबला सोलोमध्ये त्यांनी पंजाब घराण्याच्या वादन शैलीची वैशिष्ट्ये तर दाखविलेच परंतु परण, चक्रधार, मुखडे, रेला, आड कुआड लयकारी याची सविस्तर माहीती देत सादर केलेल्या तबला सोलोमध्ये प्रेक्षकांची चांगलीच बम्हानंदी टाळी लागली. संगीत रसिकांनी देखील उ. झाकीर हुसेन यांना भरभरून दाद दिली. रसिकांचे मन व कान दोन्ही तृप्त झाल्यामुळे धुंद अशा नादब्रह्मात रसिकजन तल्लीन झाले. तबला सोलोसाठी लहरा साथ उ. सुल्तान खाँ यांची होती. दोन्ही उस्तादजींची एकमेकांना साथ म्हणजे मणिकांचन योग होता."

०८. १९९५ साली त्यांनी 'तानसेन संगीत समारोहाचे' आयोजन केले.

०९. दि. २ सप्टेंबर १९९६ साली त्यांनी 'स्वरांकित' या मैफीलीचे सादरीकरण करून लातुरातील संगीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

१०. २००१ साली त्यांनी 'अखिल भारतीय संगीत संमेलाना'चे आयोजन केले. त्यात पहिल्या स्त्री तबलावादक डॉ. अबान मिस्त्री यांचे तबलावादन सादर झाले.

११. २००९ पासून ज्ञानसरस्वती संगीत समारोहाचे ते आयोजन करतात. २४ तासांपासून ७२ तासांपर्यंत अविरत संगीत यज्ञाचे आयोजन त्यांनी केले. यात २०१३ साली झालेल्या संगीत यज्ञासंदर्भात संगीत कलाविहार या मासिकात सुंदर वर्णन केले आहे की, "... सुरमणी पंडित बाबुराव बोरगावकर ने आपना गायन पेश किया। अपनी सेवा में अपने 'राग चारूकेशी' में बिलंवित ख्याल 'रे मन कैसे रिझाऊं', तथा दृत रचना 'आज मोरी भाग जागी' प्रस्तुत की। अपने गायन में अपनी नयी सोंच एवंम् रंजकता पूर्ण प्रस्तुतिकरण दिखाई देता है।"

अशाप्रकारे ज्ञानसरस्वती संगीतमहोत्सवाच्या आयोजन नियोजनापासून सादरीकरणापर्यंतची सर्व कार्ये ते रात्रंदिवस मेहनत घेऊन व श्रद्धापूर्वक करतात.



१२. २०१३ पासून लातूर येथील सदानंद मठ, दत्तमंदिर येथे बाल गोविंदानंद सरस्वती महाराजांच्या नावाने 'महासमाराधना महोत्सवा'चे आयोजन करण्यात येते. सात दिवस चालणाऱ्या या संगीतमहोत्सवाच्या आयोजनात ते परिश्रम घेत असतात.

याबरोबरच सावेवाडी येथील वैद्यनाथ संगीतमहोत्सव, सिद्धेश्वर संगीत दरबार, मुळग्रामच्या चिन्मयानंद महाराजांच्या मठात ते भक्तिभावाने आपल्या कुटुंब व शिष्यांसमवेत हजेरी लावतात. यासंदर्भात ते म्हणतात, "आमच्या मुळगावी दर्जी बोरगाव येथे चिन्मयानंद स्वामी मठात नेहमी गायनाचे कार्यक्रम करीत आलो व त्यांच्याच आशीर्वादाने या क्षेत्रात यशस्वी झालो."

अशा प्रकारे धार्मिक कार्यक्रमात ते कर्तव्यभावनेने सहभागी होतात व अशा कार्यक्रमात ते अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करतात.

* **विविध कार्यक्रमांच्या रचना :**

पं. बाबुराव बोरगावकर यांनी विविध कार्यक्रमांच्या रचना केल्या आहेत. यासंदर्भात 'दै. एकमत' वृत्तपत्रात लिहिले आहे, "पं. बाबुरावांचा 'स्वरांकित' हा सुगम संगीताचा दर्जेदार कार्यक्रम असून देशभक्तिपर गीतांचा 'देशभक्ती की स्वरधारा' हा ही लोकप्रिय कार्यक्रम आहे. जवानांच्या मदतीकरिता त्यांनी पाच कार्यक्रम केले आहेत."

याबरोबरच पं. सुधीर फडके यांच्या गीतांवर आधारित 'दरवळ' या कार्यक्रमाचे आयोजन करून पं. सुधीर फडके यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त संगीत भावांजली अर्पण केली. शास्त्रीय संगीताबरोबरच सुगम संगीतावर आधारित 'स्वरसाज' हा कार्यक्रम त्यांनी २७ ऑगस्ट २००३ रोजी लातूरकरांना ऐकविला. 'भक्तिरंग' हा त्यांनी संगीतबद्ध केलेला कार्यक्रम तर संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. अशा प्रकारे त्यांनी विविध कार्यक्रमांचे संगीत संयोजन करून सर्वसामान्य रसिकांची श्रवणतृष्णा शमविली.

* **आकाशवाणी, दूरदर्शन व ध्वनिफितींच्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार :**

पं. बाबुराव बोरगावकर यांचे १९९० पासून नियमितपणे औरंगाबाद परभणी केंद्रावरून शास्त्रीय गायन प्रसारीत झाले आहे. त्यांची जेव्हा पहिल्यांदा रेकॉर्डिंग झाली तेव्हा एकदाही रिटेक करावे लागले नाही. एवढे अचूक व आत्मविश्वासाने त्यांनी गायन केले. पं. स. भ. देशपांडे यांनी स्वरबद्ध केलेली 'गावती' रागातील 'हे घनश्याम...' ही बड्या ख्यालाची बंदिशी व त्यानंतर स्वरचित 'बालमा मोरा आयोरे...' ही बंदिश ध्वनिमुद्रित करून दिल्ली

आकाशवाणी केंद्राला पाठविली. याच ध्वनिमुद्रिकेवरून त्यांची प्रतिष्ठेच्या 'मंगळवारीय संगीत राष्ट्रीय सभेसाठी' १९९१ साली निवड झाली होती. त्या वेळी या सभेसाठी महाराष्ट्रातून केवळ दोनच कलावंतांची निवड झाली होती. यात बाबुरावजींचा समावेश होता. त्यावेळेस त्यांनी राग जोग, बागेश्री व गावती सादर केला होता. हा कार्यक्रम भारतातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून प्रसारीत करण्यात आला.

१९९४ साली ऑल इंडिया रेडिओने त्यांच्या चैन बुकिंग प्रोग्रामचे आयोजन केले. यात गोवा, धारवाड, रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर व पुणे या केंद्रांवरून त्यांचे गाणे प्रसारीत केले. हा १२ दिवसांचा सलग कार्यक्रम होता. या दरम्यान त्यांनी शिवरंजनी, शुद्ध जोगिया, वाचस्पती, मधुवंती, मधुकंस, शिवमन भैरव, अहीर भैरव, शारदा असे प्रचलित व अप्रचलित राग सादर करून अभिजात संगीताचा प्रचार केला. ३० ऑगस्ट १९९४ साली त्यांना मुंबई दूरदर्शनवरून पहिला कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळाली. 'स्वरमाधुरी' या शास्त्रीय संगीताच्या विशेष सभेत त्यांनी 'राग वाचस्पती' सादर केला. हा कार्यक्रम महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी प्रसारीत होत होता. यानंतर १ नोव्हेंबर १९९४ रोजी त्यांनी याच कार्यक्रमातून चंद्रकंस हा राग सादर केला. पुढे १४ जून २००५ पासून त्यांनी स्वरबद्ध केलेल्या भजनांची 'भक्तिरंग' ही मालिका प्रसारीत होऊ लागली. यात संत तुकाराम, संत एकनाथ व संत रामदासांच्या रचनांना त्यांनी अभिजात संगीताच्या चाली दिल्या. हा कार्यक्रम दर गुरुवारी सकाळी सात वाजता सुरू व्हायचा. या मालिकेचे प्रक्षेपण तब्बल साडेतीन वर्षे चालले.

आकाशवाणी, दूरदर्शनप्रमाणेच त्यांनी ध्वनी व चित्रफितीच्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. 'सूर-ताल संगम' या ध्वनी व चित्रफितीचे विमोचन तत्कालीन मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. पं. बाबुरावजी बोरगावकरांच्या आवाजात ध्वनिमुद्रित केलेली ही सीडी अखिल भारतीय गांधर्व मंडळाच्या पाठ्यक्रमानुसार तयार केली आहे. याबरोबरच 'भक्तिरंग'या ध्वनी व चित्रफितीचे विमोचन थोर समाजसेवक मोहन धारिया यांच्या हस्ते पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात झाले.

अशा प्रकारे ग्रामीण भागापासून संपूर्ण महाराष्ट्र व इतर राज्यात पं. बाबुरावजींनी आपल्या गायनाद्वारे व हार्मोनियमच्या माध्यमातून संगीताचा प्रचार केला. विविध संगीत महोत्सवाचे आयोजन, कार्यक्रमांचे संगीत संयोजन, आकाशवाणी, दूरदर्शन व ध्वनिफिती इ. माध्यमातून त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. यासंदर्भात त्यांचे शिष्य



प्रा. विजयकुमार धायगुडे म्हणतात, "लातूरचे सांगीतिक वातावरण निर्माण करण्यात पं. बाबुराव गुरुजींनी मोलाचे योगदान दिले. पं. भीमसेन जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी उ. झाकीर हुसेन, उ. सैद्दुदिन डागर, पं. अनुपम रॉय, अश्विनी भाटे, मनीषा साठे, आशा खाडीलकर अशा कलावंतांना जवळून ऐकता व पाहता आले. एवढेच नव्हे तर अशा कलावंतासमोर आम्हाला सादरीकरण करण्याची संधी मिळाली."

थोडक्यात असे म्हणता येईल की मराठवाड्यासारख्या अविकसित भागातील लोकांना अभिजात शास्त्रीय संगीताची गोडी लावून कानसेन निर्माण करण्याचे बहुमोल कार्य बोरगावकर परिवाराने केले व त्यात पं. बाबुराव बोरगावकर यांचा सिंहाचा वाटा आहे.

* **संगीत विद्यालयाची स्थापना :**

पं. बाबुराव बोरगावकर यांनी सांगीतिक संस्थांच्या माध्यमातूनही अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार केला. तो कशाप्रकारे हे पुढील प्रमाणे पाहता येईल.

* **सरस्वती संगीत महाविद्यालय :**

१९६३ सालापासून बाबांनी जुनी कापड गल्लीत 'सरस्वती संगीत विद्यालया'ची सुरुवात केली होती. महिना पाच रुपये प्रतिमाह शुल्क होते. सुरुवातीला २० विद्यार्थी होते. त्यात चार मुलीही होत्या. पुढे बनारसहून उच्च स्तरीय तालीम घेऊन आल्यानंतर पं. बाबुरावजी व पं. राम यांनी १९७९ पासून महाविद्यालयची सूत्रे हातात घेतली. त्यावेळेस त्यांचे संगीत विद्यालय गांधी मार्केट येथे होते. खालच्या मजल्यावर वाद्ये दुरुस्ती-विक्रीचे दुकान होते तर पहिल्या मजल्यावर बाबुरावजी संगीत अध्यापनाचे कार्य करू लागले. ते एक प्रतिभासंपन्न कलावंत तर आहेतच पण ते एक हाडाचे शिक्षकही आहेत. त्याकाळात दे. भ. पाठक, अभय करंदीकर, जयकुमार कुलकर्णी, भारत कुलकर्णी, कृष्णा बळवंत, स्मीता औटी, ग्रिष्मा देशपांडे, मंजुषा पाठक असे शिष्य त्यांच्याकडे होते.

सुप्रसिद्ध गायक, पं. बाबुरावजी यांचा पुतण्या व शिष्य मंगेश बोरगावकर त्यांच्या शिस्तीबद्दल लिहितोय, "मंगेश नावाचं बावनकशी सोनं सांगीतिक अंगाने घडावे म्हणून माझे गुरू व काका सूरमणी बाबुरावजी बोरगावकर आणि वडील पं. राम बोरगावकर यांनी कष्ट घेतले. मीच नाही तर भाऊ-बहीण गणेश आणि मधुवंती अशा तिघांच्या आयुष्यातील सांगीतिक श्रीगणेशा याच वयातला. सुटी असली की माझ्या अंगावर शहारे यायचे. कारण सकाळी ९.०० ते रात्री ९.०० तब्बल १२ तास रियाजाला बसावे लागे. ... आमचा काका

आणि वडिलांकडील संगीत शिक्षणाचा ताबा कायम असे. दिवाळी सुटी असो की उन्हाळ्याची आमची संगीत रियाजाला सूर्यनारायणाबरोबरची वेळ पाळावी लागे. काका व वडिलांच्या परिश्रमामुळे गळा घडला. १५ व्या वर्षी 'सा रे ग म प'चा विजेता होऊ शकलो. काका व वडिलांनी माझ्या हट्टाकडे दुर्लक्ष करून केलेल्या संगीताच्या हट्टामुळेच हे होऊ शकले."

त्यांच्या अध्यापन पद्धतीबद्दल अभय करंदीकर म्हणतात, "पं. बाबुराव गुरुजी आपल्या शिष्यांना गायन, वादनाचे व्यासपीठ मिळवून देतात. अनेक स्पर्धांत ते विद्यार्थ्यांना उतरवतात व त्यांची तयारी करून घेतात. परिक्षेतील रंगमंच कार्यक्रम हा त्यांचा स्पेशल इव्हेंट असतो. ध्वनिक्षेपक लावून श्रोत्यांना बोलावून रंगमंच घेतला जातो."

सौ. मधुवंती बोरगावकर, देशमुख या त्यांच्या कन्या म्हणतात, "माझ्या वडिलांचा स्वभाव जितका प्रेमळ आहे तसाच गुरू म्हणून कठोर आणि तत्त्वनिष्ठ आहे. ते आमचा लाडही करतात आणि गुरूच्या भूमिकेत आम्हाला शिस्तही लावतात. त्यांची आवाज लावण्याची पद्धत शिष्यांमध्ये सहज उतरवतात. शिष्या म्हणून त्यांनी मला नुसतेच गाणे शिकविले नाही तर हार्मोनियम व तबलाही वाजविण्यास शिकविला. माझे गाणे तयार करताना त्यांनी स्वतःचे गाणे बाजूला ठेवून माझ्यासाठी वेळ काढला. माझ्या रियाजामध्ये कधीही खंड पडू न दिल्यामुळेच वयाच्या ७ व्या वर्षी शास्त्रीय संगीत स्पर्धेत मी भारतातून प्रथम क्रमांक मिळविला. अर्थात हे सर्व यश त्यांचेच आहे असे मी म्हणते."

उपरोक्त दोन प्रतिक्रिया पाहिल्यानंतर लक्षात येते की पं. बाबुरावजींनी आपल्या शिष्यांकडून तावूनसुलाखून मेहनत करून घेतली व त्यांना स्पर्धात्मक यश मिळवून दिले.

त्यांच्या अध्यापन पद्धतीबद्दल प्रा. विजयकुमार धायगुडे म्हणतात, "गुरुजी ३ वर्षानंतर केवळ तानपुऱ्यावर स्वर लावायला शिकवितात. रागाचे चलन, रागाची शुद्धता, सरगमाचा वापर इ. बाबी ते बारकाईने शिकवितात. एखादा राग पक्का बसल्याशिवाय पुढील राग शिकवित नाहीत. त्यामुळे त्यांनी मला यमन राग एक वर्ष शिकविला."

प्रा. विश्वनाथ स्वामी म्हणतात, "त्यांची स्मरणशक्ती अतिशय तल्लख आहे. त्यांना प्रारंभिकपासून संगीत अलंकार परीक्षेपर्यंतचे सर्व राग तोंडपाठ आहेत. शिकविताना ते कधीही वही, पुस्तक हातात घेत नाहीत. एखाद्याला रागाच्या १० ताना हव्या असतील तर क्षणाचाही विलंब न लावता ते त्याला १० ताना सांगतात."

यावरून त्यांच्या स्मरणशक्ती व सृजनशिलता लक्षात येते.



प्रा. लक्ष्मण श्रीमंगले म्हणतात, "गुरुजी इतके चांगले शिकवितात की ते शिष्याच्या गळी उतरविल्याशिवाय स्वस्थ बसत नाहीत. त्यामुळे एक संगीत शिक्षक म्हणून त्यांचे मराठवाड्यात पहिले स्थान असेल असे मला वाटते. ते कडक शिस्तीचे असल्यामुळे त्याकाळी आम्हाला शिकवित असताना प्रसंगी छडीने मारायलाही मागेपुढे पहात नव्हते; परंतु कालपरत्त्वे ते शांत झाले आहेत."

त्यांची कन्या व शिष्या कु. सरस्वती बोरगावकर म्हणते, "माझे वडील शिकवित असताना स्वतः तबला वाजवून शिकवितात मग तो विलंबित एकताल असो की झुमरा, तिलवाडा. वास्तविक पाहता एकावेळी गायन करणे व तबला वाजविणे कठीण असते; परंतु ईश्वरकृपेने त्यांना ते सहज अवगत झाले आहे. ते नेहमी म्हणतात की, गाणाऱ्याला तबला आलाच पाहिजे. तरच गायकाला तबल्यावर वाजणाऱ्या बोलांचा ठेका त्याची लय समजते. तालज्ञान झाल्यामुळे गायक तालासोबत सहज संवाद साधून मैफील रंगवू शकतो."

त्यांच्या शिष्या मीनाक्षी भारती म्हणतात, "मी कांबळग्यासारख्या छोट्याशा गावातून लातूरात आले. त्यामुळे मला प्रत्येक गोष्टीची भीती वाटायची; परंतु गुरुजी मला कार्यक्रमात सहभागी करून घ्यायचे. त्यांच्या गायनासोबत मी हार्मोनियमची साथ करावी असे मला नेहमी वाटायचे. पुढे हे स्वप्न त्यांच्याचमुळे पुर्णत्त्वास आले. 'चौदावा विविध कला महोत्सव', 'सुर-संवाद', 'स्वरांकित' अशा कार्यक्रमात मी त्यांच्याबरोबर गायन व हार्मोनियम वादन केले. अशा प्रकारे माझा आत्मविश्वास जागविण्याचे काम त्यांनी केले. ते संगीत शिकविताना कंटाळत नाहीत. लातूरच नव्हेतर आठवड्यातून दोन दिवस त्यांची कन्या सौ मधुवंती हिच्या पुण्यातील संगीत विद्यालयात जाऊन संगीताचे धडे देण्याचे कार्य करतात."

उपरोक्त शिष्यांच्या प्रतिक्रिया पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, सरस्वती संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी अत्यंत कडक शिस्तीतून कलावंत घडविण्याचे कार्य केले, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

त्यांच्या अध्यापन कार्याबद्दल ते स्वतः सांगतात "विद्यार्थ्याची इच्छा असो वा नसो मी ठरलेल्या वेळेत त्यांचा क्लास घेणारच. मी माझ्या कर्तव्यात कसूर करीत नाही. विद्यार्थी दूरवरून मोठ्या अपेक्षेने काहीतरी घेण्यासाठी आलेला असतो. मी कितीही व्यस्त असलो तरी अशा प्रसंगी किमान पाच मिनिटे तरी त्यांचा क्लास घेणारच. संगीत विद्यालयामुळे मला अनेक लग्न आदी कार्यक्रमाला जाता येत नाही. पूर्व नियोजित कार्यक्रम असले तर मी माझ्या पत्नी अथवा मुलीला क्लास घ्यायला सांगतो. मला अध्यापन कार्याचा कधीही कंटाळा येत नाही."

यावरून त्यांनी अभिजात संगीत प्रचार व प्रसाराचा किती ध्यास घेतला आहे हे निदर्शनास येते.

या संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिकतेचे ज्ञान मिळावे यासाठी विविध संगीत पूरक उपक्रम राबविले. दि. ९ ते १३ फेब्रुवारी २००४ या कालावधित त्यांनी दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर व सरस्वती संगीत महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'नाट्य संगीताचे प्रशिक्षण शिबीर' घेतले. याबरोबरच नाट्यसंगीत गायन स्पर्धा, सुगम संगीत कार्यशाळा, कथ्थक नृत्य कार्यशाळा, शास्त्रीय संगीतावरील चर्चासत्रे असे अनेक उपक्रम राबवून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

१९८७ साली या महाविद्यालयासंदर्भात 'दै. एकमत' या वृत्तपत्रात सुंदर लेख लिहिला होता. यात म्हटले आहे, "सुरुवातीला मुलांचा प्रतिसाद कमी मिळाला असला तरी या बोरगावकरबंधूंनी संगीताची चळवळ आजतागायत कायम ठेवली. संगीतातील नवनवीन तंत्रे शोधून काढून ते विद्यार्थ्यांना शिकवितात. एकाच वेळी सुगम संगीत व शास्त्रीय गायन शिकविण्याची कला या बोरगावकर बंधूंकडे आहे. यामुळे दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. मराठवाड्यातील तिसरे व महाराष्ट्रातील अग्रगण्य संगीत महाविद्यालय म्हणून सरस्वती संगीत महाविद्यालयाकडे पाहिले जाते. या महाविद्यालयाची इमारत चार मजली असून संगीत साधकाला केव्हाही रियाज करता येईल अशी सोय करण्यात आली आहे. तसेच राहण्यासाठी वसतिगृहाची सोय याच महाविद्यालयात करण्यात आली आहे. आधुनिक ध्वनियंत्रांची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी याकरीता नवनवीन ध्वनियंत्रांची खरेदी केली जात आहे."

अशाप्रकारे १९८७ साली या सुविधा व उपक्रम या महाविद्यालयात राबविले जात होते. परंतु आज यासर्वच सुविधा वाढलेल्या आहेत. देशिकेंद्र विद्यालयासमोरील मालपाणी कॉम्प्लेक्स, औसा रोड वरील दत्त मंदिर येथे याच्या शाखा विस्तारलेल्या आहेत. आजही या महाविद्यालयात दर गुरुवारी अशा प्रकारे साप्ताहिक संगीत सभेचे आयोजन केले आहे. पं. बाबुरावजी बोरगावकर या महाविद्यालयाचे संचालक व अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे वडील गोविंदरावजी, पत्नी सौ. सरोज, कन्या कु. सरस्वती हे सर्वजन या महाविद्यालयातून शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, हार्मोनियम वादन व तबलावादनाचे धडे देत आहेत.



## * मराठवाडा संगीत कला अकादमी :

१९९२ साली त्यांनी मराठवाडा संगीत कला अकादमीची स्थापना केली. या अकादमीचे ते सचिव असून या व्यासपीठावरून शेकडो संगीत महोत्सवाचे आयोजन त्यांनी केले. मराठवाड्यातील कलावंतांच्या अहमदनगर, पुणे व मुंबई यासारख्या शहरात मैफिली आयोजित केल्या. या अकादमीच्या माध्यमातून लातूर विभागातील ज्येष्ठ संगीत रसिकास 'कै. दगडोजीराव देशमुख संगीत रसिक भूषण पुरस्कार' देऊन गौरविले. 'विलासराव देशमुख स्मृति संगीत कलारत्न पुरस्कारा'ने ज्येष्ठ कलावंतांना गौरवित केले.

## * संगीत नगरी, सरस्वती संगीत कला महाविद्यालय :

लातूर शहरात सांगीतिक वातावरण निर्माण व्हावे, गुरुकुल पद्धतीने संगीताचे अध्यापन व्हावे यासाठी त्यांनी संगीत नगरी वसविली. याच संगीत नगरीत पुढे २००२ पासून सरस्वती संगीत कला महाविद्यालय सुरू करण्यात आले. यातून इ. ११ वी ते एम. ए. संगीतपर्यंतचे विद्यापीठ स्तरावरचे शिक्षण दिले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभिजात संगीताची गोडी निर्माण व्हावी यासाठी विविध सांगीतिक उपक्रम राबविले जातात. सांस्कृतिक मंडळाच्या उद्‌घाटनाकरीता प्रशांत दामले यासारख्या कलावंतांना निमंत्रित करून त्यांचे मार्गदर्शन ठेवले. स्नेह संमेलनासाठी कीर्ती शिलेदारांसारख्या कलावंतांना पाचारण करून त्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असे अनेकविध कार्यक्रम राबवून या महाविद्यालयाच्या माध्यमातून ते अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

## * ज्ञानसरस्वती प्रतिष्ठान न्यास :

लहानपणापासूनच पं. बाबुरावजी यांना माता सरस्वतीचे मंदिर बांधावे असे मनोमन वाटत होते. अखेर संगीतनगरीमध्ये २००९ साली 'ज्ञानसरस्वती मंदिरा'ची प्राणप्रतिष्ठापणा केली. हा ऐतिहासिक क्षण सोनेरी करण्यासाठी खुद्द गाणसरस्वती किशोरीताई अमोणकर या उपस्थित होत्या. हा क्षण पं. बाबुरावजी व बोरगावकर परिवारासाठीच नव्हे तर लातूरकरांसाठीसुद्धा सुवर्णमयी ठरला. किशोरीताईंनी या सरस्वती मातेच्या हातात स्वतःच्या घरचा 'सरस्वती वीणा' दिला. यासंदर्भात सौ. सुनीता बोरगावकर लिहितात, "लातूरच्या आमच्या संगीत नगरी मध्ये ज्ञानसरस्वती मंदिर आहे. तेथील मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेसाठी किशोरीताई अमोणकर आल्या होत्या. रंगमंचावरील एक दिगंत व्यक्तिमत्त्व मात्र तिथे मंदिराच्या पायरीशी बसून देवीच्या मूर्तीसाठी त्यांनी स्वतःच्या हाताने सुवासिक फुलांचा अतिशय सुंदर हार सुईदोरा घेऊन स्वतः तयार केला. हारामधील फुलांची रंगसंगतीसुद्धा

इतकी सुबकपणे गुंफली होती की बस... मध्यभागी मोठे फूल मग डावीकडे ज्या रंगाची फुले तशीच उजवीकडे... असा मेळ साधून केलेला तो हार... अप्रतिम. जणू मैफीलीत नेटकेपणाने स्वर गुंफुन मैफील सजवावी, तसे ताईंनी हार गुंफला होता."

खरोखरच नवरात्रात झालेला हा सोहळा अत्यंत संस्मरणीय झाला. याच मंदिरासाठी बोरगावकरांनी 'ज्ञान सरस्वती प्रतिष्ठाण न्यासाची' स्थापना केली. यातून नवरात्रात संगीत यज्ञ, बसंत पंचमीला अन्नदान असे उपक्रम राबविले जातात.

अशा प्रकारे पं. बोरगावकरांनी सरस्वती संगीत महाविद्यालय, मराठवाडा संगीत कला अकादमी, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, ज्ञानसरस्वती प्रतिष्ठाण न्यास अशा सांगीतिक संस्थाची स्थापना करून अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ मोलाचे योगदान दिले आहे.

**शिष्य संप्रदाय :**

पं. बाबुराव बोरगावकर यांच्या शिष्यांचा परिचय पुढील प्रमाणे सांगता येईल.

* **प्रा. विजयकुमार धायगुडे :**

यांचा जन्म १८ फेब्रुवारी १९६८ रोजी झाला. घरात अध्यात्मिक व वारकरी संप्रदायाचे वातावरण होते. वयाच्या १२ व्या वर्षापासून त्यांनी पं. कोंडिबा बोळंगेगुरुजी यांच्याकडून संगीताची तालीम घेण्यास सुरुवात केली. दोन वर्षानंतर त्यांनी सूरमणी पं. बाबुराव बोरगावकर यांच्याकडे संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला तसेच त्यांना पं. शांतारामजी चिगरी यांचेही मार्गदर्शन लाभले. त्यांनी १९९० साली संगीत विशारद तर १९९४ साली संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली. त्याबरोबरच त्यांनी बी. ए., बी. एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी विविध युवकमहोत्सवातून शास्त्रीय गायनाची सुवर्णपदके प्राप्त केली. बीड, नांदेड व औरंगाबादसारख्या शहरातून त्यांनी अभिजात संगीताला मैफीली करून संगीताचा प्रचार केला. २००६ साली दूरदर्शनवरून गुरू पं. बाबुराव बोरगावकर यांच्यासमवेत सहगायक म्हणूनही गायन सादर केले. १९९७ पासून ते बसवेश्वर महाविद्यालयातील संगीत विभागप्रमुख म्हणून रूजू झाले. या महाविद्यालयातून त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना अभिजात संगीताचे धडे दिले. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी सोहम प्रतिष्ठानची १९९७ साली स्थापना केली. याअंतर्गत साधना संगीत विद्यालय सुरू केले. या विद्यालयाच्या वतीने विविध सांगीतिक उपक्रम राबविण्यात आले. त्यांनी पं. यादवराज फड, पं. अजित कडकडे, प्रा. पराग चौधरी, पं.



संजय गरूड, श्री. वाईकर अशा कलावांतांना पाचारण करून लातूरच्या रसिकांना अभिजात संगीत ऐकण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यांनी सतत चार वर्षे भजन स्पर्धेचे आयोजन केले. साधना संगीत विद्यालयातून त्यांनी कृष्णा हुमनाबादे, शिवकुमार उरगुंडे, दत्ता राजे, संतोष जाधव, सूर्यकांत घोडके व अर्चना माशाळकर इ. शिष्य घडविले. हे सर्व शिष्य अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **श्री. लक्ष्मण श्रीमंगले :**

यांचा जन्म १६ मार्च १९६७ साली लातूर येथे झाला. वडील पौराणिक नाटकात कोरस द्यायचे त्यामुळे लक्ष्मण यांच्यावर लहानपणापासूनच संगीताची आवड निर्माण झ ाली. सातवीच्या वर्गात असताना त्यांनी दारूबंदी या विषयावर गीत सादर केले. तेव्हा त्यांना तालुक्यात पहिले पारितोषिक प्राप्त झाले. वयाच्या आठराव्या वर्षापासून त्यांनी पं. बाबुराव बोरगावकर यांच्याकडे संगीत अध्यापनास प्रारंभ केला. १९९२ साली ते विशारद तर २००६ साली संगीत अंलकार परीक्षा उत्तीर्ण झाले. १९९१ पासून ते सरस्वती विद्यालय येथे संगीत शिक्षक म्हणून रूजू झाले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयातून ते बी.कॉम. झाले तर दयानंद कला महाविद्यालयातून त्यांनी एम. ए. पूर्ण केले.

त्यांनी शालेय विद्यार्थ्यांना घेऊन आष्टविनायक संगीत स्पर्धा, कामगार कल्याण मंडळाच्या राज्य स्तरीय समूहगीत स्पर्धा व इतर अनेक स्पर्धांत यश संपादन केले. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे त्यांनी परीक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर विविध विद्यापीठाच्या युवकमहोत्सवात तज्ज्ञ परीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. २००८ ते २०१० या तीन वर्षासाठी त्यांनी कामगार कल्याण मंडळाचे सल्लागार म्हणून काम पाहिले. गीतमंच प्रशिक्षण कार्यक्रमाचे ते सदस्य आहेत त्यांनी औरंगाबाद, उस्मानाबाद व लातूर येथे जिल्हा व तालुका स्तरावर प्रशिक्षक म्हणून यशस्वी कार्य केले आहे. २०१२ साली दूरदर्शनवरून भक्तिरंग या कार्यक्रमातून गुरुवर्य पं. बाबुराव बोरगावकर यांच्यासमवेत सहगायन केले. या बरोबरच ते मराठवाड्यात सुगम व शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम करून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत त्यांनी शालेय विद्यार्थ्यांबरोबरच संगीतात अभिरूची असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना संगीताचे विनामूल्य धडे दिले. ज्यातून शरद पांडे, गीतांजली सुकाळे, रेश्मा जाधव, प्रीती बन्नागिरे व अनिल जाधव हे शिष्य घडविले.

* **सौ. स्मीता औटी (जोशी) :**

सौ. स्मीता यांचा जन्म २४ जुलै १९७१ रोजी लातूर येथे झाला. घरात संगीताची

आवड होती पण वारसा नव्हता. सहज छंद म्हणून त्यांनी पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्या सरस्वती संगीत महाविद्यालयात प्रवेश घेतला. पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्या कडक शिस्तीत गायनाचे धडे घेण्यास प्रारंभ झाला. तर पं. डॉ. राम बोरगावकर यांच्याकडून तबलावादनाचे धडे घेतले. गुरूंच्या आग्रहाखातर व शिस्तीमुळे इच्छा नसतानाही रियाज होऊ लागला पुढे संगीतात गोडी निर्माण झाली व संगीत विशारद व संगीत अलंकार या पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. इकडे दयानंद वाणिज्य महाविद्यालयातून बी. कॉम. व एम. कॉम. ही पदवी प्राप्त केली. लहानपणापासून महाविद्यालीन पातळीवर त्यांनी विविध सांगीतिक स्पर्धांत सहभाग नोंदविला व यश संपादन केले.

संगीताचा पाया पक्का झाला. पुढे विवाहानंतर त्यांना हिंगोली येथे जावे लागले. योगायोगाने धनंजय जोशी हे संगीतातील मर्मज्ञ पती म्हणून त्यांच्या जीवनात आले. ते हिंगोलीत कनिष्ठ महाविद्यालयात संगीताचे अध्यापन करतात. या पती-पत्नीनी ५ जानेवारी १९९९ रोजी हिंगोलीत सरस्वती संगीत विद्यालयाची सुरुवात केली. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या पाठ्यक्रमानुसार त्यांनी संगीताचे धडे देण्यास प्रारंभ केला. हिंगोली जिल्ह्यात अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी मासिक संगीत सभा, पं. पलुस्कर पुण्यतिथी व गुरुपौर्णिमा यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले. एवढेच नव्हे तर त्या हा शास्त्रीय गायक म्हणून पुणे शहरात प्रसिद्ध आहे. याबरोबरच निलेश यरमळ, प्राजक्ता झंवर, उत्कर्षा जोशी, अमीता दसरे, स्नेहा इंदाणी, स्वराली जोशी, पल्लवी पाठक असे अनेक विद्यार्थी पुढे संगीत प्रचाराचे कार्य करीत आहेत.

***   सौ. मीनाक्षी भारती :**

यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील कांबळगा या छोट्या गावी दि. ३ मार्च १९७८ रोजी झाला. घरात कसल्याही प्रकारचा सांगीतिक वारसा नव्हता. एखादा छंद असावा म्हणून त्यांनी १९८५ साली पं. बाबुराव बोरगावकर यांच्या सरस्वती संगीत महाविद्यालयात प्रवेश घेतला. सुरुवातीला गुरूंच्या धाकामुळे रियाज सुरू झाला. पुढे आपोआपच संगीताची गोडी निर्माण झाली. पाहता पाहता २००२ साली विशारद तर २००४ साली संगीत अलंकार ही पदवी त्यांनी प्राप्त केली. संगीत विशारद पूर्ण झाल्यानंतर लगेचच २००२ साली त्यांना लातूर शहरातील यशवंत विद्यालयात संगीत शिक्षकाची नोकरी मिळाली. त्यांनी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना अभिजात संगीताची गोडी लावली. त्यातील काही विद्यार्थ्यांनी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली विशारद ही पदवी प्राप्त केली आहे.



ग्रामीण भागातून आल्यामुळे सभाधीटपणा नव्हता; परंतु पं. बाबुरावजी बोरगावकर यांनी या कलावंतातील सुप्त गुण ओळखून विविध संगीत संमेलनातून गायनाची संधी उपलब्ध करून दिली. पं. सुरेश वाडकर यांच्या समवेत व कीर्ती शिलेदार अशा कलावंतांसमोर कला सादर करण्याची संधी मिळाली.

महाविद्यालयीन जीवनात त्यांनी युवकमहोत्सवात यश संपादन केले. मुंबई, पुणे, मध्य प्रदेशातील देवास या ठिकाणी आपल्या गुरुसमवेत गायन व हार्मोनियम वादन करून संगीताचा प्रचार केला. एवढेच नव्हे तर 'भक्तिरंग' या कार्यक्रमातून सहगायिका म्हणून त्यांना दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून गायन करता आले. सध्या त्या शाळेतून व खाजगी विद्यालयातून भावी पिढीस अभिजात संगीताचे धडे देत आहेत.

***   सौ. अर्चना बारपुते (मुजुमदार) :**

यांचा जन्म ७ जानेवारी १९७५ साली लातूर येथे झाला. बालपणापासूनच त्यांनी सरस्वती संगीत महाविद्यालयातून अभिजात संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला. १९८३ ते १९९८ या कालावधीत त्यांनी अभिजात गायनाची तालीम घेतली. १९९८ साली त्यांनी संगीत विशारद ही पदवी प्राप्त केली. शालेय जीवनात त्यांनी अनेक गायन स्पर्धेत यश संपादन केले. १९८९ साली केरळ येथे संपन्न झालेल्या स्काऊट गाईड शिबिरात त्यांनी गायन करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्त्व केले त्यानंतर पं. बाबुरावजी यांच्यासमवेत लातूर, परभणी, औरंगाबाद, बीड, पुणे, बुह्राणपुर, मध्य प्रदेशातील इंदौर व भोपाळ इ. ठिकाणी गायन सादर केले.

सध्या त्या ठाणे येथे वास्तव्यास असून तेथे 'सिद्धार्थ स्कूल ऑफ आर्ट्स, ठाणे' या संस्थेच्या संचालिका आहेत. जी संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहे. या संस्थेच्या ठाणे येथे ३ शाखा आहेत. ३ वर्षांपासून ८० वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मागील १५ वर्षांपासून अभिजात संगीताचे व सुगम संगीताचे धडे दिले जातात. या संस्थेतून त्या स्वतः आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन भारतातील विविध ठिकाणी गायनाचे कार्यक्रम करतात. या संस्थेतून संगीताचे अनेक कोर्स चालविले जात असून ७००० हून अधिक विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. कंठ साधना, श्वास नियंत्रण, ध्वनिशास्त्र या विषयाच्या कार्यशाळा घेतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्या अभिजात संगीत विकासात मोलाचे योगदान देत आहेत.

त्यांनी औरंगाबादच्या विद्यापीठातून एम. एस. सी. परीक्षेत सुवर्ण पदक प्राप्त केले. राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर, मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू स्नेहल देशमुख व

प्रसिद्ध लेखक अनंत यादव यांच्या हस्ते त्यांचा सन्मान झाला. एवढेच नव्हे तर या पदवीदान समारंभात त्यांनी आपल्या मधुर आवाजात गायन सादर करून श्रोत्यांची व मान्यवरांची दाद मिळविली. प्रजापिता ब्रह्मकुमारी परिवाराच्या वतीने आयोजित 'महिलांची प्रगती' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी त्यांना निमंत्रित करण्यात आले. या व्याख्यानातून ४००० महिलांचे त्यांनी प्रबोधन केले. त्यांच्यासमवेत सिनेतारका वर्षा उसगावकर याही उपस्थित होत्या. ठाणे जनता सहकारी बँकेच्या उद्घाटन सोहळ्यासाठी त्यांनी ठाणे येथील प्रतिष्ठित कलावंत म्हणून पाचारण केले होते. याच कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. मराठवाडा मंडळाच्या वतीने त्यांचा 'मराठवाड्यातील सुप्रसिद्ध गायिका' म्हणून विशेष सत्कार करण्यात आला.

थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्या तालमीत तयार झालेल्या या गायिकेने ठाणेसारख्या शहरातून जो अभिजात संगीताचा प्रचार केला आहे तो कौतुकास्पदच आहे.

* **मंगेश बोरगावकर :**

मंगेश बोरगावकर यांचा जन्म दि. १५ ऑक्टोबर १९८९ रोजी लातूर येथे झाला. वडील डॉ. राम बरोगावकर हे सुप्रसिद्ध तबलावादक तर आई सौ. सुनीता या उत्तम चित्रकार. घरात चार पिढ्यांपासून अभिजात संगीताचा वारसा. ज्याप्रमाणे पाण्यातील माशाला पोहायला शिकविण्याची आवश्यकता नसते त्याचप्रमाणे घरात सांगीतिक वारसा असल्यामुळे मंगेशला खूप परिश्रम घ्यावे लागले नाहीत. वयाच्या चौथ्या वर्षापासूनच त्याला पणजोबा पं. सदाशिव बोरगावकर यांच्याकडून संगीताचे धडे मिळाले. केवळ २ वर्षामध्ये त्याने विविध व्यासपीठांवरून हजारो रसिकांच्या समोर गायला सुरुवात केली. पाच वर्षाचा असताना त्याने व्यावसायिक गाणे गायिले. वयाच्या सहाव्या वर्षापासून काका पं. सूरमणी बाबुराव बोरगावकर यांच्याकडून किराणा घराण्याची तालीम घेण्यास सुरुवात केली. वडील व काका मंगेशला पहाटे उठवून रियाज करून घेऊ लागले. बरोबरीला बहीण मधुवंती, सरस्वती व भाऊ गणेश रियाज करत होते. त्या काळात 'स्वरसाधना समिती'च्या अखिल भारतीय गायन स्पर्धेत मुलांच्या विभागात पहिला आला.

वयाच्या सातव्याच वर्षी औरंगाबादच्या आकाशवाणी केंद्रावरून त्याच्या कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग होऊ लागले. तेथूनच त्याला प्रसिद्धी मिळू लागली त्यानंतर मंगेशने कधीही मागे वळून पाहिले नाही. त्याने राज्य स्तरीय अष्टविनायक स्पर्धेत सलग तीन वेळा प्रथम



पारितोषिक प्राप्त केले. घरात ९ सदस्य संगीत क्षेत्रातील असल्यामुळे त्याची सांगीतिक जडण-घडण होत होती. पं. गोविंदरावजी बोरगावकर सौ. सरोज बोरगावकर यांचेही मार्गदर्शन मिळत होते. अगदी बालवयातच त्याची संगीतातील प्रतिभा पाहून पुण्यातील 'संगीत उन्मेश' या संस्थेने त्याला 'संगीत उन्मेश बालगायक' हा पुरस्कार प्रदान केला. पं. उस्मान खाँ, पं. आप्पासाहेब जळगावकर व पं. उल्हास कशाळकर या पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी उपस्थित होते. वयाच्या १२ व्या वर्षी त्याने 'प्रशांत दामले राज्य स्तरीय स्पर्धा' जिंकली. या स्पर्धेत १२३६ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता; परंतु या साऱ्यांनाच मागे टाकत त्याने प्रथम क्रमांक पटकावला या स्पर्धेला पं. अजय पोहनकर, रामदास कामत, उत्तरा केळकर हे मान्यवर परीक्षक म्हणून लाभले होते. सांस्कृतिक मंत्री अशोक चव्हाण व प्रशांत दामले यांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. या स्पर्धेच्या यशामुळे मंगशेच्या आवाजावर यशाची पहिली बडी मोहर उमटली.

दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून प्रसारीत झालेल्या 'भक्तिरंग' या मालिकेतून त्याने तब्बल साडेतीन वर्षे गायन केले.

आतापर्यंत त्याला सर्वोत्तम गायकाचे तब्बल दोन डझन पुरस्कार मिळाले आहेत. त्याचबरोबर कित्येक प्रतिष्ठेच्या व्यासपीठावर त्याचा सत्कारही झाला आहे. कनकवली येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनामध्ये तत्त्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते त्याचा गौरव झाला. तो तेरा वर्षाचा असतानाच फाऊन्टेन म्युझिक कंपनीने त्याचे दोन अल्बम प्रकाशित केले. त्यानंतर त्याने कित्येक कार्यक्रमात आपली अदाकारी सादर केली आणि तेथे तो बरेच काही शिकत गेला. मान्यवरांचे आशीर्वाद त्याला मिळत गेले.

संगीताचा हा प्रवास झी टीव्हीच्या गायन स्पर्धेत 'सा रे ग म प' मध्ये त्याला विजेता ठरवून गेला. या स्पर्धेत प्रत्येक भागामध्ये मान्यवर परीक्षकांकडून त्याची वाहवा झाली. मंगेशला 'महाराष्ट्र टाईम्सच्या' 'नवतारा उत्सव २००७' यामध्ये प्रमुख पाहुणा म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. मलुंडच्या वझे महाविद्यालयाच्या वार्षिक कार्यक्रमात प्रख्यात संगीत दिग्दर्शक अजय-अतुल यांच्याबरोबर प्रमुख पाहुणा म्हणून मंगेशला आमंत्रित करण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाच्या 'अंबा महोत्सव कार्यक्रमा'तही त्याने गायन सादर केले. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या 'आम्ही दादरकर'मध्येही त्याने खिळवून ठेवणारे गायन सादर केले. या कार्यक्रमाला 'महाराष्ट्र टाईम्स' मीडिया पार्टनरच्या भूमिकेत होता.

हा कार्यक्रम महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे श्री. राज ठाकरे यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

मंगेशने एलोरा महोत्सवातही आपले गायन सादर केले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने २३ ते २६ नोव्हेंबर २००७ दरम्यान या महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात भारतीय संगीतातील सर्व आघाडीच्या कलाकारांनी आपली गायन कला सादर केली. त्यात बडोदा मराठी मंडळाने ज्येष्ठ गायक रवींद्र साठे यांच्याबरोबर गाण्यासाठी बोलावले होते. अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष गुढीपाडवा समारंभात त्याने आपल्या गाण्याने रसिकांची मने जिंकली. त्याच्या ठाणे येथील गुढीपाडवा विशेष कार्यक्रमाला महाराष्ट्र टाईम्स पुरस्कार विजेते कवी आदित्य ठाकरे यांनी उपस्थिती लावली होती. महाराष्ट्रातील सर्व प्रतिष्ठीत मंदिर, प्रतिष्ठानांनी आयोजित केलेल्या सर्वच महोत्सवामध्ये त्याने आपली कला सादर केली आहे. पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या 'दगडूशेठ हलवाई रजत जयंती' उत्सवातही मंगेशने गाणी सादर केली होती.

सागरिका म्युझिकने नारायण राणे यांच्यासाठी आयोजित केलेल्या 'सिंधूदुर्ग महोत्सव २००८' हा आणखी एक प्रतिष्टेचा महोत्सव होता. तेथे त्याने मराठीतील आघाडीचे संगीत दिग्दर्शक अवधुत गुप्ते यांच्याबरोबर कार्यक्रमात सहभाग घेतला. 'गाणे मंगेशाचे' कार्यक्रमातून मंगेश बोरगावकरने राज्यात आणि शेजारच्या राज्यामध्येही रसिकांची वाहवा मिळवली आहे. लातूर येथील संगीत गुरुकुलाच्या विस्तारित उभारणीसाठी या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्याने निधी गोळा केला आणि त्या माध्यमातून 'गुरुकुल'मध्ये संगीत साधना करण्यासाठी आलेल्या गरीब विद्यार्थ्यांच्या निवास भोजनासह शिक्षणाची विनाशूल्क सोय केली जाणार आहे. हे गुरुकुल चार दशके बोरगावकर कुटूंबीयांकडून चालविले जाते.

मंगेश विविध टेलिव्हिजन वाहिण्यांसाठीही कार्यक्रम करीत आला आहे. 'कशासाठी, प्रेमासाठी' या प्रख्यात चित्रपटनिर्माता महेश कोठारे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातही तो होता. त्याने 'स्टार माझा' ने आयोजित केलेल्या व्हॅलेन्हटाईन डे स्पेशल 'फेस्टीव्हल ऑफ लव्ह' हा विशेष कार्यक्रम सादर केला होता. प्रेमाच्या संकल्पनेवर आधारित संवादरूपी शो (प्रेक्षकांची संवाद साधत अशा प्रकारचा तो शो होता.) सादर केला.

खासगी कंपन्यांशी सादर केलेल्या अल्बममध्येही मंगेशची गाणी ऐकायला मिळणार आहेत. 'मेरा देश महान' या अगामी बिग बजेट हिंदी चित्रपटासाठी त्याने शीर्षकगीत गाऊन पदार्पण केले आहे. शंकर महादेवन त्यांच्याबरोबर त्याने पुणे येथे त्याचा पहिला



शो केला.

मंगेशला फिलाडेल्फीया (अमेरिका) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'बीएमएम २००९' या युवामहोत्सवात गायनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

मंगेशच्या गायनात शास्त्रीय गायन, सुगम गायन व भक्तिसंगीताचा समावेश आहे. मंगेशने मुंबईत त्याचा पहिला भक्तिरंग कार्यक्रमही केला. रविंद्र नाट्य मंदिर येथे १३ जुलै २००८ रोजी हे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. तोपर्यंत त्याने मुंबईत केवळ सुगम संगीताचे कार्यक्रम केले होते. मंगेशने शंकर महादेवन, स्वप्नील बांदोडकर, बेला शेंडे आणि सुनील बर्वे यांच्याबरोबर दिवाळीत पुणे येथे कार्यक्रमात सहभाग घेतला होता. स्टार माझा वाहिनीसाठी त्याने 'दिवाळी स्पेशल' कार्यक्रम केला होता. मंगेशने त्याचा 'गाणे मंगेशाचे' हा सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम २८ डिसेंबर २००८ रोजी मुंबईत सादर केला.

युनिव्हर्सल म्युझिकसोबत करार असलेला मंगेश मराठीतला पहिला गायक बनला. संगीतकार अशोक पत्की यांनी मंगेशला घेऊन 'दिवानी झालो तुझा' हा अल्बम बनविला. स्टार प्रवाह वाहिनीवरील 'तुजविण सख्यारे!' या मालिकेत पार्श्वगायन केले. झी मराठी वाहिनीवरील 'एका लग्नाची दुसरी गोष्ट' मलिकेसाठी गायिका वैशाली सामंतसह पार्श्वगायन केले.

दि. २८ मार्च २०१५ रोजी दै. 'लोकमता'ने मंगेशची युथ आयकॉन म्हणून निवड केली व त्याचा सत्कार केला. या निमित्ताने प्रकाशीत झालेल्या अंकात त्याच्याबद्दल म्हटले आहे, "मंगेश बोरगावकर हा महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणारा लातूरचा शंभर नंबरी गळा आहे. 'सा रे ग म प' च्या मालिकेतून राज्याच्या संगीत पटलावर चमकलेला हा तारा आज देशातील अनेक संगीतप्रेमी रसिकांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. लातुरातील संगीत हाच श्वास घेऊन जगणाऱ्या बोरगावकर घराण्याचे नाव उज्ज्वल करण्याबरोबरच आपल्या जन्मभूमीची पताका मंगेशने सातासमुद्रापार नेली." विविध ठिकाणच्या सेवाभावी संस्थेसाठी तो विनामूल्य कार्यक्रम सादर करतो. त्याने अपंग मुलांच्या एका केंद्रासाठी प्रार्थना गीत गायन केले. ज्याला निलेश मोहरीर यांनी संगीत दिले आहे तर सौ विजया वाड यांनी लेखन केले आहे. लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाही मंगेशने दिवाळीत कधी कश्मीरच्या सैन्यासाठी, कधी पुण्यातल्या अनाथांसाठी तर कधी संस्थांच्या मदतीसाठी प्रयोग करून संवेदनशील कलावंतात तितकाच संवेदनशील माणूस लपल्याचे दाखवून

दिले.

*      **सौ. मधुवंती बोरगावकर देशमुख :**

मधुवंती यांचा जन्म तीन पिढ्यांचा संगीत वारसा लाभलेल्या बोरगावकर कुटुंबात १९८८ साली झाला. पंधरा सोळा जणांच्या एकत्र कुटुंबात प्रत्येक जण कलावंत आहे. कोणी गायन-वादनात तर कोणी चित्रकलेत. त्यामुळे त्यांची साधना सुरेल वातावरणात सुरू झाली. वडील पं. बाबुरावजी बोरगावकर व आई सौ. सरोज बोरगावकर हे स्वतः गायक असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांनी या दोघांकडून अभिजात संगीताची तालीम घेतली. काका डॉ. राम बोरगावकर यांच्याही त्यांना तबलावादनातील मोलाचे मार्गदर्शन मिळाले. वयाच्या सहाव्या वर्षी राज्य स्तरीय स्पर्धेत सहभागी होऊन थेट प्रथम क्रमांक मिळविला. हाच त्यांच्या दृष्टीने 'संजीवक' क्षण ठरला. त्यानंतर शिस्तबद्ध रियाझ आणि अखंड प्रेरणा पाठीशी असल्याने या साधनेला सुत्रबद्ध स्वरूप आले.

त्यांनी गानसरस्वती किशोरीताई अमोणकर यांच्याकडून उच्च स्तरिय तालीम घेतली. १९९५ साली वयाच्या सहाव्या वर्षी 'स्वरसाधना समिती, मुंबई' तर्फे घेण्यात आलेल्या राज्य स्तरीय स्पर्धेमध्ये शास्त्रीय गायनात प्रथम पारितोषिक मिळाले. १९९५ साली देशभक्त बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते 'संगीतोन्मेष पुरस्कार' मिळाला. वयाच्या आठव्याच वर्षी सह्याद्री वाहिनीवरील बालचित्रवाणी या कार्यक्रमात काव्यगायनाचा कार्यक्रम झाला. १९९७ साली महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद येथील संगीत संमेलनात शास्त्रीय गायन केले.

१९९८ साली दुल्लभदास चापसी चॅरीटेबल ट्रस्टच्या संगीत स्पर्धेत प्रथम पारितोषक मिळाले. १९९९ साली इंदौर येथे आयोजित 'लयशाला संगीत संमेलना'त शास्त्रीय गायन सादर केले. २००० साली सी. सी. आर. टी., दिल्ली यांच्यातर्फे शास्त्रीय गायनासाठी राष्ट्रीय पातळीवरील शिष्यवृत्ती मिळाली. २००५ साली सह्याद्री वाहिनीवर 'भक्तिरंग' या लोकप्रिय सांगीतिक मालिकेत प्रमुख गायिका म्हणून सहभागी होता आले. २००६ मध्ये सह्याद्री वाहिनीवरील 'महाराष्ट्र संगीतरत्न' या रियॅलिटी शोमध्ये सेमी फायनल विजेते होण्याचा बहुमान मिळाला. २००७ मध्ये झी मराठी वाहिनीवरील 'सा रे ग म प' या संगीत स्पर्धेत अंतिम ७ पर्यंत मजल मारली. ऑल इंडिया रेडिओच्या त्या आकाशवाणी कलावंत आहेत.

सांगीतिक वाटचालीबरोबरच त्यांनी शालेय व महाविद्यालयीन शिक्षणातसुद्धा आपली गुणवत्ता सिद्ध केली. २००५ साली बारावी बोर्ड परीक्षेत गुणवत्तायादीत १० वा



क्रमांक पटकावला तर २००८ साली बी. ए. तृतीय वर्ष परीक्षेत विद्यापीठातून दुसरा क्रमांक प्राप्त केला. तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून एम. ए. संगीत ही परीक्षा विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनी २००५ साली हार्मोनियम या विषयात विशारद ही पदवी विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झाल्या तर २००७ मध्ये गायन विषयात संगीत अलंकार ही पदवी विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण केली.

त्या गायनाबरोबरच तबला हार्मोनियम कॅसिओ, गिटार व सतार ही वाद्ये वाजवितात. वडिलांप्रमाणे बंदिशी तयार करणे व गीतांना चाली देण्याची परंपरा पुढे चालवित आहेत. सध्या पुणे येथील बावधन परिसरात 'श्री. ज्ञानसरस्वती संगीत विद्यालया'तून अभिजात शास्त्रीय गायन व सुगम संगीताचे मार्गदर्शन करून पुढील पिढी घडविण्याचे कार्य करीत आहेत.

पुढे चालून संगीत विषयात त्यांना पीएच. डी. मिळवायची आहे. याबरोबरच निवडक भावगर्भ कवितांना अनवट चालींच्या माध्यमातून पुन्हा एकदा रसिकांच्या समोर आणायच्या आहेत.

*      **कु. सरस्वती बोरगावकर :**

आई-वडिलांकडून मिळालेल्या संगीतिक वारशामुळे सरस्वती लहानपणापासून संगीताची आवड निर्माण झाली. वयाच्या पाचव्या वर्षापासून तिने वडील पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्याकडून अभिजात संगीताची तालीम घ्यायला सुरुवात केली. २००३ साली वयाच्या ८ व्या वर्षी तिने स्वरसाधना समिती, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सुगम गायन स्पर्धेत भारतात पहिला क्रमांक प्राप्त केला. २००६ साली श्रीरंग कला निकेतन, तळेगाव दाभाडे, पुणे यांनी आयोजित केलेल्या सुगम गायन स्पर्धेत महाराष्ट्रात सर्वप्रथम आली. २००५ ते २००७ या कालावधीत दूरदर्शनवरील 'भक्तिरंग' मालिकेत बालगायिका म्हणून तिने गायन केले. २००७ साली अष्टविनायक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या राज्य स्तरीय भक्तिगीत व सिने-शास्त्रीय गायन स्पर्धेत सर्वप्रथम येण्याचा बहुमान तिने पटकावला. २००८ साली 'आयडिया सा रे ग म लिटील चॅम्प' (मराठी) स्पर्धेत तिने आपल्या गायनाची चुनक दाखवून संपूर्ण महाराष्ट्राला मंत्रमुग्ध केले. २०१० साली प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन स्पर्धेत भक्तिगीत, भावगीत व सिनेशास्त्रीय गायन स्पर्धेत सर्वप्रथम क्रमांक पटकावला. २०१३ साली आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय युवकमहोत्सवात तिने सुगम गायन स्पर्धेत सर्वप्रथम क्रमांक प्राप्त केला. २०१४ साली आंतर-विद्यापीठ

अखिल भारतीय युवकमहोत्सव कुरूक्षेत्र येथे सुगम गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. २०१५ साली अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाची संगीत अलंकार ही पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन प्राप्त केली. २०१५ साली अखिल भारतीय आकाशवाणी स्पर्धेत तिने देशात पहिला येण्याचा बहुमान पटकावला. या सांगीतिक कार्याबरोबर तिने बी.एससी. ही पदवी प्राप्त केली आहे. आपल्या मधुर गायनाने ती संपूर्ण महाराष्ट्रातून सुगम व शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम करीत असते. वडिलांकडून घेतलेला हा सांगीतिक वारसा तिने यशस्वीरीत्या पुढे चालू ठेवला आहे.

* **सौ. गीतांजली कुलकर्णी (जोशी) :**

दि. ११ फेब्रुवारी १९७६ साली लातूर येथे गीतांजली यांचा जन्म झाला. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी सरस्वती संगीत महाविद्यालयात प्रवेश घेतला. घरात भाऊ घनश्याम हा डॉ. राम बोरगावकर यांच्याकडे तबलावादनाचे शिक्षण घेत होता. त्यामुळे यांनी गायनाचे शिक्षण घ्यावयास प्रारंभ केला. पं. बोरगावकर सरांच्या कडक शिस्तीत त्यांनी संगीताचा रियाज केला. महाविद्यालयीन जीवनात त्यांनी विविध सांगीतिक स्पर्धात यश संपादन केले. एवढेच नव्हे तर आंतर महाविद्यालयीन युवकमहोत्सवात त्यांनी शास्त्रीय व सुगम संगीतात सुवर्णपदक प्राप्त केले. संगीत विशारद, संगीत अलंकार प्रथम वर्षापर्यंत त्यांनी पदवी प्राप्त केली. तसेच एम. ए. संगीत व बी.एड. पर्यंतचे उच्च शिक्षण त्यांनी पूर्ण केले आहे. सध्या त्या सरस्वती संगीत विद्यालय, बार्शी रोड येथून भावी पिढीस संगीताचे धडे देत आहेत.

**अनेक मौलिक बंदिशीच्या रचना :**

प्रतिभा ही ईश्वरी प्रसाद असतो जो सर्वांना मिळत नसतो; परंतु पं. बाबुरावजी बोरगावकर हे अत्यंत भाग्यवान आहेत. ज्यांना नवीन बंदिशी निर्माण करण्याची प्रतिभा लाभलेली आहे. बनारस येथून आल्यानंतर त्यांना बंदिशी निर्माण करण्याचा छंद जडला. इतर कलावंत रचना करतात मग मला का येणार नाही? दुसऱ्यांची नक्कल का करावी? याच विचारातून ते रागातील बंदिशी तयार करू लागले. विद्यार्थ्यांना शिकवत असतानाच त्यांना बंदिशीचे स्फूरण होऊ लागले. लागलीच ते त्या बंदिशी विद्यार्थ्यांना शिकवूही लागले. या बंदिशीत रागाचे नेमके ठिकाण कोठे आहे? पारंपारिक व या बंदिशीत राग कुठे दिसतो याची तुलना करून ते शिकवू लागले.

'रसरंग' या टोपन नावाने त्यांनी जवळजवळ एक हजार बंदिशी निर्माण केल्या



आहेत. एकाच रागात त्यांनी अनेक बंदिशी निर्माण केल्या. उदा. भुपरागात 'गात गीत गगनवा', 'साजन मोरा गगन भर आया', 'जयजय जयाजी गणराया' या छोट्या ख्यालाच्या बंदिशी रचल्या तर 'अंबे आदी माई भवानी' ही बडा ख्यालातील रचना त्यांनी केली. सुरुवातीला त्यांनी विविध रसांवर व विषयांवर बंदिशी तयार केल्या. त्यानंतर मात्र त्यांनी ईश्वर स्तुतीवर अधिक रचना केल्या. ज्यात गणेश, सरस्वती, लक्ष्मी व हनुमान या देवतांचे वर्णन स्तुती असलेल्या बंदिशी त्यांनी रचल्या. प्रवास करताना, बसमध्ये, दुचाकी वाहनावरून जात असताना त्यांनी बंदिशी तयार केल्या. हनुमान जयंती दिवशी आपण अनेक देवतांच्या वर्णनात्मक बंदिशी तयार केल्या. आज हनुमान जयंतीनिमित्त त्यांची एक बंदिश तयार करावी असे त्यांना वाटले आणि आश्चर्य! घरापासून ज्ञानसरस्वती मंदिराकडे जात असताना हनुमानजींचे वर्णन असणारी बंदिशी तयार झाली. हिंडोल रागातील ही बंदिश अशी आहे "जय हनुमान गुन ग्यान गुणीदास".

बंदिशींची रचना करताना त्यांनी एकाच आवर्तनात लिखान करता येईल व म्हणता येईल याचा विचार केला. क्लिष्टता असल्यामुळे रागाची रंजकता कमी झाली याचा विचार करून त्यांनी हलक्या फुलक्या व सुलभ, प्रासादिक रचना केल्या. गाताना अर्थ व भावाचे प्रदर्शन कसे होईल याचाही विचार त्यांनी केला यामुळे त्यांच्या रचना हळूहळू लोकप्रिय झाल्या. बडाख्याल, छोट्याख्याल याबरोबरच त्यांनी धृपद, धमार, चतरंग, सरगमगीत, लक्ष्मण गीत, ठुमरी आदी गीत प्रकारांच्याही रचना तयार केल्या. एखादी बंदिशी किमान १०-२० वेळा विद्यार्थ्यांना शिकविल्यानंतरच त्यांनी त्याला अंतिम रूप दिले.

'रसरंग 'सा' 'रे' 'ग' 'म' 'प' 'ध' व 'नि' अशा सात पुस्तकांतून त्यांनी जवळपास पाचशे बंदिशी प्रकाशित केल्या आहेत. प्रारंभिक ते विशारद परीक्षेपर्यंतच्या संगीत साधकांना याचा लाभ होत आहे. या पुस्तकात त्यांनी रागाची माहीती व बंदिशी लिपीबद्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांची सोय झाली आहे.

पं. बाबुरावजींनी स्वतःची गायकी जेव्हा रसिकांसमोर आणली तेव्हा त्यांनी स्वबंदिशी रसिकांसमोर मांडल्या. त्याला रसिक श्रोत्यांनी उदंड प्रतिसाद दिला. किंबहुना जेव्हा त्यांनी दिल्ली आकाशवाणीत ध्वनिमुद्रिका पाठविली तेव्हा त्यांनी निर्माण केलेल्या 'गावती' रागातील 'बलमा मोरी आयेरी' ही बंदिशी पाठविली होती. याच बंदिशीवर त्यांची 'मगंळवारीय संगीत सभे'साठी निवड झाली होती.

संगीताच्या बंदिशी तर त्यांनी तयार केल्याच यावरून त्यांच्या बंदिशींना लोकमान्यता

मिळाली असल्याचे स्पष्ट होते.

सौ. मधुवंती या त्यांच्या कन्या सांगतात, "मी वडिलांच्या गायनाला हार्मोनियमची साथ द्यायचे तेव्हा ते मला स्वतः होऊन काही तरी निर्माण कर असे सांगायचे. त्यामुळेच मी काही बंदिशी तयार केल्या व काही अभंगांना चाली दिल्या."

अशा प्रकारे आपल्या शिष्यांनाही त्यांनी बंदिशी करण्यासाठी प्रोत्साहन दिले त्यामुळे सौ. मधुवंती व सरस्वती या नवीन बंदिशी तयार करून आपल्या वडिलांचा वारसा पुढे चालवीत आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. बाबुरावजी बोरगावकर यांनी हजार नवीन बंदिशी निर्माण करून अभिजात संगीत साहित्यात मोलाची भर टाकली आहे

**नवीन रागांचे सृजन :**

पं. बाबुरावजी बोरगावकर हे उत्तम गायक, गुरू व रचनाकार तर आहेतच; परंतु त्याचबरोबर त्यांनी आपल्या संगीत चिंतनातून 'शारदा' या नवरागाची निर्मिती केली आहे. या रागात कोमल गांधार असून इतर सर्व स्वर शुद्ध लागतात. या रागाच्या आरोहात अभोगी तर अवरोहात शिवरंजनी रागाचे स्वरूप दिसून येते. एकानंतर एक याप्रमाणे अभोगी व शिवरंजनीच्या छटा या रागात दिसतात. यात ध प ग रेऽ ग म सा, ध प ग रे ग मऽ हा आलाप सतत घेतल्यामुळे शारदा रागाचे स्वरूप स्पष्ट दिसते. या रागाचा वादी स्वर मध्यम तर संवादी स्वर षडज आहे. रागाची जाती औडव-औडव आहे. हा राग रात्रीच्या द्वितीय प्रहरी गायिला जातो. याचे स्वरूप भक्ती रसयुक्त व मनाला स्पर्श करणारे आहे. याचा स्वरविस्तार तिन्ही सप्तकात समान पद्धतीने केला जातो. या रागाचा स्वरविस्तार शांत व स्थिर असल्यामुळे बडाख्याल व छोटा ख्यालाच्या सर्व रचना शोभून दिसतात. ईश्वर भक्तीची गिते व भजन प्रकारांना हा राग अनुरूप आहे.

अरोह - ध़ सा रे $^{म}$ग म ध सां।

अवरोह - सां ध प, $^{प}$ग रे प ध़ सा।

पक्कड - ध़ सा रे ग म ऽ ध प ग रे ऽ ग म ऽ सा।

हा राग त्यांनी 'रसरंग' नि या पुस्तकातून प्रकाशित केला आहे. तसेच या रागात त्यांनी भजनसुद्धा स्वरबद्ध केले आहे. या रागातील दोन्ही रागांच्या मिश्रणामुळे अत्यंत गोड वाटतो, श्रृतीमधुर, अल्हाददायक व मनमोहक वाटतो. या रागाला अनेक जाणकार रसिकांनी दाद दिली आहे.



अशा प्रकारे पं. बाबुरावजी बोरगावकर यांनी अभिजात शास्त्रीय संगीतात एका नवीन रागाची भर टाकून आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**संगीतविषयक अनेक महत्त्वपूर्ण पदांवर सफलतापूर्वक कार्य :**

पं. बाबुरावजी यांनी आजपर्यंत अनेक संगीतविषयक महत्त्वपूर्ण पदावर राहून कार्य केले आहे. याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

०१. ते गेल्या अनेक वर्षांपासून अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या प्रारंभीक ते अलंकारपर्यंतच्या सर्व परीक्षांसाठी परीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

०२. १९९१ पासून महाराष्ट्र शासनाच्या विविध परीक्षा मंडळावर परीक्षक व सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

०३. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या पदवी परीक्षेसाठी संगीत विषयाचे तज्ज्ञ परीक्षक म्हणून कार्य केले.

०४. म. रा. मा. व उ. मा. शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या संगीत प्रात्यक्षिक परीक्षेसाठी परीक्षक म्हणून व लेखी परिक्षेसाठी पर्यवेक्षक, नियामक (मॉडरेटर) म्हणूनही अनेक वर्षे कार्य केले आहे.

०५. संगीत साधना मुंबई या संस्थेच्या वतीने आयोजित राज्य स्तरीय संगीत स्पर्धेसाठी त्यांनी तज्ज्ञ परीक्षक म्हणून कार्य केले.

०६. राजर्षी शाहू महाविद्यालयात संगीत विभाग प्रमुख या नात्याने त्यांची कादकीर्द विशेष संस्मरणीय आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या युवकमहोत्सवात शास्त्रीय, सुगम व समूहगीत प्रकारात अनेक विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली आहेत. गुणवत्तायादीत इ. १२ परीक्षेत संगीत विषय घेऊन गुणवत्तायादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रतिवर्ष वाढली. तीन वेळा बोर्डात सतत संगीताचा विद्यार्थी प्रथम येण्याचा बहुमान या महाविद्यालयाला मिळाला आहे. मार्च १९९९ च्या परीक्षेत राज्यामध्ये कलाशाखेत सर्वप्रथम, द्वितीय व तृतीय येणारा विद्यार्थी शाहूच्या संगीत विभागाचाच आहे. याचे सर्व श्रेय संगीताचे प्राध्यापक प्रा. बाबुराव बोरगावकर यांना आहे.

०७. शासनाकडून वृद्ध कलावंतांना मानधन देण्यात येते. या निवड समितीवर त्यांनी सदस्य म्हणून कार्य केले आहे. विशेष म्हणजे यापूर्वी केवळ कागदपत्रांची छाननी करून मानधन दिले जायचे; परंतु पं. बाबुरावजी जेव्हापासून निवड समितीवर

कार्य करू लागले. तेव्हापासून त्या कलावंतांची कलेचे प्रत्यक्ष सादरीकरण पाहून निवड करण्याचा प्रघात त्यांनी पाडला.

०८. मराठवाडा संगीत कला अकादमी, लातूर या संस्थेचे ते सचिव आहेत.

०९. सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूरचे ते संचालक व प्रधानाचार्य आहेत.

१०. सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर या संस्थेचे ते सचिव आहेत.

११. ज्ञान सरस्वती प्रतिष्ठाण न्यास या संस्थेच्या पदावर ते कार्यरत आहेत.

अशा प्रकारे परीक्षक ते संस्थाचालक अशा अनेक संगीतविषयक महत्त्वपूर्ण पदांवर कार्य करून अभिजात संगीतासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

* **मानसन्मान :**

पं. बाबुरावजी यांनी केलेल्या सांगीतिक कार्याचा नोंद घेऊन अनेक संस्था व शासनाकडून त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

०१. १९९१ साली त्यांना आकाशवाणी केंद्राने 'बी हाय' हा ग्रेड देऊन गौरवित केले.

०२. १९९५ साली त्यांच्या गायनसेवेबद्दल सूरसिंगार संसद मुंबई यांनी त्यांना 'सूरमणि' पुरस्कार देऊन सन्मानित केले.

०३. १९९९ साली त्यांना जिल्हा परिषदेचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

०४. बनारस हिंदू विश्वाविद्यालय, संगीत विभागाच्या वतीने त्यांना 'युवा गायक पुरस्कार' देऊन गौरवान्वित केले.

०५. याबरोबरच पं. पलुस्कर संगीत समारोह आग्रा, महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद, भटजीबापू संगीत समारोह, हैद्राबाद, नादानूभव फाऊन्डेशन, बैंगलौर या संस्थांनी त्यांच्या उत्कृष्ट गायनाबद्दल त्यांचा स्मृति चिन्ह देऊन सत्कार केला.

थोडक्यात असे म्हणता येईल की, "पं. बाबुरावजी बोरगावकर यांचे सांगीतिक कार्य पाहता त्यांचा जो विशेष सन्मान व्हायला हवा होता तो झाला नसल्याचे दिसून येते. असे असले तरी ते 'सेवा है यज्ञकुंड समीधा सम हम जले' या काव्यपक्तींप्रमाणे आपल्या कार्यात मग्न असतात. म्हणूनच 'संगीतातील थोर कर्मयोगी' असाच त्यांचा उल्लेख करणे उचित होईल."



त्यांच्या संपूर्ण व्यक्तित्त्वाचा आढावा घेतल्यानंतर आपणांस दिसून येते की, पं. बाबुरावजी हे उत्तम गायक, वादक, रचनाकार, लेखक, प्रकाशक, हाडाचे शिक्षक आहेत. त्यांच्या कार्याचा आवाका पाहता 'कर्मयोगी' ही उपाधी त्यांच्यासाठी निश्चितच सार्थ ठरते. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेल्या पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्याकडे पाहिल्यानंतर नकळतच ओठांतून शब्द बाहेर पडतात,

"दिव्यत्त्वाची जेथे प्रचीती।<br>तिथे कर माझे जुळती।।"

♦ ♦ ♦



प्रकरण

८

# पं. विठ्ठलरावजी जगताप

*      **जीवनवृत्त :**

घरात कसल्याही प्रकारचे सांगीतिक वातावरण नसताना स्वकर्तृत्त्वावर ज्यांनी संगीत कलेचे शिक्षण घेतले, अनेक शिष्य घडवून लातूर जिल्ह्याच्या सांगीतिक क्षेत्रास मोलाचे योगदान दिले असे ज्येष्ठ कलावंत म्हणजेच पं. विठ्ठलरावजी केरबाजी जगताप. त्यांचा जन्म १८ ऑगस्ट १९५२ रोजी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील गोताळा या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव केरबाजी तर आईचे नाव सितादेवी असे होते. घरात शिवाजी, विठ्ठल आणि मदन हे तीन भाऊ तर शांताबाई ही त्यांची बहीण होती. त्यांचे काका अमृतराव जगताप यांना २ मुले व ३ मुली होत्या. एकत्र कुटुंब पद्धती असल्यामुळे १३ जणांचे हे मोठे कुटुंब होते. हे सारे कुटुंब सुखा-समाधानाने जगत होते. अशातच त्यांच्या कुटुंबावर काळाने झडप घातली. काका अमृतराव अकालीच हे जग सोडून गेले. त्यानंतर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी केरबाजी म्हणजेच विठ्ठल जगताप यांच्या वडिलांवर येऊन पडली.

वडील केरबाजी यांना सांप्रदायिक भजनाची आवड होती. तसेच पुतण्या संजेराव जगताप याला गायन व थोडीफार हार्मोनियम वाजवायला येत होती. त्या काळी गावात मारुतीच्या मंदिरात दररोज भजन व्हायचे. विठ्ठल पाच वर्षांचे झाले तेव्हापासून वडील त्यांना मंदिरात भजनासाठी घेऊन जाऊ लागले. परंतु रोजच टाळ वाजवावा लागतो म्हणून ते तेथून पळ काढायचे. त्यामुळे त्यांना अनेक वेळा वडिलांचे बोलणे ऐकून घ्यावे लागायचे.

गावात चौथीपर्यंत एकशिक्षकी शाळा होती. शाळेत नाव दाखल केले परंतु नियमित शाळा होत नसे. कधी शेतीची कामे करावी लागायची तर कधी जमेल तेव्हा शाळेत जाणे



व्हायचे. गावात भजनाचे वातावरण होते. त्या भजनाचे सूर विठ्ठल कानांत साठवायचे. भजन, भारूड, गौळणी ऐकून शेतात कामे करता करता ते आपल्या स्वरांना मोकळी वाट करू लागले. निसर्गदत्त आवाजाची देणगी लाभल्यामुळे चिमुकल्या विठ्ठलची गायकी बहरू लागली.

अहमदपूर तालुक्यात विविध ठिकाणी सांप्रदायिक सप्ताह व्हायचे. त्या सप्ताहात दिंड्या निघायच्या, कीर्तन व्हायचे. अशा या कीर्तनात आजूबाजूच्या गावांतील भजनी मंडळी सहभागी व्हायची. कीर्तनात मुख्य तीन चाली असायच्या. या प्रत्येक चालीचा मान विविध गावांतील भजनी मंडळींना मिळायचा. ज्या गावचे भजनी मंडळ उत्तम आहे त्या गावाला पहिला मान मिळायचा. मधली चाल म्हणण्याचा मान बऱ्यापैकी गाणाऱ्या गावाला मिळायचा तर तिसरी चाल ही सर्व साधारण गाणाऱ्या गावाला दिला जायचा. सुरुवातीला गोताळा गावाला तृतीय क्रमांकाची चाल म्हणण्याचा मान होता. पण विठ्ठल जस जसे गाऊ लागले तसातसा गोताळा गावाला प्रथम चाल म्हणण्याचा मान मिळू लागला. अनेक वेळा दोन गावांतील भजनी मंडळांमध्ये जुगलबंदी व्हायची त्यात गोताळा गावातून चिमुकला विठ्ठल अग्रस्थानी असायचा. तो आपल्या मधुर आवाजाने सर्वांना मंत्रमुग्ध करायचा. अशा प्रकारे बालपणातच विठ्ठलजींची ख्याती पंचक्रोशीत पसरली. अगदी बाल्यावस्थेत संगीताचे शिक्षण न घेता केवळ ईश्वरदत्त निसर्ग लाभलेल्या आवाजाने त्यांनी पंचक्रोशीला मोहून टाकले. अशातच माधवराव कोदळे पाटील यांची कन्या अंगदाबाई यांच्याशी १९७१ साली त्यांचा विवाह झाला.

घरात आध्यात्मिक वातावरण होते. त्यामुळे दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूर येथे पांडुरंगाच्या दर्शनासाठी घरातील कोणी तरी जायचा. साधारणतः १९७१ चा काळ असावा. त्या वेळेस विठ्ठलजी पहिल्यांदाच पंढरपूरला गेले. तेथील सांप्रदायिक व सांगीतिक वातावरण पाहून विठ्ठलजी भारावून गेले. तेथील भजने, पालख्या, दिंडी, पताका, पखावजाचे धीर-गंभीर बोल, टाळांचा मधुर किनकिनाट, वीण्याचा नाद-झंकार पाहून विठ्ठलजी या नादब्रह्मात हरवून गेले. जेव्हा परत निघण्याची वेळ आली तेव्हा काही केल्या त्यांचा पाय तेथून निघेना. शेवटी मनाचा निग्रह केला आणि त्यांनी तेथेच ठाण मांडले.

योगा-योगाने चातुर्मास चालू होता. संपूर्ण चातुर्मासाचे चार महिने ते पंढरपुरातच राहिले. पदातेकाका या नावाने ७० वर्षांचे तेथे एक वारकरी होते. ज्यांच्या सानिध्यात राहून 'हरी जय जय रामकृष्ण हरी' च्या चाली शिकण्यास प्रारंभ केला. त्यांच्यासमवेत ते मठातच

राहू लागले. पोट भरण्यासाठी त्यांना चार घरची माधुकरी मागावी लागायची. पहाटे उठून काकड आरती व्हायची. हे सारे होत असताना ते ताला-सूरात डुंबून जायचे. चार महिन्यात भजनाच्या विविध चाली शिकल्या परंतु विठ्ठलजींची ज्ञानार्जनाची तहान शमत नव्हती. आपण शास्त्रीय संगीत शिकावे, असे त्यांना मनस्वी वाटू लागले. परंतु इच्छा असूनही पंढरपुरात शास्त्रीय संगीताचे धडे घेता आले नाहीत.

त्यांचे पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण गोताळा या त्यांच्या मुळ ग्रामी झाले तर सातवीपर्यंतचे शिक्षण अहमदपूर या तालुक्याच्या गावी झाले. पुढे १६ नंबरचा फॉर्म भरून बर्दापूर येथून दहावीची परीक्षा ते उत्तीर्ण झाले.

*   **गुरू आणि शिक्षण :**

विठ्ठलरावजी जगताप हे पंढरपूरला चार महिने राहून परत गावाकडे परतले. त्यामुळे घरातील मंडळीचा जीव भांड्यात पडला. सुरुवातीला सर्वजण त्यांना रागावू लागले पण काहीही झाले तरी आपले मूल आहे म्हणून सर्वांनी त्यांना आपलेसे केले. चार महिने पंढरपुरात राहूनही त्यांच्या गायनात म्हणावी तशी प्रगती झाली नव्हती. म्हणून ते नाराज होते. सातत्याचे सप्ताहाचे कार्यक्रम चालूच होते. अशातच एके दिवशी अजनी येथे श्री. उत्तमराव जायभाये यांची भेट झाली. ते पं. कोंडिबा बोळंगे यांचे शिष्य होते. अजनीच्या कार्यक्रमात विठ्ठलजींनी परमेश्वरी राग सादर केला. त्यांना हार्मोनियमजी साथ जायभाये यांनीच केली. विठ्ठलजींचे गाणे ऐकून जायभाये प्रभावित झाले. त्यांनी विठ्ठलजींना आपल्या समवेत येण्यासाठी विचारणा केली. त्यावर ते तयार झाले. सुरुवातीला आठ दिवस जायभाये यांचाच त्यांना सत्संग लाभला. त्यानंतर पुन्हा दोन महिने जायभाये यांच्यासमवेत भजनाच्या कार्यक्रमांसाठी भ्रमंती सुरू झाली.

एखादा चांगला गुरू लाभावा, असे विठ्ठलजींना वाटू लागले. त्या काळात पं. बोळंगे गुरुजींचा सर्वत्र नावलौकिक होता. श्री. जायभाये हे त्यांचे शिष्य होते. त्यांनी विठ्ठलजींना बोळंगे गुरुजींकडे येशील का? अशी विचारणा केली. त्यावर त्यांना घरातील वडीलधाऱ्या मंडळींची अनुमती घेतली व ते गुरूभेटीसाठी निघाले! योगा-योगाने शिरूर ताजबंद येथेच पं. बोळंगे गुरुजींची व त्यांची भेट झाली. त्या काळी बोळंगे गुरुजी मुरूड येथे संगीत विद्यालय चालवायचे. विठ्ठलजींचा सुरेल व संस्कारक्षम आवाज पाहून बोळंगे गुरुजी प्रसन्न झाले तर आपल्याला एक महान गुरू मिळाला याचा आनंद विठ्ठलजींच्या चेहऱ्यावर ओसांडून वहात होता. मग सुरू झाली संगीत आराधना. सुरुवातीला सहा महिने अलंकार घोटण्यातच



गेले. त्यानंतर त्यांनी यमन रागातील 'तोरी रे बासुरी जादू भरी' ही बंदिश शिकविण्यास सुरुवात केली. त्या वेळी विठ्ठलजींचे वय २३ ते २५ वर्षांचे असावे.

पुढे चालून पं. बोळंगे गुरुजींनी चाकूर येथे सूरगंगा संगीत विद्यालयाची सुरूवात केली. याच विद्यालयात अ. भा. गांधर्व मंडळाचे परीक्षा केंद्र सुरू झाले. याचा लाभ विठ्ठलजींनाही झाला. पं. बोळंगे गुरुजींकडून त्यांनी तब्बल आठ वर्षे शास्त्रोक्त पद्धतीने गायनाची विधिवत तालीम घेतली. पुढे १९७९ ते १९८५ या काळात संगीत विशारदपर्यंतचे शिक्षण घेतले व १९८५ साली संगीत विशारद ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर मात्र १९९९ साली त्यांनी स्वयंअध्ययनावर गायनातील संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली.

पं. बोळंगे गुरुजी जिथे जिथे जायचे तिथे तिथे विठ्ठलरावजी जायचे. बोळंगे गुरुजी सासवड येथे संगीत विद्यालय चालवायचे तेव्हा पांडुरंग मुखडे यांच्या समवेत पुण्याला जाणे-येणे व्हायचे. यातूनच पं. अपासाहेब जळगावकर यांचा परिचय झाला. आप्पांचा विठ्ठलराव यांच्यावर जीव जडला. ते दोघेही पं. भीमसेन जोशी यांच्या घरी जायचे. एवढ्या थोर व्यक्तीच्या दर्शनाने विठ्ठलजी आनंदित व्हायचे. पं. आप्पा जळगावकरांच्या हार्मोनियम वादनाचा प्रभाव विठ्ठलजींवर पडला. त्यामुळे विठ्ठलजी हार्मोनियमकडे आकर्षित झाले. हार्मोनियम वाजविण्याची पद्धत, भात्यावरील नियंत्रण, अंगुलीनैपुण्य इ. बरोबरच राग, लयकारी याचेही ज्ञान त्यांनी आप्पांकडून आत्मसात केले. या काळात आप्पा त्यांना अनेक मैफीलींसाठी सोबत घेऊन जायचे. त्यामुळे त्यांचे वादन विठ्ठलजींना आधिक जवळून पाहता आले.

अशा प्रकारे पं. विठ्ठल जगताप यांना पं. बोळंगे गुरुजी व पं. आप्पा जळगावकर यांचा परीसस्पर्श झाला व त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले. या थोर गुरूंकडून मिळालेला संगीत प्रसाद त्यांनी आपल्यापुरता मर्यादित न ठेवता समस्त लातूरकरांत वाटला. त्यामुळे जिल्ह्याचे सांगीतिक विश्व संपन्न व्हायला मदत झाली.

*   **अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार :**

अगदी विद्यार्थिदशेपासूनच पं. विठ्ठलरावजी जगताप यांनी आपल्या गायन व वादनाद्वारे संगीताचा प्रचार व प्रसार करण्यास सुरुवात केली. यासंदर्भात ज्येष्ठ संगीत रसिक प्रा. के. एस. वारद सांगतात, "भीमाशंकर आप्पांनी गुरुवार क्लबची स्थापना केली. भोई गल्लीत पं. बोळंगे गुरुजी संगीत विद्यालयातून विद्यार्थ्यांना संगीत शिकवायचे. तेव्हा विठ्ठल जगताप हे लहान वयातच भजनात अग्रेसर असायचे. भजनांना अभिजात संगीताचे

रूप देऊन ते उत्तम भजन सादर करायचे." बोळंगे गुरुजी जेथे जेथे जात तेथे विठ्ठलरावजी आपल्या शास्त्रीय गायनाने सर्वांना मंत्रमुग्ध करायचे.

१९६८ साली जय जगदंबा नवरात्र महोत्सव येथील गंजगोलाईत सुरू झाला. नऊ दिवस चालणाऱ्या संगीत यज्ञात अनेक कलावंत हजेरी लावू लागले. विठ्ठलजी हे बोळंगे गुरुजींचे शिष्य असल्यामुळे गुरूंच्या समवेत नवरात्र महोत्सवातून विद्यार्थिदशेतच कला सादर करू लागले.

१९८२ साली लातूर येथे पाचवे मराठवाडा संगीत संमेलन झाले. यात अनेक आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलावंतांनी हजेरी लावली होती. या संगीत संमेलानात त्यांना पं. रामदास अनवले यांच्याबरोबर हार्मोनियमची साथ करण्याचे भाग्य लाभले. एवढ्या मोठ्या संगीत संमेलनात सहभागी होण्याची ही त्यांची पहिलीच संधी होती.

संगीताची तालीम घेतल्यानंतर संगीताचा प्रचार व प्रसार करावा असे त्यांना वाटू लागले. व्यंकटेश विद्यालयाचे संस्थाचालक श्री. पटणे गुरुजी होते. पं. बोळंगे गुरुजींनी श्री. पटणे गुरुजींना विठ्ठलजींचा परिचय करून दिला आणि आपल्या शाळेत विठ्ठलला नोकरी द्यावी अशी विनंती केली. त्यांनी विठ्ठलजींना रूजू करून घेतले. अशातच प्राथमिक शाळेच्या संगीत स्पर्धा तोंडावर आल्या होत्या. पटणे गुरुजी अत्यंत कडक शिस्तीचे होते ते विठ्ठलरावांना म्हणाले, "हे बघ विठ्ठल, उद्या टाऊन हॉलवर स्पर्धा आहेत. उद्या तू शाळेचा संघ घेऊन जा. जर स्पर्धेत आपल्या शाळेचा नंबर आला तरच तुझी नोकरी कायम होईल, अन्यथा टाऊन हॉलवरूनच तू तुझ्या घरी जायचे."

हे कठीण आव्हान विठ्ठलरावांनी स्वीकारले. ३० विद्यार्थ्यांचे दांडी नृत्य, एक सुरेल सरस्वती स्तवन व राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेले देशभक्तीपर समूहगीत सादर केले आणि पाहता पाहता परिश्रमाची पराकाष्टा करून सादर केलेल्या विठ्ठलजींच्या संघास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तेव्हा त्यांचा आनंद गगणात मावेनासा झाला. पटने गुरुजीही खुश झाले. अशा प्रकारे १९८५ साली त्यांची व्यंकटेश विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून नोकरी कायम झाली. यातून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देऊन संगीताचा प्रचार व प्रसार केला.

त्यांच्या नौकरीसंदर्भात 'दै. पुण्यानगरी' मध्ये एक किस्सा सांगितला आहे, "अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये केवळ आपणास चांगले भजन करता यावे म्हणून संगीत शिक्षणास सुरुवात केली. त्यांच्या परिश्रमातून लातूरसारख्या ठिकाणी संगीत शिक्षकाची नोकरी मिळाली.



यावर त्यांच्या घरच्यांचा विश्वास बसला नाही. म्हणून त्यांचे मोठे बंधू संजेपराव जगताप यांनी सर्व शहानिशा केली तेव्हा कोठे त्यांचा विश्वास बसला. कारण वयाची २० ते २५ वर्षे ग्रामीण जीवन जगलेल्या माणसाला संगीत शिकून नोकरी लागणार हा विचारसुद्धा कोणाच्या मनात आला नाही."

पुढे चालून जगदंबा नवरात्र महोत्सवाच्या आयोजन समितीमध्ये विठ्ठलजींचा समावेश झाला. याच स्वरमंचावरून त्यांनी प्रा. वारद यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो गायक वादकांना पाचारण केले. मागील ४६ वर्षे अव्याहतपणे चालणाऱ्या या महोत्सवातून त्यांनी अनेक वेळा स्वतंत्र गायन सादर केले. यासंदर्भात एका वृत्तपत्रात लिहिले आहे की, "कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पं. विठ्ठलराव जगताप यांनी राग कलावंतामध्ये 'बन बन आयी' ही तीन तालातील बंदीश गायिली. त्यानंतर राग मालकंसमधील 'सूजन गुरू गाऊ' व त्यातील दृत तराणा व 'सावरे आ जैय्यो' ही ठुमरी सादर केली. त्यानंतर 'सदा माझे डोळे', 'रूपे सुंदर सावळा गे माई' या स्वत: स्वरबद्ध केलेले अभंग व गवळणी पेश केल्या. कार्यक्रमाची सांगता त्यांनी 'माई सावरे रंगराची' या भैरवीने केली."

याच व्यासपीठावरून त्यांनी पं. प्रभाकर कारेकर, आशा खाडीलकर, देवकी पंडीत, पं. विकास कशाळकर, पं. श्रीकांत देशपांडे, पं. शौनक अभिषेकी, पं. रघुनंदन पणशीकर, पं. शिवदास देगलूरकर अशा अनेक कलावंतांना समर्थपणे हार्मोनियमची साथ केली. याबरोबरच महाराष्ट्रातील पंढरपूर, इंदापूर, उन्केश्वर, माहूर, औरंगाबाद, परळी, उमरगा अशा विविध शहरातून त्यांनी आपले गायन-वादन पेश केले. पं. नाथराव नेरलकर, अर्चना कान्हेरे, पं. गणपती भट, पं. शाम गुंजकर, पं. कैवल्यकुमार गुरव अशा थोर कलावंतांनासुद्धा त्यांनी हार्मोनियमची साथ संगत करून त्यांचे गायन रंगविले आहे.

पं. विठ्ठलराव जगताप यांचे गुरू पं. बोळंगे गुरुजी संपूर्ण महाराष्ट्रात भ्रमण करायचे. महाराष्ट्रातील अनेक शहरातून त्यानी संगीत विद्यालयांची सुरुवात केली. पुणे जिल्ह्यातील सासवड येथे त्यांनी संगीत विद्यालय सुरू केले. सोबत पं. विठ्ठलराव हेही होते. सासवड येथे नाना महागावकर हे सोण्याचे सुप्रसिद्ध व्यापारी होते. त्यांना संगीताची आवड होती त्यांच्या घरीच बोळंगे गुरुजींनी संगीत विद्यालय सुरू केले. परंतु बोळंगे गुरुजी अनेक संगीत विद्यालये चालवित असल्यामुळे शिष्य विठ्ठलरावांना सासवड येथील संगीत विद्यालयात अध्यापनाचे काम सोपविले. तेव्हा पं. विठ्ठलरावांनी त्या संगीत विद्यालयातून अध्यापन करण्याचे काम केले. साधारणता दोन वर्षे त्यांनी सासवड येथे राहून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

भोई गल्लीत गुरुवार क्लब चालायचा. प्रत्येक गुरुवारी भजन व्हायचे. यात श्री. बाबुराव चव्हाण, गंगाधर आप्पा उटगे, वसंतराव पुसकर, आप्पा मेनकुदळे, अडप्पा हमीने, भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी व प्रा. के. एस. वारद हे त्या क्लबचे सदस्य होते. पुढे चालून १९५६ साली ह्या क्लबची रजिस्टर्ड नोंदणी झाली. भीमाशंकरआप्पा हे अध्यक्ष तर प्रा. वारद हे सचीव झाले. प्रा. वारद हे सुशिक्षित होते. ते संगीताचे उत्तम कानसेन होते. गुरुवार क्लबच्या माध्यमातून अभिजात संगीताचे शिक्षण द्यावे असे त्यांना वाटले व गुरुवार क्लबचे नाव बदलून गुरुवार संगीत विद्यालय असे नामकरण झाले. सुरुवातीला या विद्यालयातून प्रल्हाद अष्टेकर हे प्रधानआचार्य म्हणून आले. त्यांनतर श्री. करंदीकर, श्री. दीपक लिंगे, चिगरी दांपत्य व पं. बोळंगे गुरुजींनी येथून अध्यापनाचे कार्य केले. पुढे पं. विठ्ठलराव जगताप या संगीत विद्यालयाचे प्रधानाचार्य झाले."

आज गुरुवार क्लबच्या वास्तूमध्ये प्रा. के. एस. वारद, श्री. विठ्ठलराव जगताप आदींच्या कुशल नेतृत्त्वाखाली व पंचाक्षरी आप्पांच्या प्रेरणेने गांधर्व महाविद्यालयाशी संलग्न असलेले एक संगीत विद्यालय चालविले जाते. ह्या संगीत विद्यालयातून दर वर्षी ५० ते ६० विद्यार्थी संगीत साधना करतात. अशा प्रकारे आजही ते गुरुवार संगीत विद्यालयाचे प्रधानाचार्य म्हणून कार्यरत आहेत. अगदी सुरुवातीला या महाविद्यालयाची प्रयाग संगीत समितीशी संलग्नता होती. पाच वर्षांनंतर १९८६ साली या संस्थेचे संलग्नीकरण रद्द करून अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबईच्या परीक्षा केंद्राची सुरुवात केली. सध्या हे विद्यालय गंजगोलाईतील श्री. जगदंबा मंदिराच्या पहिल्या मजल्यावर सुरू आहे. येथून शास्त्रीय गायन, शास्त्रीय तबला व पखावज वादन आणि हार्मोनियम वादनाचे शिक्षण दिले जाते. प्रारंभिक ते संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण येथून ते देतात. या विद्यालयाची दुसरी शाखा केशवनगर, लातूर येथे आहे. या दोन्ही संगीत विद्यालयातून त्यांनी आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना अभिजात संगीताचे शिक्षण दिले आहे.

त्यांचा शिष्य व सुप्रसिद्ध गायक रोहीत राऊत त्यांच्याविषयी म्हणतो, "वयाच्या पाचव्या वर्षापासून मी पं. विठ्ठलरावजी जगताप यांच्याकडे गाणे शिकायला सुरुवात केली. त्यांनी अगदी सुरुवातीपासून काळजीपूर्वक शास्त्रीय संगीताचे शिक्षण दिल्यामुळेच मी आज कोणत्याही प्रकारचे गाणे गाऊ शकतो. अगदी सुरुवातीला मी जेव्हा त्यांच्याकडे जाऊ लागलो. तेव्हा काही वेळा मला जर काही जमल नाही तर ते खूप वेळा समजावून सांगायचे. पण ते कधीही रागावले नाहीत. मग हळूहळू मला त्यांच्या सल्ल्यानुसार गाणे जमू लागले. ते नेहमी सांगतात की, 'रियाजाला भरपूर वेळ द्या, मोकळेपणाणे गा, डोक्यात



हवा जाऊ द्यायची नाही, तणाव न घेता स्वर मोकळेपणाणे लावायचे. म्हणजेच तू सगळ्या प्रकारची गाणी गाऊ शकशील.' आमचे सर कधीच कमर्शियल वागत नाहीत. ते नेहमी म्हणतात, "मी शाळेत नोकरी करतो. त्यामुळे माझ्या कुटुंबाचा खर्च चालविण्यापुरता पगार मला मिळतो. पण विद्यार्थी मात्र मनापासून शिकणारे हवेत." असे उत्तम गुरू मला मिळाले हे मी माझे भाग्यच समजतो."

त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीबद्दल वैभव माने म्हणतात, "गुरुजींचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांना ते विनामूल्य शिकवितात. एवढेच नाही तर वेळ प्रसंगी विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्कसुद्धा भरतात. गुरुजींची शिकविण्याची पद्धत ही खूप सुंदर आहे. समोरचा विद्यार्थी किती ही मोठा गायक असो किंवा लहान असो. गुरुजी समोरच्या विद्यार्थ्यास खूप आत्मीयतेने शिकवितात. गुरुजींची तानपुरा लावण्याची पद्धत मला खूप आवडते. ज्यामुळे अगदी नवीन संगीत शिकणारा विद्यार्थीसुद्धा त्या तानपुऱ्याच्या स्वरामध्ये रममाण होतो. ते विद्यार्थ्यांच्या सुरांचा पाया इतका भक्कम करतात की तो निश्चितच पुढे घडतो. त्यांच्या या शिकविण्याच्या पद्धतीमुळे त्यांचे अनेक शिष्य महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये आपली गायन कला प्रस्तूत करीत आहेत."

अशा प्रकारे अर्थार्जनाचा विचार न करता गुरुवार संगीत महाविद्यालयातून भावी पिढीस अभिजात संगीताचे धडे दिले. त्यामुळे त्यांचे अनेक शिष्य तयार झाले. "संगीत आणि परमार्थ या एका नाण्याच्या दोन बाजू असून शास्त्रीय संगीत आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संगीत कला ही अलौकिक शक्ती आहे. संगीतात यश मिळवायचे असेल तर आई-वडील व गुरूंचा आशीर्वाद घेतला पाहिजे. संगीत शिकत असताना मीपणा कधीच येऊ नये", असा सल्ला पं. विठ्ठल जगताप ते आपल्या शिष्यांना नेहमी देतात.

गुरुवार संगीत महाविद्यालयाच्या वतीने परीक्षांनुसार पाठ्यक्रम तर शिकविला जातोच; परंतु पं. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांगीतिक कार्यशाळा, शिबिरे घेतली जातात. पं. वि. दि. पलुस्कर, पं. वि. ना. भातखडे यांची पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा व नवरात्रांमध्ये संगीत संमेलनाचे आयोजन केले जाते. यातून अनेक शिष्यांना कला सादर करण्याची संधी मिळते. थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. जगताप यांनी स्वरानंद येथून सुरू केलेले अध्यापनाचे कार्य आजही गुरुवार संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून अविरत चालू आहे. ज्यामुळे लातूर जिल्ह्यातील अनेक संगीत साधकांना संगीताचे ज्ञानामृत प्यायला मिळाले.

## सुयोग्य शिष्यांची निर्मिती :

पं. विठ्ठलराव जगताप यांनी आजपर्यंत शेकडो शिष्य तयार केले असून ते शिष्य अभिजात संगीताच्या विकासात व प्रचारात मोलाचे योगदान देत आहेत. त्यांच्या शिष्यांवर सहज नजर फिरविली असता आपल्या लक्षात येईल की, हे सर्व शिष्य अत्यंत यशस्वी कलावंत व गुरू म्हणून कार्यरत आहेत.

*** सुरमणि भुजंग मुर्के-झरीकर :**

यांचा जन्म १५ जून १९७० रोजी झरी या छोट्याशा गावात झाला. घरात अध्यात्मिक वातावरण होते. आई व वडील गायन करायचे. तोच सांगीतिक वारसा भुजंग यांना मिळाला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी जगताप सरांच्या गुरुवार संगीत विद्यालयात प्रवेश घेतला. १९९७ साली त्यांनी संगीत विशारद तर १९९८ साली संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली. पुढे पं. के. एन. बोळंगे गुरुजी, पं. रामदास अनवले गुरुजी व पं. शाम गुंजकर अशा दिग्गजांकडून संगीताची तालीम घेतली. त्या काळात त्यांनी अष्टविनायक प्रतिष्ठानच्या राज्य स्तरीय संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. नांदेड येथील अभिनव गितांजली या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. १९९८ साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या केंद्रीय युवकमहोत्सवात सुगम गायन, शास्त्रीय गायनात सुवर्ण पदक तर भजन स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले. पुढे पश्चिम विभागीय युवकमहोत्सव ग्वाल्हेर येथेही यशस्वी सादरीकरण केले. २००० साली ते बीड जिल्ह्यातील अपेगाव येथे जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून रूजू झाले.

त्यांनी ४४ वे 'कल के कलाकार' संगीत संमेलनात हजेरी लावली. याबरोबरच चैत्रपल्लवी संगीतोत्सव, सूरश्री प्रतिष्ठान, आवर्तन मासिक संगीत सभा येथे शास्त्रीय गायन सादर केले. मराठवाड्यातील अनेक शहरातून त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. दि. २८ मार्च २००० साली त्यांनी आकाशवाणी उस्मानाबाद केंद्रावरून 'गोरख कल्याण' हा राग सादर केला. तर दि. ३१ डिसेंबर २००१ रोजी चंद्रपूर आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे शास्त्रीय गायन प्रसारित झाले.

१९९८ साली त्यांनी 'स्वराविष्कार' संगीत विद्यालयाची सुरुवात केली. ज्यातून ते अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. या विद्यालयातून रामेश्वर गरड, दयानंद शितोळे, फुलचंद कावळे, हरीपंडित जाधव, देविदास कुसंगे, दिलीप सिसोदिया आदी शिष्य घडले. त्यांची कन्या कु. किशोरी ही उत्तम गात असून तिने २००८ साली सह्याद्री



वाहिनीवरून 'वारे वा' या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

त्यांच्या सांगीतिक कार्याबद्दल २००५ साली सूर सिंगार संसदेने 'सूरमणि' ही मानाची पदवी देऊन त्यांचा गौरव केला तसेच श्री. उत्तरेश्वर गुरुमाऊली संगीत विद्यालय, परळी, तपोवन, 'सुभाष देशमुख स्मृति संगीत रत्न २०१४' हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. थोडक्यात त्यांनी पं. विठ्ठलराव जगताप यांच्याकडून जे ज्ञान प्राप्त केले ते पुढील पिढीकडे अत्यंत योग्यरितीने सुपूर्द करीत आहेत.

*** शिवकुमार गुळवे :**

यांनी गायनातील संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केली आहे. सध्या ते महेश विद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. विविध संगीत संमेलनांतून त्यांनी गायन केले असून अभिजात संगीताचे धडे विद्यार्थ्यांना देऊन संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

*** अर्चना सुरकुटे :**

या संगीत विशारद असून सध्या पुणे येथे महानगरपालिकेच्या शाळेत संगीत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थिदशेपासूनच त्यांनी विविध सांगीतिक स्पर्धांत यश संपादन केले आहे. पुणे येथे शालेय नोकरी सोबतच संगीत विद्यालयातून शिष्य घडविण्याचे कार्य करीत आहेत.

*** नागेश आडगावकर :**

यांचा जन्म लातूर येथे १९८९ साली झाला. त्यांचे संगीत विशारदपर्यंतचे शिक्षण पं. विठ्ठलराव जगताप यांच्याकडे झाले. त्यानंतर पुणे येथील ललीत कला केंद्रातून पं. डॉ. राजेंद्र कंदलगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली एम. ए. ही पदवी प्राप्त केली. सध्या ते कोलकत्ता येथे गुरुकुलातून रामपूर सहसवान घराण्याची तालीम घेत आहेत.

महाविद्यालयीन शिक्षण चालू असताना त्यांनी अनेक युवकमहोत्सवात यश संपादन केले. २००९ साली नाशिक येथे झालेल्या प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. ऑल इंडिया रेडिओच्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविले. २०१२ साली कोल्हापूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय युवकमहोत्सवात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. २०१४ साली कुरूक्षेत्र येथे झालेल्या राष्ट्रीय युवकमहोत्सवात प्रथम क्रमांक पटकावला. २००६ साली सिलीगुडी (दार्जिलिंग) येथील दुर्गा उत्सवात यशस्वी गायन सादर केले. २००६ साली अष्टविनायक प्रतिष्ठानद्वारा आयोजित राज्य स्तरीय संगीत स्पर्धा कार्यक्रमात

त्यांना गायन करण्यासाठी निमंत्रित केले होते. २००७ साली शंकर दरबार, नांदेड येथे गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

२००७ साली त्यांना अगरतला येथे एका संगीत विद्यालयाच्या उद्घाटन सोहळयात गायन करण्याची संधी मिळाली. २००९ साली शखरी बेगम ट्रस्टच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित संगीत समारंभात त्यांना प्रमुख कलावंत म्हणून पाचारण करण्यात आले. २०११ साली यवतमाळ येथील ललित कला अकादमीत त्यांचा शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला. २०१२ साली पुण्याच्या 'संगीतमैत्र' व 'स्वरायण' या संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात गायन करण्याची संधी मिळाली. २०१२ साली गरवारे कॉलेजच्या स्वरांजली ट्रस्टच्या मैफीलीत त्यांनी गायन केले. २०१३ साली पुणे येथे चिमोरे गुरुजी स्मृति संगीत संमेलनात गायन केले, २०१४ साली लातूर येथील सप्तसूर प्रतिष्ठान व परभणी येथील आलाप प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित संगीत समारोहात त्यांनी गायन केले.

अल्पवयातच त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र व भारतात अभिजात गायन कलेचे प्रदर्शन करून वाहवा मिळविली. थोर कथ्थक नर्तक पं. बिरजू महाराज यांच्यासमवेत कोलवान येथे आयोजित कार्यशाळेत २०१२ साली त्यांनी गायन केले. त्यांचा २०१२ साली मुंबई येथे 'पं. पलुस्कर पुरस्कार' देऊन गौरव केला. २०१३ साली पं. सुरेश तळवलकर यांच्यासमवेत गायन करण्याची संधी मिळाली. दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवरून M२G२ या कार्यक्रमात सहभागी होता आले. ऑल इंडिया रेडिओची बी श्रेणी प्राप्त केली आहे. २०१४ साली दिल्ली येथे गांधी हिंदुस्थानी साहित्य सभेच्या वतीने 'संगीतरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित केले. याचबरोबर त्यांनी गुरुवार संगीत महाविद्यालयातून लातूर येथे चार वर्षे विद्यार्थ्यांना अभिजात संगीताचे प्रशिक्षण दिले. तर शाखरी बेगम ट्रस्ट, कोलकत्ता येथे त्यांनी विद्यार्थ्यांना १ वर्ष अभिजात संगीताचे धडे दिले.

अशा प्रकारे लातूर जिल्ह्यातील पं. विठ्ठलरावजी जगताप यांच्या या शिष्याने अल्पावधीतच गरूडझेप घेतली व अभिजात संगीत परंपरा अबाधित ठेवली असे म्हणता येईल.

*** रोहित राऊत :**

रोहितचा जन्म १८ नोव्हेंबर १९९५ साली अकोला येथे झाला. त्याचे वडील मुळचे नागपूरचे. रोहीत चार वर्षांचा असतानाच त्याच्या डोक्यावरील आईचे छत्र हरवले. 'सा रे ग म प' च्या महा अंतिम फेरीत पोहोचलेल्या प्रत्येक स्पर्धकाला कसली ना कसली सांगीतिक



पार्श्वभूमी होती; परंतु केवळ रोहीत हा एकमेव स्पर्धक होता की ज्याच्या घरता संगीताचा कसलाही गंध नव्हता. १९९३ साली पासून त्याचे वडील श्यामराव हे कामानिमित्त लातुरात रहात असत. रोहीतच्या जन्मानंतर आणि त्याच्या आईच्या मृत्यूनंतर रोहीतच्या शिक्षणाच्या दृष्टीने ते लातुरात स्थायिक झाले. "बाबा रात्री उशिरा घरी यायचे आणि हा टी.व्ही. वर कार्यक्रम पहात बसायचा. विशेषता पं. भीमसेन जोशी यांचे कार्यक्रम पाहून तो त्यांची नक्कल करण्याचा प्रयत्न करायचा. त्याच्या बाबांनी हे पाहिले आणि लेबर कॉलनी मध्ये राहणाऱ्या सौ. जगतकर यांच्याकडे त्यांनी संगीत अध्यापनासाठी त्याला पाठविले. त्याच्या संगीताचा पाया त्यांनी पक्का केला. त्यानंतर गंजगोलाईत असणाऱ्या गुरुवार संगीत महाविद्यालयात पं. विठ्ठलराव जगताप यांच्याकडे त्याला संगीताचे रीतसर शिक्षण घेण्यासाठी पाठविले. तिथे त्याला भाऊ-बहीण व मित्रही भेटले."

पुढे तो 'सा रे ग म' लिटील चॅम्प या इंटरनॅशनल (हिंदी) स्पर्धेत उतरला. या स्पर्धेत जगभरातील १.५ लाख स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. यात त्याने पहिल्या सात स्पर्धकांपर्यंत यशाची भरारी घेतली. पुढे २००८ ते २००९ मध्ये झी वाहिणीवरील मराठी 'सा रे ग म प' या स्पर्धेत तो उतरला. पाहता पाहता त्याने आपल्या मधुर आवाजाची छाप संपूर्ण महाराष्ट्रावर टाकली व अंतिम पाच स्पर्धकांत त्याचा क्रमांक आला. या पाच स्पर्धकांना 'पंचरत्न' हा पुरस्कार देऊन सन्मानित केले. 'सा रे ग म' लिटील चॅम्पमध्ये यश मिळाल्या नंतर रोहीत राऊत लातूरमध्ये दाखल झाला. त्याचे स्वागत व कौतुक करण्यासाठी गुरुवार संगीत महाविद्यालय, देशिकेंद्र विद्यालय आणि त्याच्या चाहत्यांनी रविवारी सकाळी ९.०० वा. शहरातून मिरवणूक काढली. या वेळी विविध संघटना व प्रतिष्ठीत नागरिकांनी त्याचा भव्य सत्कार केला.

आज तो विविध दूरदर्शनच्या विविध मालिकांतून व चित्रपटातून पार्श्वगायन करून आपला एक वेगळा ठसा उमटवत आहेत. त्याने २०१० ते २०१२ या कालावधीत ०३ वेळा विदेशी दौरा केला. संत गजानन महाराज व साईबाबा यांच्यावरील त्याचे दोन स्वतंत्र अल्बम प्रकाशित झाले आहे. त्याला चित्रपटात गाण्याची पहिली संधी मिळाली ही दुनियादारी या चित्रपटाद्वारे. त्यानंतर प्यारवाली लव्हस्टोरी, राखनदार, वजनदार, मोरूची मावशी याही चित्रपटात त्याने पार्श्व गायन केले आहे. कुंथ्रू, ३५% काटावर, वाजवा रे वाजवा, क्राईम टाईम या अगामी चित्रपटात तो गाणार आहे. पसंत आहे मुलगी या मालिकेतून संगीत अशोक पत्की यांच्या दिग्दर्शनाखाली त्यांने पार्श्व गायन केले. तुझात जीव गुंतला याही मालिकेतून त्याने पार्श्व गायन केले आहे. पार्श्व गायनाबरोबरच तो उत्तम संगीत

दिग्दर्शक म्हणून ही तो पुढे येत आहे. जय गणेश या संकल्पनेवरील एक गीत व एक अंगाई गीत त्याने स्वत: संगीत निर्देशीत करून आर्या आंबेकरकडून गाऊन घेतले आहे. गेस्ट नावाने त्याने स्वतःचा बँड तयार केला आहे. हार्ड रॉक स्टाईल पद्धतीत तो स्वत: गाणे तयार करून सादर करीत असतो. सलील कुलकर्णीच्या गणेश वंदनेतही त्याने गणेश वंदना गायली आहे. विठ्ठला हे गीत त्याने स्वत: संगीत निर्देशित करून मंगेश बोरगावकरांकडून गाऊन घेतले आहे. त्याने आत्तापर्यंत १०० चित्रपटात व ७ दूरदर्शनच्या मालिकांमधून पार्श्व गायन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ५२ व्या मराठी चित्रपट पुरस्कारात त्याने गायलेल्या 'कँडल मार्च' या चित्रपटासाठी महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट पार्श्व गायकाचा पुरस्कार त्याने पटकाविला. विशेष म्हणजे या स्पर्धेत त्याच्या बरोबरीने अजय गोगावले व आदर्श शिंदे या सारख्या दिग्गज गायकांचा समावेश होता. त्याच्या या यशात पं. विठ्ठलरावजी जगताप, शंकर जगताप व वडील श्यामराव यांचे योगदान आहे. जेव्हा रोहीतांची आर्थिक परिस्थिती ठिक नव्हती तेव्हा उद्योजक राजकुमार तापडिया यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांनी स्पर्धेला जाण्यासाठी तिकिटाचा खर्च केला. त्याला उत्तम कपडे घेऊन दिले. अशा प्रकारे ते त्याचे आश्रयदातेच होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

थोडक्यात लातूरच्या या कलावंताने पं. विठ्ठलराव जगताप यांच्याबरोबरच लातूरची शान मान उंचावली.

### * शंकर जगताप :

गायनातील विशारदपर्यंतचे शिक्षण वडील पं. विठ्ठलरावजी यांच्याकडून घेतले. तर पं. शांतारामजी चिगरी यांच्याकडून तबलावादनाचे संगीत अलंकारपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. सध्या श्री. व्यंकटेश विद्यालय, लातूर येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. याबरोबरच गुरुवार संगीत महाविद्यालयातून गेल्या अनेक वर्षांपासून तबलावादनाचे धडे देत आहेत. महाविद्यालयीन जीवनात तबलावादनाचे सुवर्णपदक पटकावले आहे. राष्ट्रीय युवकमहोत्सवातूनसुद्धा त्यांनी यश संपादन केले आहे. त्यांनी अनेक कलावंतांना तबल्याची साथसंगत केली आहे. जय जगदंबा नवरात्र महोत्सवात संयोजक म्हणूनसुद्धा ते कार्यरत आहेत.

### * प्रा. वैभव गोविंदराव माने :

निलंगा तालुक्यातील मदनसुरी या छोट्याशा गावात जन्माला आलेल्या प्रा. वैभव माने यांच्या घरामध्ये सांप्रदायिक वातावरण होते. पुढे १२ वी झाल्यानंतर ते लातूर येथे



आले त्यांनी पं. विठ्ठलराव जगताप यांच्या गुरुवार संगीत महाविद्यालय येथे प्रवेश घेतला. त्यांनी संगीत विशारद ही पदवी प्राप्त केली. त्याचबरोबर दयानंद कला महाविद्यायातून एम. ए. संगीतपर्यंतचे शिक्षण घेतले. महाविद्यालयीन जीवनात असाताना त्यांनी अनेक पारितोषके प्राप्त केली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या युवकमहोत्सवामध्ये सलग पाच वर्ष त्यांनी विविध कला प्रकारात सहभाग नोंदविला. तसेच अनेक सुवर्ण, रौप्य व कास्य पदक पटकावले. सांगीतिक स्पर्धांबरोबरच एकांकिका, प्रहसन व लोकनृत्य अशा विविध प्रकारातून त्यांनी आपला ठसा उमटविला. राज्य स्तरीय इंद्रधनुष्य आंतर विद्यापीठ युवकमहोत्सव, महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय युवा महोत्सव, महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित सांस्कृतिक स्पर्धांमध्येसुद्धा त्यांनी यश संपादन केले. दी आर्ट ऑफ लिव्हींग यांच्या वतीने आयोजित दिल्ली येथील वर्ल्ड कल्चरल फेस्टीव्हलमध्येसुद्धा त्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला. द मॅझिकल व्हाईस ऑफ इंडिया या राष्ट्रीय पातळीवरील झालेल्या गीत गायन स्पर्धेत त्यांची भारतातून पहिल्या १० स्पर्धकांमध्ये निवड झालेली होती. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवकमहोत्सव, अजमेर (राजस्थान) व कोल्हापूर याही स्पर्धेत त्यांनी सांगीतिक स्पर्धेत उज्ज्वल यश संपादन केले. सध्या ते राजर्षि शाहू महाविद्यालयात संगीत विषयाचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अशा प्रकारे पं. विठ्ठलराव जगताप यांचा सांगीतिक वारसा ते पुढे यशस्वीपणे चालवीत आहेत.

### इतर शिष्य :

सतिश स्वामी, बाळासाहेब भदाडे, धनंजय अपसिंगेकर, स्वप्नाली पुणेकर, प्रदीप जगताप, किरण कदम, शिवगंगा जगताप, प्रियंका बेंबडे, रवि किडीले दमयंती शिंदे (पुणे), विक्रम कोतवाड (मुरूड), सुधीर काळे, स्वरूप काळे, ईश्वर घोरपडे (पुणे), प्रा. संतोष गायकवाड, अभंग गायकवाड, पुरुषोत्तम नाथबुवा, अश्विन वाघमारे, विकास काळे, गणेश सुतार, मयुर येणगे, कालिंदा कुसंगे (बोळंगे), अनुराधा महिंद्रकर (तुळजापूर), स्वाती फुंदे (टेंभुर्णी), यशोदा गरड (जळगाव), आशीष शिंदे, कु. मयुरी बिरादार इ. शिष्य अनेक ठिकाणी गायक व संगीत शिक्षक म्हणून कार्यरत असून ते आपापल्या परीने अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

पं. विठ्ठलरावजी जगताप यांच्या शिष्यांनी लातूर, मराठवाडा, महाराष्ट्रच नव्हे तर विदेशातही अभिजात संगीताचा प्रचार करून भारतीय संगीताच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे.

**अनेक मौलिक बंदिशीच्या रचना :**

पं. विठ्ठलरावजी यांनी शास्त्रीय संगीतातील बंदिशींची रचना केली नाही. असे असले तरी त्यांनी अनेक सांप्रदायिक रचना लोकप्रिय केल्या आहेत. आजपर्यंत त्यांनी गौळण, भजन व अभंग अशा १०० रचनांना चाली दिल्या आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत फाऊन्टन कंपनीने 'देव माझा मी देवाचा' ही ध्वनिफित प्रसारीत केली आहे. यात १२ भजनांना त्यांनी स्वरबद्ध करून त्या रचना आपल्या सुरेल आवाजात गायिल्या आहेत.

याबरोबरच महावीर शर्मालिखित 'लक्ष लक्ष कंठोके' या समूह गीताला त्यांनी सुरेल साज चढविला. अनेक स्वागत गिते, शारदास्तवन इ. गीत प्रकारांना अभिजात संगीताचा मुलामा चढवून त्यांनी सांगीतिक योगदान दिले आहे. त्यांच्या अनेक रचना विविध स्पर्धांत बक्षिसास पात्र ठरलेल्या आहेत.

**संगीतविषयक अनेक महत्त्वपूर्ण पदांवर सफलतापूर्वक कार्य :**

०१. गुरुवार संगीत महाविद्यालय :या महाविद्यालयाचे प्रधानाचार्य या महत्त्वपूर्ण पदावर १९८५ पासून ते कार्यरत असून ते आजही या पदावर कार्यरत आहेत. या पदावर राहून त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

०२. गंजगोलाईत होणाऱ्या या नवरात्र महोत्सवाच्या संयोजन समीतीत शास्त्रीय संगीताच्या समितीचे प्रमुख म्हणून अनेक वर्षांपासून ते कार्यरत आहेत यातून उत्तमोत्तम कलावंतांना पाचारण करून लातूरकर रसिकांना रिझविण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

०३. मागील २५ वर्षांपासून अष्टविनायक संगीत प्रतिष्ठानच्या संयोजन समीतीवर पं. विठ्ठलराव जगताप हे कार्यरत असून स्पर्धांचे आयोजन संगीतमहोत्सवाचे आयोजन करणे, स्पर्धकांना साथ-संगत करणे अशा प्रकारचे कार्य त्यांनी केले आहे.

०४. अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ सुरू केलेल्या सूरश्री प्रतिष्ठान या संस्थेवर पं. विठ्ठलरावजी जगताप यांची कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड झाली. यातून ते दर्जेदार कलावंत लातूरमध्ये बोलावून त्यांच्या मैफीली घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले.



* **मानसन्मान :**

०१. शिक्षण विभागाचा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला.

०२. लातूर पंचायत समितीने 'गुरुगौरव' हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.

०३. श्री. व्यंकटेश शिक्षण संस्थेनेसुद्धा त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले.

०४. १० ऑगस्ट २००१ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त 'गुरूबिन कौन बताये बाट?' या उक्तीवर श्रद्धा असलेल्या संगीत क्षेत्रातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कृतज्ञते दाखल आपले गुरू विठ्ठलराव जगताप यांना सोन्याचे लॉकेट अर्पण करून खऱ्या अर्थाने गुरुपौर्णिमा साजरी केली.

०५. याबरोबरच विविध सांगीतिक मैफीलीत व हरिनाम सप्ताह कार्यक्रमात त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

शंकर, प्रदीप ही दोन मुले तर शिवगंगा ही त्यांची कन्या हे तिघेही संगीत क्षेत्राशी संबंधित आहेत. शंकर जगताप हे व्यंकटेश विद्यालयात संगीत शिक्षक आहेत तर कन्या शिवगंगा ही शिक्षिका आहे. जावई किरण कदम हेसुद्धा संगीत विशारद असून ते ज्ञानसागर विद्यालयात संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. लातूर येथील केशवनगर येथे 'सूरसदन' हे स्वतःचे घर आहे. सध्या ते सेवानिवृत्त झाले असून संगीताचा प्रचार करीत आहेत.

♦ ♦ ♦



# प्रकरण ९

# पं. पांडुरंगजी मुखडे

लातूर जिल्ह्यातील भूमिपुत्रांनी आपल्या प्रतिभेने अभिजात कलेत सिद्धता प्राप्त केली. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी इतर शहरात जाऊन वास्तव्य केले. तेथे राहून त्या शहराबरोबरच अभिजात संगीताची ध्वजा सातासमुद्रापलीकडे पोहोचविली. यात पं. पांडुरंग मुखडे, पं. मुकेश जाधव, गोपाळ उगीले (जाधव), प्रा. अंगद गायकवाड, श्री. राजेंद्र भोसले यांनी अभिजात संगीताचा कशाप्रकारे प्रचार केला याचा आढावा या उपप्रकरणात केला आहे.

**पं. पांडुरंगजी मुखडे :**

मराठवाड्यातील उजनी हे गाव इ. स. १६०० सालापासून संतश्रेष्ठ श्री. गणेशनाथ महाराज यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या गावात पांडुरंग मुखडे यांचा जन्म झाला. घरात संगीताचे वातावरण भजन-किर्तनापुरते मर्यादित. आर्थिक सुबत्ता, कामाला गडीमाणस असूनही घरता, गावात मन रमेना. संगीताची ओढ स्वस्थ बसू देईना. म्हणून सर्व असूनही केवळ संगीताच्या ओढीने कुणालाही न सांगता, घरातले काहीही न घेता वयाच्या अठराव्या वर्षी घर सोडले. ते थेट पुणे गाठले. कुणाची ओळख नाही की कोणता रस्ता माहिती नाही. ज्ञानदेव चित्ती हरिपाठ बेना मागिलीचा जन्या मुक्त झालो. या ज्ञानदेवाच्या हरिपाठातील अभंगाच्या अर्थाप्रमाणे त्यांचे गत जन्मात राहिलेली संगीत सेवा या जन्मात करण्यासाठी त्यांचा प्रयत्न चालत आहे. वरील अभंगाच्या ओळीप्रमाणे मागच्या जन्माची अपूरी राहिलेली संगीत सेवा पूर्ण करण्यासाठी ते पुण्यात आले. पुण्यात फुटपाथवर राहिले. तुकाराम पादुका मंदिरात काही दिवस पुजारी म्हणून राहिले. त्यानंतर परिचयातून झालेल्या संगीतप्रेमी लोकांनी त्यांची राहण्याची सोय केली. कितीही कष्ट झाले तरी संगीत सेवा सोडली नाही.



त्यातूनच दिग्गज कलाकारांना साथ केली. पहिल्यांदा १९८४ साली अमेरिका-कॅनडा येथे जाऊन अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्याकाळी विमानात बसणे ही सुद्धा मोठी कौतुकाची गोष्ट असे. एखाद्या चित्रपटातील कथेला शोभावा असा हा जीवन प्रवास घडवून आणला एका जिद्दी आणि मेहनहती कलावंताने! त्यांचे नाव आहे. पं. पांडुरंग मुखडे - लातूर जिल्ह्यातील उजनी या खेड्यात जन्माला आलेले हे कलावंत सध्या पुण्यनगरी पुण्यात वास्तव्यास आहेत. त्यांनी केलेला अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार या उपघटकात उलगडून पाहणार आहोत.

*    **जीवनवृत्त :**

पं. पांडुरंग मुखडे यांचा जन्म १ नोव्हेंबर १९५३ साली लातूर जिल्ह्यातील उजनी या छोट्या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव इराप्पा तर आईचे नाव निलाबाई. माणिक, पांडुरंग व प्रभाकर ही भावंडे. त्यांचे कुटुंब धार्मिक आणि वारकरी सांप्रदायाची परंपरा पाळणारे होते. घरात आर्थिक सुबत्ता होती. वडील परंपरांगत शेती करायचे. पुढे ते रझ ाकारांच्या काळात स्वातंत्र्य सैनिक म्हणून काम करायचे. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात त्यांनी मोलाचे योगदान दिले.

पुनर्जन्मावर कोणाचा विश्वास असो अथवा नसो परंतु पांडुरंग मुखडे यांचा पुर्नजन्म झाल्याचे दिसून येते. उजनीजवळील काक्रंबा येथे गुरव नावाचे एक उत्तम पखावज वादक होते. ते कीर्तनात पखावज वाजवत असतानाच गतप्राण झाले. त्याच वेळी पांडुरंगजी यांचा जन्म उजनी येथे झाला. तेव्हा गतप्राण झालेल्या पखावज वादकाच्या आई-वडिलांना स्वप्न पडले की माझा मुलग उजनी येथे इराप्पा मुखडे यांच्या घरात जन्माला आला आहे. त्यामुळे ते स्वप्न खरे आहे का? हे पाहण्यासाठी मुखडे यांच्या घरी शोधत-शोधत आले व म्हणाले, "तुमच्या घरात जे बाळ जन्माला आलेले आहे तो मुलगा आमचा आहे. तो आम्हाला द्या." इराप्पा मुखडे यांना या गोष्टीचे आश्चर्य वाटले परंतु त्यांनी आपला मुलगा गुरव दांपत्याला दिला नाही. गावातील काही प्रतिष्ठीत मंडळीना बोलावून त्यांची समजूत घातली. तो गणेशनाथ महाराजांच्या गावात जन्माला आहे. कारण त्याला महाराजांची सेवा करायची आहे. तो इथेच राहिल असे लोकांनी सांगितल्यावर ते आधीचे आईवडील गेले. असे असले तरी उजनीहून पंढरपूरला चैत्र महिन्यात वारी निघायची. चिमुकला पांडुरंगही बैलगाडीत बसून वारीला निघायचा. काक्रंब्याजवळ वारी आल्यानंतर गुरव दाम्पत्य तेथे यायचे. आपला पुत्र समजून पांडुरंगाच्या पाया पडायचे. ही परंपरा पांडुरंग

महाविद्यालयात जाईपर्यंत अविरत चालू होती. याचाच अर्थ पं. पांडुरंग मुखडे यांनी पुर्वजन्मात संगीताची साधना केली होती त्यामुळेच या जन्मात ते उत्तम वादक होऊ शकले असे म्हणता येईल.

गावात गणेशनाथ महाराजांची समाधी होती. त्यामुळे एक तिर्थक्षेत्र म्हणून गावाची ख्याती पंचक्रोशीत होती. गावात पांडुरंगाच्या कानावर तालासुरांचे संस्कार होऊ लागले. लहान वयात मुलं विटी दांडूचा खेळ खेळतात पण हा पांडुरंग मात्र पिठाच्या डब्याचा पखवाज करून गळ्यात घालायचा व शेजारची चार पोरं गोळा करून दिंडी काढायचा. त्यासंदर्भात एका वृत्तपत्रात लिहिलं आहे. लहानपणी गळ्यात डबे अडकवून या पांडुरंगाने आयुष्यातला पहिला ताल धरला. मुलांचे पाय पाळण्यात दिसतात ते असे. तबला, ढोलकी, मृदंग केवळ ऐकून ऐकून वाजवायला सुरुवात केली आणि या वाद्यांच्या ठिकाणी प्रेम जडलं ते कायमचं.

मंदिरात होणाऱ्या भजन-कीर्तनाकडे त्याचे पाय आपोआप वळू लागले. त्याची ही आवड पाहून वडिलांनी गावातील संगीत मास्तर महादेव रंदवे व तुकाराम मास्तर सूर्यवंशी यांनी पांडुरंगाला पखावज तर त्याच्या भावाला पेटी शिकवायला सुरुवात केली. पाहता पाहता चिमुकला पांडुरंग पहाटेच्या काकड आरतीला पखावजावर दादरा ताल धरू लागला.

शालेय शिक्षण सुरू झाले. मधली सुटी झाली की सर्व मुले खेळण्यात दंग व्हायची; परंतु छोटासा पांडुरंग शाळेसमोरील चहाच्या हॉटेलवर जाऊन विविध भारतीवरून प्रसारीत होणारी गाणी ऐकण्यात धन्यता मानायचा. गावातील गणेश विद्यालयात संगीत नाटके होत असत. या नाटकांनाही तो तबल्याची साथ करीत असे. संगीत सौभद्र, सुवर्णतुला अशा नाटकांना त्याने डोळ्यात साठवले. त्यांचा फायदा पुढे नाट्यगीतांच्या साथीसाठी झाला. त्या काळात गावातील नाटकात स्त्री भूमिका करण्यासाठी महिला तयार होत नव्हत्या. त्यामुळे पांडुरंग यांचे चुलतभाऊ मोठे पांडुरंग हे सरपंच होते. ते पुण्याहून स्त्रीकलावंताना पाचारण करीत असत. गावात वांगजीकर गुरुजी छोट्या पांडुरंगाला टेबलवर बसवून (वय ८ वर्षे) आवडे पंढरीभीमा पांडुरंग हा अभंग सर्व वर्गासमोर म्हणालयला लावायचे. ते उत्तम अभंग म्हणायचे. ते पांडुरंगाला कीर्तनात चरण म्हणण्यासाठी प्रोत्साहित करायचे. त्याकाळी राम व मदन रचपुत या भावंडाबरोबर ते गाऊ लागले यामुळे गाण्यातील स्वर, राग कळायला लागला. आजूबाजूच्या गावात कीर्तन व्हायचे तेव्हा गावातील लोक त्याला सायकलवर बसवून तेथे घेऊन जात असत.



गावात आध्यात्मिक वातावरण होते पण शास्त्रीय संगीत रूजले नव्हते. त्या काळात डॉ. सिद्रामप्पा धोत्रे हे पेनिसिलीनची डिग्री घेतलेले डॉक्टर होते. ते सोलापूरचे होते पण व्यवसायानिमित्त उजनीला यायचे. उजनीत त्यांचे चुलत भाऊ रहायचे. शाळा सुटली की पांडुरंग त्यांच्या घरी जायचा. त्यांच्या घरी तानपुरा, पेटी, तबला ही वाद्ये होती. डॉक्टर धोत्रे विविध राग व बंदिशी म्हणत असत. विशेषता त्यांना कानडी भजन म्हणण्यात रस होता. त्यांना चिमुकला पांडुरंग तबल्याची साथ करायचा. अशा प्रकारे उजनीत असताना त्यांना ताला सुरांची-रागांची समज आली होती. एकदा ते औसा येथील श्री मल्लीनाथ महाराजांच्या मंदिरात भजनाच्या साथीसाठी गेले. त्या वेळी भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी यांचा परियच झाला. त्यांना छोट्या पांडुरंगाची साथ आवडली. त्यांनी त्याला लातूरच्या गुरुवार क्लबमध्ये होणाऱ्या भजनाला साथ करण्यासाठी निमंत्रण दिले. त्यामुळे ते नेहमीच लातूरला येऊ लागले. हळू हळू आप्पा त्यांना घेऊन पुण्यात होणारा सवाई गंधर्व महोत्सवात घेऊन जाऊ लागले. आप्पांनीच पुण्यात पं. आप्पा जळगावकर यांचा परिचय करून दिला व त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या पठाण या कारागिराकडे त्यांच्या निवासाची सोय केली.

ते शालेय शिक्षणात फार रमले नाहीत. सोयीनुसार सवडीनुसार त्यांनी शिक्षण घेतले. त्या काळात इ. १० वी बोर्डाचे परीक्षा केंद्र उजनीला नव्हते. ते बेंबळी या गावी होते. बोर्ड परीक्षेचा उद्या पेपर सुरू होणार होता पण ते अभ्यास करण्याऐवजी काक्रंबा येथे कीर्तनाच्या साथीसाठी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी गावातील एकाने त्यांना सायकलवर आणून परीक्षा केंद्रावर सोडले. अशाही स्थितीत ते एस. एस. सी परीक्षा द्वितीय श्रेणीत उतीर्ण झाले. त्यांचे इ. १० वी पर्यंतचे शालेय शिक्षण गावातील श्री. गणेश विद्यालयात झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते सोलापूर येथे गेले; परंतु तेथील महाविद्यालयीन जीवनात ते रमले नाहीत. पुढे ते पुण्याला गेले. तेथे त्यांनी स्वाध्याय महाविद्यालयात प्रवेश घेतला. हे महाविद्यालय सकाळी ७ ते ९ व रात्री ६ ते ८ या वेळेत व्हायचे. तेथे दिलीप व धनंजय महाजन या बंधूनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. नोकरी, कार्यक्रम, शिकवण्या या व्यस्ततेत त्यांनी बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी मराठी विषयात एम. एम. ही पदवी संपादन केली. यासंदर्भात पं. डॉ. विकास कशाळकर म्हणतात, "एकदा का कलाकार प्रस्थापित होतो तेव्हा तो पुढे कशाला शिकायचे? असे म्हणतो परंतु पं. पांडुरंग मुखडे यांनी कला वाढविली. शालेय शिक्षणातही ते मागे राहिले नाहीत. एवढ्या खेड्यातून आलेला हा कलाकार 'सुशिक्षित कलाकार' झाला त्यांच्या बद्दलच्या आमच्या मनात आदर भावना

आहेत."

पं. पांडुरंग मुखडे यांचा १९८६ साली सौ महानंद यांच्याशी विवाह झाला. विवाहापूर्वी त्यांना गाण्याची आवड होती. तसेच गॅदरिंगला नाटकातही त्यांनी भाग घेतला होता. शिकवण्याची आवड त्यांनी लग्नानंतर व्यक्त केली व पांडुरंग मुखडे यांनी त्यांना तबला व गायनात विशारद पर्यंत पूर्ण केले. त्या १९८७ पासून संगीत कला विद्यालयाच्या संचालिका म्हणून कार्यरत आहेत. धनश्री व श्रद्धा या त्यांच्या दोन मुली. धनश्री यांनी तबलावादनात मध्यमा पूर्ण परीक्षेपर्यंत शिक्षण घेतले तर श्रद्धा हिने गायन अनुराधा मराठे यांच्याकडे तर श्रीमती शमा भाटे यांच्याकडून कथ्थक नृत्याचे धडे घेत आहे. घरात शिष्यांचा व क्लाकारांचा, स्नेही मंडळींचा नेहमीच राबता असायचा या साऱ्यांची सेवा करताना त्यांच्या पत्नी महानंदा यांनी कधीही कंटाळा केला नाही. पं. पांडुरंग मुखडे यांच्या सुख-दु:खात त्यांनी खंबीरपणे साथ दिली.

पुण्यात आल्यानंतर त्यांनी जे भोगलं जे सोसलं त्याबद्दल ते सांगत होते, "केवळ कलेसाठी मला घर सोडून पुण्यात यावे लागले. सुरुवातीला फुटपाथवर झोपून दिवस काढावे लागले. यासाठी बाबासाहेब पुरंदरे यांच्या घराजवळ पर्वती येथे एका सायकलच्या दुकानात मला काही वर्षे काढावी लागली. तेथे पखावज वादक ज्ञानेश्वर जंगले यांनी मला आसरा दिला. पुढे डेक्कन येथे शुभांगी बहुलीकर यांच्या मावशीच्या घरात एक ४ बाय ६ ची खोली मिळाली. त्याला महिन्याला ३५ रुपये भाडं होतं."

राहण्याचे ठिकाण नाही. हालअपेष्टा, अनंत अडचणीवर मात करत मुखडे पुढे चालत राहिले. त्यांच्या आयुष्यात श्री. लोणकर बंधू, पं. सदाशिवराव जाधव, पं. आप्पासाहेब जळगावकर, पं. श्रीकांत देशपांडे, डॉ. सतीश कौशिक, प्रा. शामराव जोशी, दत्तोपंत देशपांडे, प्रा. प्रकाश भोंडे, प्रा. हरीश देसाई, भरतनाट्य मंदिराचे अध्यक्ष बाबुराव विजापुरे व यशवंत वैद्य यांच्यासारख्या बुजुर्गांनी मदत केली. त्यामुळेच श्री मुखडे पुण्यात जम बसवू शकले. कठीण परिस्थितीतही केवळ तबल्यावरील निष्ठेच्या जोरावर व कठोर साधनेमुळे दैवानेसुद्धा त्यांच्या पदरात झुकते माप टाकले.

पं. मुखडे यांचा सुरुवातीचा काळ अत्यंत संघर्षमय होता. छोटे मोठे कार्यक्रम मिळत होते. अशातच एकदा पुण्यात ज्ञानवर्धन संस्थेत एक कार्यशाळा चालू होती. ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायक उदाहरणादाखल झुमरा तालात गाऊ लागले; परंतु मुखडे यांना ती ग्वाल्हेरची लय लक्षात येत नव्हती. वास्तविक पाहता त्या गायकाने त्यांना सांभाळून



घ्यायला हवे होते; परंतु 'राहू द्या ती लय तुम्हाला जमणार नाही' अशी उपहासात्मक टीका केली. हा अपमान मुखडे यांना सहन झाला नाही. ती गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. बस तेव्हापासून नको तो तबलाअन नको ती साथसंगत म्हणून ते निराशेच्या गर्तेत गेले. ही बाब जेव्हा पं. आप्पा जळगावकरांना व डॉ. विकास कशाळकर समजली तेव्हा त्यांनी त्यांना धीर दिला. संगीतात अशा घटना घडतच असतात त्या मनावर घ्यायच्या नसतात अशी समजूत काढली. पुढे आप्पांचा लवकरच स्वतंत्र वादनाचा कार्यक्रम होता. त्यात त्यांना वाजविण्यास भाग पाडले. अशा प्रकारे अपयशाचे अनेक प्रसंग त्यांनी पचविले. जोपर्यंत करीत असलेल्या कार्यात अडथळे येत नाहीत, अपमान होत नाही, चिडचिड होत नाही तोपर्यंत माणूस यशस्वी होत नाही. हा कानमंत्र संगीतकार राम कदमांकडून त्यांनी घेतला होता.

पं. पांडुरंग मुखडे यांच्या स्वभावाच्या पैलूवर प्रकाश टाकताना त्यांच्या पत्नी सौ. महानंदा म्हणतात, "ते खूप कडक शिस्तीचे होते. त्यांच्या कोणत्याही वस्तूला हात लावता कामा नये. त्यांचा तबला व त्यांचे कपडे हे व्यवस्थित जागेवरच असायला पाहिजेत असा त्यांचा नियम होता. वेळेच्या बाबतीतसुद्धा ते फार काटेकोरपणे वागतात. कार्यक्रम ७.०० वाजता असेल तर ते ५.०० वाजता तेथे पोहोचतात. त्यावर मी म्हणायचे, "आहो तेथे अजून कोणी आले नसेल. तुम्ही एवढी घाई का करता?" तेव्हा ते म्हणतात, "कोणी येऊ दे अथवा न येऊ दे. मला लवकर गेल्याने शांतता लाभते. मन स्थिरस्थावर झालं की मला वाजवायला बरे वाटते."

त्यांचे मित्र श्री. प्रकाश भोंडे म्हणतात, "श्री. मुखडे हे चतुरस्त्र कलावंत आहेत. त्यांनी निष्ठेने रंगदेवतेची सेवा केली. त्यांनी कधीही पाट्या टाकल्या नाहीत. दिलेली वेळ कधीही टाळली नाही. कार्यक्रम असो की तालीम ते वेळेवरच येणार. १९८० साली कलावंताला १५ रु. मानधन होते. अशा किरकोळ मानधनातसुद्धा त्यांनी कार्य केले. संस्था वाढविण्यासाठी व संस्थेच्या विकासासाठी त्यांनी त्याग केला. त्यांनी निरपेक्ष भावनेतून संस्थेसाठी काम केले." ते कधीही रागात दिसले नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी हसूच असते. ते कोणाबद्दलही आकस दृष्टीने वागत नाहीत. पं. श्रीकांत देशपांडे यांच्या पत्नी शीला देशपांडे (सवाई गंधर्वाच्या नातसून) म्हणतात, "ते पुढे येण्यासाठी नव्हे तर संगीतासाठी त्याहीपेक्षा तबल्यासाठी धडपडत असतात. लोक त्यांचा स्वभाव मिष्कील आहे असे म्हणतात पण ते सरळ साधे व आनंदात भर टाकणारे आहेत." त्यांच्या सरळ साध्या स्वभावामुळे त्यांच्या घरात आनंदी वातावरण राहते. त्यांच्या वागण्यातील घरेलुपणा

साऱ्यांनाच भावला आहे.

पं. सुरेश तळवलकर म्हणतात, "श्री. मुखडे हे अजात शत्रू असलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना प्रत्येक कलाकारांवर प्रेम करणे हेच माहीत आहे. संगीतात ही फार महत्त्वाची गोष्ट आहे."

एवढ्या थोर कलावंताने त्यांच्याबद्दल दिलेली ही प्रतिक्रिया त्यांच्या सरळ व प्रेमळ व्यक्तिमत्त्वाची पावती आहे असे म्हणता येईल.

त्यांची भेट झाली की पहिल्याच भेटीत ते समोरच्या व्यक्तिच्या थेट अंतःकरणात प्रवेश करतात. ते कोणाशीही पटकन मैत्री करतात व गणित बरोबर जुळवतात. ते नेहमी म्हणतात, "पुरस्कारांपेक्षाही गुरूंची विद्या पुढे चालू ठेवताय की नाही याला महत्त्व आहे. आपल्यापेक्षा कला, परंपरा व विद्या मोठी असली पाहिजे." त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे आहे. त्यांनी कधीही आवाज चढविल्याचे कोणीही पाहिले नाही. वादनातील शिस्त मात्र त्यांनी पाळली आहे. भिती वाटावे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व नाही पण त्यांचे सर्व शिष्य त्यांच्या विद्वत्तेचा आदर करतात. प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दल आदरयुक्त भिती आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी राजकीय लोकांच्या पुढे लाचारी करणे त्यांना कधीही जमले नाही. विद्वत्ता व शिकविण्याची हतोटी असल्यामुळे प्रसिद्धी न करताही शेकडो विद्यार्थी त्यांच्याकडून ज्ञान घेत आहेत.

त्यांनी कलेचे कधीही बाजारीकरण केले नाही. पुस्तकातून जुन्या दुर्मिळ रचना लोकांपर्यंत पोहचवित असताना आर्थिक लाभाचाही त्यांनी कधी विचार केला नाही. केवळ त्यांनी आपल्या कामावर लक्ष केंद्रीत केले. विद्यालयाच्या वर्धापनदिनानिमित्त व गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांनी मोठे कलावंत आतापर्यंत बोलावले. अनेक वेळा अशा कार्यक्रमातून लोक पैसे कमवितात पण पं. मुखडे यांनी असा कधीही विचार केला नाही. ना कधी प्रायोजकांकडून निधी संकलीत केला, ना कधी विद्यार्थ्यांकडून पैसे जमा केले. कार्यक्रमाचे जेवढे तिकीट आहे तेवढेच पैसे त्यांनी विद्यार्थ्यांकडून घेतले त्यामुळे त्यांना अनेक वेळा आर्थिक नुकसान सहन करावे लागले. तरीही कधी कुठलं काम अडलं मात्र नाही. परमेश्वरच्या कृपेमुळे सर्व काही सुरळीत चालू आहे.

आपण सुरुवातीच्या काळात खूप त्रास सहन केला त्यामुळे त्यांनी कधीही कडवटपणा येऊ दिला नाही. कोणी त्यांच्यावर अन्याय जरी केला तरी त्याच्याबद्दल आकस न करता ते आपल्या साधनेत रममाण झाले. काही शिष्य त्यांना सोडून गेले.



अनेक वेळा त्यांनी त्यांच्या परिचयात गुरूचे नाव सांगितले नाही. अशाही स्थितीत ते शिष्यांवर चिडले नाहीत. त्यांना या गोष्टीचे कधीही वाईट वाटले नाही. त्यांचे शिष्य श्री. धनंजय कुंटे एक प्रसंग सांगतात, "मी एके दिवशी विद्यालयामध्ये उ. अहमदजान थिरकवॉ यांची ध्वनिफीत ऐकून त्यांची नक्कल करीत होतो. अचानक गुरुजी आले." तेव्हा मी म्हणालो, "मला क्षमा करा गुरुजी, मी तुम्हाला न विचारता ही रचना वाजवतोय." त्यावर ते म्हणाले, "तू वाजव मी लेहरा धरतो" आणि त्यांनी लेहरा वाजविण्यास सुरुवात केली. मी घाबरत वाजवू लागलो. मी ती रचना वाजविल्यानंतर ते म्हणाले, "ठीक आहे पण यातील काही अक्षरे योग्य ठिकाणी पडत नाहीत. मी तुला सांगतो ते कशी वाजवायची." एखादे दुसरे गुरू असते तर त्यांना राग आला असता. हे वाजविण्याची तुझी हिम्मत कशी झाली अशी त्यांनी विचारणा केली असती पण गुरुजी म्हणाले, "तू स्वतः प्रयत्न करतोस ही तुझी पद्धत मला आवडली."

यावरून त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. ते जरी संसारिक असले तरी त्यांची वृत्ती संताची आहे असे दिसून येते. असे असले तरी त्यांनी जेवढे कष्ट केले त्याचे योग्य मूल्यमापन झाले नाही. एक कलावंत म्हणून त्यांनी जेवढे मान-सन्मान व पुरस्कार मिळायला हवे तेवढे मिळाले नाही ही शोकांतिका आहे.

यावरून त्यांच्या कार्याची व्याप्ती लक्षात येते. तसेच त्यांचे शिष्य त्यांच्यावर किती निस्सीम प्रेम करतात याचेही दर्शन घडते.

अनेक तबलावादक शर्टाच्या बाह्या मागे सारून 'थांब तुला पाहतो' या भावनेतून आक्रमक पद्धतीने साथसंगत करतात पण पं. मुखडे यांनी कधीही शर्टाच्या बाह्या मागे सारून वादन केले नाही. यावरून त्यांच्यातील नम्रता दिसून येते. अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त ज्येष्ठ गायक पं. उल्हास कशाळकर व पं. सुरेशदादा तळवलकर हे आले होते. पं. मुखडे हे गांधर्व मंडळाचे सचिव आहेत म्हटले तर ते त्यांच्या बाजूला सोफ्यावर बसून त्यांच्याबरोबर फोटो काढू शकले असते; परंतु मुखडे दांपत्यांनी तसे न करता ते जमिनीवर खाली बसले व त्यांच्याबरोबर फोटो काढला. यावरून असे दिसून येते की यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केलेला हा कलावंत अजूनही जमिनीवर आहे. विविधांगी साथ संगत करणारे, अनेक ताल वाद्य वाजविण्याचे कसब असलेले हे कलाकर मला कामापुरतं येतं असे विनम्रतापूर्वक म्हणतात. 'साधी राहणी उच्च विचारसरणी' या उक्तीप्रमाणे ते जीवन व्यतीथ करतात. वाढवलेले केस, भडक वेषभूषा, नको एवढा

मागेपुढे शिष्यांचा ताफा अशा भपकेबाज गोष्टी त्यांनी कधीच केल्या नाहीत त्यामुळेच त्यांचे सरळ साधे व्यक्तिमत्त्व सर्वांना भावते.

*** गुरू आणि शिक्षण :**

गावात महादेवआप्पा रंदवे यांच्याकडून त्यांनी पखावज वादनाचे प्राथमिक धडे घेतले होते. एकदा त्यांच्या गावाजवळ असलेल्या तेर या गावी जाण्याचा योग आला. तेर हे संतशिरोमणी गोरोबा काका यांचे गाव. तेथे पं. के. एन. बोळंगे गुरुजींची भेट झाली. यासंदर्भात पं. पांडुरंगजी लिहितात. तेर येथील गोरोबा काकांच्या मंदिरात कीर्तन संपल्यानंतर आम्ही येडशीकरांच्या फडावर जागरासाठी गेलो. जागरात अनेक थोर मंडळी गायन-वादन, चक्रीभजन करीत होती. त्यात एका बाजूला पांढरे धोतर, नेहरू शर्ट व टोपी घातलेली व्यक्ती मी पाहिली. त्यांनी मला पाहिले. त्यांनी मला साथीला बसविले. त्या व्यक्तीने मला 'चहा घेता का? असे विचारण्याऐवजी 'तुम्ही दूध घेता ना? म्हणून कपभर दूध दिले. त्या कपभर दुधावर मी आजतागायत उभा आहे. आईच्या प्रेमळ आशीर्वादानंतर ज्यांनी मला प्रेमपूर्वक कपभर दूध दिले, त्यांनी मला जवळ घेऊन, "तुम्हांला शास्त्रीय गायन आवडते का?" म्हणून विचारले मी लगेच 'हो' म्हणलो आणि दुसऱ्याच दिवशी आरणी या गावी मला त्यांनी तबल्याच्या साथीला बसविले. ही व्यक्ती म्हणजेच माझे गुरू श्री बोंळंगे गुरुजी होत.

पं. बोळंगे गुरुजी पांडुरंगाचा तबला ऐकून बेहद खुश झाले. त्यांनी त्यांना खलंग्रीला नेले. घरात न सांगता ते सात दिवस खलंग्री या गावी राहिले. तेथे सर्व वाद्ये होती. तेथे शास्त्रोक्त पद्धतीने तबल्याचे शिक्षण चालू झाले. इकडे घरची मंडळी चिंतातुर झाली. सात दिवसानंतर ते परत आपल्या घरी आले. त्यानंतर आई-वडिलांचा जीव भांड्यात पडला. पुन्हा आई-वडिलांना सांगून त्यांची पं. बोळंगे गुरुजींकडे तालीम चालू राहिली. कसल्याही प्रकारची फीस न आकारता त्यांनी पांडुरंगजी यांना सढळ हाताने विद्यादान केले. किंबहुना जीवन जगण्याचा मूलमंत्र दिला. उजनी या गावात १९६४ साली बोळंगे गुरुजींचा पहिला शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला. 'सरस सरगम गुणीजन की चर्चा मन' ही बंदिशी त्यांनी गायिली. त्यांना तबल्याची साथ पांडुरंगजी यांनीच केली होती. हार्मोनियमसाठी संगय्या स्वामी होते.

डॉ. धोत्रे बंधू यांच्या वडिलांची १२ जानेवारी या दिवशी सोलापूर येथे पुण्यतिथी व्हायची. या कार्यक्रमात अनेक कलावंत यायचे, शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम होत असे



तर ढगे आप्पा यांच्याकडे दर गुरुवारी अनेक वेळा भजन कीर्तनाचे कार्यक्रम व्हायचे. अशीच एकदा बाबुराव धामणीकर यांच्या चक्री कीर्तनाला साथ करण्याची संधी छोट्या पांडुरंगला मिळाली. डॉ. धोत्रे यांच्यामुळे पं. भीमराव कणकधर गुरुजींचा परिचय झाला. त्यांच्याकडूनसुद्धा पांडुरंगजी यांनी तबलावादनाचे धडे घेतले. एके दिवशी महानगरपालिकेच्या इंद्रप्रस्थ सभागृहात पं. सदाशिवराव जाधव यांच्या गायनाचा कार्यक्रम होता. पं. बोळंगे गुरुजींनी पांडुरंग यांना त्या कार्यक्रमासाठी नेले. सदाशिवरावांचा मधुर आवाज पांडुरंगाच्या मनात घर करून गेला. त्यांची ख्याल व ठुमरी ऐकून तो भारावून गेला. आपण या कलावंताबरोबर साथ करावी असे त्यांना वाटू लागले पण ते बोलण्याचे धारिष्ट्य झाले नाही. सांगीतिक उपक्रमात लक्ष दिल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. स्वाभाविकपणे पांडुरंगजी पी.डी. आर्ट्स (P.D. Arts) या वर्गात नापास झाले. १९७२ च्या दुष्काळाने सारी जनता होरपळत होती. अशातच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अशा अनेक संकटामुळे त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. ते अस्वस्थ झाले. पुढे काय करावे हे सुचेना. तबलावादन शिकायचे हे मात्र त्यांनी लहानपणापासूनच ठरवले होते.

*** घरातून पलायन :**

एके दिवशी मी उजनीला जाऊन येतो असे पं. बोळंगे गुरुजींना सांगून त्यांनी रेल्वेस्टेशनचा रस्ता धरला. पुण्याला जाणारी रेल्वे थांबली होती. मनाचा दृढनिश्चय केला व रेल्वेत पाऊल टाकले. तेथे कोणाकडे जायचे, जेवण-खाणे कसे करणार याची कल्पना नव्हती. कोणाला दिसू नये म्हणून ते रेल्वेत दबा धरून बसले. रात्रभर प्रवास झाला. पहाटे साडेपाच सहाला रेल्वे पुणे स्टेशनवर आली. तेथे नळावर तोंडावर पाणी मारून मार्ग दिसेल तसे ते चालू लागले. फिरत फिरत ते एक दीड तास चालल्यानंतर तुळशीबागेत येऊन पोहोचले. पुण्यात आलो पण आता पुढे काय? हा प्रश्न भेडसावत होता. पण दैवयोग इतका जबरदस्त होता की, तिथे एक श्रीकृष्ण नावाचे हॉटेल दिसले. हॉटेलमध्ये जाऊन बसले; परंतु योगायोग असा की, पं. सदाशिवराव जाधवही त्याच हॉटेलमध्ये आले. श्री. मुखडे यांची नजर त्यांच्याकडे गेली व त्यांनी ओळखले. पण सदाशिवराव जाधव हे मुखडेना ओळखत नव्हते. सदाशिवराव जाधव यांनी नास्ता केला व पांडुरंगाने चहा घेतला कारण त्याच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. पण जाधवांना पांडुरंगजीने ओळखले होते. यांना भेटून काहीतरी आपली संगीताची सोय होईल का? अशा दृष्टीकोनातून पांडुरंग ने बिल दिले. सदाशिवराव बिल देण्यासाठी गेले तेव्हा हॉटेल मालकांनी सांगितले, "त्या मुलाने दोघांचे बिल दिले आहे." त्यांना आश्चर्य वाटले. ते बाहेर आले आणि त्याला विचारले,

"तू कोण? आणि माझे बिल तू का दिले?" त्यावर पांडुरंग म्हणाला, "मी पांडुरंग, काही दिवसांपूर्वी तुम्ही सोलापूरला आला होतात. मला तुमचे गायन खूप आवडले." आता इथे कशाला आलास?, त्यांनी विचारले. मी घरदार सोडून तबला शिकण्यासाठी पुण्यात आलोय. आपण मला मदत केली तर फार उपकार होतील असे म्हणून छोटा पांडुरंग (वय वर्षे १६) त्यांचे पाय धरून ढसाढसा रडू लागला. ते खूप रागावले. तू कसा काय घरी न सांगता आला म्हणून बोलले. तू कुठला कोण म्हणून विचारले व ते म्हणाले तू सोबत चल. त्यांनी जंगली महाराज मठामध्ये नेले व म्हणाले १२ वाजता तुला न्यायला येईन. तो पर्यंत तू इथेच बस. पांडुरंग दिवसभर मंदिरात राहिला. दुपारी १२ वाजता ते आले व त्यांनी त्याला सनई वादक शामराव लोणकर यांच्या घरी निवासाची तात्पुर्ती व्यवस्था केली. एके दिवशी त्यांनी त्याला सतीश कौशीक यांच्या घरी नेले. ते रोटरीचे गव्हर्नर होते. त्यांनी पांडुरंगसाठी नोकरी पाहण्यासाठी सांगीतले. त्यांनीही लवकरच किर्लोस्कर फिल्टरमध्ये नोकरी मिळवून दिली पण ज्या ध्येयासाठी तो पुण्यात आला होता ते ध्येय त्याच्या दृष्टिपथास येत नव्हते. त्याचे मन नोकरीत लागले नाही.

एके दिवशी योगायोगाने गायिका हिराबाई बडोदेकर यांच्या घरी भजनाचा कार्यक्रम होता. हा कार्यक्रम 'विणा भक्ती मंडळा'ने आयोजित केला होता. या कार्यक्रमात पांडुरंग यांना पहिल्यांदा संधी मिळाली ती हार्मोनियमवादक बंडोपंत साठे यांच्यामुळे. मिळालेल्या संधीचे सोने करायचे हे ठरवूनच पांडुरंग यांनी आपले नैपुण्य पणाला लावले. आजची मैफिलच आपलं भविष्य ठरविणार हे ओळखून समोरचे आव्हान मोठ्या ताकदीने पेलले. विविध प्रकारच्या तोड, भरीव दमदार ठेक्यामुळे भजन रंगले. याच मैफीलीत पं. आप्पा जळगावकर उपस्थित होते. त्यांनी या तरुणाचा हुन्नर पाहिला. त्याच्या वादनशैलीने ते प्रभावीत झाले. या मुलाला आपण साथीसाठी बोलावले पाहिजे असे त्यांना वाटले. विशेषत: हा मुलगा मराठवाड्यातून तबल्यासाठी आला आहे हे ऐकल्यानंतर तर ते अधिकच प्रसन्न झाले. त्यांच्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, "खूप रियाज कर मी तुझ्या पाठीशी आहे." पुढे दोन महिन्यातच त्यांनी पं. श्रीकांत देशपांडे यांचा परिचय करून दिला. ते पं. भीमसेन जोशी यांचे शिष्य होते. त्यावेळी ते शिकत असत. श्रीकांतरावांच्या सहवासामुळे त्यांना पं. भीमसेन जोशी यांच्या घरी जाण्याचा योग येऊ लागला. श्रीकांतजीच्या स्वभाव मनमिळावू असल्याने लवकरच त्यांच्या मैत्रीचा सूर जुळला. पं. श्रीकांत देशपांडे यांच्या पत्नी म्हणतात, "रोज सकाळी ७.३० वाजता आमच्या दारावरची बेल वाजली की आम्हा घरातील लोकांना समजायचे की दारात पांडुरंग आले आहेत." साडेसात ते साडेनऊवाजेपर्यंत पांडुरंग



श्रीकांतजींना हार्मोनियमवर साथ करायचे. त्यामुळे गायक प्रत्येक स्वरांचा कसा आनंद घेतो मग त्यांना अपेक्षित साथसंगत कशी असावी याचा त्यांना अंदाज येऊ लागला. त्यांनतर साडेनऊ ते दीड वाजेपर्यंत ते तबल्याची साथ करायचे. वर्षोनवर्षे असा रियाज अविरत चालू राहिला. साथसंगत कशी करावी यासंदर्भात पं. आप्पा जळगावकरांनीसुद्धा मोलाचे मार्गदर्शन केले. कधी एकताल, कधी तिलवाडा, त्रिताल तर कधी झुमरा तालात वादन होऊ लागले. ताल कसा वाजवावा, ठेका कसा भरावा याचे ज्ञान त्यांना मिळू लागले. तीन-तीन तास फक्त ठेका वाजविणं आणि ते देखील वजनदार आणि दमदार. या गोष्टीला साथसंगतीत किती महत्त्व आहे हे त्यांनी शिकविले. त्याकाळी पूर्णवेळ तबला वाजवायचे.

* **गंडाबंधनाचा सोहळा :**

त्या काळात पं. भीमसेन जोशी, उ. गुलामरसूल खाँ व पं. आप्पा जळगावकरांचे त्रिकूट लोकप्रिय होते. याचा लाभ घेत पं. आप्पांनी उ. गुलाम रसूल यांनी पांडुरंगाला तबला शिकवावा अशी विनंती केली. हा होतकरू मुलगा आहे. तुम्ही याला तबला शिकवा अशी गळ घातली. अशा प्रकारे उ. गुलाम रसूल यांच्याकडे तालीम सुरू झाली. पण एक वर्षात एकच कायदा त्यांनी शिकविला. पुढे ते शिकवायला तयार होईनात त्यात पांडुरंगजी यांची गोची होत होती. तबला सोडावा तर एवढे मोठे गुरू मिळणार नाहीत आणि नाही सोडावा तर पदरात काही पडणार नाहीत नंतर त्यांच्या लक्षात आले की ते गंडाबंधनासाठी आडून बसले होते. ते एके दिवशी त्यांना म्हणाले, "गंडाबंधन कधी करणार? त्यांचा खर्च कसा करणार आहेस?" त्यावेळेस मात्र पांडुरंग यांच्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. जेथे एक वेळच्या खाण्याची भ्रांत होती, जेथे राहण्याचा प्रश्न होता तेथे गंडाबंधनचा खर्च कसा करणार. ते चिंतीत झाले व तबला शिकण्याचे स्वप्न तुटणार म्हणून ओक्साबोक्शी रडू लागले.

ही गोष्ट पांडुरंग यांचे स्नेही प्रा. श्याम जोशी यांना समजली. यासंदर्भात प्रा. शामराव जोशी म्हणतात, "पांडुरंग माझ्याकडे आले व म्हणाले, "उ. गुलाम रसूल खाँ साहेब म्हणाले, देखो बेटा तुम्हे गंडा बांधना पडेगा।" त्यावर मी दत्तोपंतांशी गोष्टी केली. आप्पांशी चर्चा केली, ते म्हणाले गंडाबंधन करूयात आणि तो गंडाबंधनाचा कार्यक्रम माझ्या घरी ठेवला. या कार्यक्रमात ज्यांनी ज्यांनी या मुलाला पाहिलं होतं, त्यांनी विचार केला की हा मोठा कलावंत झाला पाहिजे."

पांडुरंगजी नेहमी श्याम जोशी यांच्या साथीसाठी नेहमी जात असत. त्यांनी कार्यक्रमाचा

खर्च व गुरूंची बिदागी देण्याचे स्वतःहून मान्य केले. या कार्यात श्री दत्तोपंत देशपांडे यांनीही मोलाचे योगदान दिले. अखेर दि. १० फेब्रुवारी १९७५ रोजी श्याम जोशी यांच्या निलायम थियटरच्या जवळील 'मेघदूत' या निवासस्थानी गंडाबंधनाचा कार्यक्रम संपन्न झ ाला. या कार्यक्रमात श्रीमती शोभा जोशी यांचे गायन, पं. आप्पा जळगावकर यांचे स्वतंत्र हार्मोनियम वादन, उ. गुलाम रसूल खाँ यांचे स्वतंत्र तबलावादन झाले.

एक शानदार कार्यक्रम घडवून मुखडे यांचा गंडाबंधन हा कार्यक्रम अनेकांच्या स्मरणात राहील असा झाला. मग मात्र खऱ्या अर्थाने रीतसर तालीम सुरू झाली. खाँसाहेब एकही बोल लिहून द्यायचे नाहीत त्यामुळे शिकवित असताना अत्यंत लक्षपूर्वक ऐकावे लागायचे व घरी आल्यानंतर ते लिहून ठेवावे लागायचे. रियाजाचे तंत्र, बोलांचा निकास, बोटांची ठेवण, पढंत कसे करावे, बोल वाजविण्यापूर्वी तो टाळीवर बसविणे किती महत्त्वाचे असते, अतिदृतलयीत वाजविण्यासाठी कोणते तंत्र वापरावे अशी घराणेदार तालीम मिळू लागली. त्यांनी १९७५ पासून पुढे खाँसाहेबांच्या मृत्यूपर्यंत १४ वर्षांचा दीर्घ काळ सहवास लाभला. यासंदर्भात उ. गुलाम रसूल खाँ यांचे नातू उ. सलीम अख्तर म्हणतात, "दादाजींकडे अनेक शिष्य येत असत पण त्यातील मोजकेच असे शिष्य होते की दादाजी त्यांना स्वतः लहरा साथ करायचे. त्यात पं. पांडुरंगजी मुखडे हे एक होते."

यातूनच ते स्वतंत्रवादनात व साथसंगतीत पारंगत झाले. त्यांनी तबल्यातील अलंकार ही पदवी प्राप्त केली तर गायन व हार्मोनियममध्ये विशारद ही पदवी प्राप्त केली. पदवी पूर्ण केली, नावलौकिक प्राप्त झाला म्हणून ते थांबले नाहीत. ज्ञानाप्रति असलेल्या जिज्ञासेपोटी ते आजही भाई गायतोंडे यांच्याकडून तबलावादनाचे मार्गदर्शन घेत आहेत.

*** अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार :**

थोर गुरूंच्या मुशीत तावूनसुलाखून निघालेले पं. मुखडे आता खऱ्या अर्थाने मैफीलीत साथसंगत करण्यासाठी सिद्ध झाले होते. त्यांच्यामागचे दैन्य सरले होते. मनात अदम्य आत्मविश्वास घेऊन ते मैफीलीसाठी सज्ज होते. अशातच दैवयोगाने त्यांच्या आयुष्यात न भूतो न भविष्यती असे प्रसंग आले.

एकदा डॉ. प्रभा अत्रे यांचा पुण्यात कार्यक्रम होता. त्यामुळे पं. आप्पांनी मुखडे यांना श्रीकांतजीची पेटी आणण्यास सांगितले. निमित्त होते एवढ्या मोठ्या गायिकेचा त्यांचा परिचय होईल. इकडे श्रीकांतजी मुखडे यांना शोधत होते. ते जेव्हा श्रीकांतजींच्या घरी पोहचले तेव्हा त्यांना एक सुखद धक्काच बसला. श्रीकांतजी म्हणाले," आज तुम्हाला



पंडित भीमसेनजी जोशी यांच्याबरोबर साथ करायचीय." क्षणभर पांडुरंगजींचा विश्वासच बसला नाही. उजनीसारख्या खेड्यातून आलेल्या एका सामान्य कलाकाराला जगप्रसिद्ध गायकाबरोबर वाजविण्याची संधी कशी मिळेल याच विचारात पांडुरंग होते पण त्याचे असे झाले होते की पं. नानामुळे मुंबईहून पुण्याला येऊ शकले नव्हते त्यामुळे ही संधी त्यांना मिळाली होती. शाम जोशीचा मधुर तबला घेऊन पांडुरंग सदाशिव पेठेतल्या पुणे विद्यार्थी गृहाकडे सायकलच्या कॅरीअरला तबला बांधून पळत सुटले. धीरगंभीर सुरातला मारू बिहाग सुरू झाला. हा राग ते नेहमी एकतालात गायचे पण त्यादिवशी त्यांनी तीनतालात गायन सुरू केले. सुरुवातीला गोंधळलेल्या पांडुरंगजींनी बरोबर समेचा 'धा' टाकला आणि पंडितजींची 'वा क्या बात है' अशी दाद मिळविली. मैफीलीसाठी अनेक जाणकार उपस्थित होते. त्यांनीही त्यांचे तोंडभरून कौतुक केले. तो १९७४ सालातला हा दिवस ते कधीही विसरू शकणार नाहीत. त्यानंतर त्यांनी त्यांच्याबरोबर अनेकवेळा साथसंगत केली.

*** सवाई गंधर्व संगीत महोत्सवातून प्रचार :**

पं. वसंतराव देशपांडे यांच्याकडे पं. रोहिणी भाटे गाणे शिकायला यायच्या. पंडितजी ख्याल व ठुमरी शिकवित असताना आदासहीत शिकवायचे. तर वसंतराव देशपांडे यांची कन्या पं. रोहिणी भाटे यांच्याकडे नृत्य शिकायला जात असे. पं. आप्पा जळगावकर हे रोहिणीताईंकडे लहरा वाजविण्यासाठी जात असत. त्यामुळे पं. पांडुरंगजी हेसुद्धा आप्पांबरोबर रोहिणी भाटे, वसंतराव देशपांडे, भीमसेन जोशी व श्रीकांत देशपांडे यांच्याकडे तबला साथीसाठी घरी नेहमीच जात असत. त्यामुळे वसंतरावांनी पांडुरंग यांचा तबला ऐकला होता. असाच एक दिवस त्यांच्या बरोबर रियाजाला गेल्यानंतर 'तू आज सवाईत माझ याबरोबर बसतोस का?' असे त्यांनी पांडुरंगजींना विचारले. याही वेळी त्यांना क्षणभर विश्वास बसला नाही. डॉ. वसंतरावांनी सवाईचे आयोजक नानांना साहेब देशपांडे (पं. श्रीकांत देशपांडे यांचे वडील व सवाई गंधर्व यांचे जावाई) यांना फोन केला. 'मला कधी बसायच आहे?' तिकडून उत्तर आले, "बसा आजच." सायंकाळी पांडुरंगजींनी तबला सायकलवर घेतला. कोणी पाहणार नाही अशा बेतात ते तबला सायंकाळी सहा वाजता सवाईच्या प्रेक्षागृहात पोहोचले. तबला खुर्चीच्या खाली लपवून ठेवला आणि आप्पांबरोबर समोर बसून कार्यक्रम ऐकू लागले. त्या काळात पं. वसंतरावांबरोबर बाजीराव सोनवणे, पं. चंद्रकांत कामत असे दिग्गज तबलावादक साथ करायचे; परंतु आज मात्र पांडुरंगजीं यांना ही संधी मिळाली होती. यासंदर्भात एका वृत्तपत्रात लिहिले आहे. रईसखाँ यांच्या सतारवादनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली असे वाटले होते; परंतु अचानक डॉ.

वसंतराव देशपांडे यांचे गायन होणार असे जाहीर झाले आणि पांगलेली मंडळी पुन्हा स्थानापन्न झाली. केवळ वसंतराव म्हणूनच लोक परतले अन्यथा प्रत्येकाला घरी जाण्याची ओढ होती. आप्पा जळगावकर आणि पांडुरंग मुखडे यांच्या साथीत वसंतरावांनी भटियार ख्याल गायिला.

यासंदर्भात डॉ. विकास कशाळकरांनीही सुंदर लिहिले आहे. ते असे," डिसेंबर महिन्याच्या सवाई गंधर्वमहोत्सवात वसंतराव देशपांडे गायन हे मुख्य आकर्षण होते. कोणत्या गायकासोबत कुणी तबला वाजवायचा ह्याच्या याद्या तयार झाल्या. वसंतरावांनी तबला साथीदाराचे नाव गुलदस्त्यात ठेवलं. या दिवशी शेवटचा कार्यक्रम वसंतरावांचा होता. पांडुरंग मुखडे यांना तबला साथीला घेऊन वसंतराव रंगमंच्यावर आले. त्यादिवशी वसंतरावांनी अशा काही लयकाऱ्या मांडल्या की प्रत्येक समेवर टाळ्या पडत होत्या त्यानंतर त्यांनी एक नाट्यगीत आणि शेवटी 'बिंदिया ले गई' हा दादरा गायला. तीनही प्रकारांना मुखडेंनी त्या त्या प्रकाराला अनुरूप अशी साथ केली की वृत्तपत्रांनीही त्याची विशेष दखल घेतली."

अशा रितीने पं. मुखडे यांना सवाई गंधर्व महोत्सवात पं. वसंतराव देशपांडे यांनी प्रथमच तबला साथ करण्याची संधी दिली. अशा प्रकारे १९७९ पासून मानाच्या व प्रतिष्ठेच्या सवाई गंधर्वात अनेक वर्षे अनेक कलावंताना त्यांनी समर्थपणे साथ दिली. अगदी २०१५ मध्ये त्यांनी वसंतरावांच्या (सवाई गंधर्वाचे जावई) सुनबाई सौ. पद्माताई देशपांडे यांना तबल्याची साथ दिली.

असाच एक प्रसंग १९८० साली अंबाजोगाई येथील मराठवाडा संगीत संमेलनात घडला. डॉ. वसंराव देशपांडे यांचे गायन त्या ठिकाणी होते. तबला साथ श्री. मुखडे करत होते. त्या वेळी श्रोत्यांमध्ये खूप मोठे दिग्गज कलाकार उपस्थित होते. संगीत संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी ज्येष्ठ गायक सिंग बंधू (दिल्ली) यांचा कार्यक्रम होता. तबला साथीला कोण हवे आहे, असे आयोजकांनी त्यांना विचारले. त्या वेळी सिंगबंधू म्हणाले, "कल जिन्होंने वसंतरावजी के साथ तबला बजाया उन्हींको बुलाइये."

यावरून ते किती उत्तम साथ संगत करतात हे सिद्ध होते.

***   दिग्गजांना साथसंगत :**

पं. पांडुरंग मुखडे यांनी आजपर्यंत भारतरत्न पं. भीमसेन जोशी, पं. डॉ. वसंतराव देशपांडे, पं. जसराज, श्रीमती गंगुबाई हनगल, पं. फिरोज दस्तुर, पं. सी. आर. व्यास, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. यशवंतबुवा जोशी, पं. बसवराज राजगुरू, डॉ. प्रभा अत्रे, श्रीमती



मणिक वर्मा, श्रीमती मालिनी राजूरकर, पं. गणपती भट, वीणा सहस्त्रबुद्दे, पं. प्रभाकर कारेकर, पं. प्रभुदेव सरदार, पं. श्रीकांत देशपांडे, डॉ. सुहासिनी कोरटकर, श्रीमती श्रृती सडोलीकर, श्रीमती आशा खाडीलकर, सिंग बंधू (दिल्ली) श्री. निवृत्तीबुवा सरनाईक, श्री. विनायक तोरवी, श्रीमती देवकी पंडित, आरती अंकलीकर, अश्विनी भिडे (देशपांडे), आनंद भाटे, जयतीर्थ मेंऊडी इ. गायक कलावंतांना त्यांनी तबल्याची साथ संगत केली आहे.

याबरोबरच पं. आप्पा जळगावकर, उ. उस्मानखाँ, श्री. शंकर अभ्यंकर, उ. फैय्याज हुसेन खाँ, श्री. माधव डोंगरे, पं. अरविंद गजेंद्रगडकर या वादकांना त्यांनी समर्थपणे साथ केली. एवढेच नव्हे तर पं. कैवल्यकुमार गुरव व पं. अजय पोहनकर यांना हार्मोनियमची साथ केली तर उ. निजामुद्दिन खाँ साहेब, पं. सुधीर संसारे, उ. शफात अहमदखाँ, पं. आनंद बदामीकर यांना लेहरा साथ दिली. पंडिता रोहिणी भाटे, शमा भाटे, श्रीमती राजन व मनीषा साठे यांच्या शास्त्रीय नृत्यालाही त्यांनी तबल्याची साथ केली आहे.

पं. पांडुरंगजी उत्तम साथ संगत करायचे. यासंदर्भात सुप्रसिद्ध संगीतकार पं. यशवंत देव म्हणतात, "माझ्याबरोबर साथ केली असे पांडुरंग यांच नाव अनेक वेळा घेतलं गेलं; परंतु ते साथीला असल्यामुळे मी तालात गातोय हे नक्की असे लोक समजतात. शास्त्रीय, उपशास्त्रीय, भावसंगीत याबरोबरच पं. भीमसेन जोशी, डॉ. वसंतराव देशपांडे, पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याबरोबर त्यांनी तबला वाजविला आहे. तेव्हा प्रत्येक गायकाच वैशिष्ट्य जाणून घेऊन त्याला नेमकी कशी साथ केली तर गाणे रंगेल त्याचे उपजत ज्ञान साथीदार कलावंताजवळ असावं लागतं. त्याचं पुरेपूर ज्ञान त्यांच्याजवळ आलेले आहे याचा मला पूर्ण अनुभव आहे."

यावरून पं. मुखडे हे तालात पक्के होते हे सिद्ध होते.

थोर तबलावादक तालयोगी पं. सुरेशजी तळवलकर म्हणतात, "गायक हा साथीदाराच्या साथीमध्ये कम्फर्टेबल असावा लागतो. ते फार गरजेचे असते आणि गायकाच कम्फर्टेबलपण गाण्यासाठी तबलावादकाला विशेष विचार करावा लागतो, न ठेवण्यासाठी लागत नाही. पांडुरंग मुखडे हे गाण्याचा अतिशय चांगला आनंद घेऊन साथ करतात. माफक वाजविणं, गाणाऱ्याला त्रास होणार नाही असं वाजविणे. त्यामुळे गायक त्यांच्या साथीत ऐटीत असायचा."

यावरून पं. पांडुरंगजी हे स्पष्ट शुद्ध व वजनदार ठेका वाजवून गाणाऱ्यास बाधा

येणार नाही असे वादन करतात, हे स्पष्ट होते.

पं. शमा भाटे म्हणतात, "उत्तम लय देणारे, ठेका छान धरणारे एक उत्कृष्ट तबला वादक म्हणजे पं. पांडुरंग मुखडे. त्यांच्याशिवाय आमचा रियाज व कार्यक्रम अपूर्ण होतो."

उपरोक्त कलावंताच्या नामावलीवर एक नजर टाकता असे लक्षात येते की भारतातील सर्वच नामवंत गायक, वादक व नर्तिकांना त्यांनी साथसंगत करून त्यांच्या मैफीली रंगविल्या आहेत हे स्पष्ट होते.

*** संगीत नाटकातून अभिजात संगीताचा प्रचार :**

पं. पांडुरंग मुखडे केवळ शास्त्रीय संगीताच्या मैफीली करून थांबले नाहीत तर त्यांनी संगीत नाटकातूनही उत्तम साथ दिली. यासाठी त्यांनी अत्यंत परिश्रम घेतले. यासंदर्भात श्री. रविंद्र खरे हे नाट्यकर्मी त्यांच्याबद्दल म्हणतात, "पं. पांडुरंग मुखडे यांचे भरतमध्ये शाकुंतल हे पहिले नाटक होते. पुढे शारदामध्ये आमच्या नियमित भेटीगाठी होऊ लागल्या. त्या काळी नाटकाच्या तालमी वेगळ्या पद्धतीने व्हायच्या. तीन-तीन महिने घासून घासून व्हायच्या. गाणे व तबल्याचा बोल जसाचा तसा आला पाहिजे हा अट्टहास असायचा. यात पांडुरंग मुखडे उत्तीर्ण झाले. नोकरी, कार्यक्रम सांभाळून ते रात्री २ वाजेपर्यंत तालमीत हजर असायचे. कंटाळा आलाय, दमलोय, लवकर सोडा असे त्यांनी कधीही म्हटलेल आठवत नाही."

यावरून त्यांचे नाट्यसंगीतासाठी दिलेले योगदान स्पष्ट होते.

संगीत शाकुंतल नाटकासाठी तर ७ स्वरांचे तबले ठेवावे लागायचे. संगीत सौभद्र, कट्यार काळजात घुसली, एकच प्याला, मानापमान, मृच्छकटीक, संशय कंल्लोळ, लग्नाची बेडी, भावबंधन, स्वरसम्राज्ञी, मंदारमाला, सुवर्णतुला, मत्स्यगंधा, इ. संगीत नाटकात त्यांनी तबला साथीने रंगत वाढविली. 'तो मी नव्हेच' या नाटकात तर प्रभाकर पणशीकरांपासून आताच्या गिरीष ओक यांच्यापर्यंतच्या नाटकांत त्यांनी वादन केले. यामुळे स्वरराज छोटा गंधर्व, सौ. जोत्स्ना भोळे, सौ. बकुळ पंडित, उ. फैय्याज, श्री. उदयराज गोडबोले, श्री. रामदास कामत, श्रीमती आशा खाडीलकर, श्री. प्रभाकर कारेकर अशा अनेक कलावंताचा जवळून परिचय झाला.

य. मु. वैद्य, बाबुराव विजापुरे हे संगीत नाटकाचे भोक्ते होते. त्यांनी पांडुरंगजी यांना संगीत नाटकात वाजविण्यास प्रोत्साहन दिले. एकदा मानापमान नाटकाचा प्रयोग



नाशिक येथे होता. त्या नाटकात पं. रामदास कामत व शमा वैद्य हे मुख्य कलावंत होते. रामदास कामत हे आदल्या दिवशी त्या गावात पोहोचायचे. सर्व कलावंताबरोबर तालीम करायचे मगच ते प्रयोग करायचे. त्यांनी वैद्यांना विचारले," माझ्याबरोबर आज कोण वाजवणार आहे ?" वैद्य म्हणाले, "मुखडे". "कोठे आहेत ते?", कामतांनी प्रश्न केला. पण मुखडे कार्यक्रमासाठी लातूरला गेले होते. त्यामुळे पुण्यातला एक तबलावादक बोलावला. तालीम झाली. दुसऱ्या दिवशी मुखडे औरंगाबादला हजर झाले. पण पं. रामदासजींनी त्यांना रंगमंचावर वाजविण्याची परवानगी दिली नाही. शमा वैद्यांनी मात्र माझ्याबरोबर मुखडे वाजवतील असे सांगितले. त्यामुळे असे घडले की एकाच नाटकात दोन तबलावादक बसले. पं. रामदासजींच्या पदांना पुण्याचे तबलावादक तर क्षमाजींच्या पदांना मुखडे साथ करीत होते. पं. रामदासजींनी हे पाहिले. त्यांना मुखडे यांची साथ आवडली. ज्यांनी सुरुवातीला आक्षेप घेतला होता पण दुसऱ्या दिवशीच्या नाशिकच्या प्रयोगाला मात्र त्यांनीच पं. मुखडे यांना वाजविण्याची अनुमती दिली व पुढील दौऱ्यासाठी ते त्यांना घेऊन गेले.

अशा प्रकारे अनेक संगीत नाटकांना त्यांनी आपल्या मधुर साथीने रंगत आणली.

*** सुगम संगीताची साथसंगत :**

ग. दि. माडगूळकरांच्या गीतांवर आधारित 'मंतरलेल्या चैत्रबनात' हा कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय झाला. प्रा. हरीश देसाई आणि प्रकाश भोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ६ महिने तालमी झाल्या. या कार्यक्रमात शोभा जोशी, सुधीर दातार, शैला दातार, गिरीश जोशी, रंजना पेठे, अरूण आपटे असे अनेक नामवंत कलावंत होते. किंबहुना सुप्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ याच कार्यक्रमातून प्रकाशझोतात आले. 'आता कशाला उद्याची बात' हे जुने चित्रपट गीत असो की 'धूंद येथ मी' हे बाबुजींचे गीत असे, या प्रत्येक गीतात मुळ वादकांनी जसा ठेका वाजवला तसाच ठेका वाजविण्याचा कटाक्ष पाळला जात असे. शास्त्रीय संगीताची साथ करणे एक वेळे सोपे पण सुगम संगीताची साथ करणे कठीण असते. पं. पांडुरंगजी त्या कार्यक्रमाचे रिद्मिस्ट होते. त्या गीतातील ठेका जशाचा तसा वाजवता यावा यासाठी त्यांनी आण्णा जोशी व इतरांकडून विधिवत शिकून घेतले. तबल्याबरोबरच ते उत्तम ढोलकीही वाजवायचे. ढोलकीचा तोडा वाजला की श्रोते टाळ्यांवर टाळ्या वाजवायचे. यासंदर्भात सुप्रसिद्ध गायिका श्रीमती अनुराधाताई मराठे म्हणतात, "पांडुरंग मुखडे हे शास्त्रीय संगीताची तर साथ उत्तम करायचेच पण सुगम संगीतातील प्रत्येक ओळीतील लय व विविधता याच्या अनुशंगाने ते अप्रतिम साथ करायचे.

'बुगडी माझी सांडली ग...', 'तुम्ही माझे बाजीराव' या लावण्यापूर्वी वाजविलेला तोडा भक्कम असायचा. त्यातही वेगवेगळ्या कार्यक्रमात विविधता आसायची. त्यामुळे मला पुढील गायन करणे सहज सोईचे व्हायचे."

हा कार्यक्रम इतका लोकप्रिय झाला की याचे महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यातदेखील कार्यक्रम होत होते.

मद्रास येथे झालेल्या एका कार्यक्रमाचे वृत्त एका वृत्तपत्रात प्रकाशित झाले. यात लिहिले आहे," मद्रास येथील वेपरी भागात महाराष्ट्र मंडळाने यंदा 'मंतरलेल्या चैत्रबनात' हा कार्यक्रम आयोजित केला... विशेषतः पांडुरंग मुखडे यांच्या ढोलकी वादनासाठी स्वतंत्र वेळ देण्यात आला."

याबरोबरच दुसऱ्या एका वर्तमानपत्रात याच कार्यक्रमाचे व पं. मुखडे यांच्याबद्दल सुंदर वर्णन केले आहे ते असे, "काही वर्षापूर्वी 'मंतरलेल्या चैत्रवनात' या मराठी संगीताच्या मैफीलीला जाण्याचा योग आला. वाद्यवृंदापैकी तबला-ढोलकी वाजविणाऱ्या एका कलाकारांने सगळ्या श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतल होतं. जेव्हा वादक कलाकारांची ओळख करून दिली, तबला व ढोलकी वादक-पांडुरंग मुखडे, तेव्हा टाळ्यांचा अक्षरशः कडकडाट झाला. पुढे याच मुखड्यांचा परियच झाला आणि वाटलं कलेसाठी आयुष्य झोकून देणारा हा सच्च्या दिलाचा कलासक्त कलंदर आहे."

"थोर संगीतकार' राम कदम यांच्या 'स्वरांची वाटचाल' या कार्यक्रमात त्यांनी तबला व ढोलकीची साथ दिली."

यावरून असे दिसते की ते उत्तम तबलावादक तर आहेतच; परंतु ते एक उत्तम ढोलकीवादकसुद्धा आहेत असे लक्षात येते. तसेच त्यांच्या वादन शैलीचे दर्शन घडते. या बरोबरच 'स्वरानंद' संस्थेच्या माध्यमातून सादर केलेल्या 'पुलकित गाणी', 'आपली आवड', 'नमन मृत्युंजय वीरा', 'स्वर आले दुरूनी', 'आनंद गाणी' अशा अनेक कार्यक्रमांतून त्यांनी तबला व ढोलकीची साथ दिली. त्यांनी ज्येष्ठ संगीतकार राम कदमांबरोबरच श्री.यशवंत देव, सुरेश वाडकर, श्रीधर फडके, जयवंत कुलकर्णी, साधना सरगम यांना कार्यक्रमात साथसंगत केली.

पं. पांडुरंग मुखडे केवळ शास्त्रीय व सुगम संगीताचीच साथ करून थांबले नाहीत तर त्यांनी भजनात व किर्तनातसुद्धा तेवढ्याच तोलामोलाची साथ केली. श्री. करंदीकर बुवा (बार्शी), फाटक बुवा, घैसास गुरुजी, रायरीकर बुवा, कोपरकर बुवा व चारूदत्त



आफळे (पुणे) यांच्यासारख्या किर्तनकारांना पखावजाची व तबल्याची साथ केली. तसेच बाबुराव धामणीकर, मारुतीबुवा दोंदेकर, गुलाम ख्वाजा या शास्त्रीय भजन गायकांना तबला व पखावजाची साथसंगत करून त्यांच्या गाण्यात भक्तीरस ओतला. त्याही पलीकडे जावून लातूर येथील जगदंबा नवरात्र महोत्सवात हरिश्चंद्र गवारे यांच्याबरोबर शास्त्रीय सहगायन केले.

त्यांचे साथसंगतीचे व्यापक क्षेत्र पाहिल्यानंतर आपणास थक्क व्हायला होते. खऱ्या अर्थाने शास्त्रीय संगीताची साथसंगत करणारा कलावंत हा लोकसंगीत, सुगम संगीताची साथसंगत करेलच असे नाही पण पांडुरंग मुखडे याला अपवाद आहेत. त्यांनी शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भाव संगीत व भक्ती संगीत तेवढ्याच कुशलतेने वाजविले. त्यांनी सर्व गीतप्रकारांना समान न्याय दिला. यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट, त्यांची कलेप्रति असलेली निष्ठा व समर्पण हे शब्दातीत आहे. अशा प्रकारे त्यांचा पंचावन्न वर्षाचा ताला-सुरांचा प्रवास अनेक दिग्गज कलावंतांच्या परिसस्पर्शाने परिपक्व झाला.

***  परदेशातून अभिजात संगीताचा प्रचार :**

एव्हाना पांडुरंग मुखडे यांचा पुण्यात जम बसला होता. लातूर, औरंगाबाद व अंबाजोगाईच्या मराठवाडा संगीत संमेलनात त्यांनी दरवर्षी, अनेक वर्षे हजेरी लावली होती. एवढेच काय तर १९८१ च्या लातूर येथे झालेल्या मराठवाडा संगीत संमेलनात त्यांनी पं. भीमसेन जोशी यांच्याबरोबर साथसंगत केली. महाराष्ट्रातील विविध शहरात ते गायक वादकांसमवेत जातच होते. किंबहुना अहमदाबाद, बडोदा, मद्रास, बेंगलोर, दिल्ली व कलकत्त्यासारख्या भारतातील प्रमुख शहरांतून त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार केला होता.

१९८४ साली पं. आप्पा जळगावकर व पं. श्रीकांत देशपांडे व शीला देशपांडे यांच्या सहकार्यामुळे पं. पांडुरंगजींना अमेरिकेत जाण्याचा योग आला. मुखडेच साथीला हवेत हा श्रीकांतजींचा आग्रह होता. त्यामुळे हे तिघेही अमेरिकेला निघाले. कॅनाडातील रागमाला संस्था, डॉ. जगन्नाथ वाणी तसेच सिअॅटल येथील रागमाला व त्यांचे रमेश गांगोली यांच्या निमंत्रणाहून हा दौरा आखण्यात आला होता. ज्या पांडुरंगजींनी आजपर्यंत उजनी ते लातूर सायकल व बैलगाडीतून प्रवास केला तेच पांडुरंगजी आज डेल्टा विमानात बसून सातासमुद्रापलीकडे अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अमेरिकेत व कॅनडा या देशात जात होते. इंग्रजी भाषेची अडसर होती पण मित्राच्या सहकार्यामुळे व स्वतःच्या

अनुभवातून बऱ्यापैकी इंग्रजी बोलता येऊ लागलं. उजनीसारख्या खेड्यातील पोरगं आज अमेरिकेत जातंय याचा आप्पांनाही मनस्वी आनंद झाला. १६ तास विमानातून प्रवास करून ते अमेरिकेत पोहोचले. यासंदर्भात 'प्रकाशमान तरीही अप्रकाशित' या सदरात पं. डॉ. विकास कशाळकर यांनी 'फरमाईशी मुखडे' या मथळ्याखाली सुंदर वर्णन केले आहे. ते असे की पं. आप्पा जळगावकर कौतुकाने म्हणाले "पांड्या, अरे आज तुझं केवढं भाग्य की तू न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहरात तबला वाजवणार आहेस," सुप्रसिद्ध हार्मोनियमवादक पं. आप्पा जळगावकर पांडुरंग मुखडेंशी अमेरिकेच्या राजधानीच्या शहरात बोलत होते. बोलता बोलता टपकन त्यांच्या डोळ्यांतून दोन अश्रू बाहेर पडले. पांडुरंग मुखडेसारखा एक हजार घरांची वस्ती असलेल्या उजनी गावातलं एक शेतकऱ्याचं पोर पुण्यात तबला शिकण्याच्या जिद्दीने येतं काय आणि प्रचंड मेहनतीने तबला वादन आत्मसात करून श्रीकांत देशपांडे यांच्या गायनाला साथसंगत करायला जातं काय. सारचं विलक्षण.

गावातील श्री. गणेशनाथांच्या कृपेने येथे येणे झाले म्हणून ते मैफील सुरू करण्यापूर्वी श्री गणेशनाथांचे मनोमन स्मरण करीत असत मगच तबला वाजवीत असत.

खरोखरच पं. पांडुरंगजी यांच्या आयुष्यात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा हा दौरा ठरला. अमेरिका व कॅनडातील २० शहरांमधून त्यांचे कार्यक्रम झाले. कॅनडात १३ व अमेरिकेत १० कार्यक्रम झाले. डॅलस व सिॲटल येथील जाहीर मैफीली सुंदर झाल्या. ते केवळ मैफीली करूनच थांबले नाहीत तर त्यांनी मॅनिटोबा विद्यापीठात ४ दिवसांचे संगीत विषयाचे शिबिर चालविले. सायंकाळी सात ते साडेआठ या वेळेत पं. श्रीकांतजी गायन, मुखडे तबला तर आप्पा पेटीवादन शिकवीत होते. भारतीय संगीताची माहिती देत होते, चर्चा करीत होते. याहिवेळी प्रश्नोत्तरे होत असत. याही शिबिराला खूप प्रतिसाद मिळाला. अशा प्रकारे ६० दिवसांचा हा सांगीतिक दौरा करून ते मायभुमीत परतले.

पं. आप्पा जळगावकर, पं. श्रीकांत देशपांडे व पं. पांडुरंग मुखडे यांच चांगलच ट्युनिंग जमल होतं. तिघांच्या मैत्रींची वीण घट्ट होत चालली होती. पं. आप्पा हे दोघांपेक्षा वयाने मोठे होते पण ते हास्य विनोदात मित्रांप्रमाणेच रहात होते. यासंदर्भात पं. श्रीकांत देशपांडे यांच्या पत्नी देशपांडे म्हणतात, "अमेरिकेत जशा संगीताच्या मैफीली रंगल्या तशा यांच्या गप्पांच्या मैफीली व जुगलबंदी. आप्पा पांडुरंगजी, श्रीकांतजी आप्पा, श्रीकांतजी पांडुरंगजी अशा जुगलबंदीसुद्धा रंगल्या."

अशा प्रकारे लातूरच्या या भुमीपुत्राने भारताबरोबरच विदेशातसुद्धा भारतीय संगीताचा



प्रचार व प्रसार करून मोलाचे योगदान दिले.

* **आकाशवाणी व दूरदर्शनच्या माध्यमातून संगीताचा प्रचार :**

पं. पांडुरंग मुखडे यांनी १९७५ साली आकाशवाणीची आकाशवाणी 'ए' ग्रेड कलाकार बी श्रेणी प्राप्त केली. त्यांनी उ. फैय्याज हुसेन खाँ (व्हायोलिन वादक) यांच्यासमवेत साथसंगत केली ज्याचे आकाशवाणी केंद्रावरून प्रसारण झाले. त्याचबरोबर १९८१ साली मालती पांडे, बर्वे यांच्याबरोबर तबल्याची साथ केली. या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रसारण दूरदर्शनवरून झाले. त्याकाळात रेकॉर्डिंग हा प्रकार नव्हता. त्यामुळे कार्यक्रमांचे सरळ प्रक्षेपण व्हायचे. बालचित्रवाणी या कार्यक्रमातूनही त्यांनी अनेक वेळा सादरीकरण केले. त्यामध्ये '१० तालवाद्यांची ओळख व वादन' हा कार्यक्रम लोकप्रिय झाला. या कार्यक्रमात त्यांनी लेझीमची हालगी, टिपऱ्यांची हालगी, लोकनृत्यातील डिमडी, खंजिरी, ढोल, तबला, ढोलकी, पखावज आदी वाद्यांचे वादन केले होते.

* **संगीत विद्यालयांची स्थापना :**

पुण्यात आल्यानंतर पं. ना. वा. दिवाण या देव माणसाचा पं. पांडुरंगजी यांचा परियच झाला. त्यांनी पांडुरंगजींना मोलाचे मार्गदर्शन केले. केवळ शिकत राहू नका तर परीक्षांही द्या असा मोलाचा सल्ला दिला. पांडुरंगजीने परीक्षा फॉर्मवर केवळ सही केली. परीक्षा शुल्क दिवाण सरांनीच भरले. ते अलंकार झाले. आता तुला मिळालेली विद्या सर्वांना वाट, असा त्यांनी सल्ला दिला. त्यानंतर परीक्षक म्हणून काम कर म्हणून त्यांनी त्यांना परीक्षक केले. किंबहुना त्यांनी परीक्षा कशी घेतात हे समजविण्यासाठी पहिली नियुक्ती त्यांच्याच केंद्रावर केली. अशाप्रकारे परीक्षार्थी, गुरू ते परीक्षक हा प्रवास पूर्ण करण्यासाठी त्यांचे पांडुरंगजींच्या आयुष्यात मोलाचे योगदान आहे.

संगीत विद्यालय सुरू करण्यापूर्वी ते विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन विद्यार्थ्यांना शिकवायचे. यासंदर्भातअमेरिकेतील शिकागो शहरात राहणारे त्यांचे ज्येष्ठ शिष्य श्री. धनंजय कुंटे सांगतात, "मी १२ वर्षांचा असताना साधारणतः १९८३ सालापासून मी गुरुजींना ओळखतो. सुरुवातीला ते जेव्हा पुण्यात आले तेव्हा त्यांना स्वतःला राहायला जागा नव्हती. एका जिण्याच्या खाली एक छोटीशी खोली होती. तिथे क्लास घेणे शक्य नव्हते म्हणून ते माझ्या घरी येऊन मला शिकवायचे. गुरुजी आले की माझे शिकणे सुरू व्हायचे. त्याचे समाधान जोपर्यंत होत नव्हते तेवढी वेळ ते मला शिकवायचे. त्यांनी कधीही पैशांचा मुलाहिजा केला नाही. त्याकाळात १ रुपया प्रतिमाह गुरूदक्षिणा माझे वडील देत होते. परंतु

गुरुजींनी कधीही फीस वाढवा असे म्हटले नाही. उलट दोन वर्षांनी माझे वडील त्यांना म्हणाले, "गुरुजी तुम्ही दोन वर्षांपासून फीस वाढवली नाही." त्यावर ते म्हणायचे, "धनंजय हा चांगला वाजवतोय हेच महत्त्वाचे आहे. मला पैशांची अपेक्षा नाही. तुम्हाला वाढीव फीस द्यायची इच्छा असेल तर द्या."

यावरून आपणास असे लक्षात येते की, पं. पांडुरंगजी यांनी पैशांसाठी कधीही शिकविले नाही. त्यांनी त्यांच्या आयुष्यात व्यावसायिकता आणली नाही.

अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा, आपल्याला मिळालेले ज्ञान पुढील पिढीकडे सुपूर्द करावे या उदात्त हेतूने पं. पांडुरंग मुखडे यांनी १९७३ साली 'संगीत कला विद्यालयाची' सुरुवात केली. जे पुण्यातील नामांकित संगीत विद्यालय आहे. या विद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी अनेक शिष्य घडविले. तसेच गुरुपौर्णिमा, विद्यालयाचा वर्धापणदिन असे अनेक कार्यक्रम घडवून आणले. ज्यामुळे त्यांच्या नवोदित शिष्यांना आपली कला सादर करण्यासाठी मुक्त व्यासपीठ मिळाले.

यासंदर्भात त्यांचे शिष्य हर्षद कानेटकर म्हणतात, "१९८२ पासून मी मुखडे सरांकडे तबला शिकण्यास प्रारंभ केला. टिळक रोडवरील शिंत्रे यांच्या घरी तबला वादनाचे वर्ग चालायचे. ते आम्हाला उपाशी विठोबा मंदिरात वाजवायला लावायचे. यामुळे आमच्यात सभाधीटपणा आला."

याबरोबरच कु. नालंदा जोगळेकर या त्यांच्या शिष्या म्हणतात, "मी विशारद गुरुजींमुळेच झाले. आम्ही गुरुपौर्णिमेला अनेक श्रेष्ठ कलावंतांपुढे वाजवायचो. त्याचा आनंद तर आम्हाला होता; परंतु त्या ज्येष्ठांचे गायन-वादन आम्हाला जवळून ऐकता आले. पं. अनिंदो चॅटर्जी, पं. वसंतराव घोरपडकर, पं. भाई गायतोंडे, पं. आनंद बदामीकर, पं. सुधीर संसारे अशा थोर कलावंतांचे वादन आम्ही समोर बसून ऐकू शकलो."

एवढेच नव्हे तर अनेक थोर कलावंताचे गायन-वादनाचे कार्यक्रम घडवून आणले. या संगीत विद्यालयाचा रौप्यमहोत्सव मोठ्या थाटामाटात भरत नाट्यमंदिरात १९८८ साली संपन्न झाला. यात प्रसिद्ध गायक रामदास कामत, बकुळ पंडित व प्रभाकर करंदीकर यांनी मैफील रंगवली. " संस्कृती वृद्धींगत करणाऱ्यांचा हा सोहळा आहे. आपण कुणाचे तरी देणे लागतो याचे भान ठेवून ते कला साधनेलाच मोठे करीत आहेत. कालेच्या ध्यासाने फूटपाथवर राहून स्वत: अध्ययन तर केलेच पण अनेक विद्यार्थ्यांबरोबरच पत्नीलाही तबलावादन शिकविले हे कलेची सेवा करणारे दांपत्य आहे." असे प्रतिपादन नाट्य



समीक्षक व सकाळचे वृत्तसंपादक सुरेशचंद्र उपाध्ये यांनी या वेळी केले होते.

याच रौप्यमहोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमात 'श्री. पांडुरंग मुखडे गौरव अंक' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले होते.

***   भरतनाट्य संशोधन मंदिरातून संगीताचा प्रचार :**

पुण्यात भरतनाट्य संशोधन मंदिरही नावाजलेली संस्था आहे. या संस्थेतूनसुद्धा पं. पांडुरंग मुखडे यांनी तबलावादनाचे गुरू म्हणून कार्य केले व आजही ते अविरत चालू आहे. काही संगीत विद्यालयातून त्यांनी अनेक शिष्य घडविले. विविध सांगीतिक उपक्रम राबविले. २०११ साली या विद्यालयाचा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यालयाच्या आजी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंना म्हणजेच पं. पांडुरंग मुखडे यांना मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी झपताल, एकताल व पंचमसवारीसारख्या तालांचे सादरीकरण केले. शिस्तबद्ध समूहवादनाने भरत नाट्य मंदिरातील वातावरण बदलून गेले होते.

कार्यक्रमात मुखडे यांचे शिष्य प्रशांत पांडव, उ. गुलाम रसूल खाँ यांचे नातू उ. सलीम अख्तर व योगेश समसी यांचे तबलावादन झाले. विद्यालयाचे गुरू पं. पांडुरंग मुखडे यांची लिहिलेल्या 'तबलावादन भाग -२' या पुस्तकाचेही प्रकाशन त्या वेळी करण्यात आले. पं. मुखडे यांचा विद्यालयाशी आणि विद्यार्थ्यांशी असलेले नाते, प्रेम याचा वेध घेणारी चित्रफीत या वेळी प्रदर्शित करण्यात आली. या कार्यक्रमाचे खुमासदार निवेदन प्रसिद्ध निवेदक आनंद देशमुख यांनी केले होते.

अशा प्रकारे पं. मुखडे यांनी भरतनाट्य संशोधन मंदिरातून तबला शास्त्रोक्त तबलावादनाचा प्रचार व प्रसार केला. त्यांच्या या कार्यामुळे कार्यकारणी नियामक मंडळावर सदस्य म्हणूनही त्यांची नियुक्ती करण्यात आली.

***   स्वरानंद - सासवड संस्थेतून संगीताचा प्रचार :**

पुणे जिल्ह्यातील सासवड या छोट्याशा गावात पं. के. एन. बोळंगे, रसिकाग्रणी नाना महागावकर यांच्या संकल्पनेतून स्वरानंद - सासवड सरस्वती संगीत विद्यालयाची स्थापना करण्यात आली होती. अशा या खेड्यातील संगीत विद्यालयातून पं. पांडुरंग मुखडे यांनी विद्यार्थ्यांना तबलावादनाचे धडे दिले. त्यांनी तेथे केलेले कार्य कौतुकास्पद आहे. त्यांनी साधारणत: १९८४-८५ पासून सात-आठ वर्षे गावात शास्त्रीय संगीताचे व भजनाचे कार्यक्रम आयोजित करून लोकांचा प्रतिसाद अजमावून पाहिला. तो वाढत

असल्याचे पाहून त्यांचा उत्साह वाढला. पुण्यातील रसिकांना श्री पांडुरंग मुखडे तबला साथीदार म्हणून परिचित आहेत. परंतु सासवड येथे त्यांनी केलेले कार्य त्यांच्या तबलावादना इतकेच किंबहुना अधिकच महत्त्वाचे आहे.

त्यांनी सासवड येथे राहून विद्यार्थ्यांना संगीताचे ज्ञानामृत पाजलेच पण याचबरोबर तेथे वर्धापणदिनाचे औचित्य साधून विविध गायक वादकांना पाचारण केले. अभिजात प्रसार तेथील ग्रामीण रसिकांत वाटला. अगदी स्वरानंद सासवड संगीत विद्यालयाच्या दशकपूर्तीपर्यंत म्हणजे १९९६ पर्यंत त्यांनी तेथे अभिजात संगीताच्या प्रचारार्थ कार्य केले.

* **गीतमंचाद्वारे संगीताचा प्रचार व प्रसार :**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे ते १९८७ पासून 'गीतमंच' या विभागात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्यरत होते. 'एक सूर एक ताल' अशा संकल्पना घेऊन त्यांनी महाराष्ट्रातील हजारो संगीत शिक्षकांना प्रशिक्षित केले. या प्रशिक्षणाचे कार्यक्रम चालू असताना त्यांनी त्या त्या शहरातील संगीततज्ज्ञांना सन्मानाने आमंत्रित करून त्यांच्याही मार्गदर्शनाचा कार्यक्रम शिक्षकांसाठी आयोजित केला. पुण्यात पं. भीमसेन जोशी, पं. सुधीर मोघे, गंगाधर म्हात्रे, मुंबईत पं. सुरेश वाडकर, पं. अजय पोहनकर, पं. रविंद्र साठे, पं. रोहिणी भाटे, संगीतकार राम कदम, पं. विकास कशाळकर, यशवंत देव अशा मान्यवरांना त्यांनी निमंत्रित केले व त्यांच्या ज्ञानाचा लाभ प्रशिक्षणार्थींना करून दिला. या प्रशिक्षणाच्या निमित्ताने ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव, गंगाधर महांबरे, सुधीर मोघे वसंत शेलार अशा थोर व्यक्तींचा त्यांना सहवास लाभला. २०११ साली ते या पदावरून सेवानिवृत्त झाले.

एवढेच नाही तर ललीत कला केंद्राने त्यांना मानद गुरू म्हणून नियुक्त केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थ्यांनी एम. ए. तबला ही पदवी प्राप्त केली.

* **श्री. गणेशनाथ संगीतोत्सवाचे आयोजन :**

पं. पांडुरंग मुखडे यांचे कितीही मोठे नाव झाले असले तरी त्यांना आपल्या जन्मभूमीचे नाते तोडले नाही. ज्या उजनी गावात त्यांनी श्री गणेशनाथ महाराजांच्या साक्षिने वादन सुरू केले त्या गावात ते आजही उत्सवानिमित्त कर्तव्यभावनेने जातात. १९६३ सालापासून डॉ. सिद्रामप्पा व डॉ. शिवप्पा धोत्रे यांनी या उत्सवास प्रारंभ केला. या उत्सवासाठी पं. मुखडे मोलाचे योगदान देत आले आहेत. अलिकडे कांही वर्षापासून डॉ. जगदीश पाटील व गावातील काही मंडळी आर्थिक मदत करतात. श्री गणेशनाथ महाराजांच्या चरणी लीन



होण्यासाठी दिवाळीच्या प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत १५ दिवस हा उत्सव चालतो. यात १४ दिवस भजन कीर्तन असे कार्यक्रम होतात. शेवटच्या दिवशी म्हणजेच पौर्णिमेच्या रात्री मात्र अभिजात शास्त्रीय संगीताची मैफील होते. या महोत्सवास पं. मुखडे हे स्वतः तर हजेरी लावतातच; परंतु ग्रामीण भागातील श्रोत्यांना उत्तमोत्तम ऐकता यावे यासाठी ते नामवंत कलावंतसुद्धा घेऊन येतात. यात आतापर्यंत पं. के. एन. बोळंगे गुरुजी, पं. श्रीकांत देशपांडे, श्री शंकर वैरागकर, पं. नाथराव नेरळकर, डॉ. विकास कशाळकर, डॉ. सुहासिनी कोरटकर, हेमंत पेंडसे, अनुराधा मराठे, पं. प्रभाकर कारेकर संगय्या स्वामी, गणपती भट आनंद भाटे, उ. उस्मान खाँ, राहूल सोलापूरकर, रामदास कामत, राजीव परांजपे आदी कलावंतानी येथे अत्यंत श्रध्देने हजेरी लावली आहे. या सोहळ्याच्यासंदर्भात 'दै. सकाळ' वृत्तपत्रात लिहिले आहे. संत गणेशनाथ महाराज यांच्या समाधी सोहळ्याची सांगता शास्त्रीय मैफीलीने झाली. यात पं. रामदास कामत व पं. गणपती भट यांनी आपल्या स्वर सेवेने रंगत आणली... त्यांना तबल्याची साथ पांडुरंग मुखडे यांनी केली. गेली ५२ वर्षापासून कलाकारांना आमंत्रित करणे महाराजाची सेवा म्हणुन गायकाबरोबर तबला साथसंगत करणे हा त्यांचा दरवर्षीचा अशा प्रकारे पं. मुखडे उजनीसारख्या ग्रामीण भागात श्री गणेशनाथ मंदिराच्या उत्सवानिमित्त अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. त्यांनी श्री गणेशनाथ महाराजांच्या भजनाची सी. डी. सुद्धा प्रकाशित केली आहे.

* **अ. भा. गांधर्व मंडळाच्या माध्यमातून संगीत प्रचार :**

पं. मुखडे हे अनेक वर्षांपासून अ.भा. गांधर्व मंडळाशी संबंधित आहेत. सुरुवातीपासूनच ते परीक्षक म्हणून कार्यरत आहेत. पुढे २०१४ मध्ये मंडळाच्या निवडणुकीत ते विजयी झाले (संपूर्ण भारतातून निवडणूक असते) व सध्या ते मंडळाचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी संगीत शिक्षकांसाठी नामांकित कलावंताचे दर्जेदार कार्यक्रम व शिबिराचे आयोजन केले व शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे कार्य हाती घेतले. 'तिहाई व चक्रधार' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले ज्यात पं. सुरेशजी तळवलकर व पं. भाई गायतोंडे अशा मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. अशा प्रकारे ते गांधर्व मंडळाच्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **एक आदर्श गुरू :**

एक आदर्श कलावंत हा आदर्श गुरू असेलच असे नाही; परंतु पांडुरंग मुखडे यांच्या संगीत विद्यालयाची परंपरा व त्यांच्या शिष्यांवर सहज नजर फिरवली असता असे

लक्षात येते की ते एक आदर्श गुरू म्हणून नावारूपाला आले. नोकरी, कार्यक्रमानिमित्तचे दौरे याबाबी सांभाळून एका व्रताप्रमाणे त्यांनी जवळील ज्ञान शिष्यांना दिले. वैयक्तिक कला जीवनातील यशशिखरे गाठताना त्यांनी ज्ञानदानाचे कार्यही तितक्याच निष्ठेने व श्रध्देने अविरतपणे केले म्हणूनच त्यांच्या दोन्ही संगीत विद्यालयांचा रौप्यमहोत्सवी समारंभ यशस्वी झाला. शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत नाट्यसंगीत, भजन, कीर्तन, नृत्य, सुगम संगीत या सर्व प्रांताची मुशाफिरी करताना आपल्या कलेचा वारसा त्यांनी आपल्या शिष्यांना दिला आहे. त्यातील काहीजण अमेरिकेत आहेत. गिरिश महामुनी, राजगोपाल गोसावी, श्रीरंग चासकर, शंतनू खरे, हर्षद कानेटकर व प्रशांत पांडव असे अनेक शिष्य सर्वत्र मैफीली गाजवत आहेत.

त्यांचे ज्येष्ठ शिष्य श्री. प्रशांत पांडव म्हणतात, "मी १२ व्या वर्षी पं. आप्पा जळगावकरांकडे साथीसाठी जात होतो. तेव्हा पं. आप्पांनी मला मुखडे गुरुजींकडे जाण्याचा सल्ला दिला. मी ७ वर्षे नियमित क्लासवर जाऊ लागलो. पुढे मी साथी करू लागलो. शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमात गेल्यानंतर मुखडे गुरुजींचे नाव निघायचे तर सुगम संगीताच्या कार्यक्रमात 'स्वदानंद' मध्ये वाजवित होते अशी त्यांची सर्वत्र ख्याती होती. अजित सोमणांकडे बोलता बोलता विषय निघाला. मी गीत रामायण ऐकून ऐकून वाजवत आहे. त्यावर ते म्हणाले, "अरे तुझ्या गुरुजींकडे सर्वकाही आहे तू त्यांच ऐक."

यावरून असे लक्षात येते की, ते त्यांची ख्याती चतुरस्त्र तबलावादक म्हणून सर्वत्र होती.

त्यांचे शिष्य श्री. शंतनू खेर म्हणतात, "मी १९९२ पासून त्यांच्याकडे तबला शिकायला सुरुवात केली. गुरुजी आम्हाला काळी एक, काळी दोनचा तबला घेऊन ये असे म्हणायचे. कोण गाणार, काय गाणार हे सांगायचे नाहीत. शास्त्रीय, सुगम, भजन की गजल गाणार याचा अंदाज नसायचा. कोणत्याही गीत प्रकाराला वाजवता आले पाहिजे असे ते म्हणायचे."

अशा प्रकारे आपला विद्यार्थी सर्वांगी असावा, तो कोठेही आडू नये हा यामागचा त्यांचा प्रामाणिक हेतू होता. असाच एक प्रसंग त्याचे शिष्य श्री. धनंजय कुंटे यांनी सांगितला." एकदा मला गुरुजींनी तबला घेऊन व कुर्ता घालून तयार हो असे सांगीतले. मी तयार झ ाालो. त्यांनी मला गाडीवर मागे बसवले, मला उपाशी विठोबाच्या मंदिरात नेहले. तेथे पं. भीमसेन जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. गजाननराव वाटवे असे अनेक थोर गायक



वादकांनी हजेरी लावली होती. मी त्यांना विचारले, "तुम्ही वाजवणार आहात का?" त्यावर ते म्हणाले, "मी नाही, तू वाजवणार आहेस." मी घाबरत म्हणालो, "मी कसा वाजवू." "तू रियाज कसा करतोस तसेच वाजव", असे म्हणून ते उतरले. मी कसा बसा वाजवायला तयार झालो. मी स्वरमंचावर बसलो तेव्हा पुढे साक्षात पं. लालजी गोखले दिसले. माझ्या नंतर तेच तबला वाजविणार होते. ते मला म्हणाले, "तुम्ही तबला वाजवणार आहात का?" आता मात्र मला घाम फुटला, हात पाय थरथरू लागले. त्यावर गुरुजी म्हणाले, "तू घाबरू नकोस, समोर लालजी बसले म्हणून आपले कायदे बदलणार नाहीत. तू जसा रियाज करतोस तसाच वाजव." आणि गुरुजींनी लेहरा वाजवला व मी अर्धा तास तीनताल वाजविला. तो माझ्या आयुष्यातला पहिला स्वतंत्र वादनाचा कार्यक्रम ठरला.

यावरून आपणास असे म्हणता येईल की कोणता विद्यार्थी वादन करू शकतो, त्याची भीती कशी घालवायची, त्याला प्रोत्साहन कसे द्यायचे हे पं. पांडुरंगजी यांना माहीत होते. त्यामुळेच शेकडो शिष्य तयार झाले.

ते आपल्या सर्व विद्यार्थ्यांना तबलावादना बरोबरच लेहरा कसा वाजवायचा हे शिकवायचे. दुसऱ्या कलावंताला बोलावून त्याला बिदागी देण्यापेक्षा आपले सर्व शिष्य लहरा वादनात तरबेज झाले पाहिजेत असा त्यांचा अट्टहास होता. त्यामुळे लेहऱ्याचा व तबलावादनाचा कसा संबंध असतो याचेही ज्ञान विद्यार्थ्यांना होते. त्यांनी अनेक नवीन रचना केल्या पण जुन्या रचनांची तोडफोड केली नाही. ज्यांनी त्या तयार केल्या त्यांचा आदर ठेवला पाहिजे, रचनेचे पवित्र्य जपले पाहिजे, त्याच सौंदर्य कायम राहिले पाहिजे, त्यात तोडफोड केली तर त्यांची नैसर्गिकता टिकून राहणार नाही. त्यात सहजता येणार नाही असे करणे म्हणजे संगीताची सेवा करण्याऐवजी हानी करण्यासारखे आहे असे त्यांचे मत आहे. शिष्यांनी नवीन रचना तयार केल्या तर त्यांना आनंद वाटायचा. एवढेच नव्हे तर काही सुधारणा असतील तर त्या करून द्यायचे.

काही शिष्य रात्रंदिवस रियाज करायचे तेव्हा नकळतच त्यांच्या देहबोलीतून अहंकार दिसून यायचा. अशा वेळेस ते त्यांना सांगली येथे तबला वादनाच्या स्पर्धेसाठी घेऊन जायचे. तेथे श्री. रमेश गोखले हे 'संगीत साधना' या संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावरील तबलावादनाच्या स्पर्धा घ्यायचे. तेथे आलेले बनारस, लखनौ, हैद्राबादचे स्पर्धक व त्यांची तयारी पाहून शिष्यांचे गर्वहरण व्हायचे. तेथील स्पर्धा पाहून शिष्य जमिनीवर यायचे. ते शिष्यांना बोलू शकले असते; परंतु न बोलताही ते शिष्यांना अशा पद्धतीने धडा द्यायचे.

अर्थात पुढे याही स्पर्धेत त्यांच्या शिष्यांनी अनेक पारितोषिके पटकावली. त्यांनी शिष्यांचे तोंडावर कधीही कौतुक केले नाही. यश डोक्यावर शिरले की प्रगती थांबते असे त्यांचे मत होते. पारंपारिक तबला टिकविण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. उ. गुलाम रसूल खाँ यांच्या ध्वनीफीती ऐकल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांनी त्या रचना जशाच्या तशा आपल्या शिष्यांना शिकविल्या आहेत.

त्यांच्या ३५ विद्यार्थ्यांनी तबला विशारद ही पदवी प्राप्त केली तर काही विद्यार्थ्यांनी तबला अलंकार ही पदवी संपादन केली आहे. त्यापैकी धनंजय कुंटे हे मागील १६ वर्षापासून अमेरिकेतील शिकागो शहरात तबला वादनाचा प्रचार व प्रसार करीत आहेत. भूषण आपटे, श्रीरंग चासकर, शंतनू खेर, राजगोपाल गोसावी, संजीव दाभोळकर, श्री. निवास भिडे, प्रशांत पांडव, गिरिश महामुनी, विकास कुचेकर हे उत्तम स्वतंत्रवादन व साथसंगीतकार म्हणून परिचित आहेत. विकास कुचेकर हा त्यांचा शिष्य म्हणतो," पं. पांडुरंग मुखडे गुरुजी हे माणूस बनविणारे गुरू असून ते अभ्यासू तबला वादक आहेत. ते शिष्यांसमवेत एखाद्या मित्राप्रमाणे राहतात."

त्यांचे शिष्य गिरीष महामुनी म्हणतात," या ग्लॅमरच्या युगात गुरुजींनी कधीही साज बाज केला नाही. त्याचे साधेपण हाच त्यांच्या व्यक्तित्त्वाचा दागिना आहे. गुरुजींनी आम्हाला स्वतंत्र वादनाचाच रियाज कर, शास्त्रीय संगीताचीच साथ करायला हवी असे न म्हणता आधुनिक काळात पोट भरण्यासाठी ज्या ज्या गीत प्रकारांची साथ आवश्यक आहे ती साथसंगत त्यांनी आम्हाला शिकविली व तसे वादन करण्याचे त्यांनी आम्हाला स्वातंत्र्य दिले."

यावरून त्यांच्या खुल्या दिलाच्या स्वभावाचे दर्शन घडते. आपले शिष्य उपाशी राहू नयेत याचीही ते काळजी घेतात असे दिसून येते. खरोखरच त्यांची वेषभूषा व त्यांचा स्वभाव पाहिल्यानंतर आधुनिक युगातील रितीरिवाज, भपकेबाजपणा याचा लवलेशही त्यांच्यात दिसत नाही.

अमित लिमये हे त्यांचे शिष्य म्हणतात," पं. मुखडे गुरुजींचा आम्हाला खूप सहवास लाभला. त्यांच्या सहवासातून जे आम्ही शिकलो ते कोणत्याही वही पुस्तकातून शिकता येणार नाही. त्यांनी आम्हांला शिकविताना कधीही कंटाळा केला नाही. ही क्लासची चावी घे, मी थोड्या वेळाने येतो. असा आळस केला नाही."

खरोखरच त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून विद्यार्थ्यांना त्यांनी भरपूर वेळ दिला.



त्यांच्या पत्नी सौ. महानंदा मुखडे म्हणतात, "रात्री कार्यक्रमासाठी कितीही वेळ जागरण झ ाले, प्रवासामुळे थकवा आला तरी पहाटे ५.०० वा. उठत व रोजच्या दिनक्रमात कधीच कंटाळा केला नाही. सतत संगीताचा ध्यास, शोधकवृत्ती, सहनशीलता, संयमीवृत्ती, मनाचा मोठेपणा, क्षमासीलता हे गुण परमेश्वरांनी त्यांच्याकडे पुरेपूर दिले आहेत. तसेच परिस्थिती कशीही असो आपल्या ध्येयापासून डळमळीत होत नाहीत, स्थिर असतात. खंबीर, शांत राहतात. हा ही गुण मी अनुभवत असते. लोकांना शक्य असले तेवढी निस्वार्थ भावनेतून मदत करणे."

ते उत्तम संयोजक आहेत. छोट्या मैफीलीपासून मोठ्या कार्यक्रमापर्यंतचे नियोजन व त्याचा क्रम लिखित स्वरूपात तर असतोच पण त्या कार्यक्रमासाठी लागणारी तयारी महिना, दोन महिने डोक्यात ठेवून केली जाते. त्यामुळे त्यांनी केलेले एकूण एक कार्यक्रम यशस्वी झाले. लोकांना आनंद देऊन गेले. अजूनही अनेक कार्यक्रम लोकांच्या पक्के स्मरणात आहेत. जुनी जाणती मंडळी जेव्हा आम्हाला कार्यक्रमाच्या निमित्त्याने भेटतात. तेव्हाच्याही आठवणी सांगत असतात व मलाही हे सर्व ऐकून पाहून धन्य - धन्य झाल्यासारखे वाटते. सरांकडून खूप काही शिकायला मिळाले. अनुभवायला मिळाले. याचा मला मनोमन आनंद आहे व अभिमानही आहे.

गुरू म्हणूनही मला त्यांनी खूप आत्मीयतेने तबला व गायनाचे धडे दिले. मी काहीतरी करावे ही त्यांची तळमळ मला जाणवते. पण एक कलाकार असल्यामुळे मी घरातली बाजू सांभाळते. पत्नी म्हणून माझ्या सहकार्याबद्दल ते कौतुक करतात पण शिष्य म्हणून त्यांनी मला सतत प्रोत्साहनच दिले आहे. या नात्यातून गेली ३२ वर्षे हा प्रवास एकमेकांना समजून घेवून व एकमेकांच्या सहकार्याने संसाराचा व संगीताचा गाडा चालू आहे.

गुरूंनी दिलेली फरूखाबाद घराण्याची तालीम त्यांनी आपल्या रक्तात उतरविली. त्यांनी दिलेले बोल मनाच्या गाभाऱ्यात नंदादीपाप्रमाणे तेवत ठेवले. याची साक्ष त्या काळात त्यांनी तारीखनिहाय लिहून ठेवलेले बोल देतात.

त्यांनी गुरूसेवा करून गुरूसहवासात अधिक काळ राहून ज्ञान संपादन केले. पण काळ बदलला आधुनिक युगात विद्यार्थ्यांना वेळ मिळेनासा झाला. यासाठी त्यांनी वेगळी पद्धत अवलंबिता येते का याचा विचार केला. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेत ज्या शैक्षणिक साधनांचा वापर केला होता. तसाच वापर येथे

करता येईल का म्हणून त्यांनी 'ताल तरंग व तबला वादन' या दोन ध्वनिफिती काढल्या. तर 'तबलावादन' हे तबल्यांच्या बोलांचे पुस्तक प्रकाशित करून गुरूकडून मिळालेले संगीतरूपी धन त्यांनी समस्त विद्यार्थ्यासाठी खुले करून दिले.

संगीताचे धडे देत असताना ते विद्यार्थ्यांना सांगतात, "तबलावादकाला कमीत कमी सूर कळला पाहिजे. घराण्यानुसार लय व ठेका कसा असावा याचे चिंतन व्हायला हवे. संगीताला भाषा नसते भावनाही स्पष्ट शब्दांत सांगता येत नाहीत. पण ज्याप्रमाणे एखाद्या घागरीत थेंब थेंब पाणी साचते व घागर भरून वाहायला लागते तसे विद्यार्थ्यांनी श्रवण, चिंतन व रियाजाने स्वतःला भरले की त्यातून संगीत प्रकट होत असते." यावरून त्यांचे संगीताबद्दलचे चिंतन लक्षात येते.

या आदर्श गुरूंना दि. ५ डिसेंबर २०११ रोजी भरतनाट्य संशोधन मंदिर, तबला विद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सर्व विद्यार्थ्यांनी एक भावपत्र दिले. ते असे "आदरणीय गुरुजी तुमचं आणि आमचं अगदी जन्मो-जन्मीचं नात आहे. पण जेव्हापासून आठवतोय तो कालखंड, तालाचे मापदंड, सुरांचे अंतरंग, लयीचे तरंग... सारं सारं काही कोरलं गेलयं... आणि घडत गेली असंख्य शिल्प. आमच्या काही तरी असण्यामागे ऊर्जा आहे, प्रेरणा आहे, दिशा आहे, तुमच्या दिग्गजांबरोबरच्या रंगलेल्या असंख्य मैफिली, त्यांच्यात समरसून झालेली संगती, म्हणूनच खोलवर रूजलेली नाती. इतक सारं घडूनही चैत्रात फुललेल्या पालवीप्रमाणे अजून काही करण्याची तुमची ऊर्मी सदैव अशीच बहरत राहो. अगदी रौप्य महोत्सवाप्रमाणे सुवर्णमहोत्सवी आणि हिरक महोत्सवीसुद्धा."

* **मानसन्मान व पुरस्कार :**

पं. पांडुरंग मुखडे यांनी अभिजात संगीताची मनापासून सेवा केली. त्यामुळे त्यांना अनेक मानसन्मान मिळाले.

०१. १९८५ साली गानसरस्वती किशोरीताई अमोणकर यांच्या हस्ते सुरेल सभा या संस्थेच्या 'युवा गुणवंत कलाकार' या पुरस्काराने ते सन्मानित झाले.

०२. दि. ११ ऑक्टोबर १९९४ रोजी भरतनाट्य संशोधन मंदिर पुणे यांच्या ११० वर्ष सांगता समारंभात त्यांना बबनराव गोखले पुरस्कृत 'उत्कृष्ट संगीत साथ कलाकार' हा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

०३. पुणे महानगरपालिकेच्या वतीने पुणे शहराच्या कीर्तीत भर घातल्याबद्दल दि. १५ ऑगस्ट २०१३ साली 'उत्तम तबलाबादक' पुरस्कार प्रदान करण्यात आला.



०४. दि. ३१ ऑक्टोबर २००८ रोजी स्वरमयी गुरुकुल यांच्या वतीने 'अमृतप्रभा' या डॉ. प्रभा. अत्रे यांच्या अमृत महोत्सवी समारंभात सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला.

०५. सन २०१० साली कलाश्री संगीत मंडळ, सांगली यांनी 'कलाश्री' हा पुरस्कार उ. उस्मान खाँ यांच्या हस्ते प्रदान केला.

०६. दि. २७ नोव्हेंबर २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह, अंबाजोगाई यांच्या वतीने त्यांना यशवंतराव चव्हाण संगीत पुरस्काराने सन्मानित केले.

०७. अ. भा. गांधर्व महाविद्यालयाच्या सचिवपदी त्यांची निवड झाल्याबद्दल पुण्यातील ज्ञानवर्धन संस्थेच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

०८. दि. २७ डिसेंबर २०१५ रोजी अजरामर गदिमा - गीतांचा 'चार दशकपूर्ती सोहळा', स्वरानंद प्रतिष्ठान यांनी भरतनाट्य मंदिर, पुणे येथे साजरा केला. या सोहळ्यात त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

०९. शाहिर हिंगे प्रबोधिनी व सेवा मित्र मंडळ, पुणे यांच्या वतीने संगीत परंपरा समर्थपणे पुढच्या पिढीला देणारे ज्येष्ठ प्रशिक्षक व गुरू म्हणून मा. पांडुरंग मुखडे यांना २०१५ साली 'लोक शिक्षक पुरस्कार' सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

१०. ब्रम्हानंद संगीत महोत्सवात त्यांचा ज्येष्ठ गायक बबनराव हळदनकर यांच्या हस्ते २०१६ चा ब्रम्हानंद पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

११. अ.भा. नाट्य परिषद, पुणे शाखा यांच्या वतीने संगीत क्षेत्रातील दीर्घकालीन सेवेबद्दल 'कै. सौ माणिक वर्मा' पुरस्काराने दि. २५ मे २०१६ रोजी टिळक स्मारक येथे त्यांना सन्मानित करण्यात आले.

याबरोबरच ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे, नाट्यकर्मी प्रभाकर पणशीकर यासारख्या दिग्गजांनीसुद्धा त्यांचा सत्कार करून आशीर्वाद दिला.

* **गौरवोद्‌गार :**

०१. "पं. मुखडे यांना तबल्यातील कायदे माहीत आहेत पण गायन चालू असताना साथीदार म्हणून तिथे कोणते कायदे असतात, ते कसे पाळायचे हे त्यांना चांगले माहीत आहेत. स्वतःच्या शास्त्राला मुरड घालून मैफिली सजविण्याचे जे शास्त्र आहे त्यात त्यांचा कोणी हाथ धरेल असे वाटत नाही."

**- ज्येष्ठ संगीतकार पं. यशवंत देव**

०२. "पांडुरंग मुखडे यांना मी २५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून ओळखतो. त्यांचे अतिशय लाघवी व्यक्तिमत्त्व आहे. सर्व लोकांनी त्यांच्यावर मनापासून प्रेम केले आहे. तबला वादनाबद्दलची कळवळ, त्यांचे शिकविणे, उ. गुलाम रसुल खाँ यांच्याकडून घेतलेली विद्या यातील त्यांची श्रद्धा आणि निष्ठा मला महत्त्वाची वाटते."

**- तालयोगी पं. सुरेशजी तलवलकर**

०३. "पं. पांडुरंग मुखडे हे केवळ पं. भीमसेन जोशी, डॉ. वसंतराव देशपांडे व पं. जसराजजी यांच्याबरोबर वाजविल्यामुळे मोठे नाहीत. तर त्या लोकांनी त्यांच्या वादनाला जी पावती दिली त्या पावतीमुळे ते मोठे आहेत."

**- पं. डॉ. विकास कशाळकर**

०४. "मी १९७९ पासून 'मंतरलेल्या चैत्रबनात' या कार्यक्रमात मुखडे यांच्यासोबत काम करते. ते उत्तम साथीदार तर आहेतच पण ते एक कुटुंबवत्सल पिताही आहेत. ते आज ज्या उच्च पंक्तीत जाऊन बसले आहेत त्यामागे त्यांची कठोर साधना आहे."

**- सुप्रसिद्ध गायिका, अनुराधा मराठे**

०५. "पं. पांडुरंग मुखडे हे उत्तम लय देणारे, छान ठेका धरणारे, एक उत्कृष्ट तबला वादक आहेत. त्यांच्याशिवाय आमचा रियाज व कार्यक्रम अपूर्ण असतो. पं.आप्पा जळगावकरामुळे ते आमच्या संपर्कात आले. त्यांनी त्यांच्या वादनातून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली."

**- पं. शमा भाटे**

त्यांच्या या यशामागे आई वडिलांचे आशीर्वाद, गुरूवरील श्रद्धा, कठोर तपश्चर्या व मदत केल्याची जाण आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की पांडुरंग मुखडे यांनी उजनीसारख्या खेड्यातून जावून पुण्यासारख्या शहरात जम बसविणे ही सोपी गोष्ट नव्हती. पं. आप्पा जळगावकर व पं. श्रीकांत देशपांडे यांनी दिलेला आधार, ईश्वरकृपेने मिळत गेलेली संधी व त्यांच्या अथक परिश्रमामुळे ते प्रतितयश कलावंत होऊ शकले. अन्यथा भजनात वाजविणारे पखावज वादक अथवा गावातील संगीताचे मास्तर एवढेच त्यांचे कार्य सीमित झाले असते. लातूरच्या या भूमिपुत्राने केलेले सांगीतिक कार्य निश्चितच पुढील पिढीसाठी दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल यात शंकाच नाही.

♦ ♦ ♦



# प्रकरण १०



# पं. मुकेश जाधव

'कलावंत' हा जन्मावाच लागतो' याचे उत्तम उदाहरण म्हणजे पं. मुकेश जाधव. जिथे कोणत्याही सुखसुविधा नव्हत्या अशा छोट्याशा खेड्यात जन्माला आलेल्या, घरात सांगीतिक वातावरण नसलेल्या व एका मागासवर्गीय कुटुंबात जन्माला आलेल्या या कलावंताने वाटेत येणाऱ्या आडथळ्यांना लाथाडून, स्वपरिश्रमाने संगीत क्षेत्रात एक अढळ स्थान प्राप्त केले. 'मागासवर्गीय जातीची' लागलेली लक्तरे फेकून देत कला हिच श्रेष्ठ असते असे सिद्ध केले. केवळ लातूर, मराठवाडा, महाराष्ट्र, भारत देशच नव्हे तर संपूर्ण विश्वात त्यांनी अभिजात कलेची पताका फडकवत ठेवली. निसर्गदत्त देणगी, गुरूंचा परिसस्पर्श, आई-वडिलांचे पाठबळ व कठोर साधनेने त्यांनी तबला 'संस्कारित'केला. ईश्वरकृपेने अनेक देवमाणसे वाटेत भेटत गेली. त्यामुळेच त्यांची गणणा हिंदुस्थानी संगीतात तेजाने तळपणाऱ्या तेजस्वी ताऱ्यात झाली. असे दैवी कलावंत लातूरच्या अंगणात लहानाचे मोठे झाले. ते आता पुणे येथे वास्तव्यास असून तेथून ते संपूर्ण विश्वात अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. अशा या संगीत रत्नाचे जीवनवृत्त, गुरूशिक्षण, अभिजात संगीताचा केलेला प्रचार, वादनशैली व मानसन्मानांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

* **जीवनवृत्त :**

पं. मुकेश जाधव यांचा जन्म २६ डिसेंबर १९७३ या दिवशी अजोळी गुंजरगा, ता. निलंगा, जि. लातूर येथे झाला. त्यांचे मुळ गाव निलंगा तालुक्यातील कासारशिरसी. त्यांच्या वडीलांचे नाव श्रीपती तर आईचे नाव जनाबाई. राजेश, मुकेश व उमेश ही तीन भावंडे. मुकेशचे वडील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. ते पुढे औसा या तालुक्याच्या गावी स्थायिक झाले. ते उत्तम हार्मोनियम वाजवायचे. भजनात व प्रबोधनात्मक जागरात ते गात असत. चित्रकलेतसुद्धा ते निष्णात होते. त्यांना संगीताची समज होती पण शास्त्रोक्त शिक्षण

घेतले नव्हते. ते जिल्हा परिषदेतील शिक्षकांचे कलापथक घेऊन विविध स्पर्धेत सहभागी व्हायचे. त्या काळात त्यांच्या संघास अनेक राज्य स्तरीय पारितोषिकेही मिळाली होती. मुकेश यांचे आजोबा मारुतीराव हे उत्तम ताशावादक होते त्यामुळे स्वाभाविकपणे अनुवंशिकतेने मुकेश अंगात ताल घेऊनच जन्माला आले.

मुकेश जसजसा लहानाचा मोठा होऊ लागला तसतसे त्याची बोटे ताल धरू लागली. ताटावर, भांड्यावर त्यांचे वादन चालू झाले. त्याच्या या वाजविण्याच्या आवाजामुळे अनेकवेळा शेजारचे लोक भांडायला यायचे. मुकेश तीन वर्षांचा असतानाचा प्रसंग आहे. त्यांचे वडील गणेशोत्सवातील मेळ्याचा सराव करीत होते. तीन चार दिवसांनी किल्लारी येथील साखर कारखान्यावर त्यांचा कार्यक्रम होणार होता. मुकेशच्या वडिलांनी त्याला कडेवर घेतले. खारीमुरी खायला दिली आणि मेळ्याच्या सराव कक्षात आले.

तेथील ढोलकी वादक श्री कुलकर्णी हे बाहेर गेले होते. तेव्हा चिमुकल्या मुकेशने वडिलांना विचारले, "अण्णा मी ढोलकी वाजवू का?" तेव्हा वडिलांनी कौतुकाने मुकेशच्या हातात ढोलकी दिली. हार्मोनियमवर 'काठी न घोंगडं घेऊ द्या की रं....' हे गाणे वाजवू लागले आणि आश्चर्य! मुकेशने ढोलकीवर दमदार ठेका धरला. त्याने केवळ ठेकाच धरला नाही तर उठावणी, तोड अशा बाबी सराईत वादकाप्रमाणे वाजविल्या. वडिलांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. लगेच त्यांनी 'रसिक मोहना....' हे नाट्यगीत वाजविले तेव्हा मुकेशने तीनतालचा ठेका धरला. ठेका अस्पष्ट होता पण तालात होता. बाहेर ढोलकीवादक कुलकर्णी गुरुजी बिडी ओढत बसले होते. त्यांना वाटले कोणीतरी ढोलकी वादक आला असेल म्हणून ते धावत पळत आत आले. पाहतो तर काय, तीन वर्षांचा चिमुकला मुकेश ढोलकी वाजवत होता. कसल्याही प्रकारचे शिक्षण न घेता तो जे काही वाजवित होता ते शब्दातीत होते. सारेजन त्याचे कौतुक करू लागले.

पुढे तीन-चार दिवसांनी किल्लारी येथे साखर कारखान्यात मेळ्याचा कार्यक्रम सुरू झाला. चिमुकला मुकेश निद्राधिन झाला होता. जेव्हा 'काठीनं घोंगड...' हे गाणे आले तेव्हा त्याला झोपेतून उठविले. तो स्टेजवर गेला व पुन्हा दमदार ढोलकी वाजवून साथ करू लागला. "३ वर्षाचा मुलगा ढोलकी वाजवतोय यावर श्रोत्यांचा विश्वास बसेना. ते आनंदाने नाचायला लागले. त्याच्यावर बक्षिसांची खैरात झाली. त्याचे दोन्ही खिसे पैशांनी भरले. साधारणता पन्नास एक रुपये त्याला मिळाले. आणि हाच त्याच्या आयुष्यातील पहिला कार्यक्रम ठरला. त्यानंतर वडिलांनाही पैसे मिळू लागल्याचा आनंद होऊ लागला.



त्यामुळे ते आपल्या मुलाला विविध कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी संयोजकांना विनंती करू लागले. पाहता पाहता चिमुकल्या मुकेशची कीर्ती पंचक्रोषित पसरली."

पं. शांतारामजी चिगरी यांच्यासारख्या थोर गुरूंचा परिसस्पर्श मुकेश यांना झाला आणि त्यांच्या आयुष्याचे सोने झाले. ते लहानपणापासून शालेय शिक्षणात हुशार होते. त्यांची स्मरणशक्ती तल्लख होती. त्यांचे पहिली ते चौथीपर्यंतचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, औसा येथे झाले. चौथी परीक्षेत ते तालुक्यात पहिले आले होते. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण आजीम हायस्कूल औसा येथे झाले. १९८९ साली दहावी बोर्ड परीक्षेत ते ७६ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले. शालेय जीवनात तो सर्वच खेळात सहभागी व्हायचा. दहावीपर्यंत तो खेळात कॅप्टन होता. एके दिवशी क्रिकेट खेळताना बोटाला चेंडू लागला. त्यामुळे अण्णा खूप रागावले. तेव्हापासून क्रिकेट बंद झाले. स्नेहसंमेलनात तबलावादनाने तर तो सर्वांना मंत्रमुग्ध करायचाच पण तो विविध नाटकांतून भूमिका साकारायचा. स्काऊट आणि एनसीसीमध्येही तो सक्रिय असायचा. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. पण वडिलांनी त्याला कधीही कमी पडू दिले नाही. भाऊ राजेश व उमेश यांनी त्याला नेहमी साथ दिली. आईच्या प्रेमाने व कौतुकाच्या थापेने तो संवेदनशील कलावंत होऊ शकला.

आयुष्यात गुरू, आई-वडील, भावंडाबरोबरच गणेशअण्णा चौधरी ऊर्फ बप्पा यांनी मुकेशला खूप आधार दिला. त्यांनी त्याला स्पर्धेनिमित्त पुणे, मुंबई, बनारस सारखी गावे दाखविली. ते विविध संगीत संमेलनात संयोजकांना या मुलाला संधी द्या म्हणून विनंती करायचे. हितचिंतकांना त्यांचा तबला ऐकवायचे. त्यामुळे त्याची कला सर्वदूर पोहचण्यास मदत झाली. पं. फकीरेश आगडी (धारवाड) यांनीसुद्धा मुकेश यांचे दक्षिणेत अनेक कार्यक्रम घडवून आणले. याबरोबरच आंबड येथील पं. गोविंदराव जळगावकर, पं. आप्पा जळगावकर, पं. अण्णासाहेब गुंजकर, उ. उस्मान खाँ यांनीही मुकेश यांना व्यासपीठ मिळवून दिले. त्यामुळे त्यांचेही ऋण ते कायम स्मरणात ठेवतात.

विविध स्पर्धा अथवा कार्यक्रमाला जाण्यासाठी मुकेशच्या वडिलांकडे पैसे नसायचे. वेळप्रसंगी सावकाराकडून कर्ज काढून स्पर्धेला पाठवावे लागायचे. यासंदर्भात मुकेशच्या आई सांगत होत्या, "मुकेश नेहमी पुण्याला कार्यक्रमाला जात असे. तेथे यशवंत मराठे हे एक अंध रसिक होते. ते गणेशअण्णा चौधरी यांचे मित्र होते. ते संस्कृत विषयाचे प्रकांड पंडित होते. ते मुकेशच्या वादनावर खुश होते. त्यामुळे ते त्याच्यावर खूप प्रेम करायचे.

त्यांना माहीत असायचे की मुकेशजवळ पैसे नसतात म्हणून ते पुण्यातील डॉक्टर, इंजिनिअर व प्राध्यापक मित्रांना घरी बोलवायचे व मुकेशचा कार्यक्रम घडवून आणायचे त्यातून मिळालेले पैसे मुकेशला द्यायचे."

दहावीचे शिक्षण पूर्ण झाले. एवढा गुणी कलावंत औशातच राहिला तर त्याला व्यासपीठ मिळणार नाही. म्हणून त्याला पुण्यात ठेवण्याचा विचार चालू झाला. अण्णांची मात्र त्याला पुण्यात ठेवण्याची इच्छा नव्हती. कारण येथील निवास, भोजन व शिक्षणाचा खर्च त्यांना परवडणारा नव्हता. पण आईने मात्र त्याला पुण्यात ठेवण्याचा आग्रह केला. तेव्हा अण्णा म्हणाले," मुकेश तुझी इच्छा आहे तर तू खुशाल पुण्याला जा, पण तू मला पैसे मागायचे नाहीत." तेव्हा मुकेश म्हणाला," मी कार्यक्रम करून पैसे कमविन तुम्ही चिंता करू नका." अशा प्रकारे पुण्याला पुढील शिक्षणासाठी जाण्याचे ठरले. जून १९९० साली त्याने घर सोडले. फर्ग्युसनसारख्या महाविद्यालयात त्याला प्रवेश मिळाला. राहण्यासाठी वसतिगृहाची सोय झाली. 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत विद्यार्थी सहाय्यता समितीचाही त्याला आधार मिळाला. असे असले तरी त्याला वसतिगृहावर रियाज करता येत नव्हता. ज्या उद्देशाने तो पुण्यात गेला होता. तो उद्देश सफल होणार नाही म्हणून तो उद्विग्न झाला. पं. अतुलकुमार उपाध्ये यांचा पं. गणेशअण्णा चौधरी यांच्यामुळे यापूर्वीच परिचय झाला होता. त्यामुळे मुकेशने थेट पं. अतुलकुमारांच्या घराचा रस्ता धरून त्यांच्याजवळ आपली व्यथा मांडली. तेव्हा त्यांनी मोठ्या ममत्त्वाने आपल्या घरी येऊन राहण्यास सांगितले. सेवाभावी व विनम्र स्वभावामुळे दोनच दिवसात मुकेश उपाध्ये परिवारातील एक सदस्य होऊन गेला. आता मात्र त्यांचा सांगीतिक प्रवास खऱ्या अर्थाने सुरू झाला.

यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करीत असतानाच दि. ३० मार्च २००३ रोजी ते सौ सोनाली यांच्याशी विवाहबद्ध झाले. सौ. सोनाली याही उत्तम तबला वादन करतात. दोघांचाही सूर जुळला. त्यामुळे दोघांचे जीवन तालबद्ध पद्धतीने चालू झाले. मुकेश यांच्या सुख-दुःखात त्यांनी समर्थपणे साथ दिली. पुढे ३० जानेवारी २००५ रोजी छोट्याशा तनिष्कने त्यांच्या घरात पाऊल ठेवले. पाहता पाहता तनिष्कची बोटे तबल्यावर फिरू लागली. तोही छान तबला वाजवतोय. विविध संगीत सभेबरोबरच दूरदर्शनवरूनही त्याचे सादरीकरण झाले आहे. निश्चितच तो आपल्या वडिलांचा वारसा पुढे चालवणार यात शंकाच नाही.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की, एखाद्या परिकथेला शोभावी अशी पं. मुकेश यांच्या जीवनाची कथा आहे. अत्यल्प वयात त्यांनी जे कष्ट घेऊन यशाची गगनभरारी



घेतली आहे ती वर्णणातीत आहे.

*** गुरू आणि शिक्षण :**

चिमुकल्या मुकेशच्या तबलावादनाची ख्याती लातूर जिल्ह्यात पसरत होती. अशातच एकदा त्यांचे नातलग श्री हरिभाऊ शिरसीकर यांनी मुकेशचा तबला ऐकला. त्यांनी त्याचे कौतुक केले. त्यांच्या वडिलांना ते म्हणाले," मुकेश खूप छान ढोलकी व तबला वाजवितो. पण हे वाजविणे बरोबर नाही. तुम्ही याला शास्त्रीय संगीताचे शिक्षण दिले तर त्याचा फायदा होऊ शकेल. तुम्ही याला लातूर येथे पं. शांतारामजी चिगरी यांच्याकडे घेऊन जा." नेमके शास्त्रीय संगीत असते तरी कसे हे पहावे म्हणून मुकेशच्या वडिलांनी मुकेशला लातूरला नेले. त्यावेळी पं. शांताराम गुरुजी गुरुवार क्लबमध्ये अध्यापण करत होते. त्यांनी पाहिले एक अंध व्यक्ती विद्यार्थ्यांना रागदारीचे शिक्षण देत होती. तबला वाजवून शिष्यांना शिकवित होती. हे पाहून पिता-पुत्र अचंबित झाले. कारण यापूर्वी एवढे मधुर, स्पष्ट व शास्त्रोक्त तबलावादन त्यांनी कधीच ऐकले नव्हते. त्यांनी गुरुजीचे दर्शन घेतले व परिचय करून दिला. गुरुजींनी मुकेशपुढे तबला ठेवला व म्हणाले," तुला जे वाजविता येते ते वाजवून दाखव." त्यांच्या वडिलांनी पुन्हा 'काठीनं घोंगडं' हे गीत हार्मोनियमवर वाजविले व मुकेशने तबल्यावर ठेका धरला. हे ऐकून गुरुजी प्रसन्न झाले व म्हणाले," तुमच्या मुलाकडे निसर्ग आहे त्याने शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला तर हा परदेशात जाऊन तबलावादनाचे कार्यक्रम करील. पण त्याला माझ्याकडे रोज घेऊन यावे लागेल. त्याची प्रवेश फीस व मासिक फीस द्यावी लागेल." "आम्ही उद्या येतो गुरुजी" असे म्हणून ते दोघेही औशाला परतले.

मुकेशचे वडील रात्रभर विचार करू लागले. गुरुजी म्हणाले मुकेश परदेशात जाईल, हे कसे शक्य आहे? आम्ही गरीब. आमची जिल्ह्यात फिरण्याची ऐपत नाही आणि परदेशात जाणे हे कसे शक्य आहे? एक तर गुरुजी अंध, त्यांना कुठले जगाचे ज्ञान? काहीतरी खोटे बोलून पैसे काढण्याचे तरी लक्षण नसेल? अशा ना ना शंका त्यांना वाटू लागल्या. दुसरीकडे वाटू लागले खरंच मुकेश परदेशात गेला तर? आयुष्याचे पांग फिटेल. त्यांची पगार खूप कमी होती. त्या तुटपुंज्या पगारात पाच जणांची पोट भरणे मुश्कील होते. मग गुरुजींची फीस आणि लातूरला दररोज जाणे येणे कसे शक्य आहे. मनात द्वंद्व चालू होते. काही केल्या मुकेशचे वादन व गुरुजींचे शब्द त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. शेवटी मुकेशला गुरुजींकडून शास्त्रोक्त तालीम द्यावीच  या उद्देशाने त्यांनी त्याला लातूरला

आणले. तो दिवस होता २० जुलै १९७७. वयाच्या चौथ्या वर्षापासून त्याची तालीम सुरू झाली. गुरुजींनी त्याला तबल्याच्या अंगाची माहिती सांगितली व 'ता' हा बोल कसा वाजवायचा हे शिकविले. "उद्या या बोलाचा सराव करून ये," असे त्यांनी सांगीतले. दुसऱ्या दिवशी ते पुन्हा गुरुजींकडे गेले. त्यांनी त्याला काल सांगितलेला 'ता' हा बोल वाजविण्यास सांगितला परंतु बोल कच्चा होता. "पुन्हा याचा सराव करून उद्या ये," असे गुरुजी म्हणाले. असे करत करत 'ता' व 'ती' या दोन बोलांसाठी तीन महिने गेले. हा कंटाळवाणा प्रकार पाहून त्याच्या वडिलांना नको हे शास्त्रोक्त शिक्षण असे वाटू लागले. कारण औसाहून लातूरला जाण्यासाठी २५ पैसे तिकिट होते तर गुरुजींना महिन्यासाठी १५ रुपये फीस द्यावी लागत होती. ते देणे त्यांना शक्य नव्हते. पण मुकेशला याची गोडी लागलेली होती. त्याची ओढ व गुरुजींची तळमळ पाहून पुन्हा त्याचे शिक्षण चालू ठेवले. तीन महिन्यात त्याचे 'ता' 'ती' हे दोन बोल पक्के बसले. त्यानंतर हात वळणीचे प्रकार, दादरा, झपताल असे ताल सुरू झाले. तिट, तिरकिट, त्रक अशा बोलांचा सराव सुरू झाला. पाहता पाहता चार पाच महिन्यांत त्याच्या हातातून शुद्ध व स्पष्ट बोल निघू लागले. त्याची प्रगती पाहून गुरुजींना आनंद होऊ लागला. गुरुजींचे कष्ट आणि मुकेशची जिद्द यामुळे वर्षभरातच त्याच्या वादनात नावीन्यपणा जाणवू लागला. त्यामुळे त्यांना गुरुजींची विद्वत्ता पटली. गुरुजींनी थोर कलावंताकडून तालीम घेतली व मोठमोठ्या कलावंताना साथ केली हे ऐकून त्यांना कौतुक व अभिमान वाटायचा. गुरुजींच्या शिकविण्याबाबत मुकेश यांचे वडील लिहितात, "मुकेशने वाजवून दाखविल्यानंतर चांगले असेल तर गुरुजी टाळ्या वाजवून छान म्हणायचे आणि चुकले तर खूप रागवायचे. शिकवित असताना त्यांना अचानक काही सुचले तर मला लिहून घ्यायला सांगायचे. गुरुजींच्या स्वभावाला ओळखून मुकेशने पण खूप रियाज केला."

देशात व परदेशात मुकेशचे नाव होत होते. ही प्रगती पाहून काही लोक त्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करीत असत. ते त्यांच्या वडिलांना म्हणत असत. तुमच्या मुलाला इथे कशाला ठेवता? सोलापूर, हैद्राबाद किंवा बनारस अशा ठिकाणी ठेवा. अशा वेळेस मुकेशला खूप राग यायचा. तो म्हणत, "कोणी कितीही मोठा असला तरी माझे गुरुजी चिगरी गुरुजीच राहतील." रागाने त्याच्या डोक्याचे केस ताठ होत. तो म्हणत, "त्यांनी दिलेल्या ज्ञानामुळेच मला देशात व देशाबाहेर संगीताचा प्रचार करण्याचे भाग्य मिळाले. ती त्यांचा जन्मभर ऋणी आहे." त्यांची गुरूभक्ती पाहून लोकांनाही कौतुक वाटे. एखाद्या कुंभाराने मातीला आकार द्यावा व भांडे तयार करावे तद्वतच गुरुजींनी



मुकेश यांना घडविले. 'ताता', 'तीती' या दोन बोलांना बसविण्यासाठी गुरुजींनी ३ महिने घालविले. तेव्हा मुकेश यांनाही कंटाळा यायचा पण आता वाटतेय की त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळेच माझ्या वादनातील 'टोन' परिपक्व झाला. हा गरिबाचा आहे. कनिष्ठ जातीतला आहे. हा काय कलावंत होणार? असे काही लोक टोमणे मारायचे. पण मुकेश जिद्दीने पेटायचा व अविश्रांत रियाज करायचा. मुकेश यांचे अण्णा त्यांच्याकडून तावूनसुलाखून रियाज करून घ्यायचे. यासंदर्भात मुकेश सांगतात, "मला अण्णा रोज पहाटे पाच वाजता उठवून रियाजाला बसवायचे. मी रियाजाचा कंटाळा केला तर मला ते खारीमुरी द्यायचे. आठ दिवस आठ-आठ तास रियाज केला तर मला आवडणारी बासुंदी मला द्यायचे. बासुंदी महाग असायची पण माझा हा लाड पुरविण्यासाठी ते बासुंदी आणायचे. मी रियाज केला नाही तर मात्र छडीने पायावर फटके द्यायचे. एके दिवशी मी एवढा मार खाल्ला की, मी रियाज करेन पण मार खाणार नाही अशी प्रतिज्ञाच केली."

अशा प्रकारे गुरूंच्या मार्गदर्शनाबरोबरच गुरुवार क्लबमध्ये ज्येष्ठ गुरूबंधू अण्णा भोसले, प्राणेश पोरे, प्रमोद रायचूरकर , गिरीष नाईक, मोहन देशपांडे हे उत्तम तबला वाजवायचे. त्यांचा दबदबा मुकेशजींवर होता. ते ८-८ तास क्लासमध्ये बसून रियाज करायचे त्यामुळे आपणही तशाप्रकारे रियाज करावा असे त्यांना वाटायचे. सुरुवातीला ४ तास, पुढे ८ तास व नंतर १२-१२ तास रियाजाचा अवधी वाढविला. त्यामुळेच ते एक ख्यातकीर्त तबलावादक म्हणून जगासमोर आले.

वयाच्या दहाव्या वर्षीच तबला विशारद ही पदवी तर १२ व्या वर्षी तबला अलंकार ही पदवी त्यांनी प्राप्त केली.

पं. शांतारामजी चिगरी यांच्या बरोबरीने सौ. शकुंतलादेवी चिगरी यांचाही मुकेश यांच्या जडण घडणीत सिंहाचा वाटा आहे. बाईंमुळेच मुकेश यांची प्रगती होऊ शकली. स्पष्टता, वादनातील सुक्ष्म बारकावे इ. बाबी त्यांनी समोर बसून त्यांच्याकडून करून घेतल्या. हाताची ठेवण बसविण्यापासून जीवनाची घडी बसविण्यापर्यंत त्यांनी मुकेश यांच्या जीवनात मोलाचे योगदान दिले. त्यांनी मुकेश यांच्या विवाह प्रसंगी ३० हजार रुपयांची मदत केली. यावरून त्यांची मुकेशवर किती माया होती हे दिसून येते. त्यामुळेच मुकेश म्हणतात, "त्या बाई नव्हे तर प्रत्यक्ष मायेची ममतेची आई होती"

यावरून बाईंनी सुद्धामुकेश यांच्या जडणघडणीत किती महत्त्वाची भूमिका वठविली, हे सांगता येते.

## * अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार :

पं. शांतारामजी चिगरी गुरुजींकडून १२ वर्षे तबलावादनाची तालीम घेतल्यामुळे पं. मुकेश जाधव यांची तबलावादन शैली परिपक्व झाली. वयाच्या चौथ्या वर्षापासूनच हा छोटासा कलाकार यशाची पताका फडकवित होता. विविध स्पर्धा व संगीत सभांतून यश संपादन करीत होता. हे होत असतानाच दि. ११, १२, १३ डिसेंबर १९८१ साली लातूर येथे पाचवे मराठवाडा संगीत संमेलन होणार होते. याची चाहूल मुकेश यांच्या वडिलांना लागली. या संमेलनात पं. भीमसेन जोशी, पं. हरिप्रसाद चौरसिया, उ. झाकीर हुसेन असे दिग्गज कलावंत हजेरी लावणार होते. त्यांच्या उपस्थितीत आपल्या मुलाला थोडा वेळ तरी तबलावादन करण्याची संधी मिळेल का यासाठी ते धडपड करू लागले; परंतु संयोजकांनी परवानगी दिली नाही. उलट ते म्हणाले, "तुम्हाला समजते की नाही? एवढ्या मोठ्या संमेलनात तुमचा चिमुरडा काय वाजविणार आहे?" अशी त्यांची अवहेलना करून परत पाठविले. अशा प्रसंगी श्रीधर भातांब्रेकर पुढे सरसावले. त्यांनी संमेलनाध्यक्ष नरहर कुरूंदकरांकडे विनंती केली. खूप आग्रहानंतर त्यांनी ३ मिनिटे त्याला वाजविण्याची परवानगी दिली. दि. १३ डिसेंबरची ती रात्र, मैफील सुरू झाली. उ. शाहिद परवेझ, रिंकू आचार्य यांचे गायन-वादन झाले. तरीही मुकेशचे नाव पुकारले जात नव्हते. मुकेशचे वडील सारखे संयोजकांकडे जावू लागले. पण त्याला प्रतिसाद मिळत नव्हता. शेवटी रात्री साडेबारा वाजता संयोजकांनी मुकेश यांच्या वडिलांना बोलावून घेतले व म्हणाले," हे बघा ३ मिनिटांचा तुम्हांला वेळ दिला आहे. त्यानंतर समोरचा लाल दिवा लागेल. तेव्हा वादन थांबवायचे." रिंकू आचार्य यांचे नृत्य संपले. त्यानंतर पं. भीमसेन जोशी यांच्या गायनाने मैफिलीची सांगता होणार होती. त्यामुळे मराठवाड्यातील अनेक कलावंत आणि रसिकांनी बसवेश्वर मंगल कार्यालयाच्या सभागृहात तोबा गर्दी केली होती. नृत्य संपल्यानंतर संयोजकांनी मुकेशचे नाव घोषित केले. वडिलांच्या मांडीवर झोपी गेलेला मुकेश डोळे चोळीतच व्यासपीठावर गेला. त्याने एका दमदार उठानाने स्वतंत्र वादनाची सुरुवात केली आणि प्रचंड टाळ्यांच्या गजराने सभागृह दुमदुमून गेले. नरहर कुरूंदकरांनी हे पाहिले व पुढे येऊन त्यांनी सांगितले की," याला जेवढा वेळ वादन करायचे आहे तेवढा वेळ करू द्या मध्येच लाल दिवा लावून वादन थांबवू नका." पाहता पाहता १५-२० मिनिटे कधी संपली हेच कळले नाही. ही सुखद आठवण सांगताना मुकेश सांगतात," कार्यक्रम संपल्यानंतर नरहर कुरूंदकर सरांनी माझ्या कौतुकासाठी पंधरा मिनिटांचे भाषण केले. 'मराठवाड्याचे अनमोल रत्न', 'भावी झाकीर हुसेन' वैगेरे शब्दांत माझा गौरव केल्याचे मला आजही



आठवते."

यासंदर्भात एका वर्तमानपत्रात 'तबल्याएवढेही वजन नसलेला तबलापटू मुकेश जाधव या मुलाचा चमत्कार' या मथळ्याखाली सुंदर वर्णन केले आहे. ते असे, "मुकेश जाधव या बालकलाकाराला फक्त तीन मिनिटे देण्यात आली होती. त्याचे वय फक्त ७ वर्षांचे. तबल्याएवढी त्याची उंची नसेल असे तो तबल्यासमोर येऊन बसल्यानंतर जाणवत होते. त्याला पाहताच सर्वांना हसू आले मात्र एखादा चमत्कार घडून यावा असे घडले. जणू काही अनेक वर्षांचा दांडगा रियाज लाभलेला कलावंत असल्याप्रमाणे या बालकाने तबला असा काही वाजवून दाखविला की, सभागृहास धक्काच बसला. मराठवाड्यात विश्वविख्यात कलावंत जन्माला येत आहेत याची साक्ष या बालकलाकारांमुळे पटली... त्याचे वादन संपल्यानंतर त्याच्यावर बक्षिसांचा वर्षाव केला. त्याला अनेकांनी अलगद उचलून घेतले. या मजेदार घटनेनंतर पं. भीमसेन जोशी यांच्या गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली."

अशा प्रकारे मुकेश यांच्या कारकिर्दीतील हा पहिला मोठा कार्यक्रम नोंदविला गेला.

## * आकाशवाणी केंद्रावरून तबलावादन :

मुकेश यांचे वय पाच वर्षांचे होते. आपला मुलगा चांगला तबला वाजवितो त्याला आकाशवाणी केंद्रावरून सादरीकरणाची संधी मिळावी असे त्यांच्या वडिलांना वाटू लागले. म्हणून त्यांनी त्याला परभणीला नेले. जवळ पैसे नव्हते म्हणून रात्र बसमध्येच काढली. सकाळी उठून आकाशवाणी केंद्र गाठले. पण तेथे समजले की इथे रेकॉर्डिंग होत नाही. हिरमुसलेल्या पिता पुत्रांनी जड पावलांनी केंद्र सोडले. पुढे ते जालण्याला गेले. तेथील एका नातेवाईकांकडून पैसे घेतले व औरंगाबाद येथे पोहोचले. आकाशवाणी केंद्रासमोर बांधकाम चालू होते. तेथेच मुकेशला अंघोळ घातली त्याचे कपडे धूवून वाळत घातले. त्यावेळेस श्रीमती केशर मेश्राम या आकाशवाणीच्या संचालिका होत्या. त्यांची बैठक चालू होती. मुकेशचे वडील त्यांना भेटले. तेव्हा त्यांनी त्यांना दोन-तीन वेळा हाकलून दिले. काय आडाणी आणि विचित्र लोक आहेत. एवढ्या छोट्या मुलाला कसा काय तबला वाजवता येईल. असे म्हणून त्यांना आपमानित केले. परंतु दोघेही तेथून हालले नाहीत. शेवटी त्या म्हणाल्या, "दुपारी अडीच नंतर या" श्री रमेश सामंत हे रेकॉर्डिंगचे प्रमुख होते. त्यांनी चिमुकल्या मुकेशचा तबला ऐकला. ते बेहद खुश झाले. त्यांनी मेश्राम बाईंना सांगितले.

त्यांनीही तबला ऐकला. त्यांनाही आनंद झाला. त्या म्हणाल्या," हा तर केंद्राचे भूषण आहे. रात्री आठ वाजले तरी हरकत नाही याचे रेकॉर्डिंग झाल्याशिवाय याला जावू देऊ नका." फोटोग्राफरला बोलविण्यात आले. फोटो काढून वर्तमानपत्रात दिला. त्याला खायला प्यायला दिले. पंधरा रुपये बक्षीस देऊन मुकेशचा सन्मान केला. अशा प्रकारे सर्वांत कमी वयाचा तबलावादक म्हणून औरंगाबाद आकाशवाणीवर त्याची नोंद झाली. बालोद्यान या कार्यक्रमात त्यांचे २० मिनिटांचे वादन प्रसारित झाले. त्यानंतर सांगली, पुणे, धारवाड, गुलबर्गा, मद्रास व दिल्ली आकाशवाणी केंद्रावरून त्याचे स्वतंत्र तबलावादनाचे कार्यक्रम प्रसारित झाले.

रविवर्मा संगीत सभा' हा आकाशवाणीवरील, कार्यक्रम सर्व भारतातील आकाशवाणी केंद्रावरून प्रक्षेपित करण्यात आला.

जर्मनी देशाचा सांगीतिक दौरा चालू होता. अशातच ऑल इंडिया रेडिओच्या ऑडीशनचे पत्र आले. अशा वेळी त्यांचे वडील चिंतित झाले, त्यांनी मुकेश यांना जर्मनीला पत्र पाठविले. त्यांचे अभिनंदन केले. तू भारतात कधी येणार याची विचारणा केली. परंतु काही केल्या मुकेश यांचे उत्तर येत नव्हते. तेव्हा त्यांच्या वडिलांनी मुंबई आकाशवाणी केंद्र गाठले व ऑडीशनसाठी मुदतवाढ मागीतली; परंतु आश्चर्य असे की, तेथे निवड समीतीत तज्ज्ञ परीक्षक म्हणून विख्यात तबलावादक उ. निजामोद्दिन खाँ साहेब होते, ते त्यांना म्हणाले, "मुकेश यांना इथे येण्याची आवश्यकता नाही. आम्ही त्यांच्या वादनाच्या अनेक सीडीज ऐकल्या आहेत. त्या ऐकून त्याला बी., बी. हाय असे ग्रेड न देता ए. ग्रेड देत आहोत. अशा प्रकारे वयाच्या १७ व्या वर्षीच त्यांना हा बहूमान मिळाला."

वयाच्या पाचव्या वर्षापासून १७ व्या वर्षापर्यंतचा हा त्यांचा आकाशवाणीचा प्रवास अत्यंत रोमांचकारी आहे. आजही त्यांचे वादन विविध आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित होत असते.

* **स्पर्धात्मक यश :**

पं. मुकेश यांच्या जडण घडणीत परळी येथील श्री गणेश अण्णा ऊर्फ बप्पा चौधरी यांचे मोलाचे योगदान आहे. त्या वेळी पं. चिगरी गुरुजींकडे परीक्षा केंद्र नव्हते त्यामुळे त्यांना बप्पांकडे परीक्षेला जावे लागायचे. तेथेच बप्पा मुकेश यांच्या वादनाने प्रभावित झाले. या गुणी कलावंताचे चीज झाले पाहिजे म्हणून त्यांनी त्याला विविध स्पर्धांत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यासंदर्भात मुकेश यांचे वडील सांगत होते. मुकेश सहा वर्षांचा



होता. बप्पानी परळी येथे विदेह संगीत विद्यालयाच्या वतीने तबलावादन स्पर्धेचे आयोजन केले होते. बाल गटाची नोंदणी पूर्ण झाल्यामुळे मुकेशला मोठ्या गटात प्रवेश घ्यावा लागला. बक्षीस मिळणार नाही याची त्यांना खात्री होती पण किमान सहभागी होता यावे हीच माफक अपेक्षा माझी होती. पण आश्चर्य असे झाले की मोठ्या गटात मुकेशचा पहिला क्रमांक आला. याच स्पर्धेत ख्यातकीर्त ढोलकी वादक पं. विठ्ठल क्षीरसागर यांनीही सहभाग नोंदविला होता. त्यांना दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हे पाहून मला वाईट वाटले. बनारसचे परीक्षक होते. मी त्यांचे दर्शन घेतले व म्हणालो, "माझा मुलगा लहान आहे. पं. विठ्ठल क्षीरसागर हे खूप मोठे कलावंत आहेत तुम्ही त्यांना पहिला क्रमांक द्या व माझ्या मुलाला दुसरा द्या." त्यावर परीक्षक म्हणाले, "आम्ही दिलेला निकाल योग्यच आहे." पुन्हा मी खूपच विनंती केल्यानंतर परीक्षकांनी मुकेश व क्षीरसागर यांना ३०० रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विभागून दिले."

१९८१ ते १९८६ या काळात श्री मुकेश जाधव यांनी देशातील प्रमुख तबलावादन स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. पं. कंठे महाराज तबलावादन स्पर्धा, औरंगाबाद, स्व. अमरनाथ संगीत स्पर्धा, बनारस, 'गुरूस्मरण' स्पर्धा मद्रास या स्पर्धांत त्यांनी प्रथम क्रमांकाची पारितोषिके प्राप्त केली. 'संगीत साधनेतर्फे सांगली येथील मंगेशकर नाट्यगृहात शास्त्रीय संगीत स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात मुकेश जाधव यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

सांगली येथे झालेल्या स्पर्धेच्या संदर्भात एक महत्त्वाची घटना मुकेश यांच्या वडिलांनी सांगितली, "स्पर्धा संपल्यानंतर आम्ही परत निघणार होतो. कारण एकतर मुक्काम करण्यासाठी आमच्याकडे पैसे नव्हते व दुसरे म्हणजे माझ्या रजा शिल्लक नव्हत्या परंतु संयोजकांनी सांगितले, "तुमच्या मुलाला नक्कीच पारितोषिक मिळणार आहे आणि पं. सुधीर फडके यांच्या हातून त्याला पारितोषिक मिळणार आहे तेव्हा तुम्ही बक्षीस वितरणानंतरच जा." असे त्यांनी म्हटल्यामुळे मी नाविलाजाने राहिलो. पं. सुधीर बाबूजींच्या हस्ते माझ्या मुलाचा सन्मान होणार या कल्पनेने मी बहारून गेलो. पारितोषिक वितरणापूर्वी संयोजकांनी पं. सुधीर फडके यांना दोन मिनिटे मुकेशचा तबला ऐकण्याची विनंती केली. पण त्यांना वेळ नव्हता. कुर्डूवाडीहून त्यांच्या रेल्वेचे आरक्षण केले होते. त्यामुळे ते घाईत होते; परंतु संयोजकांनी खूपच आग्रह केला. त्यामुळे ते ऐकण्यास तयार झाले. त्यावेळेस मुकेश बारा वर्षांचा होता. त्याने तबलावादन सुरू केले आणि पाहता पाहता २ मिनिटांऐवजी २५ मिनिटे कधी संपली हेच कळाले नाही. संयोजक बाबुजींना रेल्वेच्या आरक्षणाबद्दल सांगत

होते परंतु बाबुजी देहभान हरपून चिमुकल्याचे तबलावादन ऐकत होते. "मी उद्या जाईन परंतु मुकेशचा तबला ऐकणे सोडणार नाही" असे म्हणून त्यांनी त्याचे संपूर्ण वादन ऐकले. वादन संपल्यानंतर ते व्यासपीठावर गेले. हातात माईक घेतला व भावपूर्ण शब्दात ते म्हणाले, "मी आजपर्यंत स्वतःला मोठा संगीतकार गायक समजत होतो. मी हिमालायाच्या उत्तुंग शिखरावर होतो परंतु आज या चिमुकल्याने माझे गर्वहरण केले आहे. मला जमिनीवर आणले आहे. माझा पुनर्जन्म झालाच तर मी मुकेशच्या पोटी जन्माला यावे ही ईश्वराला प्रार्थना करतो." त्यांनी मुकेशला गळ्याला लावून घेतले. श्रोत्यांना म्हणाले, "तुम्ही बसून टाळ्या वाजवू नका. यासाठी उभे राहून तुम्ही टाळ्या वाजवा कारण हा ईश्वरनिर्मित कलावंत आहे." असे गौरवोद्‌गार काढून त्यांनी मुकेशचे कौतुक केले.

* **दूरदर्शनवरून सादरीकरण :**

इ. ९ वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ६ मे १९८८ रोजी सायं. ६.२० ते ७.०० या वेळेत मुंबई दूरदर्शन केंद्रावरून पं. मुकेश यांच्या पहिला कार्यक्रम प्रसारित झाला. या कार्यक्रमातून त्यांनी स्वतः तयार केलेल्या तबलावादनातील रचना सादर केल्या. त्यांनतर विविध वाहिन्यांवरून त्यांचे स्वतंत्र तबलावादनाचे कार्यक्रम प्रसारित झाले. अनेक संगीत संमेलनातून त्यांनी केलेले वादन राष्ट्रीय दूरदर्शन व डी. डी. भारती या वाहिन्यांवरून नेहमीच प्रसारित होत असते. याबरोबरच 'राग एक, रंग अनेक' या दूरदर्शन वरील कार्यक्रमात तज्ज्ञ परीक्षक म्हणूनसुद्धा त्यांनी काम केले आहे.

* **संगीत संमेलनातून प्रचार :**

लातूर येथील पाचव्या संगीत संमेलनातून पं. मुकेश जाधव यांना प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर त्यांच्या वडिलांनी आपल्या मुलाला व्यासपीठ मिळावे यासाठी खूप परिश्रम घेतले. १९८२ साली उस्मानाबाद येथे सहावे मराठवाडा संगीत संमेलन झाले. तेथे तालयोगी पं. सुरेशजी तळवलकर यांच्यामुळे मुकेश यांना तबलावादन करण्याची संधी मिळाली. १९८३ साली अंबाजोगाई येथे मराठवाडा संगीत संमेलन झाले. तेथे जगप्रसिद्ध नृत्यांगणा श्रीमती सीतारादेवी यांच्या आग्रहामुळे त्यांना स्वतंत्र तबलावादन करण्याची संधी मिळाली. १९८४ साली जालना येथील मराठवाडा संगीत संमेलनातसुद्धा त्यांना स्वतंत्र तबला वादन करण्याची संधी मिळाली. पं. कंठे महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त औरंगाबाद येथे संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. यासंदर्भात एका वर्तमानपत्रात त्यांच्या वादनाचे सुंदर वर्णन केले आहे, "सात वर्षाच्या मुकेश जाधवने तीनतालात तबला सोलो पेश



करून टाळ्या घेतल्या... त्याच्या बोटात मुरलेली लय, दृत लयीत वाजवतानाची सहजता निश्चितच कौतुकास्पद आहे."

पं. अण्णासाहेब चौधरी यांनी मुकेश व शशी सारस्वत यांना ७ डिसेंबर १९८२ मध्ये बनारस येथे नेहले. यासंदर्भात बनारस येथील वृत्तपत्रात त्यांच्या वादनासंदर्भात लिखाण केले आहे."प्रथम दिन के कार्यक्रम का शुभारंभ महाराष्ट्र से आये हुए बाल कलाकारों के गायन-वादन, से प्रारंभ हुवा । श्री शशी सारस्वत का गायन एवं मुकेश जाधव का तबला श्री गणेशअण्णा चौधरी के निर्देशन में अत्यंत सराहनिय रहा।

या कार्यक्रमात त्यांनी सवारीसारखा अवघड ताल वाजवून गौरव व बक्षिसे मिळविली. १९८३ साली पुण्याच्या संगीत उन्मेष या संस्थेने मुकेश जाधव व सतारवादक सुधीर फडके यांची मैफील ठेवली होती. या मैफीलीत त्यांनी सतारची उत्तम साथ तर केलीच पण मतताल सारखा अनवट ताल वाजवून पुणेकरांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमात पं. आप्पा जळगावकर व पं. जसराजजी आले होते. त्यांनी छोट्याशा मुकेशच्या गळ्याला मिठी मारली व चुंबन घेऊन १०१ रुपयांचे बक्षीस दिले.

पं.जी.एल. सामंत यांनी 'बंदिश' या संस्थेच्या वतीने उ. उस्मानखाँ यांची सतार व मुकेश जाधव यांचे स्वतंत्र तबलावादन असा रमण बागेत तिकिट लावून कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यासाठी जगप्रसिद्ध तबलानवाज उ. अल्लारखाँ व उ. झाकीर हुसेन हे आले होते. ते उद्‌घाटन करून लगेचच जाणार होते. जी. एल. सामंत सरांनी दोघांनाही मुकेशचा तबला ऐकण्याची विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. मुकेशने पंचमसवारी तालात स्वतंत्र वादन केले. पंचमसवारी वाजवणार म्हटल्यानंतर उ. अल्लारखाँ यांनी भुवया उंचावल्या. एवढासा छोटा मुलगा आणि पंचम सवारीसारखा अवघड ताल कसा वाजवणार 'ये दिवाना है क्या?' असे म्हणून ते कुतूहलाने पाहू लागले. दोन चार आवर्तनातच मुकेशने श्रोत्यांच्या मनाची पकड घेतली. २०-२५ मिनिटांचे वादन झाल्यांनतर पं. जी. एल सामंतांनी अब्बाजींना विचारले, "कैसा लगता है?" त्यावर ते भावविभोर होऊन उद्‌गारले,' इसके पहले मैने ऐसी सवारी कभी नही सुनी। इसमें जरूर सिखने लायक चिजें है। उपरवाले की देन है इसके सिवा मै कुछ नही बोल सकता।"

अशा प्रकारे थोर तबलावादकांनी त्यांचे कौतुक करून आशीर्वाद दिला. १३ आक्टोबर १९८३ रोजी दक्षिणेतील थोर गायक श्री पुट्टराज गवई यांच्या गायनाला साथसंगत करण्याची संधी श्री. मुकेश यांना मिळाली. 'गुरूस्मरण- ज्ञानयोगी पंचाक्षरी गवई संगीत

महोत्सवात' हा योग जुळून आला.

मे १९९१ मध्ये जगप्रसिद्ध सतारवादक भारतरत्न पं. रविशंकरजी यांची इंग्लंड येथे भेट झाली. आर्धा तास चर्चा झाली. त्यांनीही मुकेश यांचे तोंडभरून कौतुक केले. विश्वविख्यात नृत्यांगना पं. रोहिणी भाटे यांच्या नृत्याला साथ संगत करण्याची संधी पं. मुकेश यांना लाभली. या नृत्यात एका वेगळ्या संकल्पनेला स्पर्श केला होता. मल्हाराचे विविध प्रकार व लोकसंगीताचा मिलाफ असलेल्या या नृत्य रचना अत्यंत लोकप्रिय झाल्या. लखनौ, जयपूर असा प्रवास चालू असतानाच दिल्ली येथील कार्यक्रमात प्रत्यक्ष पं. किशन महाराज व पं. बिरजू महाराज यांच्यासमोर तबलावादन करण्याची संधी पं. मुकेश यांना मिळाली. पं. किशन महाराज मुकेशजींचा तबला ऐकून बेहद खुष झाले व रोहिणी भाटेजींना म्हणाले, "दिदी ये कौन बजा रहा है? इसे कहॉ से पकडके लाया है?" असे गौरवोद्‌गार काढून दोघांनीही मुकेशजींचे कौतुक केले.

१९९० साली पं. मल्लीकार्जुन मन्सूर यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात उ. उस्मानखाँ साहेबांचा सतार वादनाचा कार्यक्रम होता. त्यांना उ. दाऊद खॉ यांचे सुपुत्र युसुफ भाई तबल्याची साथ करणार होते. त्यामुळे पुण्यातील सर्वच कलावंत ऐकायला आले होते; परंतु ऐन वेळी यूसुफभाई येऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांना साथसंगत कोण करणार हा प्रश्न पडला. योगायोगाने पं. मुकेश जाधव श्रोत्यांत उपस्थित होते आणि अचानक उ. उस्मानखाँ साहेबांनी मुकेश यांना तबलासाथ करण्यासाठी व्यासपीठावर बोलावले. यापूर्वी ते दोघे कधीच एकत्र बसले नव्हते ना कधी त्यांनी एकत्र सराव केला होता. आहे त्या वेशभुषेत पं. मुकेश व्यासपीठावर गेले आणि मैफील सुरू झाली. ती साथ इतकी अप्रतिम झाली की संपूर्ण पुण्यात या कार्यक्रमाचे व पं. मुकेश यांचे कौतुक झाले.

### * सवाई गंधर्व महोत्सवातून वादन :

सवाई गंधर्व महोत्सवात वादन करणे हे सर्वच कलावंताचे एक सोनेरी स्वप्न असते. अशा या महोत्सवात वादन करण्याची संधी पं. मुकेश यांना अकस्मितच मिळाली. त्यांचे झाले असे, १९९२ साली रामजन्मभूमीचा वाद सुरू झाला. त्यामुळे सवाई गंधर्व महोत्सवाला नियोजित असलेले पं. अनिंदो चटर्जी, उ. झाकीर हुसेन, उ. अमजद अली खाँ यासारखे कलावंत येऊ शकले नाहीत. अशावेळेस काय करावे हा प्रश्न सवाईच्या संयोजकांना पडला. त्यांनी तात्काळ उ. उस्मानखाँ साहेबांशी संपर्क साधला व सांगितले की, "तुम्ही तात्काळ निघा. तुम्हाला सवाईत वाजवायचे आहे." त्यावेळेस ते व पं. मुकेश



हे अंबड येथे दत्त जयंतीच्या संगीत महोत्सवात होते. ते दोघेही पुण्याला निघाले. अशाप्रकारे मुकेश यांचे सवाईतील पहिले वादन झाले. याही वादनाला रसिक श्रोत्यांनी मनस्वी दाद दिली.

एकदा पु. ल. देशपांडे सवाई गंधर्व महोत्सवाला आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर पं. भीमसेन जोशी, पं. श्रीकांत देशपांडे, पु. ल. देशपांडे व पं. मुकेश हे हिराबाई बडोदेकर यांच्या घरी गेले. पं. मुकेश यांनी पंचमसवारी ताल वाजवून दाखविला. तेव्हा पु. ल. यांनी मुकेशचे कौतुक केले व पेढे देऊन आशीर्वाद दिला. त्यानंतर पं. मुकेश यांना १९९४ साली पु. ल.यांच्या घरी जाण्याचा योग आला. तेव्हा सुनीताताईंनी मुकेशला ओळखलं नाही. त्यांनी पुलंना सांगितले बाहेर कोणतरी आलय. मुकेश आत गेले आणि परिचय करून दिला तेव्हा पु ल म्हणाले, "तुला कोण ओळखत नाही, तु तर मुकेश! "अशा प्रकारे पु. ल. सारख्या थोर व्यक्तिंनीसुद्धा मुकेशजींना कौतुकाची थाप दिली होती. सवाई गंधर्व महोत्सवात त्यांनी अनेकवेळा सादरीकरण केले. चोपन्नाव्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवात उ.दिलशाद खाँ व उ. साबीर खाँ यांनी सारंगीची जुगलबंदी सादर केली. त्यांना तबल्याची साथ मुकेश जाधव यांनी केली. यासंदर्भातील समीक्षा करताना लिहिले आहे की, " सवाई गंधर्वच्या रंगमंचावरचा एक विशेष रंगलेला कार्यक्रम म्हणून सारंगीवादन आणि मधुवंती रसिकांच्या दीर्घकाळ निश्चित लक्षात राहील... मुकेश जाधव यांची तबला साथ ही उल्लेखनीय म्हणावी अशीच नेमकी, पूरक आणि रंगतदार अशीच होती."

### * परदेशात अभिजात संगीताचा प्रचार :

भारतातील प्रमुख शहरांतून व संगीत महोत्सवांतून पं. मुकेश जाधव आपले कलानैपुण्य दाखवित होतेच. अशातच त्यांना १९९० साली परदेशात जाऊन तबलावादन सादर करण्याची संधी मिळाली. इंग्लंडचे रामदास गोठुरेकर यांनी पं. अतुलकुमार उपाध्ये व पं. मुकेश जाधव यांची वादनाची सी. डी. ऐकली आणि त्यांनी दोघांना युरोप दौऱ्यासाठी पाचारण केले. या वेळी मुकेश यांचे वय केवळ १७ वर्षांचे होते. व्हिसा मिळण्यासाठी इन्टरव्हू फॉर्म भरला. तेथील अधिकाऱ्यांनी प्रश्न विचारले; परंतु घाबरत घाबरत उत्तरे दिल्यामुळे त्यानी फॉर्म रद्द केला. पण थोड्या वेळाने त्यांनी परत मुकेशला बोलावले व व्हिसा मंजूर केला. मुकेश उड्या मारतच बाहेर पडला. अशाप्रकारे मे १९९० मध्ये त्यांचा पहिला परदेश दौरा झाला. यासंदर्भात वर्तमानपत्रात बातम्या छापून आल्या. दि. १५ मे १९९१ रोजी पं. मुकेश जाधव यांनी मुबईहून अमेरिकेला प्रयाण केले असून ते दोन महिने

अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या राष्ट्रात कलेचे प्रदर्शन करून परत येणार आहेत.

या बातमीने समस्त लातूरकरांना आनंद झाला. मोठ्या देशात जात आहे हे पाहून साऱ्यांनाच अभिमान वाटला. न्यूयॉर्क, फिलाडेलफिया, रॉजडल, प्रिन्स्टल, यू. के. लंडन, मॅन्चेस्टर अशा विविध शहरातून त्यांचे कार्यक्रम होऊ लागले.

महाराष्ट्र मंडळ लंडन या संस्थेचा १९९१ सालातील तिसरा कार्यक्रम दि. १५ जून रोजी मंडळाच्या सभागृहात पार पडला. यासंदर्भात लोकसत्ता या वर्तमानपत्रात मुकेश जाधव यांच्या वादन शैलीवर स्तुतीसुमने उधळली. त्यात असे लिहिले आहे, "मध्यांतरानंतर पुण्याचे उमलते कलावंत श्री अतुलकुमार उपाध्ये यांनी व्हायोलिन वादनाने तर कु. मुकेश याने तबल्याच्या बहारदार साथीने प्रेक्षकांची मने जिंकली. कु. मुकेश जाधव हा मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातला आहे. वयाच्या सातव्यावर्षापासून त्याने तबला वादनाची गती दाखवविली. तेव्हापासून आजपर्यंत त्यांच्या वादनाची चढती कमान आहे. आपल्या सोलो वादनाने लवकरच मोठमोठ्या कलावंताना तो साथ देईल हे त्याने लंडनमधील प्रेक्षक वर्गास पटवून दिले."

खरोखरच मुकेश जाधव यांनी अनेक दिग्गजांना तबल्याची साथ दिली. ज्यात व्हायोलीनसाठी पं. अतुलकुमार उपाध्ये-पुणे, पं. एन. राजम्, मुंबई, पं. लक्ष्मीशंकर-मुंबई, पं. पुट्टराज गवई-गदग, सतारीसाठी उ. उस्मान खाँ-पुणे, उ. शहिद परवेझ, उ. सुजात खाँ-दिल्ली, उ. रहिमत खाँ-मुंबई, उ. बाले खॉ-धारवाड, रफिक, शफिकसाहेब,-कर्नाटक, संतुरवादनासाठी-पं. सतीश व्यास-मुंबई, पं. भजन सोपुरी-मुंबई, पं. राहूल शर्मा-मुंबई, बासरीसाठी पं. रोनू मजुमदार,-मुंबई, पं. रूपक कुलकर्णी, सरोदसाठी - पं. राजन कुणकर्णी-पुणे, पं. ब्रिजनारायण -मुंबई, मोहनविणासाठी, पं. विश्वमोहन भट-मुंबई, गायनासाठी पं. सी. आर व्यास, पं. फकीरेश आगडी-धारवाड, पं. शौनक अभिषेकी-पुणे, नृत्यासाठी जगप्रसिद्ध नृत्यांगना रोहिणी भाटे, मुंबई अशा दिग्गज कलावंताना पं. मुकेश जाधव यांनी समर्थपणे तबल्याची साथ करून मैफीली सजविल्या आहेत.

पद्मश्री पं. शंकरबापू अपेगावकर (पखावज), पं. भवानी शंकर (पखावज), जगप्रसिद्ध ड्रमवादक शिवमणी (केरळ) ड्रमवादक पं. लालजी भाटी, जालंधर अशा विभूतींसोबत त्यांनी जुगलबंदी करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी उ.सुजाद खाँ, शहिद परवेझ व पं. शिवमनी यांच्यासमवेत जर्मनी येथे फ्युजनचे पाच कार्यक्रम सादर केले. एवढेच नव्हे तर युक्रेनचे बगदान व जगप्रसिद्ध ड्रम प्लेअर आर्कोर्डीन यांच्यासमवेत



सॅक्सोफोन, पियानो, ड्रम व तबलावादनाची जुगलबंदी फ्रान्स देशात सादर केली. याही कार्यक्रमाला रसिकांनी दाद दिली.

पं. मुकेश जाधव यांच्या मते जगातील संस्कृतीचे आदान-प्रदान झाले पाहिजे. स्वर; ताल एकच आहेत परंतु विकेंद्रीकरणामुळे वेगळा विचार मांडला जातो. असे असले तरी जगातील संगीताची एकत्र नाळ जुळू शकते.

परदेशात सांस्कृतिक कला जपणाऱ्या रसिकांची दाद त्यांनी मिळविली आहे. त्यांनी आजपर्यंत इंग्लंड ४ वेळा, जर्मनी-४ वेळा, स्विझर्लंड ३ वेळा, अमेरिका १ वेळा, पोलंड, जपान, इटली, पोर्तुगाल, बहेरीन इ. देशातून साथसंगतीचे व स्वतंत्र तबलावादनाचे कार्यक्रम पेश करून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, पं. मुकेश जाधव यांनी ग्रामीण भागातील छोट्या मैफीलीपासून जगातील प्रमुख शहरातून भारतीय अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

♦ ♦ ♦



# प्रकरण ११

# श्री. गोपाळ उगीले (जाधव)

सर्वात प्राचीन वाद्य असलेल्या पखावज या वाद्याला गोपाळ जाधव यांनी अथक परिश्रमाने संपूर्ण देशात निनादत ठेवले. एका गरीब कुटुंबातील, ग्रामीण भागातील या तरुणाने राजधानी दिल्ली येथे आठ वर्षे राहून कठोर साधना केली. दिल्लीबरोबरच देशातील प्रमुख संगीत संमेलनात दमदार वादन करून श्रोत्यांना नादब्रह्माची अनुभूती करून दिली. अशा या तरुण कलावंतांचे जीवनवृत्त, गुरूशिक्षण, संगीत कलेचा केलेला प्रचार व मानसन्मान याचा उहापोह पुढीलप्रमाणे केला आहे.

* **जीवनवृत्त :**

श्री. गोपाळ उगीले (जाधव) यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील अंदलगाव या छोट्याशा खेड्यात दिनांक १० मे १९७१ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सोपानराव तर आईचे नाव भागीरथीबाई असे आहे. हरिभाऊ हा त्यांचा भाऊ तर रूक्मिणबाई व गौळण या त्यांच्या दोन बहिणी. एकूण सहा माणसांचे हे कुटुंब होते. जमिनीच्या छोट्याशा तुकड्यावरच या कुटुंबाची गुजराण व्हायची. घरात आर्थिक सुबत्ता नव्हती. आई-वडील कधी शाळेत गेले नव्हते. वडिलांना मात्र सांप्रदायाचा छंद होता. घरातील दोन्ही मुलांना संगीताचे शिक्षण द्यावे असे त्यांच्या वडिलांना वाटू लागले. अंदलगावपासून जवळच असलेल्या सावरगावला श्री. उद्धव शिंदे हे संगीताचे जाणकार होते. त्यांना संगीत शिकविण्यासाठी अंदलगावला बोलावून घेतले. सोपानराव यांच्या घरी राहूनच ते गावातील मुलांना संगीताचे धडे देऊ लागले. चिमुकला गोपाळ गायनाची साधना करू लागला तर ज्येष्ठ बंधू हरिभाऊ हा पखावजाचे शिक्षण घेऊ लागला. सहा महिने झाली तरी या दोन्ही भावांना संगीत अध्यायनात गती येईना. त्यामुळे श्री. उद्धव शिंदे निराश झाले व सावरगावला



निघून गेले.

आठ दिवसांनी भल्या पहाटेच श्री. उद्धव सोपानराव उगीले यांच्या घरी आले. त्यांच्या अचानक येण्याने घरातील सर्वांना आश्चर्य वाटले. तेव्हा श्री. शिंदे यांनी सांगितलेला प्रसंग अगदी रोमांचकारी आहे. ते म्हणाले, "मी जेव्हा आपले घर सोडून गेलो तेव्हापासून मी बेचैन होतो. मी आपल्या घरी सहा महिने राहिलो; परंतु तुमच्या मुलांना मी शिकवू शकलो नाही याचे मला शल्य डाचत राहिले. रात्री माझ्या स्वप्नात आले की मी गोपाळ यास पखावज शिकवू लागलो आहे. मी सहा महिने त्याला गाणे शिकविण्यात व्यर्थ मेहनत घेतली. तुम्ही आताच्या आता हनुमान मंदिराज जा व तेथील पखावज घेऊन या." त्यांच्या सल्ल्यानुसार सोपानरावांनी मंदिरातील पखावज आणला. आता मात्र खऱ्या अर्थाने योग्य दिशेने संगीत अध्यापनास सुरुवात झाली. त्यांनी तीन दिवस गोपाळला शाळेत जाऊ दिले नाही. दिवसभर ते त्याला पखावज शिकवू लागले आणि आश्चर्य चौथ्या दिवशी लहानग्या गोपाळने भजनाला उत्तम साथ दिली. पुढे श्री. गोपाळ यांनी अनेक दिग्गज तबला व पखावज वादकांकडून रीतसर तालीम घेतले. पाहता पाहता या ग्रामीण भागातल्या कलावंताच्या पखावजाचे धीरगंभीर बोल दिल्ली येथे घुमले.

इ. ११ वी ते बी. ए. पर्यंतचे शिक्षण त्यांनी लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पूर्ण केले तर एम. ए. अर्थशास्त्राचे शिक्षण राजर्षि शाहू महाविद्यालयातून पूर्ण केले. दिल्ली येथील संगीत नाटक अकादमीच्या गीत व नाट्य विभागात त्यांना नौकरी करण्याची संधी मिळणार होती; परंतु मुलाखतीचे पत्र वेळेत पोहोचू शकले नाही. त्यामुळे एक मोठी संधी हातची निघून गेली. याचे त्यांना खूप दु:ख झाले. याचाच परिपाक म्हणून त्यांना अर्धांगवायू झाला. त्यात त्यांचे सहा महिने गेले. पुढे २००४ साली त्याचा विवाह कल्पना यांच्याशी झाला. त्यांना ओमकेश व प्रतीक्षा अशी दोन मुले झाली. ओमकेश सध्या वडिलांकडून पखावज वादनाचे धडे घेत आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, श्री. गोपाळ उगीले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संगीत साधना केली. जीवनात आलेल्या अपयशाने खचून न जाता मोठ्या हिमतीने ते पुढे मार्गक्रमण करीत आहेत व अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

* **गुरू व शिक्षण :**

श्री. उद्धव शिंदे यांच्याकडे श्री. गोपाळ जाधव यांची तालीम चालूच होती. एके

दिवशी श्री. दिगंबर कुलकर्णी (पोहरेगाव) यांनी चिमुकल्या गोपाळचे पखावज वादन ऐकले व ते प्रभावित झाले व म्हणाले, "या मुलाचा हात चांगला आहे. मी याला पखावज शिकवितो." त्यावेळी श्री. कुलकर्णी हे लातूर येथे रहात होते. महिना पन्नास रुपये फीस ठरली. ते आठवाड्यातून एक दिवस अंदलगावला येऊ लागले. त्यांच्याकडून गोपाळ यांनी सहा महिने तालीम घेतली. १९८३ साली सौंदणा या गावी सांप्रदायिक सप्ताह चालू होता. पहाटे चार वाजता छोटासा गोपाळ हरिपाठाला पखावजाची साथ करीत होता. तेथे थोर पखावजवादक पद्मश्री पं. शंकरबापू आपेगावकर हे आले होते. त्यांनी गोपाळचे मधुर वादन ऐकले. त्याच्या वादनातील तयारी पाहून पं. शंकरबापू प्रसन्न झाले. त्यांनी गोपाळला बोलावून घेतले व म्हणाले, "मी तुला पखावज शिकवितो. तू येशील का माझ्याकडे?" यापूर्वी गोपाळने शंकरबापूंचे नाव खूप वेळा ऐकले होते. क्षणाचाही विलंब न लावता गोपाळने होकार दर्शविला. आता मात्र शास्त्रोक्त पद्धतीचे त्याचे शिक्षण सुरू झाले. पं. शंकरबापू बरोबरच पं. उद्धवबापू आपेगावकरांचेही त्याला मार्गदर्शन मिळू लागले.

१९९३ साली संगीत नाटक अकादमीच्या वतीने औरंगाबाद येथे 'पखावज मेला' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पं. उद्धवबापूंनी श्री. गोपाळ यांना पखावज वाजविण्याची संधी दिली. या कार्यक्रमासाठी संगीत नाटक अकादमीच्या चेअरमन श्रीमती शर्बरजी मुखर्जी या उपस्थित होत्या. त्यांनी गोपाळ यांचा पखावज ऐकला व त्या आनंदित झाल्या. त्यांनी पं. शंकरबापूंना सांगितले,"इसे दिल्ली भेज दो, उसे पखावज सिखायेंगे."

सहा महिन्यांनी पं. उद्धवबापूंनी गोपाळ यांचा दिल्ली येथील कथ्थक केंद्रात प्रवेश मिळविण्यासाठी आवेदनपत्र भरले. १९९३ साली गोपाळ यांना मुलाखतीसाठी दिल्ली येथे बोलावले. एका खेड्यातला हा छोटासा मुलगा पहिल्यांदाच दिल्लीसारख्या मोठ्या शहराकडे निघाला. मनात अगम्य आत्मविश्वास होता. डोळ्यांत सुरेल स्वप्न होत. हे स्वप्न घेऊन तो प्रवास करू लागला. दिल्ली जवळील निजामोद्दीन रेल्वे स्टेशन आले. तेथे चारपाच गुंडांनी चाकू दाखवून गोपाळजवळचे सर्व पैसे काढून घेतले. तो स्टेशनवर उतरला. आता मात्र त्याच्या डोळ्यातील स्वप्न विरून गेले. तो रडू लागला. तेथे चहा पिणाऱ्या प्रवाशांनी हे पाहिले. त्यांनी त्याची आस्थेवाईक पद्धतीने चौकशी केली. घडला प्रकार त्याने त्यांना सांगितला. त्यांना गोपाळची दया आली. तेथील प्रवाशांनी पैसे जमा केले व एक रिक्षा करून त्याला संगीत नाटक अकादमीच्या कार्यालयाकडे पाठविले. मुलाखत उत्तम झाली. रेल्वेतील घडला प्रकार त्याने त्या अधिकाऱ्यांना सांगितला. त्यांनी परतण्याचे



पैसे उपलब्ध करून दिले. तो गावाकडे पोहोचला. थोड्याच दिवसात गोपाळ याची राष्ट्रीय कथ्थक केंद्रात ३ वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाल्याचे पत्र आले. अशाप्रकारे दिल्ली येथे त्यांच्या निवास, भोजन व पखावज शिकण्याची व्यवस्था झाली. तेथे पं. स्वामी रामकिशोर दासजी यांच्याकडे पखावजाचे शिक्षण सुरू झाले.

गरीब परिस्थिती, गावंढळ वेशभूषा व हिंदी भाषेची अडसर असल्यामुळे तेथील एकही विद्यार्थी गोपाळ यास बोलत नव्हता. असे असले तरी गोपाळ याने हिंमत न सोडता अविरत परिश्रम घेतले. त्या तीन वर्षात त्याने एकदाही सूर्य उगवताना व मावळताना पाहिला नाही. पहाटे चार ते रात्री अकरा वाजेपर्यंत रियाज आणि रियाजच केला. त्याची रियाजी वृत्ती पाहून गुरू स्वामी किशोरजी यांनी गुरुकुलाची चावी त्याच्याकडे सुपूर्द केली व म्हणाले, "तुला वाट्टेल तेवढा वेळ इथे रियाज कर." अशाप्रकारे भोजन व थोड्याशा विश्रांतीशिवाय त्याने एक क्षणसुद्धा वाया घातला नाही. आयुष्यातील सुखद घटना सांगताना गोपाळ सांगत होते, "त्या वेळी जगप्रसिद्ध कथ्थक नर्तक पं. बिरजू महाराज हे कथ्थक केंद्राचे संचालक होते. त्यांच्या विश्रांती कक्षाजवळ आमच्या पखावजाच्या रियाजाचा कक्ष होता. एके दिवशी दुपारी चारची वेळ होती. पं. बिरजू महाराजांनी त्यांच्या शिष्यांना विचारले," ये पखावज हर रोज कौन बजाता है? उसे बुलावो." मला बोलावण्यासाठी विद्यार्थी आले. माझ्याकडून असा कोणता अक्षम्य गुन्हा घडला की पं. बिरजू महाराजांनी मला बोलाविले. असा विचार करत मी घाबरत घाबरत त्यांच्याकडे गेलो. त्यांनी मला विचारले, 'कहाँ से आये हो?' 'महाराष्ट्रसे' मी उत्तरलो. 'नाल बजाते हो' मी म्हणालो 'प्रयास करता हूँ।' चलो मैं लावणी गाता हूँ आप नाल बजावो' आणि त्यांनी लावणी म्हणायला सुरुवात केली. मीही दमदार ठेका पकडला. ते खुश झाले. 'चलो अब मैं ठुमरी गाता हूँ, आप तबला बजावो' आणि मी त्यांच्या ठुमरीला तबल्याची उत्तम साथ दिली. ते अत्यानंदित झाले व म्हणाले,'आप मेहनती हो, मैं आपको एक अच्छे गुरू के पास भेजता हूँ।' असे म्हणून त्यांनी त्या गुरूंना फोन केला. थोड्याच वेळात ते गुरू तिथे आले. त्या गुरूंचे नाव होते पं. दालचंद शर्माजी! पं. बिरजू महाराजांनी त्यांना सांगितले, "ये बहोत बढ़ीया शागीर्द है आप इसे तालीम दिजीए।"

अशाप्रकारे श्री. गोपाळ यांना त्यांनी आपल्या घरी नेले. गुरुकुल पद्धतीत त्यांची नाथद्वारा घराण्याची शास्त्रोक्त तालीम सुरू झाली. त्यांनी त्यांच्याकडून जवळपास पाच वर्षे उच्चस्तरीय पखावज वादनाचे धडे घेतले. याबरोबरच लातूर येथील सुप्रसिद्ध तबलावादक डॉ. राम बोरगावकर यांच्याकडूनही त्यांनी प्रारंभिक ते विशारदपर्यंतचे तबलावादनाचे

शिक्षण घेतले. नृत्याची साथ कशी करावी यासाठी पं. बिरजू महाराज, उर्मिला नागर व पं. मुन्नालाल शुक्लजी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

थोडक्यात असे म्हणता येईल की, श्री. उद्धव शिंदे यांच्यापासून पं.दालचंद शर्माची व पं. बिरजू महाराजांसारख्या थोर गुरूंचा त्यांना परीसस्पर्श लाभला. अशा या गुरूंकडून त्यांनी आपली ओंजळ भरली व आपले वादन परिपक्व केले.

* **अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार**

पं. दालचंद शर्माजी यांच्याकडून नाथद्वारा घराण्याची तालीम श्री. गोपाळ यांनी घेतल्यामुळे या घराण्याची सर्वच वैशिष्ट्ये त्यांच्या वादनात दिसून येतात. सुस्पष्ट बोलांचा निकास, लयकारी, धुमकिटची तयारी, मनमोहक पढंत व प्रभावी वादनशैली असल्यामुळे देशातील अत्यंत महत्त्वपूर्ण संगीत संमेलनातून त्यांनी आपले वादन पेश केले. त्यांच्याकडील कागदपत्रे, निमंत्रण पत्रिका व वर्तमान पत्रातील कात्रणांवर नजर फिरविता त्यांनी आपल्या कलेचा ठसा सर्वच संगीत संमेलनातून उमटविला आहे असे निदर्शनास येते.

०१. दि. २७ ऑक्टोबर, १९९७ साली कथ्थक केंद्राच्या छात्रोत्सवासाठी वीस पखावज वादकांतून त्यांची निवड झाली. त्यांना स्वतंत्र पखावज वादन करण्यासाठी २० मिनिटांचा कालावधी होता परंतु त्यांचे वादन एवढे आकर्षित झाले की ३५ मिनिटे कशी संपली हेच श्रोत्यांच्या लक्षात आले नाही.

०२. मृदंगाचार्य नानासाहेब पानसे यांच्या १११व्या स्मृतिसमारोहानिमित्त दि. २१ जुलै, २००५ मध्ये बकयान (मध्यप्रदेश) येथे गुरुपौर्णिमा संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात त्यांनी स्वतंत्र पखावजवादन केले.

०३. ५० वे स्वामी हरिदास संगीत सम्मेलन, सूर-सिंगार संसद सुवर्ण जयंतीमहोत्सव दि. २५ डिसेंबर २००५ रोजी मुंबईत संपन्न झाले. याही संमेलनात त्यांनी स्वतंत्र पखावज वादन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

०४. ४१ वे 'कल के कलाकार' संगीत संमेलन २००२ मध्ये पार पडले. यातही श्री. गोपाळ जाधव यांनी पखावजवादन केले.

०५. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या वतीने ११ व्या व १२ व्या संगीत नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही वर्षी त्यांनी आपले कलानैपुण्य दाखविले.



०६. तत्कालीन पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल यांच्या निवासस्थानी एका संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. याही मैफिलीत त्यांनी पखावजवादन सादर करून पंतप्रधान महोदयांना मंत्रमुग्ध केले.

०७. महान संगीततज्ज्ञ बैजू बावरा यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ दि. २२ ते २४ ऑक्टोबर २०१० दरम्यान चंदेरी (भोपाळ) येथे आयोजित करण्यात आलेल्या संगीत समारोहात त्यांनी श्री. अफजल हुसैन यांना पखावजाची साथसंगत केली.

०८. नोबल कॉज सोसायटी आणि राजस्थान शिक्षा विज्ञान व सांस्कृतिक परिषद, उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१८ डिसेंबर २०१० रोजी श्रृंगीऋषी संस्थान, सभाभवन, उदयपूर (राजस्थान) येथील चतुर्थ धृपद समारोहात त्यांनी स्वतंत्र पखावज वादन केले.

०९. पं. गुणवंत माधवलाल व्यास स्मृति संस्थान, रायपूर (छ. ग.) यांनी आयोजित केलेल्या 'राग समय सिद्धांत' यावर आधारित संगीत सभेत पखावजाची साथसंगत केली. ३० तास चाललेली ही सभा दि. १८ व १९ मे २०१३ या कालावधीत संपन्न झाली.

१०. स्पिक मैके फेस्टिव्हल २००७ मध्ये रूद्रवीणा वादन उ. बहाउद्दीन डागर यांची मैफील झाली. त्यांना पखावजाची साथ श्री. गोपाळ जाधव यांनी केली. ही सभा राजस्थान येथील कोटा येथे संपन्न झाली.

११. कालीदास अकादमी यांनी आयोजित केलेल्या दोन दिवसीय 'मध्यप्रदेश संगीत समारोहात' उ. अफजल हुसैन यांनी धृपद गायन पेश केले. त्यांना त्यांनी पखावजाची साथ दिली.

१२. संगीत नगरी ग्वाल्हेर येथे दि. १४ डिसेंबर २०१४ रोजी 'तानसेन संगीत समारोह' संपन्न झाला. यात धृपद केंद्राच्या विद्यार्थ्यांनी गायन केले. त्यांना पखावजाची उत्तम साथ श्री. गोपाळ जाधव यांनी दिली.

१३. मध्यप्रदेश जनजातीय संग्रहालयामध्ये संस्कृती संचालनालयाद्वारे भोपाळ येथे धृपद केंद्राच्या विद्यार्थ्यांचे गायन झाले. या सुंदर सादरीकरणास त्यांनी पखावजाची साथ दिली.

१४. उस्ताद अमीर खाँ स्मृतिप्रात्यर्थ आयोजित ३ दिवसीय संगीत समारोह इंदोर येथील रविंद्र नाट्यगृहात संपन्न झाला. दि.१३ मार्च २०१३ रोजी झालेल्या या समारोहात

आशिष सांकृत्यायन यांनी धृपद गायन पेश केले. त्यांना पखावजाची साथ नाथद्वार शैलीचे ख्यातकीर्त कलाकार गोपाळ जाधव यांनी केली.

१५. दि. ३० नोव्हेंबर २००५ रोजी 'वेरूळ-औरंगाबाद' महोत्सव झाला. या महोत्सवात पं. उद्धवबापू यांच्यासमवेत श्री.गोपाळ जाधव यांनी पखावजवादन केले.

१६. लातूर येथील आवर्तन व अष्टविनायक प्रतिष्ठानच्या वतीने आशीष मिश्र (भोपाळ) यांनी दि.१९ सप्टेंबर २०१५ रोजी धृपद गायन पेश केले. त्यांना श्री. गोपाळ जाधव यांनी पखावजाची साथ कधी मृदु-मुलायम तर कधी धारेसारख्या प्रवाहात अतित, सम, विषम ग्रहांचा प्रयोग करीत केली व श्रोत्यांना स्वर नादानुभूती दिली.

१७. श्री. कृष्णमोहन मिश्र, वास्वती मिश्र यांच्या 'परमेलू' या कथ्थक प्रकारांनी त्यांनी मुंबई, कोलकत्ता व दिल्ली येथे पखावजाची साथ दिली. पद्मश्री शोभना, नारायणजी यांच्याही कथ्थक नृत्यास त्यांनी अनेक कार्यक्रमात पखावजाची साथसंगत केली आहे.

१८. ते आकाशवाणी कलावंत असल्यामुळे दिल्ली आकाशवाणीवरून अनेकवेळा त्यांचे स्वतंत्र पखावजवादन झाले आहे.

१९. विविध समारोहातून त्यांचे स्वतंत्रवादन व साथसंगत केली आहे. अशा समारोहाचे डी. डी. १ व डी. डी.भारती या दूरदर्शच्या राष्ट्रीय वाहिन्यांवरून नेहमीच प्रसारण झाले आहे. यासंदर्भात 'दै. संचार' या वृत्तपत्रात लिहिले की, "अंदलगाव येथील गोपाळ जाधव यांनी पखावज वादनात केलेली प्रगती वाखाणण्याजोगी आहे. दिल्ली, मुंबई या मोठ्या शहरांसह त्यांचे अनेक ठिकाणी कार्यक्रम झाले आहेत. दिल्ली आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे पखावज वादनाचे कार्यक्रम नेहमीच होतात. याच बरोबर पं. बिरजू महाराज यांनाही गोपाळरावांनी साथ-संगत केली आहे. आकाशवाणी सोबतच ते अमजद अली खाँ यांच्या अमान व आयान या मुलांसोबतही कार्यक्रम करतात."

थोडक्यात असे म्हणता येईल की, श्री. गोपाळ जाधव यांनी भारतातील सर्वच प्रमुख शहरातून आपले कला नैपुन्य दाखवून दाद मिळविली. एका ध्यैयाने प्रेरित होऊन त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला आहे. येवढेच नाही तर त्यांनी आपल्या अपूर्व वादन शैलीने संपूर्ण देशात लातूर जिल्ह्याची शान व मान उंचावली आहे.



* **संगीत विद्यालयाची स्थापना :**

श्री.गोपाळ जाधव हे अर्धांगवायूच्या आजारातून सावरले व पुन्हा दिल्ली येथे गेले. तेथे सहा महिने विविध संगीत महोत्सवातून त्यांनी आपले पखावजवादन केले. त्यानंतर एके दिवशी पद्मश्री पं. शंकरबापू आपेगावकरांनी त्यांना अंबाजोगाईला बोलावून घेतले. ते आजारी होते. त्यांनी श्री. गोपाळ यांना एकांतात घेऊन सांगितले की, "मी तुझ्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून गुरुकुल चालविण्यासाठी घेतले आहे. उद्धव याला हे गुरुकुल चालविण्यासाठी मदत कर. आता तू दिल्लीला जाऊ नकोस. इथे अंबाजोगाई येथे राहूनच विद्यार्थ्यांना शिकव." गुरू आज्ञा म्हणून श्री. गोपाळ यांनी दिल्ली सोडली व महाराष्ट्र शासनाच्या 'गुरुकुल' या संस्थेत ते अध्यापनाचे कार्य करू लागले. २००४ ते २००८ या कालावधीत त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना पखावजवादनाची तालीम दिली. त्यातील अनेक विद्यार्थी महाराष्ट्राबाहेर अभिजात संगीताचा प्रचार करू लागले. यासंदर्भात 'दै.लोकमत'मध्ये लिहिले आहे, "अंबाजोगाई येथील गुरुकुलातील सनतकुमार बढे, श्रीकृष्ण गडदे, मीरा चिंतामणी, सारिका तट या चौघांनी उदयपूर (राजस्थान) येथील 'गुरूशिष्य परंपरा अवलोकन शिबिरात' पखावज वादन केले. त्यांना गोपाळ जाधव यांचे मार्गदर्शन लाभले."

पुढे अंबाजोगाईतील गुरुकुल बंद पडल्यानंतर २००८ साली श्री. गोपाळ जाधव यांनी 'मृदंग साधना गुरुकुल' या संस्थेची अंबाजोगाई येथे स्थापना केली. या गुरुकुलाची एक शाखा अंदलगाव या त्यांच्या जन्मग्रामी सुद्धा आहे. या गुरुकुलातून ते भावी पिढीस मार्गदर्शन करीत आहेत. यातून राजू करडे (इंदापूर), दत्ता माने (अहमदनगर), हरिप्रसाद गाडेकर, विष्णू तोरडमल (परळी), सनतकुमार बढे (घाटनांदूर), राहुल पवार (देवळा), कृष्णा पवार (सारसा), माणिकराव पांचाळ (अंबाजोगाई), श्रीराम चव्हाण (चौसाळा) असे अनेक विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, श्री. गोपाळ जाधव यांनी अथक परिश्रमाने विविध गुरूंकडून ज्ञान प्राप्त केले. ते आपल्यापुरते मर्यादित न ठेवता समस्त महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मुक्त हस्ते वाटले. त्यांचे शिष्यही ही परंपरा पुढे चालवीत आहेत.

* **मानसन्मान :**

श्री.गोपाळ उगिले (जाधव) यांनी केलेल्या अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून त्यांना अनेक मानसन्मान मिळाले. याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

०१. कथ्थक केंद्र, राष्ट्रीय कथ्थक संस्था यांच्याकडून त्यांना ३ वर्षांसाठी नवी दिल्ली येथे पखावज शिकण्यासाठी निवास भोजन व अध्यापनासाठी शिष्यवृत्ती मिळाली.

०२. भारत सरकारच्या पर्यटन व सांस्कृतिक मंत्रालयातर्फे भारतीय संगीतासाठी प्रतिमाह रु. २०००/- शिष्यवृत्ती मिळाली. ही शिष्यवृत्ती १.२.२००१ ते १.२.२००३ या दोन वर्षांसाठी होती.

०३. दिल्ली आकाशवाणी स्वर परीक्षण बोर्डाकडून त्यांना २००१ मध्ये बी ग्रेड प्रदान करण्यात आला.

०४. शास्त्रीय संगीतातील अपूर्व साधना केल्याबद्दल २००२ साली सूर-सिंगार अकादमीने 'ताल-मणि' हा मानाचा पुरस्कार प्रदान केला.

०५. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या वतीने १९९८-९९ साली आयोजित युवा संगीत नृत्य महोत्सवात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

०६. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने अमरावती येथे दि. २६ डिसेंबर १९९४ रोजी मृदंग वादनाची स्पर्धा झाली. या स्पर्धेत त्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

०७. यु. जी. सी. ॲकॅडमीक स्टाफ व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.७ जानेवारी ते २८ जानेवारी २०१३ या कालावधीत संगीत विषयक प्राध्यापकांचा रिफ्रेशर कोर्स संपन्न झाला. या कोर्समध्ये अध्यापन करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

याबरोबरच विविध सांगीतिक स्पर्धांमध्ये त्यांना अनेक पारितोषिके मिळाली. अनेक राष्ट्रीय संगीत महोत्सवात त्यांचा सत्कार संपन्न झाला. एकूणच अभिजात संगीतातील अनेक शिखरे पादाक्रांत केली. याचा समस्त लातूरकरांना सार्थ अभिमान आहे.

♦ ♦ ♦



प्रकरण

१२

# श्री. अंगद गायकवाड



लातूर जिल्ह्यातील एक सुरेल गायक श्री. अंगद गायकवाड यांनी आपल्या मधुर गायनाने संपूर्ण महाराष्ट्रातील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. अहमदनगर येथे राहून ज्यांनी उत्तम हार्मोनियम वादनाने अनेकांच्या मैफीली सजविल्या. एक आदर्श व मेहनती गुरू होऊन शेकडो शिष्यांचे जीवन सुरेल बनविले, विविध सांगीतिक उपक्रमांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. अशा या गुणी कलावंताच्या सांगीतिक प्रवासाचा व कार्याचा लेखाजोखा या उपप्रकरणात केला आहे.

* **जीवनवृत्त :**

श्री. अंगद गायकवाड यांचा जन्म ९ जुलै १९७५ साली लातूर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कुंडलिकराव तर आईचे नाव विमलबाई असे आहे. भाऊ सुधीर तर बहीण चंद्रकला. एकूण पाच माणसांचे हे कुटुंब. घरात वडील उत्तम हार्मोनियम वाजवायचे. भजनात गायन करायचे. त्यांना बासरी वाजविण्याचाही छंद होता. वास्तविक पाहता त्यांनी कधीही शास्त्रोक्त संगीताचे शिक्षण घेतले नव्हते. त्यांना निसर्गतः स्वरज्ञानाचे वरदान लाभले होते. सहाजिकच हा गुण अंगदला अनुवंशिकतेने मिळाला. अंगद तिसरीत असतानाच त्याच्या वडिलांनी त्याला एक हार्मोनियम आणून दिली. वडिलांनी त्याला सारेगमची ओळख करून दिली. निसर्गदत्त गोड गळा व स्वर ज्ञान मिळाल्यामुळे तिसरीपासूनच तो रेडिओवरील जुनी मराठी व हिंदी चित्रपट गीते हार्मोनियमवर वाजवून गाऊ लागला. घरात लहान भाऊ सुधीर व बहीण चंद्रकला हेसुद्धा तालासुरात रममाण होऊ लागले.

श्री. अंगद यांचे इ. पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील किल्लारी येथे महाराष्ट्र विद्यालयात झाले. इ. ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयात झाले. बी. ए. पर्यंतचे शिक्षण महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे पूर्ण केले तर एम. ए. संगीताचे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद येथे झाले. शालेय व महाविद्यालयीन जीवनात श्री.अंगद हे विविध सांगीतिक स्पर्धा व महोत्सवातून सहभागी होत असत. एवढेच नाही तर या कालावधीत त्यांनी अनेक पारितोषिकेही पटकावली. पुढे डिसेंबर २००१ मध्ये मनीषा यांच्याशी ते विवाहबद्ध झाले. कु. नंदिनी व कु. अंजली या त्यांच्या दोन मुली. या दोघीही आज महाराष्ट्रातील विविध सांगीतिक स्पर्धांत यश संपादन करीत आहेत.

*      **गुरू व शिक्षण :**

मुळातच संगीताची आवड असल्यामुळे त्यांच्या वडिलांना छोट्याशा अंगदने शास्त्रीय संगीत शिकावे असे वाटू लागले. त्यामुळे त्यांनी श्री. नरसिंह गंगणे (गातेगाव) यांच्याकडे संगीताचे धडे घेण्यासाठी पाठविले. पुढे पं. विठ्ठलराव जगताप व पं. बाबुराव बोरगावकर यांच्याकडूनही संगीताचे ज्ञान आत्मसात केले. या तीन गुरूवर्यांकडून त्यांनी साधारणतः ३ वर्षे तालीम घेतली. त्यानंतर त्यांनी पं. शांतारामजी चिगरी यांच्या सूरताल विद्यार्थी शास्त्रोक्त संगीताचे धडे घेऊ लागले. याबरोबरच पुणे, आळंदी येथूनसुद्धा विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येऊ लागले. यात श्री. विनोद राऊत (संगमनेर), दत्तात्रय कचरे (कर्जत), रामभाऊ कुलकर्णी (हडपसर, पुणे), साध्वी तुलसीदेवी (आळंदी), आशुतोष खराडे (अहमदनगर), एकनाथ तळेकर, विजय ढेले (कडा, आष्टी) इ. विद्यार्थ्यांचा नामोल्लेख करता येईल.

विशेष म्हणजे त्यांच्या दोन मुली व शिष्या कु. नंदिनी व कु. अंजली या महाराष्ट्रातच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर अनेक पारितोषिकांच्या मानकरी ठरल्या आहेत. कु. नंदिनी हिने वयाच्या आठव्या वर्षापासून आपल्या वडिलांकडून गाण्याचे धडे घेऊ लागली. तिने आजपर्यंत पुणे, औरंगाबाद, नांदेड, लातूर या ठिकाणच्या राज्य स्तरीय शास्त्रीय व सुगम गायनाच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर लखनौ येथे आयोजित केलेल्या 'क्लासिकल व्हाईस ऑफ इंडिया २०१४' या स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेसाठी देशभरातून १६ स्पर्धकांची निवड झाली होती. त्यात तिने हे यश संपादन केले.



कु. अंजली ही दहा वर्षाची आहे. तिने वयाच्या ५ व्या वर्षापासून वडील अंगद गायकवाड यांच्याकडून संगीताचे शिक्षण घ्यायला प्रारंभ केला. पहिलीत असतानाच तिने लातूर येथे आयोजित केलेल्या राज्य स्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. तिने आजपर्यंत पुणे, औरंगाबाद, नांदेड, लातूर, सातारा इ. ठिकाणी राज्य स्तरीय शास्त्रीय व सुगम स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. डिसेंबर २०१५ साली लखनौ येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावतरील 'क्लासिकल व्हाईस ऑफ इंडिया २०१५' या स्पर्धेत तिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. विशेष म्हणजे अंतिम फेरीत जेवढे स्पर्धक होते त्या सर्व स्पर्धकांत ती सर्वांत कमी वयाची म्हणजे १० वर्षांची एकमेव स्पर्धक होती. एवढेच नव्हे तर झी वाहिनीवरील 'सारेगमप लिटल चम्प' या राष्ट्रीय पातळीवरील रिअलीटी शोमध्ये अंजलीने सर्वप्रथम क्रमांक पटकाविला. लोकमत परिवाराकडून अंजलीला १ लाख रुपयांचा 'सुर ज्योत्स्ना पुरस्कार' देऊन सन्मानित केले. तसेच सुप्रसिद्ध संगितकार ए आर रहेमान यांनी 'सचिन : अ बिलीयन ड्रिम्स' या चित्रपटात एक गीत गाऊन घेतले.

२०१५ साली परभणी येथे संपन्न झालेल्या राज्य स्तरीय खुल्या गटातील गायन स्पर्धेत १ लाख १ हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक या दोन्ही भगिनींनी पटकावले. अहमदनगर येथील स्वरानंद संगीत संस्थेचा 'स्वरानंद पुरस्कार', अहमदनगर संगीतप्रेमी संस्थेचा 'नगर संगीत रत्न पुरस्कार' या भगिनींना मिळाला आहे.

उपरोक्त माहितीच्या आधारे असे म्हणता येईल की, श्री. अंगद गायकवाड यांनी लातूरचे संगीत संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्याचे कार्य करीत आहेत. त्यांच्या शिष्यामार्फत अभिजात संगीताचा ते प्रचार करीत आहेत. विशेषतः त्यांच्या दोन्ही मुलींची मेहनत व गायकी पाहता असे वाटते की पं. शांतारामजी चिगरी यांच्या गायकीची परंपरा पुढे अविरत चालूच राहील.

♦ ♦ ♦

प्रकरण

१३

# श्री. राजेंद्र भोसले

बनारस घराण्याची रीतसर तालीम घेऊन अल्पावधीतच ज्यांनी घर सोडले व अहमदनगरसारख्या मोठ्या शहरात जाऊन तबलावादनाच्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला असे कलावंत म्हणजेच श्री. राजेंद्र भोसले हे होत. ज्यांनी लातूर शहरात राहून अविरत परिश्रम घेतले, अहमदनगरसारख्या शहरातून संगीत विद्यालयाची स्थापना केली. विविध सांगीतिक उपक्रम राबविले. अशा एका जिद्दी कलावंताचे सांगीतिक कार्य या उपप्रकरणात पाहता येईल.

* **जीवनवृत्त :**

श्री. राजेंद्र भोसले यांचा जन्म दि. २३ मे १९७० रोजी लातूर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव प्रल्हाद तर आईचे नाव गंगाबाई असे आहे. छोटा भाऊ नरेंद्र. अशाप्रकारे चार माणसांचे हे कुटुंब. राजेंद्र यांचे काका ज्योतिराम भोसले हे उत्तम हार्मोनियम वाजवायचे. घरात हार्मोनियमचे सूर वाजू लागताच चिमुकला राजेंद्र त्याकडे आकृष्ट झाला. काकांनीही मोठ्या प्रेमाने त्याला आणि नरेंद्र याला हार्मोनियमचे धडे दिले. नरेंद्र गायनात रमला परंतु राजेंद्र मात्र तालात रमू लागला. कोणत्याही वस्तूवर तो वाजवू लागला. एवढेच नाही तर एखादे गाणे लागले की तो भांडे घेऊन त्यावर ताल धरू लागला. हे त्याच्या काकांनी पाहिले. याला हार्मोनियमपेक्षा तबला वादनात गती मिळेल असे त्यांना वाटले. त्याला तबलावादनासाठी योग्य गुरू मिळतो का याचा ते शोध घेऊ लागले. त्याला योग्य गुरू लाभला. पुढे त्यांनी तबलावादनाची रीतसर तालीम घेऊन १९८९ साली अहमदनगर हे शहर गाठले. त्यांचे शालेय शिक्षण श्री. देशिकेंद्र विद्यालय, लातूर येथे झाले तर महाविद्यालयीन शिक्षण महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर या महाविद्यालयात पूर्ण केले. त्यांचा १९९८ साली पूनम यांच्याशी विवाह झाला. कु. पूर्णांकिना ही त्यांची मुलगी. ही आज आपल्या वडिलांची परंपरा पुढे चालविण्याचा प्रयत्न करीत आहे.



* **गुरू आणि शिक्षण :**

लहानपणापासूनच संगीताची आवड निर्माण झाल्यामुळे श्री. राजेंद्र भोसले यांच्या काकांनी त्यांना पं. डॉ. राम बोरगावकर यांच्याकडे दाखल केले. वयाच्या आठव्या वर्षी म्हणजेच १९७८ साली त्यांनी तबलावादनाचे धडे घेण्यास प्रारंभ केला. साधारणतः एक वर्षानंतर गुरू डॉ. राम बोरगावकर हे तबलावादनाची उच्चस्तरीय तालीम घेण्यासाठी बनारसला गेले. गुरू गेले तरी साधनेत खंड पडू नये यासाठी डॉ. राम सरांचे काका श्री. गोविंद बोरगावकर उर्फ अण्णा यांच्याकडून श्री. राजेंद्र यांनी २ वर्षे धडे घेतले. जेव्हा डॉ. राम बोरगावकर बनारसहून परत आले तेव्हा मात्र बनारस घराण्याची तालीम सुरू झाली. त्याकाळात पं. राम सर आठ आठ तास रियाज करायचे. याचा नकळत परिणाम त्यांच्या शिष्यांवर व्हायचा. शिष्यही गुरुसमवेत आठ आठ तास रियाज करू लागले. कायदे, रेले, तुकडे, बनारसच्या घरंदाज बंदिशी त्यांनी शिष्यांना भरभरून दिल्या. याला श्री. राजेंद्र तरी कसे अपवाद असणार? गुरुकडून मिळालेला हा बोलांचा प्रसाद त्यांनी मनोभावे स्विकारला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गुरूंनी त्यांना आधार दिला. त्यांचे मनोबल उंचावले. यामुळे ते लवकरच एक उत्तम तबलावादक म्हणून नावारूपाला आले. एप्रिल १९८७ साली ते संगीत विशारद तर १९९१ साली ते तबला अलंकार ही परीक्षा उत्तीर्ण झाले. २०१० साली तबला विषयात एम.ए. झाले. याच काळात त्यांनी पं. बाबुराव बोरगावकर यांच्याकडून गाण्याचेही ज्ञान आत्मसात केले.

* **संगीत विद्यालयाची स्थापना :**

श्री. राजेंद्र भोसले यांनी तबलावादनाची तालीम घेतल्यानंतर संगीत प्रचारार्थ अहमदनगर येथे जावे असे त्यांना वाटू लागले. त्यावेळेस त्यांचे वय होते केवळ १८ वर्षांचे. घरदार सोडून परक्या गावात कसे जावे याचा त्यांनी आठ दिवस विचार केला. अखेर जाण्याचा निर्धार पक्का झाला; परंतु त्यांचे आईवडील काही केल्या परवानगी देत नव्हते तेव्हा गुरू डॉ. राम सर त्यांच्या घरी गेले व म्हणाले, "याला अहमदनगरला जाऊ द्या. काहीतरी करून दाखवायचे हेच वय आहे." अशाप्रकारे घरातून त्यांना नगरला जाण्याची परवानगी मिळाली. लातूरहून निघताना त्यांनी आई-वडील व गुरुजनांचा आशीर्वाद घेतला. तेव्हा श्री. राजेंद्र या प्रसंगाचे वर्णन करताना सांगतात, "मी राम सरांचे आजोबा श्री. बाबा बोरगावकर यांच्याकडे आशीर्वादासाठी गेलो. तेव्हा बाबा म्हणाले, "राजेंद्र तू आता नगरला जात आहेस पण आता तेथून हताश होऊन किंवा अपयशी होऊन परत मागे पाऊल

टाकायचे नाही." बाबांचे हेच वाक्य त्यांनी स्मरणात ठेवले व अहमदनगरकडे प्रस्ताण केले. तेथे २८ जानेवारी १९८९ साली श्रीगणेश संगीत विद्यालयाची स्थापना केली.

श्री. गणेश संगीत विद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी अनेक संगीत संमेलने, संगीत रजनी व संगीत महोत्सवाचे आयोजन केले. यात तालमणि डॉ. राम बोरगावकर व सूरमणी पं. बाबुराव बोरगावकर, पं. अजय पोहनकर, पं. प्रभाकर कारेकर, सौ. आशा खाडीलकर, पं. संजीव अभ्यंकर, प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगणा व अभिनेत्री कु. अर्चना जोगळेकर, उ. उस्मान खाँ (सतार), उ. इक्बाल महमद (व्हायोलिन), पं. राजन कुलकर्णी (सरोद), पं. अरविंदकुमार आजाद(तबला), उ. शफिक खाँ (सतार), पं. मुकुंद पटेकर (हार्मोनियम) इ.नामवंत कलाकारांचे कार्यक्रम आयोजित केले. अशाप्रकारे अहमदनगर व परिसरात त्यांनी अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

या संगीत विद्यालयातून त्यांनी अनेक शिष्य घडविले. यात प्रा. मकरंद देशमुख(पुणे), संजय हिंगणे (अहमदनगर), सारंग सोहनी (पुणे), विश्वजीत कुलकर्णी (अहमदनगर), हर्षद भावे (अहमदनगर) यांचा नामोल्लेख करता येईल. ही पिढी आपल्या गुरूचा वारसा आपल्या कलेद्वारे व अध्यापनाद्वारे पुढे चालवित आहे.

* **अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार :**

अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील प्रमुख शहराबरोबरच इतर राज्यात सुद्धा वादन केले. मुंबई (माटुंगा) येथे मराठवाडा संगीत संमेलन झाले होते. या संमेलनात त्यांनी स्वतंत्र तबला वादन केले. पुणे येथे श्री. दत्त आश्रम सांगवी येथील संगीत महोत्सवात सादरीकरण करून श्रोत्यांची वाहवा मिळविली. औरंगाबाद येथे डॉ. राम बोरगावकर यांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्रदान करण्यात आला त्याचे औचित्य साधून राज्य शासनाच्या वतीने एका संगीत सोहळ्याचे आयोजन केले होते. यात त्यांनी तबलावादन सादर केले. अहमदनगर येथे १९९२ साली त्यांनी 'संगीत नृत्य रजनी'चे आयोजन केले. या समारोहातून त्यांनी आपले वादन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. १९९४ साली अहमदनगर येथे त्यांनी संगीत महोत्सवाचे आयोजन केले होते. याही महोत्सवातून त्यांनी स्वतंत्र तबलावादन व साथसंगत करून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या वतीने देवास (मध्यप्रदेश) येथे एका सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात त्यांनी साथसंगत केली.



तसेच कर्नाटकातील हुमनाबाद येथेही आपले सादरीकरण करून संगीताचा प्रचार केला.

ते एक उत्तम रचनाकार असून त्यांनी विविध तालात उठान, कायदे, टुकडे, चक्रदार इ.च्या बंदिशी तयार करून त्याचे सादरीकरण केले आहे. त्यांनी "ब्रम्हानंदी लागली टाळी " व "दावलशहा बाबा" या धार्मिक भक्तिगीतांच्या ध्वनिफितींचे संगीत संयोजन केले आहे. गुरूवर्य तालमणी डॉ. राम बोरगावकर निर्मीत दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून २००१ साली प्रसारीत झालेल्या "तालदर्शन" या कार्यक्रमात त्यांनी सहवादन केले आहे. तसेच २००६ साली दूरदर्शनवरून प्रसारित झालेल्या 'भक्तिरंग' या कार्यक्रमात श्री. राजेंद्र भोसले यांनी तबल्याची साथसंगत केली आहे.

१९९४ पासून ते अ. भा. गांधर्व महा. मंडळाचे प्रारंभिक ते संगीत अलंकार परीक्षेचे परीक्षक म्हणून काम पाहतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, राज्य स्तरीय आंतर विद्यापिठीय इंद्रधनुष्य या युवकमहोत्सवातून त्यांनी संगीतविषयक स्पर्धांसाठी तज्ज्ञ परीक्षक म्हणूनही यशस्वीपणे कार्य पार पाडले आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, लातूर जिल्ह्यातील या भूमिपुत्राने अहमदनगर येथे जाऊन स्वकर्तृत्त्वावर आपले सांगीतिक विश्व निर्माण केले. संगीत विद्यालये, संगीत महोत्सव, स्वतंत्र तबलावादन, साथसंगत, परीक्षण व दूरदर्शन इ. च्या माध्यमातून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला.

♦ ♦ ♦

# प्रकरण
# १४
# उपसंहार

निष्कर्षतः असे म्हणता येईल की, मराठवाड्याला दैदीप्यमान अशी सांगीतिक परंपरा लाभलेली आहे. पं. शारंदेव, पं. गोपाल नायक यांसारखे थोर संगीततज्ज्ञ या भूमीत जन्माला आले. ज्यांनी मराठवाडाच नव्हे तर भारतीय संगीताला मोलाचे योगदान दिले. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत दासोपंत, संत रामदास स्वामी अशा थोर विभूतींनीसुद्धा अभिजात संगीतासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी चौदाव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत रागविद्या कीर्तनाच्या माध्यामातून जन-सामान्यांपर्यंत पोहोचविली.

पुढे निजामशाहीत राजसत्तेने संगीत कलेत रस दाखविला त्यामुळे तिला पुन्हा बहर आला. मराठवाड्याचे सत्ताकेंद्र हैद्राबाद होते. मराठवाड्याच्या सत्तेची दोर निजामाच्या हातात असल्यामुळे मराठवाड्यातील अनेक चाकरमाणी माणसं हैद्राबादला जात होती तर काही जण उच्च शिक्षणासाठी हैद्राबादला जाऊन रहात होती. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांचा तेथील सांस्कृतिक वातावरणाशी संबंध येत होता. अशा प्रकारे तेथील प्रत्येक नवीन गोष्टींचा सुगावा मराठवाड्यातील जनतेला लागायचा. त्याकाळात भटजीबापू व माणिक प्रभू महाराज आदी व्यक्तींनी अभिजात संगीताला प्रोत्साहन दिले.

विसाव्या शतकात सामाजिक परिवर्तनाबरोबरच संगीतातही परिवर्तन झाले. पं.वि.ना. भातखंडे व पं. वि. दि. पालुस्कर यांच्या कृपेने मर्यादित असलेले संगीत सर्वांसाठी खुले झाले. या वाटचालीत पं. विनायकबुवा पटवर्धनांचे शिष्य डॉ. सं. भ. देशपांडे व पं. रातंजनकरांचे शिष्य गोविंदराव दंताळे यांना हैद्राबाद येथे अभिजात संगीत शिकविण्याचा बहुमान मिळाला.

देशाला स्वातंत्र्य मिळाले. राजकीयदृष्ट्या भारत पारतंत्र्यातून मुक्त झाला; परंतु मराठवाड्याला भारतात विलीन व्हायला १९५६ साल उजाडावे लागले. स्वतंत्र मराठवाड्यात डॉ. सं. भ. देशपांडे व डॉ. अण्णासाहेब गुंजकर यांनी प्राणपणाने अभिजात संगीत रूजविले.



पुढे पं. शंकर बापू अपेगावकर, पं. आप्पा जळगावकर, पं. रामदास अनवले, पं. के. एन बोळंगे, पं. गुलाम रसूल, पं. नाथराव नेरलकर, प. शांताराम चिगरी, पं. शाम गुंजकर, पं. गणेशअण्णा चौधरी, पं. रमेश कानोले, सीता मोहनराव, पं. कमलाकर परळीकर, पं. शिवदास देगलूकर, पं. डॉ. राम बोरगावकर, पं. बाबुराव बोरगावकर, पं. पांडुरंग मुखडे, डॉ. सुहासिनी कोरटकर, पं. अरविंद गजेंद्रगडकर, पं. उद्धव अपेगावकर यांनी अथक परिश्रम घेऊन मराठवाड्यातील अभिजात संगीत परंपरा जतन करून ठेवली.

सध्या पं. मुकेश जाधव, प्रा. अंगद गायकवाड, प्रकाश बोरगावकर, प्रा. वृषाली देशमुख, प्रा. अंजली मालकर, नागेश आडगावकर, अभिजीत अपस्तंभ, अंकिता जोशी, तेजस धुमाळ, इ. तरुण गायक-वादक मराठवाड्याच्या अभिजात संगीत परंपरेत मोलाची भर टाकीत आहेत.

नवीन पिढी संगीताच्या प्रचारार्थ धडपड करते आहे. असे असले तरी संगीत कलेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मराठवाड्यात अनेक उणिवा दिसून येतात. येथील संगीत क्षेत्रातील सर्व कलावंतांचे संघटन नाही किंवा तशी भरीव योजनाही नाही त्यामुळे सांघिक प्रयत्नातून जो संगीताचा विकास व्हायला हवा तो होत नाही. विभागीय स्तरावर एखादी अकादमी असायला हवी; परंतु शासन व राजकीय व्यक्तींनी याकडे विशेष लक्ष दिले नाही. गायक व तबला वादकांची संख्या भरपूर आहे परंतु अजूनही मराठवाड्यात वाद्यवादन परंपरा विकसित होऊ शकली नाही. अनेक जिल्ह्यांत आकाशवाणी केंद्र सुरू झाले नाही.

मराठवाड्यातील अनेक शाळात व महाविद्यालयात संगीत हा ऐच्छिक विषय सुरू झाला आहे. त्यामुळे बी. ए., एम. ए. व पीएच. डी. सारख्या पदव्या घेणाऱ्यांचीही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मराठवाड्यातील अनेक शहरी भागात अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळाशी संलग्नीत संगीत विद्यालये सुरू झाले आहेत. यातून अनेक विद्यार्थी विशारद व अलंकार या पदव्या घेत आहेत; परंतु त्यांच्या सादरीकरणाचा दर्जा सुमारच आहे. अनेक ग्रामीण भागात आजही अभिजात संगीत शिकविण्याची सोय नाही. संगीत विकासार्थ शासनाकडून अनुदान मिळत नाही. या सर्व समस्यांचे निराकरण केले तर पुन्हा एकदा मराठवाड्याचे नाव अभिजात संगीताच्या नभांगणात तेजाने तळपत राहील.

प्रस्तुत प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील निवडक अभिजात गायक वादकांचे चरित्रात्मक संशोधन पद्धतीतून उत्क्रांत झालेल्या कलावंतनिष्ठ संशोधन पद्धतीचा

अवलंब केल्यामुळे या कलावंताचा बौद्धिक व भावनिक विकास कसा झाला, त्यांची गायन, वादन शैली कशी विकसित झाली हे जाणून घेतले. कलावंतांच्या व्यक्तिमनाचे जोपर्यंत आकलन होत नाही तोपर्यंत त्याच्या कलेला नेमका न्याय देता येत नाही. हे विचारात घेऊन निवडक अभिजात कलावंतांच्या व्यक्तित्त्वाचा वेध घेण्यासाठी त्यांचे थोडक्यात जीवनवृत्त पाहिले आहे.

या प्रकरणात कलावंतांचा जन्म, त्यांच्या आई-वडिलांचा व्यवसाय या बाबी पाहिल्या. त्यातून असे स्पष्ट झाले की बहुतेक सर्व कलावंतांचे आई-वडील हे निरक्षरच आहेत. त्यामुळे त्यांची सांगीतिक वाटचाल करण्यास अडथळे निर्माण झाले. किंबहुणा अनेक कलावंतसुद्धा अल्पशिक्षित आहेत, हे स्पष्ट होते. असे असले तरी काही कलावंतांच्या घरात थोडे फार सांप्रदायिक वातावरण होते. ज्यामुळे ते पुढे संगीत क्षेत्रात प्रगती करू शकले. अल्प शैक्षणिक पात्रतेबरोबरच बहुतेक सर्वच कलावंतांच्या घरी अठराविश्व दारिद्र्य होते. कोणी गुरे राखणारे होते तर कोणी माधुकरी मागणारे होते, कोणी घरदार सोडून संगीत साधनेसाठी भिक्षा मागून शिकत होते. अशाही कठीण परिस्थितीला लथाडून त्यांनी आपले सांगीतिक जीवन समृद्ध केले.

निवडक अभिजात कलावंतांच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला असता असे स्पष्ट होते की अगदी सुरुवातीच्या काळात पं. शांतारामजी चिगरी, पं. बाबुरावजी बोरगावकर हे अत्यंत कठोर व शिस्तप्रिय गुरू म्हणून परिचित होते. तर पं. अनवले, पं. बोळंगे, पं. राम बोरगावकर व पं. विठ्ठलराव जगताप हे अत्यंत मृदू स्वभावाचे असल्याचे दिसून येते. या सर्व गुरूंनी आपल्या शिष्यांना पोटच्या मुलांप्रमाणे सांभाळले. याच प्रकरणात कलावंतांच्या व्यक्तित्त्वावर प्रकाश टाकला आहे. हे सर्व कलावंत आंतर्बाह्य सुंदर असल्याचे दिसून आले. पं. शांतारामजी चिगरी यांच्यासारखे कलावंत जरी अंध असले तरी सर्व शिष्यांना त्यांनी डोळसपणे ज्ञानाचा प्रकाश दिला.

कलावंतांचे विवाह व त्यांच्या आर्धांगीनीने कशाप्रकारे साथ दिली याचा परामर्श या प्रकरणात घेण्यात आला आहे. सहाही कलावंतांच्या पत्नीने आपल्या पतीच्या सांगीतिक कार्यात मोलाची साथ दिली. पं. बोळंगे गुरुजी तर आपल्या घरावर तुळशीपत्र ठेऊन संपूर्ण मराठवाड्यात परिक्रमा करीत असत. अशाही स्थिती त्यांच्या पत्नीने आपल्या कुटुंबाची योग्य ती काळजी घेतली. पं. शांतारामजी चिगरी गुरुजीना वेळप्रसंगी चुरमुरे खाऊन राहावे लागले. अशा स्थितीत त्यांच्या पत्नी सौ. शकुंतलादेवी यांनी कधीही तक्रार केली नाही.



सहा कलावंतांपैकी प. शांतारामजी चिगरी यांच्या पत्नी सौ. शकुंतलादेवी व पं. बाबुरावजी बोरगावकर यांच्या पत्नी सौ. सरोज यांनी संगीताचे शिक्षण घेतले व आपल्या पतीच्या अध्यापन कार्यात मदत केली.

निवडक सहा कलावंतांपैकी दोन कलावंत कालवश झाले आहेत. ज्यात पं. अनवले गुरुजींनी परभणी आकाशवाणी केंद्रवर रेकॉर्डिंग होत असतानाच अखेरचा श्वास घेतला. तर पं. बोळंगे गुरुजींनी अखेरच्या श्वासापर्यंत संगीत अध्यापणाचे कार्य केले. उर्वरित चार कलावंत आजही मोठ्या उत्साहाने संगीतिक प्रचार व प्रसार कार्यात रममाण झाल्याचे दिसून येते.

निवडक अभिजात कलावंतांच्या जीवन वृत्ताचा वेध घेतल्यानंतर तिसऱ्या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील निवडक अभिजात गायक वादकांनी घेतलेली विधिवत तालीम व त्यामध्ये प्राप्त केलेली सिद्धता याचा विवेचक पद्धतीने विचार केला आहे. त्यांचा नजरेत भरणारे विशेष पुढीलप्रमाणे आहेत.

लातूर शहर हे तसे सुरुवातीच्या काळातील उस्मानाबाद जिल्ह्यातील एक छोट्याशा तालुक्याचे शहर होते. कसल्याही प्रकारच्या दळणवळणाच्या व भौतिक सुख-सुविधेपासून हे गाव कोसो मैल दूर होते. असे असले तरी या निवडक अभिजात कलावंतांनी प्राणपणाने मेहनत घेऊन विधिवत तालीम घेतल्याचे दिसते. पं. अनवले गुरुजींनी उ. रशिदअली खाँ चांदोरकर यांच्याकडून चंद्रपूर येथे जाऊन तालीम घेतली तर परभणी येथून उ. गुलाम रसूल खाँ व मध्यप्रदेशात जाऊन गुरू दयाल यांच्याकडून तालीम घेतली. खिशात पाच पैसे नसतानाही त्यांनी केवळ गुरुगृही कपडे धुणे, चिलीम भरणे अशी कामे करून त्यांनी बी.ए., तबला प्रवीण व बी. ए. व एम. ए. गायन या सांगीतिक पदव्या प्राप्त केल्या.

पं. बोळंगे गुरुजींनी श्री. पंढरीनाथ चाकूरकर, श्री. माणिकराव संगवई, श्री. बाबुरावजी वणकुद्रे व अवलिया फकिर खाँसाहेब यांच्याकडून मैलो न् मैल पायपीट करून ज्ञान प्राप्त केले. अवलिया फकीर खाँ साहेबांबरोबर त्यांनी कधी झाडाखाली तर कधी मशिदीमध्ये बसून व भीक्षा मागून गायनाचे धडे घेतले. पुढे कलकत्त्याचे जगदीश प्रसाद व पतियाला घराण्याचे बडे गुलाम अली खाँ यांचेही शिष्यत्त्व पत्करले. मिळालेल्या ज्ञानावर समाधान न मानता त्यांनी नजामत अली, सलामत अली, फतेहअली खाँ व अमानत अली खाँ यांच्या गायकीचा त्यांनी डोळसपणे अभ्यास केला.

पं. शांतारामजी चिगरी यांनी तर गायनाबरोबरच तबलावादनाची विधिवत तालीम

घेतली. त्यांनी पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. विनायकबुवा पटवर्धन व पं. नारायणराव व्यास यांच्याकडून ग्वाल्हेर घराण्याची यथोचित तालीम घेतली तर उ. अहमदजान थिरकवाँ, (फरूकाबाद), उ. खलिफा नत्थू खाँ (दिल्ली), व बद्रीप्रसाद मिश्र (बनारस) यांच्याकडून तबलावादनाचे धडे घेतले. गायन व तबलावादनात त्यांनी संगीत प्रभाकर ही पदवी प्राप्त केली. असे असले तरी संगीत अलंकारपर्यंतच्या शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी अत्यंत शास्त्रोक्त शिक्षण दिले.

डॉ. राम बोरगावकर यांनी काका पं. गोविंदराव बोरगावकर, उ. गुलाम रसूल खाँ व पं. शारदा सहाय महाराजांकडून तबल्याची उच्च स्तरीय तालीम घेतली. पुढे त्यांनी अखंड परिश्रम करून तबलावादनात सिद्धता प्राप्त केली. त्यांनी तबला विशारद, संगीत अलंकार या पदव्या घेतल्या. याबरोबरच 'भारतीय व पाश्चात्त्य तालांचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन करून अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मंडळाची 'संगीताचार्य' ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली. पं. बाबुराव बोरगावकर यांनी वडील गोविंदराव बोरगावकर, आजोबा बाबा बोरगावकर, पं. सदाशिवबुवा जाधव, पं. बलवंतराय भट्ट व पं. डॉ. स. भ. देशपांडे यांच्यासारख्या गुरूकडून अभिजात शास्त्रीय गायनाचे धडे घेतले. त्यांनी गायनातील संगीत अंलकार तबला व हार्मोनियम वादनातील विशारद ही पदवी प्राप्त केली. पं. विठ्ठलरावजी जगताप यांनी पं. के. एन. बोळंगे गुरुजीकडून ज्ञान संपादन केले. गायनातील संगीत अलंकार ही पदवी त्यांनी प्राप्त केली.

या सर्वच कलावंतांना अभिजात संगीताची तालीम घेण्यासाठी शेकडो मैल पायपीट करावी लागल्याचे दिसते. महाराष्ट्रबरोबरच मध्यप्रदेश व उत्तर प्रदेशात भटकंती करावी लागली. अथक परिश्रम करून त्यांना संगीतातली अलौकिक विद्या प्राप्त करावी लागली. यातील पं. बोळंगे गुरुजीवगळता सर्वच कलावंतांनी संगीत विशारद व अलंकार ही पदवी प्राप्त केली. 'संगीताचार्य' ही पदवी प्राप्त करणारे मात्र डॉ. राम बोरगावकर हे एकमेव कलावंत आहेत.

चौथ्या प्रकरणात निवडक गायक-वादकांच्या अपूर्व गायन व वादन शैलीद्वारे अभिजात संगीताचा देश-विदेशात कशा प्रकारे प्रचार व प्रसार केला याचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे. या सहा कलावंतांनी आपली गायन व वादन शैली कशा प्रकारे विकसित केली यावर प्रकाश टाकण्यात आला. संशोधनाअंती असे लक्षात येते की, या सर्वच कलावंतांनी उत्तम सादरीकरणाची कला आत्मसात केल्याचे दिसून येते. आपल्या



परिपक्व गायन व वादनशैलीद्वारे या कलावंतांनी अनेक मैफीली दुमदुमून टाकल्या.

पं. रामदास अनवले यांनी गायन व तबलावादनाच्या माध्यमातून महाराष्ट्र कर्नाटक व आंध्र प्रदेशात अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्यांनी विविध आकाशवाणी केंद्रावरून आपले गायन व वादन सादर केले. किंबहुना मराठवाड्यातील पहिले आकाशवाणी कलावंत होण्याचा त्यांना बहुमान मिळाला. पं. बोळंगे गुरुजींनी संपूर्ण मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भात आपल्या गायन-वादनांने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. पं. शांतारामजी चिगरी गुरुजींनी तर भारतरत्न पं. रविशंकर (सतार) व भारतरत्न स्वरसम्राज्ञी 'लता मंगेशकर' (पार्श्वगायन) यांना तबला व ढोलकची साथ केली. महाराष्ट्र व कर्नाटकात त्यांनी अनेक मैफीली करून अभिजात संगीताचा प्रचार केला. डॉ. राम व पं. बाबुराव बोरगावकरांनी महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश व उत्तर प्रदेशातील प्रमुख शहरातून आपल्या गायन-वादनाने संगीताचा प्रचार केला. त्यांनी आकाशवाणी दूरदर्शन व ध्वनिफितींच्या माध्यमातून भारतीय संगीत सर्वदूर पोहोचवले. पं. राम बोरगावकरांनी तर विदेशात जाऊन भारतीय संगीताची ध्वजा फडकवली. पं. विठ्ठलरावजी जगताप यांनी मराठवाड्यातील अनेक शहरांत अभिजात संगीताच्या मैफिली केल्या. त्यांनी एका ध्वनिफितीची निर्मिती करून संगीताचा प्रचार व प्रसार केला.

लातूर जिल्ह्यातील या सहाही कलावंतांनी आपल्याजवळील ज्ञान पुढील पिढीकडे सुपूर्द करावे यासाठी संगीत विद्यालय, संगीत अकादमी व महाविद्यालय सुरू केले. पं. अनवले गुरुजींनी मराठवाड्यातील दुसरे संगीत विद्यालय उदगीरसारख्या छोट्या गावात सुरू केले. पं. राम व बाबुरावजी बोरगावकरांनी मात्र संगीत महाविद्यालयाबरोबरच मराठवाडा संगीत अकादमी व रिसर्च सेंटर व सरस्वती संगीत कला महाविद्यालयाची सुरुवात केली. या सर्वच कलावंतांनी या संगीत संस्थांतून अभिजात संगीताचे शास्त्रोक्त धडे तर दिले. एवढेच नाहीतर त्यांनी विविध संगीत महोत्सवांचे आयोजन केले. पं. भीमसेन जोशीपासून उ. झाकीर हुसेन व कौशिकी चक्रवर्ती पर्यंतच्या शेकडो कलावंतांना त्यांनी लातूर शहरात पाचारण केले व जिल्ह्यातील रसिकांचे कान तृप्त केले. यातील काही कलावंतांनी शिष्यांना अभिजात संगीत शिकता यावे यासाठी मोफत ज्ञानदान केले, वसतिगृह, शिष्यवृत्ती देऊन अभिजात संगीत विकासात मोलाचे योगदान दिले. त्यामुळे या निवडक कलावंतांच्या परिश्रमातून लातूर, मराठवाडा व महाराष्ट्रच नव्हे तर देशासाठी अनेक उदयोन्मुख कलावंत तयार झाले. पं. शांतारामजी चिगरी यांनी मुकेश जाधवसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत

घडविले. पं. राम व बाबुराव बोरगावकरांनी मंगेश बोरगावकरसारखा संगीतातील हिरा महाराष्ट्राला दिला तर पं. विठ्ठलराव जगताप यांनी नागेश आडगावकर व रोहीत राऊतसारखे शास्त्रीय व चित्रपट संगीतातील गायक तयार केले.

लातूर जिल्ह्यातील काही कलावंतांनी बंदिशींची निर्मिती केली आहे. ज्यात सूरमणि पं. बाबुराव बोरगावकर यांनी शेकडो नवीन बंदिशींची रचना केली. त्यांच्या रचना अत्यंत सोप्या, भावपूर्ण व प्रासादिक आहेत. विशेषतः ईश्वर स्तुतीपर असलेल्या त्यांच्या या रचना प्रारंभिकपासून ते संगीत विशारदपर्यंतच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरल्या आहेत. 'रसरंग' 'सा', 'रे', 'ग', 'म', 'प', 'ध', 'नी' या सात पुस्तकातून त्या प्रकाशित केल्या आहेत. पं. शांतारामजी चिगरी व पं. डॉ. राम बोरगावकर यांनी तबलावादनातील शेकडो नवीन रचना तयार करून शिष्यांना शिकविल्या. अशा प्रकारे या तीन कलावंतांनी भारतीय शास्त्रीय संगीताच्या माध्यमाने नवनिर्मीत बंदिशीने बहारून टाकले.

हे कलावंत केवळ बंदिशींची रचना करून स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी आपल्या संगीत चिंतनातून काही नवीन राग व तालांची निर्मिती केली. पं. शांतारामजी चिगरी यांनी 'षटम रूपक' तर पं. राम बोरगावकर यांनी 'ताल-गणेश' या नवीन तालांची निर्मिती केली. पं. बाबुराव बोरगावकर यांनी 'शारदा' या नवरागाचे सृजन केले. अशा प्रकारे लातूर जिल्ह्यातील या कलावंतांनी नवीन ताल व रागांची निर्मिती करून भारतीय अभिजात संगीताला मोलाचे योगदान दिले.

लातूर जिल्ह्यातील हे सहाही कलावंत अत्यंत प्रतिभाशाली व कार्यकुशल आहेत. त्यांनी विविध सांगीतिक पदांवर राहून अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. डॉ. राम बोरगावकर यांना शासनाच्या विविध महत्त्वपूर्ण पदांवर राहता आले. इतर कलावंतांची मात्र शासकीय स्तरांतून विविध महत्त्वपूर्ण पदांवर निवड झाली नसल्याचे दिसते. या सर्वच कलावंतांनी भारतीय संगीताच्या प्रचारार्थ अत्यंत परिश्रम घेतले. तन-मन-धनाने सरस्वती मातेला तिच्या उच्चस्थानी विराजमान करण्यासाठी ध्यास घेतला. विविध उपक्रमातून अभिजात संगीत घराघरांत पोहोचविले. डॉ. राम बोरगावकर यांना महाराष्ट्र शासनाकडून सांस्कृतिक पुरस्कार देऊन गौरवित केले; परंतु इतर पाच कलावंतांची मात्र शासनाने उपेक्षा केल्याचे दिसते. त्यांना शासनाने कोणताही मानसन्मान, पुरस्कार देऊन गौरविले नाही. असे असले तरी या सहाही कलावंतांना सामाजिक व सांस्कृतिक संस्थांनी यथोचित मानसन्मान करून गौरवान्वित केले. किंबहुना रसिक श्रोत्यांना या कलावंतांना आपल्या



हृदय सिंहासनावर कायमचे स्थान दिले.

लातूर जिल्ह्यातील भूमिपुत्र असलेल्या काही कलावंतांनी इतर शहरात जाऊन अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला अशा कलावंतांच्या कार्याचा आढावा या प्रकरणाच्या शेवटी घेण्यात आला आहे. ज्यात पं. पांडुरंग मुखडे (पुणे), पं. मुकेश जाधव (पुणे), श्री. गोपाळ उगिले (बीड), श्री राजेंद्र भोसले (अहमदनगर) व श्री. अंगद गायकवाड (अहमदनगर) या पाचही कलावंतांनी अत्यंत मेहनत घेऊन प्रमाणपणाने अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार केला. पं. पांडुरंगजी मुखडे यांनी उजनीसारख्या खेड्यातून पुण्यात जाऊन आपले अस्तित्व निर्माण केले. महाराष्ट्रातील पं. वसंतराव देशपांडे, पं. भीमसेन जोशी अशा अनेक दिग्गज कलावंतांना तबल्याची अनरूप साथ करून उत्तम साथीदार कसा असतो हे महाराष्ट्राला दाखवून दिले. केवळ शास्त्रीय संगीतच नव्हे तर उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत, नृत्य, सांप्रदायिक संगीत व नाट्य संगीताला त्या त्या ढंगाने साथ करून त्यांनी शेकडो कलावंतांच्या मैफिली रंगविल्या.

पं. मुकेश जाधव या कलावंतांचा जन्म औसा तालुक्यातील एका खेड्यात झाला. गरीब व मागासवर्गीय कुटुंबात जन्माला आलेल्या या कलावंताने तबलाक्षेत्रात जी भरारी मारली आहे ती शब्दातीत आहे. 'महाराष्ट्राचा झाकीर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कलावंताने जगभरातील अनेक देशांत भारतीय अभिजात संगीताचा पताका फडकवत ठेवली. अंदलगावसारख्या अडवळणी गावात राहणाऱ्या श्री. गोपाळ जाधव या पखावज वादकाने तर दिल्ली दुमदुमून टाकली. पं. बिरजू महाराजांसारखे थोर कथ्थक नर्तकांसमवेत त्यांनी पखावज वादन केले. भारतातील विविध धृपद मेळ्यात त्यांनी आपल्या स्वतंत्र पखावज वादनातून व साथसंगतीतून संगीताचा प्रचार व प्रसार केला. श्री. अंगद गायकवाड व श्री. राजेंद्र भोसले यांनी लातूरचे अभिजात संगीत संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवले. अहमदनगरसारख्या शहरातून भावी पिढीस ते संगीताचे संस्कार करीत आहेत. मराठवाड्यातील या कलावंतांनी पश्चिम महाराष्ट्रात जाऊन अनेक शिष्य घडविले व अभिजात संगीताच्या प्रचार व प्रसारार्थ मोलाचे योगदान दिले.

अशाप्रकारे या लातूरच्या पाच भुमिपुत्रांनी देश-विदेशात जो अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार केला. त्याचे वर्णण शब्दांच्या पलीकडचे आहे. एका व्रताप्रमाणे ध्येयाने बेभान झालेल्या या कलावंतांनी लातूरच नव्हे तर संपूर्ण भारतमातेची शान-मान उंचावण्याचे कार्य केले आहे.

थोडक्यात लातूर जिल्ह्यातील या निवडक गायक वादकांच्या सांगीतिक कलाकृती रसिकात आनंदाची शिंपण करतात, सप्त रंगांची उधळण करतात, भारतीय संगीताच्या संवर्धनाबरोबरच भारतीय संगीताच्या परिवर्तनाची बीजे पेरतात, चिंतनाने ही बिजे अंकुरतात, रसिक मनाला सावली देण्याइतपत त्यांचा विस्तार आणि विकास होतो असे कार्य या कलावंतांनी केले आहे. तरी पण या कलावंताचे गायन-वादन कसे आहे हे समजण्यासाठी एकच मार्ग आहे तो म्हणजे जाणकारांनी व रसिकांनी कुतुहलापोटी का होईना त्यांच्या मैफीलींचे, ध्वनिफितीचे श्रवण करावे, जे हयात आहेत त्यांच्या सहवासातून त्यांच्या श्रेष्ठत्त्वाची अनुभूती घ्यावी.

अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करणे एवढेच ध्येय निश्चित करून या कलावंतांनी प्रसंगी घरावर तुळशीपत्र ठेवले. अभिजात संगीत हे लातूरच नव्हे तर संपूर्ण मराठवाडा व महाराष्ट्रात पोहोचले पाहिजे याचाच त्यांनी ध्यास घेतला. फळाची अपेक्षा न करता एका व्रताप्रमाणे त्यांनी आपले जीवन संगीतासाठी समर्पित केले. लातूरसारख्या म्हटले तर ग्रामीण भागात राहून या कलावंतांनी जो त्याग केला तो शब्दातीत आहे. प्रतिकूल परिस्थितीशी झुंजत, संकटावर मात करीत 'फिनिक्स' पक्षाप्रमाणे भरारी घेणाऱ्या या कलावंतांचे सांगीतिक कार्य निश्चितच प्रेरणादायक आहे. प्रस्तुत शोध-निबंध संगीत साधक, रसिक श्रोते व अभ्यासकांना निश्चितच दिशादर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

या शोध प्रबंधाच्या माध्यमातून निवडक कलावंतांच्या सांगीतिक कार्याचा प्रचार व प्रसार आपण पाहिला आहे. याच्याही पलीकडे लातूर जिल्ह्यात अजूनही काही थोर संगीत तज्ज्ञ आहेत. त्यांच्या कार्याचा व संगीत प्रचार-प्रसाराचा अभ्यास करता येऊ शकतो. लातूर जिल्ह्यातील लोककला व सुगम संगीताच्या प्रचार-प्रसारार्थ ज्या कलावंतांनी कार्य केले आहे. ज्यांचा येथे उल्लेख नाही असे अनेक कलावंत आहेत. त्यांच्याही कार्याचा अभ्यास करता येऊ शकतो.

♦ ♦ ♦



# संदर्भ ग्रंथ सूची

*** मराठी संदर्भ ग्रंथ सूची :**


०१. काळे भगवान - संपादक, 'मराठवाडा काल आणि आज', संकेत प्रकाशन, जालना प्रथमावृत्ती १० एप्रिल १९८६.

०२. कुरूंदकर नरहर, 'मागोवा' देशमुख आणि कंपनी, पुणे २, प्रथमावृत्ती १ फेब्रुवारी १९६७.

०३. गजेंद्रगडकर अरविंद, 'असे सुर अशी माणसे', उन्मेष प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती ११ ऑगस्ट २००३.

०४. जोशी गोविंद प्रल्हाद, 'कृष्णा गोदा परिसर :- कांही शोध व बोध', कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद प्रकाशन, गुलबर्गा, प्रथमावृत्ती १३ जानेवारी १९९२.

०५. तारळेकर ग. ह. - भाषांतरकार, 'संगीत रत्नाकर' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती १९७५.

०६. देगलूरकर शिवदास रं. - संपादक, 'मराठवाडा संगीत गौरवग्रंथ', सौ. शालिनी देगलूरकर, अंबाजोगाई, प्रथमावृत्ती १५ जुलै २००१.

०७. परळीकर कमलाकर, 'समर्थ रामदासांचे संगीत चिंतन', संस्कार प्रकाशन, मुंबई द्वितीयावृत्ती ११ जुलै २००६.

०८. पाटील श्रीराम - संपादक, 'मायबोलीचा मराठवाडा' योगेश प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी २००२.

०९. पानसे मुरलीधर गजानन, 'यादवकालीन महाराष्ट्र', मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९६३.

१०. मालकर अंजली, 'मराठवाड्यातील अभिजात संगीत' सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, प्रथमावृत्ती १५ मे २००५.

११. रानडे अशोक दा., 'संगीत विचार', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पहिली आवृत्ती २००९.

१२. लिंगे दीपक, प्रकाशक - 'मृदंग साधना', शिवप्रसाद लिंगे, उस्मानाबाद, प्रथमावृत्ती २६ जुलै २००७.

१३. सहस्त्रबुद्धे पु. ग., 'महाराष्ट्र संस्कृती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९७९.

१४. सौताडेकर वि. स. 'लातूर : काल आणि आज', डॉ. सयाजीराव सौताडेकर, लातूर दुसरी आवृत्ती १ मे २००४.

* **हिंदी संदर्भ ग्रंथ :**

०१. चतुर्वेदी सुलोचना, आचार्य बृहस्पती, 'खुसरो तानसेन तथा अन्य कलाकार', राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करन १९७६.

०२. शर्मा सुनीता, 'भारतीय संगीत का इतिहास' संजय प्रकाशन, दिल्ली प्रथम संस्करन १९९६.

* **इंग्रजी संदर्भ ग्रंथ :**

Disha - Directory of Indian Class Artrsf Neharu Center, Mumbai.

* **स्मरणिका :**

०१. कुलकर्णी सुधाकर - संपादक, 'कलासंस्कार संगीत महोत्सव, लातूर', प्रा. वारद काशीनाथ, प्रथमावृत्ती २६ नोव्हेंबर १९८७.

०२. चिल्ले रमेश - संपादक, कुंभार नागोराव, 'भीमाशंकरआप्पा पंचाक्षरी : संगीत रूजविणारा नांदीकार जन्मशताब्दि विशेषांक', शब्दवेल प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती २०१५.

०३. जगदाळे संदिपान - संपादक, 'सूरताल-पं. शांतरामजी चिगरी गुरुजी अमृतमहोत्सव गौरवग्रंथ', संकल्प प्रकाशन, लातूर प्रथमावृत्ती, २४ ऑगस्ट २०१५.

०४. देऊळगावकर चंद्रकांत - संपादक,'पाचवे मराठवाडा संगीत संमेलन, लातूर', प्रा. वारद के. एस., प्रथमावृत्ती १२ फेब्रुवारी १९८१.

०५. देगलूरकर शिवदास - संपादक, 'गंधर्वगाथा', बालगंधर्व संगीत विद्यालय आणि गुरुकुल, अंबाजोगाई, प्रथमावृत्ती २०११.



०६. महागावकर नानासाहेब - संपादक, 'स्वरानंद-सासवड-सरस्वती संगीत विद्यालय, दशकपूर्ती सोहळा १९९६', प्रथमावृत्ती २४ फेब्रुवारी १९९६.

०७. रणसुभे सूर्यनारायण - संपादक, 'गाथा पूरणमलांची आणि जडणघडण मराठवाड्याची', अग्रवाल कमलकिशोर, प्रथमावृत्ती २०१४.

०८. सौताडेकर विजय - संपादक, 'संवादिनी' स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला, लातूर, रौप्यमहोत्सव २०१० व सवाई संगीत संमेलन लातूर', दबडगावकर विजय, प्रथमावृत्ती २७ फेब्रुवारी २०१०.

* **नियतकालिके :**

भार्गव कुमुदिनी - संपादक, 'विवेकानंद वार्ता', विवेकानंद रूग्णालय, लातूर श. १९३६, ५ मार्च २०१५.

* **कोष :**

कुंटे चैतन्य, माधव इमारते - संपादक, 'शिल्पकार : चरित्र कोश- खंड ७, भाग २ संगीत', साप्ताहिक विवेक, हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई, प्रथमावृत्ती १५ मार्च २०१४.

* **सहकारी प्रकाशने :**

०१. पाठक अरुणचंद्र शं. - संपादक, 'महाराष्ट्र राज्य गॅजेटिअर, लातूर जिल्हा - भाग २', दर्शनिका विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८.

* **सहाय्यक ग्रंथसूची (मराठी) :**

०१. आगलावे प्रदीप, 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १ जानेवारी २०००.

०२. इनामदार दे. वि. - संपादक, 'संत एकनाथ-दर्शन' कॉन्टिमेन्टल प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती ३१ ऑक्टो. १९८३.

०३. काळे भगवान, 'मराठवाडा सारस्वत', संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती २१ डिसेंबर २००१.

०४. गोखले वा. वा., 'संगीतातील माणिकमोती' रोहण प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती ८ जानेवारी २००३.

०५. जोशी सु. ग. -संपादक, 'मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७४.

०६. जोशी सु. ग., 'लातूरचा इतिहास व रत्नापूर महात्म्य', मराठवाडा संधोधक मंडळ, लातूर प्रथमावृत्ती १ जानेवारी २००८.

०७. ढेरे रा. चि. - संपादक, 'सकल संतगाथा-खंड दुसरा' वरदा प्रकाशन, पुणे १६ नवी आवृत्ती १५ मार्च १९८३.

०८. तुळपुळे शं. गो. 'यादवकलीन मराठी भाषा' व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ऑक्टोबर १९७३.

०९. थत्ते अनया, ' संगीतातील संशोधन पद्धती', संस्कार प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती १६ मार्च २०१०.

१०. दळवी श्रीकृष्ण, 'ही माणसे मोठीच', मृण्मयी ऋग्वेदी प्रकाशन, प्रथमावृत्ती २ ऑक्टोबर २००२.

११. देगलूरकर शिवदास, 'एका तालियाने', विमल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २२ ऑगस्ट १०. २००९.

१२. देशपांडे वामन, महाराष्ट्राचे संगीतातील कार्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती जून १९७४.

१३. देशपांडे वामन हरी, 'आलापिनी', मौज प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती मार्च १९७९.

१४. देवधर बी. आर., 'थोर संगीतकार' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई द्वितीय आवृत्ती १९९९.

१५. पाटील वा. भा., 'संशोधन पद्धती', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८.

१६. महाजन शा. ग., 'मी पीएच. डी. होणारच', युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१२.

१७. मालसे स. गं. 'शोधनिबंधाची लेखन पद्धती', संपादन - मिलिंद मलाशे, लोकवाङ्मयगृह, मुंबई, तृतीय आवृत्ती, मे २००७.

१८. मुळगावकर अरविंद, 'तबला' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर प्रथमावृत्ती १९७५.



१९. क्षीरसागर शकुंतला,'प्रबंध लेखनाची पद्धती', युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१२.

* **सहाय्यक ग्रंथसूची (हिंदी) :**

०१. नागपाल अलका, 'भारतीय संगीत में शोध- प्रविधि', राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, प्रथम संस्करन १९९६.

०२. मिस्त्री आबान ए., 'पखावज और तबला' के घराने एवं परम्परायें, प्रकाशक - पं. केकी एस जिजिना - स्वरसाधना समिती, बम्बई प्रथमावृत्ती १९८४.

०३. बैनर्जी नमिता, 'मध्यकालीन संगीततज्ज्ञ एवं उनका तत्कालीन समाजपर प्रभाव', राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, प्रथमावृत्ती १९९६.

०४. शर्मा विनयमोहन, 'हिंदी को मराठी संतों की देन', बिहार राष्ट्रभाषा-परिषद, पटना ३, प्रथम संस्करन मार्च १९५७.

०५. श्रीवास्तव हरिश्चंद्र, 'हमारे प्रिय संगीततज्ज्ञ', संगीत सदन प्रकाशन, इलाहाबाद, प्रथम संस्करन १९९३.

* **नियतकालिके :**

०१. कशाळकर विकास, मेनका, सुमन बेहरे, मंगली आठलेकर, पुणे, मे २००८.

०२. नानल माधवी, संपादक संगीत कलाविहार, अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई, जून २०१२.

०३. नानल माधवी, संपादक संगीत कलाविहार, अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई, जुलै २०१०.

०४. पटवर्धन सुधा, संपादक संगीत कलाविहार, अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई, ऑगस्ट २००६.

♦ ♦ ♦